Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रिटिशांचा इतिहास

खंड दुसरा (उत्तरार्ध)

[इ. स. १८९० ते इ. स. १९४०]

४१म
१२ग

र्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

LIBRARY,
GURUKULA KANGRI.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

❀ ओ३म् ❀

पुस्तक-संख्या ४१ म/१८ग

पंजिका संख्या २०१८६

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियाँ लगाना वर्जित है। कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रिटिशांचा इतिहास

खंड दुसरा (उत्कर्ष)

[इ. स १८२० ते इ. स. १९४०]

CHECKED 1973

लेखक

विष्णु सिताराम चितळे,

बी. ए., बी. टी. (मुंबई), टी. डी. (लंडन),

एम्. आर्. एस्. टी. (इंग्लंड).

'हिंदुस्थानची शासनपद्धति' या पुस्तकाचा कर्ता,

असिस्टंट सुपरिंटेंडेंट, न्यू. इं. स्कूल, पुणें

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

KARNATAK PUBLISHING HOUSE

BOMBAY 2

मूल्य सवा रुपया

LIBRARY, GURUKULA KANGRI.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

First Edition 1940

Printed by M. N. Kulkarni, at the Karnatak Printing Press, Karnatak House, Chira Bazar, Bombay 2, and published by him at the Karnatak Publishing House, Chira Bazar, Bombay 2.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहिल्या खंडाची प्रस्तावना

इतिहासाच्या अभ्यासानें मुलांना तत्त्वबोध होईल, त्यांची कल्पनाशक्ति फांकून तिला तेज चढेल, त्यांची स्मरणशक्ति वाढेल, त्यांच्या तर्कपद्धतीला विशिष्ट वळण लागेल, त्यांच्यांत चिकित्सक बुद्धि जागृत होईल व त्यामुळें खऱ्याखोट्याचा न्याय-निवाडा करण्याची त्यांच्यांत खरी धमक येईल ! परंतु आज शाळेंत ज्या प्रकारचें शिक्षण दिलें जातें, त्यामुळें वरील सर्व गोष्टी खरोखर घडतील का ? सध्यांच्या इतिहास-शिक्षणानें वरील हेतु क्वचितच साध्य होत असतील; कारण आमच्या शाळांतील इतिहास-शिक्षणाची दिशाच चुकीची आहे. शिवाय ज्यांना इतिहास शिकवावयाचा त्यांच्या मनाची ठेवण व मनाच्या प्रवृत्ति काय आहेत हें लक्षांत न घेतांच विषय शिकविला जातो ! इतिहास-शिक्षणानें विद्यार्थ्यांच्या बुद्धीला वळण लागावें अगर त्यांच्या मनोविकासास शिक्षण कारणीभूत व्हावें; केवळ याच हेतूनें इतिहास शिकविणें चूक होणार नाहीं का ? कारण इतिहासांत मुलांना मनुष्याचीं अचाट कृत्यें, त्याचा जीविताशीं झालेला झगडा, त्याचा विकास, त्याची प्रगति, त्याचा पराभव या व अशा गोष्टींच्या ज्ञानामुळें जो आनंद मिळतो तो कल्पनातीत असतो. इतिहास शिकतांना अगर वाचतांना भिन्न जगांत, भिन्न परिस्थितींत, भिन्न समाजांत, भिन्न लोकांत व भिन्न संस्कृतींत विद्यार्थ्याला वावरावें लागतें; परंतु त्यामुळेंच त्याला अपरिमित आनंद मिळत असतो. तो तशा भिन्न परिस्थितींत वावरत असतांही आपण आपल्या पूर्वजांच्या अगर त्यांच्या वेळच्या इतर लोकांच्या सुखःदुखाच्या गोष्टी वाचीत आहोंत याची त्याला पूर्ण जाणीव असते व यामुळेंच त्या त्या वेळच्या लोकांच्या सुखामुळें त्याला सुख होतें, दुःखामुळें दुःख होतें व त्यांच्या जयापजया-मुळें त्याला आनंद अगर दुःख होतें. या त्याच्या समरसतेमुळेंच त्याला खरा आनंद होतो आणि तोही कशाकरितां, तर त्या पूर्वींच्या लोकांशीं आपलें अल्पस्वल्प नातें जोडून त्यांचीं सुखदुःखें त्याला समरसतेनें अनुभवावयास मिळतात म्हणून.

मुलांचा हा आनंद टिकवावयाचा असेल अगर त्यास तो अनुभविण्यास मिळावा अशी इच्छा असेल तर इतिहास-शिक्षणाची दिशाच पार बदलावयास नको काय ? एक काळ असा होता कीं, मुलांच्या वरील प्रकारच्या नैसर्गिक प्रवृत्तींकडे दुर्लक्ष करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व राष्ट्राच्या केवळ लष्करी उन्नतीकडेच लक्ष देऊन इतिहास शिकविण्याची व लेखनाची प्रथा रूढ होती. अर्थात् इतिहासाच्या इंग्रजी पाठ्य-पुस्तकांतून व त्यांस आधारून लिहिलेल्या मराठी पाठ्य-पुस्तकांतून राष्ट्राच्या राजकीय व परराष्ट्रीय उलाढालींवरच सर्व लक्ष केंद्रीभूत होत असे. यामुळें राजकीय घडामोडींची उकल, लष्कराचे पराक्रम, त्याच्या हालचाली व डावपेंच, युद्धांतील लढायांचीं प्रात्यक्षिकें व त्यांतील मोहिमांचीं रसाळ व भावनोद्दीपक वर्णनें, मोहिमांचे कार्यक्रम, लढाईच्या वेळचे सैन्यरचनेचे नकाशे यांची रेलचेल शालेय पाठ्य-पुस्तकांतून असे. वरीलप्रमाणेंच राजघराण्यांतील पुरुषांच्या जन्ममृत्यूंच्या नोंदी, सनावळ्या, तहनामे, वेढे, खून, मारामाऱ्या, अत्याचार, पार्लमेंटचे कायदे यांचीं रुक्ष वर्णनेंही पुस्तकांतून अगदीं इत्थंभूत देण्यांत येत. अर्थात् त्याच गोष्टींवर वर्गांतून शिक्षक भर देत असतील, यांत नवल तें कसलें ! वरील सर्व गोष्टींना इतिहासाच्या अध्यापनांत स्थान नाहीं असें नाहीं; परंतु त्यांचाच केवळ अतिरेक होऊन कसा चालेल? कारण वरील गोष्टीच शाळांतून शिकविल्या गेल्यानें विद्यार्थी उत्तम सैनिक म्हणून कदाचित् तयार होईल; परंतु उत्तम नागरिक बनण्यास लागणारे गुण त्याच्यांत उतरतीलच असें सांगतां येईल काय ?

ही विचारसरणी मान्य केल्यास मनुष्याची हळूहळू उत्क्रांति व प्रगति कसकशी होत गेली, त्यानें कोणकोणतीं अचाट कृत्यें केलीं, त्याला कोणकोणत्या संकटांशीं तोंड द्यावें लागलें, त्यांतून तो सहीसलामत कसा निघाला, त्यानें कोणकोणत्या संस्था स्थापन केल्या व आपल्या समाजाचें पाऊल कसकसें पुढें नेलें हें इतिहासाच्या अध्ययनानें मुलांस समजण्यास नको काय? त्याचप्रमाणें मनुष्याच्या आचाराविचारांत, राहणींत, व्यवहारांत, राजकारणांत—अर्थात् समाजाच्या आर्थिक, राजकीय, धार्मिक, लष्करविषयक व सामाजिक परिस्थितींत निरनिराळ्या काळांत कसकसा बदल होत गेला व प्रत्येक युगांत समाजाचें पाऊल कसकसें पुढें पडत गेलें हें इतिहासाशिवाय दुसरा कोणता विषय समजावून देणार आहे ? या प्रत्येक स्थित्यंतराच्या वेळीं त्या त्या वेळच्या स्त्री-पुरुषांनीं आपलें आचरण कसें ठेविलें, आपल्या चळवळी कशा चालविल्या व आपल्या संस्था स्थापून व जगवून, त्यांची प्रगति कशी करून घेतली, हें समजल्यानें विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं निसर्गतःच असलेल्या भावना एकवटून त्यांस खात्रीनें आनंद होईल. एवढेंच नव्हे, तर त्यांच्या बुद्धीचा विकास होऊन राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीनें ते कार्यक्षम होतील. सारांश इतिहासाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेखन काय किंवा त्याचें अध्यापन काय, मानवी उत्क्रांति व मानव्याचा विकास लक्षांत घेऊनच करावयास पाहिजे.

या सर्व गोष्टी लक्षांत घेतां इतिहास-लेखनाचें अगर त्याच्या अध्यापनाचें कार्य किती बिकट होऊन बसतें हें समजून येण्यासारखें आहे. इतिहास हा जात्याच एक रुक्ष विषय समजला जातो व असल्या विषयाच्या लेखनाचें व अध्यापनाचें काम एखाद्या रुक्ष मनुष्यानें करावयाचें म्हटल्यास कोणता अनवस्थाप्रसंग गुदरेल हें सांगणें कठिणच ! त्याच्या अध्यापनांत जिवंतपणा उत्पन्न करण्याकरितां किती यातायात करावी लागते तें खऱ्या इतिहास-अध्यापकासच माहीत ! आणि तो जर तसा असेल तर अनेक प्रकारच्या उपलब्ध साधनांनीं तो आपला विषय अत्यंत चित्ताकर्षकरीतीनें समजावून देऊन मुलांमध्यें त्या विषयाबद्दल नुसती आवडच नव्हे, तर प्रत्येक गोष्टीचें यथायोग्य व सोपपत्तिक ज्ञान तो मुलांस करून देऊन त्यांस तो आनंदवील. एवढेंच नव्हे, तर 'मेलेले मुडदे उकरून काढूनही' त्यांना तो आपल्या मुलांपुढें जिवंतपणें नाचवील व त्यांच्यांत चेतना उत्पन्न करून त्यांच्या बुद्धीला, मनाला व आचरणाला उत्तम प्रकारचें वळण देईल.

इतिहासाच्या अध्यापनांत अशा प्रकारचा जिवंतपणा उत्पन्न करावयाचा असल्यास विद्यार्थ्यांपुढें अनेक प्रकारच्या साधनांची शिधा-सामुग्री मांडावी लागते. त्या त्या काळच्या पुरुषांचीं, स्थळांचीं, देखाव्यांचीं, जहाजांचीं, इमारतींचीं चित्रें, मूळ व अस्सल दस्तऐवज, पत्रसंग्रह, हकीकती, निरनिराळीं नाणीं वगैरेंची तर अत्यंत जरुरी असतेच; पण जुनीं ऐतिहासिक स्थळें, किल्ले, संस्था वगैरेंस प्रत्यक्ष भेटी देणेंही रास्त व उपयुक्त असतें. मूळ व अस्सल उतारे हे नेहमींच उत्तम मार्गदर्शक समजले जातात व त्यांवरून विद्यार्थ्यांस योग्य तो बोध झाल्याशिवाय रहात नाहीं. कारण हे उतारे थोडे जुनाट व त्यामुळें थोडे चमत्कारिक भासले तरी ते सोपे व तत्कालिन परिस्थिति नीट समजावून घेण्यास व देण्यास बहुमोल व यथायोग्य असतात. त्यामुळेंच विद्यार्थ्यांना—त्यांतल्या त्यांत मोठ्या विद्यार्थ्यांना—ते फार आवडतात व त्यांत त्यांचें मन सदैव रमतें. मात्र हे उतारे योग्य तऱ्हेनें शोधून काढण्यास थोडें कौशल्य लागतें. या उताऱ्यांवरून त्या त्या वेळच्या लोकांच्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीची यथार्थ जाणीव होते. तसेंच चित्रांवरूनही लोकांचे पोषाख, उद्योग-धंदे, चालीरीति वगैरे गोष्टींचा बोध होण्यास मदत होते. ऐति-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हासिक स्थळांस भेटी दिल्यानें मुलांस अनेक प्रकारचें ज्ञान प्राप्त होतें व विद्यार्थ्यांच्या चौकसपणास वाव मिळून तो वाढतो. त्याचप्रमाणें ऐतिहासिक प्रसंगावर उभारलेले वादविवाद व नाट्यरूप संवाद यांमुळें तो तो ऐतिहासिक प्रसंग विद्यार्थ्यांपुढें जिवंतपणें उभा करतां येतो. याशिवाय मुलांच्या हस्तव्यवसायास मार्गदर्शक व उपकारक होणारींही अनेक साधनें आहेत. शिक्षकांनीं आपल्या विद्यार्थ्यांकडून त्या त्या वेळचीं व प्रसंगांचीं चित्रें काढून घेतलीं, घरांचे, होड्यांचे, किल्ल्यांचे, यंत्रसामुग्रीचे कागदी, लांकडी अगर मातीचे उत्तम नमुने तयार करून घेतले तरी त्यांपासूनही मुलांस ऐतिहासिक ज्ञान आपोआप होऊन त्यांस खरा आनंद प्राप्त होईल. निरनिराळ्या प्रकारचे आलेख, कालादर्श, नकाशे वगैरे प्रत्यक्ष काढवून घेण्यानेंही अमोलिक साहाय्य मुलांस लाभेल. आधुनिक काळांत नभोवाणी, मॅजिक लँटर्न, एपिडायास्कोप, सिनेमा वगैरेंच्या मदतीनें कितीतरी ऐतिहासिक माहिती थोड्या वेळांत व थोड्या श्रमानें विद्यार्थ्यांना मिळूं शकेल. अशा तऱ्हेच्या साधनांचा उपयोग केला असतां इतिहासाच्या अध्यापनांत जिवंतपणा कां येणार नाहीं ? मात्र योजक तितका कुशल व चतुर पाहिजे.

या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन व जितक्या आधुनिक उपलब्ध साधनांचा उपयोग करून घेतां येईल तितका तो करून घेऊन, प्रस्तुत पुस्तक इंग्रजी चौथी व पांचवी या इयत्तांतील व इतर विद्यार्थ्यांकरितां लिहिलें आहे. बहुतेक सर्व आधुनिक तंत्रांचा उपयोग करून मूळ विषय मीं रंगविला आहे. ज्या ज्या तऱ्हांनीं पुस्तक मार्गदर्शकच नव्हे, तर मनोरंजक व चटकदार होईल त्या त्या तऱ्हांनीं तें तसें करण्याचा मीं प्रयत्न केला आहे. भाषा साधी, सोपी व मुलांस सहज समजेल अशी वापरली असून साधारण विद्यार्थ्यांप्रमाणेंच बुद्धिमान् विद्यार्थ्यांच्या बुद्धीलाहि योग्य प्रकारची चालना मिळेल, अशी आशा आहे. विषयाचें विवेचन सहज समजावें अशीच त्याची मुद्देसूद मांडणी केली आहे. प्रत्येक धड्याच्या शेवटीं अनेक प्रकारचे प्रश्न अभ्यासाकरितां व मुलांची विवेचकशक्ति जागृत व्हावी म्हणून दिलेले आहेत. त्यामुळें मुलांच्या हस्तव्यवसायास, नाट्याभिनयास अगर वादविवादासही वाव मिळण्यासारखा आहे. ते सगळे अगर त्यांतील निवडक प्रश्न वर्गांत अगर अन्य प्रकारांनीं शिक्षकांनीं मुलांकडून करून घेतल्यानेंही उत्तम काम होण्यासारखें आहे. अत्यंत खटपट करून मिळविलेलीं अनेक प्रकारचीं सुमारें शेंदीडशें चित्रें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या पुस्तकांत ठिकठिकाणीं विखुरलेलीं दिसतील. त्यामुळें मुलांस त्या त्या वेळच्या लोकांचे पोषाख, चालीरीति, खेळ, उद्योगधंदे वगैरे गोष्टींसंबंधीं ज्ञान होण्यास मदत होणारी आहे. शिवाय मूळ व अस्सल उताऱ्यांचीं मराठीमध्यें सुमारें तीस-चाळीस रूपांतरें दिल्यानें पुस्तकाचें महत्त्व वाढलें आहे. त्या त्या युगांतील लोकांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय जीवनावर प्रकाश पाडील, असा अनेक प्रकारचा मजकूर या पुस्तकांत समाविष्ट केल्यानें इंग्रजांच्या राहणींत, जीवनांत, उद्योगधंद्यांत, चालीरीतींत, आचारविचारांत, युद्धपद्धतींत कसकसा फरक होत गेला, हें विद्यार्थ्यांस सहज समजून येणार आहे. तसेंच प्रत्येक धड्याच्या शेवटीं व अन्य ठिकाणीं सुमारें तीस-चाळीस कालादर्श, वीस-पंचवीस नकाशे व आलेख व निरनिराळे वंशवृक्ष दिल्यानें पुस्तकाच्या अंतरंगाचें सौंदर्य वाढेल असें मला वाटतें. युद्धविषयक कंटाळवाण्या हकीगती अत्यंत आटोपशीर पद्धतीनें सांगितल्यानें त्या मुलांस आवडतील अशी आशा आहे. थोडक्यांत म्हणजे पुस्तकाची उपयुक्तता व सौंदर्य वाढविण्याचा व पुस्तकाचें नांव सार्थ करण्याचा शक्य तों कसोशीचा प्रयत्न केला आहे; तो सर्वांस पसंत पडल्यास मला खात्रीनें जास्त उमेद येऊन आनंद होईल.

पुस्तकाच्या शेवटच्या पानाकडे नजर फेंकल्यास एवढें मोठें पुस्तक शाळांतून पाठ्य-पुस्तक असणें योग्य आहे काय, असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होणार; पण हें पुस्तक लहानच आहे हेंच त्याला माझें उत्तर. आजपर्यंत लहान लहान पुस्तकें मराठी बोधभाषा असूनही, मुलांच्या हातीं दिल्यानें त्यांची दृष्टि आकुंचित करण्याचाच प्रयत्न केला गेला. तसें होऊं नये ही माझी इच्छा. तसेंच या पुस्तकांतील प्रत्येक गोष्ट शिक्षकानें विद्यार्थ्यांस शिकविलीच पाहिजे असें नाहीं. युक्तायुक्त विचार केला व तारतम्य वापरलें तर आपल्या विद्यार्थ्यांला कोणता भाग शिकविणें योग्य व कोणता शिकविणें अयोग्य हें शिक्षकाला सहज समजून येणारें आहे. अर्थात् शिक्षकाच्या पसंती-नापसंतीस व त्याच्या निवडीला वाव देणेंही रास्त होतें. शिवाय लोकांच्या सर्वांगीण उन्नतीची व प्रगतीची आधुनिक तंत्रासहित मांडणी करावयाची तर तो मोठाच ग्रंथ होणार आहे. तशांतच चित्रांनीं, उपयुक्त व मार्गदर्शक प्रश्नांनीं व मूळ अस्सल उताऱ्यांनींही व निरनिराळ्या युगांतील ब्रिटिशांच्या सामाजिक, आर्थिक व धार्मिक घडामोडींच्या वर्णनांनींच प्रस्तुत पुस्तकाचीं निम्मीं अधिक पानें व्यापलेलीं आहेत आणि ही वाढ अनावश्यक अशी कशी म्हणतां येईल ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या सर्व गोष्टींचा विचार करतां पुस्तक दिसायला मोठें दिसत असलें, तरी त्याची वाढ युक्तच आहे व ज्या हेतूनें तें लिहिलें आहे त्यालाही तें पोषकच आहे. त्यामुळें सर्व प्रकारच्या साधनांनीं व माहितीनें परिपूर्ण असें हें मराठींतील पहिलेंच पाठ्य-पुस्तक आहे, असें म्हणणें फारसें धाष्ट्र्याचें होणार नाहीं असें वाटतें. माझी ही कृति सर्वांस पसंत पडल्यास माझ्या श्रमांचें व माझ्या गेल्या दहा-पंधरा वर्षांच्या अध्यापनक्षेत्रांतील अनुभवाचें चीज झालें असें मी कां समजूं नये ?

इतक्या मोठ्या पुस्तकाची छपाई-प्रकाशनाची जबाबदारी व्यक्तिशः अंगावर घेणें मला शक्य नव्हतें. त्यांतून मला मोकळें केल्याबद्दल मुंबईच्या कर्नाटक पब्लिशिंग हौसचे मालक श्री. मंगेशराव कुळकर्णी यांचे नुसते कोरडे आभार मानून त्यांच्या ऋणांतून मी मुक्त होणार नाहीं. त्यांनीं हरघडी वाटेल त्या प्रकारची मला मदत दिली नसती तर हें पुस्तक माझ्या हातून लिहून तयारही झालें नसतें. लंडनच्या ब्रिटिश म्युझियमच्या ट्रस्टींनीं व नॅशनल पोर्ट्रेट गॅलरी व सायन्स म्युझियमच्या डायरेक्टरांनीं मोठ्या उदार अंतःकरणानें अनेक चित्रें या पुस्तकांत घालण्यास परवानगी दिली याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होणार आहेत. माझे स्नेही श्री. शि. आ. आंबर्डेकर यांनीं सुवाच्य व सुंदर अशी हस्तलिखित प्रत तयार करून दिली, श्री. प. कृ. लेले यांनीं सुंदर चित्रें व रेखीव नकाशे व आलेख तयार करून दिले व श्री. कृ. के. केळकर यांनींही बरींच चित्रें काढून दिलीं, या सर्व कामाबद्दल त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें.

शेवटची विनंति इतकीच कीं, या पुस्तकांत अनेक प्रकारच्या उणीवा, चुका व दोष राहणें शक्य आहे. पुस्तकाच्या चांगुलपणाचा तेवढा मी फायदा घ्यावयाचा, मग त्यांतील दोषांचा वांटा मीं कां घेऊं नये ? अर्थात् त्या सर्वांची जबाबदारी मी अत्यंत संतोषानें घेण्यास तयार आहें. मात्र सवानीं ते मला कळवावे. त्याबद्दल मी त्यांचा आभारी होईन.

पुणें शहर,
मंगळवार, ता. २ मे, १९३९.

वि. सि. चितळे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चार शब्द

मागील दोन्ही भाग लिहितांना मी जें ध्येय व धोरण आंखलें होतें, त्यास अनुसरूनच हाही कालखंड तयार केला आहे. या खंडांतील उतारे मिळवितांना फार खटपट करावी लागली. ते उतारे जितके चांगले निवडून घेतां येतील तितके ते घेतलेले आहेत. ते सर्वांस आवडतील व माझ्या श्रमाचें चीज होईल अशी माझी खात्री आहे. या पुस्तकांतील चित्रें जितकीं अस्सल मिळवितां आलीं तितकीं मिळवून मीं घातलीं आहेत. बाकीचीं चित्रें श्री. कृ. के. केळकर यांनीं काढून दिलीं व नकाशे व आलेख श्री. मो. ब. पुरंदरे यांनीं काढून दिले. त्याबद्दल त्या दोघांचा मी आभारी आहें.

या पुस्तकाचा पहिला व दुसरा खंड (पूर्वार्ध) दुय्यम शाळांकरितां सरकारी विद्याखात्यानें 'पाठ्य-पुस्तक' म्हणून मंजूर केला आहे. त्याबद्दल मी त्या खात्याचा अत्यंत आभारी आहें. हाही भाग लौकरच मंजूर होईल अशी मला खात्री आहे.

माझे स्नेही श्री. शि. आ. आंबर्डेकर यांनीं मुद्रितें तपासण्यास मला मदत केली त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहें.

कर्नाटक पब्लिशिंग हौसचे मालक श्री. मंगेशराव कुळकर्णी यांनीं याही भागाची छपाई-प्रकाशनाची जबाबदारी आपल्यावर घेतली, त्याबद्दल त्यांचाही मी अत्यंत आभारी आहें.

'ब्रिटिशांचा इतिहासा'चे तीनहि भाग लिहिण्याच्या वेळीं ज्या ज्या पुस्तकांचा मला वेळोवेळीं अत्यंत उपयोग झाला, त्यांच्या कर्त्यांचा मी फार ऋणी आहें. त्या सर्वांची यादी प्रत्येक भागाच्या शेवटीं मी जोडलेली आहेच.

माझ्या इच्छेप्रमाणें 'ब्रिटिशांचा इतिहास' संपूर्ण लिहून पुरा झाला व माझा हा प्रयत्न अनेकांस पसंत पडला यामुळें मला फार आनंद होत आहे. सर्वांनीं माझी ही कृति गोड मानून घेतली याबद्दल त्यांचाही मी आभारी आहें.

पुणें शहर,
ता. १ नोव्हेंबर, १९४०.

वि. सि. चितळे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

	पृष्ठांक
१. पार्लमेंटच्या सुधारणेचा उषःकाल	१–१६
२. पार्लमेंटच्या सुधारणांचें बिल पास झालें	१७–२८
३. संरक्षित व्यापार कीं खुला व्यापार	२९–५०
४. पूर्वेकडील प्रश्न—लॉर्ड पामर्स्टन	५१–७१
५. विल्यम एवर्ट ग्लॅडस्टन	७२–८३
६. साम्राज्यवादी बेंजामिन डिझरेली–बेकन्सफील्डचा अर्ल ...	८४–९३
७. ग्लॅडस्टनचें दुसरें व तिसरें प्रधानमंडळ	९४–१०४
८. व्हिक्टोरिया राणीची अखेर	१०५–११९
९. ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार	१२०–१३७
१०. शास्त्रीय प्रगति व उद्योगधंद्यांची उन्नति	१३८–१५४
११. एकोणिसाव्या शतकांतील कांहीं ठळक विशेष	१५५–१७२
१२. एकोणिसाव्या शतकांतील लोकांचें जीवन	१७३–१८५
१३. शांततारक्षणार्थ युरोपियन राष्ट्रांची धडपड	१८६–१९९
१४. ॲस्क्विथच्या प्रधानमंडळाची कामगिरी	२००–२११
१५. युरोपांतील महायुद्ध (१९१४–१९१८)	२१२–२३६
१६. महायुद्धानंतरचें इंग्लंड	२३७–२५०
१७. दुसरें जागतिक युद्ध (१९३९–)	२५१–२६२
१८. विसाव्या शतकांतील इंग्लंड	२६३–२७३
१९. इंग्लंडची राज्यघटना	२७४–३०३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नकाशे – आलेख – अनुक्रमणिका

	पृष्ठ
१. बाल्कन राष्ट्रें व क्रिमिया	५६
२. दक्षिण आफ्रिकेंतील ब्रिटिश वसाहती	१२५
३. ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार (आलेख)	१२७
४. भूगोलावरील ब्रिटिश साम्राज्य	१३३
५. इंग्लंडच्या व्यापाराची वाढ (आलेख)	१४२
६. जगाची व्यापारी शर्यत	१४७
७. इंग्लंडचा निर्यात व्यापार	१६६
८. इंग्लंडचा आयात व्यापार	१६८
९. महायुद्धांतील पश्चिम आघाडी	२१९
१०. सन १९१४ मधील युरोपखंड	२३०
११. सन १९२१ मधील युरोपखंड	२३०
१२. हॅनोव्हर व विंडसर राजघराणीं	३०४

वंशवृक्ष

१. विंडसर घराणें	१८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रांची अनुक्रमणिका

पृष्ठ

१. चौथा जॉर्ज १
२. जॉर्ज कॅनिंग (National Portrait Gallery) ... ४
३. विल्यम हस्किसन (National Portrait Gallery) ... ८
४. चौथा विल्यम (National Portrait Gallery) ... १७
५. राणी ॲडेलेड (National Portrait Gallery) ... १७
६. विल्यम विल्बरफोर्स (National Portrait Gallery) ... २३
७. राणी व्हिक्टोरिया २९
८. प्रिन्स आलबर्ट (National Portrait Gallery) ... २९
९. रिचर्ड कॉब्डेन (National Portrait Gallery) ... ३४
१०. जॉन ब्राइट (National Portrait Gallery) ... ३५
११. सर रॉबर्ट पील ३९
१२. फ्लॉरेन्स नाइटिंगेल (National Portrait Gallery) ... ५७
१३. लॉर्ड पामर्स्टन (National Portrait Gallery) ... ५९
१४. विल्यम ग्लॅडस्टन (National Portrait Gallery) ... ७४
१५. बेंजामिन डिझरेली (National Portrait Gallery) ... ८४
१६. लॉर्ड सॅल्सबरी (National Portrait Gallery) ... १०५
१७. सेसिल ऱ्होडस् (National Portrait Gallery) ... ११४
१८. लॉर्ड किचनेर (National Portrait Gallery) ... ११६
१९. आफ्रिकेंत मंगोपार्क १२२
२०. डेव्हिड लिव्हिंग्स्टन (National Portrait Gallery) ... १२४
२१. जोसेफ चेंबर्लेन (National Portrait Gallery) ... १३५
२२. चार्ल्स डार्विन (National Portrait Gallery) ... १३९
२३. घोडागाडी व आगगाडी यांची शर्यत १४१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पृष्ठ

२४. सुरुवातीची आगगाडी १४४
२५. जॉर्ज स्टीफन्सन (National Portrait Gallery) ... १४५
२६. एकोणिसाव्या शतकांतील सुरवातीची वाहतुक (From a Diorama in the Science Museum, London) १५०
२७. मॅकमिलनची बायसिकल (१८३९) (From an exhibit in the Science Museum, London) १५१
२८. विसाव्या शतकाच्या सुरवातीची वाहतुक (From a Diorama in the Science Museum, London) १६०
२९. कारखान्यांत मुलांस असें वागविण्यांत येई १६२
३०. खाणींत मजुरांस असें वागवीत १६३
३१. जॉन स्टुअर्ट मिल (National Portrait Gallery) ... १७१
३२. विसाव्या शतकापर्यंत शहरांची वाढ १७४
३३. घोड्याची गाडी (१८५५) (From a model in the Science Museum, London) १७५
३४. लंडनमधील पहिली 'मोटार बस' १७६
३५. स्त्री-पुरुषांचे पोषाख १८१
३६. सातवा एडवर्ड (National Portrait Gallery) ... १८६
३७. विमानाची पहिली भरारी (१९०३) (From a Photograph in the Science Museum, London) १८९
३८. 'ग्लासगो' नामक आरमारी जहाज (१९०९) (From a model in the Science Museum, London) १९५
३९. पांचवा जॉर्ज २०३
४०. राणी मेरी २०४
४१. पाणबुडी (१९१२) (By Courtesy of the Director of the Science Museum, London) २०७
४२. राजकुटुंब (१९१३) (National Portrait Gallery) ... २०९
४३. झेपेलिनची भरारी—जर्मन पदक (British Museum) ... २१३
४४. जर्मन पदक (British Museum) २१८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रांची अनुक्रमणिका

पृष्ठ

४५. महायुद्धाच्या वेळचे कांहीं लष्करी अधिकारी (National Portrait Gallery) २२१

४६. महायुद्धाच्या वेळचे कांहीं आरमारी अधिकारी (National Portrait Gallery) २२३

४७. अमेरिकेची मदत (British Museum) २२५

४८. ग्राफ झेपेलिन (From a model in the Science Museum, London) २२७

४९. व्हर्सायच्या तहावर सही करण्याचे वेळीं (१९१९) (National Portait Gallery) २२८

५०. लॉइड जॉर्ज २३८

५१. एमिली पॅंकहर्स्ट (National Portrait Gallery) ... २३९

५२. लॉर्ड कर्झन (National Portrait Gallery) २४१

५३. आजची वाहतूक (From a Diorama in the Science Museum, London) २४३

५४. ॲटलांटिकमधील ब्रिटिश आरमार (१९२५) (By Courtesy of the Director of Science Museum, London) २४५

५५. 'ॲंटीलोप' नामक आरमारी जहाज (१९२८) (From a model in the Science Museum, London) २४७

५६. राजे सहावे जॉर्ज व राणी एलिझाबेथ २५२

५७. नेव्हिल चेंबर्लेन २५४

५८. विन्स्टन चर्चिल २५७

५९. 'आर् ३४' नामक आकाशयान (From a model in the Science Museum, London) २६४

६०. 'आर् १०१' नामक आकाशयान (By Courtesy of the Director of the Science Museum, London) २६५

६१. ब्रिटिश-पार्लमेंट सभागृह २८२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पारिभाषिक शब्दांचा कोश

Non-Intervention Policy—
अलिप्तपणाचें धोरण

Catholic Emancipation—
कॅथॉलिक विमोचन

Anti-Corn-Law League—
धान्य-कर-विरोधी संघ

Bed Chamber Questions—
राणीच्या मानकरणींचा प्रश्न

Rotten Boroughs—मोडकळलेलीं खेडीं

Reciprocity of Duties Bill—
व्यापारी सवलतींचा कायदा
सनदवाले

Protection—संरक्षित व्यापारपद्धति
Prerogative—राजाधिकार
Crown Colony—बादशाही वसाहत

Far East Question—अतिपूर्व प्रश्न
Fountain of Justice—न्यायाचें उगमस्थान
Munroe Doctrine—मन्रोचें तत्त्व
Sliding Scale—फिरता दर
Free Trade—खुला व्यापार
Buffer State—लोड संस्थान
Pocket Boroughs—हात खेडीं
Chartists—सनदवाले
Unionists—एकीकरणवाले
Privileges of Parliament—
पार्लमेंटचे अधिकार
Eastern Question—पूर्वेकडील प्रश्न
Middle East Question—मध्यपूर्व प्रश्न
Fountain of Honour—मान-सन्मानाचें उगमस्थान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



मायकेल फॅरॅडे





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आइन्स्टाइन

लॉर्ड केल्हिन

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१. पार्लमेंटच्या सुधारणेचा उषःकाल

१. चौथा जॉर्ज (१८२०-३०)—स्वभाव :—तिसऱ्या जॉर्जनंतर त्याचा मुलगा चौथा जॉर्ज इंग्लंडचा राजा झाला. त्यावेळीं त्याचें वय अठ्ठावन्न वर्षांचें होतें. सन १८११ पासून तिसरा जॉर्ज वेडा झाल्यानें राजपालक या नात्यानें त्यानें आपल्या बापाच्या अखेरीपर्यंत राज्यकारभार केला होता. अत्यंत उधळ्या, चैनीची चटक लागलेला, मंद बुद्धीचा, आळशी, सर्व प्रकारच्या व्यसनांनीं ग्रस्त झालेला, लहरी असा जॉर्ज स्वतःच्या स्वार्थापेक्षां दुसऱ्या कोणत्याही गोष्टीला प्राधान्य देत नसे. दिसण्यांत तो सुंदर दिसे; पण 'खावें–प्यावें व मजा लुटावी' ही त्याची खरी वृत्ति असल्यानें त्यानें राष्ट्राच्या भरभराटीकडे कधींही लक्ष दिलें नाहीं.

चौथा जॉर्ज

त्याची चालचलणूक सभ्य होती; परंतु व्यसनापायीं अतोनात पैसा खर्च झाल्यानें तो नेहमीं कर्जबाजारीच असे. पार्लमेंटची सुधारणा करण्याच्या व कॅथॉलिकांवरील निर्बंध रद्द करण्याच्या तो विरुद्ध होता. त्याचा माणुसघाणेपणा कमालीचा होता; तरीही छानछोकीचा पोशाख करावा व नाच-रंगांत दंग असावें असें त्याला नेहमीं वाटे. त्याचें नैतिक आचरण कमालीचें वाईट होतें. 'तो दुष्ट मुलगा होता, निर्दय नवरा होता, वाईट बाप होता, घातकी मित्र होतां व नादान राजा होता.' त्याच्या कारकीर्दीत इंग्लंडची भरभराट न होता, देशांत असंतोषानें नुसता थैमान घातला होता !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. कॅटो रस्त्यांतील कट (१८२०):—जॉर्ज राजा झाला त्या वेळची इंग्लंडची स्थिति अत्यंत वाईट होती. जबर करांच्या ओझ्याखालीं लोक चेपून गेले होते, बेकारी अफाट होती, धान्याच्या महर्गतेमुळें दुष्काळ भासूं लागला होता, सरकारचा कारभार दडपशाहीचा होता, व्यापार मंदावला होता व सर्वत्र असंतोषानें आपलें ठाण दिलें होतें. अनेक दंगे-धोपे चालू होते. तशांतच दडपशाही करणाऱ्या प्रधानमंडळांतील प्रधानांचा खून करण्याचा कट सन १८२० मध्यें झाला. थिसलवुड नामक लष्करांतून हकालपट्टी झालेला मनुष्य कटाचा आद्य प्रवर्तक होता. फ्रेंच राज्यक्रांतीमुळें त्याचें मस्तक भ्रमूं लागलें होतें व स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व यांचा इंग्लंडमध्यें प्रसार झाला पाहिजे असें तो म्हणत असे. त्याचे साथीदारही त्याच्या म्हणण्यास मान तुकवीत. कॅटो रस्त्यावर राहणाऱ्या लॉर्ड हॅरोबी नांवाच्या एका सरदाराच्या घरीं प्रधानमंडळांतील सर्व प्रधान एके रात्रीं जेवावयास जाणार होते. अर्थात जेवून ते परतले म्हणजे अंधाऱ्या रात्रीं त्यांचा खून करावयाचा असा कटवाल्यांचा हेतु होता. हे सर्व प्रधान सुधारणांस विरोध करतात असा कटवाल्यांचा त्यांच्यावर आरोप होता. वरील हेतु साध्य झाल्यावर तुरुंग फोडून कैद्यांस मुक्त करावें व सरकारी तिजोऱ्यांवर हल्ले चढवून पैसा लांबवावा असाही त्यांचा बेत होता. प्रधानांचा खून झाल्यावर सर्व राज्यकारभार आपल्या हातीं घेण्याचाही त्यांचा मनोदय होता. परंतु त्यांच्या कटाची बातमी प्रधानमंडळाला अगोदरच कळली व त्यांनीं थिसलवुड व त्याचे चार प्रमुख साथीदार यांना पकडून फाशीं दिलें व कांहींस हद्दपार केलें.

३. राणी कॅरोलिन (१८२०):—वरील कटाचा बंदोबस्त होत होता, त्या वेळीं एक नवीनच भानगड देशांत उत्पन्न झाली होती. राजाची राणी कॅरोलिन ही या वेळीं इंग्लंडमध्यें येऊन दाखल झाली (१८२०) व राजाबरोबर आपल्यालाही राज्याभिषेक झाला पाहिजे असें ती म्हणूं लागली. सन १७९५ मध्यें त्या दोघांचें लग्न झालें होतें. त्याच्यापूर्वीच जॉर्जनें 'राजकुटुंबीयांच्या लग्नाच्या कायद्याचें' उल्लंघन करून, एका कॅथॉलिक स्त्रीबरोबर, आपल्या बापाच्या संमतीशिवाय, लग्न केलें होतें. हें लग्न कायदेशीर नसल्यानेंच तिसऱ्या जॉर्जच्या सांगण्यावरून जॉर्जनें कॅरोलिनशीं लग्न केलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें. परंतु लग्नानंतर त्यांचें बिनसलें. तिला चारलोटी नांवाची एक मुलगीही झाली होती. पुढें बेबनावानें तीव्र स्वरूप धारण केल्यानें कॅरोलिन सन १८१४ मध्यें इंग्लंड सोडून इटलीमध्यें गेली. तेथें तिचें नैतिक आचरण ठीक नव्हतें असें लोक उघडउघड म्हणत. जॉर्जचें आचरणही शुद्ध नव्हतें व त्याच्या-बद्दलही लोकांत संशय व गैरसमज फार माजले होते. अशा स्थितींतच आपल्या नवऱ्याला राज्याभिषेक होणार हें कळतांच राणी इंग्लंडांत आली व राणी म्हणून आपल्याला राज्याभिषेक व्हावा असा हट्ट धरून बसली. राणीनें इंग्लंडांत येऊं नये म्हणून दरसाल पन्नास हजार पौंड देण्याचीही राजानें तिला लालूच दाखविली; परंतु त्याला राणी भुलली नाहीं. त्यामुळें राजा संतापला व चिडून जाऊन त्यानें तिच्याशीं घटस्फोट करण्याचें बिल पार्लमेंटपुढें मांडण्यास मुख्य प्रधान लॉर्ड लिव्हरपूल यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें तें बिल उमरावमंडळांत मांडलें. तेथें तें पास झालेंही; परंतु कॉमन्ससभेंत तें पास होईलच असें त्यास न वाटल्यानें त्यानें तें बिल तसेंच पडूं दिलें. यामुळें घटस्फोट शक्य झाला नाहीं. पुढें वेस्टमिन्स्टर ॲबेमध्यें राजाला राज्याभिषेक चालू असतां राणीनें आंत घुसण्याचा प्रयत्न केला; तेव्हां दारावरील शिपायांनीं तिला धक्के मारून हांकलून दिलें! यामुळें अत्यंत मनस्ताप होऊन ती थोड्याच दिवसांत मेली. या एकंदर प्रकारानें मध्यम वर्गाला सरकारबद्दल आदर वाटेनासा झाला व सुधारणा घडवून आणणें इष्ट आहे असें त्यास वाटूं लागलें.

४. प्रधानमंडळांतील फरक:—चौथा जॉर्ज राजा झाला त्या वेळीं लॉर्ड लिव्हरपूलच मुख्य प्रधान होता. परंतु प्रधानमंडळांत लॉर्ड कॅसलरे हाच आपला वरचष्मा ठेवून होता. लॉर्ड सिड्मथ हा गृहमंत्रि होता. या सर्वांचें धोरण प्रतिगामी होतें व दडपशाहीचा अंगिकार करून सुधारणेची चळवळ दडपून टाकावी असें त्यांस वाटत होतें. परंतु तशांतही सन १८२१ मध्यें दोन चांगल्या गोष्टी घडून आल्या. कॅथॉलिकांवरील धार्मिक निर्बंध रद्द करावे असें एक बिल कॉमन्ससभेंत पास झालें; परंतु उमरावमंडळानें तें नापास केलें. तरीही कॉमन्ससभेनें तें बिल पास केल्यानें देशांत कोणत्या बाजूनें वारे वाहत होते हें कळून येण्यासारखें आहे. तसेंच लॉर्ड जॉन रसेल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यानें एक बिल मांडलें. 'ग्रॅपाऊंड' या परगण्याचा पार्लमेंटमध्यें दोन प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार काढून घेऊन तो हक्क यॉर्क परगण्यास द्यावा असें त्या बिलानें ठरविलें. हें बिल पार्लमेंटनें पास केलें. त्यावरून पार्लमेंटमधील वातावरण कसें होतें हें समजतें. त्यानंतर सन १८२२ मध्यें लॉर्ड कॅसलरे यानें आत्महत्या केली. त्यामुळें प्रधानमंडळांतील एक कट्टा टोरी व पार्लमेंटच्या सुधारणेसंबंधीं प्रतिगामी तत्त्वांचा पुरस्कार करणारा प्रधान नाहींसा झाला. त्याची जागा जॉर्ज कॅनिंग या पुरोगामी टोरी गृहस्थानें घेतली व तो परराष्ट्रमंत्रि झाला. त्याच्या अगोदरच लॉर्ड सिड्मथ यानें राजीनामा दिल्यानें सर रॉबर्ट पील हा गृहमंत्रि झाला व हस्किसन व्यापारमंत्रि झाला. या तीन नव्या मंत्र्यांच्या पुरोगामी धोरणामुळें लोकांस आशा वाटूं लागली. लॉर्ड लिव्हरपूल मुख्य प्रधान राहिला.

५. जॉर्ज कॅनिंग (१७७०–१८२७):—जॉर्ज कॅनिंगचा जन्म सन १७७० मध्यें झाला व सन १७९३ मध्यें तो पार्लमेंटमध्यें प्रथम निवडून आला. धाकट्या पिटचा तो चाहता होता. सन १८०७–०९ पर्यंत तो इंग्लंडचा परराष्ट्रमंत्रि होता. नेपोलियनचा तो कट्टा शत्रू असल्यानें त्याचा निःपात करण्याचेंच धोरण त्यानें सदैव आपल्या नजरेसमोर ठेवलें होतें. लॉर्ड कॅसलरे व ॲडिंग्टन ऊर्फ लॉर्ड सिड्मथ यांच्याशीं त्याचें कधींच जमलें नाहीं. सन १८१६–२१ पर्यंत त्यानें प्रधानमंडळांत व्यापारमंत्रि म्हणून उत्तम कामगिरी बजावली. पुढें तो सन १८२२ सालीं परराष्ट्रमंत्रि झाला. इंग्लंडचें हित साधण्याकडे त्याची नेहमीं दृष्टि असे. सुधारणा घडवून आणाव्या असें त्याचें मत होतें. तो हुशार, मुत्सद्दी व उत्तम वक्ता होता. इंग्लंडवर त्याचें प्रेम होतें व आपल्या देशाची

जॉर्ज कॅनिंग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रतिष्ठा वाढावी असें त्यास नेहमीं वाटे. त्यामुळें त्याचें धोरण इंग्लंडच्या हिताकडेच झुकत असे. परराष्ट्रीय प्रधान म्हणून कॅनिंगचें नांव बरेंच गाजलें. त्याचें धोरण उदार असल्यानेंच त्यानें पवित्र संघास विरोध केला. फ्रेंच राज्यक्रांतीमुळें उत्पन्न झालेल्या स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व यांच्यावर उभारलेलें एकराष्ट्रीयत्व हाणून पाडण्याकरितांच पवित्र संघाचा जन्म झाला आहे असें त्याचें मत होतें व त्यामुळेंच त्या संघाचा सभासद होण्याचें त्यानें नाकारलें. यावरून अनियंत्रित राजसत्ता त्याला मान्य नव्हती हेंच सिद्ध होतें. युरोपांतील भानगडींत इंग्लंडनें पडूं नये असें त्याचें ठाम मत होतें व त्यामुळेंच त्यानें युरोपियन राष्ट्रांसंबंधीं अलिप्तपणाच्या धोरणाचा अंगिकार केला होता. प्रत्येक राष्ट्रानें आपल्यापुरतें पहावें, इतर राष्ट्रांच्या भानगडींत पडूं नये, असें तो म्हणे. यावरून त्याचें परराष्ट्रीय धोरण राष्ट्रीय स्वरूपाचें होतें, आंतरराष्ट्रीय स्वरूपाचें नव्हतें, असें म्हणतां येईल. मात्र इंग्लंडच्या हितसंबंधाचा प्रश्न आला म्हणजे तो परराष्ट्राच्या कारभारांत ढवळाढवळ करण्यास तयार असे. स्वातंत्र्य मिळवूं पाहणाऱ्या राष्ट्रास मदत करण्याची तो नेहमीं तयारी दाखवी; मात्र त्यांत त्याला इंग्लंडचा लाभ दिसला तर. ' अमेरिकेच्या राजकारणांत अमेरिकेनें वाटल्यास ढवळाढवळ करावी, युरोपियन राष्ट्रांनीं नाहीं, ' असें अमेरिकेचा अध्यक्ष मन्रो याचें म्हणणें होतें. त्या तत्त्वास कॅनिंगनें अप्रत्यक्षपणें संमति दर्शविली, तीही इंग्लंडच्या हिताकडे लक्ष देऊन.

६. कॅनिंगचें परराष्ट्रीय धोरण :—वरील सर्व तत्त्वांस अनुसरूनच कॅनिंगनें आपलें परराष्ट्रीय धोरण आंखलें होतें. त्याचें धोरण धडाडीचें व जोरदार होतें यांत शंका नाहीं; तितकेंच धडाडीचें धोरण लॉर्ड कॅसलरेचेंही होतें. ज्या तत्त्वांचा कॅनिंगनें अंगिकार केला होता त्याच तत्त्वांस कॅसलरेनेंही उचलून धरलें होतें. कॅसलरेच्या धोरणास उठाव देण्याचें काम कॅनिंगनें मोठ्या धडाडीनें केलें इतकेंच. ठोशास ठोसा देण्याचें कॅनिंगनें ठरविलें होतें व त्यामुळेंच त्याला अनियंत्रित सत्तेविरुद्ध बंड पुकारणाऱ्या लोकांस मदत करावीशी वाटे. सन १८२२ मध्यें स्पेनमध्यें बंड झालें, व तेथें लोकशाही स्थापण्याचा प्रयत्न करण्यांत आला. अर्थात तो दडपून टाक-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ण्याकरितां युरोपियन राष्ट्रें पुढें सरसावलीं. कॅनिंगनें त्या बाबतींत बंडवाल्यांशीं सहानुभूति दर्शविली; मात्र त्यांस प्रत्यक्ष मदत केली नाहीं. तसेंच सन १८२३ मध्यें अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतींनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. अध्यक्ष मन्रोप्रमाणेंच कॅनिंगनेंही त्यांच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली. असें केल्यानें त्या वसाहतींशीं इंग्लंडला व्यापार वाढवितां येईल असें त्यास वाटत होतें. पुढें सन १८२६ मध्यें पोर्तुगालमधील सनदशीर चळवळ दडपून टाकण्याकरितां फ्रेंच व स्पॅनिश सैन्यें त्या देशांत घुसत असतां पोर्तुगालला मदत करण्याकरितां त्यानें लष्कर पाठविलें. त्यामुळें फ्रेंच व स्पॅनिश सैन्यानें माघार घेतली. सन १८२१ मध्यें ग्रीसनें आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. त्या देशावर इतके दिवस तुर्कस्थानचें स्वामित्व होतें. अर्थात त्याला बाध आल्यानें तुर्कस्थान व ग्रीस या देशांत लढाई जुंपली. या संधीचा फायदा घेण्याचें रशियानें ठरवून ग्रीसला मदत दिली. कॅनिंगला ग्रीकांच्या स्वातंत्र्याबद्दल सहानुभूति वाटत होती; परंतु रशियाच्या पूर्वेकडील वाढत्या सत्तेस विरोध करणें जरुरीचें आहे असें त्यास वाटे. अर्थात ग्रीसला मदत केल्यास तुर्कस्थान निर्बल होईल व तो देश निर्बल झाल्यानें रशियाची सत्ता काळ्या समुद्रांत वाढेल व हळूहळू भूमध्यसमुद्रांत त्याचा शिरकाव झाल्यानें इंग्रजांच्या तेथील सत्तेस धोका पोचेल असें कॅनिंगला वाटत होतें. तेव्हां या पेचांतून सोडवणूक करून घेण्याकरितां सन १८२७ मध्यें त्यानें रशिया, तुर्कस्थान, इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें लंडन येथें तह घडवून आणला व तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं ग्रीसचें स्वातंत्र्य मान्य करण्यांत यावें असें ठरलें. त्यानंतर कॅनिंग सन १८२७ मध्यें वारला व लॉर्ड गोडरिच मुख्य प्रधान झाला. त्यावेळीं वरील तह तुर्कस्थाननें धुडकावून देऊन इंग्लंड, रशिया व फ्रान्स यांच्या संयुक्त आरमारावर हल्ला केला. नॅव्हॅरिनो येथें लढाई होऊन तुर्कस्थानचा पराभव झाला व त्यामुळें तुर्कांना ग्रीकांचें स्वातंत्र्य मान्य करावें लागलें. वरील गोष्टीवरून 'पूर्वेकडील प्रश्नाचा' कॅनिंगनें, इंग्लंडच्या हिताकडे लक्ष देऊन, व्यापकदृष्टीनें अभ्यास केला होता हें उघड आहे. पुढें वेलिंग्टन मुख्य प्रधान असतां लंडनच्या तहांत ठरल्याप्रमाणें त्यानें सन १८२८ मध्यें तुर्कस्थानला रशियाविरुद्ध मदत केली नाहीं. त्यामुळें रशियानें तुर्कस्थानचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पराभव करून तुर्कांच्या वर्चस्वाखालील बाल्कन राष्ट्रांतील ख्रिस्ती प्रजाजनांचें रक्षण करण्याचा अधिकार मिळविला.

७. पीलच्या सुधारणा :—गृहमंत्रि सर रॉबर्ट पील यानें सन १८२३ मध्यें फौजदारी कायद्यांत सुधारणा केली. त्या काळीं साध्या गुन्ह्यासही फाशीची शिक्षा असे. पांच शिलिंग किंवा त्यापेक्षां जास्त किंमतीचा माल चोरणें, लहान झाडें तोडणें, मेंढी अगर घोडा चोरणें, खिसे कापणें, साधी मारामारी करणें वगैरे दीडदोनशें लहानसहान गुन्ह्यांस देहान्ताची शिक्षा होई. अशा तऱ्हेनें शिक्षा होतात हें लक्षांत घेऊन ज्यूरींतील लोक गुन्हेगारास सोडून देत. त्यामुळें कायद्याचें विफलत्व लोकांस पटूं लागलें. पीलनेंही ती गोष्ट लक्षांत घेऊन सुमारें शंभर लहानसहान गुन्ह्यांची देहान्ताची शिक्षा रद्द केली व गुन्ह्यांचें महत्त्व लक्षांत घेऊन सौम्य अगर कडक शिक्षा देण्यांत यावी असें ठरविलें. सन १८२३-२७ पर्यंत निरनिराळे कायदे करून पीलनें हें काम चालविलें होतें. कॅनिंग मुख्य प्रधान झाला त्यावेळीं पीलनें प्रधानमंडळांत जागा स्वीकारली नाहीं. परंतु पुढें सन १८२८ मध्यें वेलिंग्टनचा ड्यूक ज्यावेळीं मुख्य प्रधान झाला त्यावेळीं तो पुन्हां गृहमंत्रि झाला. त्यावेळीं त्यानें पोलिसखात्याची प्रथमच स्थापना केली (१८२९). इतके दिवस रात्रीच्या वेळीं 'चार्लीज' नामक गस्तवाले पहारा ठेवीत. हे गस्तवाले म्हातारे असत व रखवालीचें काम त्यांच्याकडून चांगलें होत नसे. तेव्हां पीलनें लंडनकरितां प्रथमच पोलीस ठेवण्यास सुरुवात केली. त्यानंतर इतर शहरांकरितांही त्यानें तीच पद्धति सुरू केली. पीलनें पोलिस निर्माण केले म्हणून पोलिसास लोक थट्टेनें 'पीलर' अथवा 'बॉबी' (रॉबर्ट पीलच्या टोपण नांवावरून) असें म्हणत. हीं नांवें अजूनही इंग्लंडांत प्रचलित आहेत.

८. हस्किसनच्या सुधारणा :—व्यापारमंत्रि हस्किसन यानेंही बऱ्याच नव्या सुधारणा केल्या. तोही पिटचा अनुयायी होता व व्यापाराच्या बाबतींत खुल्या व्यापाराचें धोरण स्वीकारणेंच योग्य होय असें त्याचें मत होतें. त्या धोरणास अनुसरून सन १८२३ सालीं त्यानें प्रथमतः नौकानिर्बंधाच्या कायद्यांत सुधारणा केल्या व जें राष्ट्र इंग्लंडला व्यापारासंबंधीं जितक्या सवलती देईल, तितक्या सवलती इंग्लंडनें त्या राष्ट्राला द्याव्या असें त्यानें ठरविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्या या बिलाला ' व्यापारी सवलतींचा कायदा ' असें म्हणतात. यामुळें व्यापारी जहाजांवरील निर्बंध जवळ जवळ नाहींसे झाले व अनेक परकी जहाजें लंडनला येऊं लागलीं. खुल्या व्यापाराची ही पूर्वतयारीच होती. खुल्या व्यापाराचें धोरण स्वीकारल्यास आपला व्यापार बुडेल असें इंग्लिश व्यापाऱ्यांस प्रथमतः वाटलें; पण पुढील पंचवीस वर्षांत इंग्लंडचा व्यापार सुमारें पंचेचाळीस टक्क्यांनीं वाढला. त्यानंतर व्यापाराची वाढ व्हावी म्हणून हस्किसननें अनेक जिनसांवरील जकाती उठवून कच्चा माल मोठ्या प्रमाणावर इंग्लंडांत येण्याची तरतूद केली. रेशीम व लोकर यांवरील जकाती त्यानें उठविल्यामुळें रेशमी व लोकरीच्या

विल्यम हस्किसन

कापडाची निपज व व्यापार वाढला. तसेंच हस्किसनच्या सूचनेवरून त्यावेळचा फडणीस रॉबिन्सन ऊर्फ लॉर्ड गोडरिच यानें निरनिराळे कर कमी केले व खिडक्यांवरील कर रद्द केला. त्याचप्रमाणें साखर, कॉफी, दारू, स्पिरिट, लोखंड, लोकर, रेशीम वगैरे जिनसांवरील कर उतरविण्यांत आले. त्यामुळें गरिबांचा फायदा झाला. सन १८२४ मध्यें त्यानें मजूरसंघास मान्यता दिली. इतके दिवस मजूरसंघ अस्तित्वांत होते; परंतु त्यांस सरकारी मान्यता मिळाली नव्हती. त्यामुळें मजुरांत पुष्कळ असंतोष माजला होता. मजूरसंघांस मान्यता मिळाल्यानें मजुरीचे दर व कामाचे तास किती असावेत या बाबत मजुरांना आपल्या मालकांशीं स्वतंत्रपणें ठराव करतां येऊं लागले. तसेंच धान्याच्या कायद्याच्या बाबतींत हस्किसननें सन १८२५ मध्यें ' फिरता दर ' सुरू केला. त्यामुळें भाव चढता असला तर जकात कमी घ्यावी व भाव पडता असेल तर जकात जास्त घ्यावी असें ठरविण्यांत आलें. यामुळें गव्हाची किंमत एका क्वार्टरास ६४ शिलिंग कायम राहील, अर्थात परदेशी गहूं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लंडांत येणार नाहीं व त्यामुळें इंग्लिश शेतकऱ्यांचें नुकसान होणार नाहीं असें हस्किसनचें मत होतें. त्याच वर्षी इंग्लंडच्या व्यापारी जगांत फारच मोठी खळबळ उडाली होती. चलनी नोटा मोठ्या प्रमाणावर निघाल्यानें पैशाची किंमत घसरूं लागली, व्यापार घटूं लागला व या गोष्टींचा फायदा घेण्याकरितां अनेक नकली कंपन्या निघूं लागल्या. त्यांचीं दिवाळीं वाजलीं व लोकांत खळबळ सुरू झाली. त्यावेळीं हस्किसननें नोटांची छपाई बंद करून सोन्याचीं नाणीं पाडण्यास सुरुवात केली. छोट्या बँकांचा नोटा छापण्याचा अधिकार काढून घेतला व इंग्लंडच्या बँकेच्या शाखा मोठमोठ्या शहरीं स्थापन करण्याचें ठरविलें. यामुळें बरीच स्थिरस्थावरता निर्माण झाली. शिवाय त्यामुळें इंग्लंडची पत वाढल्यानें व्यापारही चांगलाच सरसावला. हस्किसनच्या खुल्या व्यापाराच्या धोरणामुळें इंग्लंडचा व्यापार पांच कोटी पौंडांचा होता तो सात वर्षांत सात कोटी पौंडांवर गेला.

९. **प्रधानमंडळांतील फरकः**—सन १८२७ मध्यें प्रकृतिस्वास्थ्यासाठीं लॉर्ड लिव्हरपूलनें राजीनामा दिला व त्याच्या जागीं जॉर्ज कॅनिंग मुख्य प्रधान झाला. तो उदारमतवादी असल्यानें व्हिग पक्षानें त्याला पूर्णपणें पाठिंबा दिला. अनेक व्हिग लोकांनीं त्याच्या प्रधानमंडळांत जागाही स्वीकारल्या होत्या. त्यांत लॉर्ड पामर्स्टन होता. कॅनिंगनें सन १८२७ मध्यें लंडनचा तह घडवून आणला होता. त्यानंतर तो मृत्यु पावल्यानें लॉर्ड गोडरिच मुख्य प्रधान झाला (१८२७). परंतु तो लायक मनुष्य नसल्यानें प्रधानमंडळांत कुरबुरी व भांडणें सुरू झालीं व त्यांना कंटाळून त्यानें राजीनामा दिला. तेव्हां टोरीपक्षाचा पुढारी वेलिंग्टनचा ड्यूक मुख्य प्रधान झाला. त्याचें धोरण कट्टर व प्रतिगामी स्वरूपाचें होतें व सर्व प्रकारच्या सुधारणांची लाट थोपवून धरली पाहिजे असें त्याला नेहमीं वाटे. हस्किसन, सर रॉबर्ट पील, पामर्स्टन वगैरे लोक त्याच्या प्रधानमंडळांत होते.

१०. **वेलिंग्टनचा ड्यूक (१७६९-१८५२):**—वेलिंग्टनच्या ड्यूकचा जन्म डब्लिनला सन १७६९ मध्यें वेल्स्लीकुळांत झाला. अर्थात जन्मानें तो आयरिशच होता. ईटनच्या शाळेंत त्याचें शिक्षण झालें व त्याचें लष्करी शिक्षण फ्रान्समधील अँजर्स येथील लष्करी शाळेंत झालें. त्यानंतर इंग्लिश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लष्करांत त्याचा प्रवेश झाला. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर हॉलंडमध्यें युद्ध सुरू झालें त्यावेळीं त्याची तेथें रवानगी करण्यांत आली होती. तेथें त्याला अनेक ठिकाणीं पराभव घ्यावे लागल्यानें लष्करीपेशा सोडून द्यावा असेंही त्याच्या मनानें घेतलें. मनाच्या अशा आंदोलित स्थितींत असतांच त्याची हिंदुस्थानांत रवानगी करण्यांत आली. त्यावेळीं त्याचा भाऊ मार्किस वेल्स्ली हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल होता. हिंदुस्थानांत मात्र त्यानें उत्तम सेनापति म्हणून कीर्ति मिळविली. सन १७९९ मध्यें श्रीरंगपट्टण घेऊन त्यानें टिपूचा पराभव केला. मराठ्यांशीं झालेल्या तिसऱ्या युद्धांत त्यानें शिंद्यांच्या विरुद्ध असईची लढाई जिंकून मोठी कीर्ति मिळविली. त्यानंतर सन १८०५ मध्यें तो इंग्लंडांत परत आला. सन १८०७ मध्यें द्वीपकल्पांतील युद्धांत मुख्य सेनापति म्हणून त्याची नेमणूक झाली व अत्यंत धिमेपणानें व चिकाटीनें लढून त्यानें फ्रेंचांना जेरीस आणलें व त्यांना स्पेनमधून हुसकून लावून फ्रान्समध्यें पिटाळलें. पुढें वॉटर्लूच्या लढाईच्या वेळीं तर तो संयुक्त सैन्याचा मुख्य सेनापति होता. तीही लढाई त्यानें जिंकली व उत्तम सेनापति म्हणून कीर्ति मिळविली. त्याचें पूर्वीचें नांव सर आर्थर वेल्स्ली असें होतें; परंतु द्वीपकल्पांतील युद्धांत त्यानें विजय मिळविल्यानें त्याला वेलिंग्टनचा ड्यूक करण्यांत आलें व त्याला पार्लमेंटनें चार लक्ष पौंडांची देणगी दिली. वॉटर्लूच्या विजयानंतरही त्याला मोठी जहागीर मिळाली होती. सन १८२८ मध्यें तो मुख्य प्रधान झाला.

११ वेलिंग्टनचें परराष्ट्रीय धोरण:—वेलिंग्टनचें परराष्ट्रीय धोरण प्रतिगामी स्वरूपाचें होतें. कॅनिंगनें पूर्वेकडील प्रश्नास चालना देऊन रशियाला शह देण्याकरितां तुर्कस्थानला मरूं देतां कामा नये असें धोरण स्वीकारलें होतें. त्याचा वेलिंग्टननें अवलंब केला व ग्रीसच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली. सन १८३० सालीं फ्रान्समध्यें पुन्हां राज्यक्रांति होऊन फ्रान्सचा राजा व वेलिंग्टनचा दोस्त दहावा चार्ल्स फ्रान्समधून पळून इंग्लंडांत आला. चार्ल्सनें दडपशाही केली व त्या बाबतींत वेलिंग्टननें त्याला उत्तेजन दिलें असें लोक म्हणत. चार्ल्सच्या ऐवजीं लुई फिलीप फ्रान्सचा राजा झाला. ही गोष्ट अनेक इंग्रजांस आवडली नाहीं व वेलिंग्टनच्या प्रतिगामी धोरणास लगाम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घालण्याकरितां पार्लमेंटची सुधारणा करण्याची चळवळ त्यांनीं हातीं घेतली. सन १८३० मध्यें बेल्जम देश हॉलंडपासून स्वतंत्र झाला. बेल्जमच्या स्वातंत्र्यास त्याची सहानुभूति मिळाली नाहीं व बेल्जमनें हॉलंडपासून फुटून निघूं नये असेंच त्यानें प्रतिपादिलें. त्याचें प्रतिगामी धोरण कॅथॉलिकांवरील धार्मिक निर्बंध दूर करण्याच्या बाबतींतही दिसून आलें. कॅथॉलिकांवरील निर्बंध दूर न करण्याचें वचन देऊनच तो मुख्य प्रधान झाला होता. परंतु अखेरीस त्याला आपलें वचन मोडून ते निर्बंध दूर करावे लागले.

१२. धर्मकसोटीचा व कॉर्पोरेशनचा कायदा रद्द (१८२८):—नॉन-कन्फॉर्मिस्टांना सरकारी नोकऱ्या स्वीकारतां येत नसत. हे लोक प्रॉटेस्टंट-पंथीयच होते. त्यांच्या मार्गांतील दोन मुख्य अडचणी म्हणजे धर्मकसोटीचा कायदा व कॉर्पोरेशन कायदा. वॉलपोलनें दरसाल माफीचा कायदा पास करून त्यांस सरकारी नोकऱ्या देण्याचें धोरण स्वीकारलें होतें. त्याप्रमाणें दरसाल माफीचा कायदा पार्लमेंटला पास करावा लागे. जे लोक ते कायदे मोडीत त्यांना शिक्षाही होत नसे. तरीही ते कायदे अस्तित्वांत ठेवणें म्हणजे सुधारलेल्या राष्ट्रावरील कलंक होय असें कांहीं लोक समजत. लायक माणसांवर बंधनें लादल्यानें त्यांच्या सेवेस देश आंचवतो असें व्हिग पक्ष म्हणत असे. त्या लोकांचा पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळीं व्हिग पक्षाला पाठिंबा मिळत असे व त्यामुळेंच त्यांच्यावरील निर्बंध दूर करण्याच्या हेतूनें लॉर्ड जॉन रसेलनें धर्मकसोटीचा कायदा व कॉर्पोरेशन कायदा रद्द करण्यासंबंधीं पार्लमेंटमध्यें सन १८२८ सालीं बिल मांडलें. टोरींच्या विरोधास न जुमानतां पार्लमेंटनें तें बिल पास केलें. यामुळें नॉनकन्फॉर्मिस्ट, क्वेकर, डिसेंटर, कर्मनिष्ठ वगैरे धर्मपंथांतील सर्व लोकांना सरकारी नोकऱ्या मिळणें शक्य झालें. वरील कायदे रद्द झाल्यानें सर्व पक्षोपपक्षांस राजकीय हक्क मिळूनही कॅथॉलिकांस ते हक्क मिळाले नाहींत. यामुळें ते लोक चिडून गेले. कॅथॉलिकांचा प्रश्न हातीं घेऊन त्यांच्यातर्फे अभूतपूर्व चळवळ करण्याचें श्रेय डॅनियल ओकोनेल यानें संपादिलें.

१३. डॅनियल ओकोनेल (१७७५–१८४७)—कॅथॉलिकांचें विमोचन:—डॅनियल ओकोनेलचा जन्म १७७५ सालीं आयर्लंडमध्यें झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचें सर्व शिक्षण आयर्लंडमध्यें झालें. सन १७९८ मध्यें तो बॅरिस्टर झाला. तो स्वतः उत्तम वक्ता होता. रोमन कॅथॉलिक पंथाबद्दल त्याला प्रेम होतें व कॅथॉलिकांवरील राजकीय निर्बंध दूर करण्याकरितां त्यानें आयर्लंडमध्यें चळवळ सुरू केली. त्याला आयर्लंडचा स्वातंत्र्यवीर समजतात. सन १८०० सालीं धाकट्या पिटनें वचन देऊनही कॅथॉलिकांवरील निर्बंध दूर केले नव्हते व त्यामुळें सर्व आयरिश कॅथॉलिक चिडून जाऊन त्यांनीं आयरिश व इंग्लिश पार्लमेंटांचें एकीकरण रद्द करण्याकरितां चळवळ चालविली. त्यांतच डॅनियल ओकोनेलनें कॅथॉलिकांवरील धार्मिक निर्बंध दूर करण्याकरितां सन १८२३ मध्यें 'कॅथॉलिक असोसिएशन' स्थापून तिच्यातर्फे चळवळ चालविली. आयरिश कॅथॉलिक धर्मगुरूंचाही त्यानें पाठिंबा मिळवून त्यांच्या वजनानें प्रत्येक आयरिशाकडून त्यानें दर आठवड्यास एकेक पेनीप्रमाणें पैसे घेऊन फंड उभारला व त्याच्या जोरावर त्यानें आपली चळवळ अत्यंत शांततेच्या मार्गानें चालविली. त्यानें मोकळ्या जागेंत मोठमोठ्या सभा भरविल्या, इंग्रजांचा तीव्र निषेध केला, सन १८०० चा 'वचनभंग' लोकांच्या मनांत बिंबविला व त्यांचीं मनें चेतवून दिलीं. मात्र त्यानें दंगेधोपे अथवा अत्याचार यांस प्रोत्साहन दिलें नाहीं. शेवटीं सन १८२५ त ती संस्था सरकारनें तीन वर्षेंपर्यंत दडपून टाकली. परंतु तीन वर्षांनीं ती संस्था पुन्हां सुरू झाली. सन १८२८ मध्यें ओकोनेल क्लेअर परगण्यातर्फे पार्लमेंटसाठीं निवडून आला. परंतु तो कॅथॉलिक म्हणून त्याला पार्लमेंटमध्यें बसतां येणें शक्य नव्हतें. यामुळें आयर्लंडमध्यें अभूतपूर्व चळवळ सुरू झाली; व ओकोनेलची निवडणूक रद्द केल्यास यादवी होईल अशी आयर्लंडच्या गव्हर्नरनें मुख्य प्रधान वेलिंग्टन यास सूचना दिली. वेलिंग्टन व पील हे दोघेही पक्के टोरी व प्रतिगामी धोरणाचे अनुयायी होते. तशांतच त्यांनीं कॅथॉलिकांवरील निर्बंध दूर न करण्याचें राजाला वचन दिलेलें. अशा स्थितींत देशांतील गंभीर स्थितीस तोंड कसें द्यावें असा मोठा पेंच त्यांच्यापुढें पडला. शेवटीं वेलिंग्टननें माघार घेऊन सन १८२९ सालीं कॅथॉलिकांवरील निर्बंध दूर करण्याकरितां पार्लमेंटमध्यें बिल मांडून तें पास करून घेतलें. तें बिल पास झाल्यानें राजपद, लॉर्ड लेफ्टेनंट, लॉर्ड चॅन्सेलर वगैरे जागांशिवाय इतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरकारी नोकऱ्या कॅथॉलिकांस मिळाव्या व पार्लमेंटमध्येंही त्यांस प्रतिनिधि म्हणून बसतां यावें असें ठरलें. कॅथॉलिक विमोचनाचा कायदा पास झाला तरी आयर्लंडमध्यें कायमची शांतता निर्माण झाली नाहीं. वचन देऊनही टोरीपक्षानें कॅथॉलिकांवरील निर्बंध दूर केले, त्यामुळें अनेक टोरी लोक त्या पक्षांतून फुटून निघाले. अर्थात टोरी पक्षाचीं छकलें झालीं. तो कायदा पास झाल्यानंतर ओकोनेल पार्लमेंटमध्यें निवडून आला व त्याची निवडणूक पार्लमेंटनें मान्य केली. मात्र आयर्लंडमधील प्रॉटेस्टंटांस कॅथॉलिक विमोचनाचा कायदा पास झाल्यानें वाईट वाटलें. कारण तो कायदा पास झाल्यानें कॅथॉलिक लोकांचे प्रतिनिधि पार्लमेंटमध्यें मोठ्या प्रमाणावर निवडून येतील अशी त्यांस व पर्यायानें सरकारलाही भीति वाटत होती. तेव्हां आयरिश प्रॉटेस्टंटांचें संरक्षण करण्याच्या हेतूनें ब्रिटिश सरकारनें आयर्लंड-मधील मतदानाच्या अधिकारांत बदल करणारा कायदा पास केला. त्या कायद्यानें चाळिस शिलिंगांच्या ऐवजीं वार्षिक दहा पौंड सारा देणारांस मत-दानाचा अधिकार ठेवण्यांत आला.

अभ्यास

१. जॉर्ज कॅनिंगच्या परराष्ट्रीय धोरणाचें वर्णन करा. धाकट्या पिटचा तो अनुयायी होता असें तुम्हांस वाटतें ? कशावरून ?

२. सर रॉबर्ट पीलनें कोणकोणत्या सुधारणा केल्या ? त्या करण्याचें कारण काय ? त्यांचा परिणाम काय झाला ?

३. हस्किसनच्या सुधारणा सांगा. व्यापारासंबंधीं त्यानें कोणतें धोरण स्वीकारलें ? कां ? त्याचा परिणाम काय झाला ?

४. डॅनियल ओकोनेलचें चरित्र थोडक्यांत सांगा. कॅथॉलिक विमोचनास तो कितपत कारणीभूत झाला ? कॅथॉलिक विमोचनाची आवश्यकता सांगा.

५. कॅथॉलिकांचें विमोचन म्हणजे काय ? त्यांच्यावर निर्बंध लादण्याचें कारण काय ? ते दूर झाल्यानें त्यांना कोणते अधिकार मिळाले ? कॅथॉलिक विमोचनाचे परिणाम सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. टिपणें करा :—राणी कॅरोलिन, कॅटो रस्त्यावरील कट, मन्रोचें तत्त्व, ग्रीसचें स्वातंत्र्य, पीलर ऊर्फ बॉबी, फिरता दर.

७. वेलिंग्टनची कामगिरी सांगा. मुख्य प्रधान झाल्यावर त्यानें कोणती कामगिरी बजाविली ?

उतारे

१. कॅथॉलिकांचें विमोचन—१८०८

...आज आयर्लंडमध्यें सुमारें पन्नास लाख लोक आहेत. त्यापैकीं शेकडा वीस लोक प्रॉटेस्टंट आहेत. प्रॉटेस्टंटांपैकीं निम्मे लोक डिसेंटर आहेत व ते सर्व कडवे असून कॅथॉलिकांइतकेच प्रॉटेस्टंटधर्मपीठाचा तिरस्कार व द्वेष करतात. अशा स्थितींत फटके मारणें, खोड्यांत अडकविणें वगैरेसारख्या क्रूर शिक्षा देण्यानें का ते लोक वठणीवर येणार आहेत ? सर्व कॅथॉलिक योग्य संधीची वाट पहात आहेत व मग ते तुमच्याकडून दसपट सुधारणा मिळवून घेतील. मग मात्र तुम्ही हळहळाल. तेव्हां अशी वेळ येण्यापूर्वींच त्यांस आज जे (राजकीय हक्क) देतां येतील ते तुम्ही देऊन कां टाकीत नाहीं ? अमेरिकेचें उदाहरण तुमच्यापुढें आहेच. तीच चूक आयर्लंडच्या बाबतींतही—कॅथॉलिकांच्या बाबतींत—तुमच्या हातून होऊं नये अशी परमेश्वराजवळ माझी प्रार्थना आहे. कॅथॉलिकांवरील राजकीय निर्बंध काढून टाकण्यास तुम्ही इतके कां भितां तें मला कळत नाहीं. तसें केल्यास फारतर वीस लोक कॉमन्ससभेंत व दहा लोक उमरावमंडळांत बसतील. हे तीस सभासद पार्लमेंटकडून टाइथ कर रद्द करून घेतील असें का तुम्हांस वाटतें ? कां एखादा कॅथॉलिक सेनापति आपल्या सैन्यासह पार्लमेंटवर हल्ला करून तो तेथील सर्वांस हाकलून देणार आहे ? कॅथॉलिकांस राजकीय हक्क मिळाले तर कॅथॉलिक धर्मग्रंथ लिहिणाऱ्यांची बुद्धि एकदम अचाट व भेदक होईल असें का तुम्हांस वाटतें ? कां तसें केल्यानें टाइथ करासारखे कर आपोआप रद्द होतील, तुमचीं तत्त्वें खोटीं ठरतील व तुमची राज्यघटना नष्ट होईल असें तुम्हांस वाटतें ? असें होईल असें तुम्हांस वाटत असेल तर ती तुमची नुसती दिशाभूल होणार आहे. कॅथॉलिकांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. त्यांचें शिरकाण करण्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्नही हास्यास्पद आहे. राजकीय अधिकार न देणें म्हणजे जुलम नव्हे काय? जुलमांत व त्यांत काय फरक आहे? असा फरक करणारा व पशू हे माझ्या मतें एकच होत. सूर्यप्रकाश व शुद्ध हवा यांच्याप्रमाणेंच स्वातंत्र्यही सर्वांस हवेंच. तें तुम्हांस मिळणार नाहीं, तो आमचा हक्क आहे, असें म्हणणें हें कोत्या बुद्धीचें लक्षण होय. तें न्यायबुद्धीलाही सोडून आहे.

—सिडने स्मिथच्या पत्रसंग्रहावरून

प्रश्न :—१. कॅथॉलिक विमोचनाकरितां ग्रंथकर्त्यानें कोणतीं कारणें दिलीं आहेत?

२. विमोचन केलें नसतें तर कोणता प्रसंग उद्भवला असता?

२. कॅथॉलिकांचें विमोचन व डॅनियल ओकोनेल-भाषण-१८१४.

आज सर्व युरोपियन राष्ट्रांतून अनियंत्रित राजसत्तेची हकालपट्टी होत असून तेथें स्वातंत्र्याची स्थापना होत आहे. ज्या देशांत स्वातंत्र्य आहे तेथें सदसद्विवेकबुद्धीलाच प्राधान्य मिळालेलें आहे. इंग्लंडनें स्वातंत्र्याचें नुसतें ढोंग माजवून प्रत्येकाचें तोंड बंद केलें आहे. इंग्लंडांत मनुष्यानें कोणतीं मतें धारण करावीं हें कायदा ठरविणार! इंग्लंडमधील मतस्वातंत्र्याचेंच का हें लक्षण? तें अन्यायमूलक व वेडेपणाचें नाहीं असें कोणास वाटणार नाहीं? बरें हें टिकेल असें का तुम्हांस वाटतें? जें बुद्धीला पटत नाहीं, जें धर्माला मान्य नाहीं, जें धोरण सर्व युरोपनें त्याज्य मानिलें तें कायम टिकणार कसें?........कॅथॉलिकविमोचनाची जी चळवळ आम्हीं आरंभिली आहे, तींत आम्हांस यश खात्रीनें मिळणारच. आज सर्वत्र गुलामगिरी नष्ट झालेली आहे व मनुष्याचे विचार उच्च व प्रगल्भ होऊं लागले आहेत. इंग्लंडला आमची मदत पाहिजे आहे व त्यानें आमची मागणी मान्य केली तरच त्याला ती मिळणार आहे. आमचें म्हणणें न्याय्य व रास्त आहे. आणि प्रत्येकास धर्मस्वातंत्र्य असावें असा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्कच नाहीं का?........तेव्हां माझ्या सर्व कॅथॉलिकबंधूंस माझी विनंति कीं, आपल्या पवित्र व प्राचीन धर्मावर कोणाचा हल्ला आला तर तो तुम्ही कधींही सहन करूं नका. आपल्या परमप्रिय धर्माच्या रक्षणाकरितां आपल्या पूर्वजांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या प्राणांचीही पर्वा केलेली नाहीं; व धार्मिक अधःपातापेक्षां गुलामगिरीस कवटाळण्यासही त्यांनीं कमी केलें नाहीं. अशा पूर्वजांचेच आपण सुपुत्र आहोंत. एक वेळ गुलामगिरी स्वीकारावी लागली तरी बेहेत्तर; परंतु आपल्या धर्माची विटंबना व बेअब्रू होऊं देऊं नका हीच माझी तुम्हांस कळकळीची विनंति आहे.

प्रश्न :—१. ओकोनेलनें इंग्लंडवर कोणता आरोप केला ? त्याला यशाची आशा कां होती ?

२. त्यानें आपल्या धर्मबंधूंस कोणती विनंति केली ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. पार्लमेंटच्या सुधारणांचें बिल पास झालें

१. चौथा विल्यम (१८३०-३७):—सन १८३० मध्यें चौथा जॉर्ज मृत्यु पावला व त्याचा भाऊ चौथा विल्यम इंग्लंडचा राजा झाला. तो सुधारणावादी असल्यामुळें लोकांत प्रिय होता. तो जरा लहरीच होता. लोकांनीं आपल्याला 'बरें' म्हणावें असें त्यास वाटे. त्यानें थोडें नाविक शिक्षण घेतलें असल्यानें त्याला 'नाविक राजा' असेंही म्हणत. तो मोकळ्या मनाचा होता. भाषणें करावयाची त्याला मनापासून हौस होती. तो लंडनच्या रस्त्यांमधूनही मोकळेपणानें भटके व वाटेल त्याच्याशीं बोले.

चौथा विल्यम

त्याचें अंतःकरण मृदु असल्यामुळें तो दुसऱ्यास सहसा दुखवीत नसे, यामुळेंच तो लोकांस आवडे. त्याचें वर्तनही चांगलें होतें. व्हिग व टोरी पक्षांतील लोकांशीं तो आपलेपणानें वागत असे. राज्यावर आल्यावर त्यानें सुधारणेस आपलें मत अनुकूल दिल्यानें त्या प्रश्नाला महत्त्व मिळालें. सन १८३० मध्यें फ्रान्समध्यें राज्यक्रांति होऊन अनियंत्रित सत्तेस मोठाच धक्का बसला होता; व फ्रान्समध्यें नियंत्रित राजसत्ता स्थापन झाल्यानें इंग्लंडमध्येंही

राणी ॲडेलेड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकशाहीची प्रगति होईल असें मध्यमवर्गीयांस वाटत होतें. त्यांची ही अटकळ खरी ठरली.

२. पार्लमेंटच्या सुधारणेचे प्रयत्न :—पहिल्या एडवर्डच्या वेळीं पार्लमेंटची स्थापना झाली व तेव्हांपासून सन १६८९ पर्यंत तिची सत्ता एकसारखी वाढतच होती. त्यामुळें ब्रिटिश राज्यघटनेंत तिचें स्थान अढळ झालें व तिला एक प्रकारें असामान्य महत्त्व प्राप्त झालें. नंतरच्या राजांनीं खटपट करूनही तिचें महत्त्व घटलें नाहीं. अशी महत्त्वाची संस्था देशकालानुरूप सुधारणें अत्यंत आवश्यक झालें होतें. देशांत दारिद्र्य माजलें होतें व देशाची स्थितीही निकृष्ट होऊं लागली होती. ही स्थिति सुधारावयाची असेल तर पार्लमेंटची सुधारणा झाली पाहिजे असें लोक म्हणूं लागले होते. दोन्ही पिट, रिचमॉंडचा ड्यूक, जॉन विल्कस्, (खंड २ रा, पान २८१ पहा,) कॉबट, बर्डेट, लॉर्ड जॉन रसेल (खंड२रा, पान ३६८ पहा,) वगैरेनीं पार्लमेंटची सुधारणा करण्याचा अनेक वेळां निष्फळ प्रयत्न केला होता. नेपोलियनशीं झालेल्या युद्धानंतर तो प्रश्न प्रामुख्यानें पुढें आला; परंतु त्यावेळीं प्रतिगामी टोरी प्रधानांनीं दडपशाही करून तो प्रश्न दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें देशांत अनेक ठिकाणीं दंगे झाले, कट झाले, सुधारणावादी मंडळें स्थापन झालीं व त्या सर्वांमुळें पार्लमेंटच्या सुधारणेचा प्रश्न तेवत राहिला. कॅथॉलिकांच्या विमोचनानंतर व सुधारणावादी चौथा विल्यम गादीवर आल्यानंतर त्या प्रश्नाला चांगलीच चालना मिळाली. परंतु त्यावेळचा मुख्य प्रधान वेलिंग्टन यानें पार्लमेंटच्या सुधारणेसंबंधीं प्रतिकूळ विचार प्रकट केल्यानें लोक खवळले. तेव्हां त्याचा पार्लमेंटमध्यें पराभव झाल्यानें त्यानें राजीनामा दिला (१८३०). पार्लमेंटची नवी निवडणूक झाली व त्यांत सुधारणावादी व्हिगांचें बहुमत झाल्यानें त्यांचा पुढारी लॉर्ड ग्रे मुख्य प्रधान झाला. त्यानें पार्लमेंटच्या सुधारणेचा प्रश्न हातीं घेऊन तो धसास लावला व यश मिळविलें.

३. पार्लमेंटच्या सुधारणेची आवश्यकता :—पार्लमेंटची सुधारणा करण्याची आवश्यकता अनेक करणांनीं लोकांस पटूं लागली होती. सन १४३० मध्यें वार्षिक चाळिस शिलिंग उत्पन्न असणाऱ्या मिरासदारांस अगर जमीनदारांस मतदानाचा अधिकार मिळालेला होता. त्यांत गेल्या चारशें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्षांत कोणत्याही प्रकारचा फरक झालेला नव्हता. औद्योगिक क्रातीनंतर मँचेस्टर, बर्मिंगहॅम, लीडस्, यॉर्क, शेफील्ड वगैरे मोठमोठ्या शहरांस प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार नव्हता. उलट पूर्वीच्या खेड्यांस पूर्वीप्रमाणेंच आपापले प्रतिनिधि पाठवितां येत. त्यामुळें अनेक चमत्कारिक प्रकार घडत. लंडनसारख्या पांच लाख वस्तीच्या शहरास फक्त चार प्रतिनिधि होते, तर वेमथ, मेलकंब रेजिस वगैरे सारख्या मागासलेल्या खेड्यांस प्रत्येकीं दोन दोन प्रतिनिधि पाठवितां येत. ओल्ड सेरम, ग्रॅटन, डनिच वगैरे गांवें उजाड व उध्वस्त झालेलीं असतांही व त्या गांवीं कोणीही रहात नसतांही त्यांचा प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क कायम होता. 'लॉजर्स हॉल' नामक खेड्यांत एका घरांत एकच मतदार होता व तो आपल्या स्वतःचें मत स्वतःला देई व त्या गांवाचा प्रतिनिधि म्हणून पार्लमेंटमध्यें जाऊन बसे! अशा सर्व उध्वस्त खेड्यांस 'मोडकळलेलीं खेडीं' असें म्हणत. तसेंच हीं उजाड गांवें एखादा उमराव अगर जमीनदार विकत घेई व त्यांच्यातर्फे तो आपले हस्तक निवडून आणी. लहान लहान खेडीं जमीनदारांच्या हातांतील होतीं व आपलें वजन त्या गांवच्या शेतकऱ्यांवर अगर मजुरांवर पाडून ते लोक आपल्याला पाहिजे तोच उमेदवार निवडून आणीत. अशा खेड्यांना 'हात-खेडीं' अगर 'मालकी गांवें' असें म्हणत. हे जमीनदार आपल्या वर्चस्वाखालीं असलेल्या जागा प्रत्यक्षपणें किंवा गुप्तपणें लिलांवानें विकीत किंवा गुप्तधन घेऊन वाटेल त्याला त्या गांवातर्फे निवडणुकीस उभे राहूं देत. यामुळें पार्लमेंट-मधील सुमारें एकतृतीयांश लोक पैसे भरून निवडून येत! त्याचप्रमाणें पार्लमेंटमधील जवळ जवळ निम्या जागा जमीनदारांच्या ताब्यांत होत्या!! प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळीं लांचलुचपतीचे प्रकार इतके होत कीं भल्या माणसास त्यांचा वीट येई. उघडपणें लांच देणें, धमक्या देणें, मारामारी करणें, दंगल माजविणें वगैरे गोष्टी नेहमीं चालत. गुप्तपणें मतदानाची सोय नसल्यानें उमेदवार व त्यांचे एजंट अगर हस्तक कोणीं कोणास मत दिलें तें ओळखीत. अशा तऱ्हेनें एक निवडणूक अनेक दिवस चाले, दररोजचें मतदान दररोज जाहीर केलें जाई व त्यामुळें शेवटीं मतदान करणारांस चांगली रक्कम मिळे! मतदानाचा अधिकारही मर्यादितच होता. औद्योगिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्रांतीनंतर पुढें आलेल्या घरमालक, व्यापारी, कारखानदार, श्रीमंत, धंदेवाले वगैरे लोकांस मतदानाचा अधिकार नव्हता. मजूर, खलाशी, नावाडी वगैरे कनिष्ठ वर्गांतील लोकांस तो नव्हताच नव्हता. यामुळें ते लोक असंतुष्ट होते व मतदानाचा अधिकार मिळवून घेण्यासाठीं त्यांचा एकसारखा प्रयत्न चालला होता. पार्लमेंटमध्यें निवडून आलेले लोक आपलीं मतें, जो पक्ष अधिक पैसे देईल त्याला विकीत; व अशा मार्गांनीं आपल्या तुंबड्या भरून घेत. या सर्व गोष्टींवरून पार्लमेंटसभा लोकमतनिदर्शक नव्हती हें उघड आहे. कारण पार्लमेंटमधील जवळ जवळ चारपंचमांश सभासद जमीनदारांच्या वर्चस्वाखालीं असलेल्या शहरांतून निवडून आलेले असत!

४. विरोधकांचें म्हणणें:—अशी स्थिति असतांही वेलिंग्टन, पील वगैरे टोरी मुत्सद्दी पार्लमेंटच्या सुधारणेस कसून विरोध करीत होते. त्यांचें म्हणणें असें कीं, आजवर इंग्लंडची राज्यघटना हळूहळू वाढत गेली, तिच्यांत एकदम फरक झालेला नाहीं. अनेक अडचणींना व आपत्तींना तिनें तोंड दिलें व त्या दिव्यांतून ती वांचली. त्यामुळें तावूनसुलाखून निघाल्यामुळें तिचें राष्ट्रास अत्यंत महत्त्व वाटावयास पाहिजे; कारण यापुढें ती यापेक्षांही जास्त महत्त्वाची कामगिरी केल्याशिवाय राहणार नाहीं. अशी उत्कृष्ट राज्यघटना ठोकरीसरशी नष्ट करून तींत सुधारणा करणें मूर्खपणाचें ठरेल; किंवा फ्रेंच क्रांतिकारकांच्या प्रयत्नांप्रमाणें तो प्रयत्न फोल ठरेल. अनेक मताचे लोक आजही पार्लमेंटमध्यें लोकांचे प्रतिनिधि म्हणून आहेत. यापेक्षां जास्त लोकांस प्रतिनिधित्व दिलें तर देशांत क्रांति झाल्याशिवाय खचित राहणार नाहीं. कारण खालच्या वर्गांतील लोकांच्या हातीं राजसत्ता गेली तर ते राज्यकारभार बिघडवून टाकतील, देशांतील शांततेचा बिघाड होईल व देशांत दंगेधोपे माजून इतके दिवस अविश्रांत श्रम घेऊन बसविलेली घडी नष्ट होईल. वॉलपोल, चॅटहॅम, धाकटा पिट, बर्क, फॉक्स, वगैरे मुत्सद्दी जुन्या परंपरेंत वाढलेले व त्यांनीं जुनी राज्यघटना चिरस्थायी केलेली. ती एकदम नष्ट करणें योग्य होणार नाहीं.

५. सुधारणेचें बिल पास झालें (१८३२):—वरील विचारसरणी लोकांस मान्य झाली नाहीं व म्हणून लॉर्ड ग्रे मुख्य प्रधान झाल्याबरोबर त्याच्या सूचनेप्रमाणें लॉर्ड जॉन रसेल यानें कॉमन्स सभेंत पार्लमेंटच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

४१५/१९ (ग्र) २०१८६
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुधारणेचें बिल मांडलें; परंतु तें नापास झालें (मार्च, १८३१). तेव्हां पार्लमेंटची पुन्हां निवडणूक झाली. त्यांत सुधाणावादी व्हिगपक्ष बहुमतानें पार्लमेंटमध्यें निवडून आला. तेव्हां त्या पार्लमेंटनें सुधारणेचें बिल पास केलें (ऑक्टो. १८३१); परंतु उमरावमंडळानें तें नापास केलें. त्यामुळें सर्व देशांत जोराची चळवळ सुरू झाली, दंगेधोपे सुरू झाले, जमीनदारांच्या घरांवर हल्ले होऊं लागले व कांहीं शहरांतून रक्तपातापर्यंतही मजल गेली. पार्लमेंटची बैठक सन १८३२ मध्यें पुन्हां भरली. त्यावेळीं पार्लमेंटच्या सुधारणेचें बिल कॉमन्ससभेनें तिसऱ्यांदां पास करून उमरावमंडळाकडे पाठविलें. त्यावेळीं उमरावमंडळानें त्यांत आमूलाग्र सुधारणा सुचविल्या. ती गोष्ट लोकांस कळतांच त्यांचा पारा एकदम चढला. लॉर्ड ग्रेनें तें बिल उमरावमंडळांत पास होत नाहीं असें पाहून तें पास होण्यास पुरतील इतके नवे उमराव निर्माण करण्याचा राजाला सल्ला दिला. परंतु तो राजास मानवला नाहीं. तेव्हां लॉर्ड ग्रेनें राजीनामा दिला. वेलिंग्टननें प्रधानमंडळ बनविण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु त्याला यश लाभलें नाहीं. तेव्हां राजानें लॉर्ड ग्रेला पुन्हां प्रधानमंडळ बनविण्यास सांगितलें. परंतु तसें करण्यापूर्वी लॉर्ड ग्रेनें आपल्याला पाहिजे असलेलें वचन त्याच्याकडून घेतलें. तेव्हां उमराव-मंडळानें त्या बिलाला संमति देऊन तें पास केलें. मात्र मतदानाच्या वेळीं वेलिंग्टन व त्याचे सुमारें शंभर अनुयायी तटस्थ राहिले. अशा तऱ्हेनें व्हिगपक्षानें जोर धरून पार्लमेंटच्या सुधारणेचें बिल पार्लमेंटमधील टोरींच्या व जमीनदारांच्या विरोधास न जुमानतां पास करून घेतलें.

६. पार्लमेंटच्या सुधारणेचा कायदा (१८३२):—सन १८३२ सालीं पास झालेल्या कायद्यानें अनेक सुधारणा केल्या. पूर्वीच्या ५६ परगण्यांचा प्रत्येकीं दोन प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार व ३१ परगण्यांचा प्रत्येकीं एकेक प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार काढून घेण्यांत आला. अशा तऱ्हेनें १४३ जागा रिकाम्या झाल्या. त्यापैकीं ५६ जागा मोठ्या परगण्यांना देण्यांत येऊन, २२ मोठ्या शहरांस प्रत्येकीं दोन प्रमाणें व २१ छोट्या शहरांस प्रत्येकीं एक प्रमाणें वांटण्यांत आल्या. दोन हजाराखालीं लोकवस्ती असलेल्या गांवांचा प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार अजीबात

LIBRARY,
GURUKULA KANGRI.
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढून घेण्यांत आला. स्कॉटलंडला आठ जागा अधिक मिळून, आयर्लंडला पांच अधिक जागा देण्यांत आल्या. मतदानाच्या अधिकारांतही फरक करण्यांत आला. वार्षिक चाळिस शिलिंग उत्पन्न असणाऱ्या जमीनदारांचा पूर्वीचा मतदानाचा अधिकार कायम करण्यांत आला. वार्षिक १० पौंड खंड भरणाऱ्या पट्टेदारास व वार्षिक ५० पौंड खंड देणाऱ्या खंडकऱ्यास मतदानाचा अधिकार मिळाला. वार्षिक १० पौंड भाडें येईल अशा शहरांतील घरमालकांसही तो हक्क देण्यांत आला. मात्र मजूर, सैनिक, नावाडी वगैरे श्रमजीवी लोकांस मतदानाचा हक्क मिळाला नाहीं. पार्लमेंटच्या कॉमन्स-सभेची संख्या पूर्वी ६१५ होती ती आतां ६५८ झाली.

७. बिलाचें महत्त्व व परिणाम :—वरील कायद्यानें अनियंत्रित राजसत्ता कायमची नष्ट होऊन लोकशाहीच्या युगास सुरुवात झाली. त्यामुळें राजाची सत्ता नामशेष होऊन पार्लमेंटला राज्यघटनेंत महत्त्वाचें व मानाचें स्थान लाभलें. अर्थात् मुख्य प्रधानाचें महत्त्व वाढलें असल्यास नवल नाहीं. पूर्वीच्या जमीनदारांचें पार्लमेंटमधील वर्चस्व कमी होऊन, मध्यमवर्गातील लोकांच्या मतांची पार्लमेंटवर छाप पडूं लागली. त्यामुळें पुढें सन १८६८ पर्यंत त्यांच्याच हातांत राज्यकारभार राहूं शकला. अर्थात् मध्यमवर्ग पुढें सरसावल्यानें त्या वर्गाचें महत्त्व फार वाढलें. असें असलें तरीही श्रीमंत व वजनदार जमीनदारांचें पार्लमेंटमधील वजन अजीबात नष्ट झालें नाहीं. त्या वर्गातील लोकांचें बहुमत कमी झालें, तरी त्यांच्या विचारांची छाप पार्लमेंटवर पडत होतीच. या कायद्यानें मजूर वर्गातील लोकांस मतदानाचा अधिकार मिळाला नसल्यानें तो वर्ग असंतुष्ट राहिला. त्यामुळें तो हक्क प्राप्त करून घेण्याकरितां त्यांनीं चळवळ करण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम म्हणजे चार्टिस्टांची चळवळ होय. या बिलानें उत्तर इंग्लंड व मध्य इंग्लंडमधील औद्योगिक केंद्रांतील शहरांना महत्त्व मिळालें. त्यामुळें राजकीयदृष्ट्या त्या भागाचें महत्त्व फार वाढलें. या कायद्यानें पांच लक्ष लोकांना मतदानाचा अधिकार मिळाल्यानें मतदारांची संख्या दहा लक्ष झाली. अर्थात् मतदारसंघ व मतदानाचा अधिकार विस्तृत झाल्यानें पार्लमेंटसभा पूर्वीपेक्षां कितीतरी पटीनें लोकमतनिदर्शक झाली. हा कायदा व्हिगपक्षानें पास करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेतला. मात्र यापुढें सुधारणा करण्याची आवश्यकता नाहीं असें या कायद्याचा जनक लॉर्ड जॉन रसेल म्हणाला; व त्याच्या म्हणण्याला अनेक व्हिग लोकांनीं मान्यता दर्शविली होती हें आश्चर्य होय. हें बिल पास झालें नसतें तर इंग्लंडांत राज्यक्रांति होईल अशी अनेकांस भीति वाटत होती. आतां तें बिल पास झाल्यानें ती भीति टळली असें त्यांस वाटूं लागलें.

८. **सुधारलेल्या पार्लमेंटची कामगिरी**:—नव्या कायद्यानुसार सन १८३३ मध्यें पार्लमेंटची निवडणूक होऊन व्हिगपक्ष मताधिक्यानें निवडून आला; व मोठ्या उत्साहानें तो सुधारणांच्या कामास लागला. या पार्लमेंटनें अनेक महत्त्वाचे कायदे पास केले. सन १८३३ सालीं गुलामांची गुलामगिरींतून मुक्तता करण्याचा कायदा पास करण्यांत आला. सन १८०७ च्या कायद्यानें गुलामांचा व्यापार बंद करण्यांत आला होता व त्यामुळें गुलामांचा व्यापार ज्यांमधून पुष्कळ चाले अशा ब्रिस्टल, लिव्हरपूल वगैरे बंदरांचें महत्त्व कमी झालें होतें. तरीही गुलामगिरी नष्ट झालेली नव्हती. ती नष्ट व्हावी म्हणून विल्यम विल्बरफोर्सनें अतोनात खटपट चालविली होती. पिट, फॉक्स, कॅनिंग वगैरे मुत्सद्यांनीं त्याला सक्रिय पाठिंबा दिला होता. तरीही अमेरिकेमध्यें गुलामगिरींत अडकून राहिलेले अनेक गुलाम होतेच. तेव्हां त्यांची गुलामगिरींतून कायमची मुक्तता करण्याकरितांच वरील कायदा पास करण्यांत आला. त्यामुळें गुलामांची मुक्तता झाली; तरी त्यांनीं पांचसात वर्षें उमेदवार म्हणून आपल्या मालकांकडे काम करावें असें ठरलें. वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिका वगैरेमधील गुलामांच्या मालकांचें अतीशय नुकसान झालें व त्यांच्या व्यवहारांत त्यांस बूड येऊं

विल्यम विल्बरफोर्स

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागली. तेव्हां गुलामांच्या मालकांस नुकसानभरपाईदाखल सरकारनें दोन कोट पौंड द्यावे असें ठरविण्यांत आलें. त्याच वर्षी 'कारखान्यांचा कायदा' करण्यांत येऊन नऊ वर्षांखालील मुलांस कारखान्यांत नेमूं नये, स्त्रियांस व अठरा वर्षांच्या आंतील मुलांस दररोज फक्त दहा तास काम देण्यांत यावें व तेरा वर्षांच्या आंतील मुलांस फक्त आठ तास काम देण्यांत यावें व दररोज दोन तास त्यांना शाळांत शिक्षणाकरितां पाठवावें असें ठरलें. शिवाय कारखान्यांची तपासणी करण्याकरितां एका सरकारी तपासनिसाचीही नेमणूक करण्यांत आली. सन १८३३ मध्यें शिक्षणासंबंधींही कायदा पास करण्यांत आला व खाजगी संस्थांस दरसाल वीस हजार पौंडांची देणगी देण्यांत येऊन ती त्यांनीं शाळा बांधण्यांत खर्च करावी असें ठरलें. सन १८३४ सालीं भिकाऱ्यांच्या कायद्यांत सुधारणा करण्यांत आली. पूर्वी मजुरांस थोडी मजुरी मिळे व त्यामुळें धर्मादाय-फंडांतून त्यांना 'डोल' नामक भत्ता देण्याची पद्धति सुरू झाली होती. या पद्धतीनें कारखानदार आपल्या मजुरांची मजुरी उतरवूं लागल्यानें मजुरीचे दर उतरले. धर्मादाय-फंडास मदत करणारांचेंही नुकसान होऊं लागलें. यामुळें वरील कायदा पास करण्यांत आला. त्या कायद्यानें 'डोल' भत्ता म्हाताऱ्या व पंगु मजुरांसच देण्यांत यावा, व ज्यांना तो पाहिजे असेल त्यांनीं सरकारी भिकारखान्यांत राहून काम करावें व मजुरी घ्यावी असें ठरलें. यामुळें धर्मादाय-फंडावरील बोजा कमी झाला, मजुरीचे दर वाढले व योग्य माणसासच मदत मिळूं लागली. या कायद्याला 'भिकाऱ्यांचा नवा कायदा' असें म्हणतात. सन १८३३ मध्यें ई. इं. कंपनीच्या सनदेमध्यें फेरफार करण्यांत येऊन तिच्याकडील सर्व व्यापारी हक्क काढून घेण्यांत आले; व ती कंपनी एक राजकीय संस्था बनली. चीनशीं व्यापार करण्याचा तिचा मक्ता काढून घेण्यांत येऊन तो व्यापार सर्वांस खुला करण्यांत आला. यामुळें हिंदुस्थानांतील कारभार हांकणें एवढेंच काम त्या कंपनीकडे राहिलें.

९. **प्रधानमंडळांतील फेरफार**:—सन १८३३ सालीं एक दडपशाही कायदा पास करून प्रधानमंडळानें तो आयर्लंडला लागू केला. त्यावेळीं आयर्लंडमध्यें अत्याचारांस ऊत आला होता. तेव्हां ते दडपून टाकण्याकरितां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरील कायदा पास करण्यांत आला. परंतु तो कायदा पुढील वर्षीं तसाच चालू ठेवावा असें लॉर्ड अल्थ्रॉप म्हणूं लागला. तें लॉर्ड ग्रेला पसंत नसल्यानें अल्थ्रॉपनें प्रधानमंडळांतील आपल्या जागेचा राजीनामा दिला. त्याच वेळीं वृद्धपणामुळें लॉर्ड ग्रेनेंही राजीनामा दिल्यानें लॉर्ड मेलबर्न मुख्य प्रधान झाला. परंतु राजाला व्हिग लोकांचा कंटाळा आल्यानें त्यानें वेलिंग्टनला प्रधानमंडळ बनविण्यास सांगितलें. त्यानें सर रॉबर्ट पीलकडे बोट दाखविलें. तेव्हां पीलनें मुख्य प्रधानाची जागा स्वीकारली व आपलें प्रधानमंडळ बनविलें. परंतु त्याचा पार्लमेंटमध्यें एकसारखा पराभव होऊं लागल्यानें त्यानें राजीनामा दिला व शेवटीं लॉर्ड मेलबर्न मुख्य प्रधान झाला. या सर्व घालमेलींत एक महत्त्वाची गोष्ट घडून आली होती. सन १८३५ मध्यें पार्लमेंटची निवडणूक होणार होती. त्यावेळीं सर रॉबर्ट पीलनें टॅमवर्थ या गांवाहून आपल्या पक्षातर्फे एक जाहीर पत्रक प्रसिद्ध केलें होतें (१८३४). व त्यांत आपल्या पक्षाचें टोरी हें नांव बदलून त्यानें 'कंझर्व्हेटिव्ह' हें नवें नांव स्वीकारलें होतें. पुढें व्हिगपक्षानेंही आपलें नांव बदलून 'लिबरल' हें नांव धारण केलें. त्या वेळेपासून आजतागायत इंग्लंडमध्यें कंझर्व्हेटिव्ह व लिबरल हींच नांवें राजकारणांत प्रसिद्ध आहेत.

१०. लॉर्ड मेलबर्नचें प्रधानमंडळ (१८३५-४१):—लॉर्ड मेलबर्न मुख्य प्रधान झाला त्यावेळीं त्यानें प्रथमतः एक अत्यंत महत्त्वाचा कायदा पास करून घेतला. इतके दिवस शहरांतून म्युनिसिपालिट्या होत्या; परंतु कांहीं विशिष्ट व्यक्ति व घराणीं यांच्या हातींच त्यांचा कारभार होता. त्यामुळें म्युनिसिपल कर देणारांचें हित रक्षिलें जात नसे. ही स्थिति सुधारणें इष्ट होतें. तेव्हां लॉर्ड मेलबर्ननें सन १८३५ मध्यें 'म्युनिसिपालिट्यांचा कायदा' पास केला. या कायद्यानें म्युनिसिपल कर देणारांस मतदानाचा अधिकार दिला व म्युनिसिपालिट्यांची दर तीन वर्षांनीं निवडणूक व्हावी व निवडून आलेल्या सभासदांनीं मेयर, उपमेयर वगैरे अधिकारी निवडून आपल्या शहराच्या स्थानिक गोष्टींची व्यवस्था पहावी असें ठरवून दिलें. तसेंच दहा हजारांवर लोकवस्ती असलेल्या सर्व शहरांस म्युनिसिपालिटी स्थापन करण्याचा अधिकार देण्यांत आला. या कायद्यानें लोकांस प्रत्यक्ष राज्य-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारभाराचें शिक्षण मिळणें शक्य झालें. सन १८३६ सालीं पार्लमेंटमधील कोणत्या सभासदानें कोणत्या बाजूस मत दिलें हें सर्वांस कळावें म्हणून त्यानें मतविभागणीची यादी प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. त्याच वर्षी जन्म-मृत्यु व लग्नें यांची सरकारी नोंद व्हावी असें ठरविण्यांत येऊन त्याकरितां एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आली. हेंच काम पूर्वी धर्मगुरू करीत. त्याचप्रमाणें रजिस्टरपद्धतीनें लग्नें करण्यासही त्यानें सर्वांस मोकळीक दिली. दुसऱ्या एका बिलानें त्यानें वर्तमानपत्रांवरील जकात चार पेन्सांच्या ऐवजीं एक पेनी केली. यामुळें वर्तमानपत्रें स्वस्त होऊन लोकांत जागृति होण्यास मदत झाली. इतके दिवस 'टाइथ' कर सर्व आयरिश कॅथॉलिकांकडून आयरिश धर्मपीठाकरितां वसूल करण्यांत येत होता. टाइथ म्हणजे उत्पन्नाचा दहावा हिस्सा व तो धान्याच्या रूपानें घेण्यांत येत असे. ही पद्धति बदलून तो कर पैशाच्या रूपानें घ्यावा असें मेलबर्नच्या प्रधानमंडळानें ठरवून दिलें (१८३६). अशा गोष्टी चालू असतांच चौथा विल्यम सन १८३७ मध्यें मृत्यु पावला. त्याला मूलबाळ नसल्यानें त्याची पुतणी व केंटच्या ड्यूकची मुलगी व्हिक्टोरिया इंग्लंडची राणी झाली.

अभ्यास

१. पार्लमेंटच्या सुधारणेची आवश्यकता सिद्ध करा. ती सुधारणा घडवून आणण्याकरितां कोणीं कोणीं व कसकसे प्रयत्न केले ते सांगा.

२. पार्लमेंटची सुधारणा करण्याकरितां टोरी लोकांनीं प्रयत्न कां केला नाहीं ? त्यांचें म्हणणें काय होतें? व्हिग लोकांचें म्हणणें काय होतें ?

३. सन १८३२ सालच्या सुधारणा-बिलाचीं कलमें सांगून त्या बिलाचें महत्त्व व परिणाम सांगा.

४. नव्या सुधारलेल्या पार्लमेंटनें कोणती कामगिरी बजाविली ?

५. तुमच्या शाळेच्या पार्लमेंटपुढें 'पार्लमेंटच्या सुधारणेची आवश्यकता' हा विषय चर्चेकरितां घ्या. व्हिगपक्षानें सुधारणांची आवश्यकता प्रतिपादावी व टोरीपक्षानें त्याला विरोध करावा. त्याच पार्लमेंटमध्यें सुधारणा-बिलावरही चर्चा करावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. खालील व्यक्तींनीं इतिहास घडविला असें म्हणतात तें खरें काय ? कशावरून ? विल्बरफोर्स, लॉर्ड ग्रे, हस्किसन, कॅनिंग.

७. चौथ्या विल्यमच्या कारकीर्दीत झालेल्या सामाजिक व राजकीय सुधारणांसंबंधीं माहिती सांगा.

उतारे

१. वेलिंग्टनचा ड्यूक व पार्लमेंटची सुधारणा—१८३०.

पार्लमेंटची सुधारणा करण्याची एखादी योजना मी तयार केली आहे अशी कोणाची कल्पना असेल तर ती चूक आहे. तशा प्रकारची एखादी योजना माझ्या पाहण्यांत व वाचण्यांतही आलेली नाहीं. त्या विषयांत शिरण्याची व त्यावर एखादा खडाजंगी वाद निर्माण करण्याची माझी इच्छा नाहीं. माझी ठाम कल्पना आहे कीं आपलें विधिमंडळ सर्व दृष्टींनीं परिपूर्ण असेंच आहे. त्याच्याकडून कायदे करण्याचें कामही चोख होतें. इतकेंच नव्हे तर दुसऱ्या कोणत्याही विधिमंडळाचें काम चोख होत नसेल इतकें आपल्या विधिमंडळाचें होतें. त्यामुळेंच आपल्या विधिमंडळावर व देशांत रूढ असलेल्या राज्यपद्धतीवर लोकांचा अढळ विश्वास आहे; त्या मंडळांत होणारे वादविवाद व होणाऱ्या चर्चा लोकादरास पात्र होतात. दुसऱ्या एखाद्या देशाचें विधिमंडळ या घटकेस बनविण्याची माझ्यावर पाळी आली तर आपल्या विधिमंडळाइतकें उत्तम तें मला निर्माण करतां येईलच असा मला भरंवसा वाटत नाहीं. आज आपल्या पार्लमेंटमध्यें जमीनदारांचें प्राबल्य आहे व त्यामुळेंच पार्लमेंटच्या कामगिरीवर त्यांच्या विचाराचेंच वर्चस्व स्थापन होतें हें मला मान्य आहे. (ती स्थिति राष्ट्राच्या फायद्याची असल्यानें) त्यांत सुधारणा करण्यास मी तरी तयार होईन असें मला वाटत नाहीं. एवढेंच नव्हे तर तशी सुधारणा करण्याची एखादी योजना माझ्यापुढें आल्यास तिला विरोध करणें मी आपलें कर्तव्यकर्म समजेन.

प्रश्न :—१. वेलिंग्टनला पार्लमेंटची सुधारणा कां नको होती ?

२. त्याला पूर्वीची स्थिति आवडत होती ? कां ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. पार्लमेंटचा सुधारणा कायदा—१८३२—कांहीं भाग

ज्याअर्थीं कॉमन्ससभेंतील सभासदांच्या निवडणुकीसंबंधीं अनेक घोटाळे उत्पन्न झाले आहेत व ते दूर करणें अत्यंत जरुरीचें आहे, पुष्कळ गावांचा प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार रद्द करणें आवश्यक आहे, श्रीमंत व भरभराटीस आलेल्या व लोकांनीं गजबजलेल्या शहरांस प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार देणें योग्य आहे, तसेंच परगण्यांतील ज्या जमीनदारांना मताधिकार मिळालेला नाहीं व मतदानाचा हक्क ज्यांना आजपर्यंत मिळालेला नाहीं व त्यांना तो देणें जरूर आहे, निवडणुकीचा खर्च कमी करणें आवश्यक आहे,

त्याअर्थीं असा कायदा करण्यांत येत आहे कीं (१) ओल्डसेरम, न्यू टाऊन, सेंट मायकेल्स्, गॉल्टन, ब्रँबर, बॉझी हे, डनिच, लजर हॉल, सेंट जर्मेन, न्यू पोर्ट, यारमथ, न्यूटन, बरोब्रिज, स्टॉकब्रिज, हेडन, मिलबर्न, ॲपलबी वगैरे छप्पन्न नामधारी शहरांचा एकेक प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार रद्द करण्यांत यावा, (२) मँचेस्टर, बर्मिंगहॅम, लीड्स, ग्रीनिच्, शेफील्ड, संदर्लंड, डेव्हन पोर्ट, फिन्सबरी, हॅलिफॅक्स, ब्रायटन, मेरिलीबोन, ब्रॅडफर्ड, ब्लॅकबर्न, लँबीथ, बोल्टन, ओल्डहॅम, स्टॉकपोर्ट वगैरे बावीस शहरांस प्रत्येकी दोन प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार देण्यांत यावा, (३) चॅटहॅम, डडले, केंडॉल, वेकफील्ड, रॉचडेल, वॉरिंग्टन, व्हिटबी, व्हाइटहेवन, बरी, गेटस्हेड वगैरे वीस शहरांस प्रत्येकी एक प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार असावा. (४) व ज्याचा वार्षिक खंड दहा पौंडाखालीं नाहीं अशा वयांत आलेल्या प्रत्येक पुरुषास मतदानाचा अधिकार असावा.

प्रश्न :—१. वरील कायद्यानें प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार कोणत्या शहरांस मिळाला ? कां ?

२. कोणत्या शहरांचा तो अधिकार नष्ट झाला ? कां ?

३. वरील कायदा करण्याचा हेतु कोणता होता ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. संरक्षित व्यापार कीं खुला व्यापार

१. राणी व्हिक्टोरिया (१८३७–१९०१):—सन १८३७ मध्यें व्हिक्टोरिया इंग्लंडची राणी झाली. सन १८१९ मध्यें तिचा जन्म झाला व जन्मानंतर सहासात महिन्यांनींच तिचा बाप मृत्यु पावल्यानें तिचें संगोपन व संवर्धन तिच्या जर्मन आईनेंच केलें. लंडनच्या केनसिंग्टन राजवाड्यांत ती रहात होती. एके दिवशीं पहाटे पांचच्या सुमारास तिला जागी करण्यांत आली. ताबडतोब कँटरबरीचा आर्चबिशप व लॉर्ड चेंबरलेन (राजाचा मुनीम) यांना तिच्यासमोर आणण्यांत आलें. त्या वेळीं ती डोळे चोळीत व जांभया देत असतांच, 'ती इंग्लंडची राणी झाल्याचें वृत्त' त्या दोघांनीं तिला कळविलें व तिला कुर्निसात केला. त्यावेळीं तिचें वय एकोणीस वर्षांचें होतें. तिला राजकारणाचा गंधही नव्हता. तिची राहणी अत्यंत साधी होती. डामडौल, भपका, चैन वगैरे गोष्टी तिला माहीत नव्हत्या. राहणी अत्यंत काटकसरीची असल्यानेंच तिच्या उत्तर आयुष्यांत तिला मध्यम-

राणी व्हिक्टोरिया



प्रिन्स आल्बर्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्गातील लोकांशीं मिळून मिसळून वागतां आलें. सन १८४० सालीं सॅक्स-कोबर्गच्या आल्बर्ट नामक एका जर्मन राजपुत्राशीं तिचें लग्न झालें. तो मोठा चाणाक्ष, हुशार व मेहनती होता. पार्लमेंटनें त्याला तीस हजार पौंड दरसाल मिळावे असें ठरविलें. राणीचें वैवाहिक जीवन अत्यंत सुखांत गेलें. तिला इंग्लंडचें राज्य मिळाल्यानें एक मोठीच अडचण उत्पन्न झाली. इतके दिवस इंग्लंडच्या राज्यावर पुरुष असल्यानें त्याला हॅनोव्हरचेंही राजपद मिळे; परंतु जर्मन सॅलिक कायद्याप्रमाणें स्त्रीला राजपद मिळणें शक्य नव्हतें. तेव्हां राणीचा चुलता कंबरलंडचा ड्यूक हॅनोव्हरचा राजा झाला. यामुळें इंग्लंडचा व हॅनोव्हरचा संबंध तुटला. असें झाल्यानें इंग्लंडचा फायदाच झाला. कारण हॅनोव्हरमुळें इंग्लंडला युरोपियन युद्धांत पडावें लागे, तें आतां अशक्य झालें. व्हिक्टोरिया राणीनें चौसष्ट वर्षें राज्य केलें. पक्षातीत राहून तिनें कारभार केला व इंग्लंडची सर्वतोपरी भरभराट होण्यास तिनें अखंड मदत केली. त्यामुळें ती आपल्या प्रजेला फार आवडे.

२. कानडाचा प्रश्न (१८३७–३८):—व्हिक्टोरिया राणी झाली त्याच वेळीं कानडामध्यें यादवी माजणार असा रंग दिसत होता. इंग्लिशांनीं कानडा जिंकून घेतला त्यावेळीं त्या प्रांतांत फ्रेंचांची लोकसंख्या पुष्कळ होती. त्यामुळें तेथील फ्रेंचांना कांहीं विशेष हक्क प्राप्त झाले होते. पुढें सन १७९१ मध्यें पिटनें एक कायदा करून कानडाची उत्तर कानडा व दक्षिण कानडा अशी विभागणी करून, उत्तर कानडा इंग्रजांचा व दक्षिण कानडा फ्रेंचांचा असें ठरवून दिलें. कानडाचे दोन्ही भाग इंग्लिश साम्राज्यांत मोडत असले तरी तेथें भिन्न परिस्थिति निर्माण झाली होती. उत्तर कानडामधील लोक प्रॉटेस्टंट होते व दक्षिण कानडांतील लोक कॅथॉलिक होते. दोन्ही भागांसही गव्हर्नर व विधिमंडळ निरनिराळे होते. यामुळें त्यांच्यांत कोणत्याही प्रकारचा एकोपा नव्हता. अखेर कुरबुरी वाढत जाऊन दक्षिण कानडानें बंड केलें. तें मोडण्यांत आलें, तरी धुसफुस कायम होती. तेव्हां सन १८३८ मध्यें मुख्य प्रधान लॉर्ड मेलबर्न यानें लॉर्ड डरहॅमला कानडामध्यें हाय कमिशनर म्हणून पाठविलें व कानडांतील परिस्थितीचा अभ्यास करून तेथें कोणत्या प्रकारच्या सुधारणा करणें योग्य आहे त्यासंबंधीं रिपोर्ट करण्यास सांगितलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डरहॅमनें कानडामध्यें जाऊन दडपशाही करण्यास सुरवात केली व कित्येक बंडवाल्यांस हद्दपार केलें. त्या गोष्टीचा इंग्लंडांत फार बभ्रा झाला. ताबडतोब लॉर्ड मेलबर्ननें डरहॅमला परत बोलाविलें. तेव्हां डरहॅमनें राजीनामा दिला व तो इंग्लंडांत परत आला. परंतु त्यापूर्वीं त्यानें आपला रिपोर्ट मेलबर्नकडे पाठवून उत्तर व दक्षिण कानडाचें एकीकरण करण्यांत येऊन कानडाला स्वराज्य द्यावें असें सुचविलें. डरहॅमचा हा रिपोर्ट म्हणजे ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहतींची स्वराज्याची सनद म्हणून समजण्यांत येतो. पुढें सन १८४० मध्यें पार्लमेंटनें कायदा करून कानडाचें एकीकरण केलें व त्याला अंतर्गत बाबतींत स्वराज्य दिलें. मात्र इंग्लिश भाषेंत त्या प्रांताचें दप्तर रहावें व कानडाच्या धर्मपीठाचा कारभार इंग्लंडकडे रहावा असें ठरविलें. या गोष्टीमुळें कानडांत शांतता निर्माण झाली.

३. राणीच्या मानकरणींचा प्रश्न :— डरहॅमच्या वर्तनामुळें मेलबर्नच्या प्रधानमंडळाचे दिवस भरले; व त्या प्रधानमंडळांतील कांहीं प्रधान मेलबर्नला सोडून गेले. तेव्हां लॉर्ड मेलबर्ननें राजीनामा दिला. त्यामुळें सर रॉबर्ट पीलनें प्रधानमंडळ बनविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळीं एक मजेदार पेंचप्रसंग उद्भवून पीलनें प्रधानमंडळ बनविण्याचें नाकारलें. तो प्रसंग असा. इतके दिवस जो पक्ष अधिकारारूढ असे त्याच पक्षांतील लोक राजाच्या खास दिमतीला त्याच्या राजवाड्यांत असत व प्रधानमंडळांत बदल झाला म्हणजे राजाचे हे नोकर आपले राजीनामे देत. आजपर्यंत चालत आलेली ही वहिवाट इंग्लंडच्या गादीवर पुरुष होता तोंपर्यंत ठीक होती; परंतु आतां तें पद एका स्त्रीनें विराजमान केल्यानें तो प्रश्न जरा चमत्कारिक झाला. कारण लॉर्ड मेलबर्न मुख्य प्रधान असतांच राणी राज्यावर आली व त्यावेळीं त्यानें तिच्या दिमतीस सगळ्या व्हिग स्त्रिया दिल्या. त्या दूर झाल्या तरच मी प्रधानमंडळ बनवितों असें राणीस पीलनें सांगितलें. एका दृष्टीनें पीलचें म्हणणें बरोबर होतें. कारण त्याला तशी अट घालतां येत होती व दुसरें असें कीं तो कंझर्व्हेटिव्ह पक्षाचा व राणीच्या मानकरणी व्हिगपक्षाच्या! त्यामुळें त्या स्त्रिया राणीचें मत त्याच्याविरुद्ध कलुषित करण्याचा संभव पुष्कळ! परंतु राणीनें 'रूढीच्या विरुद्ध व अपमानकारक' असा शेरा मारून त्याची अट झिड-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारून टाकली. तेव्हां पीलनेंही प्रधानमंडळ बनविण्यास नकार दिला. अर्थात लॉर्ड मेलबर्नच मुख्य प्रधान राहिला (१८३९).

४. एका पेनींत वाटेल तेथें पत्र (१८३९):—लोकांवर व व्यापाऱ्यांवर अनंत उपकार ज्या गोष्टीनें झाले अशी गोष्ट रोलंड हिल नांवाच्या गृहस्थानें केली. ती म्हणजे सन १८३९ मध्यें एका पेनींत वाटेल तेथें पत्र पाठविण्याची सोय सरकारनें केली ही होय. आजपर्यंत सरकारनें पोस्टाची व्यवस्था केली होती व अनेक लोक त्या व्यवस्थेचा फायदाही घेत होते. परंतु ती अति खर्चाची गोष्ट होऊन बसली होती. जितकें जास्त अंतर तितकें जास्त पोस्टेज द्यावें लागे. लंडनहून यॉर्ककडे पत्र पाठवावयाचें झाल्यास एक शिलिंग खर्चावा लागे. शिवाय सर्व पत्रें घोड्याच्या गाडींतून टप्प्या-टप्प्यानें जात व तीं अत्यंत दिरंगाईनें मालकास पोंचविलीं जात. खुद्द लंडनच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकास पत्र पोंचवावयाचें झाल्यास त्याला पंधरा तास लागत. तेव्हां या सर्व गोष्टी बदलून एका पेनींत वाटेल तेथें पत्र पाठविल्यास वेळ व श्रम वांचून लोकांचा व व्यापाऱ्यांचा फायदा होईल व सरकारी उत्पन्न वाढेल असें हिलनें सांगितलें. पत्रें पोंचविण्याच्या वेळाही वाढवाव्या असें त्याचें म्हणणें पडलें. शेवटीं सरकारनें त्याच्या म्हणण्याप्रमाणें केलें. त्यामुळें सर्वांना आनंद झाला व लोकांनीं अनेक प्रकारांनीं त्याचा सत्कार केला.

५. चार्टिस्टांची चळवळ (१८३८):—सन १८३२ चा कायदा पास झाला तरी मजुरांस मताधिकार मिळाला नव्हता. त्यांच्या स्थितींतही फारसा फरक पडलेला नव्हता. पूर्वीचे घरगुती धंदे बसून कारखान्यांचें युग देशांत सुरू झालें होतें. त्यामुळें अनेक लोक बेकार झाले होते. खेड्यांत राहतां येईना व शहरांत काम मिळेना अशा पेचांत सर्व मजूरवर्ग सांपडला होता. त्यामुळें त्या वर्गांत अत्यंत असंतोष पसरला होता. सन १८३२ च्या कायद्यामुळें आपल्याला राजकीय हक्क मिळतील व आपल्या परिस्थितींत सुधारणा होईल असें मजुरांस वाटत होतें. परंतु ती तर गोष्ट झाली नाहींच; उलट भिकाऱ्यांच्या कायद्यांत सुधारणा होऊन त्यांना मिळत असलेला सुखाचा घांसही त्यांच्या तोंडांतून काढून घेण्यांत आला असें सर्वांस वाटत होतें. तसेंच धान्याचा कायदाही त्यांस पोटभर अन्न मिळूं देत नव्हता अशी त्यांची तक्रार होती. अशा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थितींत असंतुष्ट मजुरांनीं आपल्याला राजकीय हक्क मिळावेत म्हणून चळवळ आरंभिली. त्या चळवळीचे पुढारी ओकोनर, हेदरिंगटन, व्हिन्सेंट, लोव्हेट, फ्रॉस्ट, वॅटसन, स्टीफन्स वगैरे होते. या चळवळीच्या पुरस्कर्त्यांनीं एक सनद तयार करून त्यांत आपल्या मागण्या नमूद केल्या होत्या. त्यामुळें त्यांना 'सनदवाले' ऊर्फ 'चार्टिस्ट' असें म्हणत. त्यांच्या मागण्या अशा होत्या. (१) पार्लमेंटची निवडणूक दरसाल व्हावी. (२) पार्लमेंटच्या सभासदास पगार देण्यांत यावा. (३) वयांत आलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषास मतदानाचा अधिकार असावा. (४) मतदारसंघ समान असावे. (५) मतदान गुप्तमतदान-पद्धतीनें व्हावें. (६) पार्लमेंटच्या सभासदत्वासाठीं विवक्षित उत्पन्नाची अट नसावी. अशा तऱ्हेच्या मागण्या त्या सनदेमध्यें लिहून त्यावर लाखों लोकांच्या सह्या घ्यावयाच्या व नंतर ती सनद राजाच्या मान्यतेकरितां पार्लमेंटकडे मोठ्या समारंभानें पाठवावयाची असा सनदवाल्यांचा विचार होता. आपल्याला लोकांचा पाठिंबा मिळावा म्हणून सनदवाल्यांनीं ठिकठिकाणीं व्याख्यानाकरितां दौरे काढले, हस्तपत्रकें वांटलीं, वर्तमान-पत्रांतून चर्चा केली व लेख लिहिले. अनेक ठिकाणीं दंगे करण्यासही त्यांनीं कमी केलें नाहीं. सनदवाल्यांतही अत्याचाराचा उघड उघड पुरस्कार करणारे व अनत्याचाराचें समर्थन करणारे दोन पक्ष निर्माण झाले होते. ते लोक दंगे करूं लागले तेव्हां सरकारनें दडपशाही सुरू केली व अनेकांस पकडून हद्दपार केलें. या उपायांनीं ती चळवळ तात्पुरती बंद पडली; परंतु दहा वर्षांनीं ती पुन्हां सुरू झाली.

६. धान्य-कर-विरोधी संघ :—चार्टिस्टांची चळवळ सुरू झाली त्याच वेळीं दुसरी एक चळवळ इंग्लंडांत सुरू झाली होती. तिला 'धान्य-कर-विरोधी चळवळ' असें म्हणतात. या चळवळीचे प्रमुख पुरस्कर्ते रिचर्ड कॉबडेन, जॉन स्टुअर्ट मिल व जॉन ब्राइट हे होते. ते कारखानदार होते. त्यांनींच धान्य-कर-विरोधी संघ स्थापन केला. ते उत्तम वक्ते असल्यानें त्यांनीं आपल्या चळवळीला चांगलीच प्रसिद्धी दिली. या चळवळ्यांचा मुख्य कटाक्ष धान्याच्या कायद्यावर होता. तो कायदा रद्द झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. धान्याचा कायदा कायम ठेवला तर धान्याचा भाव वाढतो व परकीय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धान्याला मज्जाव केल्यानें देशी धान्याचा भावही वाढत जातो व त्यामुळें गरिबांचे हाल होतात असें त्यांचें म्हणणें पडलें. थोडक्यांत, त्यांच्या म्हणण्याप्रमाणें देशांत खुला व्यापार सुरू करणेंच श्रेयस्कर होय व आजवर सरकारनें स्वीकारलेलें संरक्षित व्यापाराचें धोरण यापुढेंही चालू ठेवल्यास लोकांचे हाल होतील व व्यापारही अनिर्बंधपणें चालणार नाहीं. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ या लोकांनीं ॲडॅम स्मिथच्या तत्त्वांचा पुरावा पुढें केला. या चळवळीमुळें इंग्लिश मुत्सद्यांच्या पुढें खुला व्यापार कीं संरक्षित व्यापार हाच प्रश्न प्रामुख्यानें मांडला गेला. रिचर्ड कॉब्डेननें खुद्द पार्लमेंटमध्यें सांगितलें कीं, 'आपले देशबांधव सुखी व सद्गुणी व्हावेत अशी इच्छा असल्यास त्यांस भरपूर भाकरी पुरवा व त्यांचे धन्यवाद घ्या.



रिचर्ड कॉबडेन

त्याकरितां धान्याचा कायदा रद्द झालाच पाहिजे व तो रद्द झाल्याशिवाय आम्हांस खरेंखुरें समाधान कशानेंही लाभणार नाहीं.' अशा तऱ्हेनें या चळवळ्यांनीं सर्व देशभर आपल्या संघाच्या अनेक शाखा स्थापन केल्या व हस्तपत्रकें, व्याख्यानें, लेख, पार्लमेंटमध्यें प्रश्न विचारणें व भाषणें करणें वगैरे उपायांनीं आपली चळवळ चालू ठेविली. या चळवळीला कारखानदारांचा पाठिंबा असला तरी शेतकरी व जमीनदार यांचा पाठिंबा नव्हता. त्यांच्या मतें धान्याचा कायदा रद्द झाल्यास शेतीचें अत्यंत नुकसान होणार होतें. त्यामुळें त्या लोकांनीं या चळवळीला जोराचा विरोध करण्यास सुरुवात केली. एवढेंच नव्हे तर संघातर्फे व्याख्यान देणाऱ्या व्याख्यात्याला जो कोणी नदींत फेकून देईल त्याला गव्हाचें एक पोतें बक्षीस देण्याचेंही त्यांनीं जाहीर केलें! अशा तऱ्हेनें या चळवळीची देशांत एकच गडबड उडून राहिली होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. पीलचें दुसरें प्रधानमंडळ (१८४१–४६):—सन १८४१ मध्यें पार्लमेंटची निवडणूक होऊन कंझ-र्व्हेटिव्ह पक्षाला बहुमत मिळाल्यानें लॉर्ड मेलबर्ननें राजीनामा दिला व पील मुख्य प्रधान झाला. त्याच्या प्रधानमंडळांत वेलिंग्टन, लॉर्ड ॲबर्डीन, लॉर्ड स्टॅन्ले, ग्लॅडस्टन वगैरे लोक होते. पील मुख्य प्रधान झाला त्यावेळीं इंग्लंडची परिस्थिति बरीच बिकट झाली होती. लिबरल-पक्षाच्या हातीं सत्ता असतां इंग्लंडच्या आर्थिक गोष्टींची लिबरल मुत्सद्यांनीं नीट व्यवस्था लावली नव्हती. त्यामुळें व्यापार घसरला होता, कामकरी वर्गाचे हाल होत होते, तिजोरीची व्यवस्था नीट न झाल्यानें त्या खात्यांतही घोटाळे माजले होते व चार्टिस्ट, धान्य-कर-विरोधी संघ वगैरेमुळें देशांत अस्वस्थता उत्पन्न झाली होती. तशांतच आयर्लंडमध्यें ओकोनेलनें जोराची चळवळ करून सरकारला सतावून सोडलें होतें. साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांत युद्धाच्या पूर्वींचे ढग जमूं लागले होते; व अफगाणिस्थानाशीं युद्ध सुरू होणार हें निश्चित होतें. अशा एकंदर अडचणींस तोंड देण्याचें सामर्थ्य पीलच्या अंगीं असल्यानेंच प्रथमतः त्यानें आपल्या आर्थिक सुधारणांस धडाडीनें सुरुवात केली.

जॉन ब्राइट

८. सर रॉबर्ट पील (१७८८–१८५०):—सर रॉबर्ट पीलचा जन्म सन १७८८ मध्यें झाला. लँकेशायरमधील एका कारखानदाराचा तो मुलगा. ऑक्सफर्डच्या विश्वविद्यालयाचा तो एम. ए. होता. सन १८०९ मध्यें तो प्रथमतः पार्लमेंटमध्यें शिरला. पार्लमेंटमधील त्याचें पहिलें भाषण अत्यंत परिणामकारक झालें होतें. सन १८१२–१८ पर्यंत तो आयर्लंडचा प्रधान होता. आपल्या खात्यांची तो नेहमीं चोख व्यवस्था ठेवी. तो मोठा अर्थ-शास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध होता. आर्थिक गोष्टींची उकल तो उत्तम करी. त्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूचनेवरूनच सन १८१९ मध्यें चलनी नोटा बंद करण्यांत येऊन रोखीचा व्यवहार इंग्लंडच्या बँकेनें सुरू केला. लॉर्ड लिव्हरपूल मुख्य प्रधान असतां सन १८२२ मध्यें तो गृहमंत्रि होता व त्याचवेळीं त्यानें फौजदारी कायद्यांत सुधारणा करून अनेक क्षुल्लक गुन्ह्यांची देहान्ताची शिक्षा रद्द केली. सन १८२८-३० मध्यें कॅथॉलिक विमोचन व पार्लमेंटची सुधारणा करणें हे प्रश्न त्याला मान्य नव्हते व म्हणून वेलिंग्टनप्रमाणें त्यानें त्या प्रश्नांस कसून विरोध केला. यामुळें टोरीपक्षाची दाणादाण झाली होती. आपल्या जुन्या तत्त्वांस आपण लोंबकळत राहिलों व सुधारणांचें पाऊल एकसारखें मागें ओढूं लागलों तर आपला टोरीपक्ष मागें पडेल हें पीलनें ओळखलें होतें. अर्थात देशकालपरिस्थिति लक्षांत घेऊन आपल्या पक्षानें आपल्या ध्येयांत सुधारणा करणें श्रेयस्कर होय असें त्याचें ठाम मत होतें. या दृष्टीनें त्यानें टॅमवर्थ येथून जाहीर केलेला जाहीरनामा प्रसिद्ध आहे. त्याला अनुसरूनच टोरीपक्षाची पुनर्घटना करून त्यानें त्या पक्षाला ‘ कंझर्व्हेटिव्ह ’ असें नवें नांव दिलें. कॅथॉलिक विमोचन व धान्याचा कायदा रद्द करण्याच्या वेळीं तो आपल्या नव्या तत्त्वांप्रमाणें वागला. देशाचें हित साधून, देशाचें योग्यरीतीनें संरक्षण करणें यांतच त्याचा आनंद सामावलेला होता. पक्षनेता म्हणून तो फार कुशल होता. मात्र तो आपल्या पक्षाच्या पूर्णपणें आहारीं कधींच गेला नाहीं. गरीब मजूरवर्गाबद्दल त्याला नेहमीं सहानुभूति वाटे व त्याच्या सुखाकरितां तो नेहमीं झटे. त्याचें व्यवहारचातुर्य, त्याचा कामाचा उरक, सततोद्योगाची त्याची हौस, निःपक्षपात बुद्धीनें कोणतेंही काम करण्यांत त्यानें दाखविलेलें कौशल्य, त्याचें शुद्ध चारित्र्य, त्याची साधी राहणी वगैरेमुळें तो लोकांचा अग्रणी म्हणून झळकला. तो भावनाप्रधान होता. त्याची वागणूक थोडी गैरशिस्त असली तरी तो कोणाचा मुद्दाम अपमान करीत नसे. अशा तऱ्हेचा मुत्सद्दी इंग्लंडला पाहिजे होता त्यावेळीं लाभला.

९. पीलची कामगिरी :—मुख्य प्रधान झाल्यावर पीलनें प्रथमतः देशाची आर्थिक स्थिति सुधारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळीं करांचें ओझें अतोनात वाढलें होतें व तें कमी करण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. कर जास्त वाढले तर ते देण्याची राष्ट्रांत ऐपत नव्हती. जिनसांच्या किंमतीही अतोनात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाढल्या होत्या. त्यामुळें गरिबांचे हाल फार होत. व्यापारही मंदावला होता. अशा स्थितींत सन १८४२ मध्यें त्यानें आपलें अंदाजपत्रक पार्लमेंटला सादर केलें. त्या अंदाजपत्रकांत त्यानें अनेक जिनसांवर असलेल्या जबर जकाती रद्द केल्या, कच्च्या मालावरील जकाती पांच टक्क्यांनीं कमी केल्या व पक्क्या मालावरील जकाती वीस टक्क्यांनीं उतरविल्या. यामुळें जकातीचें उत्पन्न कमी झालें व तें भरून काढण्याकरितां त्यानें प्राप्तीवर कर बसविला. हा कर ज्याचें वार्षिक उत्पन्न दीडशें पौंडांवर होतें अशांनाच द्यावा लागे. तो दर पौंडामागें फक्त सात पेन्स ठेवण्यांत आला. त्या कराची मुदतही फक्त तीन वर्षांची होती. हें अंदाजपत्रक खुल्या व्यापाराला पोषकच होतें व त्यामुळें इंग्लंडचा व्यापार वाढेल अशी पीलची कल्पना होती. त्याप्रमाणें त्याचा अंदाज खरा ठरला. सन १८४५ सालीं प्राप्तीवरील कर रद्द करणें जरूर होतें; परंतु तसें न करतां खुल्या व्यापाराच्या तत्त्वांस अनुसरून त्यानें सर्व कच्च्या मालावरील जकाती अजीबात रद्द केल्या. तसेंच निर्यात मालावरील जकातीही त्यानें एकजात रद्द केल्या व सुमारें ४५० आयात वस्तूंवरील जकाती उठविल्या. पीलनें खुल्या व्यापाराचें धोरण उघड उघड स्वीकारल्यानें लिबरलपक्षानें त्याला आपला सक्रिय पाठिंबा दिला. तरी त्याच्या कंझर्व्हेटिव्हपक्षांतील बऱ्याच लोकांस त्याचें नवें धोरण मान्य झालें नाहीं; व ते मनांतून त्याच्यावर थोडे गरम झाले. एकंदरींत पाहतां पीलचें नवें धोरण देशाच्या फायद्याचेंच ठरलें. इंग्लंडचा व्यापार वाढला, जिनसांच्या किंमती उतरल्या व गरिबांचे होणारे हाल कमी झाले. सन १८४४ मध्यें बँकांच्या व्यवहारांत सुधारणा करण्याकरितां त्यानें एक कायदा पास केला. त्यामुळें इंग्लंडच्या बँकेचीं ठेव खातें व नोटा-प्रसिद्धी खातें हीं खातीं अलग केलीं गेलीं व बँकेनें चलनी नोटा छापावयाच्या झाल्या तर तितक्या किंमतीचें सोनें अगर चांदी तारण म्हणून ठेविली पाहिजे व इंग्लंडच्या बँकेशिवाय इतर बँकांनीं नोटा छापूं नयेत असें ठरविलें गेलें. यामुळें बँकांचें स्थैर्य वाढलें, ठेवीदारांचा बँकांवरील विश्वास दुणावला, बँकेकडे अनेक ठेवी येऊं लागल्या व त्यामुळें बँकांना कारखानदारांस व उद्योगधंदेवाल्यांस भांडवल पुरवितां आल्यानें उद्योगधंदे पुढें सरसावले. इंग्लंडचा व्यापारही वाढूं लागला व त्यामुळें लंडनचें महत्त्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाढलें. सन १८४२ सालीं त्यानें एक कायदा करून स्त्रिया व मुलें यांस कोळशाच्या खाणींतून काम करण्यास नेमूं नये असें ठरविलें. त्याचप्रमाणें सन १८४४ सालीं त्यानें 'कारखान्याचा कायदा' पास करून मुलांस फक्त अर्धा दिवस कारखान्यांत काम द्यावें व आठ वर्षांखालील मुलें तेथें नेमूं नयेत असें ठरविलें; व कारखानदारांवर अनेक प्रकारच्या अटी लादून मजुरांच्या सुखसोयींकडे ते नीट लक्ष देतात किंवा नाहीं व कायद्याप्रमाणें वागतात किंवा नाहीं हें पाहाण्याकरितां सरकारी तपासणी कडक केली.

१०. आयर्लंडसंबंधीं धोरण :—कॅथॉलिकांवरील धार्मिक निर्बंध दूर झाल्यानंतर आयर्लंडचा पुढारी डॅनियल ओकोनेल स्वस्थ नव्हता. एकीकरण रद्द व्हावें असें त्याचें म्हणणें होतें. मध्यंतरीच्या काळांत प्रॉटेस्टंटांस शाळांतून शिक्षण देण्याची व तें मिळण्याची सोय झाली. सन १८३८ मध्यें 'टाइथ कर' सर्वांकडून न घेतां तो जमीनदारांकडून साऱ्याबरोबर घ्यावा, इतरांकडून घेऊं नये—असें ठरविण्यांत आलें. त्यामुळें टाइथ कर इतके दिवस प्रत्यक्षपणें घेण्यांत येई तो आतां अप्रत्यक्षपणें घेण्यांत येऊं लागला. हा कर आयर्लंडमध्यें असलेल्या प्रॉटेस्टंट चर्चकरितां रोमन कॅथॉलिकांकडून घेण्यांत येत असल्यानें त्याविरुद्ध आयरिश लोक चळवळ करीत होते. सन १८४० मध्यें आयर्लंडांतील म्युनिसिपालिट्यांच्या सुधारण्यासंबंधीं कायदा करण्यांत आला. या सर्व गोष्टींनीं ओकोनेलचें समाधान झालें नाहीं व त्यानें सन १८४० मध्यें एकीकरण रद्द व्हावें म्हणून जोरानें चळवळ सुरू केली. त्या चळवळीनें पीलच्या वेळीं उग्र स्वरूप धारण केलें. तेव्हां सन १८४४ त राजद्रोहाच्या आरोपावरून ओकोनेलला पकडण्यांत येऊन त्याला शिक्षा देण्यांत आली. ही शिक्षा पुढें रद्द करण्यांत आली; तरी अत्याचारी चळवळीला त्यानें नकार दिल्यानें त्याचें आयरिशांवरील वजन जें एकदां नष्ट झालें तें कायमचें. आयर्लंडांतील लोकांस खूष करण्याकरितां सन १८४५ सालीं पीलनें मनूथ येथील कॅथॉलिक कॉलेजची वार्षिक देणगी वाढविली; व आयर्लंडमध्यें बेलफास्ट, कॉर्क, गालवे वगैरे ठिकाणीं कॉलेजें स्थापन केलीं. पीलचें हें कृत्य न आवडल्यानें ग्लॅडस्टननें प्रधानमंडळांतील जागेचा राजीनामा दिला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११. धान्याचा कायदा रद्द झाला (१८४६) :—पीलनें खुल्या व्यापाराच्या तत्त्वांचा अंगिकार केला व अनेक वस्तूंवरील कर त्यानें उठविले, तरी गव्हावरील कर त्यानें रद्द केला नव्हता किंवा धान्याचा कायदा रद्द करण्याचेंही त्यानें मनावर घेतलें नव्हतें. एवढेंच नव्हे तर सन १८४० सालीं



सर रॉबर्ट पील

झालेल्या निवडणुकीच्या वेळीं धान्याचा कायदा रद्द करणार नाहीं असें त्यानें आपल्या मतदारांस वचन दिलें होतें. परंतु त्यासंबंधीं पीलचीं मतें बदलूं लागलीं व धान्याचा कायदा रद्द करून परकीय धान्य देशांत येऊं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्यावें असें त्याला वाटूं लागलें. त्याच्या अशा विचारांच्या आंदोलित स्थितींतच सन १८४५ मध्यें आयर्लंडमधील बटाट्याचें पीक बुडाल्यानें तेथें भयंकर दुष्काळ पडला. त्याच वेळीं इंग्लंडमधील गव्हाचें पीकही अतिवर्षणानें बुडालें. यामुळें इंग्लंडमध्येंही दुष्काळ जाणवूं लागला. उपासमारी, ताप वगैरेमुळें लाखों लोक मृत्युमुखीं पडूं लागले. तेव्हां धान्याचा कायदा रद्द करून परकीय देशांतील गहूं इंग्लंडांत येऊं द्यावा असें पीलला वाटूं लागलें. एकंदर परिस्थितीची जाणीव झाल्यानें धान्य-कर-विरोधी संघाच्या चळवळीसही जोर चढला व ब्राइट वगैरे लोकांनीं आपली मोहीम जोरांत सुरू केली. शेवटीं पीलनें धान्याचा कायदा रद्द करण्याचें ठरवून प्रधानमंडळांतील आपल्या सहकाऱ्यांसही त्यानें तसें कळविलें. त्याचें म्हणणें त्यांस पसंत पडलें नाहीं. तेव्हां त्यानें राजीनामा दिला. लॉर्ड जॉन रसेल या व्हिग पुढाऱ्यानें प्रधानमंडळ बनविण्याचा प्रयत्न केला; पण तो फसला. तेव्हां पील पुन्हां मुख्य प्रधान झाला व सन १८४६ मध्यें धान्याचा कायदा रद्द करण्याचें बिल पार्लमेंटपुढें मांडून तें त्यानें पास करून घेतलें. मात्र सन १८४९ पर्यंत आयात धान्यावर एका क्वार्टरला चार ते दहा शिलिंगांपर्यंत जकात ठेवावी व त्यानंतर ती जकात फक्त एक शिलिंगच असावी असें कायद्यानें ठरवून दिलें. धान्याचा कायदा रद्द झाल्यानें इंग्लंडनें खुल्या व्यापाराचें धोरण उघडपणें स्वीकारलें. त्यामुळें शेतकऱ्यांचा फारसा फायदा झाला नाहीं. मात्र बाहेरचें धान्य देशांत येऊं लागल्यानें इंग्लंडांत धान्य स्वस्त झालें. देशाचा व्यापारही सरसावला. मात्र पीलच्या कंझर्व्हेटिव्ह पक्षाचीं दोन छकलें झालीं. संरक्षित व्यापाराचे पुरस्कर्ते म्हणून बेंजामिन डिझरेली, लॉर्ड जॉर्ज बेंटिंक वगैरे त्याच्या पक्षाचे लोक पीलला कसून विरोध करूं लागले व ग्लॅडस्टन, कॅनिंग, डलहौसी, सिडने हर्बर्ट, वगैरे लोक खुल्या व्यापाराचे पुरस्कर्ते झाले व त्यांनीं पीलची बाजू उचलून धरली. खुद्द पीलला 'विश्वासघातकी' म्हणून म्हणवून घ्यावें लागलें व त्याचा अधःपात होऊं लागला. पुढें त्यानें राजकारणांतून कायमचें अंग काढून घेतलें. तो सन १८५० मध्यें मृत्यु पावला. कसेंही असलें तरी धान्याचा कायदा रद्द करून त्यानें गरिबांवर व देशावरही अनंत उपकार केले यांत शंका नाहीं. त्याच्या नंतर दोनच वर्षांनीं कंझर्व्हेटिव्ह पक्षाचा दुसरा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक कट्टर पुढारी वेलिंग्टनचा ड्यूक हाही सन १८५२ मध्यें मृत्यु पावला. त्यामुळें तो पक्ष बराच निःसत्त्व झाला.

१२. मध्यपूर्व प्रश्न :—सर रॉबर्ट पील मुख्य प्रधान झाला त्या वेळीं अफगाणिस्थानाशीं इंग्रजांचें युद्ध सुरू होतें. ज्याप्रमाणें तुर्कस्थानाला मारून टाकून भूमध्य समुद्रावर वर्चस्व स्थापण्याचा रशिया प्रयत्न करीत होता त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या वायव्येस असलेल्या अफगाणिस्थानावरही त्याचा डोळा होता. त्या देशावर आपलें वर्चस्व स्थापन करावयाचें व इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील राज्याला धोका उत्पन्न करून, साधल्यास हिंदुस्थानांतून इंग्रजांस हुसकून द्यावयाचें असा रशियाचा बेत होता. यालाच ब्रिटिश मुत्सद्दी ‘ मध्यपूर्व प्रश्न ’ असें म्हणतात. त्या धोरणास अनुसरून रशियाचे एकसारखे प्रयत्न चालूच होते. मध्य आशियांतील निरनिराळीं राज्यें काबीज करून रशियानें आपली सरहद्द अफगाणिस्थानाला नेऊन भिडविली होती. तुर्कस्थानासंबंधींचें आपलें धोरण इंग्रजांमुळें यशस्वी होत नाहीं, असें वाटूनच रशियानें या बाजूनें इंग्रजांस शह देण्याचा घाट घातला होता. टिलसिटच्या तहाच्या वेळेपासून रशियाचें लक्ष अफगाणिस्थानाकडे वेधलें गेलें होतें. तेव्हां इंग्रजांनीं इराणचा शहा, अफगाणिस्थानचा अमीर, पंजाबचा रणजितसिंग यांच्याशीं दोस्तीचे तह केले होते. पुढें सन १८३८ मध्यें अफगाणिस्थाननें रशियाच्या वकिलास आपल्या दरबारीं ठेवून घेतलें. ही गोष्ट इंग्रजांस न आवडल्यानें अमीरानें त्याला घालवून द्यावें असा निरोप त्यांनीं अमीराकडे पाठविला. अमीरानें त्याला नकार दिला, तेव्हां अफगाणिस्थानाशीं युद्ध सुरू झालें (१८३८). त्यांत प्रथमतः इंग्रजांनीं अमीर दोस्त महंमद याचा पराभव करून त्याच्या जागीं शाहाशुजा याला बसविलें. परंतु मानी अफगाणांस ती गोष्ट आवडली नाहीं व त्यांनीं फसवून ब्रिटिश फौजेचा सर्वनाश केला! आपली मानहानी भरून काढण्याकरितां पुढें इंग्रजांनीं अफगाणिस्थानावर फौजा पाठविल्या व इंग्रजांचा तेथील वचक कायम ठेवून त्या हिंदुस्थानांत परत आल्या (१८४२). अफगाणिस्थानाच्या बाबतींत अलिप्तपणाचें धोरण पीलनें स्वीकारलें होतें म्हणूनच त्यानें तेथील लष्कर परत बोलाविलें. सन १८४३ मध्यें इंग्रजांनीं सिंधप्रांत काबीज केला. त्याच वेळीं हिंदुस्थानांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिखांशींही युद्ध होऊन त्यांचा पराभव झाला. पील मुख्य प्रधान झाला त्याच वेळीं चीनशीं इंग्रजांचें युद्ध चालू होतें. त्याचें वर्णन पुढें आलें आहे. चीनसंबंधीं इंग्लंडनें अत्यंत सावधगिरीचें धोरण स्वीकारलेलें होतें. चीनचीं कांहीं बंदरें व्यापाराकरितां मिळवावयाचीं असा इंग्रजांचा हेतु होता. तो पुढें बराच साधला. चीनसंबंधीं जो प्रश्न पुढें उत्पन्न झाला त्याला 'अतिपूर्व प्रश्न' असें म्हणत. त्यामुळें इंग्लंड व जपान यांच्यामध्यें पुढें कांहीं बाबतींत खटके उडूं लागले.

१३. लॉर्ड जॉन रसेलचें प्रधानमंडळ (१८४६-५२):—धान्याचा कायदा रद्द केल्यानें पीलवर अनेक लोक नाखूष झाले होते. खुद्द त्याच्या पक्षांतील लोकांसही तो नकोसा झाला होता. तेव्हां सन १८४६ मध्यें आयर्लंड-मध्यें दडपशाही करण्याकरितां पीलनें एक बिल पार्लमेंटमध्यें मांडलें असतां सर्वांनीं त्याच्या विरुद्ध मत दिलें व त्याचा पराभव केला. त्यामुळें पीलनें राजीनामा दिला. तेव्हां लॉर्ड जॉन रसेल मुख्य प्रधान झाला. सन १८४७ मध्यें 'कारखान्यासंबंधीं कायदा' पास करण्यांत येऊन कापडाच्या गिरण्यां-तून स्त्रिया व मुलें यांस दररोज दहा तासांपेक्षां जास्त काम देण्यांत येऊं नये असें ठरविण्यांत आलें. सन १८४८ सालीं इंग्लंडांत चार्टिस्टांच्या चळवळीनें आपलें डोकें पुन्हां वर काढलें. त्यांनीं एक मोठा अर्ज तयार केला होता व त्यावर अनेक लोकांच्या सह्या घेऊन तो पार्लमेंटला सादर करण्याकरितां ते एक मोठी मिरवणूक काढणार होते. त्याप्रमाणें त्यांची एक मोठी मिरवणूक केनिंगटन मैदानावरून निघून पार्लमेंटगृहाकडे चालली. ओकोनर त्यांचा पुढारी होता. अर्जावर पन्नास लाख लोकांच्या सह्या होत्या असें म्हणतात. फ्रान्समध्यें नुकतीच राज्यक्रांति झाल्यानें त्या लोकांप्रमाणेंच आपल्यालाही यश मिळेल असें या चळवळ्यांना वाटत होतें. लंडनमध्यें दंगेधोपे होऊं नयेत, म्हणून सरकारनें चांगलीच व्यवस्था ठेवली होती. वेलिंग्टननें लष्कराच्या मदतीनें उत्कृष्ट तयारी ठेवली होती. रसेलनें सुमारें सतरा हजार नव्या पोलिसांची भरती करून त्यांना लंडनच्या निरनिराळ्या भागांत ठेवून दिलें होतें. शेवटीं चार्टिस्टांची जंगी मिरवणूक निघाली; परंतु तिला वेस्टमिन्स्टर पुला-पलीकडे जाण्याची परवानगी नाकारण्यांत आली. दंगा-धोपा न होतां सनद-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाल्यांचा अर्ज पार्लमेंटला सादर करण्यांत आला. त्या वेळीं त्याची छाननी झाली. तेव्हां त्यांतील अनेक सह्या खोट्या होत्या, अनेक मृतांच्याही सह्या त्यांत होत्या व आश्चर्याची गोष्ट म्हणजे राणी व्हिक्टोरिया, वेलिंग्टन, प्रिन्स आलबर्ट, सर रॉबर्ट पील वगैरेंच्या सह्याही त्यांत दडपल्या होत्या! ही गोष्ट बाहेर आल्यानें सनदवाल्यांची जिकडे तिकडे नाचक्की झाली व त्यांची चळवळ आपोआप नष्ट झाली. त्यांच्या बहुतेक सर्व मागण्या सन १९२८ पर्यंत पार्लमेंटनें मान्य केल्या. दरसाल पार्लमेंटची निवडणूक करण्याची त्यांची मागणी मात्र अजून मान्य झालेली नाहीं.

१४. इसवी सन १८४८:—सन १८४८ हें वर्ष युरोपच्या इतिहासांत क्रांतिकारक वर्ष समजलें जातें. त्या वर्षी फ्रान्समध्यें राज्यक्रांति होऊन लुई फिलीपनें राज्यत्याग केला व नेपोलियन बोनापार्टचा पुतण्या लुई नेपोलियन फ्रान्सचा अध्यक्ष झाला. त्यामुळें फ्रान्समध्यें दुसऱ्यांदां लोकशाही स्थापन झाली. ऑस्ट्रियामध्येंही राज्यक्रांति होऊन अनियंत्रित राज्यकारभाराचा पुरस्कर्ता मेटर्निक याचा पाडाव झाला. हंगेरीमध्यें ऑस्ट्रियापासून फुटून निघण्याकरितां कसूथच्या पुढारीपणाखालीं मोठी चळवळ सुरू झाली. इटलीमध्यें व जर्मनीमध्येंही एकीकरणाच्या चळवळीस सुरुवात झाली होती. राष्ट्रीयत्वाची जाणीव झाल्यानें तेथील लोक ऑस्ट्रियाचें वर्चस्व झुगारून देण्यास सज्ज झाले होते. खुद्द इंग्लंडमध्यें सनदवाल्यांची चळवळ सुरू झाल्यानें राज्यक्रांति होते कीं काय असें लोकांस वाटत होतें. आयर्लंडमध्यें मोठें बंड निर्माण झालें. ओकोनेलची सुटका झाल्यानंतर आयरिश लोकांच्या मनांतून तो उतरला होता. तेव्हां स्मिथ ओब्रायन आयरिश लोकांचा पुढारी झाला. अत्याचाराला त्यानें प्रोत्साहन दिलें होतें. युरोपांत राज्यक्रांत्या होत होत्या, त्यावेळीं त्याच्या पुढारीपणाखालीं एक मोठें बंड आयर्लंडमध्यें झालें. अत्याचाराला प्रोत्साहन दिल्याबद्दल 'युनायटेड आयरिशमन' नांवाच्या वर्तमानपत्राच्या मिचेल नामक संपादकास हद्दपार करण्यात आलें व अनेक पुढाऱ्यांस अटक करून तुरुंगांत टाकण्यांत आलें. अखेरीस हें बंड मोडलें.

१५. रसेल मंत्रिमंडळाची इतर कामगिरी:—सन १८४९ मध्यें नौकानिर्बंधाचे कायदे रद्द करण्यांत आले. रसेल खुल्या व्यापाराचा पुर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्कर्ता होता व नौकानिर्बंधाचे कायदे खुल्या व्यापाराच्या आड येतात असें वाटल्यानें रसेलनें ते रद्द केले. ते कायदे रद्द झाल्यानें इंग्लंडशीं व्यापार करण्याची सर्वांस मोकळीक मिळाली. परदेशी मालावरील जकातीही नाहींशा झाल्यानें इंग्लंडचा व्यापार वाढला. सन १८५१ मध्यें एक मोठें प्रदर्शन भरविण्यांत आलें. राणीचा नवरा प्रिन्स आलबर्ट त्याचा मुख्य प्रवर्तक होता. निरनिराळ्या देशांतील अनेक वस्तु त्या प्रदर्शनांत मांडल्या होत्या. त्यामुळें निरनिराळ्या देशांतील उद्योगधंद्यांची प्रगति किती झाली हें इंग्लिशांस चांगलें समजेल व त्यामुळें आपल्याला यापुढें कोणत्या प्रकारची प्रगति करून दाखवितां येईल हेंही इंग्रज कारखानदारांस कळून येईल असा प्रदर्शनाच्या प्रवर्तकांचा मुख्य हेतु होता. तें एक मोठें जागतिक प्रदर्शन होतें व लोकांचा विरोध असूनही तें अत्यंत यशस्वी झालें. साठ लक्ष लोक तें पहाण्याकरितां गेले होते. त्याच्यामुळें जी प्राप्ति झाली त्यांतूनच लंडनमधील 'केन्‌सिंगटन वस्तुसंग्रहालयाची' उभारणी झाली. याच वेळीं लुई नेपोलियननें 'फ्रेंचांचा बादशाह' हा किताब धारण केला म्हणून परराष्ट्रमंत्रि लॉर्ड पामर्स्टननें त्याचें अभिनंदन केलें. ही गोष्ट राणीस न आवडल्यानें तिनें लॉर्ड रसेलच्यातर्फे त्याला राजीनामा द्यावयास सांगितलें. त्यामुळें लॉर्ड पामर्स्टन रसेलवर चिडून गेला होता व त्याचा पराभव करण्याच्या संधीची तो वाट पहात राहिला. सन १८५२ मध्यें ती त्याला लाभली. त्या वर्षी रसेलनें एक 'लष्करी बिल' पार्लमेंटपुढें मांडलें. फ्रान्सचा बादशाह लुई नेपोलियन इंग्लंडवर कदाचित् हल्ला करील म्हणून इंग्लिश लष्कराची व्यवस्था नीट राखणें जरूर आहे असें रसेलचें म्हणणें होतें व तेवढ्याकरितां त्यानें तें बिल पार्लमेंटमध्यें मांडलें. त्या बिलाला लॉर्ड पामर्स्टननें एक पुस्ती जोडली व ती पास करून घेतली. त्यामुळें रसेलनें राजीनामा दिला (१८५२).

१६. लॉर्ड डार्बीचें पहिलें प्रधानमंडळ (१८५२):—लार्ड रसेलनें राजीनामा दिल्यानंतर कंझर्व्हेटिव्ह पक्षाचा पुढारी लॉर्ड डार्बी मुख्य प्रधान झाला. डिझरेली फडणीस होता. परंतु ग्लॅडस्टननें त्या मंत्रिमंडळाच्या अंदाजपत्रकावर सडेतोड टीका करून तें नापास करविलें. त्यामुळें लॉर्ड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डार्बीनें राजीनामा दिला. परंतु राजीनामा देण्यापूर्वीं त्याच्या मंत्रिमंडळानें एक गोष्ट उत्तम केली. सन १८५२ मध्यें लॉर्ड पामर्स्टननें 'खुल्या व्यापारामुळें देशाचा फायदा झाला आहे व त्यामुळें यापुढें इंग्लंडनें खुल्या व्यापाराचें तत्त्व स्वीकारणेंच श्रेयस्कर होय' असा ठराव पार्लमेंटमध्यें मांडला. सरकारच्यातर्फे फडणीस डिझरेली यानें त्या ठरावाला मान्यता दिली. खुल्या व्यापाराचा प्रसार व त्याचा पुरस्कार व्हिग लोकांनीं केला. परंतु डिझरेलीसारख्या कट्टर कंझर्व्हेटिव्ह पुढाऱ्यानें व खुल्या व्यापाराला जोरानें विरोध करणाऱ्यानेंही त्या तत्त्वास मान्यता दिली. यामुळें 'संरक्षित व्यापार कीं खुला व्यापार' या प्रश्नाचा खुल्या व्यापाराच्यातर्फे निकाल लागला हें लक्षांत धरण्यासारखें आहे. पुढें सन १८६९ सालीं धान्यावर असलेली एक शिलिंगाची जकातही अजीबात उठविण्यांत आली. त्यामुळें इंग्लंडमध्यें खुला व्यापार राजरोस सुरू झाला असें म्हणणेंच योग्य होय.

अभ्यास

१. पीलनें केलेल्या आर्थिक बाबतींतील सुधारणा सांगा. धान्याचा कायदा त्यानें कां रद्द केला ? त्याचा परिणाम काय झाला ?

२. सर रॉबर्ट पील याचें चरित्र थोडक्यांत सांगा. खुला व्यापार, आयर्लंड व मजूरवर्ग यांसंबंधीं त्यानें कोणत्या गोष्टी केल्या ? त्यांचा परिणाम काय झाला ?

३. सनदवाल्यांची चळवळ उत्पन्न होण्याचें कारण काय ? त्यांच्या चळवळीसंबंधीं तुम्हांस माहीत असलेली सर्व हकीकत सांगा.

४. धान्य-कर-विरोधी संघ स्थापन होण्याचें कारण काय ? त्या संघाची कामगिरी वर्णा.

५. खुल्या व्यापाराच्या प्रसारार्थ इंग्लंडच्या निरनिराळ्या मुत्सद्यांनीं कोणकोणते प्रयत्न केले ? संरक्षित व्यापार पद्धति इंग्लंडनें कां टाकून दिली ? त्याचा फायदा काय झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. खालीलसंबंधीं टीपा लिहा :—

सन १८४८, चार्टिस्टांची चळवळ, धान्य-कर-विरोधी संघ, पेनी-पोस्टेज, सन १८५१ चें जागतिक प्रदर्शन, मध्यपूर्वप्रश्न, मानकरणींचा प्रश्न, डरहॅमचा रिपोर्ट.

७. संरक्षित व्यापार कीं खुला व्यापार या विषयावर तुमच्या शाळेच्या पार्लमेंटमध्यें अगर वादविवाद मंडळांत चर्चा करा व तिचा रिपोर्ट लिहून काढा.

उतारे

१. चार्टिस्टांच्या अर्जांतील भाग—१८३८.

ना. कॉमन्ससभा, यांचे हुजुरास,

ज्या देशांत अनेक कुशल कारखानदार आहेत, ज्या देशांत अनेक धाडशी व्यापारी आहेत व ज्या देशांतील मजूर अत्यंत कष्टाळू आहेत अशा देशांतच आमचा जन्म झाला आहे. गेलीं तेवीस वर्षें अत्यंत शांततेचीं व भरभराटीचीं गेलीं. परंतु त्याचा पुरेपूर फायदा घेण्याची आमची इच्छा व लायकी असतांही आम्ही दुःखांत बुडालों आहोंत. करांचे डोंगर आमच्या डोक्यावर लादलेले आहेत, व्यापारी आपलीं दिवाळीं काढण्याच्या बेतांत आहेत, मजूर उपाशी मरत आहेत. भांडवलावर व्याज सुटत नाहीं व मजुरांस मजुरी मिळत नाहीं. कारागिरांच्या घरांत शुकशुकाट (वावरतो) आहे, सावकारांचीं घरें तुडुंब भरलीं आहेत, कारखाने ओस पडताहेत, भिकारखाने चिक्कार भरून जाताहेत. या देशावर ईश्वरानें अनंत उपकार केले असले तरी आमचे राज्यकर्ते परमेश्वरी देणग्यांचा मूर्खपणानें दुरुपयोग करीत आहेत. एवढ्या अफाट साम्राज्याची शक्ति व संपत्ति मूठभर लोकांच्या सुखाकरितां, चैनीकरितां व स्वार्थाकरितां उधळली जात आहे! ज्या मूठभर लोकांच्या हातीं राजसत्ता आहे ते लोक राष्ट्रांतील लोकांचें हित दूर सारून आपल्या बगलबच्च्यांच्या फायद्याकरितांच झटत आहेत. सन १८३२ च्या सुधारणा कायद्यानें आमच्यासारख्यांच्या तक्रारींचें निरसन होईल असें वाटलें होतें; परंतु सर्वांचीच निराशा झाली—नव्हे अत्यंत हीनबुद्धीनें फसवणूक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली गेली. एका सत्ताधारी वर्गाच्या हातून सत्ता जाऊन ती दुसऱ्या वर्गाच्या हातीं गेली एवढेंच. गरीब बिचारे लोक पूर्वीप्रमाणेंच असहाय्य राहिले! त्यांची गुलामगिरी नष्ट झाली नाहीं. ती नष्ट व्हावी अशी आम्हां अर्जवाल्यांची इच्छा आहे. ती स्थिति चिरकाल टिकणारी नाहीं. मात्र ती टिकली तर राजसत्तेस धोका पोंचेल व देशांत अशांतता पसरेल यांत तिळमात्र शंका नाहीं. आपल्याला आमची अत्यंत नम्र विनंति आहे कीं, भांडवलावर योग्य तोच फायदा सुटावा, मजुराला योग्य ती मजुरी मिळावी, ज्या कायद्यांनीं धान्य महाग होतें व पैसा दुर्मिळ होतो ते कायदे रद्द व्हावेत, उद्योगधंद्यावर कर बसविण्याऐवजीं मालमत्तेवर कर बसवावे व थोड्या लोकांचें हित साधण्याऐवजीं जास्तींत जास्त लोकांचें हित साधेल अशी योजना सरकारनें हातीं घ्यावी. आम्ही अडाणी व अशिक्षित आहोंत हें खरें; परंतु देशावर परचक्र आल्यास त्याच्या संरक्षणास आम्हीच पुढें होतों, सरकार मागेल तेव्हां कराच्या रूपानें आम्हीच पैसा पुरवितों, सरकारचे कायदे आम्हीच बिनतक्रार पाळतों; मात्र कायदे करण्याच्या वेळीं आमच्याकडे पूर्णपणें दुर्लक्ष केलें जातें. हा अन्याय चीड आणण्यासारखा नव्हे काय? ज्या कायद्यांचें पालन आम्ही करावयाचें त्या कायद्यांच्या चर्चेच्या वेळीं आम्हांस विधिमंडळांत भाग कां घेतां येऊं नये?

प्रश्न :—१. चार्टिस्टांनीं चळवळ कशाकरितां केली? त्यांची स्थिति कशी होती?
२. त्यांच्या प्रमुख मागण्या कोणत्या होत्या? त्याकरितां त्यांनीं कोणते मुद्दे पुढें मांडले? ते योग्य होते?

२. खुल्या व्यापारासंबंधीं पुढाऱ्यांचीं मतें

खुला व्यापार म्हणजे काय, असें जो तो मला विचारतो. त्याला माझें उत्तर इतकेंच कीं, ज्यांच्यामुळें व्यापाराला अडथळा होतो अशा जकाती रद्द करणें म्हणजे खुला व्यापार होय. 'सर्व जकाती रद्द करणें म्हणजे कस्टमखातें रद्द करणें' असा कांहीं लोक अर्थ करतात, तो चूक होय. खुला व्यापार सुरू झाल्यानें सर्व मानवजातीवर अनंत उपकार झाल्याशिवाय राहणार नाहींत. खुल्या व्यापाराचें धोरण निसर्गाला धरून आहे व त्यामुळेंच तें रास्त व योग्य आहे. धान्य स्वस्त व्हावें एवढाच आमचा हेतु नाहीं; तर धान्याची किंमत निसर्गनियमांस अनुसरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्हावी असें आम्हांस वाटतें. त्यांतच शेतकऱ्याचें हित आहे, त्यामुळेंच शेतकऱ्यास पोटभर अन्न मिळणार आहे व त्यामुळेंच जमीनदार व कारखानदार यांचेंही हित साधणार आहे. एवढेंच नव्हे तर राष्ट्राराष्ट्रांतील व्यापाराविरुद्ध जकातीच्या रूपानें ज्या अजस्र भिंती उभ्या केलेल्या आपणांस आज दिसत आहेत, त्या नष्ट होतील व हेवा-दावा, मत्सर, द्वेष, सूडबुद्धि व लढाया कायमच्या नष्ट होऊन राष्ट्राराष्ट्रांत सलोखा व शांतता स्थापन झाल्याशिवाय राहणार नाहीं.

—रिचर्ड कॉब्डेन

चला, आपण सर्वजण हातांत हात घालूं या; व ज्या पद्धतीनें आपल्या व्यापाराचा नाश केला, आपल्या शेतीचा नायनाट केला, आपल्या देशांतील निरनिराळ्या लोकांत वर्गकलह निर्माण केले, सावकारी पाश घट्ट केले व ज्या पद्धतीच्यामुळें ताप, निरनिराळ्या सांथी, अक्षम्य गुन्हे व मृत्यु यांचें फावलें ती पद्धति—संरक्षित व्यापारपद्धति—नष्ट करूं या. धान्याचे कायदे रद्द करण्याकरितां सरकारला कांहीं तरी निमित्त पाहिजे आहे. तें पुरविण्याकरितां लोकांनीं सरकारकडे अर्ज करावे, सभा भरवून आपलें मत प्रदर्शावें, विनंत्या काराव्या व इतर सनदशीर मार्गांचा अवलंब करावा. त्यामुळें सरकारला निमित्त मिळून त्याला आपलें उद्दिष्ट साध्य करून घेतां येईल.

—विल्यम ग्लॅडस्टन

धान्य-कर-विरोधी संघाचीं तत्त्वें मला मान्य नाहींत. मी छातीवर हात ठेवून सांगतों कीं, त्याच्या म्हणण्याप्रमाणें या देशांत खुल्या व्यापाराची पद्धति सुरू केल्यास कारखानदारांचें हित साधणार नाहींच, उलट ज्यांच्या हिताकरितां आज खुल्या व्यापाराचा उदो उदो करण्यांत येत आहे ते शेतकरीही सपशेल बुडाल्याशिवाय राहणार नाहींत. त्या संघांतील लोकांचा आत्मविश्वास, त्यांचें संघटनाचातुर्य व अत्यंत आत्मीयतेनें एखाद्या तत्त्वाला वाहून घेऊन त्याच्या विजयार्थ त्यांनीं दाखविलेलें धैर्य व कौशल्य अपूर्व होय. त्यांनीं संघशक्ति निर्माण केली, त्यांत मला विशेषसें वाटत नाहीं. मला त्यांचें कौतुक वाटतें तें त्यांनीं आमच्या पक्षाच्या पुढाऱ्यालाही फितवून आपलासा केलें याबद्दल! संरक्षित व्यापाराच्या धोरणाचा जो एकमेव गड्डा, ज्याच्यावर आमची अढळ निष्ठा व विश्वास,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्याला देशानें राष्ट्रांतील पहिलें मानाचें स्थान (मुख्य प्रधानाचें) दिलें व त्यामुळेंच जो आज आपली सत्ता गाजवूं शकत आहे त्या आमच्या मुख्य प्रधानालाच त्यांनीं बनविलें! ही आश्चर्यकारक घटना नव्हे काय!! ज्याच्यावर आमचा अढळ विश्वास त्याला 'सामाजिक क्रांति' घडवून आणावयाची होती म्हणे! आणि ती त्यानें कशी घडवून आणली तर आमचा व आपल्या पक्षाचा विश्वासघात करून!! धान्याचा कायदा रद्द करण्याचें धोरण ठरवितांना त्यानें आपल्या सहकाऱ्यांचा सल्ला घेतला होता काय? पार्लमेंटची सल्ला घेतली होती काय? नाहीं, नाहीं, नाहीं. इतकी महत्त्वाची घटना आम्ही त्याच्या तोंडून न ऐकतां ती वर्तमानपत्रांच्या स्तंभांतून वाचली! याचा परराष्ट्रांवर काय परिणाम होईल याचा त्यानें कधीं विचार केला होता काय? आणि हाच आमचा पुढारी 'मी संरक्षित व्यापाराच्या धोरणाचा होतों, परंतु यापुढें मी खुल्या व्यापाराचें धोरण स्वीकारणार आहें,' असें सांगूं लागला तर त्याच्याबद्दल आम्हांस काय वाटत असेल?

—बेंजामिन डिझरेली

पीलचें भाषण–१८४६

माझें बद्दू नांव माझ्यामागें राहणार आहे हें मी जाणून आहें. माझ्यावर माझ्या अनेक सहकाऱ्यांनीं तोंडसुख घेतलें आहे व त्यांनीं अत्यंत निस्वार्थबुद्धीनें माझा पक्ष सोडला त्याबद्दल मला अत्यंत वाईट वाटत आहे. (जे माझ्या पक्षांत नव्हते पण) ज्यांना संरक्षित पद्धति पूर्णपणें पसंत आहे त्यांनींही मला कसून विरोध केला आहे. स्वार्थामुळेंच जे संरक्षित व्यापारपद्धतीला चिकटून राहिले आहेत, त्यांनींही माझी भरपूर निंदा केली आहे. या सर्वांच्या विरोधानें व निंदेनें माझें नांव कलंकित झालें असलें, तरी माझी पक्की खात्री आहे कीं एक दिवस असा उजाडेल कीं ज्या दिवशीं माझे गोडवे गाइले जातील. ज्यांना आपलें दररोजचें अन्न मिळविण्याकरितां प्रत्यहीं घाम गाळावा लागतो, त्यांना स्वस्त, कर-विरहित व भरपूर अन्न मिळूं लागलें म्हणजे त्यांच्या घरांतून माझें नांव मोठ्या प्रेमानें उच्चारिलें जाईल; त्यावेळींच माझ्या या कृत्याबद्दल (धान्याचा कायदा रद्द करण्याबद्दल) मला खरोखरीची धन्यता मिळेल.

प्रश्न :—१. खुल्या व्यापाराचा पुरस्कार कोणीं केला? कां?
२. त्याला विरोध कोणीं केला? कां?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श १८२०-१८५२

प्रसिद्ध व्यक्ती	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	वर्ष	हिंदुस्थान-महत्त्वाच्या गोष्टी	युरोप-महत्त्वाच्या गोष्टी
	कॅटो रस्त्यावरील कट	१८२०		
मन्रो, कॅनिंग,	लंडनडेरीची आत्महत्या	१८२२		तुर्कांविरुद्ध ग्रीसचें बंड
हस्किसन,			पहिलें ब्रह्मी युद्ध १८२३-२६	
स्टीफन्सन,	कॅनिंगचा मृत्यु	१८२७		लंडनचा तह. नॅव्हॅरिनोची लढाई
वेलिंग्टन,	कसोटीचा व कॉर्पोरेशन कायदा रद्द	१८२८	लॉर्ड विल्यम बेंटिंक	
स्कॉट,	कॅथॉलिकांचें विमोचन	१८२९	सतीची चाल बंद	
मॅझिनी, लॉर्ड ग्रे	पार्लमेंट सुधारणा बिल	१८३२		रशियाचें पोलंडवर आक्रमण
राजा राममोहन रॉय,	गुलामगिरी रद्द	१८३३	ई. इं. कंपनीच्या सनदेची फेरतपासणी	
	भिकाऱ्यांचा नवा कायदा	१८३४		
लॉर्ड मेलबर्न,				
कॉब्डेन, ब्राइट,	धान्य-कर-विरोधी संघ	१८३७		
रणजितसिंग,	चार्टिस्टांची चळवळ	१८३८	त्रिवर्गांचा तह-इंग्र-रणजी-शहासुजा	डरहॅमचा रिपोर्ट
	पेनी पोस्टेज	१८३९	१ लें अफ. युद्ध १८३९-४२	
ओकोनेल,				
सर रॉबर्ट पील,		१८४२	चीनशीं युद्ध	
	धान्याचा कायदा रद्द	१८४६		
लॉर्ड डलहौसी,	चार्टिस्टांची चळवळ	१८४८	सातारचें राज्य खालसा	फ्रान्समध्यें राज्यक्रांति
काव्हूर,		१८४९	दुसरें शीख युद्ध, पंजाब खालसा	
लॉर्ड पामर्स्टन,	पीलचा मृत्यु	१८५०		
	पहिलें जागतिक प्रदर्शन	१८५१		
	वेलिंग्टनचा मृत्यु	१८५२	दुसरें ब्रह्मी युद्ध	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. पूर्वेकडील प्रश्न–लॉर्ड पामर्स्टन

१. लॉर्ड ॲबरडीनचें प्रधानमंडळ (१८५२–५५):—लॉर्ड डार्बीनें राजीनामा दिल्यावर लॉर्ड ॲबरडीन इंग्लंडचा मुख्य प्रधान झाला. तो पीलचा अनुयायी होता. त्याचप्रमाणें ग्लॅडस्टन हाही पीलचाच अनुयायी होता. धान्याचा कायदा रद्द झाल्यापासून पीलच्या पुरोगामी कंझर्व्हेटिव्ह अनुयायांस 'पीलाइटस्' असें म्हणत. त्यांचा कल हळूहळू व्हिग ऊर्फ लिबरलपक्षाकडे झुकत होता. त्यामुळें ॲबरडीनच्या प्रधानमंडळांत लॉर्ड पामर्स्टन, लॉर्ड जॉन रसेल वगैरे व्हिगपक्षीय मुत्सद्दीही सामील झाले होते. यामुळें ॲबरडीनच्या प्रधानमंडळाला 'मिश्रप्रधानमंडळ' असें म्हणतात. ग्लॅडस्टनकडे फडणिशीखातें व लॉर्ड पामर्स्टनकडे गृहमंत्र्याचें खातें होतें. तरीही लॉर्ड पामर्स्टनचें लक्ष परराष्ट्रीय संबंधाकडे विशेष असे व त्याच्या मतांचा व धोरणांचा त्यावेळच्या परराष्ट्रीय धोरणावर पगडा बसल्याशिवाय राहिला नाहीं. या प्रधानमंडळाला 'क्रिमियन युद्धांत' पडावें लागलें.

२. रशियाचें धोरण:—सन १८२५–५५ पर्यंत रशियाच्या तक्तावर पहिला निकोलस होता. तो मोठा धर्मशील होता व ग्रीक चर्चच्या अनुयायांचा तो आपल्याला वाली समजत असे. ग्रीक चर्चचे पुष्कळसे अनुयायी त्यावेळीं तुर्कस्थानच्या अंमलाखालीं असलेल्या बाल्कन संस्थानांत होते; व रशियनां-प्रमाणेंच ते लोक स्लाव्ह जातीचे असल्यानें त्यांचें संरक्षण करणें हें आपलें कर्तव्य होय असें निकोलस म्हणे. एके काळीं तुर्कस्थानचें साम्राज्य ऑस्ट्रि-याच्या राजधानीपर्यंत पसरलें होतें; व त्याची एकोणिसाव्या शतकांत अवनति होत होती. सन १८३० पूर्वींच ग्रीसनें आपलें स्वातंत्र्य मिळविलें होतें; व तेव्हांपासून रशियाचा डोळा तुर्कस्थानवर होता. सन १७७४ मध्यें रशिया व तुर्कस्थान यांच्यामध्यें एक तह होऊन तुर्कस्थानच्या साम्राज्यांत असलेल्या ग्रीक चर्चच्या अनुयायांचें संरक्षण करण्याचा रशियाला पूर्णपणें अधिकार आहे असें ठरविण्यांत आलें होतें. त्याच्या जोरावर रशिया बाल्कन संस्था-नांच्या कारभारांत वरचेवर हात घालूं लागला. त्यामुळें त्याचे हेतु शुद्ध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नसावेत हें युरोपियन राष्ट्रांनीं व विशेषतः इंग्लंडनें ओळखलें. भूमध्यसमुद्रांत आपल्याला जातां यावें म्हणून रशिया खटपट करीत आहे हें प्रथमतः धाकट्या पिटनें ओळखलें होतें. बाल्कन संस्थानांतील आपल्या ख्रिस्ती प्रजेवर तुर्कस्थानचा सुलतान जुलूम करीत होता व त्यामुळें त्यांच्याबद्दल युरोपियन राष्ट्रांना सहानुभूति वाटत होती हेंही खरें होतें. परंतु तें कारण पुढें करून रशिया भूमध्यसमुद्रांत हातपाय पसरणार व तेथें इतर राष्ट्रांच्या व्यापारास खो देणार हें जेव्हां सर्वांस समजून आलें, त्यावेळीं त्यांनीं रशियाच्या धोरणास पायबंद घालून तुर्कस्थानला उचलून धरण्याचें ठरविलें. रशियाचें हें धोरण कॅनिंगनें पूर्णपणें ओळखलें होतें व म्हणूनच त्यानें तुर्कस्थानला उचलून धरून रशियाला चांगलीच तंबी दिली.

३. पूर्वेकडील प्रश्न :—बाल्कन संस्थानांतील स्लाव्ह जातीच्या ख्रिस्त्यांच्या संरक्षणाच्या नांवाखालीं तुर्कस्थानला मारून नेस्तनाबूत करावयाचा, काळ्या समुद्रावर आपलें वर्चस्व स्थापन करावयाचें, काळा समुद्र व भूमध्य-समुद्र यांना जोडणाऱ्या बास्फोरस व डार्डानेल्स या सामुद्रधुन्या आपल्या स्वामित्वाखालीं आणावयाच्या व कॉन्स्टँटिनोपल हस्तगत करून भूमध्य-समुद्रांतील व्यापार काबीज करावयाचा अशी रशियाचा झार निकोलस याची महत्त्वाकांक्षा होती. रशियाच्या या महत्त्वाकांक्षेस आळा घातला नाहीं तर भूमध्यसमुद्रांतील आपल्या व्यापारास बाध येईल व त्यामुळें कदाचित् हिंदुस्थानांतील आपल्या साम्राज्यास धोका पोंचेल असें ब्रिटिश मुत्सद्यांस वाटत होतें. तेव्हां रशियाला पायबंद घालावयाचा झाल्यास तुर्कस्थानास जिवंत ठेवलेंच पाहिजे असें त्यांनीं ठरविलें. तुर्कस्थान जिवंत राहिला तर रशियाला आपले बेत सफल करणें अशक्यच होतें. तुर्कस्थान आपल्या तंत्रानें वागूं लागला तर बाल्कन राष्ट्रांतील ख्रिस्त्यांच्या संरक्षणाचा प्रश्नही आपल्याला पाहिजे तसा सोडवितां येईल असें युरोपियन राष्ट्रांसही वाटत होतें. अशा तऱ्हेनें युरोपच्या पूर्वेकडील बाजूस एक मोठें राजकारण शिजत होतें; व त्यांत अनेक गुंतागुंतीचे प्रश्न ग्रथित झाले होते. त्या सर्वांस 'पूर्वेकडील प्रश्न' असें म्हणत. एकोणिसाव्या शतकांत या प्रश्नानें युरोपियन व त्यांतल्या त्यांत ब्रिटिश मुत्सद्यांचें लक्ष अनेकवार वेधून घेतलें होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. रशियाचे पूर्वेकडील बेत :—सन १८३३ सालीं रशियानें तुर्कस्थानशीं तह करून डार्डानेल्समधून रशियाच्या जहाजांशिवाय इतर युरोपियन राष्ट्रांचीं जहाजें जाऊं नयेत असें त्याच्याकडून कबूल करून घेतलें. त्यामुळें रशियाला भूमध्यसमुद्रांत आपलीं जहाजें नेण्यास पूर्ण परवानाच मिळाला. हें पाहून ब्रिटन, फ्रान्स व ऑस्ट्रिया यांनीं रशियाचा निषेध केला. पुढें सन १८३९ मध्यें इजिप्तचा खेदीव महमदअल्ली यानें फ्रान्सच्या मदतीनें तुर्कस्थानवर स्वारी करून सीरिया प्रांत हस्तगत केला. तेव्हां पामर्स्टननें तुर्कस्थानला मदत केली. सन १८४० मध्यें रशिया, प्रशिया, इंग्लंड व ऑस्ट्रिया यांनीं एक संघ निर्माण करून महमदअल्लीशीं बोलणें सुरू केलें; परंतु त्यानें फ्रेंचांच्या मदतीच्या बळावर विसंबून त्यांचें म्हणणें झिडकारून टाकलें. शेवटीं युद्ध होऊन त्यांत त्याचा पराभव झाला व सन १८४२ सालीं लंडनला तह होऊन तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं महमदअल्ली इजिप्तचा खेदीव म्हणून मानला गेला व डार्डानेल्समधून कोणत्याही राष्ट्रांचीं जहाजें जाऊं देऊं नयेत असें ठरलें. यानंतर सन १८४४ मध्यें रशियाचा झार पहिला निकोलस इंग्लंडमध्यें आला असतां त्यानें तुर्कस्थानच्या राज्याचे तुकडे पाडून ते विभागून घेण्याची सूचना ब्रिटिश मुत्सद्यांपुढें मांडली. परंतु त्यावेळीं त्याची डाळ शिजली नाहीं. पुढें सन १८५३ मध्यें सेंटपीटर्सबर्गमध्यें असणाऱ्या ब्रिटिश वकिलाजवळ बोलतां बोलतां तोच प्रश्न अप्रत्यक्षपणें काढून 'तुर्कस्थान म्हणजे युरोपचा व्याधिग्रस्त मनुष्य होय व त्याच्या मरणापूर्वी त्याच्या इस्टेटीची नीट व्यवस्था केली नाहीं तर गोंधळ माजेल' असें उद्गार काढले. यामुळें इंग्लंडला रशियाची चीड आली. पुढें इंग्लंडनें इजिप्त घ्यावा व बाल्कन राष्ट्रें रशियाच्या वर्चस्वाखालीं रहावीं अशी उघड उघड सूचनाही रशियानें केली; परंतु इंग्लंडनें त्या सूचनेकडे कानाडोळा केला. या सर्व गोष्टींवरून यूरोपच्या पूर्वेकडील भागांत रशियाचे कोणते बेत चालले होते तें लक्षांत येण्यासारखें आहे. मात्र तो योग्य संधीकरितां टपून बसला होता.

५. क्रिमियन युद्धाचीं कारणें :—ती संधि त्याला आयतीच मिळाली. खिश्चनांचीं धर्मक्षेत्रें ज्यांत आहेत तो पॅलेस्टाइन प्रांत तुर्कांच्या साम्राज्यांत मोडत होता. त्या प्रांतांतील जेरुसलेमच्या क्षेत्राजवळ बेथलेम हें जीझस क्राइ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्टच्या जन्माचें ठिकाण असून तेथें एक चर्च आहे. त्या चर्चच्या मागील दरवाजाच्या किल्ल्या लॅटिन चर्चवाल्यांच्याकडे व पुढील दरवाजाच्या ग्रीक चर्चवाल्यांच्या जवळ होत्या. तेव्हां मुख्य दरवाज्याच्या किल्ल्या आपल्याजवळ असाव्या असें लॅटिन चर्चवाले म्हणूं लागले. फ्रान्सनें लॅटिन चर्चवाल्यांची बाजू उचलून धरली व ग्रीक चर्चवाल्यांची बाजू रशियानें स्वीकारली. फ्रान्सचा राजा लुई नेपोलियन होता व त्याला एखादें युद्ध निर्माण करून व तें जिंकून यश व कीर्ति मिळवावयाची होती. याच हेतूनें तो या भांडणांत पडला होता. ब्रिटननेंही फ्रान्सला मदत करण्याचें ठरविलें होतें. बाल्कन राष्ट्रें ग्रीक चर्चचीं अनुयायी असल्यानें व त्यांच्या हक्कांचें संरक्षण करण्याचें कंकण रशियानें आपल्या हातांत बांधून घेतलें असल्यामुळें रशियानें ग्रीक चर्चवाल्यांची बाजू उचलली. आतां निर्णय देण्याचें काम तुर्कस्थानच्या सुलतानाकडे होतें; त्यामुळें दोन्ही बाजूचे लोक सुलतानानें आपल्या बाजूनें निकाल द्यावा असा त्याला आग्रह करीत होते. शेवटीं सुलतानानें लॅटिन चर्चवाल्यांच्या बाजूनें निकाल दिला. आपल्या बाजूला इंग्लंड व फ्रान्स हे देश आहेत व आपल्या निकालानें चिडून जाऊन रशियानें युद्ध सुरू केल्यास त्या राष्ट्रांची आपल्याला मदत मिळेल असें त्याला वाटत होतें. ठरल्याप्रमाणें रशिया चिडला व त्यानें एकदम तुर्कस्थानच्या राज्यांतील मोल्डेव्हिया व वॅलेशिया (सध्यांचा रुमेनिया) या प्रांतांवर हल्ला चढविला (१८५३). त्यामुळें जें युद्ध सुरू झालें, त्याला ‘ क्रिमियन युद्ध ’ असें म्हणतात.

६. इंग्लंड युद्धांत कां पडलें ?:—तुर्कस्थानावर रशियानें हल्ला केला हें कळतांच इंग्लंड व फ्रान्स यांनीं तुर्कस्थानचा बचाव करण्याकरितां रशियाविरुद्ध युद्ध पुकारलें (१८५४). इंग्लंडनें या युद्धांत भाग घेतला ही गोष्ट अनेकांस आवडली नाहीं. इंग्लंडनें त्या युद्धांत भाग घेऊन एक मोठें पातक केलें असें जॉन ब्राइट म्हणाला. त्याचे शब्द पुढें बऱ्याच अंशानें खरे ठरले. अमुक तत्त्वास अनुसरून इंग्लंड या युद्धांत पडलें असें सांगतां येत नाहीं. इंग्लंडला रशियाची भीति वाटत होती. तुर्कस्थान देश रशियानें जिंकून घेतला तर रशियाची सत्ता पूर्वेकडे बेसुमार वाढेल व त्या देशाचा भूमध्य-समुद्रांत शिरकाव झाला तर भूमध्यसमुद्रांतील आपला व्यापार व हिंदुस्था-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नशीं असलेलें आपलें दळणवळण नष्ट होईल अशी इंग्लंडला साधार भीति वाटत होती. पूर्वेकडील देशांशीं होणाऱ्या दळणवळणाचें इजिप्त नाकं समजलें जाई व तेंही रशियानें काबीज केल्यास इंग्रजांचा व्यापारही जाणार व हिंदुस्थानचें राज्यही जाणार ! तेव्हां तुर्कस्थान व्याधिग्रस्त असला तरी त्याचें संरक्षण केल्यानेंच रशियन आक्रमणाची लाट थोपवून धरितां येईल असें इंग्लंडला वाटत होतें व त्यामुळेंच इंग्लंड या युद्धांत पडलें.

७. क्रिमियन युद्ध (१८५४-५६):—रुमेनियावर रशियानें हल्ला केला असें कळतांच इंग्लंड व फ्रान्स या दोन्ही देशांनींही रशियाविरुद्ध युद्ध पुकारून आपलीं जहाजें काळ्या समुद्रांत नेलीं. तेव्हां रुमेनियाच्या बाजूचें सैन्य रशियानें क्रिमियन द्वीपकल्पांत आणलें. याच ठिकाणीं सर्व लढाया झाल्यानें या युद्धाला 'क्रिमियन युद्ध' असें म्हणतात. लॉर्ड रॅगलन हा ब्रिटिश सैन्याचा सेनापति होता व फ्रेंचांचा सेंट आरनॉड होता. त्यांनीं आपलीं सैन्यें क्रिमियांत उतरविलीं व सेबॅस्टिपूलवर हल्ला चढविला. त्याचप्रमाणें बॅलाक्लॅव्हा, इन्कर्मन वगैरे ठिकाणीं मोठ्या घनघोर लढाया झाल्या. सेबॅस्टिपूल येथें रशियाचा दारूगोळा होता. सेबॅस्टिपूलचा किल्ला बळकट असल्यानें तो सुमारें नऊ महिने दोस्तांच्या स्वाधीन झाला नाहीं. शेवटीं सन १८५५ मध्यें तो किल्ला दोस्तांनीं जिंकला. या नऊ महिन्यांत शिपायांचे अनंत हाल झाले. त्या वेळीं कडक थंडी पडली होती; व त्याच्या निवारणार्थ ब्रिटननें कोणत्याही प्रकारची पूर्वयोजना केली नसल्यानें सैनिकांना अनेक प्रकारच्या हालांस तोंड द्यावें लागलें. त्यांतच कॉलरा सुरू झाला, तापाची सांथ उद्भवली, लोकांस अन्न व कपडे मिळेनासे झाले व अनेक लोक प्राणास मुकूं लागले. रुग्णालयांची व्यवस्थाही चांगली नव्हती. अन्नसामुग्री व औषधें यांचा तुटवडा पडूं लागला. जेथें अन्न पाहिजे तेथें कपडे जात व जेथें कपडे पाहिजेत तेथें अन्न पोचविलें जाई ! थंडीपासून लोकांचें निवारण होईना व शिपायांना उघड्या तंबूंत कुडकुडत पडावें लागे. त्यांच्या दुर्दैवानें हे तंबू सोसाट्याच्या वाऱ्यानें उडून गेले म्हणजे लोकांची गाळण होई. रसद पोंचविण्याची व्यवस्था तर इतकी वाईट होती कीं, एके ठिकाणीं बूट पाठविण्यांत आले ते एकाच पायाचे ! ज्या ठिकाणीं अन्न पाहिजे होतें त्या ठिकाणीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तें न जातां, तें नको त्या ठिकाणीं जाई व तेथें तें कुजे. डॉक्टरांना पाहिजे तें सामान न मिळाल्यामुळें रुग्णालयांत हजारों लोक मेले. सन १८५५ मध्यें २५००० पैकीं १३००० लोक मेल्याचें निदर्शनास आलें. या



बाल्कन राष्ट्रें व क्रिमिया

गोष्टींचा इंग्लंडमध्यें फार बभ्रा झाला. प्रधानमंडळाच्या व्यवस्थेवर कडक टीका होऊं लागली. शेवटीं लॉर्ड ॲबरडीननें राजीनामा दिला व लॉर्ड पामर्स्टन मुख्य प्रधान झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. फ्लॉरेन्स नाइटिंगेल (१८२०–१९१०) :—क्रिमियाच्या समरभूमीवर ब्रिटिश सैनिकांचे अत्यंत हाल होत असल्याचें पाहून इंग्लंडमधील अनेक स्त्रिया नर्सिंगचें काम करण्यास तयार झाल्या व जखमी शिपायांची शुश्रूषा करून त्यांस पुन्हां कार्यक्षम करण्याकरितां युद्धक्षेत्राकडे जाण्याची त्यांनीं तयारी दाखविली. त्यांत फ्लॉरेन्स नाइटिंगेल ही स्त्री प्रमुख होय. तिचा जन्म सन १८२० मध्यें फ्लॉरेन्स येथें झाला. जन्मतः ती श्रीमंत होती, परंतु समाजसेवेचें वेड तिला बालपणापासूनच लागलेलें होतें. सेविकेचें शिक्षण तिनें पॅरिसला मिळविलें. आजाऱ्याची शुश्रूषा करणें, रुग्णालयाची नीट व्यवस्था लावणें वगैरेमध्यें तिनें प्रावीण्य मिळविलें होतें. शुश्रूषा करणें स्त्रीला जमणार नाहीं असें त्या वेळीं मत असतांही तिनें सेविकेचा धंदा मोठ्या आवडीनें पत्करला व लोकनिंदेस पाठ देऊन तो आत्मसात् केला. सन १८५४ मध्यें क्रिमियन युद्धाच्या वेळीं रुग्णाईत शिपायांची शुश्रूषा करण्याकरितां तिनें सेविकांचें एक पथक निर्माण केलें व तुर्कस्थानाकडे जाण्यास ती सिद्ध झाली. नंतर ती स्कुटारी येथील हॉस्पिटलमध्यें काम करूं लागली. तेथील रुग्णालयाची उत्तम व्यवस्था लावून आजाऱ्यांची तिनें उत्तम शुश्रूषा केल्यानें तेथील मृत्यूचें प्रमाण निम्म्यानें घटलें व शेवटीं तर तें प्रमाण दोन टक्के राहिलें. यावरून तिनें किती उत्कृष्ट काम केलें याची सहज साक्ष पटते. तिच्या कामाबद्दल लोकांनीं ५०००० पौंडांची रक्कम उभी केली; परंतु ती रक्कम सेविकेचें शिक्षण देणाऱ्या एका संस्थेस तिनें देऊन टाकली. एकंदरींत पाहतां अलीकडील सेविकाशास्त्राची फ्लॉरेन्स नाइटिंगेल मुख्य जननी म्हणून समजली जाते.

फ्लॉरेन्स नाइटिंगेल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. क्रिमियन युद्धाचा शेवट (१८५६):—बॅलाक्लॅव्हा येथें एक अपूर्व गोष्ट घडून आली. या ठिकाणीं ब्रिटिशांचीं जहाजें व युद्धसामुग्री होती. त्यावर रशियन लोकांनीं हल्ला केला. तेव्हां त्यावर उलट हल्ला चढविण्याचा हुकूम लॉर्ड ल्यूकन याच्या ६७० लोक असलेल्या 'लाइट ब्रिगेड' नामक पलटणीला मिळाला. हा हुकूम चुकीचा होता. तरीही त्या लोकांनीं तो पाळला व ते सर्व लोक 'मृत्यूच्या जबड्यांत शिरले.' त्यांच्यापैकीं फक्त दोनशें सुखरूप परतले. त्यावरून ब्रिटिश सैन्याची कर्तव्यबुद्धि व शिस्त किती उत्तम होती हें समजून येतें. लॉर्ड ॲबर्डीननंतर लॉर्ड पामर्स्टन मुख्य प्रधान झाला (१८५५). त्याच वर्षीं रशियाचा झार पहिला निकोलस मृत्यु पावला. व्हिक्टोरिया राणीला पामर्स्टन आवडत नव्हता; राष्ट्राला तो हवा होता. तेव्हां राणीनें आपल्या इच्छेविरुद्ध त्याला मुख्य प्रधान नेमलें. मुख्य प्रधान झाल्याबरोबर पामर्स्टननें युद्धाचें स्वरूप पार पालटून टाकलें. सैन्यभरती उत्तम झाली, युद्धोपयोगी सामानाची पोंच व्यवस्थित होऊं लागली, क्रिमियामध्यें एक आगगाडी सुरू करून लष्कराच्या हालचाली योग्य होतील अशी सोय करण्यांत आली व कोठें कांहीं कमी पडणार नाहीं अशी खास व्यवस्था झाली. त्यामुळें युद्धाचा नूरही बदलला. सन १८५५ मध्यें इटलीमधील सार्डीनिया हें संस्थान रशियाविरुद्ध युद्धांत सामील झालें; व त्याच वर्षीं सेबॅस्टिपूल पडल्यानंतर तहाच्या वाटाघाटी होऊन पॅरिस येथें तह झाला व युद्ध संपलें (१८५६). डार्डानेल्स सामुद्रधुनी सर्व राष्ट्रांच्या आरमारी जहाजांस बंद असावी, काळ्या समुद्रांत रशिया व तुर्कस्थान यांनीं आपलें आरमार ठेवूं नये, तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं रुमेनिया (मोल्डेव्हिया व वॅलेशिया) प्रांत स्वतंत्र व्हावा व रशियानें बाल्कन संस्थानांच्या संरक्षणाची जबाबदारी घेऊं नये वगैरे गोष्टी या तहानें ठरल्या. यामुळें रशियाच्या महत्त्वाकांक्षेस पायबंद बसला; मात्र तो तात्कालिक ठरला. कबूल करूनही तुर्कस्थानच्या सुलतानानें आपल्या राज्यांतील ख्रिस्ती प्रजाजनांस नीट वागविलें नाहीं व त्यामुळेंच बाल्कन राष्ट्रांत राष्ट्रीयत्वाची चळवळ उत्पन्न झाली व त्यांनीं तुर्कस्थानचें स्वामित्व झुगारून देण्याचे प्रयत्न चालविले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०. लॉर्ड पामर्स्टन (१७८४-१८६५):—क्रिमियन युद्धांत इंग्लंडला यश मिळवून देणारा मुत्सद्दी लॉर्ड पामर्स्टन सन १७८४ मध्यें जन्मास आला. तो आयरिश उमराव होता. त्याचें सर्व शिक्षण हॅरोच्या शाळेंत व केंब्रिजच्या विश्वविद्यालयांत झालें. सन १८०७ मध्यें तो प्रथमतः पार्लमेंटमध्यें शिरला. त्यानंतर दोनच वर्षांनीं त्याचा प्रधानमंडळांत शिरकाव झाला. उत्कृष्ट परराष्ट्रमंत्रि म्हणून त्याची फार प्रसिद्धी आहे. त्याची बुद्धिमत्ता वरच्या दर्जाची होती व त्यामुळें प्रत्येक वेळीं आपल्या आत्मविश्वासावर अवलंबूनच तो प्रत्येक गोष्ट करीत असे.

लॉर्ड पामर्स्टन

आपल्या सहकाऱ्यांस अगर खुद्द राणीलाही न कळवितां अनेक गोष्टींचा निकाल तो स्वतः लावी. त्याचें हें स्वातंत्र्य-प्रेम त्याच्या अंगलट आल्याशिवाय राहिलें नाहीं; व त्यामुळेंच त्याला तापट, ताठर व एकांडा शिलेदार म्हणूनही लोक म्हणत. त्याला इंग्लंडबद्दल अत्यंत अभिमान होता व आपल्या राष्ट्राचें महत्त्व व दरारा वाढविण्याकरितां तो सदैव झटत असे. लोकशाहीच्या तत्त्वांचा तो उपासक नव्हता. सन १८३२ सालच्या सुधारणा कायद्याला त्यानें पाठिंबा दिला असला तरी त्यापेक्षां जास्त सुधारणा करण्याची मुळींच आवश्यकता नाहीं असें तो म्हणे व त्यामुळेंच तो जिवंत असेतोंपर्यंत पार्लमेंटची सुधारणा झाली नाहीं. कॅथॉलिक-विमोचनाला त्यानें संमति दिली तरी कॅथॉलिकांस त्यापेक्षां जास्त सवलती देऊं नयेत असें त्याला वाटे. खुल्या व्यापाराचाही तो कट्टा पुरस्कर्ता नव्हता व त्यामुळेंच त्याचे व ग्लॅडस्टनचे नेहमीं खटके उडत. परराष्ट्रीय बाबतींत त्यानें अत्यंत उदार धोरण स्वीकारलें असलें तरी इंग्लंडच्या बाबतींत तो प्रतिगामी धोरणाचाच पुरस्कर्ता होता हें ध्यानांत धरलें पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११. पामर्स्टनचें परराष्ट्रीय धोरण (१८३०–५६):—पामर्स्टननें प्रथमतः पर्सिव्हल, लिव्हरपूल, कॅनिंग, वेलिंग्टन वगैरे कट्टर टोरी मुत्सद्यांच्या प्रधानमंडळांत युद्धमंत्रि म्हणून काम केलें. नंतर सन १८३० पासून पुढें जवळजवळ तीस वर्षें तो इंग्लंडचा परराष्ट्रीय प्रधान होता. तो कॅनिंगचा अनुयायी असल्यानें परराष्ट्रीय बाबतींत त्याच्या तत्त्वांचेंच त्यानें अनुकरण केलें. इंग्लंडचें महत्त्व वाढवून त्याचा युरोपांतील राष्ट्रांवर त्याला दरारा बसवावयाचा होता. युरोपांतील राष्ट्रांत राष्ट्रीयत्वाची चळवळ जोरांत चालू होती. तेव्हां ती चळवळ दडपून न टाकतां तिला सर्वत्र संचार करूं द्यावा असें त्यास नेहमीं वाटे. यामुळेंच त्यानें इतर राष्ट्रांच्या बाबतींत उदारपणाचें धोरण स्वीकारलें होतें असें म्हणावें लागतें. रशियाचा तर तो कट्टा शत्रू होता; व म्हणूनच त्या देशाच्या पूर्वेकडील महत्त्वाकांक्षी बेतास आळा घालण्याकरितां तुर्कस्थानला जिवंत ठेविलें पाहिजे असें तो म्हणे. या बाबतींतला त्याचा उद्देश कांहींसा सफल झालाही. एकंदरींत पाहतां त्याचें परराष्ट्रीय धोरण मोठें तडफदार होतें व त्यामुळेंच तो राणीला आवडत नसला तरी लोकादरास पात्र झाला. (१) **बेल्जम**—सन १८३० सालीं लॉर्ड ग्रेच्या प्रधानमंडळांत तो प्रथमतः परराष्ट्रीय मंत्रि होता. त्यावेळीं धार्मिक विषमतेमुळें हॉलंडपासून बेल्जम विभक्त होऊं पहात होतें. सन १८३० मध्यें ब्रुसेल्सला राज्यक्रांति झाली व बेल्जमनें हॉलंडपासून स्वतंत्र होण्याचा प्रयत्न चालविला. बेल्जममध्यें कॅथॉलिक लोकांचें मताधिक्य होतें व हॉलंडमध्यें प्रॉटेस्टंटांचें प्राधान्य होतें. यामुळें बेल्जियनांचा धार्मिक छळ होई. राजकीय बाबतींतही त्यांना अधिकार मिळत नसत व म्हणूनच त्यांनीं हॉलंडविरुद्ध बंड केलें होतें. हॉलंडच्या राजानें तें बंड दडपून टाकण्याचा बेत केला होता. परंतु बेल्जमच्या मदतीस इंग्लंड व फ्रान्स हीं बलाढ्य राष्ट्रें धांवून आल्यानें त्याला आपला बेत रहित करावा लागला. शेवटीं लंडनला पामर्स्टनच्या अध्यक्षतेखालीं सन १८३१ सालीं सभा भरून बेल्जमच्या स्वातंत्र्यास मान्यता देण्यांत आली व चौथ्या जॉर्जच्या जांवयास–लिओपोल्ड यास–स्वतंत्र बेल्जमचा राजा म्हणून मान्यता देण्यांत आली. पामर्स्टनच्या प्रेरणेमुळेंच पुढें सन १८३९ मध्यें बेल्जम हें राष्ट्र कायमचें तटस्थ असल्याचें व त्याच्या तटस्थपणाचा कधींही भंग न कर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ण्याचें सर्व युरोपियन राष्ट्रांनीं कबूल केलें. (२) **पोलंड**—सन १८३२ सालीं पोलंडमध्यें राज्यक्रांति झाली असतां रशियानें त्या राष्ट्राच्या राज्यव्यवस्थेंत हस्तक्षेप करून तेथें आपल्या वर्चस्वाखालीं एक नवी राज्यव्यवस्था स्थापन केली. ही गोष्ट पामर्स्टनला आवडली नाहीं म्हणून त्यानें त्याचा फक्त निषेध केला. (३) **स्पेन–पोर्तुगाल**—स्पेन व पोर्तुगालमधील तंटे त्यानें तरवारीच्या जोरावर मिटविले. डॉम मीगल यानें पोर्तुगालचें राज्य बळकाविलें होतें. पेड्रो नामक ब्राझीलच्या राजानें तें आपल्या मुलीस दिलें होतें. आपल्या मुलीच्या हक्काच्या संरक्षणार्थ पेड्रोनें पोर्तुगालवर स्वारी केली होती. तेव्हां पामर्स्टनच्या मदतीनें पेड्रोनें मीगलचा पराभव केला (१८३३). त्याचप्रमाणें डॉन कॅरलॉसनें स्पेनमधील लोकांच्या मनाविरुद्ध तेथील राज्य बळकावण्याचा प्रयत्न केला. तेव्हां आपल्या पुतण्याविरुद्ध–डॉन कॅरलॉसविरुद्ध–क्रिस्तीना राणीनें आपल्या मुलीला स्पेनची गादी मिळावी म्हणून इंग्लंडची मदत मागितली. तेव्हां पामर्स्टननें सन १८३४ मध्यें इंग्लंड, फ्रान्स, स्पेन व पोर्तुगाल या चार राष्ट्रांचा एक संघ स्थापन करून कॅरलॉसला पळवून लावलें. त्यामुळें तेथील लोकांच्या मतस्वातंत्र्यास पामर्स्टननें मान्यता दिली असेंच सिद्ध होतें. (४) **रशिया–तुर्कस्थान**—पामर्स्टन रशियाचा शत्रू होता हें मागेंच सांगितलें आहे. तुर्कस्थान जिवंत राहिलें तरच रशियाच्या पूर्वेकडील महत्त्वाकांक्षेस पायबंद बसेल हें त्यानें पूर्णपणें ओळखलें होतें व त्याकरितांच त्यानें रशियाशीं उघड उघड शत्रुत्व स्वीकारून तुर्कस्थानला मदत केली (१८३३-४२). ही हकीकतही मागें (पान ५३ पहा) आलीच आहे. (५) **चीनशीं युद्ध**—सन १८३९ मध्यें इंग्लंड व चीन यांच्यांत खटका उडाला. चीनमधून इंग्रजांनीं अफू नेऊं नये असें ठरलें असतांही इंग्लिशांनीं अफूचा व्यापार चोरून मारून करण्यास सुरुवात केली. हें समजतांच चिनी सरकारनें सन १८३९ सालीं पंधरा लक्ष पौंडांची अफू चोरून नेत असतां इंग्रज व्यापाऱ्यांस पकडलें. त्यावेळीं पामर्स्टननें चीनशीं युद्ध पुकारलें. शेवटीं सन १८४२ मध्यें तह होऊन हॅंगकॉंग बेट इंग्रजांस मिळालें व चीनचीं अनेक बंदरें इंग्रजांस व्यापाराकरितां खुलीं करण्यांत आलीं. (६) **पुन्हां स्पेन**—सन १८४३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सालीं स्पेनच्या राजकन्यांच्या लग्नाचा प्रश्न उत्पन्न झाला. स्पेनची राणी इसाबेला हिनें लग्न केल्याशिवाय व तिला मुलें झाल्याशिवाय तिच्या बहिणीचें लग्न आपल्या मुलाशीं लावणार नाहीं असें फ्रान्सचा राजा लुई फिलीप यानें इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिला वचन दिलें होतें. परंतु तें वचन मोडून इसाबेलाचें लग्न झाल्याबरोबर फिलिपनें आपल्या मुलाचें स्पेनच्या राणीच्या बहिणीबरोबर लग्न लाविलें. ही गोष्ट व्हिक्टोरियाला व पामर्स्टनलाही आवडली नाहीं. त्यामुळें फ्रान्स व इंग्लंड यांचें बिनसलें. (७) **स्वित्झरलंड**—पुढें सन १८४६ सालीं स्वित्झरलंडमधील लिबरलपक्षाला उचलून धरून पामर्स्टननें लुई फिलीपची त्या देशांतील कारवाई मोठ्या शिताफीनें हाणून पाडली व स्वित्झरलंडच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली. एवढेंच नव्हे तर तें राष्ट्र बेल्जमप्रमाणेंच 'कायमचें तटस्थ राष्ट्र' म्हणून मानण्यांत यावें असें सर्वांकडून मान्य करवून घेतलें (१८४७). (८) **फ्रान्स**—सन १८४८ मध्यें इटली, हंगेरी, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रिया वगैरे देशांत राज्यक्रांत्या होत होत्या; त्यांस पामर्स्टनची पूर्णपणें सहानुभूति होती. फ्रान्समध्यें लुई फिलीपचा पाडाव होऊन राज्यक्रांति झाली (१८४८) व फ्रान्समध्यें पुन्हां प्रजासत्ताक राज्य सुरू झालें. त्यानंतर लुई नेपोलियन त्या प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष झाला; परंतु तें पद झुगारून देऊन सन १८५१ मध्यें 'फ्रान्सचा बादशाह' हें पद त्यानें स्वीकारलें. पामर्स्टनला हें कळतांच त्यानें खाजगीरीतीनें त्याचें अभिनंदन केलें. ही गोष्ट त्यानें प्रधानमंडळांतील आपल्या इतर सहकाऱ्यांसही कळूं दिली नाहीं. परंतु पुढें ती उघडकीस आली. तेव्हां राणीला अत्यंत राग आला. या गोष्टीच्या अगोदर एक वर्ष राणीनें पामर्स्टनला पत्र लिहून 'परराष्ट्रीय बाबतींत कोणतें धोरण स्वीकारणार हें मला अगोदर कळविल्याशिवाय व त्याला माझी संमति असल्याशिवाय तें धोरण स्वीकारूं नये' असें त्याला कळविलें होतें (१८५०). परंतु त्याकडे दुर्लक्ष करूनच पामर्स्टननें लुई नेपोलियनचें अभिनंदन केलें होतें. तें कळतांच राणीनें मुख्य प्रधान लॉर्ड जॉन रसेल याला पत्र लिहून त्या गोष्टीचा पामर्स्टनकडून जाब घ्यावा असें सुचविलें. तेव्हां पामर्स्टननें जाब न देतांच आपल्या जागेचा राजीनामा दिला. त्यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पामर्स्टन राणीच्या मनांतून कायमचाच उतरला होता. (९) **ग्रीस**—सन १८५० मध्यें त्यानें ग्रीसशीं युद्ध पुकारलें होतें. डेव्हिड पॅसिफिको नांवाच्या एका इंग्लिश 'ज्यू'वर अथेन्सच्या लोकांनीं हल्ला केला. तेव्हां त्यानें 'आपण ब्रिटिश प्रजाजन आहोंत, तेव्हां आपल्याला संरक्षण पाहिजे' असें म्हणून पामर्स्टनकडे मदतीची याचना केली. तेव्हां पामर्स्टननें पार्कर या दर्यासारंगाच्या नेतृत्वाखालीं ग्रीसकडे इंग्लिश आरमार पाठवून दिलें व ग्रीसवर बहिष्कार पुकारला. यामुळें युरोपांत खळबळ उडाली. तेव्हां उमराव-मंडळांत पामर्स्टनविरुद्ध निंदाव्यंजक ठराव मांडण्यांत आला असतां 'जगाच्या कोणत्याही भागावर जरी एखादा इंग्रज असला, तरी त्याचें संर-क्षण करणें हें इंग्लंडचें कर्तव्यकर्म आहे' असें सांगून आपल्या कृत्याचें त्यानें समर्थन केलें. शेवटीं त्याचें म्हणणेंच मान्य होऊन मूळ ठराव नापास झाला. त्यानें प्रतिपादिलेलें हें तत्त्व अजूनही मानण्यांत येतें; व त्याची अंमलबजाव-णीही कसोशीनें केली जाते. पामर्स्टनची त्यावेळीं वाहवा झाली. (१०) **क्रिमियन युद्धाच्या** वेळची त्याची कामगिरी मागें आलीच आहे. त्यावेळींच तो मुख्य प्रधान झाला होता. राणीला तो नको होता; परंतु लोकांच्या इच्छे-पुढें तिचा नाइलाज झाला.

१२. पामर्स्टनचें पहिलें प्रधानमंडळ (१८५५–५८):—क्रिमियन युद्धांतून मोकळा होतो न होतो तोंच पामर्स्टनला चीनशीं युद्ध पुकारावें लागलें. सन १८५६ मध्यें 'ॲरो' या नांवाच्या एका जहाजास चीननें पकडलें. या जहाजावरील सर्व खलाशी चिनी होते व आपल्या जहाजावर ब्रिटिश निशाण फडकत ठेवून ते लोक चांचेगिरी करीत होते असा त्यांच्यावर आरोप होता. ब्रिटिश सरकारनें त्या जहाजाच्या कप्तानाला इंग्लिश निशाण फडकविण्याचा अधिकार एका वर्षापुरता दिला होता. परंतु तें वर्ष संपल्या-वरही त्या जहाजाच्या कप्तानानें ब्रिटिश निशाण लावलें होतें. अर्थात ती चूक होती. तरीही त्या जहाजावरील खलाशांची सुटका व्हावी व ब्रिटिश निशाणाचा अपमान झाल्याबद्दल चीननें माफी मागावी असा पामर्स्टननें आग्रह धरला. चिनी सरकारनें खलाशांना सोडून दिलें; परंतु माफी मागण्याचें नाकारलें. तेव्हां पामर्स्टननें चीनशीं युद्ध पुकारलें. ब्रिटिश निशाणाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अपमान झाला व त्याबद्दल चीनला शासन झालेंच पाहिजे असें पामर्स्टनचें म्हणणें होतें. परंतु त्या कृत्याचा फारच गवगवा झाला; तेव्हां पामर्स्टननें पार्लमेंटची नवी निवडणूक केली. त्यांत त्याला बहुमत मिळाल्यानें तोच मुख्य प्रधान राहिला. तेव्हां त्यानें चीनशीं जोरानें युद्ध सुरू केलें. शेवटीं सन १८६० मध्यें तह होऊन चीनच्या दरबारीं ब्रिटिश वकील ठेवून घेण्याचें व टीन्स्टिन बंदर ब्रिटिश व्यापाराकरितां खुलें ठेवण्याचें चिनी सरकारनें कबूल केलें. चीनकडून जबरदस्त खंडणीही वसूल करण्यांत आली. सन १८५७ सालीं हिंदुस्थानांत बंड झालें; तें मोडण्यांत आलें. सन १८५८ मध्यें लॉर्ड पामर्स्टननें पार्लमेंटमध्यें 'खुनाचा कट' करण्याविरुद्ध एक बिल मांडलें. त्या सालीं ऑर्सिनी नामक एका इटालियनानें फ्रेंच बादशाह लुई नेपोलियन याच्यावर एके दिवशीं एक बॉंब टाकला. हा बॉंब इंग्लंडमध्यें तयार झाला होता व त्यामुळें लुई इंग्लंडवर चिडला होता. पुढें ऑर्सिनीचें इंग्लंडमध्यें स्वागत झालेलें पाहून तो संतापला. हें पाहून त्यानें इंग्लंडला पत्र पाठवून 'इंग्लंडांत खुनी माणसालाही उत्तेजन मिळतें काय ?' असा टोला दिला; तेव्हां त्याला खूष करण्याकरितांच पामर्स्टननें वरील बिल पार्लमेंटमध्यें आणलें अशी त्याच्यावर टीका झाली व त्याचें बिल फेटाळण्यांत आलें. तेव्हां पामर्स्टननें राजीनामा दिला व लॉर्ड डार्बी मुख्य प्रधान झाला (१८५८).

१३. लॉर्ड डार्बीचें दुसरें प्रधानमंडळ (१८५८–५९):—याच प्रधानमंडळानें हिंदुस्थानांतील बंडानंतर 'राणीचा जाहीरनामा' प्रसिद्ध केला (१८५८). सन १८५८ मध्यें ज्यू लोकांवरील राजकीय निर्बंध दूर करण्यासंबंधीं व त्यांना पार्लमेंटमध्यें प्रवेश देण्यासंबंधीं प्रयत्न करण्यास जोराची सुरवात झाली. यापूर्वीही तसे प्रयत्न अनेक झाले; परंतु त्यांना यश आलें नाहीं. सन १८५१ मध्यें डेव्हिड सालोमन्स नांवाचा एक ज्यू गृहस्थ पार्लमेंटकरितां ग्रिनिचतर्फे निवडून आला व तो पार्लमेंटमध्यें आपली जागा घेण्याकरितां जात असतां पार्लमेंटच्या रखवालदारानें त्याला हुसकून लावलें. त्यामुळें ज्यू समाज खवळला व त्यांनीं आपल्याला राजकीय अधिकार मिळविण्याकरितां जोरानें चळवळ चालविली. तेव्हां सन १८५८ मध्यें ज्यू लोकांवरील राजकीय निर्बंध दूर करण्याबद्दल पार्लमेंटमध्यें बिल मांडण्यांत आलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उमरावमंडळानें तें फेंटाळून लावलें; परंतु पार्लमेंटच्या कोणत्याही सभेनें सभासदाला घ्यावयास लागणाऱ्या शपथेंत वाटेल तसा फेरफार करावा व ज्यूनीं ती शपथ घेऊन पार्लमेंटमध्यें बसावें अशी तडजोड मान्य झाली. त्याप्रमाणें शपथ घेण्याचें ठरवून सन १८५८ पासून ज्यू लोक पार्लमेंटमध्यें बसूं लागले. बॅरन रॉथचाइल्ड हा ज्यू गृहस्थ कॉमन्ससभेंत प्रथम बसला. यानंतर सन १८५९ मध्यें डिझरेलीनें पार्लमेंटच्या सुधारणेसंबंधीं पार्लमेंट-मध्यें एक बिल मांडलें. त्यांत अनेक लोकांस मतदानाचा अधिकार देण्यांत आला होता. परंतु तें बिल पार्लमेंटमध्यें नापास झालें. त्यामुळें पार्लमेंटसभा रद्द करण्यांत येऊन, नवी निवडणूक होण्याचें ठरलें. त्यांत लिबरलपक्ष बहुमतानें निवडून आल्यानें लॉर्ड डार्बीनें राजीनामा दिला व पामर्स्टन मुख्य प्रधान झाला.

१४. लॉर्ड पामर्स्टनचें दुसरें प्रधानमंडळ (१८५९-६५) :—(१) आर्थिक सुधारणा—पामर्स्टनच्या प्रधानमंडळांत ग्लॅडस्टन हा फडणीस होता. तो पीलचा अनुयायी असल्यानें त्यानें खुल्या व्यापाराच्या तत्त्वाचा पूर्णपणें अंगिकार केला होता. त्याप्रमाणें त्यानें सुमारें चारशें वस्तूंवरील जकाती रद्द केल्या. त्यामुळें उत्पन्नांत येणारी तूट भरून काढण्याकरितां त्यानें चहा व साखर यांच्यावरील जकाती वाढविल्या व प्राप्तीवरील कर पूर्वी एका पौंडास नऊ पेन्स होता तो दहा पेन्स केला (१८६०). पुढें यांतही हळूहळू फरक करीत त्यानें सन १८६५ सालीं प्राप्तीवरील कर पौंडास चार पेन्स केला व चहा-वरील जकातही कमालीची उतरविली. सन १८६० मध्यें वर्तमानपत्रांना लागणाऱ्या कागदावरील जकात रद्द करण्यासंबंधीं ग्लॅडस्टननें पार्लमेंटमध्यें बिल मांडलें. कॉमन्ससभेनें तें पास केलें; परंतु उमरावमंडळानें तें नापास केलें. त्यामुळें कॉमन्ससभा संतापली व उमरावसभेनें आपल्या अधिकारावर अतिक्रमण केलें आहे असें कॉमन्ससभेचे सभासद म्हणूं लागले. त्यामुळें कॉमन्ससभा व उमरावमंडळ यांच्या अधिकाराबद्दल खडाजंगी माजली. परंतु त्यांत कॉमन्ससभेला हार खावी लागल्यानें सन १८६१ मध्यें ग्लॅडस्टननें तो कर उठविल्याचें वार्षिक अंदाजपत्रकांतच मोठ्या चातुर्यानें दाखविलें. त्यामुळें उमरावमंडळाचा तिळपापड झाला. अंदाजपत्रक पास करावें तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कागदावरील जकात आपोआप रद्द होणार; न करावें तर आपली नाचक्की होऊन पुन्हां भांडण व देशांत खळबळ होणार, असें उमरावमंडळाला वाटलें. शेवटीं त्या मंडळानें तें अंदाजपत्रक पास केलें. कागदावरील जकात अशा तऱ्हेनें रद्द झाल्यानें देशांत खुला व्यापार पूर्णत्वानें सुरू झाला असें मानण्यांत येतें. त्याचप्रमाणें त्यायोगें वर्तमानपत्रें स्वस्त होऊं लागून तीं लोकांस सहज वाचण्यास मिळूं लागलीं. याच सुमारास व्हिक्टोरिया राणीचा नवरा प्रिन्स आलबर्ट मृत्यु पावला (१८६१).

१४. परराष्ट्रीय धोरण—(१) **इटली**—सन १८४८ सालीं इटलींतील ऑस्ट्रियाचें वर्चस्व झुगारून देऊन इटलीच्या एकीकरणास सुरुवात झाली होती. प्रसिद्ध इटालियन देशभक्त जोसेफ मॅझिनी त्या चळवळीचा प्रमुख पुढारी होता. सार्डीनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युअल व त्याचा प्रधान काऊंट काव्हूर यांनींही त्या दृष्टीनें खटपट चालविली होती. त्यानें आपल्या प्रजेस बरेच राजकीय हक्क देऊन लोकांना आपल्या विश्वासांत घेतलें. मात्र इटलींतील इतर सात संस्थानांमध्यें राजकीय चळवळ चालू असूनही त्यांना राजकीय हक्क मिळाले नव्हते. त्यामुळें तेथें लोकक्षोभ उत्पन्न झाला. सन १८५९ मध्यें फ्रान्सचा बादशाह लुई नेपोलियन यानें व्हिक्टर इमॅन्युअल याच्याशीं मैत्रीचा तह केला व ऑस्ट्रियाविरुद्ध मदत करण्याचें अभिवचन दिलें. युद्ध सुरू झालें; परंतु थोड्याच दिवसांत तह झाला. त्यानंतर लोंबार्डी, पार्मा, बोलोना, मोडेना, टस्कनी वगैरे संस्थानांनीं इमॅन्युअलचें स्वामित्व पत्करून तीं त्याच्या राज्यांत सामील झालीं. सन १८६० मध्यें त्याचा मुख्य सेनापति गॅरिबॉल्डी यानें नेपल्स संस्थान काबीज करून घेतलें व तें इमॅन्युअलच्या राज्यास जोडलें. सन १८६१ मध्यें व्हिक्टर इमॅन्युअल इटलीचा राजा झाला व इटालियन पार्लमेंटनें त्या गोष्टीस आपली संमति दिली. पुढें सन १८६६ मध्यें ऑस्ट्रियानें व्हेनिस संस्थानावरील आपला ताबा सोडून दिला व त्यानंतर तें संस्थान व सन १८७० मध्यें पोपचें राज्यही इमॅन्युअलच्या राज्यांत समाविष्ट करण्यांत आलें. अशा तऱ्हेनें इटलीचें एकीकरण पूर्ण झालें व तें ऑस्ट्रियाच्या मगरमिठींतून कायमचें सुटलें. इटालीच्या एकीकरणाच्या प्रयत्नाकडे लॉर्ड पामर्स्टन मोठ्या सहानुभूतीनें पहात होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इटाली देश स्वतंत्र व्हावा म्हणून तो स्वतः तटस्थ राहिला व इतर राष्ट्रांनींही त्या बाबतींत पडूं नये म्हणून त्यानें दक्षता बाळगिली. (२) **जर्मनी**— इटलीप्रमाणेंच जर्मनीमध्येंही ऑस्ट्रियाचें वर्चस्व होतें. इटलीप्रमाणेंच जर्मनीमध्येंही बरींच संस्थानें होतीं. त्यांत प्रशियाचें संस्थान सर्वांत मोठें व सामर्थ्यवान् होतें. त्याच्या नेतृत्वाखालींच जर्मन संस्थानांच्या एकीकरणाचा प्रयत्न चालला होता व त्यांत यशही येत होतें. सन १८६१ मध्यें पहिला विल्यम प्रशियाचा राजा झाला. त्याचा मुख्य प्रधान प्रिन्स बिस्मार्क हा अत्यंत महत्त्वाकांक्षी व कारस्थानी मुत्सद्दी होता. जर्मनींतील ऑस्ट्रियाचें वर्चस्व झुगारून दिलेंच पाहिजे असें त्याला वाटे. सन १८६४ मध्यें ऑस्ट्रिया व प्रशिया यांचें बरेंच जमलें व त्यांनीं डेन्मार्कवर स्वारी करून श्लेस्विग व हॉल्स्टेन हे दोन प्रांत जिंकून घेतले. परंतु ते दोन्ही प्रांत प्रशियाच्याच ताब्यांत रहावेत अशी बिस्मार्कची इच्छा असल्यामुळें त्यानें ऑस्ट्रियाशीं युद्ध सुरू केलें. सन १८६६ मध्यें आपल्या लष्कराच्या जोरावर सॅडोआच्या लढाईंत प्रशियाचा सेनापति मोल्टक यानें मोठ्या शिताफीनें युद्ध करून ऑस्ट्रियाचा पराभव केला. त्यानंतर जर्मनींतील ऑस्ट्रियाचें वर्चस्व झुगारून देण्यांत येऊन प्रशियाच्या राजाचें वर्चस्व वाढलें. अशा रीतीनें ऑस्ट्रिया पेचांत असतांच हंगेरींतील लोकांनींही बंड केलें; परंतु त्यांनीं अखेरीस ऑस्ट्रियाच्या राजाला मान्यता दिल्यानें ऑस्ट्रियाचा बादशाह फ्रॅन्सिस जोसेफ याला हंगेरीचा राजा म्हणून राज्याभिषेक करण्यांत आला (१८६७). इटली व जर्मनी या देशांमधील घडामोडीमुळें ऑस्ट्रियाचें इतकीं वर्षें चालत आलेलें युरोपांतील वर्चस्व कायमचें नष्ट झालें. आपल्या लष्करी सामर्थ्याच्या जोरावर जर्मनी मात्र युरोपमध्यें महत्त्व व मान्यता पावला. जर्मनी व ऑस्ट्रिया यांनीं ज्यावेळीं डेन्मार्कशीं युद्ध सुरू केलें त्यावेळीं डेन्मार्कला मदत करावी अशी इंग्लंडच्या प्रधानमंडळाची उत्कट इच्छा होती. परंतु राणीचा ओढा प्रशियाकडे असल्यानें तिनें त्या गोष्टीस नकार दिला. इंग्लंडची मदत मिळणार या आशेवरच डेन्मार्कनें प्रशियाशीं दोन हात करण्याचें ठरविलें होतें; परंतु प्रत्यक्ष लढाईचे वेळीं इंग्लिश लोकांनीं वचनभंग करून डेन्मार्कला मदत केली नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळेंच प्रशियाचें फावलें; डेन्मार्क व इंग्लंड यांची मैत्री मात्र दुरावली. (३) **अमेरिका**—त्यावेळीं अमेरिकेंतील संस्थानांत उत्तरेकडील संस्थानें व दक्षिणेंतील संस्थानें असे दोन गट पडले होते. उत्तरेकडील संस्थानांत उद्योगधंदे व कारखाने जोरांत होते, तर दक्षिण संस्थानांत शेती उत्तम चाले. त्या दोन्ही गटांमध्यें धुसफूसही सारखी चालत होती व दक्षिण संस्थानें अमेरिकेपासून फुटून जाऊं पहात होतीं. त्याचप्रमाणें त्या दोन्ही गटांत गुलामगिरी नष्ट करण्याबद्दल बराच मतभेद माजून राहिला होता. दक्षिणेंतील संस्थानांत शेती हाच मुख्य धंदा असल्यानें तेथें गुलामगिरी कायमची होती व ती नष्ट होऊं नये असें त्यांचें मत होतें. त्यावेळीं ॲब्राहाम लिंकन हा अमेरिकेचा अध्यक्ष होता व अमेरिकेंतून गुलामगिरीचें कायमचें उच्चाटन व्हावें अशी त्याची इच्छा होती. शेवटीं दोन्ही गटांत यादवी युद्धास सुरुवात झाली. (१८६१–६५). त्या युद्धांत दक्षिण अमेरिकन संस्थानांचा पराभव झाला. युद्धानंतर अमेरिकेंतून गुलामगिरी पार नष्ट करण्यांत येऊन निग्रो गुलामांस स्वातंत्र्य मिळालें. मात्र सन १८६५ मध्यें अमेरिकेचा अध्यक्ष लिंकन याचा जॉन विल्कस बूथ या माथेफिरूनें, तो नाटक पहात असतां भर थिएटरमध्यें खून केला. अमेरिकन यादवी युद्धाच्या वेळीं इंग्लंड तटस्थ राहिलें तरी सरकारचा ओढा दक्षिण संस्थानांकडे होता; मजूर वर्गाचा ओढा उत्तरेकडील संस्थानांकडे होता. (४) **अल्बामा प्रकरण**—याच युद्धाच्या वेळीं उत्पन्न झालें होतें. अल्बामा या नांवाचें एक क्रूझर जहाज इंग्लंडनें दक्षिण संस्थानांच्या उपयोगाकरितां बांधलें. तें कोणाकरितां बांधलें जात होतें हें प्रथमतः प्रधानमंडळाला माहीतही नव्हतें. तेव्हां तें जहाज तयार झाल्यावर मालकाकडे रवाना करूं नये असा सरकारी हुकूम सुटला. परंतु तो हुकूम येण्यापूर्वींच तें जहाज इंग्लंडचा किनारा सोडून गेलें होतें. त्यानें अमेरिकन युद्धांत दक्षिण संस्थानांच्या बाजूनें भाग घेऊन दोन वर्षांत उत्तर-संस्थानांचीं सुमारें पंच्याहत्तर जहाजें पकडलीं. शेवटीं सन १८६४ मध्यें त्याला जलसमाधि देण्यांत आली. अल्बामामुळें आपलें अत्यंत नुकसान झालें, तेव्हां इंग्लंडनें त्याकरितां नुकसानभरपाई द्यावी अशी उत्तर संस्थानांनीं मागणी केली. इंग्लंडनें तटस्थपणाचा भंग केला असाही इंग्लंडवर आरोप करण्यांत आला. इंग्लंडनें दोन्ही गोष्टी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाकारल्या नाहींत. परंतु सर्व प्रकरण लवादमंडळापुढें मांडावें असें सुचविलें. त्याप्रमाणें सन १८७२ मध्यें लवादमंडळ नेमलें गेलें. या लवादमंडळानें सर्व गोष्टींची छाननी करून इंग्लंडनें सुमारें एकतीस लक्ष पौंड अमेरिकेला नुकसान-भरपाई द्यावी असा निकाल दिला. ग्लॅडस्टन मुख्य प्रधान असतां लवाद-मंडळाचा निकाल त्यानें मान्य केला व त्याप्रमाणें अमेरिकेस पैसे देण्याचें त्यानें कबूल केलें. मात्र त्यामुळें त्याच्यावर बरीच टीका झाली. अल्बामाप्रकरणा-प्रमाणेंच 'ट्रेंट प्रकरणही' त्यावेळीं गाजलें. त्यावेळीं ट्रेंट नामक इंग्लिश जहाजावरून दक्षिण संस्थानांचे दोन प्रतिनिधि युरोपांत जात होते. ती गोष्ट उत्तर संस्थानांस कळली. तेव्हां त्यांच्या जहाजांनीं ट्रेंट जहाज भर समुद्रांत थांबवून त्यावरील दोघा प्रतिनिधींस अटक केली. आंतर्राष्ट्रीय कायद्याचें यामुळें उल्लंघन झालें असें म्हणून पामर्स्टननें उत्तर संस्थानांच्या या कृत्याचा निषेध केला (१८६२). फ्रान्सनेंही इंग्लंडची बाजू घेतली. त्यामुळें अमेरिकेशीं युद्ध जुंपणार असें सर्वांस वाटूं लागलें. तेव्हां राणीनें मध्यस्थी केली व युद्ध-प्रसंग टाळला; लिंकननें नंतर दोघा प्रतिनिधींस सोडून दिलें. (५) **फ्रान्स**— लुई नेपोलियन व पामर्स्टन यांचें बरेंच सख्य होतें. परंतु अलीकडे त्याला नेपोलियनबद्दल शंका उत्पन्न झाली होती. नेपोलियन बोनापार्टबद्दल पामर्स्ट-नला आदर नव्हता व त्याच्याप्रमाणेंच लुई नेपोलियनही इंग्लंडवर हल्ला करणार असें पामर्स्टनला वाटत होतें. त्यामुळें त्यानें इंग्लंडच्या दक्षिणेकडील प्रमुख भागांची तटबंदी करण्यास सुरुवात केली व इंग्लंडांत स्वयंसेवक दल उभारून त्यांत अनेकांची भरती केली. मात्र पामर्स्टनची शंका अस्थानीं ठरली. सन १८६० मध्यें इंग्लंडनें नेपोलियनशीं, कॉब्डेनच्यातर्फे, खुल्या व्यापाराच्या तत्त्वांस अनुसरून एक तह केला व परस्परांनीं आपल्या देशांत येणाऱ्या मालावरील जकाती उतरवाव्या असें ठरलें. या तहामुळें दोन्ही राष्ट्रांत सलोखा झाला. मात्र त्यामुळें नेपोलियनच्या लोकोप्रियतेस ओहोटी लागली; कारण फ्रान्स देश संरक्षित व्यापाराचा पुरस्कर्ता होता. (६) **पोलंड**—सन १८६३ त पोलंडमध्यें रशियाच्या सत्तेविरूद्ध बंड उत्पन्न झालें. त्या वेळीं इंग्लंडनें पोलिश लोकांबद्दल सहानुभूति दर्शवून त्यांस मदत करावयाचें वचन दिलें. त्या वचनावर विश्वास ठेवूनच पोलिश लोकांनीं बंड केलें होतें. परंतु इंग्लंडनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डेन्मार्कप्रमाणें या वेळींही वचनभंग करून त्या लोकास तोंडघशीं पाडलें. त्यामुळें त्यांना इंग्लंडचा संताप आला.

१५. रसेलचें दुसरें प्रधानमंडळ (१८६५–६६):—सन १८६५ सालीं पामर्स्टन मृत्यु पावला. लिबरल पक्षाचेंच बहुमत पार्लमेंटमध्यें असल्यानें लॉर्ड जॉन रसेल पुन्हां एकदां मुख्य प्रधान झाला. त्याचा जन्म सन १७९२ मध्यें झाला व सन १८१३ मध्यें तो पार्लमेंटमध्यें प्रथम निवडून आला. सन १८३१ मध्यें व्हिगपक्षातर्फे त्यानें पार्लमेंटच्या सुधारणेचें बिल मांडलें व मोठ्या हिंमतीनें तें पास करून घेतलें. त्यानंतर लॉर्ड मेलबर्नच्या प्रधानमंडळांत तो होता. सन १८४६–५२ पर्यंत तो मुख्य प्रधान होता. तो पुरोगामी मताचा होता. कॅथॉलिकांचें विमोचन त्याला मान्य होतें. खुल्या व्यापाराचाही तो पुरस्कर्ता होता. ज्यूंवरील धार्मिक निर्बंध दूर करण्याकरतां त्यानें अतिशय खटपट केली व त्यांत यश मिळविलें. राष्ट्रीयत्वाच्या चळवळीचा तो चाहता होता. आयर्लंडबद्दल त्याला सहानुभूति वाटे. परंतु तो कुढ्या मनाचा व फाजील विनयशील असल्यानें त्याचा प्रकाश फारसा पडत नसे. त्याचा तापट स्वभाव त्याच्या अनेक वेळां आंगलट आला. वक्ता म्हणून तो प्रसिद्ध नव्हताच. मात्र त्याचीं भाषणें प्रमाणबद्ध व स्पष्ट असत. दुसऱ्या वेळीं तो मुख्य प्रधान झाला, तेव्हां ग्लॅडस्टननें पार्लमेंटची सुधारणा करण्याकरितां पार्लमेंटमध्यें एक बिल मांडलें. परंतु तें कोणासही आवडलें नाहीं व तें नापास झालें. त्यामुळें रसेलनें राजीनामा दिला व कंझर्व्हेटिव्ह पुढारी लॉर्ड डार्बी यानें आपलें तिसरें प्रधानमंडळ बनविलें. लॉर्ड जॉन रसेल पुढें सन १८७८ मध्यें मरण पावला.

अभ्यास

१. पूर्वेकडील प्रश्न म्हणजे काय ? त्याचा पूर्वेतिहास सांगा. लॉर्ड पामर्स्टननें रशियाशीं कोणतें धोरण स्वीकारलें होतें ? कां ? त्याचा परिणाम काय झाला ?
२. तुर्कस्थानबद्दल रशिया, फ्रान्स, इंग्लंड व ऑस्ट्रिया यांचें धोरण काय होतें ?
३. क्रिमियन युद्धाचीं कारणें सांगा. त्या युद्धांत इंग्लंड व फ्रान्स हीं राष्ट्रें कां सामील झालीं ? त्या युद्धाचा परिणाम सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. लॉर्ड पामर्स्टनचें चरित्र व त्याच्या परराष्ट्रीय धोरणाचीं तत्त्वें थोडक्यांत सांगा.

५. लॉर्ड पामर्स्टनचें परराष्ट्रीय धोरण वर्णा.

६. खालीलसंबंधीं मुद्देसूद टिपणें करा.

अमेरिकन यादवी युद्ध, फ्लॉरेन्स नाइटिंगेल, अल्बामा प्रकरण, बॅला-क्लॅव्हा, ट्रॅट प्रकरण, ज्यूंचें विमोचन.

७. 'परराष्ट्रीय बाबतींत पामर्स्टन उदारमतवादी असला तरी इंग्लंडच्या बाबतींत तो प्रतिगामी धोरणाचा पुरस्कर्ता होता' या विधानाचें खंडन अथवा मंडन करा :—

कालादर्श १८५२–१८६७

प्रसिद्ध व्यक्ति	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	वर्ष	हिंदुस्थान–महत्त्वाच्या गोष्टी	युरोप–महत्त्वाच्या गोष्टी
	ॲबर्डीनचें प्रधानमंडळ	१८५२		
			हिंदुस्थानांत पहिली रेल्वे १८५३	रशिया–तुर्कस्थान युद्ध १८५३.
पामर्स्टन, ग्लॅडस्टन,	क्रिमियन युद्ध सुरू	१८५४		क्रिमियन युद्ध १८५४–५६
	पॅरिसचा तह.	१८५६	लॉर्ड कॅनिंग ग. ज.	
राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे,	चीनशीं दुसरें युद्ध.	१८५७	हिंदुस्थानांत बंड	
डिझरेली, डार्बी,	'ज्यूं'चें विमोचन	१८५८	ई. इं. कंपनी रद्द	
डार्विन, लिंकन,	कागदावरील जकात रद्द	१८६१		अमेरिकन यादवीयुद्ध
रस्किन, टेनिसन			लॉर्ड लॉरेन्स, व्हाइसरॉय १८६३–६९.	इटलीच्या एकीकरणाची चळवळ
		१८६४		डेन्मार्क-जर्मनी युद्ध.
		१८६६	ओढ्या प्रांतांत दुष्काळ	ऑस्ट्रिया-जर्मनी युद्ध.
	दुसरा सुधारणा कायदा	१८६७		

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. विल्यम एवर्ट ग्लॅडस्टन

१. पार्लमेंट सुधारण्याचा दुसरा कायदा (१८६७) :—रसेलनें राजीनामा दिल्यानंतर कंझर्व्हेटिव्ह पुढारी लॉर्ड डार्बी मुख्य प्रधान झाला व डिझ्रेली फडणीस झाला. या प्रधानमंडळांत डिझ्रेलीच प्रमुख होता. डार्बी फक्त नांवाचा मुख्य प्रधान होता. त्यावेळीं वाहत्या गंगेंत हात धुऊन घेण्याचें डिझ्रेलीनें ठरविलें होतें. लिबरल मंत्रिमंडळानें पार्लमेंटपुढें मांडलेलें बिल नापास झालें होतें व लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला तर पुन्हां तसलेंच बिल पुन्हां मांडल्याशिवाय तो पक्ष राहणार नाहीं असें डिझ्रेलीचें मत होतें. तेव्हां त्याच्या अगोदर आपणच तसलें बिल मांडावें असें त्यानें ठरविलें. मात्र त्या बाबतींत आपल्या पक्षांतील लोकांचीं मनें प्रथम त्यानें मोठ्या मुष्कीलीनें वळविलीं होतीं. शेवटीं सन १८६७ मध्यें त्यानें आपलें बिल पार्लमेंटपुढें मांडलें. व्हिग पक्षाचा पुढारी ग्लॅडस्टन यानें त्यांत अनेक दुरुस्त्या सुचविल्या व त्या सर्वांस डिझ्रेलीनें मान्यता दिल्यानें अखेरीस तें बिल पास झालें. त्या बिलानें खालील गोष्टी ठरविल्या. (१) अकरा शहरांचा प्रत्येकीं दोन प्रतिनिधि पाठविण्याचा व तेवीस शहरांचा प्रत्येकीं एक प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार काढून घेण्यांत आला व अशा तऱ्हेनें रिकाम्या झालेल्या जागा लंडन, मँचेस्टर, लिव्हरपूल, बर्मिंगहॅम, लीड्स वगैरे मोठमोठ्या शहरांना देण्यांत आल्या. (२) मतदानाच्या बाबतींतही बराच फरक करण्यांत आला. शहरांतील सर्व घरमालकांस व वार्षिक दहा पौंड भाडें देणाऱ्या भाडेकऱ्यांस मतदानाचा अधिकार मिळाला. त्याचप्रमाणें बारा पौंड वार्षिक खंड भरणाऱ्या खंडकऱ्यास तो अधिकार मिळाला. (३) विश्वविद्यालयांस स्वतंत्रपणें प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार मिळाला. अशा रीतीनें या कायद्यानें लोकशाहीचें पाऊल पुढें पडून पार्लमेंटसभा अधिक लोकमतनिदर्शक बनली. शहरांतील कारागीर, दुकानदार, भाडेकरी वगैरेंना मताधिकार मिळाला; त्याचप्रमाणें खेड्यांतील छोट्या शेतकऱ्यांनाही तो मिळाला. यामुळें राजकीय चळवळीचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केंद्र बदललें. कामकरीवर्गांतील लोक मताधिकाराबद्दल चळवळ करूं लागले. स्त्रियांना मताधिकार देण्याचा प्रश्न पुढें आला होता; पण तो फेटाळण्यांत आला. हें बिल पुष्कळ कंझर्व्हेटिव्ह लोकांनाही आवडलें नाहीं व खुद्द लॉर्ड डार्बीनें 'अंधारांतील उडी' या शब्दांनीं या सुधारणा-कायद्याचें वर्णन केलें. यानंतर डार्बीनें प्रकृतिस्वास्थ्यासाठीं राजीनामा दिल्यानें डिझरेली मुख्य प्रधान झाला.

२. डिझरेलीचें पहिलें प्रधानमंडळ (१८६८):—स्मिथ ओब्रायनच्या नेतृत्वाखालील अत्याचारी चळवळ दडपून टाकण्यांत आल्यावर अनेक आयरिश लोक अमेरिकेंत गेले होते व त्यांनीं तेथील यादवी युद्धांतही भाग घेतला होता. तेथेंच त्यांनीं 'फीनियन सोसायटी' ही संस्था स्थापन केली. आयर्लंडला स्वातंत्र्य मिळवून देणें हें त्या सोसायटीचें ध्येय होतें. त्यांनीं अत्याचारी चळवळीला प्रोत्साहन दिलें. न्यूयॉर्क हें त्यांचें मुख्य ठिकाण व तेथूनच त्यांच्या चळवळीचीं सर्व सूत्रें हलविलीं जात. खुद्द आयर्लंडमध्येंही त्यांनीं आपली चळवळ जोरांत चालविली. तेव्हां सन १८६६ त ब्रिटिश सरकारनें दडपशाही सुरू केली. त्यामुळें अनेक फीनियन लोक अमेरिकेंत पळून गेले. सन १८६७ सालीं त्या लोकांनीं एक मोठें बंड आयर्लंडमध्यें केलें. जेम्स स्टीफन्स बंडवाल्यांचा पुढारी होता. बंडाचा बीमोड ताबडतोब करण्यांत आला. खुद्द इंग्लंडमध्येंही त्या लोकांनीं अनेक दंगे केले; परंतु ते सर्व मोडण्यांत आले. आयर्लंडबद्दल डिझरेलीला सहानुभूति कधींच वाटली नाहीं. दडपशाही करून आयर्लंडांत शांतता राखण्याचा त्याचा प्रयत्न होता.

३. कानडासंबंधीं कायदा (१८६७):—सन १८४० सालीं कानडाला संयुक्त पार्लमेंट मिळालें होतें. तरीही तेथील भांडणें थांबलेलीं नव्हतीं. फ्रेंच व इंग्रज वसाहतवाले आपापसांतील द्वेषभाव अजूनही विसरले नसल्यानें त्यांच्यांत नेहमींच धुसफूस चाललेली होती. कानडाची वाढही झपाट्यानें होत होती. वसाहतवाल्यांनीं कानडाचा पश्चिमेकडील भाग संशोधून तेथेंही वसाहती स्थापण्यास सुरुवात केल्यानें व्हँकूव्हरपर्यंत कानडा पसरला होता. यामुळें हा नवीन भाग संयुक्त पार्लमेंटच्या वर्चस्वाखालीं आणणें जरूरीचें झालें होतें. तेव्हां सन १८६७ सालीं कानडासंबंधीं नवा कायदा पास करण्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आला. त्याप्रमाणें कानडाचे पूर्वीचे दोन्ही भाग रद्द करण्यांत येऊन कानडांत संयुक्त सरकार स्थापन करण्यांत आलें. ॲंटेरियो व क्वीबेक या पूर्वीच्या प्रांतांत नोव्हास्कोशिया, न्यूब्रन्सविक वगैरे भाग वरील योजनेप्रमाणें सामील करण्यांत आले. संयुक्त सरकारला दोन मध्यवर्ती कायदेमंडळें देण्यांत येऊन त्यांच्यातर्फे कानडाचा राज्यकारभार चालविण्यांत यावा असें ठरलें; व कानडामध्यें एक गव्हर्नर जनरल नेमण्यांत येऊं लागला. ही व्यवस्था अजूनही कानडामध्यें आहे. पुढें निरनिराळे प्रांत या राज्यव्यवस्थेखालीं येऊं लागले. प्रत्येक प्रांताचा कारभारही गव्हर्नर व कायदेमंडळें यांच्या तंत्रानें चालूं लागला.

४. ग्लॅडस्टनचें पहिलें प्रधानमंडळ (१८६८–७४) :—सन १८६८ मध्यें पार्लमेंटची निवडणूक होऊन कंझर्व्हेटिव्हपक्षाचा पराभव झाला व लिबरल पक्ष बहुमतानें निवडून आल्यानें त्या पक्षाचा पुढारी ग्लॅडस्टन मुख्य प्रधान झाला. नुकतेंच सन १८६७ सालीं पार्लमेंटच्या सुधारणेचें दुसरें बिल पास झालें होतें. सन १८३२ च्या कायद्यानंतर अनेक प्रकारच्या सुधारणा झाल्या, तशा सुधारणा नव्या कायद्यानंतरही होऊं घातल्या होत्या व त्या करण्याचें काम ग्लॅडस्टनच्या प्रधानमंडळानें केलें. इंग्लंडचें धर्मपीठ, सरकारी खात्यांत काटकसर, आयर्लंडचें समाधान व शांततेची स्थापना करून लोकांस सुख देणें या चार गोष्टींकडे ग्लॅडस्टनला विशेष लक्ष पुरवावयाचें होतें. मुख्य प्रधान झाल्यावर ग्लॅडस्टननें या सर्व गोष्टींकडे लक्ष पुरवून बरेंच यश मिळविलें. त्याच्या प्रधानमंडळांत रॉबर्ट लो हा फडणीस होता, क्लॅरेंडन परराष्ट्रमंत्री होता, फॉर्स्टर शिक्षणमंत्री होता व कार्डवेल युद्धमंत्री होता. याशिवाय जॉन ब्राइट, ग्रेनव्हिल, लॉर्ड किंबर्ले वगैरे मुत्सद्द्यांचा त्याच्या प्रधानमंडळांत समावेश झालेला होता. परंतु या प्रधानमंडळांत उत्तमोत्तम मुत्सद्दी नव्हते असें त्या वेळच्या लोकांचें म्हणणें होतें.

विल्यम ग्लॅडस्टन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. विल्यम एवर्ट ग्लॅडस्टन (१८०९-१८९८):—विल्यम एवर्ट ग्लॅडस्टन याचा जन्म सन १८०९ मध्यें लिव्हरपूल येथें एका श्रीमंत व धर्मशील व्यापाऱ्याच्या पोटीं झाला. ईटन व ऑक्सफर्ड येथें उत्तम अभ्यास करून पहिल्या प्रतीचा विद्यार्थी अशी त्यानें कीर्ति मिळविली होती. सन १८३२ मध्यें तो कंझर्व्हेटिव्हपक्षातर्फे पार्लमेंटमध्यें प्रथम निवडून आला व तो पीलचा अनुयायी बनला. सन १८४१ मध्यें पीलच्या प्रधानमंडळांत व्यापारीखात्याचा तो उपमंत्री होता. धान्याचा कायदा रद्द झाला, त्या वेळीं कंझर्व्हेटिव्हपक्षांत फूट पडली व पीलच्या अनुयायांचा स्वतंत्र गट झाला. त्यांत ग्लॅडस्टन होता. त्या गटानें पुढें पुढें लिबरल पक्षाशीं सहकार्य करण्याचें धोरण स्वीकारलें व तो गट लिबरलपक्षांत विलीन झाला. त्यामुळें ग्लॅडस्टनही लिबरल म्हणून ओळखला जाऊं लागला. लॉर्ड ॲबरडीन, पामर्स्टन व रसेल यांच्या प्रधानमंडळांत त्यानें फडणिशीखातें सांभाळलें होतें. उत्कृष्ट फडणीस म्हणून त्याची त्या वेळीं फारच प्रसिद्धी झाली. त्या वेळचीं त्याचीं अंदाजपत्रकें कांहीं कांहीं बाबतींत अत्यंत क्रांतिकारक ठरलीं. खुल्या व्यापाराचा तो पुरस्कर्ता होता व आपल्या हयातींत त्यानें इंग्लंडमध्यें खुल्या व्यापाराला प्रोत्साहन दिलें. एवढेंच नव्हे तर संरक्षित व्यापाराची त्यानें पूर्णपणें हकालपट्टी केली. आर्थिक प्रश्नांची तो इतक्या कुशलतेनें उकल करीत असे कीं, लोकांनीं तोंडांत बोटें घालावीं! त्याचें वक्तृत्व असामान्य होतें. त्याची रसवंती सहज व लीलेनें स्रवूं लागली व त्याच्या तोंडांतून वेचक शब्द अत्यंत मनोहर व रसाळ वाणीनें बाहेर पडूं लागले म्हणजे सर्व लोक मंत्रमुग्ध नागाप्रमाणें डोलूं लागत. तो पट्टीचा वाग्भट होता. प्रतिपक्षावर अचूक मारा करण्यांत तो कुशल असल्यानें त्याचे प्रतिस्पर्धी त्याला वचकून असत. पार्लमेंटमधील वादविवादांचा दर्जाही त्यानें वाढविला. प्रतिस्पर्ध्यांशीं दोन हात खेळण्यापासून त्याला अत्यंत आनंद होई. त्याचे मुद्दे समर्पक व परिणामकारक असल्यानें व ते अत्यंत स्पष्ट शब्दांत व अंतःकरणापासून मांडले गेल्यानें त्याचे प्रतिस्पर्धी चीत होत. त्याची धर्मप्रवण वृत्ति त्याच्या राजकारणांतही नेहमीं दृष्टीस पडे. त्याचें ऋजु अंतःकरण गरिबांच्या हालांनीं गहिंवरून येई. त्याची राहणी अत्यंत साधी होती. लहानसहान प्रश्नांचाही तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठ्या गंभीरपणानें विचार करून कार्यप्रवण होत असे. त्याची चिकाटी इतकी दांडगी होती कीं एकदां हातीं घेतलेलें काम, संकटांस न जुमानतां, तडीस नेल्याशिवाय तो कधींही रहात नसे. तो धैर्याचा मेरूमणी होता, माणसाची त्याला पारख होती व वाङ्मयाचा तो मरेपर्यंत उपासक होता. त्याचें परराष्ट्रीय धोरण धडाडीचें नव्हतें व त्याला समाजास प्रसन्न ठेवतां येत नसे. हे दोष सोडल्यास एकोणिसाव्या शतकांतील तो एक उत्तम मुत्सद्दी होता यांत शंका नाहीं.

६. ग्लॅडस्टन व आयर्लंड :—ग्लॅडस्टनला आयर्लंडबद्दल अत्यंत सहानुभूति वाटत होती. तेव्हां मुख्य प्रधान झाल्यावर त्यानें प्रथमतः आयर्लंडचा प्रश्न हातीं घेतला. आयर्लंडमधील प्रॉटेस्टंट धर्मखातें आयरिश लोकांस आवडत नव्हतें. आयर्लंडमधील बहुसंख्य लोक कॅथॉलिक पंथाचे होते; व त्यांच्याकडून कर घेऊन त्यांतूनच प्रॉटेस्टंट धर्मखात्याचा खर्च चालविण्यांत येई. त्यामुळें मूठभर प्रॉटेस्टंटांकरितां इंग्लंडनें चालविलेल्या या धर्मखात्याविरुद्ध आयरिश लोक एकसारखी चळवळ करीत. तें खातें रद्द व्हावें अशी त्यांची मागणी होती. ही गोष्ट लक्षांत घेऊन सन १८६९ मध्यें ग्लॅडस्टननें एक कायदा पास करून आयर्लंडमधील प्रॉटेस्टंटधर्मखातें रद्द केलें; व त्याला मिळणारी सरकारी मदतही थांबविली. सन १८७० मध्यें आयर्लंडमधील 'जमिनीसंबंधीं कायदा' करण्यांत आला. आयर्लंडांतील जमिनी इंग्रज प्रॉटेस्टंट जमीनदारांच्या मालकीच्या होत्या. त्यामुळें आयरिश लोकांस त्यांच्यामुळें अत्यंत जाच सोसावा लागे. आयरिश शेतकऱ्यांना जमीनदारांस दरसाल खंड द्यावा लागे, पदरचे पैसे खर्च करून शेतांत निरनिराळ्या सुधारणा कराव्या लागत व वेळेनुसार मालकाची मर्जी सांभाळतां न आल्यास त्याच्या मर्जीस येईल त्या वेळीं, खंड दिला असो नसो, त्याला शेत सोडून जावें लागे. शेत सोडून गेल्यास त्यानें स्वतःचे पैसे खर्च करून शेतांत ज्या सुधारणा केल्या असतील अगर इमारती बांधल्या असतील त्याबद्दल त्याला एक कपर्दिकही मिळत नसे. यामुळें आयरिश शेतकऱ्यांचें जीवन अत्यंत त्रासाचें व कष्टाचें झालें होतें. जमीनदार आयर्लंडमध्यें कधींच रहात नसत. ते दूर कोठेंतरी राहून आपल्या गुमास्त्यांतर्फे आपल्या शेतांची व्यवस्था करीत. हे गुमास्ते शेतक-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऱ्यांस पिळून काढीत. त्यामुळें आयर्लंडमध्यें जमीनदारांविरुद्ध असंतोष माजला होता; व चळवळीच्या रूपानें त्याला वाचाही फुटली होती. ही स्थिति लक्षात घेऊनच ग्लॅडस्टननें वरील कायदा पास केला. त्या कायद्यानें खालील गोष्टी ठरविल्या. (१) जमीनदारानें शेतकऱ्यास काढून टाकल्यास, शेती सुधारण्याकरितां शेतकऱ्यानें जो पैसा खर्च केला असेल तो जमीनदारानें त्याला दिला पाहिजे. (२) वेळेवर खंड दिला असूनही मालकानें शेतकऱ्यास काढून टाकलें तर शेतकऱ्यास मालकानें नुकसानभरपाई दिली पाहिजे. (३) कोणाही शेतकऱ्यास जमीन विकत घेण्याची परवानगी असावी व त्याकरितां त्याला कर्ज लागल्यास तें सरकारनें द्यावें. या कायद्यानें आयरिश शेतकऱ्यांचें फारसें समाधान झालें नाहीं. कारण जमीनदार जबर खंड घेत. त्याला त्या कायद्यानें आळा घातला गेला नाहीं व त्यामुळें जमीनदार अनेक शेतकऱ्यांस कामावरून दूर करूं लागले. यामुळें आयर्लंडांत जास्तच असंतोष माजला.

७. शिक्षणासंबंधीं सुधारणा (१८७०–७१) :—यापूर्वी लोकांस शिक्षण देणें ब्रिटिश सरकार आपलें कर्तव्य मानीत नसल्यानें इंग्लंडमध्यें सरकारीरीत्या लोकांच्या शिक्षणाची कोणत्याही प्रकारची सोय नव्हती. खाजगी शाळा व 'पब्लिक स्कूल्स' या संस्थांतून लोकांस–त्यांतल्या त्यांत श्रीमंतांच्या मुलांस–शिक्षण मिळे तेवढेंच. सार्वत्रिक शिक्षण नव्हतेंच. ही स्थिति सुधारण्याकरितां ग्लॅडस्टननें सन १८७० सालीं 'प्राथमिक शिक्षणासंबंधीं कायदा' पास केला. शिक्षणमंत्री फॉर्स्टर यानें हा कायदा पास करून घेण्यांत फार खटपट केली. त्या कायद्यानें खालील गोष्टी ठरविल्या. (१) प्रत्येक परगण्यांत 'स्कूलबोर्ड' स्थापण्यांत यावें व त्यानें आपल्या परगण्यांतील पांच ते बारा वर्षांच्या मुलांच्या शिक्षणाकरितां शाळा स्थापाव्या. (२) हें शिक्षण स्वस्त असावें, पण मोफत नसावें. एक तृतीयांश खर्च सरकारनें द्यावा, एक तृतीयांश स्कूल बोर्डानें कराच्या रूपानें उभारावा व एक तृतीयांश फीच्या रूपानें उत्पन्न करावा. (३) स्कूलबोर्डांना शिक्षणांकरितां अल्पसा कर बसविण्याचा अधिकार असावा. (४) बोर्डांनीं हें शिक्षण वाटल्यास सक्तीचें करावें. (५) गरिबांच्या वस्तींतील मुलांस हें शिक्षण मोफत असावें. हा कायदा पास झाल्यानें सार्वत्रिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षणाची सोय झाली, तरी शिक्षण महाग होऊं लागलें, धर्मगुरू असंतुष्ट झाले व सक्ति होई ती सार्वत्रिक होईनाशी झाली. असें असलें तरी शिक्षणाचें पाऊल पुढें पडण्यास मदत झाली यांत शंका नाहीं. 'मतदारांस सुशिक्षित करण्याचा प्रयत्नही' यशस्वी होऊं लागला. सन १८७१ मध्यें ग्लॅडस्टननें आणखी एक कायदा पास करून ऑक्सफर्ड व केंब्रिज या विश्वविद्यालयांत सर्व धर्मांच्या व मतांच्या विद्यार्थ्यांस प्रवेश मिळावा असें ठरविलें. पूर्वी फक्त प्रॉटेस्टंट एपिस्कोपेलियनासच त्या विश्वविद्यालयांच्या पदव्या देण्यांत येत. हा कायदा पास झाल्यानें इंग्लंडांतील धर्मस्वातंत्र्य पूर्णपणें अस्तित्वांत आलें असें मानण्यांत येतें.

८. लष्करविषयक सुधारणा (१८७१-७२):—एडवर्ड कार्डवेल त्या वेळीं युद्धमंत्री होता. त्यानें लष्करासंबंधीं सुधारणा करण्याचा प्रयत्न केला व त्यांत यश मिळविलें. ब्रिटिश लष्कराचा अव्यस्थितपणा अनेक वेळां सरकारच्या निदर्शनास आला होता. क्रिमियन युद्ध व हिंदुस्थानांतील सत्तावन सालचें बंड या वेळीं तो जास्त प्रत्ययास आला. त्याच वेळीं प्रशियानें उत्कृष्ट सैन्य तयार करून ऑस्ट्रियाचा पराभव केला होता व आज ना उद्यां प्रशिया इंग्लंडवर स्वारी करील अशी लोकांस भीति वाटत होती. तेव्हां लष्कराची सुधारणा करणें आवश्यक आहे असें कार्डवेलनें ठरविलें. शिवाय त्या वेळीं म्हातारे होईपर्यंत सैनिक लष्करांत रहात व त्यामुळें ताज्या दमाचें सैन्य न मिळाल्यानें लष्करी कामें योग्य तऱ्हेनें होत नसत. लष्करांतील अधिकाराच्या जागा पैशानें विकत घेतल्या जात, योग्यतेवर त्या ठरविल्या जात नसत. मुख्य सेनापति हा युद्धमंत्र्याच्या हाताखालीं काम करीत नसे व त्यामुळें त्याच्यावर युद्धमंत्र्याचा मुळींच दाब नसे. ही सर्व स्थिति सुधारण्याकरितांच सन १८७१ मध्यें कार्डवेलनें 'लष्करविषयक कायदा' पार्लमेंटमध्यें पास करून घेतला. त्या कायद्यानें खालील गोष्टी ठरविल्या. (१) मुख्य सेनापतीवर युद्धमंत्र्याची हुकमत चालावी. यामुळें सैन्यावर पार्लमेंटची हुकमत सुरू झाली; कारण युद्धमंत्री पार्लमेंटला जबाबदार असे. (२) खड्या नोकरीची मुदत बारा वर्षांची असावी. त्यापैकीं सहा वर्षें त्यानें प्रत्यक्ष लष्करांत नोकरी करावी व सहा वर्षें राखीव सैन्यांत करावी. यामुळें राखीव सैन्य शिल्लक राहून ताज्या दमाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लष्कर सदैव तयार होऊं लागलें. (३) लष्करांतील अधिकाऱ्याच्या जागा विकण्यांत येऊं नयेत. हें कलम पार्लमेंटला मान्य न झाल्यानें राणीनें 'जाहीरनामा' लावून तें पास केलें. या सुधारणा झाल्यानें लष्कराची कार्यक्षमता वाढली. लष्करावर राणीचा ताबाही दुसऱ्या एका बिलानें मान्य केला गेला.

९. आरमारासंबंधीं सुधारणा:—वाफेच्या यंत्रांचा शोध लागल्या-पासून आरमारांतील जहाजांकरितां त्यांचा उपयोग करण्यांत यावा असे लोकांस वाटे; परंतु आरमारी अधिकाऱ्यांस ती गोष्ट पटत नसे. पूर्वींचीं शिडांचीं जहाजेंच आरमारी लढाईला जास्त उपयुक्त होत, असें त्यांचें मत होतें. कारण वाफेचीं जहाजें सुरू केल्यास त्यांना योग्य वेळीं कोळसा मिळणार नाहीं असें त्यांस वाटत होतें. शेवटीं आरमारीखात्यानें पोलादी जहाजें तयार करण्याचें ठरवून त्यांत वाफेचीं यंत्रें बसविण्यास सुरुवात केली व त्यांवर लांब पल्ल्याच्या तोफाही ठेवण्यांत येऊं लागल्या. यामुळें हीं जहाजें शत्रूच्या माऱ्याच्या टप्प्यांत सहजासहजीं येईनाशी झालीं. सन १८७० पासून या सुधारणेस सुरुवात झाली होती.

१०. इतर सुधारणा:—सन १८७२ मध्यें गुप्तमतदानासंबंधीं कायदा पास करण्यांत आला. मतदान उघडपणें झाल्यास लांचलुचपतीचे व धाक-दपटशाचे प्रकार वाढतात व निवडणुकीच्या वेळीं हुल्लड माजते असें लिबरल पक्षाचें म्हणणें होतें. त्यामुळें निवडणूक निःपक्षपातपणानें होत नसे. गुप्तमतदान पद्धति सुरू झाल्यानें वरील प्रकार बंद होण्यास मदत झाली. सन १८७१ सालीं मजूरसंघास सरकारी मान्यता देण्याकरितां 'मजूरसंघासंबं-धाचा कायदा' पास करण्यांत आला. यामुळें मजुरांच्या हिताचें संरक्षण होण्यास मदत झाली. मजूरसंघाच्या पैशाची अफरातफर केल्यास त्या संघाच्या अधिकारी वर्गावर फिर्यादी करून त्यांस शिक्षा करण्याचाही अधिकार वरील कायद्यानें मजुरांस मिळाला. सन १८७२ मध्यें 'परवाना कायदा' पास झाला. या कायद्यानें दारूचे गुत्ते केव्हां उघडावे व केव्हां बंद करावे हें ठरवून देऊन कलालांस विवक्षित ठिकाणीं-दारूचे गुत्ते उघडण्यासाठीं परवाने दण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेटला देण्यांत आला. सन १८७० मध्यें एक कायदा पास करून सनदी नोकरींतील सर्व जागा परीक्षांच्या निकालांवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व गुण व लायकी यांच्यावर देण्यांत याव्यात असें ग्लॅडस्टननें ठरविलें. मात्र परराष्ट्र कचेरींतील जागा सर्वांस मोकळ्या ठेवण्यांत आल्या नाहींत. सन १८७३ मध्यें आयरिश कॅथॉलिकांकरितां एक स्वतंत्र युनिव्हर्सिटी स्थापन करण्याकरितां त्यानें एक बिल पार्लमेंटमध्यें मांडलें होतें; परंतु तें नापास झालें. त्यामुळें त्यानें राजीनामा दिला. परंतु विरोधी पक्षाचा पुढारी बेंजामिन डिझरेली यानें प्रधानमंडळ बनविण्याचें नाकारल्यानें ग्लॅडस्टन पुन्हां मुख्य प्रधान झाला. त्या वेळीं त्यानें सन १८७३ मध्यें इंग्लंडांत एक वरिष्ठ कोर्ट स्थापण्याचा कायदा पास केला. हें कोर्ट स्थापन झाल्यानें इंग्लंडमधील न्यायालयांचें संघटन झालें व कायदा व न्याय या शाखा भिन्न झाल्यानें न्यायदान लौकर होऊं लागलें.

११. ग्लॅडस्टनचें परराष्ट्रीय धोरण :—ग्लॅडस्टन मुख्य प्रधान असतां त्यानें युरोपांतील चळवळींकडे जवळ जवळ दुर्लक्षच केलें. जात्या तो शांतता-वादी असल्यानें युरोपच्या बाबतींत त्यानें अलिप्तपणाचेंच धोरण स्वीकारलें. यामुळें त्याचें सर्व लक्ष इंग्लंडच्या अंतर्गत सुधारणांकडेच लागल्यानें त्याचें परराष्ट्रीय धोरण धडाडीचें झालें नाहीं. अर्थात पामर्स्टनमुळें वाढलेल्या इंग्लंडच्या वैभवास ग्लॅडस्टनच्या धोरणामुळें बराच धक्का बसला. (१) सन १८७० मध्यें फ्रान्स व जर्मनी यांच्यामध्यें युद्ध झालें व त्यांत फ्रान्सचा पूर्णपणें पराभव झाला. स्पेनच्या गादीवर फ्रान्स व प्रशिया यांच्यामध्यें वाद उत्पन्न झाला होता. त्या वेळीं प्रशियाची सत्ता वाढत होती व ती फ्रान्सचा बादशाह लुई नेपोलियन याला खपत नव्हती. शिवाय प्रशियानें डेन्मार्क व ऑस्ट्रिया यांचा पराभव केला होता; त्याचेंही शल्य त्याच्या मनांत सलत होतें. यामुळेंच फ्रान्स व प्रशिया यांच्यामध्यें स्पेनच्या गादीबद्दलचा चाललेला तंटा विकोपास गेला; व प्रशियन प्रधान प्रिन्स बिस्मार्क याच्या खोडसाळपणामुळें सन १८७० मध्यें युद्धास सुरुवात झाली. शेवटीं सेडन येथें घनघोर लढाई होऊन फ्रेंचांचा पूर्णपणें पराभव झाला. नेपोलियननें राज्यत्याग करावा व फ्रान्समध्यें प्रजा-सत्ताक राज्य स्थापण्यांत यावें असें तहानें ठरलें. या विजयानें प्रशियाची शक्ति जर्मनींत सर्वश्रेष्ठ ठरली व त्याच्या नेतृत्वाखालीं सर्व जर्मन संस्थानांचें एकीकरण होऊन प्रशियाचा राजा जर्मनीचा पहिला बादशाह झाला (१८७१).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मात्र या युद्धाचें शल्य फ्रेंच लोकांच्या मनांत एकसारखें सलत राहिलें; कारण त्यांचे आल्सेस व लोरेन हे प्रांत जर्मनीनें आपल्या ताब्यांत घेतले होते. या युद्धाच्या वेळीं इंग्लंड तटस्थ राहिलें होतें. मात्र बेल्जमच्या तटस्थपणाचा दोन्ही राष्ट्रांकडून भंग होणार नाहीं अशी ग्लॅडस्टननें दक्षता बाळगली होती. (२) फ्रान्स व जर्मनी यांचें युद्ध चालू असतांच काळ्या समुद्रांत रशियानें गडबड सुरू केली; व सन १८५६ सालीं झालेला पॅरिसचा तह धुडकावून देण्याची धमकी दिली. तेव्हां सन १८७१ मध्यें लंडनला एक सभा भरविण्यांत येऊन काळ्या समुद्रांत लढाऊ जहाजें ठेवण्याची रशियाला परवानगी देण्यांत आली व तुर्कस्थानानें डार्डानेल्स व बास्फोरस या सामुद्रधुन्यांमधून आपल्या मित्रराष्ट्रांचीं लढाऊ जहाजें जाऊं द्यावीं असें ठरलें. ग्लॅडस्टनच्या प्रधान-मंडळानें रशियाला सवलती दिल्या हे अनेकांना आवडलें नाहीं. (३) फ्रान्स व प्रशिया यांचें युद्ध चालू असतांच इटालियनांनीं पोपच्या ताब्यांतील रोमवर स्वारी केली व तें शहर हस्तगत केलें. त्यामुळें पोपची सत्ता संपुष्टांत आली, व इटलीं-तील सर्व संस्थानांचें एकीकरण होऊन व्हिक्टर इमॅन्युअल संयुक्त इटलीचा राजा झाला (१८७०). (४) अल्बामा प्रकरणाची हकीकत मागें आलीच आहे (पहा, पान ६८–६९). ग्लॅडस्टननें लवादमंडळानें ठरविलेली रक्कम दिली, त्यामुळें त्याच्यावर गहजब झाला. एकंदरींत पाहतां ग्लॅडस्टनचें परराष्ट्रीय धोरण अत्यंत कमकुवत होतें, असा त्याच्यावर प्रतिपक्षानें आरोप केला व ग्लॅडस्टननें इंग्लंडच्या प्रतिष्ठेस जबरदस्त धक्का दिला असें लोकांचें मत झालें. त्यामुळेंच पुढील निवडणुकींत त्याचा पराभव झाला.

१२. ग्लॅडस्टनच्या कामगिरीचा परिणाम:—ग्लॅडस्टननें मोठ्या धडाडीनें कामाला सुरुवात केली व त्यानें सुधारणेचें नवें युग निर्माण केलें असें मानण्यांत येतें. तरीही त्याची कामगिरी अनेकांस पसंत पडली नाहीं. आयर्लंडांतील धर्मखातें रद्द केल्यानें व विश्वविद्यालयांतील धार्मिक अटी रद्द केल्यानें धर्मगुरू रुष्ट झाले, प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास झाल्यानें धार्मिक संस्थांच्या शिक्षणविषयक कामगिरींत ग्लॅडस्टननें निष्कारण ढवळाढवळ केली असें त्यांच्या चालकांस वाटूं लागलें व त्यामुळें ते ग्लॅडस्टनवर रागावले. लष्करांतील अधिकाऱ्यांच्या जागांची विक्री थांबविल्यानें वरच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्गांतील लोक असंतुष्ट झाले. मजूरसंघांना त्यानें मान्यता दिली म्हणून कारखानदार गरम झाले. ग्लॅडस्टनचें कमकुवत परराष्ट्रीय धोरण कंझर्व्हेटिव्ह पक्षास पसंत पडलें नाहीं व लोकांस रुचलें नाहीं. अल्बामा प्रकरणांत ग्लॅडस्टननें हार खाल्ली असेंच प्रत्येक जण म्हणत होता. या सर्व गोष्टींवरून ग्लॅडस्टनच्या सुधारणांचा लोकांस पूर्णपणें कंटाळाच आला होता असें मानलें जातें. 'ग्लॅडस्टननें प्रत्येक धंद्यास सतावून सोडलें, सर्व वर्गांतील लोकांचा छळ केला, व्यापाऱ्यांचा जाच केला व सर्व प्रकारच्या लोकांच्या इस्टेटीवर धाड आणली' असें डिझरेलीनें ग्लॅडस्टनच्या कामगिरीसंबंधीं उद्गार काढले. कसेंही असलें तरी ग्लॅडस्टनच्या प्रधानमंडळानें लोकहिताचीं अनेक कामें करून इंग्लंडची सर्वांगीण सुधारणा केली. सन १८७८ मध्यें झालेल्या निवडणुकींत ग्लॅडस्टनच्या लिबरलपक्षाचा पराभव झाल्यानें ग्लॅडस्टननें राजीनामा दिला व कंझर्व्हेटिव्ह पक्षाचा पुढारी डिझरेली मुख्य प्रधान झाला.

अभ्यास

१. ग्लॅडस्टनचें चरित्र थोडक्यांत सांगा.

२. ग्लॅडस्टननें केलेल्या सुधारणा थोडक्यांत सांगून त्याचा परिणाम काय झाला तें वर्णा. लोकांना त्याच्या सुधारणा आवडल्या नाहींत असें म्हणतात तें खरें काय? तें तुम्हांस पटतें? कां नाहीं?

३. खुला व्यापार, आयर्लंड व पूर्वेकडील प्रश्न यांसंबंधीं ग्लॅडस्टनचें धोरण काय होतें तें स्पष्ट करा.

४. सन १८६७ चा कायदा पास झाल्यानें लोकशाहीचें पाऊल पुढें पडलें असें तुम्हांस वाटतें काय? कशावरून? सन १८३२ च्या कायद्यांतील व या कायद्यांतील साम्य व भेद सांगा.

५. खालीलसंबंधीं महत्त्वपूर्ण उल्लेख करा:—फीनियन सोसायटी, फॉर्स्टर, कार्डवेल, गुप्तमतदानपद्धति, सन १८६७ चा कायदा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उतारा

१. ग्लॅडस्टन व आयर्लंड—१८६९

आपल्या राज्यकर्त्यांशीं आयरिश लोकांनीं गेल्या शतकभर एकसारखा झगडा चालविला आहे. त्यांचा झगडा इंग्लंडशीं नसून इंग्लिश राज्यकर्त्यांशीं आहे. त्यांची लोकसंख्या अल्प आहे, त्यांचीं साधनें अपुरीं आहेत, राजकारणांत ते मुरलेले नाहींत; या सर्व बाबतींत इंग्रजांपेक्षां ते कमी प्रतीचे असले तरी त्यांस अनेकवार यश मिळत गेलें आहे. इंग्लिश लोक सर्व सत्ताधारी असले तरी आयरिश झगड्यांत आयरिशांपुढें त्यांस अनेक वेळां साष्टांग नमस्कार घालावे लागले आहेत. त्यामुळें आयरिशांची एकसारखी प्रगतीच होत आहे. त्याचें खरें कारण म्हणजे त्यांच्या चळवळीला सत्याचें व न्यायाचें अधिष्ठान लाभलें आहे. त्यामुळेंच पुढारलेल्या सर्व जगानें त्यांची बाजू स्वीकारली व त्यांना उत्तेजन दिलें. आयर्लंडला न्याय देण्याकरितां आज आपण जमलों आहों. बहुजन समाजानें अल्पजन समाजावर जुलूम करावा हें तिरस्कारार्ह व घातुक आहे. आपल्यापुढें आज जें बिल आहे तें तत्त्वतः अत्यंत महत्त्वाचें आहे. त्यामुळें आपल्यावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. आयर्लंड-मधील राजसत्ता व धर्मपीठ यांची सांगड ज्या मुहूर्तावर घातली गेली तो अत्यंत अशुभ होता. कारण त्यामुळेंच आयरिशांच्या तक्रारी वाढल्या, त्यांचीं दुःखें दुणावलीं व त्यामुळें इंग्लंडची बेअब्रू व नाचक्की होण्यास सुरुवात झाली. अर्थात् आजच्या शुभदिनीं आयर्लंडांतील राजसत्ता व धर्मपीठ यांची सांगड नष्ट करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोंत, यामुळें मला आनंदच होत आहे. हें बिल पास झाल्यानेंच शांततेचें व न्यायाचें राज्य सुरू होईल.

—आयरिश धर्मपीठ रद्द करण्याच्या वेळीं ग्लॅडस्टननें केलेल्या
भाषणांतील कांहीं भाग.

प्रश्न:—१. आयरिश धर्मपीठ रद्द करावें असें ग्लॅडस्टनला कां वाटलें ?
२. आयरिश लोकांची त्यानें कोणत्या प्रकारें स्तुति केली आहे ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. साम्राज्यवादी बेंजामिन डिझरेली— बेकन्सफील्डचा अर्ल

१. बेंजामिन डिझरेली (१८०४–१८८१):—प्रसिद्ध साम्राज्यवाद व कंझर्व्हेटिव्ह पुढारी बेंजामिन डिझरेली याचा जन्म सन १८०४ त लंडनमध्यें एका मध्यम ज्यू कुळांत झाला. त्याचा बाप विद्यासंपन्न होता. बेंजामिनला एका खाजगी शाळेंत घालण्यांत आलें होतें; परंतु त्याला फारसें शिक्षण मिळालें नाहीं. वाचनाचा त्याला भयंकर नाद होता व त्यामुळेंच त्यानें फ्रेंच, लॅटिन व इंग्लिश या भाषांवर प्रभुत्व मिळविलें. तो स्वतःच स्वतःचा शिक्षक बनला व अखंड वाचनानें, मननानें व निरीक्षणानें त्यानें उत्कृष्ट ज्ञान संपादिलें. डिझरेलीला प्रवासाची अत्यंत हौस होती. लंडनमधील खाणाखुणा त्याला मुखोद्गत असत. पुढें थोडा मोठा झाल्यावर त्यानें स्पेन, इटाली, पॅलेस्टाइन वगैरे प्रांतांत प्रवास केला. पॅलेस्टाईनमधील प्रवास त्याला अत्यंत आवडला व तेथूनच सर्व प्रकारची सुधारणा युरोपांत अवतीर्ण झाली असें त्याला वाटूं लागलें. सन १८३७ त टोरीपक्षातर्फे पार्लमेंटमध्यें प्रथमतःच तो निवडून आला. पार्लमेंटमधील त्याचें पहिलें भाषण निराशाजनक झालें व लोकांनीं त्याची उघड उघड चेष्टा केली; परंतु त्यामुळें डगमगून न जातां तो स्वाभिमानपूर्वक उद्गारला, ‘एक वेळ अशी येईल कीं तुम्हांला माझें भाषण ऐकावेंच लागेल.’ यावरून त्याचा आत्मविश्वास निदर्शनास येतो. सन १८३९ मध्यें त्यानें एका श्रीमंत विधवेशीं

बेंजामिन डिझरेली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लग्न केलें. प्रथमतः अनेक प्रकारचीं पुस्तकें लिहून तो आपला चरितार्थ चालवी; परंतु लग्न झाल्यानंतर बायकोच्या पैशानें श्रीमंत झाल्यानें तो ऐषारामांत राहूं लागला. पीलनें त्याला हाताशीं धरून अनेक प्रकारें उत्तेजन दिलें; परंतु तें विसरून धान्याचा कायदा रद्द करण्याचे वेळीं तो पीलवर उलटला व त्याच्यावर बेसुमार तोंडसुख घेऊन 'कंझर्व्हेटिव्ह पक्षाचा पीलनें नाश केला' असा त्याच्यावर त्यानें उघड उघड आरोप केला. ग्लॅडस्टन-प्रमाणें त्यानें कंझर्व्हेटिव्हपक्ष न सोडतां त्या पक्षाच्या संघटनेचें काम अंगिकारलें व त्यांत अपूर्व यश मिळविलें. संरक्षित व्यापारपद्धतीचा तो पुरस्कर्ता असला तरीही पुढें त्यानें आपलें तें ध्येय बदललें व सन १८५२ मध्यें खुल्या व्यापाराचें ध्येय स्वीकारलें. आपल्या पक्षानें पार्लमेंटची सुधारणा हातीं घेतल्यास तो पक्ष पुढें येईल असें त्यास वाटल्यानें त्यानें सन १८६७ चा सुधारणा कायदा पास करून घेतला. देशांतील संस्था जगवाव्या, साम्राज्याचें संरक्षण करावें व राष्ट्रांतील लोकांची स्थिति सुधारावी असा त्रिविध कार्य-क्रम ध्येय म्हणून कंझर्व्हेटिव्हपक्षापुढें त्यानें मांडला. या ध्येयवाक्याप्रमाणें वागूनच त्यानें आपल्या पक्षामध्यें नवा जोम व नवा उत्साह निर्माण केला व सन १८७४ मध्यें पार्लमेंटमध्यें निर्णायक बहुमत मिळविलें. तो कट्टर साम्राज्यवादी होता. साम्राज्याच्या संरक्षणांतच इंग्लंडचें वैभव व श्रेष्ठत्व सामाविलेलें आहे असें तो नेहमीं म्हणे. विधायक कामगिरी त्याला कधींच साधली नाहीं. वक्तृत्वही त्याला कधीं जमलें नाहीं; तरीही विनोद, थट्टा, उप-हास, निंदा वगैरेमुळें त्याचीं भाषणें लोकांस आवडत. त्याला भपक्याची आवड फार असे. बडेजाव माजवावा व प्रत्येक गोष्ट फुगवून दाखवावी असें त्याला नेहमीं वाटे. हा त्याचा गुण लोकांस भुलवी व फसवी. त्याचें धैर्य अफाट होतें व कोणालाही कधींही न भितां तो आपलें ठरलेलें ध्येय गांठण्याचा सदैव प्रयत्न करीत असे. कोणाही ज्यूला इंग्लंडबद्दल जितका आपलेपणा वाटेल तितकाच त्यालाही इंग्लंडबद्दल वाटत होता, यांत मात्र शंका नाहीं.

२. डिझरेलीचें दुसरें प्रधानमंडळ (१८७४-८०):—सन १८७४ मध्यें मुख्य प्रधान झाल्याबरोबर डिझरेलीनें आपल्या ध्येयास अनुसरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कामास सुरुवात केली. मजूर वर्गाबद्दल त्याला फार सहानुभूति होती व मजुरांची स्थिति सुधारली पाहिजे असें त्याला वाटे. त्यामुळें सन १८७५ मध्यें त्यानें 'मजुरांच्या घरांसंबंधीं कायदा' पास केला. इतके दिवस मजुरांचीं घरें अत्यंत गलिच्छ व घाणेरड्या वस्तींत बांधलीं जात. त्यामुळें मजुरांची स्थिति अत्यंत कष्टप्रद झाली होती. बालमृत्यूचें प्रमाणही त्यांच्यांत बरेंच वाढलें होतें. तेव्हां या गोष्टी सुधारण्याकरितांच वरील कायदा पास करण्यांत आला. त्या कायद्यानें पंचवीस हजार लोकवस्ती असलेल्या शहरांच्या म्युनिसिपालिट्यांना अस्वच्छ व गलिच्छ वस्तींतील घरें पाडून टाकण्याचा व मजुरांकरितां हवाशीर व आरोग्यदृष्ट्या सुखकर घरें बांधून देण्याचा अधिकार मिळाला. वर्गावर्गांत कलह माजविणारें असलें बिल पास करूं नये असें लिबरल लोक म्हणत होते; परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. 'कारखानदार व मजूर' यांच्यासंबंधाचा कायदा सन १८७५ मध्यें पास झाला. मजूरसंघास ग्लॅडस्टननें मान्यता दिली होती; परंतु मजुरांचा संप करण्याचा अधिकार मान्य करण्यांत आला नव्हता. या नव्या कायद्यानें त्याला मान्यता दिली. मात्र संपांत सामील होणाऱ्या संपवाल्यांनीं सनदशीर व शांततेच्या मार्गाचा अवलंब करूनच इतरांस आपल्या संपांत ओढून घ्यावें; संपांत सामील झालेल्या मजुरांस इतर गुन्हेगारांप्रमाणें वागवूं नये असें या कायद्यानें ठरविण्यांत आलें. हा कायदा पास झाल्यानें मजूरसंघाचें औद्योगिक क्षेत्रांतील महत्त्व वाढून त्याचें आसन स्थिर झालें. सन १८७६ मध्यें 'व्यापारी दळणवळणासंबंधीं कायदा' पास करण्यांत आला. आपल्याला फायदा मिळावा म्हणून जहाजांचे मालक आपल्या जहाजांत खच्चून माल भरीत व विम्याची रक्कम मिळावी म्हणून तुफान समुद्रांतही जहाजें हाकारीत. यामुळें अनेकांस प्राणांस मुकावें लागे व विम्याचे पैसे मिळविण्याकरितां अनेक लोक धडपड करीत. ही स्थिति लक्षांत घेऊनच सरकारनें वरील कायदा पास केला होता. त्या कायद्यानें व्यापारी खात्याला बरेच अधिकार मिळाले व वरील गोष्टी होऊं न देण्याबद्दल खबरदारी त्यानें घ्यावी असें ठरलें. सन १८७८ मध्यें 'कारखान्यांसंबंधीं कायदा' करण्यांत आला. त्यामुळें आजपर्यंतचे निरनिराळ्या वेळीं पास झालेले कायदे एकत्रित करण्यांत आले. सन १८७६ सालीं प्राथ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिक शिक्षण त्यानें जवळ जवळ सार्वत्रिक व सक्तीचें केलें. त्यामुळें मजुरांस शिक्षण मिळून ते सुशिक्षित होतील असें डिझरेलीस वाटत होतें. त्याचप्रमाणें इंग्लंडमध्यें साक्षरतेचें प्रमाण वाढण्यासही मदत होणार होती.

३. डिझरेलीचें परराष्ट्रीय धोरण:—डिझरेली कट्टर साम्राज्यवादी होता. इंग्लंडचें साम्राज्य वाढल्यामुळें इंग्लंड युरोपियन राष्ट्र राहिलेलें नसून त्याला एका मोठ्या साम्राज्याचें नेतृत्व मिळालें आहे असें त्याचें मत होतें. तेव्हां साम्राज्यांतील घटकावयवांचें संघटन करणें अत्यंत महत्त्वाचें आहे असें तो म्हणे. साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांच्या संरक्षणाची जबाबदारी इंग्लंडवर असल्यामुळें इंग्लंडचें परराष्ट्रीय धोरण त्या दृष्टीनेंच आंखणें योग्य होय असें त्याला वाटे. त्याच्या परराष्ट्रीय धोरणाचीं मुख्य सूत्रें अशीं. रशियाला विरोध करून त्याच्या पूर्वेकडील महत्त्वाकांक्षेस आळा घालणें व त्याकरितां तुर्कस्थानला हातीं धरून तें राष्ट्र जगविणें. हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीचें रक्षण करण्याकरितां अफगाणिस्थानाला लोडसंस्थानाचें स्वरूप देऊन त्या बाजूनें येणाऱ्या रशियाच्या हल्ल्यास पायबंद घालणें. युरोपियन राजकारणांत इंग्लंडला महत्त्वाचें स्थान प्राप्त करून देणें. या सूत्राप्रमाणें आपलें परराष्ट्रीय धोरण हांकण्याचें त्यानें ठरविलें होतें. परंतु त्या बाबतींत त्याला फारसें यश आलें नाहीं. विशेषतः साम्राज्य संघटनेच्या संबंधाचें त्याचें ध्येय तसेंच कल्पनेंत राहिलें व त्याला त्या बाबतींत विशेषसें कांहीं करतां आलें नाहीं. मात्र सन १८७७ सालीं एक कायदा करून व्हिक्टोरियास 'हिंदुस्थानची साम्राज्ञी' करण्यासंबंधाचा त्यानें एक कायदा पास केला. त्यावेळचा त्याचा दिमाख साम्राज्याच्या कल्पनेस पोषक असला तरी ती गोष्ट अनेक इंग्रजांस आवडली नाहीं हें सत्य आहे.

४. सुएझ कंपनीचे शेअर (१८७५):—सन १७५९ मध्यें फ्रेंच एंजिनियर फर्डिनंड लेसेप्स यानें सुएझ कालव्याच्या खननास सुरुवात केली व दहा वर्षांनीं तो कालवा तयार झाला. त्या कालव्याच्या कार्याकरितां एक कंपनी स्थापन करण्यांत येऊन तिचे शेअर फ्रेंच लोकांनीं व इजिप्तच्या राजानें—खेदीवानें—विकत घेतले होते. त्यामुळें फ्रेंचांचा व इजिप्तच्या खेदीवाचा त्या कालव्यावर अधिकार चाले. पूर्वेकडील देशांशीं व्यवहार ठेवावयाचा असल्यास सुएझच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालव्याचा अत्यंत फायदा होणार, हें सर्वांस माहीत होतें व त्या दृष्टीनें पाहतां सुएझचा कालवा म्हणजे पूर्वेकडील व्यापार व साम्राज्य यांच्या संरक्षणाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें ठिकाण होय हें डिझरेलीनें ओळखलें होतें. सन १८७५ मध्यें इजिप्तचा खेदीव कर्जाच्या जिकीरीमुळें आपले शेअर विकण्याच्या बेतांत आहे अशी कुणकूण डिझरेलीला लागली. हे शेअर जवळजवळ १,७६,६०२ होते. जलदी केली तर ते सर्व आपल्याला मिळतील असें डिझरेलीला वाटल्यानें पार्लमेंटच्या संमतीचीही वाट न पाहतां, स्वतःच्या जबाबदारीवर त्यानें ते सर्व इंग्लंडकरितां ३९,७६,५८२ पौंडांस विकत घेतले. यामुळें सुएझ कालव्यावर इंग्लंडचा ताबा सुरू झाला व इजिप्तबद्दल इंग्लंडला आपलेपणा वाटूं लागला. तसेंच हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड वगैरे साम्राज्याच्या भागांशीं दळणवळण होणें सुलभ व बिनधोक झालें. आज या कालव्यांतून अनेक जहाजें जातात-येतात; परंतु एकावेळीं एकापेक्षां अधिक जहाजें त्या कालव्यांतून जावयाचीं झाल्यास त्या कालव्यांतून प्रथम जाण्याचा मान इंग्लिश जहाजास दिला जातो हें विसरतां येत नाहीं. इंग्लिश जहाज निघून गेल्यावरच इतर जहाजें त्या कालव्यांतून जातात. त्यावरून इंग्रजांना त्या मानाबद्दल किती अभिमान वाटत असेल तें समजून येईल.

५. डिझरेली व पूर्वेकडील प्रश्न:—सन १८७५ पर्यंत बल्गेरिया, बॉस्निया, हर्झीगोव्हिना वगैरे प्रांत तुर्कस्थानच्या ताब्यांत होते. त्या वर्षी हर्झीगोव्हिना प्रांतांत बंडाला सुरुवात झाली व तुर्कस्थानानें बंडवाल्यांचा छळ आरंभिला. त्यामुळें बल्गेरियांतही बंडास सुरुवात झाली. तेव्हां तुर्क लोकांनीं बल्गेरियांतील लोकांची अमानुष कत्तल करून बंडाचा उपशम करण्याचा प्रयत्न चालविला. ही गोष्ट कळतांच रशियाचा झार दुसरा अलेक्झांडर याला संताप आला व त्यानें तुर्कस्थानविरुद्ध युद्ध पुकारलें (१८७७). त्या युद्धांत तुर्कस्थानचा पराभव होऊन सन १८७८ मध्यें सॅनस्टेफॅनो येथें रशिया व तुर्कस्थान यांच्यांत तह झाला. त्या तहानें तुर्कस्थानची युरोपांतील सत्ता जवळ जवळ नष्ट झाली. तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालील स्लाव्ह युरोपियनांची स्थिति सुधारण्याचें तुर्कस्थाननें कबूल केलें व बल्गेरियाचें एक मोठें व स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्यास त्यानें मान्यता दिली. या सर्व गोष्टी चालू

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतां डिझरेली गप्प नव्हता. त्यानें तुर्कस्थानास मदत करण्याचें ठरवून डार्डानेल्सपर्यंत ब्रिटिश आरमार पाठविलें व हिंदी फौजही भूमध्यसमुद्रांत आणविली. त्यामुळें रशियालाही भीति वाटूं लागली. तेव्हां सॅनस्टेफॅनोचा तह सर्व राष्ट्रांच्या परिषदेपुढें ठेवून त्याला त्या परिषदेची मान्यता मिळविली पाहिजे असें डिझरेली म्हणूं लागला. त्याला रशियानें मान्यता दिल्यानें बर्लिन येथें सन १८७८ त एक मोठी परिषद भरविण्यांत आली.

६. **बर्लिनची परिषद (१८७८)**:—बर्लिनच्या परिषेदमध्यें रशिया, तुर्कस्थान, इंग्लंड, ऑस्ट्रिया, फ्रान्स, इटली व जर्मनी या राष्ट्रांचे प्रतिनिधि जमले होते. परिषदेचा अध्यक्ष प्रिन्स बिस्मार्क होता. इंग्लंडतर्फे डिझरेली (आतां बेकन्सफील्डचा अर्ल) व लॉर्ड सॅल्सबरी हे त्या परिषेदकरितां गेले होते. रशिया व तुर्कस्थान यांच्यामधील तंटा मिटविण्याकरितां ही परिषद बोलाविण्यांत आली होती. परिषदेस जाण्यापूर्वीच डिझरेलीनें तहाचा एक खर्डा तयार करून त्याला रशियाची व तुर्कस्थानची मान्यता मिळवून ठेविली होती. त्यामुळें परिषदेचें काम सोपें झालें. शेवटीं परिषदेनें एक तह तयार केला व त्याला मान्यता दिली. त्या तहास 'बर्लिनचा तह' असें म्हणतात. त्यांत खालील गोष्टी ठरल्या. (१) सर्व्हिया, मॉटेनीग्रो व रुमेनिया हे प्रांत स्वतंत्र व्हावेत. (२) बॉस्निया व हर्झागोव्हिना हे प्रांत ऑस्ट्रियाला मिळावेत. (३) बाटुम व कार्स रशियाला मिळावे. बेसअरेबिया प्रांत रशियाकडेच रहावा. (४) बल्गेरियाला स्वातंत्र्य मिळावें; मात्र तो देश तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं रहावा. या तहानें रशियाच्या पूर्वेकडील महत्त्वाकांक्षेस आळा बसला, तुर्कस्थान जिवंत राहिलें, रशियाचा भूमध्यसमुद्रांतील प्रवेश बंद झाला व बाल्कन राष्ट्रें निर्माण झाल्यानें तेथें पुढें तंटे माजूं लागले. या तहानें डिझरेली बेहद्द खूष झाला व इंग्लंडांत परत आला, त्यावेळीं तो म्हणाला 'इंग्लंडची प्रतिष्ठा व लौकिक वाढवून मीं तह घडवून आणला आहे.' त्याची ही आत्मप्रौढी पुढील गोष्टींनीं फोल ठरविली. त्याचा मोठा मान झाला. खुद्द तुर्कस्थाननेंही इंग्लंडला 'सायप्रस बेट' बहाल केलें; मात्र इंग्लंडनें तुर्कस्थानला त्याबद्दल थोडी खंडणी द्यावी असें ठरलें. ही अट मात्र हानिकारकच होती. शिवाय तुर्कस्थानच्या बाजूनें साधत नाहीं, असें पाहून रशि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यानें अफगाणिस्थानच्या बाजूनें आपल्या कारवाया करण्यास सुरुवात केली. याचवेळीं बिस्मार्कनें इजिप्तही डिझरेलीला देऊं केलें होतें; पण त्यावेळीं डिझरेलीनें त्या गोष्टीला नकार दिला.

७. अफगाणिस्थानशीं युद्ध (१८७८) :— बर्लिनची परिषद संपल्यानंतर रशियानें अफगाणिस्थानच्या बाजूस कारवाया सुरू केल्या. त्यावेळीं डिझरेलीचा हस्तक लॉर्ड लिटन हिंदुस्थानचा व्हाईसरॉय होता. तोही रशियाला विरोध करण्यास तयार झाला. त्यावेळीं रशियाची सरहद्द अफगाणिस्थानच्या सरहद्दीला येऊन भिडली होती व त्यामुळें त्यांच्यांत कटकटी उत्पन्न होऊं लागल्या. शेवटीं रशियानें आपला वकील अफगाणिस्थानच्या दरबारीं ठेवून दिला. ही गोष्ट इंग्रजांस आवडली नाहीं व रशियाच्या वकिलाप्रमाणें आपलाही वकील अफगाणिस्थानच्या दरबारीं रहावा अशी लॉर्ड लिटननें अफगाणिस्थानचा अमीर शेरअल्ली, यास विनंति केली. शेरअल्लीनें ती विनंति झिडकारून टाकली. त्यामुळें युद्धास सुरुवात झाली (१८७८). त्यांत शेरअल्लीचा पराभव झाला व तो पळून गेल्यानें याकुबखानास अमीर करण्यांत आलें. त्यानें ब्रिटिशांच्या अटी मान्य केल्या. परंतु त्यानंतर ब्रिटिश वकिलाचा काबुलास खून झाल्यानें युद्धास पुन्हां सुरुवात झाली. त्यांत ब्रिटिशांची त्रेधा उडाल्यामुळें डिझरेलीवर लिबरल पक्ष तुटून पडला. युद्ध चालू असतांच निवडणूक होऊन डिझरेलीच्या पक्षाचा पराभव झाला व लिबरलपक्षाचा पुढारी ग्लॅडस्टन मुख्य प्रधान झाला.

८. डिझरेली व ग्लॅडस्टन :— एकोणिसाव्या शतकांतील ग्लॅडस्टन व डिझरेली ही मुत्सद्यांची दुक्कल अभूतपूर्व होती. एकमेकांचीं व्यंगें हुडकून काढून दुसऱ्यावर मात करण्यास प्रत्येकजण नुसता टपून असे. दोघेही प्रथमतः टोरीपक्षातर्फें पार्लमेंटमध्यें निवडून आलेले. परंतु डिझरेली आपल्या पक्षाला अखेरपर्यंत चिकटून राहिला; एवढेंच नव्हे तर पीलनें धान्याचा कायदा रद्द केल्यानंतर सन १८४६ मध्यें कंझर्व्हेटिव्ह पक्षामध्यें जी दुफळी झाली ती डिझरेलीनें सांधण्याचें कठिण काम स्वतःवर घेतलें व त्यांत यश मिळविलें. उलट ग्लॅडस्टननें त्याच वेळीं पीलला पाठिंबा दिला व कंझर्व्हेटिव्ह पक्ष सोडून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो पीलचा अनुयायी बनला व पुढें हळूहळू तो व्हिग ऊर्फ लिबरल-पक्षांत सामील होऊन त्या पक्षाचा पुढारी झाला. ग्लॅडस्टनचें शिक्षण उत्तम झालेलें होतें; डिझरेलीला शिक्षण मिळालें नाहीं, तरी तो आपल्या पराक्रमानेंच मोठा विद्वान झाला. ग्लॅडस्टन उत्तम वक्ता तर डिझरेली उत्तम लेखक. ग्लॅडस्टनचे ग्रंथ लोकादरास कधींच पात्र झाले नाहींत; डिझरेलीच्या कादंबऱ्या लोकांस फार आवडत. लोकांची सर्वांगीण सुधारणा करावी, त्यांच्या स्वास्थ्यांत भर टाकावी व स्वातंत्र्याची भूक लागलेल्यांस तें देऊन त्यांस संतुष्ट ठेवावें अस ग्लॅडस्टनला नेहमीं वाटे; यामुळें अनेक प्रकारच्या सुधारणांचा त्यानें पुरस्कार केला. याच्या उलट डिझरेली होता. त्याचा विशेष कटाक्ष साम्राज्यावर होता. साम्राज्याचें संघटन केल्यानेंच इंग्लिश लोकांस खरें समाधान प्राप्त होईल असें त्यास वाटे व त्यामुळें त्यानें इंग्लंडचा बडेजाव वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. ग्लॅडस्टन खुल्या व्यापाराचा पुरस्कर्ता, तर डिझरेली संरक्षक व्यापार उचलून धरणारा. पार्लमेंटची सुधारणा करण्याची ग्लॅडस्टननें आवश्यकता प्रतिपादून त्या बाबतींत पुष्कळ प्रयत्न केले व यश मिळविलें; डिझरेलीला पार्लमेंटची सुधारणा मान्य नव्हती. सन १८६७ चा कायदा त्यानें पास करून घेतला खरा; पण तो केवळ आपल्या पक्षाची इज्जत सांभाळण्याकरितां. उत्तम अर्थमंत्री म्हणून ग्लॅडस्टन प्रसिद्धी पावला, तर डिझरेलीचें परराष्ट्रीय धोरण त्याच्या कीर्तीस कारणीभूत झालें. आयर्लंडला स्वराज्य देऊन टाकावें असें म्हणणारा ग्लॅडस्टन, त्याकरितां अविश्रांत खटपट करी; उलट आयर्लंडांतील चळवळ मारून टाकण्याकरितां दडपशाही करण्यास डिझरेली नेहमीं उत्सुक असे. परराष्ट्रांशीं सलोख्याचें धोरण ठेवणें व रशियाकडे दुर्लक्ष करणें ग्लॅडस्टनला आवडे; डिझरेलीला दोन्ही गोष्टी मान्य नव्हत्या. एकंदरींत पाहतां ग्लॅडस्टन व डिझरेली हे दोघेही परस्परांहून भिन्न होते; परंतु त्यांची कामगिरी एकमेकांस पूरकच ठरली व त्यामुळें इंग्लंडचा फार मोठा फायदा झाला, यांत शंका नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. डिझरेलीचें चरित्र थोडक्यांत देऊन त्याची कामगिरी सांगा.

२. डिझरेली व ग्लॅडस्टन यांत तुम्हांस कोण आवडतो? कारणें देऊन सिद्ध करा.

३. डिझरेलीच्या दुसऱ्या प्रधानमंडळाची कामगिरी वर्णा.

४. डिझरेलीच्या परराष्ट्रीय धोरणाचें वर्णन करा.

५. टिपणें करा:—सुवेझ कालव्याचें महत्त्व, डिझरेली व मजूरवर्ग, बर्लिनची परिषद.

उतारे

१. डिझरेली व आयर्लंड—१८४४

या सनातन आयरिश प्रश्नाचें स्वरूप तरी काय आहे? कांहींच्या मतें तें अत्यंत व्यावहारिक असावें तर कांहींच्या मतें तें पूर्णपणें तात्त्विक असावें. आयर्लंड-मध्यें अराजकता निर्माण होण्यास अनेकांच्या मतें अनेक कारणें संभवतात. कांहींच्या मतें तेथें जमीनदारांची सत्ता नाहीं म्हणून असें होतें, कांहींच्या मतें तेथें आगगाडी नाहीं म्हणून तेथें अराजकता नांदूं शकते, कांहींच्या मतें तेथें पोपची सत्ता नसल्यानें असें होतें, तर कांहीं म्हणतात कीं तेथें पूर्वीप्रमाणें बटाटे होत नाहींत म्हणून असें होतें! आयर्लंडमधील लोक उपाशी मरताहेत, तेथें जमीनदारांच्या गैरहजेरींत त्यांचे गुमास्ते शेतमजुरांवर अनन्वित जुलूम करीत आहेत, तेथें परकीयांचें धर्मपीठ आहे व तेथील कार्यकारीमंडळ अत्यंत निःसत्त्व आहे. हेंच तें आयरिश प्रश्नाचें स्वरूप होय. ही स्थिति सुधारण्यास आयर्लंडमध्यें राज्यक्रांति होणेंच योग्य होय असें कांहीं समजतात. परंतु त्या देशांत राज्यक्रांति होणें अशक्य आहे आणि त्याचें कारणही उघड आहे. त्या देशाचा संबंध एका सामर्थ्यसंपन्न देशाशीं निगडित झालेला आहे. तेव्हां इंग्रज प्रधानाचें आयर्लंडसंबंधीं मुख्य कर्तव्य म्हणजे ज्यामुळें राज्यक्रांति घडून येईल त्याचें समूळ उच्छेदन करणें होय.

प्रश्न:—१. आयर्लंडसंबंधीं कोणतें धोरण स्वीकारावें असें डिझरेलीस वाटे?

२. त्या धोरणांत त्यानें पुढें फरक केला? कां?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. साम्राज्यवाद व ग्लॅडस्टन—१८८०

मुख्य प्रधान डिझरेली 'साम्राज्य व स्वातंत्र्य' हे शब्द सहज बोलून गेले. त्यांनीं इंग्लिश साम्राज्याची तुलना रोमन साम्राज्याशीं केली यामुळें मला अत्यंत वाईट वाटलें. मुख्य प्रधानांची ही कल्पना मूलतःच फुसकी आहे व अशी तुलना करणेंच अत्यंत घातुक आहे. दोन्ही साम्राज्यांच्या धोरणांत तत्त्वतःच फरक आहे. रोमन लोकांना जग जिंकावयाचें होतें व त्यांतील लोकांना कोणत्याही प्रकारचे हक्क न देतां गुलामगिरींत खितपत पाडावयाचें होतें. आमच्या मुख्य प्रधानांची साम्राज्याची कल्पना याच तत्त्वावर उभारली जाणार आहे काय? साम्राज्याच्या कल्पनेबरोबरच स्वातंत्र्याची कल्पनाही त्यांनीं लोकांपुढें मांडली आहे. परंतु साम्राज्य व स्वातंत्र्य यांच्या रोमन लोकांच्या कृतींतून व उक्तींतून कोणता अर्थ निघत होता? तर स्वातंत्र्य आपल्याकरितां, साम्राज्य इतरेजनाकरितां! यावरून मुख्य प्रधानांच्या साम्राज्याच्या कल्पना दिसावयाला साध्यासुध्या दिसतात. परंतु त्यांच्या बुडाशीं जहर विष आहे हें कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. या जगांतील सर्व लोक खिस्तीधर्मतत्त्वांतील सत्याच्या रज्जूंनीं बांधलेले आहेत. त्यांच्यांत उच्चनीच असा भेदाभेद नाहीं. सर्व लोक समान दर्जाचे आहेत, असें उदात्त धोरण पुढें असतां आमचे मुख्य प्रधान (आपल्या साम्राज्याच्या कल्पनेच्या पुरस्कारानें) या देशाचा घोर अपराध करीत आहेत असेंच मला वाटतें.

—ग्लॅडस्टनच्या एका मिडलोथियन भाषणावरून.

प्रश्न :—१. ग्लॅडस्टनला डिझरेलीचा साम्राज्यवाद कां पसंत नव्हता?
२. त्याच्या मतें साम्राज्याची कल्पना कोणती?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. ग्लॅडस्टनचें दुसरें व तिसरें प्रधानमंडळ

१. ग्लॅडस्टनचें दुसरें प्रधानमंडळ (१८८०-८५):—डिझरेलीचें परराष्ट्रीय धोरण लिबरलपक्षाला पसंत नव्हतें. तेव्हां त्याच्याविरुद्ध ग्लॅडस्टननें टीकेची झोड उठविली. त्या वर्षी पार्लमेंटची निवडणूक होती व ग्लॅडस्टननें स्कॉटलंडमध्यें एक मोठा दौरा काढून कंझर्व्हेटिव्हपक्षाच्या परराष्ट्रीय धोरणावर सडकून टीका केली. त्यावेळचीं त्याचीं वक्तृत्वपूर्ण भाषणें 'मिडलोथियन भाषणें'–इतकीं परिणामकारक वठलीं कीं लोकांनीं त्याच्या पक्षाला पार्लमेंटमध्यें निर्णायक बहुमत मिळवून दिलें. त्यामुळें डिझरेलीनें राजीनामा दिला व ग्लॅडस्टन इंग्लंडचा पुन्हां एकदां मुख्य प्रधान झाला (१८८०). त्याच वेळीं पार्नेल नामक आयरिश पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं साठ आयरिश लोकांचा एक गट पार्लमेंटमध्यें निवडून आला होता. सन १८८१ मध्यें डिझरेली ऊर्फ बेकन्सफील्डचा अर्ल मृत्यु पावल्यामुळें लॉर्ड सॅल्सबरी कंझर्व्हेटिव्हपक्षाचा पुढारी बनला. ग्लॅडस्टनच्या प्रधानमंडळांत फॉर्स्टर, जोसेफ चेंबर्लेन वगैरे लोक होते.

२. आयर्लंडसंबंधीं धोरण:— सन १८७० मध्यें ग्लॅडस्टन प्रथमतः मुख्य प्रधान झाला त्यावेळीं त्यानें आयर्लंडमधील लोकांस शांत करण्याकरितां 'जमिनीचा कायदा' पास केला होता; परंतु त्यामुळें आयरिशांचें समाधान झालें नव्हतें. जमिनीचा कायदा पास झाला असूनही अनेक शेतकऱ्यांस कामावरून दूर करण्यांत आलें होतें. त्यामुळें असंतोषानें तीव्र स्वरूप धारण केलें. सन १८७० मध्यें ऐझॅक बटच्या नेतृत्वाखालीं आयर्लंडमध्यें 'स्वराज्याची चळवळ' सुरू झाली होती. एकीकरण रद्द करून आयर्लंडला स्वतंत्र पार्लमेंटसभा असावी असें आयरिशांचें म्हणणें होतें. बटनंतर त्या चळवळीचें नेतृत्व चार्ल्स स्टुअर्ट पार्नेल याच्याकडे आलें. त्यामुळें चळवळीस चांगलेंच तीव्र स्वरूप प्राप्त झालें. सन १८७९ सालीं आयर्लंडांत बटाट्यांचें पीक बुडून दुष्काळ पडला, अनेक शेतकरी बुडाले, अनेकांस कामावरून दूर करण्यांत आलें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेव्हां पार्नेलनें 'शेतकीसंघ' स्थापन केला. चळवळीनें अधिक तीव्र स्वरूप धारण केलें, करबंदी सुरू झाली, इंग्लिश जमीनदारांवर व त्यांच्या साथीदारांवर कडकडित बहिष्कार सुरू झाला, त्यांच्याशीं कोणीही कोणताही संबंध ठेवूं नये, इंग्लंडमध्यें कोणीही आपला माल पाठवूं नये व इंग्लंडशीं असहकार करावा असें संघांतील लोकांनीं ठरविलें. खुद्द पार्लमेंटमध्यें पार्नेल व त्याचे अनुयायी यांनीं अडवणुकीचें धोरण स्वीकारलें. आयर्लंडांत दंगेधोपे सुरू झाले व अत्याचारानें उग्र स्वरूप धारण केलें. तेव्हां ग्लॅडस्टननें (सन १८८१ मध्यें) 'दडपशाहीचें बिल' पार्लमेंटकडून पास करवून घेतलें. त्या बिलान्वयें कोणासही अटक करून चौकशीविना त्यास अटकेंत ठेवण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेटला देण्यांत आला. यामुळें आयर्लंडांतील दंगेधोपे थांबण्यास मदत झाली.

३. जमिनीचा दुसरा कायदा (१८८१) :—सन १८८१ मध्यें आयरिश जमिनीसंबंधीं दुसरा एक कायदा पास करण्यांत आला. आयरिश जमीनदारांचा शेतकऱ्यांवर जुल्म होतच होता. जमीनदार आपल्यातर्फे गुमास्ते नेमीत व ते मनाला येईल तितका खंड ठरवीत. तो शेतकऱ्यांनीं दिला नाहीं तर त्यांना ते वाटेल तेव्हां शेतावरून काढून टाकीत. यामुळें शेतकऱ्यांचें अती नुकसान होई. ही गोष्ट लक्षांत घेऊनच पार्नेलच्या सल्ल्यानें आयर्लंडमध्यें 'शेतकीसंघ' स्थापन झाला होता. त्या संघवाल्यांनीं अनेक अत्याचार केले. त्यांचा कटाक्ष जमीनदार, त्यांचे गुमास्ते व जे शेतकरी शेतकीसंघांत सामील झाले नव्हते त्यांच्यावर विशेष होता. त्यामुळेंच सरकारला दडपशाही करावी लागली. पुढें ग्लॅडस्टननें आयरिश लोकांस शांत करण्याकरितांच 'जमिनीचा दुसरा कायदा' पास करून घेतला. त्या कायद्यान्वयें खालील गोष्टी ठरल्या. (१) मुलकी कोर्टें स्थापण्यांत यावींत व त्यांनीं शेतकऱ्यांपासून जमीनदारानें खंड किती घ्यावा हें ठरवून द्यावें. (२) एकदां ठरविलेला खंड पंधरा वर्षें कायम रहावा. (३) कुळांकडून वक्तशीर खंड मिळत असो नसो, त्याला काढून टाकण्याचा अधिकार जमीनदारास असूं नये. (४) शेतकऱ्यानें शेतांत सुधारणा करण्याकरितां जो खर्च केला असेल त्याच्यावर त्याचा हक्क रहावा. (५) कमिशनर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नेमण्यांत यावेत व त्यांनीं शेतें विकत घेऊं इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांस आर्थिक मदत करावी. मात्र ही मदत शेताच्या किंमतीच्या तीन चतुर्थांशाइतकी असावी. या कायद्यानें कोणाचें समाधान झालें नाहीं. पार्नेलनेंही त्याला नाक मुरडलें. जमीनदारही नाखूषच झाले.

४. चार्ल्स स्टुअर्ट पार्नेल (१८४६–१८९१) :—चार्ल्स पार्नेलचा जन्म सन १८४६ मध्यें एका प्रॉटेस्टंट जमीनदाराच्या कुळांत झाला. सन १८७५ मध्यें तो प्रथमतः पार्लमेंटमध्यें निवडून आला. त्यावेळीं ऐझॅक बट आयरिश लोकांचा पुढारी होता; परंतु पार्नेलपुढें त्याचें तेज पडलें नाहीं. रोमन कॅथॉलिक शेतकऱ्यांबद्दल त्याला फार प्रेम असे व त्यांचे हाल दूर करावे असें त्यास वाटे. तो मोठा उत्तम वक्ता होता असें नाहीं; तरीही पक्षसंघटना करण्याची त्याची हातोटी अत्यंत उत्तम असल्यामुळें त्याला यश लाभलें. त्याचें चारित्र्यही चांगलें नव्हतें; परंतु लोकांच्या मनाचा ठाव त्यानें बरोबर घेतला. त्याच्या जोरावरच तो आयर्लंडचा अनभिषिक्त राजा बनला. 'स्वराज्याची' ऊर्फ होमरूलची चळवळ त्याच्यामुळेंच आयर्लंडमध्यें जोरानें फोफावली. पार्लमेंटमधील सनदशीर अडवणुकीचें धोरण त्यानें स्वीकारलें व तासन्तास भाषणें करून पार्लमेंटच्या चालत्या गाड्यास त्यानें आपल्या अनुयायांच्या मदतीनें अनेक वेळां खीळ घातली. जमिनीचा दुसरा कायदा पास झाल्यावर पार्नेलनें आयर्लंडमध्यें त्याच्या निषेधार्थ जोरानें चळवळ सुरू केली; व त्यामुळें आयर्लंडांत अत्याचारही माजले. तेव्हां त्याला व त्याच्या कांहीं सहकाऱ्यांस अटक करण्यांत आली. तुरुंगांत असतांच त्यानें एक जाहीरनामा काढून शेतकऱ्यांनीं खंड देऊं नये असें सांगितलें. त्यामुळें चळवळ जोरावली. लगेच सरकारनें दडपशाही सुरू करून शेतकी संघ बेकायदा ठरविला. त्यामुळें आयर्लंडांत गुप्त मंडळें स्थापन होऊं लागलीं. पुढें पार्नेलला सोडून देण्यांत आलें. देशांत शांतता नांदेल असें वाटल्यावरूनच ग्लॅडस्टननें पार्नेलची सुटका केली पण त्याचा अंदाज चुकला. सन १८८२ मध्यें आयर्लंडचा सेक्रेटरी लॉर्ड फ्रेडरिक कॅव्हेंडिश व त्याचा दुय्यम टॉमस हेन्री बर्क यांचा डब्लिनच्या फोनिक्स पार्कमध्यें ब्रॅडी नांवाच्या एका आयरिश गृहस्थानें खून केला. तेव्हां सरकारनें आणखी एक दडपशाही कायदा करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संशयावरून कोणासही पकडण्याचा व ज्यूरीच्या मदतीशिवाय त्यांच्या खटल्याचा झटपट निकाल करण्याचा मॅजिस्ट्रेटला अधिकार दिला. तरीही पुढें अनेक वर्षें आयर्लंडमध्यें अत्याचार चालू होते. त्यामुळेंच ग्लॅडस्टननें आयरिश लोकांस संतुष्ट करण्याकरितां त्यांस होमरूल देण्याची खटपट करण्यास सुरुवात केली.

५. पार्लमेंटची सुधारणा-तिसरा कायदा (१८८४-८५):— आयर्लंडमधील गडबड चालू असतांच ग्लॅडस्टननें पार्लमेंटची सुधारणा करण्याकरितां सन १८८४ मध्यें पार्लमेंटच्या सुधारणेचा तिसरा कायदा पास करून घेतला. सन १८३२ व सन १८६७ सालीं असेच कायदे पास झाले होते; परंतु अजूनही मजुरांस व शेतमजुरांस मतदानाचा अधिकार मिळालेला नव्हता. त्यामुळें तो वर्ग असंतुष्ट राहिला होता. सन १८८४ च्या कायद्यानें खालील गोष्टी ठरविल्या. (१) खेड्यांतील शेतकरी व शेतमजूर यांस, दहा पौंड भाडें भरणाऱ्या खेड्यांतील भाडेकऱ्यांस व परगण्यांतील सर्व घरमालकांस मतदानाचा अधिकार असावा. (२) हा अधिकार स्कॉटलंड, आयर्लंड व इंग्लंडमधील सर्व लोकांस मिळावा. हें बिल कॉमन्ससभेंत पास झालें. परंतु उमरावमंडळानें त्याला संमति देण्याचें नाकारलें. तें बिल पास झाल्यास कंझर्व्हेटिव्हपक्षास बहुमत मिळणार नाहीं असें उमरावमंडळाचें म्हणणें होतें. त्या मंडळांत कंझर्व्हेटिव्हपक्षाचें बहुमत असल्यानें मोठा पेंच उत्पन्न झाला. मतदारसंघाची लोकसंख्येच्या दृष्टीनें पुनर्रचना करावी असा उमरावांनीं हट्ट घेतला. त्यानें राष्ट्रांत खळबळ उडाली व उमरावमंडळ कायमचें रद्द तरी करा किंवा त्याची सुधारणा करा असें लोक म्हणूं लागले. त्यामुळें सर्व प्रकरण विकोपास गेलें. शेवटीं राणीनें मध्यस्थी करून तो वाद मिटविला. विरोधीपक्षाच्या संमतीनें ग्लॅडस्टननें मतदारसंघाची पुनर्रचना करण्याचें ठरवून त्याप्रमाणें सन १८८५ मध्यें त्यासंबंधाचा कायदा पार्लमेंटमध्यें पास करून घेतला. त्या अन्वयें खालील गोष्टी ठरल्या. (१) पंधरा हजारांखालीं लोकवस्ती असलेल्या गांवांस प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार नसावा. (२) पन्नास हजारांखालीं लोकवस्ती असलेल्या गांवांस एकच प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार असावा. (३) पन्नास हजार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ते दीड लाख लोकवस्तीच्या शहरांस दोन प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार असावा. (४) परगणे व मोठमोठीं शहरें यांचे समान विभाग ऊर्फ वॉर्ड्स पाडून त्या प्रत्येकास एक प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार असावा. हा कायदा पास झाल्यानें मजुरांस मताधिकार मिळाला व इंग्लंडमधील मतदारांची संख्या सन १८६७ मध्यें दहा लाख होती ती आतां वीस लाख झाली. पार्लमेंटच्या सभासदांची संख्या पूर्वी ६५८ होती ती आतां ६७० झाली. हा कायदा पास झाल्यानें इंग्लंडांत खरी लोकशाही सुरू झाली.

६. **परराष्ट्रीय धोरण :—(अ) अफगाणिस्थान**—ग्लॅडस्टन मुख्य प्रधान झाला त्या वेळीं अफगाणिस्थानाशीं युद्ध चालू होतें. लॉर्ड रॉबर्टस् याला तिकडे पाठविण्यांत आलें. ग्लॅडस्टननें चढावाचें धोरण टाकून देऊन अलिप्तपणाचें धोरण स्वीकारलें. त्याप्रमाणें लॉर्ड रॉबर्टस् यानें काबूलला अडकलेल्या इंग्रज बायकामुलांस सोडवून आणल्यावर हिंदुस्थानचा व्हाइसरॉय लॉर्ड रिपन यानें अफगाणिस्थानाशीं तह केला व अबदुल रहमान यास अमीर म्हणून मान्यता दिली. ग्लॅडस्टनचें हें धोरण 'आत्मनाशाचें धोरण आहे' असें डिझरेलीनें सांगितलें. तरीही लोकांस तें धोरण एकंदरींत मान्य झालें. **(आ) ट्रान्सव्हाल**–१८७७ सालीं बेकन्सफील्डनें बोअर लोकांची ट्रान्सव्हाल नामक वसाहत ब्रिटिश साम्राज्यांत सामील करून घेतली. यामुळें बोअर लोकांस राग आला; व त्यांनीं त्या गोष्टीचा निषेध केला. त्याच वेळीं त्यांना स्वातंत्र्य देण्यांत येईल असें जाहीर होऊनही त्यांस स्वातंत्र्य देण्यांत आलें नाहीं. यामुळें ते लोक चिडले; व त्यांनीं युद्धास सुरुवात केली. मजुबा येथें एक छोटी लढाई झाली (१८८१) व त्यांत इंग्रजांचा पराभव झाला. तेव्हां तहाच्या वाटाघाटी होऊन ट्रान्सव्हालमधील बोअर लोकांच्या स्वातंत्र्यास मान्यता देण्यांत आली. मात्र त्यांनीं साम्राज्यांत रहावें, ब्रिटिशांचें वर्चस्व मान्य करून ट्रान्सव्हालचें परराष्ट्रीय धोरण ब्रिटिशांच्या हातीं ठेवावें व अंतर्गत गोष्टींचा कारभार बोअर लोकांनीं चालवावा असें ठरलें. या तहास पुढें मान्यता मिळाली. **(इ) इजिप्त**—डिझरेली ऊर्फ बेकन्सफील्ड यानें इजिप्तचा खेदीव इस्माइल याच्याकडून सुवेझ कालव्याचे शेअर विकत घेतले, त्याच वेळीं इजिप्तमध्यें फ्रान्स व इंग्लंड यांची 'दुहेरी सत्ता' स्थापन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाली होती. इजिप्तची आर्थिक दिवाळखोरी नष्ट करून तेथें स्थीरस्थावरता स्थापन करण्याचें फ्रेंच व इंग्रज यांनीं कबूल केलें होतें. पुढें इस्माइलला राज्यत्याग करण्यास लावून ब्रिटिशांनीं त्याचा मुलगा त्यूफिक याला खेदीव केलें. त्यावेळीं अरेबी बे यानें बंड केलें; परंतु लष्कराच्या साहाय्यानें इंग्लंडनें तें मोडून टाकलें. अरेबीस हद्दपार करण्यांत आलें. यानंतर इजिप्तवरील फ्रान्स व इंग्लंड यांची 'दुहेरी सत्ता' नष्ट करण्यांत आली; तरीही इंग्लंडनें तेथें आपलें वर्चस्व स्थापन केलें व इजिप्त इंग्लंडच्या संरक्षणाखालीं आलें.

(ई) सूडान— इजिप्तमधील कटकट नामशेष होत होती त्याच वेळीं महादी नामक एका काफिरानें सूडानांत बंड केलें. चार्ल्स जॉर्ज गॉर्डन हा त्यावेळीं सूडानचा गव्हर्नर होता. सूडान प्रांत इजिप्तच्या ताब्यांत होता; परंतु इजिप्तच्या सरकारला महमद अहमद ऊर्फ महादी याच्या बंडाचा बीमोड करतां येणें अशक्य झालें. तेव्हां इंग्लंडनें खेदीव व महादी यांच्यांत तह घडवून आणावा असें जॉर्ज गॉर्डनला सुचविलें; परंतु त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून गॉर्डननें महादीचें बंड मोडून सूडानमध्यें सुराज्य स्थापण्याचें ठरविलें. तेव्हां महादीनें खार्टूमवर हल्ला करून तेथील किल्ल्याला वेढा दिला. त्यांत गॉर्डन अडकला होता. तेव्हां संरक्षण करणें जरूर होतें. त्याकरितां सरकारनें त्याच्या मदतीस फौज पाठविली. परंतु ती पोंचण्यापूर्वींच महादीनें गॉर्डनला कैद करून त्याचा शिरच्छेद केला. ही गोष्ट इंग्लंडमध्यें कळल्यावर ग्लॅडस्टनच्या प्रधानमंडळाचा निषेध करण्यांत येऊं लागला. शेवटीं सूडान-संबंधींही ग्लॅडस्टननें अलिप्तपणाचें धोरण स्वीकारलें व तेथील ब्रिटिश फौजा त्यानें परत बोलाविल्या.

७. इतर कामगिरी :—सन १८८० मध्यें चार्ल्स ब्रॅडलॉ नामक पार्लमेंटच्या एका सभासदानें पार्लमेंटमध्यें राजनिष्ठेची शपथ घेण्याचें नाकारलें. तो नास्तिक होता व म्हणून 'शपथ न घेतां माझ्या सदसद्विवेकास अनुसरून राजनिष्ठा मी प्रदर्शित करतों, त्याचा स्वीकार व्हावा' अशी त्यानें विनंति केली. ती अमान्य करण्यांत येऊन त्याच्यावर खटला भरण्यांत आला. न्यायकोर्टानें त्याचें म्हणणें मान्य केलें नाहीं; तरी तो पार्लमेंटमध्यें बसूं लागला. तेव्हां पार्लमेंटनें त्याची हकालपट्टी केली व पार्लमेंटमध्यें बसण्याची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यास मनाई केली. त्यावेळीं ग्लॅडस्टननें 'शपथ घेण्याची सक्ति पार्लमेंटच्या सभासदांवर करूं नये; सभासदाचा प्रतिज्ञालेखही मान्य करण्यांत यावा' अशा अर्थाचें एक बिल पार्लमेंटमध्यें मांडलें; परंतु तें नापास झालें. सन १८८० मध्यें प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यांत आलें; सन १८८३ त दुसरा एक कायदा पास करण्यांत येऊन पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळीं होत असलेल्या लांचलुचपतीच्या प्रकारांवर कडक नियंत्रण घालण्यांत आलें. तसेंच निवडणुकीचा खर्च योग्य प्रमाणांतच व्हावा असें ठरविण्यांत आलें. यानंतर सन १८८५ च्या अंदाजपत्रकावर विरोधीपक्षानें हल्ला चढविल्यानें ग्लॅडस्टननें राजीनामा दिला. त्यामुळें कंझर्व्हेटिव्ह पुढारी लॉर्ड सॅल्सबरी मुख्य प्रधान झाला; परंतु नंतर झालेल्या निवडणुकींत लिबरलपक्षाला मताधिक्य मिळाल्यानें ग्लॅडस्टन तिसऱ्यांदां मुख्य प्रधान झाला.

८. ग्लॅडस्टनचें तिसरें प्रधानमंडळ (१८८६):—मुख्य प्रधान झाल्यावर ग्लॅडस्टननें प्रथमतः आयर्लंडकडे लक्ष देण्याचें ठरविलें. सन १८८२ मध्यें कॅव्हेंडिश व बर्क यांच्या खुनाच्या प्रकरणानंतर अर्ल स्पेन्सर आयर्लंडचा लॉर्ड लेफ्टेनंट झाला. त्याच वर्षी पार्नेलनें 'राष्ट्रीय संघ' स्थापन केला. आयर्लंडला स्वातंत्र्य अर्थात होमरूल मिळवून देणें हा त्या संघाचा मुख्य उद्देश होता. आयर्लंडची पार्लमेंट स्वतंत्र झाली म्हणजे ती अंतर्गत भानगडी मिटवील असें पार्नेलचें म्हणणें होतें. सन १८८३ मध्यें कॅव्हेंडिश व बर्क यांच्या खुनी माणसांस पकडण्यांत आलें व त्यांस शिक्षा झाली. त्यानंतर स्पेन्सरनें आयर्लंडांत शांतता स्थापन केली. मात्र पार्नेलची होमरूलची चळवळ जोरांत सुरू झाली. तेव्हां आयर्लंडला साम्राज्यांतर्गत स्वराज्य द्यावें असें ग्लॅडस्टनलाही वाटूं लागलें. सन १८८६ मध्यें झालेल्या निवडणुकींत ८६ आयरिश सभासद निवडून आले होते. ते सर्व पार्नेलचे अनुयायी असल्यानें त्यांची मदत मिळेल असें ग्लॅडस्टनला वाटलें. लगेच ग्लॅडस्टननें आपलें पहिलें होमरूल बिल पार्लमेंटमध्यें सन १८८६ मध्यें मांडलें. त्यांत त्यानें खालील गोष्टी सुचविल्या होत्या. (१) आयर्लंडमध्यें एक स्वतंत्र पार्लमेंटसभा असावी व तिचीं वरिष्ठ व कनिष्ठ अशीं दोन मंडळें असावीं. (२) इंग्लंडच्या पार्लमेंटमध्यें एकही आयरिश गृहस्थ नसावा. (३) राजसत्ता, आरमार, लष्कर,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परराष्ट्रीय धोरण, जकाती वगैरेसंबंधीं इंग्लिश पार्लमेंटनें कायदे पास करावे; व आयरिश पार्लमेंटनें फक्त अंतर्गत कारभार पहावा. (४) आयर्लंडांतील प्रॉटेस्टंट धर्मपीठाचें संरक्षण करण्यांत यावें. (५) आयर्लंडचें कार्यकारीमंडळ अथवा प्रधानमंडळ आयरिश पार्लमेंटला जबाबदार रहावें. या होमरूल बिलाप्रमाणेंच त्यानें 'जमीनीच्या खरेदीचें बिल' पार्लमेंटपुढें मांडलें. आयरिश जमीनदारांची जमीन आयरिश शेतकऱ्यांस घेतां यावी म्हणून त्यांस पुरविण्याकरितां आयर्लंडला कांहीं रक्कम देण्यांत यावी; मात्र जमिनींच्या किंमती कोर्टानें ठरवून द्याव्या.

९. होमरूल बिलाचा परिणाम :— ग्लॅडस्टननें आयर्लंडकरितां होमरूलची चळवळ हातीं घेतली हें कळतांच अनेक लिबरल पुढारी त्याच्यावर संतापले होते. त्यामुळें त्याच्या होमरूल बिलाला अनेक लिबरल लोकांनीं कसून विरोध करण्याचें ठरविलें. जॉन ब्राइट, हार्टिंग्टन, जोसेफ चेंबर्लेन, गॉसचेन वगैरे लिबरल पुढाऱ्यांनीं त्याला विरोध केला. अर्थात होमरूल बिलानें लिबरलपक्षांत फूट पडून होमरूलवाले (अर्थात ग्लॅडस्टनचे अनुयायी) व एकीकरणवाले म्हणजे 'यूनियनिस्टस्' असे दोन पक्ष निर्माण झाले. कंझर्व्हेटिव्हपक्षाला तें बिल कधींही मान्य होण्यासारखें नव्हतें. तेही आयर्लंडला स्वराज्य देऊं नये, एकीकरण चालू ठेवावें, असें म्हणणारे होते. अर्थात एकीकरणवाल्या लिबरल पुढाऱ्यांनीं कंझर्व्हेटिव्हपक्षाच्या बाजूनें मतें दिलीं. त्यामुळें होमरूल बिल ३११ विरुद्ध ३४१ इतक्या मतांनीं नापास झालें. खुद्द राणीलाही तें बिल आवडलें नाहीं. होमरूल बिलाप्रमाणेंच ग्लॅडस्टनचें जमिनीसंबंधींचेंही बिल नापास झालें. एकीकरण रद्द करून आयर्लंडला स्वराज्य दिलें तर आयरिश लोकांस राज्यकारभार करतां यावयाचा नाहीं, कॅथॉलिकांचें राज्य सुरू झाल्यानें तेथें प्रॉटेस्टंटांचा छळ होईल व मुख्य म्हणजे इंग्लिश पार्लमेंट सामर्थ्यहीन होईल, असें विरोधकांस वाटत होतें. होमरूल बिल नापास झाल्यावर पार्लमेंटची पुन्हां निवडणूक झाली. त्यांत ग्लॅडस्टनला बहुमत न मिळाल्यानें त्यानें राजीनामा दिला; अर्थात कंझर्व्हेटिव्ह पुढारी लॉर्ड सॅल्सबरी मुख्य प्रधान झाला. एकीकरणवाले पुढें लिबरलपक्षांतून कायमचे फुटून निघाले व ते कंझर्व्हेटिव्हपक्षांत सामील झाले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यामुळेंच लॉर्ड सॅल्सबरीचा पक्ष जोरदार झाला; व त्यामुळेंच कंझर्व्हेटिव्ह पक्षाच्या हातीं पुढें सहा वर्षें सत्ता टिकली.

अभ्यास

१. ग्लॅडस्टनच्या दुसऱ्या व तिसऱ्या प्रधानमंडळाची कामगिरी सांगा.

२. ग्लॅडस्टनला आयरिश लोकांस होमरूल द्यावें असें कां वाटलें ? त्याचें होमरूल बिल नापास कां झालें ? त्याचा परिणाम काय झाला ?

३. चार्ल्स स्टुअर्ट पार्नेल याचें थोडक्यांत चरित्र सांगा. आयर्लंडला होमरूल मिळवून देण्याकरितां त्यानें कोणकोणत्या मार्गांचा अवलंब केला ? त्याचा परिणाम काय झाला ?

४. एकोणिसाव्या शतकांत पार्लमेंटची सुधारणा करण्याकरितां जे निरनिराळे कायदे पास झाले त्यांची परिणामांसह थोडक्यांत हकीगत सांगा.

५. थोडक्यांत मुद्देसूद टिपणें करा :—

आयरिश जमिनीसंबंधीं कायदे, पार्लमेंटच्या सुधारणेसंबंधींचा तिसरा कायदा, लॉर्ड गॉर्डन.

उतारा

१. आयर्लंडच्या होमरूल बिलावर ग्लॅडस्टनचें भाषण—१८८६

आज आयरिश लोकांचें खरें हृद्गत आपल्याला कळत आहे. आयर्लंडची इच्छा काय आहे, त्याची आकांक्षा काय आहे, त्या राष्ट्राला काय पाहिजे आहे, तें दिलें तर तें राष्ट्र काय करूं शकेल हें आज आपल्याला कळत आहे. आपल्याला एका राष्ट्राशीं आज झगडा करावयाचा आहे. एखाद्या राष्ट्राची मागणी सयुक्तिक व योग्य असली तर ती आपल्याला अवमानितां येईल काय ? योग्य संधि व अनुकूल परिस्थिति असली तर ती मागणी मान्य करावयास काय हरकत आहे ? एखाद्या राष्ट्राची मागणी सन्मानपूर्वक मान्य करणें व जबरदस्तीमुळें ती आपल्यावर लादून घेणें यांत महदंतर आहे. एकामुळें आपल्याला कृतज्ञतेचा लाभ होईल, तर दुसरीमुळें अपमान व बेअब्रू आपल्या पदरीं पडेल. आयर्लंडच्या बाबतींत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आज आपल्याला सुवर्णसंधि प्राप्त झालेली आहे. ती आपण गमावूं नये. आयर्लंड देश आज अत्यंत आशाळभूतपणें आपल्याकडे डोळे लावून बसला आहे. त्या राष्ट्राचा प्रत्येक शब्द सत्यानें व कळकळीनें भारलेला आहे. त्याच्या प्रत्येक शब्दांत गांभीर्य भरलेलें आहे. त्या राष्ट्राला जें काय द्यावयाचें असेल तें पूर्वपरंपरा ओळखून द्या असें सांगण्यांत येतें. त्या बाबतींत मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, जगाच्या कोनाकोपऱ्यांत जा, सर्व राष्ट्रांतील वाङ्मयावर हल्ला करा, तेथील पुस्तकें चाळा, तेथील वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने अभ्यासा, तेथील लोकांचीं मतें व विचार यांची माहिती करून घ्या. इतकें केल्यावर तुम्हांस काय आढळेल ? आयर्लंडसंबंधीं इंग्लंडनें स्वीकारलेल्या धोरणावर जहाल टीका व त्या धोरणाचा धिःक्कारच तुम्हांस पहावयास मिळेल ! याच परंपरेवर आपण जगावयाचें काय ? आपल्या थोर राष्ट्राच्या कीर्तीवर तो मोठा कलंक आहे असेंच मी मानतों.

प्रश्न :—१. आयर्लंडला स्वराज्य द्यावें असें ग्लॅडस्टनला कां वाटलें ?

२. त्या बाबतींत त्यानें कोणते मुद्दे पुढें मांडले ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—१८६७-१८८६

प्रमुख व्यक्ति	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	वर्ष	हिंदुस्थान-महत्त्वाच्या गोष्टी	युरोप-महत्त्वाच्या गोष्टी
डिझरेली, ग्लॅडस्टन	पार्लमेंटचा दुसरा सुधारणा कायदा	१८६७		
	आयरिश धर्मपीठ रद्द	१८६९	लॉर्ड मेयो ग. ज. १८६९-७२	सुवेज कालवा सुरू
फॉर्स्टर,	प्राथमिक शिक्षणाचा कायदा	१८७०		आयरिश जमिनीचा कायदा
कार्डवेल,	लष्करांतील सुधारणा	१८७१		फ्रँको-जर्मन युद्ध
	गुप्तमतदान-कायदा	१८७२	लॉर्ड नॉर्थब्रुक ग. ज. १८७२-७६	अल्बामा प्रकरण
	वरिष्ठ कोर्ट स्थापन	१८७३		
पार्नेल,	मजुरांच्या घरांसंबंधीं कायदा	१८७५	राजपुत्राचें हिंदु. आगमन	
	प्राथमिक शिक्षण सक्तीचें	१८७६	लॉर्ड लिटन ग. ज. १८७६-८०	
		१८७७	व्हिक्टोरिया हिंदु. ची साम्राज्ञी	
रॉबर्टस्,	बर्लिनची परिषद	१८७८	दुसरें अफगाण युद्ध	
		१८८०	लॉर्ड रिपन ग. ज. १८८०-८४	
गॉर्डन, किचनेर,		१८८१		आयरिश जमिनीचा कायदा
रानडे, चिपळुणकर,	पार्लमेंटचा तिसरा सुधा. कायदा	१८८४		
टिळक,		१८८५	पेनजेह प्रकरण. राष्ट्रीय सभेची स्थापना	गॉर्डनचा खून
	पहिलें होमरूल बिल	१८८६		

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. व्हिक्टोरिया राणीची अखेर

१. लॉर्ड सॅल्सबरीचें दुसरें प्रधानमंडळ (१८८६–१८९२) :—

लॉर्ड सॅल्सबरी

लॉर्ड सॅल्सबरी पक्का साम्राज्यवादी होता. त्याचा जन्म सन १८३० मध्यें झाला होता; व सन १८५३ मध्यें तो पार्लमेंटमध्यें प्रथम निवडून आला. सन १८६६ पासून १८७४ पर्यंत तो भारतमंत्रि होता. लोकशाहीचा त्यानें कधींही पुरस्कार केला नाहीं; जुन्या तत्त्वांस चिकटून राहून नव्या सुधारणांस त्यानें एकसारखा विरोध केला. त्याची वृत्ति समाधानी व धार्मिक होती. पुराणमतवादी असल्यामुळें त्याचीं मतें त्यावेळीं अनेकांस पटत नसत; देशाभिमान, प्रामाणिकपणा, सचोटी, परराष्ट्रीय व्यवहारांची उकल करण्याची त्याची हातोटी वगैरे गुणांमुळेंच तो त्याच्या अनुयायांस आवडे. मात्र त्याचा स्वभाव फटकून वागण्याचा असल्यानें तो तितकासा प्रिय नसे. तो उत्तम परराष्ट्रमंत्रि होता. डिझरेलीचें चढावाचें धोरण त्यानें अंगिकारलें होतें. इंग्लंडची प्रतिष्ठा वाढविणें हाच त्याचा मुख्य उद्देश होता. आयरिश लोकांस होमरूल देऊं नये असें त्याचें मत होतें. त्याच्या प्रधानमंडळांत लॉर्ड रॅन्डॉल्फ चर्चिल व आर्थर बाल्फोर हे नाणावलेले वक्ते होते. जोसेफ चेंबर्लेन कॉमन्ससभेचा पुढारी होता.

२. आयर्लंडसंबंधीं धोरण :—आर्थर बाल्फोर हा आयर्लंडचा प्रधान झाला. तो दडपशाहीचा पुरस्कर्ता होता. आयर्लंडमध्यें अत्याचारांस ऊत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आला होता. होमरूल बिल नापास झाल्यानें आयरिश लोक खवळले होते व म्हणूनच त्यांनीं अत्याचार सुरू केले; परंतु त्यांना पकडून न्यायकोर्टांत उभे केले तर आयरिश ज्यूरर्स त्यांना निर्दोषी म्हणून सोडून देत. ही स्थिति लक्षांत घेऊन बाल्फोरनें सन १८८७ मध्यें एक कायदा पास करून घेतला. त्याला 'गुन्ह्यांचा कायदा' असें म्हणतात. त्या कायद्यानें आयर्लंडांत ज्यूरी पद्धति रद्द केली व ठिकठिकाणीं मॅजिस्ट्रेट नेमण्यांत आले. तसेंच वाटल्यास कांहीं खटले खुद्द इंग्लंडमध्यें चालविण्याचीही वरील कायद्यानें सवलत दिली होती. त्याच वर्षी आयरिश जमिनीसंबंधीं त्यानें एक कायदा पास केला. या कायद्यान्वयें जमिनीच्या खंडाची फेरतपासणी व्हावी व जमीन विकत घेणाऱ्यांस अधिक सवलती मिळाव्यात असें ठरलें. दडपशाही कायद्यानें आयरिश जास्तच चिडले. जमीनधाऱ्याबद्दल तंटे चाललेच होते; होमरूलची चळवळही जोरांत होती. खुद्द ब्रिटिश पार्लमेंटमध्यें पार्नेलच्या पुढारीपणाखालीं सुमारें शंभर आयरिश सभासद होते व तेथेंही त्यांनीं सनदशीर विरोध करण्याचें धोरण चालू ठेविलें होतें. सन १८८८ मध्यें लंडन टाइम्सनें पार्नेलच्या सहीचें एक पत्र प्रसिद्ध करून लोकांस चांगलाच धक्का दिला. पार्नेल खुनाला व अत्याचाराला उत्तेजन देतो असें त्या पत्रावरून सिद्ध होत होतें. पार्नेलनें त्या पत्राचा निषेध केला; तरीही पार्लमेंटनें त्या प्रकरणाची चौकशी करण्याकरितां एक कमिशन नेमलें. चौकशीअंतीं तें पत्र बनावट होतें असें सिद्ध झालें व पार्नेलनें खुनास व अत्याचारास कधींही उत्तेजन दिलें नाहीं असें सिद्ध झालें. परंतु सन १८९० मध्यें पार्नेलचा अधःपात झाला. त्याला त्याचें स्वतःचें दुर्वर्तनच कारणीभूत झालें. ओशिया नामक एका स्त्रीशीं पार्नेलचा वाईट संबंध होता असें सिद्ध झालें व त्यामुळें पार्नेलवरील कॅथॉलिकांचा विश्वास उडाला. आयरिशपक्षानें त्याचें पुढारीपणही रद्द केलें. शेवटीं तो सन १८९१ मध्यें मृत्यु पावला. त्यावेळीं त्याचें वय अवघें पंचेचाळीस वर्षांचें होतें. बाल्फोरनें प्रथमतः जरी दडपशाही आरंभिली, तरी पुढें त्यानें आयर्लंडसंबंधीं थोडें उदार धोरण स्वीकारलें व सन १८९० मध्यें 'जमिनीच्या खरेदीचा कायदा' पास केला. त्या कायद्यानें खालील गोष्टी ठरल्या. (१) जमिनीच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंमती ठरविण्याकरितां एक स्वतंत्र पण मध्यवर्ती खातें निर्माण करण्यांत यावें. (२) त्यानेंच जमिनीसंबंधींच्या सर्व प्रश्नांचा निकाल करावा. (३) कोणास जमीन खरीद करावयाची असेल तर त्याला सरकारनें त्या जमिनीची किंमत कर्जाऊ द्यावी व ती हप्त्याहप्त्यानें वसूल करावी. हें बिल पास झाल्यानें आयरिश लोकांचें बरेंच समाधान झालें.

३. स्थानिक स्वराज्याचा कायदा (१८८८):—सॅल्सबरीच्या प्रधानमंडळानें सन १८८८ मध्यें स्थानिक स्वराज्यासंबंधीं कायदा पास केला. त्या कायद्यानें खालील गोष्टी ठरल्या. (१) प्रत्येक परगण्यांत एक याप्रमाणें इंग्लंडमधील साठ परगण्यांत साठ 'परगणामंडळें' स्थापण्यांत यावींत व त्यांची दर तीन वर्षांनीं निवडणूक व्हावी. त्यांचा अध्यक्षही लोकनियुक्तांनीं आपल्यांतूनच निवडावा. (२) या मंडळांनीं आपल्या परागण्यांतील आरोग्य, दळणवळण, पूल बांधणें, शिक्षण वगैरे गोष्टींचा कारभार करावा. (३) लंडन शहराकरितां एक स्वतंत्र मंडळ असावें; मात्र लंडनची कॉर्पोरेशन रद्द न करतां तिचे पूर्वींचे अधिकार कायम रहावेत. (४) या मंडळांच्या निवडणुकीच्या वेळीं कर देणाऱ्या सर्वांस मतदानाचा अधिकार असावा. हा कायदा पास झाल्यानें खेड्यांतील लोकांसही लोकशाहीच्या तत्त्वांचें शिक्षण मिळण्याची सोय झाली. कंझर्व्हेटिव्हपक्ष उदार तत्त्वांचा पुरस्कर्ता झाल्याचें या कायद्यानें लोकांच्या निदर्शनास आणलें. हा कायदा सन १८९० मध्यें स्कॉटलंडलाही लागू करण्यांत आला. या परगणामंडळांस सन १८९० मध्यें बीर व स्पिरिट यांवर कर बसविण्याची परवानगी मिळाली; मात्र तें उत्पन्न त्यांनीं औद्योगिक शिक्षणाकडे खर्चावें अशी अट त्यांच्यावर घालण्यांत आली. सन १८९१ मध्यें प्राथमिक शिक्षण मोफत करण्याचें ठरलें; सन १८८० सालींच तें सक्तीचें करण्यांत आलें होतें. मुलांची फी सरकारनें भरावी, पालकांनीं नव्हे, असें नव्या कायद्यानें ठरविलें.

४. ग्लॅडस्टनचें चौथें प्रधानमंडळ (१८९२–९४):—सन १८९२ मध्यें पार्लमेंटची निवडणूक झाली. त्यांत ग्लॅडस्टनचा लिबरलपक्ष बहुमतानें निवडून आला. त्यामुळें लॉर्ड सॅल्सबरीनें राजीनामा दिला व ग्लॅडस्टन मुख्य प्रधान झाला. ताबडतोब त्यानें सन १८९३ मध्यें आपलें सुधारलेलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसरें होमरूल बिल पार्लमेंटपुढें मांडलें. कॉमन्ससभेंत तें थोड्या मतांनीं पास झालें. परंतु उमरावमंडळानें तें नापास केलें. या पराभवानंतर ग्लॅडस्टननें राजीनामा न देतां दुसऱ्या कांहीं चांगल्या गोष्टी केल्या. सन १८९४ मध्यें ग्रामपंचायतींचा कायदा पास करण्यांत आला. त्या कायद्यान्वयें प्रत्येक खेड्यांत लोकनियुक्त ग्रामपंचायती स्थापन करण्यांत याव्यात असें ठरलें. मात्र तीनशें लोकसंख्या नसलेल्या गांवीं अशा ग्रामपंचायती असूं नयेत असें ठरविण्यांत आलें होतें. या पंचायतींकडे गांवचीं अनेक कामें सोपविण्यांत आलीं. हा कायदा पास झाल्यानें इंग्लंडांतील लोकशाहीचें बीज खेड्यापर्यंत पोचलें. हा कायदा पास झाल्यानंतर ग्लॅडस्टननें राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें. त्यावेळीं त्याचें वय पंचाऐशीं होतें. पुढें सन १८९८ मध्यें हा थोर मुत्सद्दी, उत्तम वक्ता, उत्कृष्ट फडणीस व धर्मशील गृहस्थ वेल्समधील हार्डेन गांवीं आपल्या राहत्या घरीं मृत्यु पावला.

५. लॉर्ड रोजबरीचें प्रधानमंडळ (१८९४–९५):—ग्लॅडस्टननें मुख्य प्रधानाच्या जागेचा राजीनामा दिल्यानंतर लॉर्ड रोजबरी मुख्य प्रधान झाला (१८९४). त्यावेळीं सर विल्यम हर्वर्ट हा फडणीस होता. आरमारावर जास्त खर्च करणें जरुरीचें आहे, असें त्याचें म्हणणें होतें. तें ग्लॅडस्टनला मान्य नसल्यामुळें ग्लॅडस्टननें राजीनामा दिला होता. ग्लॅडस्टननंतर हर्वर्ट फडणीस राहिला व त्यानें आपल्या म्हणण्याप्रमाणें आरमारी खर्च जास्त धरला व पूर्वीचे कर वाढवून कांहीं नवे बसविले. वारसा कर त्यानें प्रथमच सन १८९४ मध्यें बसविला. सरदार, जहागिरदार, श्रीमंत, व्यापारी वगैरे मृत झाले म्हणजे त्यांची इस्टेट त्यांच्या वारसाकडे जाई. त्यावेळीं हा कर वसूल करण्यांत यावा व तो दिला नाहीं तर त्याला ती इस्टेट मिळूं नये असें कायद्यानें ठरविलें. या करास त्यावेळीं पुष्कळ विरोध झाला. त्यानंतर या मंत्रिमंडळानें विशेष असें कांहींच केलें नाहीं. शेवटीं एका बिलाचे वेळीं प्रधानमंडळाचा पराभव झाल्यानें सन १८९५ मध्यें रोजबरीनें राजीनामा दिला. त्यानंतर पार्लमेंटची निवडणूक झाली. त्यांत कंझर्व्हेटिव्ह पक्षास बहुमत मिळाल्यानें लॉर्ड सॅल्सबरी इंग्लंडचा मुख्य प्रधान झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. लॉर्ड सॅलसबरीचें तिसरें प्रधानमंडळ (१८९६–१९०२):— सॅलसबरीच्या तिसऱ्या प्रधानमंडळांत बाल्फोर, जोसेफ चेंबर्लेन, डेव्हनशायरचा ड्यूक वगैरे नामांकित लोक होते. याच वेळीं लिबरलपक्षीय 'एकीकरणवाले' कंझर्व्हेटिव्हपक्षांत पूर्णपणें विलीन झाले. साम्राज्याच्या संघटनेकरितां या प्रधानमंडळानें अखंड खटपट केली. जोसेफ चेंबर्लेननें त्या बाबतींत पुढाकार घेतला होता. सन १८९७ मध्यें व्हिक्टोरिया राणी राज्यावर आल्याला साठ वर्षें झाल्यानें मोठा हीरकमहोत्सव करण्यांत आला. त्यावेळीं साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतून त्या त्या भागांचे मुख्य प्रधान लंडनला जमले होते. राजनिष्ठेची अपूर्व लाट त्यावेळीं इंग्लंडमध्यें व साम्राज्यांत उसळली होती. सन १८९८ मध्यें आयर्लंडमध्यें स्थानिक स्वराज्यसंस्था स्थापन कराव्या असें कायद्यानें ठरविण्यांत आलें. नंतर सन १८९९ मध्यें एक मध्यवर्ती शिक्षणसमिति स्थापण्यांत येऊन तिनें इंग्लंड व वेल्स या प्रांतांतील शिक्षणाची व्यवस्था पहावी असें ठरविण्यांत आलें. त्या समितीला मदत व्हावी म्हणून एक कायमची सल्लागारसमितीही स्थापण्यांत येऊन तिनें शिक्षणसमितीस शिक्षणविषयक प्रश्नांसंबंधीं वेळोवेळीं सल्ला द्यावा असें ठरविण्यांत आलें. सन १९०० मध्यें लंडनचें विश्वविद्यालय स्थापन करण्यांत येऊन परीक्षा घेऊन पदव्या देण्याचा व निरनिराळीं विद्यालयें स्थापून शिक्षण देण्याचा अधिकार त्याला मिळाला. सन १८९९ मध्यें लंडन शहराकरितां निरनिराळ्या म्युनिसिपालिट्या असाव्या असें ठरलें. त्याप्रमाणें लंडनचे निरनिराळे २८ विभाग पाडण्यांत येऊन प्रत्येकास म्युनिसिपालिटी मिळाली.

७. परराष्ट्रीय धोरण:— लॉर्ड सॅलसबरी चढावाच्या धोरणाचा पुरस्कर्ता असला व इंग्लंडची प्रतिष्ठा वाढवून ब्रिटिश साम्राज्याला बळकटी आणावी असें त्याचें सर्वसाधारण धोरण असलें तरी निष्कारण भानगडींत पडूं नये असें त्याला वाटत असे. तो पक्का साम्राज्यवादी होता. साम्राज्याचें संघटन करणें जरूर आहे असें त्याला वाटत होतें. सन १८९७ मध्यें व्हेनिझुएला व गियाना यांच्या सरहद्दीबद्दल तंटा लागला. हा प्रदेश दक्षिण अमेरिकेमध्यें होता. तरवारीच्या जोरावर तो तंटा मिटविण्याचा लॉर्ड सॅलसबरीचा विचार होता. परंतु अमेरिकेनें 'मन्रो तत्त्व' पुढें करून तो तंटा मिटविण्याचें काम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लवादमंडळाकडे सोपविलें. त्या लवादमंडळानें इंग्लंडच्या बाजूनें निकाल दिला. यामुळें सॅल्सबरीचा विजय झाला. सन १८९७ मध्यें ग्रीस व तुर्कस्थान यांच्यांमध्यें लढाई उत्पन्न झाली. क्रीट हें बेट तुर्कस्थानच्या ताब्यांत होतें. तेथील ख्रिस्ती लोकांनीं सुलतानाविरुद्ध बंड करून ग्रीकांची मदत मागितली. ती ग्रीक लोकांनीं दिली. त्यांत ग्रीक लोकांचा पराभव झाला. तेव्हां लॉर्ड सॅल्सबरीनें मध्यस्थी केली. ती सुलतानानें फेटाळून लावली. तेव्हां सॅल्सबरीनें इतर राष्ट्रांची मदत घेऊन क्रीटवर हल्ला केला. त्यांत तुर्कस्थानचा पराभव झाला; व क्रीटन लोकांना स्वातंत्र्य मिळालें. त्याच वर्षी हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवरील चित्रळ प्रांतांत गडबड सुरू झाली होती. त्या वेळीं लॉर्ड एलजिन हिंदुस्थानचा व्हाइसरॉय होता. त्यानें फौज पाठवून तें ठिकाण हस्तगत केलें व त्या प्रांतांत शांतता निर्माण केली. त्यानंतर सरहद्दीवर महमंड नामक पठाणांनीं पेशावरपर्यंत धुमाकूळ मांडला. आफ्रिडी लोकांनींही उचल केली. तेव्हां सन १८९८ मध्यें टिरा खोऱ्यांतील आफ्रिडी लोकांविरुद्ध लष्कर पाठवून त्यांस वठणीवर आणण्यांत आलें. याच सुमारास चीनमध्येंही थोडी गडबड सुरू झाली होती. ब्रिटननें चीनमध्यें चंचूप्रवेश करून व्यापारासंबंधीं अनेक सवलती चीनकडून मिळविल्या होत्या. तशाच प्रकारच्या सवलती आपल्याला मिळाव्या म्हणून जर्मनी व रशिया यांनीं प्रयत्न सुरू केले. त्यांत जर्मनीला कियोचू बंदर व रशियाला पोर्ट आर्थर बंदर मिळालें. तेव्हां आपल्यालाही एखादें बंदर मिळावें म्हणून इंग्लंडनें प्रयत्न चालविला. तेव्हां त्यानें सन १८९८ मध्यें वी हाय वी हें बंदर घेतलें व हॉंगकॉंगजवळील थोडा प्रदेशही उपटला. युरोपियन लोकांचें हें आक्रमण चिनी लोकांस पसंत नव्हतें. तेव्हां त्यांनीं युरोपियनांवर दांत धरून त्यांच्याविरुद्ध सशस्त्र बंड उभारलें. या बंडवाल्यांस 'बॉक्सर' असें म्हणत. त्यांनीं पेकिंगमधील युरोपियनांवर शस्त्र उपसलें. तेव्हां सर्व युरोपियन एकत्र झाले व त्यांनीं बंडांतील लोकांचा पराभव केला (१९००); यामुळें इंग्लंडला अनेक व्यापारी सवलती मिळाल्या. मात्र रशिया व जर्मनी यांच्याप्रमाणें इंग्लंडला चीनमध्यें प्रदेश मिळाला नाहीं.

८. सूडान काबीज (१८९८) :—लॉर्ड गॉर्डनचा सन १८८५ मध्यें खून झाल्यावर सूडानसंबंधीं इंग्लंडनें अलिप्तपणाचें धोरण स्वीकारलें होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मात्र इजित व सूडान यांच्या सरहद्दीवर ब्रिटिश फौजा ठेवण्यांत आल्या होत्या. इजिप्तच्या सैन्याची इंग्रजांनीं चांगलीच तयारी केली होती व त्यांनीं सूडानमध्यें आगगाडीचा रस्ताही तयार केला होता. त्यामुळें लष्कराच्या हालचाली करणें अत्यंत सोईस्कर होत होतें. लॉर्ड किचनेर त्यावेळीं इजिप्तच्या सैन्याचा मुख्य सेनापति होता. गॉर्डनच्या खुनाचा सूड उगवावा असें इंग्लिश लोकांस वाटत होतें. तेव्हां लॉर्ड किचनेरला सूडानवर चाल करून जाण्याचा हुकूम देण्यांत आला. त्यानें सूडान प्रांतावर हल्ला करून निरनिराळ्या लढायांत जय मिळविले व खार्टूम शहर काबीज केलें. त्यानंतर सूडान प्रांत इंग्लिशांनीं काबीज करून ब्रिटिश साम्राज्यांत सामील केला (१८९८).

९. फॅशोडा प्रकरण (१८९८):—सूडान प्रांत ब्रिटिशांच्या ताब्यांत गेला याचें फ्रेंचांना वैषम्य वाटलें व त्यांनीं मार्चंड याच्या नेतृत्वाखालीं फौज पाठविली. सूडान प्रांत ब्रिटिशांच्या हातीं गेल्यानें नाईल नदीच्या उगमापर्यंतचा भाग ब्रिटिशांच्या ताब्यांत गेला होता. त्या भागांत नाईल नदीला अत्यंत महत्त्व होतें. कारण ज्याच्या हातीं नाईल त्याची त्या भागांत सत्ता स्थापन होणार होती. या गोष्टीचें वैषम्य वाटल्यानेंच फ्रेंचांनीं मार्चंडला ससैन्य पाठविलें होतें. मार्चंडनें फॅशोडावर हल्ला केला व फ्रेंचांचें निशाण रोविलें. ही गोष्ट कळतांच लॉर्ड किचनेर तिकडे गेला व त्यानें प्रथमतः फॅशोडा आपल्या ताब्यांत घेतलें व फ्रेंच फौजेच्या हालचालीवर नजर ठेवून तो स्वस्थ बसला. यामुळें इंग्लंड व फ्रान्स यांच्यांत लढाई होणार असा रंग दिसूं लागला. तेव्हां फ्रेंचांनीं तहाचें बोलणें सुरू केलें. मार्चंडला परत बोलावण्यांत आलें; व तह झाला. त्यांत सूडानवर इंग्लंड व इजिप्त यांचा जोड अंमल चालावा व सूडानमध्यें व्यापार करण्याची सर्वांस मोकळीक असावी असें ठरलें. तसेंच चाद सरोवराच्या उत्तरेकडील व पूर्वेकडील सूडानच्या सरहद्दीपर्यंतच्या भागावर फ्रेंच सत्ता असावी व चाद सरोवरापासून नाईलपर्यंत ब्रिटिश मुलुख असावा असेंही ठरविण्यांत आलें. यामुळें ब्रिटिशांचा सूडान प्रांतावर व नाईलवर ताबा स्थापन झाला.

१०. बोअर युद्ध— थोडा पूर्वेतिहास:— लॉर्ड सॅल्सबरीच्या वेळीं दक्षिण आफ्रिकेमध्यें बोअर युद्धास सुरुवात झाली. बोअर लोक मूळचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हॉलंडमधील डच लोक होत. सन १६५० मध्यें डच ईस्ट इंडिया कंपनीच्या लोकांनीं गुडहोप भूशिराचा ताबा घेतला व त्यानंतर दोन वर्षांनीं त्यांनीं तेथें डच वसाहत स्थापन केली. पुढें सन १६८७ मध्यें धर्मछळास कंटाळून अनेक फ्रेंच प्रॉटेस्टंट तेथें आले. अशा तऱ्हेनें फ्रेंच व डच एकत्र आले तरी ते एकाच धर्मपंथाचे असल्यानें त्यांच्यांत भेदाभेद न होतां ते गुण्यागोविंदानें तेथें राहूं लागले. पुढें अनेक डच तेथें येऊन राहूं लागले. हे नवे डच लोक जुन्या डच लोकांशीं नीट वागेनात. कारण भाषा, संस्कृति, आचारविचार, राहणी वगैरे बाबतींत त्या दोघांत पुष्कळ फरक होता. यामुळें जुने डच केप कॉलनी सोडून अंतर्भागांत जाऊन राहूं लागले. हे सर्व लोक शेतीभाती करून राहत, म्हणून त्यांस 'बोअर' असें म्हणत. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर फ्रेंचांनीं हॉलंड जिंकून घेतला. त्यावेळीं इंग्रजांनीं केप कॉलनी काबीज करून ती आपल्या साम्राज्यांत सामील केली (१७९५); परंतु अमीन्सच्या तहानंतर ती पुन्हां डच लोकांना देण्यांत आली. पुढें सन १८०६ मध्यें इंग्रजांनीं ती पुन्हां जिंकून घेतली व त्यानंतर ती इंग्लंडकडे कायमचीच राहिली. तेव्हां त्या वसाहतीकडे ब्रिटिशांचा एकसारखा ओघ लागला. त्यामुळें ब्रिटिश व डच वसाहतवाल्यांमध्यें धुसफूस सुरू झाली. बोअर लोक अडाणी होते; पण ते युद्धशास्त्रांत तरबेज होते. इंग्रज लोक त्यांच्या मानानें थोडे होते. त्यामुळें त्यांच्यांत अंतस्थ वैर होतें. त्यावेळीं 'केप कॉलनीचा' कारभार एका इंग्रज गव्हर्नरच्यातर्फे चालत होता. त्याला मदत करणारें एक मंडळही होतें. परंतु बोअर लोकांना राज्यकारभारांत स्थान नव्हतें. पूर्वी डच भाषा दरबारी-भाषा म्हणून मानली जाई, आतां तिची जागा इंग्रजी भाषेनें घेतली. या सर्व गोष्टींमुळें बोअर लोक चिडले. बोअर अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते व ते आफ्रिकेंतील नीग्रो लोकांवर जुलूम करण्याचा आपल्याला जन्मजात अधिकार आहे असें म्हणत. तें इंग्रजांस पटत नसे. त्यामुळें इंग्रजांनीं बोअर लोकांप्रमाणें त्या लोकांसही राजकीय अधिकार दिले. तें कृत्य बोअर लोकांस मान्य झालें नाहीं. त्यामुळेंही ब्रिटिश व बोअर यांचें बिनसलें. त्याच वेळीं काफीर, झुलू, बंटू वगैरे जमातींतील लोकांनीं सन १८२० पर्यंत बोअर लोकांवर हल्ले केले असतां ब्रिटिश लोकांनीं त्यांस मदत केली नाहीं. त्यामुळेंही बोअर लोक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिडले होते. सन १८३३ मध्यें 'केप कॉलनी' बादशाही वसाहत झाली. त्याच वेळीं त्या वसाहतीची सरहद्द वाढवावी म्हणजे काफीर, बंटू, झुलू वगैरे लोकांच्या हल्ल्यापासून सर्वांचें संरक्षण होईल असें त्या वसाहतीच्या गव्हर्नरनें ब्रिटिश सरकारला कळविलें. त्याची विनंति अमान्य करण्यांत आली. त्यामुळें बोअर लोकांनीं ती वसाहत सोडून देऊन स्थलांतर करण्याचें ठरविलें.

११. नव्या वसाहतींची स्थापना :—सन १८३६ मध्यें हजारों बोअर लोक 'केप कॉलनी' सोडून गेले. ब्रिटिश सत्तेला कंटाळूनच आपलीं घरेंदारें सोडून बोअर गेले होते. ऑरेंज नदीच्या कांठीं त्यांनीं 'ऑरेंज फ्री स्टेट' ही वसाहत स्थापन केली. दुसऱ्या एका टोळीनें ट्रान्सव्हाल वसाहत व तिसरीनें नाताळ वसाहत स्थापन केली. परंतु हीही गोष्ट ब्रिटिशांस खपली नाहीं. बोअर लोकांच्या मागोमाग ब्रिटिश वसाहतवालेही हळूहळू नव्या वसाहतींत जाऊन राहूं लागले. सन १८४१ मध्यें इंग्लिश लोकांनीं ऑरेंज रिव्हर शेजारींच 'ऑरेंज रिव्हर साव्हरिंटी' नामक दुसरी एक वसाहत स्थापन केली. सन १८४३ सालीं इंग्लंडनें नाताळ वसाहत केप कॉलनीस जोडली. पुढें सन १८५२ मध्यें ट्रान्सव्हाल व सन १८५४ मध्यें ऑरेंज फ्री स्टेट या दोन्ही वसाहतींचें स्वातंत्र्य इंग्लंडनें मान्य केलें. परंतु झुलू लोकांच्या हल्ल्यापासून त्या वसाहतींना आपलें संरक्षण करतां येत नसे. शिवाय या दोन्ही वसाहतींची आपापसांत धुसफूस सुरू झाली. आर्थिक हलाखीपायीं, ट्रान्सव्हालचें दिवाळें वाजण्याची वेळ आली. त्यामुळें सन १८७७ मध्यें ती वसाहत ब्रिटिशांनीं आपल्या राज्यास जोडून घेतली. त्याच वेळीं झुलू लोकांशीं युद्ध करून ब्रिटिशांनीं त्यांचा पराभव केला व त्यांची झुलू वसाहत आपल्या राज्यांत सामील केली. झुलूंचा त्रास संपला असें पाहतांच ट्रान्सव्हालमधील लोक आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्याकरितां खटपट करूं लागले; व त्यांनीं मजुबावर हल्ला केला (१८८१). तेव्हां तडजोड होऊन इंग्लंडनें त्यांचें स्वातंत्र्य मान्य केलें.

१२. हिऱ्याच्या व सोन्याच्या खाणींचा शोध :—सन १८७० मध्यें ऑरेंज फ्री स्टेटमध्यें हिऱ्यांच्या खाणीचा शोध लागला. त्याबरोबर त्या बाजूला अनेक बोअर लोक जाऊं लागले. किंबर्ले हें शहर त्यामुळें वसविलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेलें. त्या शहराच्या रोखानें इंग्रजही जात होतेच. किंबर्ले शहर केप कॉलनी व ऑरेंज फ्री स्टेट यांच्या सरहद्दीवर होतें. त्यामुळें त्याच्यावर बोअर व इंग्रज या दोघांचाही डोळा होता. त्याच वेळीं ट्रान्सव्हालमध्यें सोन्याच्या खाणींचाही शोध लागला व त्या जेथें होत्या त्या प्रदेशाकडेही इंग्रज व बोअर जाऊं लागले. त्यामुळें जोहान्सबर्ग हें शहर वसलें; व तेथें अनेक लोक येऊन राहूं लागले. बोअर लोक या सर्वांना 'परस्थ' किंवा 'आउटलँडर्स' असें समजत; व त्यांना ते कोणतेही राजकीय हक्क देण्यास तयार नसत. ट्रान्सव्हालचा अध्यक्ष पॉल क्रूगर होता व त्यानें या परकी लोकांवर जाचक करही लादण्यास कमी केलें नाहीं. त्या सर्व गोष्टींस न जुमानतां, केवळ सोन्याच्या आशेनें, अनेक इंग्रज लोक ट्रान्सव्हालमध्यें जमा झाले व सन १८८६ मध्यें या लोकांची संख्या ट्रान्सव्हालमधील लोकांच्या पांच-सहा पट वाढली. अर्थात त्यांच्यांत जागृति होऊन ते लोक राजकीय हक्क मागूं लागले. साधा मतदानाचा अधिकारही त्यांस नव्हता. त्याच वेळीं सेसिल ऱ्होडस् हा केप कॉलनीचा मुख्य प्रधान होता व त्यानें ट्रान्सव्हालमधील इंग्रजांच्या चळवळीस मदत करण्याचें आश्वासन देऊन त्यांस उत्तेजन दिलें.

१३. सेसिल ऱ्होडस् (१८५३–१९०२):—सेसिल ऱ्होडस् याचा जन्म सन १८५३ मध्यें झाला. प्रकृतिस्वास्थ्यासाठीं तो प्रथमतः केप कॉलनीमध्यें आला; व तेथेंच तो पुढें स्थायिक झाला. हिऱ्यांची खाण सांपडतांच तेथें अनेक लोक जमा झाले, त्यांत ऱ्होडस् होता. त्यानें 'डी बीर्स' कंपनी स्थापन केली व इतर किरकोळ कंपन्या तीमध्यें सामील करून घेतल्या. पुढें सोन्याच्या खाणी सांपडल्यानंतर सोन्याकरितांही कंपन्या स्थापन होऊं लागल्या; त्यांतही ऱ्होडस्चा हात होताच. या धंद्यामुळें सेसिल ऱ्होडस् श्रीमंत झाला व त्याचें वजनही केप

सेसिल ऱ्होडस्

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कॉलनीमध्यें वाढूं लागलें. होतां होतां त्या वसाहतीचा तो मुख्य प्रधान झाला. तो पक्का साम्राज्यवादी होता व दक्षिण आफ्रिकेंत ब्रिटिश साम्राज्याचा फैलाव व्हावा व दक्षिण आफ्रिकेंतील वसाहतींचें संयुक्त सरकार स्थापन व्हावें असें त्याला वाटत होतें. त्यामुळें सन १८८९ मध्यें त्यानें 'ब्रिटिश साऊथ ॲफ्रिकन कंपनी' नांवाची एक कंपनी स्थापन केली, तिला बादशाही सनद मिळवून दिली व 'ऱ्होडेशिया' नांवाची वसाहत स्थापण्याची तिला परवानगी दिली. पुढें ती वसाहत ब्रिटिश साम्राज्यांत सामील करण्यांत आली. त्याप्रमाणेंच 'बेच्युआनालँड' या नांवाची दुसरी वसाहतही त्याच्यामुळेंच स्थापन झाली. सेसिल ऱ्होडस्नें या दोन्ही वसाहती बोअर लोकांच्या ट्रान्सव्हाल वसाहतीच्या अनुक्रमें उत्तरेस व पश्चिमेस स्थापन केल्या होत्या; व त्यांच्यामध्यें अनेक प्रकारच्या सुधारणाही केल्या. केपटाउनपासून कायरोपर्यंत एक रेल्वे स्थापन करण्याचाही त्याचा मानस होता; पण तो सफळ झाला नाहीं. तो सन १९०२ मध्यें मृत्यु पावला. त्यावेळीं त्यानें साठ लक्ष पौंड ऑक्सफर्ड विश्वविद्यालयास दिले व ब्रिटिश साम्राज्यांतील लोकांस शिष्यवृत्त्या देण्याकरितां ते पैसे खर्च करावेत अशी त्यानें इच्छा प्रदर्शित केली. त्या शिष्यवृत्यांस 'ऱ्होडस् शिष्यवृत्त्या' असें म्हणतात.

१४. जेम्सनचा हल्ला (१८९५):—ट्रान्सव्हालमधील इंग्रज 'परस्थांस' राजकीय हक्क मिळाले नव्हते. त्यामुळें व इतर कारणांमुळें ते बोअर लोकांवर रागावले होते. त्यांतच क्रूगरनें 'परस्थ' इंग्रजांस नामोहरम करतां यावें म्हणून जर्मनी व हॉलंड या देशांशीं स्नेह जमविण्यास सुरुवात केली; व त्या देशांतून शस्त्रास्त्रांची मोठ्या प्रमाणावर मागणी केली. मात्र प्रत्येक पार्सलवर 'यंत्रसामुग्री' असा शिक्का मारलेला असे. त्याच वेळीं क्रूगरनें पोर्तुगीज लोकांस अनेक प्रकारच्या व्यापारी सवलती दिल्या हें 'परस्थ' इंग्रजांस खपलें नाहीं. तेव्हां त्या सर्व गोष्टींची शहानिशा करून घेण्याचा त्यांनीं निश्चय केला व सेसिल ऱ्होडस्ची मदत मागितली. त्यानें त्यांना उत्तेजन दिलें व त्यामुळें त्याच्याकडून लष्करी मदत मिळेल असें वाटून डॉ. जेम्सन या नांवाच्या ऱ्होडस्च्या 'साऊथ ॲफ्रिकन कंपनींतील' एका अधिकाऱ्यानें पांच-सहाशें लोकांनिशीं जोहान्सबर्गवर हल्ला केला. आपल्याला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक 'परस्थ' येऊन मिळतील व तेही बंड करतील अशी त्याला आशा होती. परंतु तसें कांहीं न होतां तो पकडला गेला. त्याला उत्तेजन दिल्याबद्दल सेसिल ऱ्होडस्वर ठपका ठेवण्यांत आला; म्हणून त्यानें मुख्य प्रधानकीचा राजीनामा दिला. डॉ. जेम्सनच्या हल्ल्यमुळें बोअर लोक खवळून गेले व ब्रिटिशांना आपलें स्वातंत्र्य हरण करावयाचें आहे अशी त्यांची भावना होऊन बसली. त्याच वेळीं जर्मनीच्या कैसरनें पॉल क्रूगरला जेम्सनचा पराभव केल्याबद्दल अभिनंदनपर तार पाठविली. त्यामुळेंही इंग्रजांना बोअरांबद्दल शंका येऊं लागली; व इंग्लंडांत जर्मनीबद्दल द्वेष वाणूं लागला.

१५. बोअर युद्ध (१८९९):—सेसिल ऱ्होडस्नें राजीनामा दिल्यानंतर सर आल्फ्रेड मिल्नर यास केप कॉलनीचा हाय कमिशनर नेमण्यांत आलें. त्यानें बोअर व इंग्रज यांच्यामध्यें सलोखा निर्माण करण्याची आशा धरून क्रूगरशीं बोलणीं सुरू केलीं. त्यावेळीं मोठ्या मुष्कीलीनें ट्रान्सव्हालमध्यें पांच वर्षें राहिलेल्या इंग्रजांस मतदानाचा अधिकार देण्यास तो तयार झाला; मात्र इंग्लंडनें ट्रान्सव्हालवरील स्वामित्व सोडावें असें त्यानें सांगितलें. वसाहतमंत्रि जोसेफ चेंबर्लेन यानें ती गोष्ट साफ नाकारली. त्यामुळें सलोख्याचे सर्व दरवाजे बंद झाले. ट्रान्सव्हालभोंवतीं लष्करी गराडा घालण्याच्या हेतूनें हिंदुस्थानांतून व इंग्लंडमधून फौजा आणण्यास सुरुवात झाली. ती गोष्ट क्रूगरला नापसंत झाली व त्या फौजा काढून घेण्यांत याव्या असें त्यानें सुचविलें. ती गोष्ट अमान्य करण्यांत आल्यानें त्यानें केप कॉलनीवर हल्ला केला व त्यामुळें बोअर युद्धास सुरुवात झाली.

लॉर्ड किचनेर

ट्रान्सव्हाल व ऑरेंज फ्री स्टेटमधील सर्व बोअर एकत्र झाले. नाताळमधील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोअरही त्यांस मिळाले. प्रथमतः बोअर लोकांस चांगलें यश मिळालें. तेव्हां लॉर्ड रॉबर्टस् व लॉर्ड किचनेर यांच्या हाताखालीं मोठें सैन्य बोअर लोकांवर पाठविण्यांत आलें. त्यापूर्वी लेडीस्मिथ, किंबर्ले, मेफकिंग वगैरे ठिकाणीं इंग्रजांचा पराभव झाला होता; परंतु रॉबर्टस् व किचनेर यांनीं हळूहळू सर्व ट्रान्सव्हाल काबीज केला. हें युद्ध तीन वर्षें चालून सन १९०२ मध्यें खलास झालें. बोअर सेनापति बोथा, डेलारे व डी वेट हे आपल्या स्वातंत्र्याकरितां अखेरपर्यंत झगडले; पण त्यांस यश मिळालें नाहीं. अखेर ट्रान्सव्हाल व ऑरेंज फ्री स्टेट या वसाहती ब्रिटिश साम्राज्यांत सामील करण्यांत आल्या.

१६. **व्हिक्टोरिया राणीची अखेरी**:—बोअर युद्ध चालू असतांच सन १९०१ मध्यें व्हिक्टोरिया मृत्यु पावली. तिनें चौसष्ट वर्षें राज्य केलें व असामान्य लोकप्रियता संपादिली. तिच्या कारकीर्दीत अनेक महत्त्वाच्या घडामोडी झाल्या, ब्रिटिश साम्राज्याचा जगभर फैलाव झाला व इंग्लंडचें वैभव अनेक रीतीनें वाढलें. राणी या नात्यानें ती आदर्श ठरली. लोकशाहीचा प्रसार करून तिचा इंग्लंडमध्यें विकास होण्यास तिनें पुष्कळ वाव दिला. राजघराण्याची प्रतिष्ठा व त्याची सत्ता जेणेंकरून कमी होईल त्या प्रत्येक गोष्टीस तिनें विरोध केला; तरीही ती अत्यंत सनदशीर राज्यकर्ती होऊन गेली यांत शंका नाहीं. आपल्या प्रधानांस तिनें अनेक वेळां चापले व त्यांची चांगलीच कानउघाडणीही केली. लोकांस धार्मिक स्वातंत्र्य असावें असें तिला वाटे. एकंदरींत राणी म्हणून ती लोकादरास पात्र झाली होती. तिच्या प्रजेचेंही तिच्यावर प्रेम होतें; व त्यामुळेंच इंग्लंडमध्यें राजसत्ता कायमची रुजण्यास मदत झाली. तिचें खाजगी आयुष्य, तिचा नवरा जिवंत होता तोंपर्यंत, अत्यंत सुखाचें गेलें; पुढें मात्र ती अत्यंत शोकमग्न दिसे. तिचें चारित्र्य शुद्ध होतें. तिची राहणीही साधी होती. सत्याची आवड, दूरदर्शीपणा, मायाळूपणा, वाङ्मयाची अभिरुचि, कलासक्ति वगैरे तिच्या अंगच्या गुणांमुळें ती लोकांस आवडे. ती थोडी तापट होती व त्यामुळेंच तिचे प्रधानांशीं खटके उडत. तरीही तिनें राजवैभव पुरेपूर उपभोगिलें व राजसत्तेची प्रतिष्ठा वाढविली. आदर्श राणी, नमुनेदार पत्नि व थोर माता म्हणून अजूनही इंग्लंडमध्यें तिला मान दिला जातो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. लॉर्ड सॅल्सबरीचें चरित्र थोडक्यांत सांगून त्याची कामगिरी वर्णा.

२. दक्षिण आफ्रिकेंतील बोअर लोकांच्या वसाहतींची वाढ कसकशी होत गेली तें सांगा. बोअर युद्धाचीं कारणें व परिणाम वर्णा.

३. आर्थर बाल्फोरनें आयर्लंडसंबंधीं कोणतें धोरण स्वीकारलें होतें? त्याचा परिणाम काय झाला?

४. एकोणिसाव्या शतकांत इंग्लंडांत लोकशाहीच्या तत्त्वांनुसार राज्यकारभार स्थापन झाला असें तुम्हांस वाटतें काय? कशावरून? राज्यकारभार व स्थानिक बाबींची व्यवस्था करण्याचे बाबतींत लोकशाही यशस्वी झाली असें तुम्हांस वाटतें? कशावरून?

५. खालीलसंबंधीं मुद्देसूद टिपणें करा:—
वारसा कर, फॅशोडा प्रकरण, स्थानिक स्वराज्याचा कायदा, ग्रामपंचायतींचा कायदा, एकीकरणवाले, बॉक्सर बंड, सेसिल ऱ्होडस्, जेम्सनचा हल्ला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—१८८६-१९०१

वर्ष	इंग्लंड–महत्त्वाच्या गोष्टी	हिंदुस्थान–महत्त्वाच्या गोष्टी	यूरोप–महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ति
१८८६	आयरिश होमरूल बिल.	क्वेट्टा कावीज		
१८८७	सुवर्ण महोत्सव		कील कालव्यास सुरुवात	कैसर
१८८८	स्थानिकस्वराज्याचा कायदा	लॉर्ड लॅन्सडाऊन १८८८–९४		ऱ्होडस्
१८९२		कौन्सिलासंबंधीं कायदा		सॅल्सबरी
				मोर्ले
१८९४	ग्रामपंचायतींचा कायदा		चीन–जपान युद्ध	बाल्फोर
१८९५	संयुक्त ऑस्ट्रेलियाची स्थापना			चेंबर्लेन
१८९६	जेम्सनचा हल्ला व पराभव	हिंदुस्थानांत मोठा दुष्काळ	सुदानवर हल्ला	किचनेर
१८९७	राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव		ग्रीस-तुर्कस्थान युद्ध	टिळक
१८९८	ग्लॅडस्टनचा मृत्यु	आफ्रिडी लोकांशीं युद्ध	बिस्मार्कचा मृत्यु	दादाभाई
१८९९	बोअर युद्धास सुरुवात	लॉर्ड कर्झन १८९९–१९०५	ट्रॅन्स-सैबेरियन रेल्वे पूर्ण	
१९००	ऑस्ट्रेलियास वसाहतींचें स्वराज्य			मॅक्स मुल्लर
१९०१	व्हिक्टोरियाचा मृत्यु	रानडे यांचा मृत्यु		

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार

१. साम्राज्याकरितां धडपड :—एकोणिसाव्या शतकांत ब्रिटिश साम्राज्याचा अफाट विस्तार झाला. आज या साम्राज्यांत पृथ्वीवरील एक-चतुर्थांश जमीन मोडते व जगांतील लोकसंख्येचाही तितकाच भाग त्या साम्राज्यांत आहे. आणि एवढें मोठें साम्राज्य ब्रिटिश लोकांनीं संपादन केलें. या साम्राज्याची उभारणी सोळाव्या शतकांत होऊं लागली व तिची पूर्तता एकोणिसाव्या शतकांत झाली. सतराव्या शतकांत जगांतील निरनिराळ्या भागांत साम्राज्य स्थापण्याकरितां पोर्तुगीज, स्पॅनिश, डच, फ्रेंच, इंग्रज वगैरे युरोपियन लोकांनीं अहर्निश खटपट केली. त्यांत प्रत्येकास कमीजास्त यश मिळत असे; परंतु सर्वांत इंग्लिशांचें यश मोठें ठरलें. दैवानेंही त्यांना अनेक वेळां हात दिला; व त्याच्या जोरावरच इंग्लिशांनीं धैर्य, चिकाटी, साहस, युक्ति-प्रयुक्ति वगैरेंच्या साहाय्यानें आपलें साम्राज्य उभारलें. तेंही इतकें मोठें कीं आज त्यांच्या साम्राज्याचा प्रत्येकाला हेवा वाटूं लागला आहे. प्रथमतः व्यापाराचें निमित्त पुढें करून इंग्रजांनीं ठिकठिकाणीं आपला चंचूप्रवेश करून घेतला, त्याच्या जोरावर पुढें त्यांनीं तेथील बाजारपेठा काबीज केल्या, त्यामुळें श्रीमंती प्राप्त झाल्यानें त्यांनीं आक्रमणास व मुलुखगिरीस सुरुवात केली व नंतर तेथें स्वतःचें राज्य स्थापन केलें. अन्नाचा तुटवडा, लोकसंख्येची वाढ, सत्तेचा अभिलाष, मुलुखगिरी व चांचेगिरी यांची आवड, व्यापाराकरितां बाजारपेठा काबीज करण्याची ईर्षा व आपापसांतील चढाओढ, तेढ, मत्सर वगैरेंमुळें युरोपांतील छोटीं-मोठीं राष्ट्रें पंधराव्या शतकापासून साम्राज्याकरितां पुढें सरसावलीं व प्रत्येकानें आपापल्या कर्तृत्वानुसार युरोपच्या बाहेर छोटें-मोठें साम्राज्य निर्माण केलें. या बाबतींत इंग्लंड प्रथमतः जरा मागें होतें; परंतु शेवटीं त्यानेंच सर्वांना मागें टाकलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. आफ्रिका :— आफ्रिकेमधील प्रांत मिळविण्याकरितां पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इटालियन, जर्मन, स्पॅनिश, इंग्रज व बेल्जियन यांनीं धडपड चालविली होती. या सर्व लोकांनीं आफ्रिकेचे लचके तोडण्यास निरनिराळ्या वेळीं सुरुवात केली. आफ्रिकेचा उत्तर भाग सर्वांस अगोदर माहीत होता पण दक्षिण भाग, मध्य भाग व पूर्वपश्चिम भाग कोणासच माहीत नव्हता. अजूनही मध्य भाग आज्ञातच आहे. आफ्रिकेमध्यें कोणाचेंही साम्राज्य नव्हतें व तेथील लोक अडाणी व मागासलेले होते. यामुळें युरोपियनांचें फावलें. त्यांतून आफ्रिकेचा निर्जन प्रदेश अत्यंत सुपीक असल्यानें वसाहतवाल्यांच्या झुंडीच्या झुंडी आफ्रिकेंत जाऊं लागल्या. प्रथमतः युरोपियन लोक आफ्रिकेंतील नीग्रो लोकांस पकडून त्यांस गुलाम म्हणून विकीत व हा उद्योग वाढतांच आफ्रिकेंत राज्य स्थापण्याची कल्पना युरोपियनांस सुचली. तेव्हां सर्व युरोपियनांनीं थोडा बहुत आफ्रिकन प्रदेश मिळविण्याकरितां धडपड सुरू केली. त्यामुळें आज बहुतेक सर्व युरोपियनांच्या वसाहती आफ्रिकेमध्यें दिसत आहेत. आज पोर्तुगीज लोकांच्या वर्चस्वाखालीं अंगोला व मोझांबिक या वसाहती आहेत. स्पेनच्या ताब्यांत मोरोक्कोचा कांहीं भाग, टॅंजीर्स व इतर थोडा भाग आहे. बेल्जमच्या ताब्यांत कांगो वसाहत आहे. इटलीच्या ताब्यांत इरिट्रिया, सोमालीलँड, त्रिपोली ऊर्फ लिबिया हे भाग आहेत. सन १९३६ मध्यें ॲबिसीनियाशीं युद्ध करून तो प्रांतही इटालीनें आपल्या घशांत घातला. सन १८८३ च्या पूर्वीं जर्मनीच्या वसाहती नव्हत्या. परंतु हें शल्य जर्मनांना सलूं लागलें. तेव्हां त्यांनीं आफ्रिकेच्या पश्चिमेस एक वसाहत स्थापन केली व नंतर टॅंगानिका प्रदेश आक्रमून पूर्व आफ्रिकेंतही दुसरी वसाहत स्थापिली. या दोन्ही वसाहती सन १९१८ मध्यें जर्मनीच्या ताब्यांतून इंग्लंडकडे गेल्या. त्या परत मिळविण्याकरितां जर्मनीची धडपड सध्यां चालू आहे. वसाहतींची स्थापना करण्याच्या बाबतींत फ्रान्स देशही मागें नव्हता. सन १८३८ पर्यंत अल्जीरिया, सेनिगॉल, ट्यूनिस, मादागास्कर, मोरोक्को, सोमालीलँड वगैरे अनेक भाग फ्रेंचांच्या ताब्यांत मोडतात.

३. पश्चिम आफ्रिकेंतील इंग्लंडच्या वसाहती :—गुलामांचा व्यापार जोरांत असतां इंग्लंडची नजर प्रथमतः आफ्रिकेकडे वळली. त्यावेळीं नीग्रो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांस धरून गुलाम म्हणून विकण्याचा पायंडा पडलेला होता. गिनी



आफ्रिकेंत मंगोपार्क

प्रांतांत हा व्यापार जोरांत चाले. त्यामुळें इंग्लिशांनीं त्या प्रांतांत प्रथमतः वसाहती स्थापन करण्यास सुरुवात करून गँबिया, सिएरा लिओन व गोल्ड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोस्ट कॉलनी या वसाहती स्थापन केल्या. त्यानंतर केप कॉलनी इंग्रजांकडे सन १८०६ मध्यें आली. त्या काळीं आफ्रिकेसंबंधीं भरपूर अज्ञान होतें व आफ्रिकेचा अंतर्भाग ज्ञात व्हावा म्हणून युरोपियनांची एकसारखी धडपड चालली होती. 'ॲफ्रिकन ॲसोसिएशन' या नांवाची त्यावेळीं एक संस्था स्थापन झाली व तिच्यातर्फे आफ्रिकेचा शोध लावण्याचें काम सुरू झालें. त्यावेळीं नायगर नदीच्या आजुबाजूच्या भागाचा शोध लागलेला नव्हता. त्या प्रांतांत अनेक धाडशी लोक गेले होते; परंतु त्या सर्वांचा तेथील नीग्रो लोकांनीं नाश केल्यानें तेथें जाण्यास कोणीही धजावत नसे. अशा स्थितींत मंगोपार्क नामक एक स्कॉच डॉक्टर वरील संस्थेतर्फे त्या भागांत जाण्यास निघाला. त्याचा जन्म सन १७७१ मध्यें झाला होता. तो सन १७९४ मध्यें नायगर नदीच्या भागांत शिरला. गॅंबिया नदीपर्यंत गेल्यावर तो अज्ञात प्रदेशांत भटकत असतां त्याला नीग्रो लोकांनीं धरून चार महिने कैदेंत ठेवलें. तेथून तो पळून आला व पुन्हां नायगर नदीच्या मार्गानें त्यानें आपलें संशोधन चालू केलें. तो सुमारें ८० मैल आंत गेला; परंतु त्यापुढें जाणें शक्य न झाल्यानें तो परतला. नंतर तो इंग्लंडला गेला व लग्न करून तो तेथें स्थायिक झाला. परंतु सन १८०५ मध्यें सरकारनें त्याला पुन्हां नायगरच्या शोधार्थ पाठविलें. एक लहानशी बोट बांधून त्यानें आपल्या साथीदारांसह त्या बोटींतून प्रवासास सुरुवात केली. परंतु एका खडकावर त्याची नाव आपटून फुटली. त्यावेळीं अनेक नीग्रो लोक तेथें जमा झाले व त्यांनीं बाण, भाले वगैरेंच्या मदतीनें या असाहाय्य लोकांस ठार मारलें. मात्र एक नीग्रो ही हकीकत सांगण्यास इंग्लिश ठाण्यास परत आला. यानंतर कांहीं दिवसांनीं पश्चिम आफ्रिकेंतील सर्व व्यापारी कंपन्यांचें एकीकरण करण्यांत येऊन तिला 'रॉयल नायजर कंपनी' असें नांव देण्यांत आलें व तिच्याकडे 'नायजेरिया' वसाहतीचा कारभार आला. पुढें ही वसाहत ब्रिटिश अंमलाखालीं आली. दक्षिण आफ्रिकेंत वसाहतींचा विस्तार कसा झाला तें मागील एका धड्यांत (पहा, पान ११२–१३) सांगितलेंच आहे. त्याचप्रमाणें सूडान व इजिप्त येथें इंग्रजांनीं आपलें आसन स्थिर कसें केलें तेंही मागें सांगण्यांत आलें आहे (पहा, पान ९९,११०–११).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. डेव्हिड लिव्हिंगस्टन (१८१३–७३) :—मंगोपार्कप्रमाणेंच आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर असणाऱ्या झांबिझी नदीच्या खोऱ्याचा शोध लावण्याचें काम डेव्हिड लिव्हिंगस्टन या एका स्कॉच मिशनऱ्यानें केलें. त्याचा जन्म एका गरीब कुटुंबांत सन १८१३ मध्यें झाला. प्रथमतः तो खाणींत काम करीत असे; परंतु पुढें डॉक्टर होऊन दक्षिण आफ्रिकेंत काम करण्याचें त्यानें ठरविलें. विद्याभ्यास पुरा झाल्यावर तो सन १८४० मध्यें दक्षिण आफ्रिकेंत सध्यांच्या

डेव्हिड लिव्हिंगस्टन

ग्रॅहम्सटाउननजीक गेला. तेथून तो आफ्रिकेच्या अंतर्भागांत गेला. कोणत्याही प्रकारचीं शस्त्रास्त्रें बरोबर न नेतां केवळ प्रेमळ शब्दांच्या पसाऱ्यानें त्यानें तेथील नीग्रो लोकांस भारून टाकलें व विलक्षण लोकप्रियता संपादिली. झांबिझी नदीच्या खोऱ्यांतील प्रांताच्या शोधांत असतांच त्याला एके ठिकाणीं मोठा धबधबा दिसला. त्याला त्यानें 'व्हिक्टोरिया धबधबा' असें नांव दिलें. पुढें प्रवास करीत असतां नीग्रो लोकांत चालू असलेले भांडणतंटे त्यानें मिटवून त्यांचें प्रेम संपादिलें. झांबिझी नदीच्या मार्गानें सर्व प्रवास एकट्यानें करून तो प्रदेश त्यानें शोधून काढला. नंतर तो इंग्लंडला परत गेला. त्यानंतर तो पुन्हां आफ्रिकेमध्यें आला व त्यानें अनेक वेळां प्रवास करून नियासा सरोवर व मध्य आफ्रिकेचा प्रदेश शोधला. नाईल नदीच्या उगमाचें स्थान त्याला शोधून काढावयाचें होतें. परंतु पुढें त्याचा कांहींच पत्ता लागेना म्हणून त्याच्या शोधार्थ हेन्री मॉर्टन स्टॅन्ले यास पाठविण्यांत आलें. त्या दोघांची गांठ सन १८७१ मध्यें पडली. लिव्हिंगस्टन मिशनरी काम करीत असतांच सन १८७३ मध्यें वारला. लिव्हिंगस्टनच्या शोधांमुळेंच पुढें सेसिल ऱ्होडसूला झांबिझी नदीच्या आजूबाजूच्या प्रदेशांत 'ऱ्होडेशिया' वसाहत स्थापितां आली. स्टॅन्लेनें त्याचें काम पुढें चालू केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. पूर्व आफ्रिकेंतील वसाहती :—पश्चिम व दक्षिण आफ्रिकेंत इंग्रजांच्या वसाहती स्थापन होत असतांच त्यांचें लक्ष पूर्व आफ्रिकेकडे



दक्षिण आफ्रिकेंतील ब्रिटिश वसाहती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वळलें व सन १८८० च्या सुमारास त्या बाजूस व्यापार करण्याकरितां ' ईस्ट आफ्रिका कंपनी' स्थापण्यांत आली. पुढें सन १८८४ मध्यें इंग्रजांस सोमाली लँड, युगांडा व कीनिया हे प्रांत मिळाले. हळूहळू तेथेंही ब्रिटिशांच्या वसाहती स्थापन होऊं लागल्या. या भागांतही लिव्हिंगस्टन अनेक वेळां फिरला होता व त्यानें अनेक नीग्रो लोकांस ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली होती. सन १८९० च्या सुमारास ब्रिटन व जर्मनी यांच्यामध्यें सरहद्दीबद्दल थोडी बाचाबाची झाली. तेव्हां त्या वेळचा मुख्य प्रधान लॉर्ड सॅल्सबरी यानें स्नेह जोडण्याच्या हेतूनें जर्मनीशीं तह केला व युगांडा व जर्मन ईस्ट आफ्रिका यांच्या सरहद्दी ठरवून घेतल्या. त्याचप्रमाणें आफ्रिकेंतील झांझीबार बेट आपल्याकडे ठेवून डेन्मार्कजवळील हेलिगोलंड बेट जर्मनीला दिलें. परंतु ही गोष्ट इंग्रजांस आवडली नाहीं.

६. ऑस्ट्रेलिया :—मार्को पोलो नांवाच्या पृथ्वीप्रदक्षिणा करणाऱ्या गृहस्थानें एक भूभाग दक्षिण समुद्रांत असावा असें दर्शविलें होतें; परंतु त्यानें ऑस्ट्रेलियाचा शोध लावला नव्हता. पुढें कॅप्टन कुकनें त्या खंडाचा शोध लावून ऑस्ट्रेलिया खंड जगाच्या निदर्शनास आणलें. परंतु त्याच्या पूर्वी डच लोकांनीं पश्चिम ऑस्ट्रेलियाचा शोध लावला होता. त्याचप्रमाणें टॅस्मन व हारटॉग यांनींही ऑस्ट्रेलियाच्या किनाऱ्याजवळून प्रवास केला. टॅस्मननें टॅस्मानियाचा शोध लावला होता. असें असूनही कुकला ऑस्ट्रेलियाच्या शोधाचें श्रेय देण्यांत येतें. न्यूझीलंडचा मात्र त्यानें शोध लावला. कुकच्या अगोदर विल्यम डॅंपियर व अलेक्झांडर सेलकर्क हे दोघे प्रवासी ऑस्ट्रेलियांत प्रवास करून आले होते. परंतु अजूनही ऑस्ट्रेलियांत वसाहती स्थापण्यास सुरुवात झाली नव्हती. कुकनें प्रथम सन १७७० मध्यें इंग्लिश निशाण रोवलें; व पुढें सन १७७८ मध्यें ऑस्ट्रेलियांत प्रथमच कैद्यांची वसाहत स्थापन करण्यांत आली. पहिल्या टोळींत काळ्या पाण्याची शिक्षा झालेले सुमारें ७०० कैदी ऑस्ट्रेलियाच्या पूर्व भागांत वसाहत करून राहूं लागले. सन १७९३ मध्यें वसाहतवाल्यांची पहिली टोळी ऑस्ट्रेलियामध्यें येऊन राहूं लागल्यानें, त्यांच्यामागून अनेक कैदी व वसाहतवाले तेथें आले व त्यांनीं ' न्यू साऊथ वेल्स ' ही वसाहत स्थापन केली. या सर्व लोकांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऑस्ट्रेलियांतील जंगल तोडून तेथें शेती सुरू केली. तरीही मध्य ऑस्ट्रेलियाचा अजून शोध लागलेला नव्हता. या वेळेपर्यंत इंग्लंडांतून कैद्यांची रवानगी एकसारखी दरसाल होत होती. ती गोष्ट अनेकांस रुचली नाहीं. तेव्हां चांगले वसाहतवाले ऑस्ट्रेलियांत यावेत म्हणून तेथें प्रथम मोफत जमिनी देण्यांत येत. परंतु ही पद्धति पुढें बंद करण्यांत येऊन दर एकरास ५ शिलिंग व पुढें एक पौंड घेऊन वसाहतवाल्यांस जमिनी देण्याची पद्धति गिबन वेकफील्ड यानें पाडली. येणारा पैसा दळणवळण, लागवड, वसाहतवाल्यांस उत्तेजन वगैरेकरितां खर्च करण्याचें ठरविण्यांत आलें. यामुळें चांगल्या वर्तणुकीचे अनेक लोक ऑस्ट्रेलियांत येऊं लागले व सन १८३६ मध्यें व्हिक्टोरिया व सन १८३६ मध्यें दक्षिण ऑस्ट्रेलिया या वसाहती स्थापन झाल्या. यानंतर ऑस्ट्रेलियांत अनेक इंग्रज लोक येऊन स्थायिक होऊं लागले. याच वेळीं ऑस्ट्रेलियांत गुन्हेगार न पाठविण्याची चळवळ हातीं घेण्यांत आली व तिला थोडेंफार यश येऊन सन १८५३ पासून काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्यांस ऑस्ट्रेलियांत न पाठविण्याचें धोरण इंग्लंडनें अंगिकारलें.

७. सोन्याच्या खाणींचा शोध:—ऑस्ट्रेलियांतील वसाहतवाल्यांनीं तेथें अनेक प्रकारच्या सुधारणा घडवून आणल्या. अनेक प्रकारचे उद्योगधंदे तेथें सुरू झाले. मेंढ्या पाळून लोकरीची पैदास करणें, फर्निचर तयार करणें, शेती करणें, बागाईत करून निरनिराळीं फुलें-फळें निर्माण करणें वगैरे अनेक धंदे तेथें जोरांत चालू झाले. क्वीन्सलंड या नांवाची नवीन वसाहतही पुढें स्थापन झाली. टॅस्मानियाची वाढ होऊं लागली. सन १८५१ मध्यें ऑस्ट्रेलियांत सोन्याच्या खाणींचा शोध लागला. त्यामुळें ऑस्ट्रेलियांत जाण्याची इंग्लिशांत अहमहमिका लागली व थोडक्या वेळांत श्रीमंत होण्याची हांव मनांत धरून अनेक लोक ऑस्ट्रेलियांत जमा होऊं लागले. या 'नूतनागतांत' व्यापारी, कारागीर, शेतकरी, दुकानदार वगैरे अनेक प्रकारचे लोक ऑस्ट्रेलियांत कायमची वसाहत स्थापण्याच्या हेतूनें आल्यानें ऑस्ट्रेलियाचा फायदाच झाला. आज ऑस्ट्रेलियांतून अनेक प्रकारचा माल इंग्लंडांत जातो. त्यांत मांस, फळफळावळ, लोकर, लोणी, अंडीं वगैरेंचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रामुख्यानें उल्लेख करणें जरूर आहे. हळूहळू ऑस्ट्रेलियांतील निरनिराळ्या प्रांतांतील लोकांमध्यें स्वराज्याची जाणीव उत्पन्न झाली. पुढें ऑस्ट्रेलियांतील सर्व वसाहतींचा एक संयुक्त गट तयार करण्यांत आला व त्यास सन १९०१ मध्यें कानडासारखें साम्राज्यांतर्गत स्वराज्य देण्यांत आलें.

८. न्यू झीलंड :—सन १६४२ मध्यें टॅस्मन या नांवाच्या डच संशोधकानें न्यू झीलंडचा शोध लावला. त्यावेळीं तें एकच बेट आहे अशी त्याची कल्पना होती. परंतु पुढें सन १७६९ मध्यें कॅप्टन कुकनें तीं दोन बेटें आहेत असें प्रसिद्ध केलें. तेथें माओरी नांवाचे हुशार व सुंदर बांध्याचे लोक रहात होते. तेथील हवाही फार सुंदर होती. परंतु तेथें जाऊन वसाहत स्थापण्याची कोणासही इच्छा झाली नाहीं. कांहीं लोक तेथें व्यापाराकरितां जात व तेथील ताग, सागवान वगैरे माल नेत. पुढें मिशनरी लोक न्यू झीलंडमध्यें प्रथम जाऊं लागले; व त्यांनीं तेथें ख्रिस्ती धर्माचा फैलाव करण्यास सुरवात केली. पुढें सन १८३९ मध्यें 'न्यू झीलंड कंपनी' या नांवाची एक कंपनी स्थापन होऊन तिच्यातर्फे न्यू झीलंडमध्यें वसाहती स्थापन करण्याचें ठरलें. सन १८४० मध्यें कांहीं फ्रेंच लोकांनीं न्यू झीलंडचा ताबा घेण्याच्या हेतूनें तिकडे एक जहाज पाठविलें; ही बातमी कळतांच इंग्रजांनीं न्यू झीलंडमध्यें जाऊन तेथील माओरी लोकांशीं समेट केला व न्यू झीलंड ब्रिटिश साम्राज्यास जोडलें गेलें. त्यामुळें तेथेंही इंग्रजांच्या वसाहती स्थापन होण्यास सुरुवात झाली. सर जॉर्ज ग्रे हा न्यू झीलंडचा उद्योगी गव्हर्नर होता. त्यानें त्या प्रांतांतील लोकांची संघटना करून ऑकलंड, वेलिंग्टन, कँटरबरी, नेल्सन वगैरे अनेक वसाहती स्थापन केल्या. पुढें सन १८५६ मध्यें या सर्वांचा एक गट तयार करण्यांत येऊन न्यू झीलंडमध्यें जबाबदार राज्यव्यवस्था सुरू झाली व त्याला सन १९०७ मध्यें 'डोमीनियन स्टेटस्' मिळालें.

९. आशिया :—(१) **हिंदुस्थान**—ई. इं. कंपनीनें हिंदुस्थानांत प्रथमतः व्यापाराच्या मिषानें चंचूप्रवेश करून घेतला व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राज्यांतील आपापसांतील कलह, त्यांची दुर्बलता, हिंदी लोकांचें अज्ञान वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांवर आक्रमण सुरू केलें. त्यांत लॉर्ड क्लाइव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड वेल्स्ली, लॉर्ड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हेस्टिंग्ज, लॉर्ड डलहौसी वगैरेनीं प्रामुख्यानें भाग घेतला; अखेरीस बहुतेक सर्व हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्याखालीं आणला गेला. सन १८५७ मध्यें हिंदुस्थानांत एक मोठें बंड झालें; परंतु तें मोडण्यांत आलें. बंडानंतर ई. इं. कंपनीकडील कारभार काढून घेण्यांत आला व हिंदुस्थानांत व्हिक्टोरियाचें राज्य सुरू झालें. त्यानंतर हिंदुस्थानांत सन १९१९ मध्यें जबाबदार राज्यव्यवस्था अंशतः सुरू करण्यांत आली. त्या सालच्या कायद्यांत सन १९३५ मध्यें थोडी सुधारणा होऊन प्रांतांतून प्रांतिक स्वायत्तता स्थापन झाली व मध्यवर्ती सरकारच्या कारभारांत 'संयुक्त राज्यपद्धति' स्थापण्याचें ठरलें. परंतु सन १९४० पर्यंत ती अस्तित्वांत आली नाहीं. (२) **ईस्ट इंडीज बेटें**— ईस्ट इंडीज बेटांमध्यें प्रथमतः डच लोकांचा शिरकाव झाला होता; व त्यांनीं तीं जिंकून घेऊन तेथें आपलें राज्य स्थापिलें. पुढें तेथें इंग्रज लोकही जाऊं लागले. त्यामुळें ब्रिटिश व डच यांच्यामध्यें झटापटी होण्यास सुरुवात झाली. पुढें ब्रिटिशांनीं त्या बेटांशीं व्यापार करण्यास सुरुवात केली. त्यावेळीं त्यांनीं पेनांग बेट ताब्यांत घेतलें (१७८६). परंतु व्यापाराच्या दृष्टीनें त्याचा इंग्रजांना फारसा उपयोग झाला नाहीं. सन १८१९ मध्यें सिंगापूर बेट इंग्रजांस मिळालें. सिंगापूरला स्थानमहात्म्यामुळें पुढें चांगलें महत्त्व प्राप्त झालें व तेथें मोठ्या प्रमाणावर व्यापार सुरू झाला. पुढें सन १८२४ मध्यें ब्रिटिशांनीं मल्लाका बंदर डचांपासून मिळविलें. कालांतरानें ब्रिटिशांनीं मलाया द्वीपकल्प आपल्या वर्चस्वाखालीं आणून तेथें स्वायत्त कारभार सुरू केला. मलायाच्या वरच्या भागांत असलेला ब्रह्मदेशही ब्रिटिशांनीं जिंकून घेतला व तो हिंदुस्थानच्या साम्राज्यास जोडण्यांत आला. सन १९३५ मध्यें तो हिंदुस्थानापासून स्वतंत्र करण्यांत आला. (३) **बोर्निओ**—ईस्ट इंडीज बेटांप्रमाणें इंग्लंडनें चीनच्या लगत असणारें हाँगकाँग बेट सन १८४० सालीं मिळविलें. सन १८३९ मध्यें जेम्स ब्रुक यानें बोर्निओच्या सुलतानास मदत करून 'सारवाक' नामक मोठा प्रांत बक्षिसादाखल उपटला. तेथील राजा अजूनही सारवाकचा राजा म्हणून मिरवतो. पुढें इंग्लंडला सन १८७४ मध्यें फिजी बेटें मिळालीं. सन १८८८ मध्यें बोर्निओ प्रांत इंग्लंडच्या साम्राज्यांत समाविष्ट करण्यांत आला. (४) **एडन**— सन १८३९ मध्यें एडन बंदर इंग्लंडच्या ताब्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आलें. इंग्लंड ते हिंदुस्थान-ऑस्ट्रेलिया या मार्गावरील तें अत्यंत महत्त्वाचें ठिकाण आहे. कोळसा घेण्याकरितां बोटी तेथें थांबतात. इतके दिवस एडनचा कारभार मुंबई इलाख्याकडे होता. आतां तो साम्राज्यसरकारकडे सोपविण्यांत आला आहे. (५) **पॅलेस्टाईन**—हा प्रांत सन १९१७–१८ मध्यें युद्ध चालू असतां इंग्रजांनीं जिंकून घेतला व महायुद्धानंतर तो इंग्लंडकडेच रहावा असें ठरविण्यांत आलें. सन १९१७ मध्यें 'बाल्फोरचा जाहीरनामा' प्रसिद्ध होऊन पॅलेस्टाइनमध्यें ज्यू लोकांची वसाहत स्थापन करण्यांत यावी असें ठरलें. मात्र त्यामुळें ज्यूशिवाय इतर धर्मपंथीयांच्या धार्मिक अधिकारांवर बंधन असतां कामा नये असें ठरलें. (६) **बेहेरिन**—सन १८५५ मध्यें इराणच्या आखातांत इंग्रजांनीं आपलें वर्चस्व स्थापन केलें होतें. त्याचप्रमाणें इराणमध्यें तेलाच्या खाणीं सांपडल्यानें त्यांच्या आशेनें इंग्रज लोक तेथें गेले व त्यांनीं तेथें आपलें वर्चस्व स्थापिलें; परंतु पुढें तें नष्ट झालें. मात्र मोत्यांकरितां प्रसिद्ध असलेलीं बेहेरिन बेटें इंग्रजांच्या ताब्यांत गेलीं, तीं कायमचींच. (७) **लंका ऊर्फ सिलोन**—ही प्रथमतः पोर्तुगीजांनीं काबीज केली. नंतर ती डच लोकांनीं काबीज केली. सन १७९६ मध्यें त्यांच्यापासून ती इंग्रजांनीं जिंकून घेतली. पुढें तेथें ब्रिटिशांनीं आपली वसाहत स्थापली. आज ती 'बादशाही वसाहत' म्हणून समजली जाते. मोतीं वर काढण्याचा धंदा तेथें मोठ्या प्रमाणावर आहे; व तो सरकारच्या ताब्यांत आहे. तेथें स्वायत्त कारभार असून इंग्लंडतर्फे सर्व कारभार गव्हर्नरच पाहतो.

१०. **युरोप**:—खुद्द युरोपमध्यें ब्रिटिश बेटें साम्राज्य सरकारचें मुख्य ठाणें म्हणून समजलीं जातात. त्याशिवाय इंग्लंड-हिंदुस्थान-ऑस्ट्रेलिया या समुद्रमार्गावरील भूमध्यसमुद्रावर स्वामित्व ठेवण्याकरितां इंग्लंडनें जिवापाड खटपट केली. या मार्गावर असलेलीं कांहीं महत्त्वाचीं ठिकाणें इंग्लंडच्या ताब्यांत आहेत. त्यांत जिब्रॉल्टर, माल्टा बेट, सायप्रस बेट यांचा समावेश होतो. सन १७०४ मध्यें इंग्लंडनें जिब्रॉल्टरचा बळकट किल्ला काबीज करून घेतला. 'भूमध्य समुद्राची किल्ली' असें त्याला म्हणतात. त्या दृष्टीनें त्याचें अत्यंत महत्त्व आहे. सन १८०० मध्यें माल्टा बेट इंग्रजांनीं जिंकून घेतलें व सन १८१४ मध्यें त्याचा ब्रिटिश साम्राज्यांत अंतर्भाव करण्यांत आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सन १८७८ मध्यें सायप्रस बेट इंग्रजांस मिळालें व सन १९१४ मध्यें तें ब्रिटिश साम्राज्यास कायमचें जोडण्यांत आलें. तेंही एक अत्यंत महत्त्वाचें ठिकाण मानण्यांत येतें. या सर्वांमुळें व विशेषतः सुएज कालव्याचा इंग्लंडनें ताबा मिळविल्यानें इंग्लंडच्या पूर्वेकडील साम्राज्यास जोडणारा मार्ग सुरक्षित राहूं लागला.

११. अमेरिका :—(१) कानडा—प्रथमतः येथें फ्रेंचांनीं वसाहती स्थापन केल्या व नंतर तेथें इंग्लिशांनीं वसाहती स्थापल्या. त्या दोघां-मध्यें नेहमीं चकमकी उडत. न्यू फाऊंडलंड या वसाहतींची स्थापना सर हंफ्री गिलबर्ट यानें केली. त्यानंतर अनेक वसाहती स्थापन झाल्या. सन १७८२ मध्यें अमेरिकेंतील तेरा वसाहतींनीं इंग्लंडविरुद्ध बंड करून स्वातंत्र्य मिळ-विलें. त्याच्या अगोदरच इंग्लंडनें फ्रेंचांपासून कानडा प्रांत जिंकून घेतला होता. या कानडा प्रांतांत वरचा व खालचा असे दोन भाग होते. सन १८४१ मध्यें त्यांचें एकीकरण करण्यांत आलें व सन १८६७ मध्यें कान-डाला साम्राज्यांतर्गत स्वराज्य ऊर्फ 'डोमीनियन स्टेटस्' देण्यांत आलें. **(२) वेस्ट इंडीज**—यांचा शोध प्रथमतः कोलंबसानें लावला. पुढें त्यांच्यावर सतराव्या शतकांत डच, फ्रेंच, इंग्रज वगैरेंनीं हल्ले चढविले. सन १६२४ मध्यें बार्बाडॉझ इंग्लंडच्या ताब्यांत आलें. सन १६६५ च्या सुमारास जमेका व बहामा बेटें इंग्लिशांनीं जिंकलीं व हांडूरास हा मध्य अमेरिकेचा भागही त्यांनीं जिंकून घेतला. यानंतर सेंट ल्यूसिया, डोमीनिका, ग्रेनेडा, त्रिनिदाद, टोबॅगो वगैरे अनेक बेटें इंग्लिशांनीं जिंकून घेतलीं. यामुळें वेस्ट इंडीजपैकीं बहुतेक महत्त्वाचीं बेटें आज इंग्लंडच्या ताब्यांत आहेत असें म्हणतां येईल. दक्षिण अमेरिकेपैकीं ब्रिटिश ग्वायना हा भाग सतराव्या शतकांत इंग्लंडनें जिंकून घेतला. तोही ब्रिटिश साम्राज्यांत आज मोडतो.

११. साम्राज्यवाद :—एकंदरींत पाहतां जगाच्या निरनिराळ्या भागांत इंग्रजी साम्राज्य अस्तित्वांत आलें. त्यामुळें एक नवीनच जग निर्माण झाल्यासारखें झालें. या नव्या जगांत इंग्लिश भाषा बोलली जाई, इंग्लिश कायदे पाळले जात, इंग्रजांच्या चालीरीतींना मान दिला जाई व इंग्लंडबद्दल तेथें एक प्रकारचा अभिमान उसळे. इंग्लिश वाङ्मय, इंग्लिश संगीत, इंग्लिश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कला वगैरेंचा नव्या जगावर इतका परिणाम झाला होता कीं तेथील लोक इंग्रजांशीं समरस झाले असल्याचा इंग्रजांस भास होई. वसाहतींतील लोकांना



आपल्या धाडसाचें कौतुक वाटे, श्रमांबद्दल अभिमान वाटे, निसर्गाशीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांनीं चालविलेल्या झगड्यांबद्दल त्यांस गर्व होई व आपल्या चातुर्यानें ते दिङ्मूढ होत. परंतु या सर्वांच्या बुडाशीं त्यांचें स्वातंत्र्यप्रेम होतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यामुळें एकोणिसाव्या शतकांत वसाहती आपल्या स्वातंत्र्या-करितां झगडूं लागल्या व इंग्लंडशीं फटकून वागण्यांत त्या पुरुषार्थ मानूं लागल्या. त्याची इंग्लंडवर प्रतिक्रिया झाल्याशिवाय राहिली नाहीं. त्यामुळें साम्राज्यवाद निर्माण झाला. वसाहतींस स्वराज्य दिलें तर साम्राज्याचीं बंधनें सैल होतील व कदाचित् साम्राज्याचीं छकलें होऊन तें लयास जाईल असें साम्राज्यवादी पुढारी म्हणत. तेव्हां साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांचें संयुक्तीकरण करणें योग्य होय असें ते म्हणूं लागले. डिझरेलीसारखे कट्टर साम्राज्यवादी पुढारी लंडनच्या पार्लमेंटमध्यें निरनिराळ्या वसाहतींचे प्रतिनिधि बसूं द्यावे असें म्हणूं लागले. त्यामुळें इंग्लंड व वसाहती एकजीव होतील व साम्राज्यांतून फुटून निघण्याची कल्पना वसाहतींमध्यें प्रसृत होणार नाहीं असें त्यांस वाटत होतें. साम्राज्यवाद्यांना विरोध करणारे म्हणत कीं, आज आपण आपल्या वसाहतींना स्वराज्य दिलें तर त्यांना आपलें स्वतःचें संरक्षण करतां येणें शक्य नाहीं. तेव्हां तो प्रश्न बाजूस टाकून, प्रथमतः आपण आपलें घर सुधारूं, लोकांचें दारिद्र्य घालवूं, देशाचें आरोग्य सुधारूं, लोकांस ज्ञानदान करून त्यांस सुशिक्षित करूं व मग साम्राज्याच्या दृढीकरणाचा प्रयत्न करूं. परंतु ही विचारसरणी साम्राज्यवाद्यांस विचित्र वाटली. पुढें डिझरेलीनंतर लॉर्ड सॅल्सबरीनेंही साम्राज्यवादास जोरानें चालना दिली. त्याचें परराष्ट्रीय धोरण साम्राज्याच्या दृढीकरणाच्या दृष्टीनेंच आखलें जाई. जोसेफ चेंबर्लेनला साम्राज्यशाहीचें वेडच लागलें होतें! ‘साम्राज्याच्या दृष्टीनें प्रत्येक गोष्टीचा विचार करा’ असें तो प्रत्येकाला सांगे. त्यावरून साम्राज्याबद्दल अभिमान बाळगण्याची कल्पना त्याच्या रोमांरोमांत किती भिनली होती हें समजून येईल. इंग्लंडच्या बाहेर सेसिल ऱ्होडस्सारखे मुत्सद्दीही साम्राज्यवादी बनून साम्राज्यांतील लोकांचें एकीकरण व संघटन करण्याचा एकसारखा प्रयत्न करीत होते. पुढें एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडच्या व्यापारावर इतर राष्ट्रें गदा आणणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. परराष्ट्रें आपला माल इंग्लंडच्या वसाहतींत विकूं लागल्यानें व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तोही स्वस्त विकूं लागल्यानें इंग्लंडनें खुल्या व्यापाराचें धोरण टाकून दिलें नाहीं तर इंग्लंडचा व्यापार इतर राष्ट्रें मारून टाकतील असें जोसेफ चेंबर्लेन म्हणूं लागला. साम्राज्यांतील मालाला इतर राष्ट्रांपेक्षां जकातींच्या बाबतींत जास्त सवलती दिल्या तरच इंग्लंडचा व्यापार तगेल व ब्रिटिश साम्राज्याचीं बंधनें शिथिल होणार नाहींत असें तो प्रतिपादूं लागला. त्याचें हें म्हणणें प्रथम कोणींही मानलें नाहीं. अशा तऱ्हेनें एकोणिसाव्या शतकांत साम्राज्यवादानें इंग्लंडचें राजकारण चांगलेंच रंगलें. त्याचा अजूनही निकाल लागलेला नाहीं.

१२. साम्राज्याच्या दृढीकरणार्थ :—एकोणिसाव्या शतकांत साम्राज्याच्या दृढीकरणाचें अनेक प्रयोग झाले. ग्लॅडस्टन व डिझरेली या दोघांसही प्रथमतः साम्राज्यवाद आवडत नसे. ग्लॅडस्टन आपल्या तत्त्वांस चिकटून राहिला; परंतु डिझरेलीनें साम्राज्यशाहीचें तत्त्व अंगिकारिलें व त्याचा पुरस्कार केला. लॉर्ड रोजबरी या लिबरल प्रधानानेंही साम्राज्यवादाचें तत्त्व अंगिकारलें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तेव्हां या शतकांत जोसेफ चेंबर्लेन वसाहतींचा प्रधान असतां, साम्राज्यांतील निरनिराळ्या विभागांचें दृढीकरण व्हावें या दृष्टीनें सन १८९७ मध्यें

जोसेफ चेंबर्लेन

व्हिक्टोरियाच्या राज्यदिनाच्या हीरक महोत्सवप्रसंगीं साम्राज्यांतील निरनिराळ्या प्रधानांस त्यानें लंडनला बोलाविलें. एक मोठी सभा भरली व साम्राज्यांतील व्यापार, वसाहतींचें संरक्षण व इंग्लंडशीं वसाहतींचे संबंध या विषयांसंबंधीं चर्चा झाली. या प्रसंगामुळें साम्राज्यांतील सर्व प्रधानांनीं एकत्र बसून विचारविनिमय केल्याचें हें पहिलेंच उदाहरण होय. त्यामुळें इंग्लिश राणीबद्दल त्या सर्वांस किती राजनिष्ठा वाटत होती तें सिद्ध झालें व साम्राज्याच्या दृढी-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करणाचें महत्त्व सर्वांस पटूं लागलें. त्यामुळेंच पुढें बोअर युद्धाच्या वेळीं इंग्लंडला वसाहतींकडून मदत मिळाली.

अभ्यास

१. ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार कसकसा झाला हें दर्शविणारा एक आलेख तयार करा. ब्रिटिश साम्राज्याच्या वाढीस कोणकोणतीं कारणें झालीं ?

२. मंगोपार्क व लिव्हिंग्स्टन यांची कामगिरी थोडक्यांत सांगा.

३. साम्राज्यवाद म्हणजे काय ? तो कसा उत्पन्न झाला ? साम्राज्याच्या संघटनेकरितां लोक उत्सुक कां नव्हते ? डिझरेली, सॅल्सबरी व चेंबर्लेन यांनीं त्यासंबंधीं कोणतें धोरण स्वीकारलें होतें ?

४. आफ्रिकेंत आपला हिस्सा असावा असें युरोपियनांस कां वाटत होतें ? त्यांना आफ्रिकेंतील कोणता कोणता विभाग मिळाला ?

५. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—
लिबिया, मंगोपार्क, स्टॅन्ले, लिव्हिंग्स्टन, कॅप्टन कुक, ऱ्होडस् , टास्मन, हारटॉग, जॉर्ज ग्रे, सेलकर्क, डँपियर, जेम्स ब्रुक, हंफ्री गिलबर्ट.

६. ऑस्ट्रेलियाची उन्नति कसकशी होत गेली तें थोडक्यांत सांगा.

उतारे

१. वसाहतींस स्वराज्य द्या—१८३८.

मी ज्या सुधारणा सुचविणार आहें त्यामुळें वसाहतवाल्यांच्या हातीं त्यांच्या वसाहतींचा अंतर्गत कारभार जाणार आहे हें मी जाणून आहें. ब्रिटिश लोक आपल्या वसाहतींना किती महत्त्व देतात हें मी ओळखून आहें. तसेंच इंग्लंडचा वसाहतींशीं संबंध कायम टिकला पाहिजे यांतही शंका नाहीं. तरीही ज्या कायद्यांचा इंग्लंडशीं काडीचाही संबंध येत नाहीं, अशा वसाहतींच्या अंतर्गत कारभारांतील कायद्यांमध्यें इंग्लंडनें कितीशी ढवळाढवळ करावी हें मला कळत नाहीं. कोणते कायदे आपल्या वसाहतींस हितकर ठरतील व कोणत्या माणसांच्या हातीं कारभाराची धुरा दिली असतां त्यांत वसाहतींचें हित होईल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हे वसाहतवाले नेहमींच ओळखतील असें नाहीं. तरीही त्या बाबतींतील त्यांचा निर्णय योग्यच ठरेल. त्यांनीं कायदे वाईट केले काय किंवा चांगले केले काय, त्यांमुळें ज्यांच्या हिताला फारसा धक्का पोंचणार नाहीं अशा लोकांपेक्षां (इंग्रजांपेक्षां) ते लोक योग्य तीच दक्षता बाळगतील अशी माझी खात्री आहे. वसाहतवाल्यांनीं वाईट कायदे केले किंवा आपल्या राज्यकारभाराची धुरा अननुभवी व नादान लोकांच्या हातीं दिली, तरी त्यामुळें त्यांचेंच अनहित होणार आहे व त्यामुळें त्यांच्यावर जी अनर्थपरंपरा कोसळेल तिला तोंड देण्यास ते सदैव तयार असलेच पाहिजेत. एवढेंच नव्हे, तर तो अनर्थ दूर करण्यास योग्य ते उपायही त्यांस योजावे लागतील.

—लॉर्ड डरहॅमच्या कानडासंबंधींच्या रिपोर्टाचा भाग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०. शास्त्रीय प्रगति व उद्योगधंद्यांची उन्नति

१. अद्भुतरम्य शतक :—एकोणिसाव्या शतकांत शास्त्रीय ज्ञानांत अफाट भर पडली. गेल्या शतकाच्या अखेरीस अनेक संशोधक उदयास येऊं लागले होते व त्यांनीं निरनिराळे प्रयोग करून शास्त्रीय ज्ञानांत क्रांति घडवून आणली. त्यामुळें लोकांचें ज्ञान वाढलें, अनेक महान तत्त्वें सिद्ध झालीं व उद्योगधंद्यांत व लोकांच्या जीवनांत व राहणींत अभिनव नाविन्य उत्पन्न झालें. आजवर जे निरनिराळे शोध लागले होते, त्यामुळें मनुष्यांचें जीवन थोडेंफार सुखमय होऊं लागलें होतें. परंतु एकोणिसाव्या शतकाचा विशेष हा कीं, जीवन अधिक सुखमय कसें करतां येईल याच विचारानें प्रत्येक शास्त्रज्ञ आपले प्रयोग चालू ठेवूं लागला. त्यामुळें रसायनशास्त्र, विज्ञान-शास्त्र, भूस्तरशास्त्र, वैद्यकशास्त्र, स्थापत्य, प्राणिशास्त्र वगैरे अनेक शास्त्रांत क्रांतिकारक शोध लागून लोकांचें दररोजचें जीवन सुखमय होण्यास खात्रीनें मदत झाली. अठराव्या शतकांतील नवीन शोधांमुळें लोकांचा धर्मावरील विश्वास ढळूं लागला होता व त्यामुळें सर्वांचें लक्ष शास्त्रीय ज्ञानाकडे वळलें होतें व खरें सत्य शोधून काढण्याची एकसारखी धडपड सुरू झाली होती. त्याचा परिणाम म्हणजेच शास्त्रीय शोध. एकोणिसाव्या शतकांत इतके आश्चर्यकारक शोध लागले कीं, त्यामुळें जगाची उलथापालथ होऊन गेली व यामुळेंच एकोणिसाव्या शतकाला 'अद्भुतरम्य शतक' असें म्हणतात.

२. शास्त्रीय संशोधक :—सर हंफ्री डेव्ही (१७७८–१८२९) यानें पोटॅशियम व सोडियम यांचा शोध लावला व विद्युत् उत्पन्न करणारी घट-माला ऊर्फ बॅटरी शोधून काढली. डेव्हीनेंच 'सेफ्टी लॅंप' शोधून काढला होता. रसायनशास्त्रासंबंधीं त्यानें अनेक प्रयोग केले व त्यासंबंधीं अनेक शोध लावले. त्याचा शिष्य मायकेल फॅरडे (१७९१–१८६७) यानें अत्यंत आश्चर्यकारक शोध लावून आपलें नांव अजरामर केलें. सेंद्रिय रसायन-शास्त्राचा तो जनक समजला जातो. विद्युत् व लोहचुंबक यांच्यासंबंधानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक शोध त्यानें लावले. डायनॅमोचा शोधही त्यानें लावला. विद्युत्बल मोजतां येतें असेंही त्यानें सिद्ध केलें. लॉर्ड केलव्हिन (१८२४–१९०७) यानें विज्ञानशास्त्रांत उत्तम भर घातली. विजेच्या प्रवाहाचा जोर किंवा तीव्रता मोजण्याचें यंत्र त्यानें शोधून काढलें. त्याला 'गॅल्व्हॅनोमीटर' असें म्हणतात. रसायनशास्त्राच्या प्रयोगाकरितां उपयोगीं पडणारीं अनेक यंत्रें त्यानें शोधून काढलीं. ॲटलांटिक महासागरांत तारा घातल्या तर इंग्लंडहून अमेरिकेस विद्युत् संदेश पाठवितां येईल असें त्यानें सिद्ध केलें. पृथ्वीची सध्यांची स्थिति ईश्वरी प्रेरणेवर अवलंबून नसून, ती नद्या, हिमनद्या, वगैरेवर अवलंबून आहे व या जगावर जे अनेक प्रकारचे उत्पात होतात ते त्यामुळेंच होत, असे चार्ल्स लयेल (१७९७–१८७५) यानें सिद्ध केलें. त्याच्या सिद्धांतानें धर्मग्रंथांत सांगितलेल्या तत्त्वांस बाध येत असल्यानें त्याच्याविरुद्ध बरेंच अकांडतांडव झालें. चार्ल्स डार्विन (१८०९–१८८२) या संशोधकानें सन १८५९ मध्यें उत्क्रांतिवादासंबंधाचा आपला 'ऑरिजिन ऑफ स्पीसीज' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्या ग्रंथांत 'बळी तो कान पिळी' या तत्त्वास अनुसरून व्यक्तिव्यक्तीमधील जीवनकलह तीव्रतेनें चालू दिला तरच मनुष्यमात्राचें हित साधेल, लोकांमधील शौर्यवीर्यादि गुणांचा विकास होईल व बलहीन माणसें कालवश होऊन सबल माणसें जगांत विजयी होतील असें त्यानें प्रतिपादिलें होतें. अर्थात् प्रबल लोक दुर्बलांवर राज्य करतात तें योग्यच होय असें त्याचें मत होतें. त्याच्या ग्रंथांतील तत्त्वें अत्यंत क्रांतिकारक ठरलीं. त्याचप्रमाणें सन १८७१ मध्यें मनुष्याची उत्पत्ति गोरिला, ओरांग-उटांग वगैरे सारख्या माकडयोनींतून झाली असेंही त्यानें प्रतिपादिलें. त्याच्या या सिद्धांतानें



चार्ल्स डार्विन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युरोपांत अपूर्व खळबळ उडवून दिली व त्याच्यावर चौफेर टीका होऊं लागली. परंतु त्यानें आपलें मत बदललें नाहीं. सन १८४७ मध्यें डॉ. जेम्स सिंपसन (१८११-१८७०) यानें क्लोरोफॉर्म नामक भूल देण्याचें औषध प्रथम उपयोजिलें. त्यामुळें मोठमोठ्या असाध्य शस्त्रक्रिया विनाक्लेश होणें शक्य झालें. सर जोसेफ ऊर्फ लॉर्ड लिस्टर (१८२७-१९१२) या सर्जननें भंजक ऊर्फ अँटिसेप्टिक औषधें प्रथमतः उपयोजिलीं. शस्त्रक्रियेच्या वेळीं हात, हत्यारें व जखमा त्या औषधांनीं धुऊन स्वच्छ केल्या तर विषारी कृमी नाश पावून शस्त्रक्रिया यशस्वी होण्यास अधिक मदत होते व शस्त्र-क्रियेच्या पूर्वी व नंतर होणाऱ्या यातना अनंतपटीनें कमी होतात असें त्यानें स्वानुभवानें सिद्ध केलें. सन १८२१ मध्यें स्टेथॉस्कोप नामक छाती तपा-सण्याकरितां उपयोजिण्यांत येणारी नळी व सन १८४४ मध्यें थरमॉमीटर यांचा शोध लागला. लुई पाश्चर (१८२२-१८९५) या फ्रेंच डॉक्टरनें जंतुशास्त्राचा खोल अभ्यास केला. हवेमध्यें, पाण्यामध्यें व इतर अनेक ठिकाणीं अनेक प्रकारचे हानिकारक जंतु असतात व त्यांच्यापासून अनेक रोग उत्पन्न होतात असें त्यानें सिद्ध केलें. आपल्या रक्तांतही विषारी जंतू असतात व त्यामुळें विषमज्वरासारखे रोग होतात असें तो म्हणे. तेव्हां ते जंतू मार-ण्याकरितां, जेनरप्रमाणेंच, विषानें विष मारण्याची कल्पना त्यानें अनुसरली व विषारी जंतू मारले अगर त्यांची शक्ति कमी केली तर असाध्य रोगही साध्य होतो असें त्यानें सिद्ध करून दाखविलें. अर्थात् या कामीं नानाप्रकारचीं 'इन्जेक्शनें' देण्यास त्यानें सुरुवात केली व तीं यशस्वी झालीं. त्यांमुळें जंतूंमुळें होणारे रोग बरे होतात हेंही आपोआप सिद्ध झालें. त्याच्या शोधांवर विश्वास ठेवूनच सर रोनाल्ड रॉस (१८५७-१९३४) या इंग्रज डॉक्टरनें मलेरिया डांसांमुळें होतो असें अनेक प्रयोगांच्या साहाय्यानें सिद्ध केलें. सन १८९८ मध्यें मादाम क्यूरी (१८६७-१९३४) या फ्रेंच स्त्रीनें रेडियमचा शोध लावला. ती पॅरिसमध्यें विज्ञानशास्त्राची प्राध्यापिका होती व तिनें आपल्या नवऱ्याच्या साहाय्यानेंच रेडियमचा शोध लावला होता. या शोधा-मुळें नभोवाणीचा शोध लागण्यास चांगलीच मदत झाली. ग्रेगर मेंडेल (१८२९-१८८४) यानें वंशशास्त्रासंबंधीं आश्चर्यकारक शोध लावले. त्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शोधांमुळें मनुष्याचे कांहीं गुणधर्म वंशजन्य असतात असें सिद्ध झालें. त्यामुळें शेतीमध्यें व जनावरांच्या निर्मितीमध्येंही क्रांति घडून आली.



अगदीं प्रथम आगगाड्यांचा वेग अगदीं मंद असे. एकदां एका गाडीवानानें एका रेल्वे कंपनीला आव्हान दिलें व त्या शर्यतींत आगगाडी मागें पडून घोडागाडीनें शर्यत जिंकली, असें हें एक काल्पनिक चित्र आहे.

२. उद्योगधंद्यांतील क्रांति :—(अ) विणकला. अठराव्या शतकांत लागलेल्या शोधांमुळें विणकलेंत मोठी प्रगति झाली होती; तरीहि त्या क्षेत्रांत काम करणारे कल्पक कारखानदार स्वस्थ बसले नव्हते. त्यांनीं आपले प्रयोग चालू ठेवले होते व त्यांच्या प्रयोगास यशही येत गेलें. वाफेनें चालणारीं यंत्रें उपयोजिण्यांत येऊं लागल्यानें हातमाग मागें पडले; तरी अजूनही कोठें कोठें त्यांचा उपयोग होत होता. सन १८२० मध्यें 'जॅकर्ड' नांवाचा माग उपयोगांत येऊं लागला. त्याच्या साहाय्यानें कापडामध्यें चित्रें, वेलबुट्टया व निरनिराळ्या आकृति विणतां येऊं लागल्या. त्यामुळें विणकलेंत क्रांति झाली. जोसेफ जॅकर्ड (१७५२–१८३४) या फ्रेंच कोष्ट्यानें हा माग शोधून काढला होता. सन १८३० मध्यें रॉबर्टनें स्वयंगतीनें चालणारा माग शोधून काढला व सन १८५१ मध्यें मागावरील धागे पिंजण्याकरितां एक नवीन यंत्र शोधून काढण्यांत आलें. या सर्व शोधांमुळें कापसाचें, लोकरीचें व रेशमाचें कापडही इंग्लंडांत निघूं लागलें. अनुकूल हवेमुळें मँचेस्टर व लँकेशायरमध्यें कापडाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गिरण्या मोठ्या प्रमाणावर निघूं लागल्या. (आ) **लोखंड.** यंत्रांना मागणी अतोनात येऊं लागल्यानें लोखंडाच्या उत्पादनाचा धंदा जोरांत चालू लागला. इमारती, जहाजें, आगगाड्या, यंत्रें वगैरेस लोखंड व पोलाद यांचा उपयोग होई. त्यामुळें लोखंडाचे मोठमोठे कारखाने निर्माण झाले. लोखं-



डाचा रस करण्याकरितां मोठमोठ्या भट्ट्या वापरण्यांत येऊं लागल्या. अभंग पोलाद तयार करण्याचे अनेक शोध यावेळीं लावण्यांत आल्यानें लोखंडाच्या धंद्यांत चांगलीच क्रांति घडून आली. लोखंडाचा रस करण्याकरितां दगडी कोळसा व कोक यांची अत्यंत जरूरी असे. त्यामुळें दगडी कोळशाच्या खाणी-शेजारींच लोखंडाचे कारखाने सुरू झाले. सुदैवानें लोखंडाच्या व दगडी कोळशाच्या खाणी एकमेकांजवळ सापडूं लागल्यानें कारखानदारांची चांगलीच सोय झाली. लोखंडाचे कारखाने जसजसे जोरांत चालूं लागले तसतसें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थापत्यशास्त्रही सुधारूं लागलें. यंत्रांची पैदास करतांना त्यांचे निरनिराळे भाग प्रमाणबद्ध करण्याकडे व नवीं नवीं यंत्रें शोधून काढण्याकडे कल्पक स्थापत्यविशारदांचें लक्ष वेधूं लागलें. त्यामुळें यंत्रशास्त्रविशारदांचा नवा वर्ग निर्माण होऊं लागला. बर्मिंगहॅम व शेफील्ड येथील लोखंडाचे कारखाने त्यावेळीं फार प्रसिद्धी पावले. शेफील्डच्या कारखान्यांतच हेन्री बेसेमर (१८१३-१८९८) हा एक स्थापत्यविशारद होता. त्यानें पोलाद तयार करण्याची एक नवीन पद्धति शोधून काढली होती. त्यामुळें यंत्रांच्या किंमतींत चांगलीच क्रांति झाली. (इ) दगडी कोळशापासून गॅस उत्पन्न करून दिवे लावण्याकरितां त्यावेळीं खटपट सुरू झाली होती. सन १७९२ मध्यें विल्यम मर्डॉकनें त्यासंबंधीं प्रथम प्रयत्न चालविले व सन १७९७ मध्यें त्यानें गॅसचा दिवा प्रथमतः लावला. पुढें सन १८०१ मध्यें लेबन या फ्रेंच गृहस्थानें त्यांत सुधारणा केली व त्यानंतर गॅसचे दिवे जिकडे तिकडे होऊं लागले. सन १८१४ मध्यें लंडनमधील रस्त्यांवर गॅसचे दिवे प्रथम लागले.

४. शेतींत सुधारणा :—सन १८२५ ते १८५० पर्यंतचा काल शेतीला प्रतिकूल होता. कारखान्यांमुळें शेती मागासलेली होती. खेड्यांतील जमीन पडून राहूं लागली, मिरासदार शेतकरी नष्ट होऊं लागले, शेतकरी खेड्यांत राहण्यापेक्षां शहरांत राहूं लागल्यामुळें खेडीं ओस पडूं लागलीं, मजुरीचे दर अत्यंत कमी झाल्यानें शेती करण्यासही कोणी मिळेना व जे शेती करण्यास तयार होते त्यांस कोणाकडूनही उत्तेजन मिळेना. शेतकरी असंतुष्ट झाल्यानें त्यांनीं दंगेधोपे सुरू केले, कारखान्यांवर हल्ले होऊं लागले व जिकडे तिकडे खिन्नतेचें वातावरण नांदूं लागले. शेतीच्या हलाखीला कुंपणें घालण्याची पद्धति, व्यापाराची मंदी व धान्याचा कायदा हीं प्रमुख कारणें सांगतां येतील. अनेक मिरासदारांनीं आपल्या जमिनी गहाण टाकण्यास अगर विकून टाकण्यासही कमी केलें नाहीं. पुढें सन १८५०–७५ पर्यंतचा काळ शेतीच्या उन्नतीचा काळ असें म्हणतां येईल. या काळांत शेतीची वाढ होण्यास अनेक घटना कारण झाल्या. सन १८३७ मध्यें 'रॉयल अॅग्रिकल्चरल सोसायटी' स्थापन होऊन तिच्यातर्फें शेतकी प्रदर्शनें भरूं लागलीं, शेतकी विषयांचें एक मासिक प्रसिद्ध होऊं लागलें व त्यांतून शेतीविषयक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक प्रयोगांची माहिती देण्यांत येऊं लागली. या उपक्रमांमुळें शेतीला उत्तेजन मिळूं लागलें. सन १८४५ मध्यें ग्लॉस्टरशायरमध्यें एक शेतकी कॉलेज स्थापण्यांत आलें. त्याच सुमारास शास्त्रज्ञांच्या शोधांमुळें निरनिराळ्या खतांचा उपयोग लोकांस कळूं लागला व कोणतें खत केव्हां घातल्यानें पीक उत्तम येतें हें लोकांस समजूं लागल्यानें शेती उत्तम चालू झाली. रॉथॅमस्टेड या ठिकाणीं सन १८३७ मध्यें एक रसायनशाळाही स्थापण्यांत आली. त्यांत खतांचा झाडांवर व पिकांवर काय परिणाम होतो याबद्दल संशोधन होऊं लागलें. रेल्वे सुरू झाल्यानें वाहतुक सोपी व कमी खर्चाची होऊं लागली. या सर्व गोष्टींमुळें इंग्लंडांत शेती उत्तम तऱ्हेनें चालून शेतकरी वर्ग आनंदांत होता. याच काळांत नवीन प्रकारचे नांगर, कुळवणी व पेरणी यंत्रें व कापणी यंत्रें उपयोजिलीं जाऊं लागलीं. धान्याचा कायदा रद्द झाल्यानें धान्यास मागणीही चांगली येत असे. परंतु सन १८७५ ते १९०० पर्यंतचा काळ शेतीला पुन्हां प्रतिकूळ झाला. अतिवर्षण, अवर्षण, धान्याच्या उतरत्या किंमती वगैरेमुळें शेतीचा धंदा पार बसून गेला. तेव्हां त्यामुळें शेतीची सुधारणा करण्याकरितां सरकारनेंही अनेक उपाय सुचविले. परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. तेव्हां जोसेफ चेंबर्लेननें खुल्या व्यापाराचें धोरण टाकून संरक्षित व्यापाराचें धोरण स्वीकारल्याशिवाय शेती जगणार नाहीं, असें सांगितलें; पण त्यावेळीं त्याचें कोणींही ऐकलें नाहीं. एकंदरींत या काळांत शेतीची अनास्थाच झाली.

५. दळणवळणाच्या साधनांत फरक:—औद्योगिक क्रांतीच्या वेळीं दळणवळणाच्या साधनांत फरक झाला होता. रस्ते व सडका चांगल्या



सुरुवातीची आगगाडी. यांत तिन्ही वर्गांचे डबे आहेत. कोणते ते ओळखा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाल्या होत्या. कालवेही वाहतुकीकरितां वापरण्यांत येत होते. व्यापारी आपला माल भाडोत्री घोड्यांच्या पाठीवरून, होड्यांतून अगर गाड्यांतून नेत असत. परंतु हीं सर्व साधनें अपुरीं पडूं लागलीं. अवजड यंत्रें नेण्याकरितां त्यांचा फारसा उपयोग होईनासा झाला. शिवाय त्या वाहतुकीमध्यें वेळ फार खर्च होई व पैसाही भरपूर खर्च करावा लागे. त्यावेळीं वाफेचीं एंजिनें कारखान्यांतून उपयोजिलीं जात. त्याचप्रमाणें वाहतुकीकरितांही वाफेच्या एंजिनांचा उपयोग व्हावा म्हणून प्रयोग होऊं लागले. तसेच जलद वाहतुक व्हावी म्हणून नवीन दिशेनें शोध होऊं लागले. त्यांत यश येऊन लोहमार्ग, आगगाडी व आगबोट यांचा शोध लागून वाहतुकीच्या कामीं त्यांचा उपयोग एकोणिसाव्या शतकांत होऊं लागला. त्यामुळें त्या शतकाला ‘ बाष्पयुग ’ असेंही म्हणतात.

६. लोहमार्ग व आगगाडी :—वाहतुक जलद व्हावी म्हणून अठराव्या शतकाच्या सुरुवातीसच कोळशाच्या खाणींतून रूळ टाकून त्यावरून ‘ वाघिणी ’ नेल्या-आणल्या जात. त्या ओढण्याकरितां घोड्यांचा उपयोग होई. रूळही प्रथमतः लाकडीच असत. पुढें सन १७३९ मध्यें रूळ लोखंडाचे होऊं लागले व त्यांवरून घोड्यांच्या मदतीनें वाघिणी ओढल्या जात. वाफेचीं एंजिनें सुरू झाल्यानंतर सन १८१३ मध्यें विल्यम हॅडले यानें ‘भग्‌भग्’ करणारें वाफेचें एंजिन शोधून काढलें. त्याच्यापूर्वीच सन १७६९ मध्यें क्रूनो या फ्रेंच गृहस्थानें तसलें एंजिन शोधून काढलें होतें; परंतु तें ‘भयंकर’ म्हणून मागें पडलें. रिचर्ड ट्रेव्हिथिक यानेंही सन १८०४ त एक एंजिन शोधून काढलें होतें. परंतु त्या सर्वांपेक्षां जॉर्ज स्टीफन्सननें (१७८१–१८४८) शोधून काढलेलें एंजिन



जॉर्ज स्टीफन्सन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अत्यंत उपयुक्त ठरलें. हा स्टीफन्सन एक स्कॉच गृहस्थ होता. त्याची घरची अत्यंत गरिबी होती. परंतु पहिल्यापासूनच त्याचा ओढा एंजिनें बनविण्याकडे होता. त्यानें जें एंजिन तयार केलें तें ताशीं सहा मैल जाई व सहा 'वाघिणी' ओढी! त्यानें एंजिन तयार केल्यावरच इंग्लंडमध्यें स्टॉकटन ते डार्लिंग्टनपर्यंत अगदीं पहिली रेल्वे सन १८२६ मध्यें सुरू झाली. पुढें लिव्हरपूल ते मँचेस्टरपर्यंत दुसरी रेल्वे सन १८३० मध्यें सुरू झाली. तिच्या उद्घाटन समारंभाच्या दिवशींच व्यापारमंत्रि हस्किसन त्या गाडीखालीं सांपडून मेला. पुढील दहा वर्षांत रेल्वेचे फाटे इंग्लंडमध्यें अनेक ठिकाणीं झाले; व एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सर्व इंग्लंडमध्यें रेल्वेच्या रुळांचें जाळें पसरण्यांत आलें. अगदीं प्रथम आगगाड्या फार सावकाश जात, त्यांचीं वेळापत्रकें असत, पण त्याप्रमाणें आगगाड्या कधींही जात-येत नसत, एंजिनहांकेही अनभिज्ञ असल्यानें अनेक अपघात होत व त्यांतील प्रवासही सुखाचा नसे. माल वाहण्याकरितां मात्र त्यांचा फार उपयोग होऊं लागला. अगदीं सुरुवातीला वाटेल त्यानें आपली स्वतःची गाडी न्यावी व त्याकरितां रुळांच्या मालकाला ठराविक रक्कम भाडें म्हणून द्यावें अशी पद्धति होती. परंतु तीमुळें पुढें अनेक घोंटाळे होऊं लागल्यामुळें खाजगी गाड्यांस रुळांवरून जाण्याची मनाई करण्यांत आली. पहिल्या व दुसऱ्या वर्गाचे डबे बंद व जरा सोयीस्कर असत; तिसऱ्या वर्गाचे डबे उघडे असत व त्यांतील प्रवास त्रासदायक होई. रेल्वेचें भाडें दर मैलास एक पेनी असे.

७. आगबोटी :—इतके दिवस लाकडी बोटी समुद्रावरून शिडांच्या व डोलकाठ्यांच्या साहाय्यानें प्रवास व व्यापार करीत; परंतु त्यामुळें वेळ फार लागे व व्यापार त्वरित गतीनें होत नसे. ही अडचण ओळखून आगगाडीप्रमाणेंच वाफेनें चालणाऱ्या बोटीही सुरू करण्यांत आल्या. सन १८०२ मध्यें वाफेनें चालणारी बोट प्रथमतः स्कॉटलंडमध्यें सुरू झाली; परंतु ती नालायक ठरली. पुढें 'क्लेरमॉट' नामक बोट अमेरिकेंत हडसन उपसागरांत सुरू झाली. परंतु तीही समाधानकारक नव्हती. सन १८१२ मध्यें क्लाइड नदींतून चालणारी 'कॉमेट' नांवाची आगबोट प्रथम यशस्वी झाली. अजून समुद्रपर्यटन करणारी आगबोट सुरू झालेली नव्हती. सन १८१९ मध्यें 'सॅव्हॅन्ना' नामक आग-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोट अगदीं प्रथमच ॲटलांटिक महासागर तरून अमेरिकेस गेली. मात्र वाफेच्या एंजिनाशिवाय तिला डोलकाठ्याही ठेवण्यांत आल्या होत्या! न जाणों, एंजिनानें काम करण्याचें नाकारलेंच तर त्यांचा उपयोग व्हावा. सन १८२५ मध्यें हिंदुस्थानांत एक आगबोट आली. यानंतर माल नेण्यास



जगाची व्यापार-शर्यत.

आगबोटींचा सर्रास उपयोग होऊं लागला. या सर्व आगबोटी लांकडाच्या होत्या; तेव्हां पुढें त्या लोखंडाच्या तयार करण्यांत याव्या असें कांहीं म्हणूं लागले. त्यावेळीं 'त्या तरणार कशा' असें म्हणून त्या कल्पनेचें हसूं झालें! परंतु हळूहळू ही कल्पना अनेकांस व आरमारी अधिकाऱ्यांसही पटूं लागली. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस पोलादी आगबोटी इंग्लंडमध्यें तयार होऊं लागल्या. सन १८६९ मध्यें सुवेझ कालवा उघडला गेला व त्यांतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रवास करण्यास आगबोटीच उपयुक्त होत असें अनुभवानें सिद्ध झालें. त्यामुळें शिडांचीं लांकडी जहाजें मागें पडूं लागलीं.

८. तारायंत्र व टेलिफोन :—आगगाड्या व आगबोटी यांच्या शोधांप्रमाणेंच व्यापार व बातम्या यांच्या जगांत क्रांति घडवून आणणाऱ्या आणखी दोन शोधांचा एकोणिसाव्या शतकांत प्रसार झाला. मायकेल फॅरडेनें विद्युत्संबंधीं अनेक शोध लावले होते. त्यांचा फायदा घेऊन सन १८३७ मध्यें कुक व व्हिटस्टन यांनीं तारायंत्राचा शोध लावला. कांहीं ठराविक खुणांच्या मदतीनें दूर अंतरावरच्या माणसाकडे विद्युत्संदेश पाठवितां येतो असें त्यांनीं सिद्ध केलें. सन १८१४ मध्यें ऑर्स्टेड नांवाच्या एका ऑस्ट्रियन गृहस्थानें तो शोध लावला होता; परंतु तो फारसा यशस्वी झाला नाहीं. इंग्लंडमध्यें सन १८४४ मध्यें पहिला विद्युत्संदेश पाठविण्यांत आला. परंतु देशांतल्या देशांत तारायंत्राचा उपयोग होतो; समुद्रापलीकडील देशांत विद्युत्संदेश कसा पाठवावयाचा हा प्रश्न होता. लॉर्ड केलव्हिन यानें तो प्रश्न सोडविला व समुद्रांत वापरतां येईल अशी तार शोधून तिच्यातर्फे अमेरिकेंतही विद्युत्संदेश पाठवितां येईल असें त्यानें सिद्ध केलें. त्याप्रमाणें सन १८६५ सालीं प्रथमतः समुद्रांत 'केबल' टाकण्यांत येऊन तिच्यातर्फे अमेरिकेस विद्युत्संदेश पाठविण्यांत आला. पुढें सन १८७० मध्यें सरकारनें तारायंत्रावर आपली मालकी असल्याचें जाहीर केलें व खाजगी विद्युत्संदेशास सहा पेन्स फी ठेविली. विद्युत्च्या मदतीनें आवाजही दूरवर पोंचवितां येतो असें 'पेज' नामक एका अमेरिकन शास्त्रज्ञानें सिद्ध केलें होतें. पुढें सन १८६० मध्यें फिलिप रीस या जर्माननें टेलिफोनची कल्पना लोकांपुढें प्रथम मांडली व ग्रॅहॅम बेलनें त्यांत सुधारणा करून टेलिफोन सुरू केला. परंतु तोही सदोषच होता. त्यांत सुधारणा करून एडिसननें सध्यांच्या स्वरूपांत टेलिफोन सुरू केला. पुढें सन १८९०–९२ मध्यें टेलिफोनचा उपयोग सार्वत्रिक होऊं लागला. तारायंत्र व टेलिफोन यांच्या शोधांमुळें जगावर अनंत उपकार झाले आहेत. पेनी पोस्टेजची व्यवस्थाही एकोणिसाव्या शतकांत झाली होती. त्याचें वर्णन मागें आलेंच आहे (पहा, पान ३२).

९. विद्युत्शक्तीमुळें इतर फायदे :—तारायंत्र व टेलिफोन यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमाणेंच विद्युत्शक्तीनें आणखीही चमत्कार घडवून आणले. बेंजामिन फ्रँकलिननें विद्युत्संबंधीं अनेक शोध लावले. त्याचा एक शोध फारच उपकारक ठरला. उत्पातप्रसंगीं घरांचें संरक्षण करणारी विद्युत्वाहक तार त्यानें शोधून काढली. त्यामुळें ती लाविली असतां घरावर वीज पडली तरी घर शाबूत राहतें, असें त्यानें सिद्ध केलें. मायकेल फॅरॅडे यानें डायनॅमोचा शोध लावल्यानें विद्युत् कोठेंही निर्माण होऊं लागली. त्यामुळें कोठेंही डायनॅमो बसविला तर घरांत विजेचे दिवे लावतां येणें शक्य झालें. यामुळें इतके दिवस तेलाचे अगर गॅसचे दिवे लाविले जात, ते बंद पडून विजेचे दिवे सर्वत्र होऊं लागले. इंग्लंडमध्यें सन १८८२ मध्यें विजेच्या दिव्यांचा प्रसार व्हावा या हेतूनें कायदा पास झाला. विद्युत्च्या साहाय्यानें चांदीच्या भांड्यांस गिलिट करणेंही शक्य झालें. आणखी एक मोठा फायदा म्हणजे 'क्ष किरणांच्या' साहाय्यानें फोटो काढणें शक्य झालें. विल्यम कोनार्ड रॉटजेन (१८४५–१९२३) या जर्मन शास्त्रज्ञानें 'क्ष' किरणांचा शोध लावला (१८९५). कोणत्याही रोग्याच्या रोगाचें योग्य निदान करण्याच्या दृष्टीनें 'क्ष' किरणांचा फार उपयोग होतो. भूगर्भांतून जाणाऱ्या आगगाड्याही सन १८५५ पासून सुरू झाल्या. त्याही विजेच्या साहाय्यानें चालवितां येतील असें हेन्री ग्रेटहेड (१८४४–१८९६) यानें सिद्ध केलें. त्याप्रमाणें विजेनें चालणाऱ्या आगगाड्याही इंग्लंडमध्यें सन १९०० च्या सुमारास निघूं लागल्या. सन १८६९ पासून घोड्याच्या ट्रामगाड्या इंग्लंडांत असत; परंतु सन १८९६ मध्यें विद्युत्च्या साहाय्यानें ट्रामगाड्या चालू झाल्या व सर्व लंडनभर त्यांचें जाळें पसरलें गेलें.

१०. इतर शोधः—गॅसनें चालणारें एंजिन लेनॉर या फ्रेंच गृहस्थानें प्रथमतः सन १८६० मध्यें शोधून काढलें व त्यांत सुधारणा करून सन १८७६ मध्यें 'ऑटो' एंजिन व सन १८८६ मध्यें 'क्लार्क' एंजिन शोधून काढण्यांत आलें. परंतु त्या एंजिनांस खर्च फार लागे. तेव्हां गॅसच्या मदतीनें एंजिनें चालू न करतां त्याकरितां विद्युत्चाच उपयोग होऊं लागला. पेट्रोलचा शोध लागण्यापूर्वी वाफेच्या गाड्या रस्त्यांतून जात येत. त्यांचा वेग दर ताशीं चार मैल होता. परंतु त्या गाड्या लोकांस आवडेनात. तेव्हां डेमलर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



एकोणिसाव्या शतकांतील सुरवातीची वाहतूक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१८३४–१९००) या जर्मनानें पहिलें पेट्रोल एंजिन शोधून काढलें (१८८४). त्याच्या एंजिनांत शोध करून पुढें लेव्हसर या फ्रेंच गृहस्थानें मोटारगाडी शोधून काढली; सन १८९५ त इंग्लंडमध्यें पहिली मोटारगाडी आली. मोटारगाडीच्या शोधामुळें वाहतुकीमध्यें व दळणवळणाच्या साधनांत क्रांति घडून आली. रूडॉल्फ डीझेल (१८५८–१९१३) या जर्मनानें 'डीझेल' एंजिन शोधून काढलें (१८९२). त्यामुळें तेलाच्या साहाय्यानें चालणारीं एंजिनें, गिरण्या, आगबोटी, कारखाने वगैरे अनेक ठिकाणीं बसविण्यांत आलीं. टॉमस एडिसननें (१८४७–१९३१) सन १८७७ मध्यें ग्रामोफोनचा व मॅजिक लँटर्नचा शोध लावला. टॉमस वेजवुड (१७७१–१८०५) यानें प्रथमतः सन १८०२ मध्यें फोटोग्राफीचा शोध लावला असें म्हणतात. परंतु फोटोग्राफीसंबंधींचे अनेक शोध फॉक्स टॅलबॉट (१८००–१८७७) या इंग्रजानें लावले. विमानांसंबंधीं व नभोवाणीसंबंधींही प्रयोग चालू होते; परंतु त्यांचें युग अजून यावयाचें होतें. सन १८५१ मध्यें ऐझॅक सिंगर (१८११–१८७५) या अमेरिकन गृहस्थानें शिवण्याचें यंत्र शोधून काढलें. सन १८४० च्या सुमारास हार्मोनियमचा शोध लागला. सन १८०८ च्या सुमारास एका दुचाकीचा पॅरिसमध्यें देखावा दिसूं लागला. त्या गाडीचा मधला दांडा लाकडाचा असे व त्यावर घोड्याच्या तोंडाच्या



मॅकमिलनची बायसिकल १८३९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आकाराचें चित्र कोरलेलें असे. त्यावरून त्या गाडीला 'हॉबी हॉर्स' असें म्हणत. त्या गाडीला पेडल्स, मडगार्ड वगैरे कांहीं नव्हतें. पुढें तिच्या रचनेंत सुधारणा होऊं लागल्या. सन १८१८ मध्यें बॅरन ड्रेइस या जर्मनानें बरीच सुधारणा केली व ती दुचाकी लंडनच्या रस्त्यांतून चालूं लागली. सध्यांच्या सायकलीसारखी सायकल करण्याचें बरेंचसें श्रेय गॅव्हिन डॅलझील व मॅकमिलन या इंग्रजांस मिळतें. त्यांनीं आपली गाडी सन १८४६ च्या लंडनच्या प्रदर्शनांत मांडली होती. त्यावेळीं सायकलवर नीट बसतां येत नसे व धड उभेंहि राहतां येत नसे. पुढें सन १८८८ च्या सुमारास सायकली सर्वत्र झाल्या.

११. शास्त्रीय शोधांचे परिणाम:—एकंदरींत पाहतां एकोणिसाव्या शतकांतील निरनिराळ्या शोधांमुळें जगाची अनेक प्रकारांनीं प्रगति झाली यांत शंका नाहीं. वैद्यकशास्त्रांतील शोधांमुळें मनुष्यजातीवर अनंत उपकार झाले. लोखंड व दगडी कोळसा यांच्या बाबतींत जे शोध झाले त्यामुळें इंग्लंड देश यांत्रिक सामुग्री उत्पन्न करणारा जगाचा एकमेव कारखानाच बनला. आगगाडीस लागणारीं यंत्रें, रूळ, एंजिनें हीं इंग्लंडमध्येंच निर्माण होत. त्यामुळें जगाच्या निरनिराळ्या भागांतून त्याकरितां एकसारखी मागणी येऊं लागली. त्यामुळें इंग्लंडांतील लोखंडाचे कारखाने जोरांत चालू लागून देश संपन्न झाला. इंग्लंडचा जगांतील निरनिराळ्या भागांशीं संबंध त्वरित गतीनें आणण्यास आगबोटी व तारायंत्र यांचा फार उपयोग होऊं लागला. त्यामुळें इंग्लंडच्या नौकानयनाच्या धंद्याची अतिशय वाढ होऊं लागली. ऑस्ट्रेलियासारख्या दूरच्या देशांतूनही मांस, गहूं, साखर, लोणी, फळें, सोनें वगैरे माल त्वरित गतीनें इंग्लंडांत येऊं लागल्यानें इंग्लंडच्या व्यापाराची वाढ झाली. ब्रिटिश साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांशीं ब्रिटनला योग्य ते संबंध ठेवतां येऊं लागल्यानें साम्राज्याचें संरक्षण करणें पूर्वींपेक्षां सोपें झालें. विद्युत्शक्तीच्या साहाय्यानें अनेक गोष्टी होऊं लागल्यानें लोकांच्या सुखसोयींमध्यें अनेक सुधारणा होऊं लागल्या व जीवन अधिक सुखमय होण्यास मदत झाली. शिवाय ग्रामोफोन, विजेचे दिवे, फोटो, आगगाड्या, पोस्ट, तारायंत्र वगैरेंमुळें मनुष्याच्या राहणींत फरक पडत जाऊन लोकांची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहणीही सुधारली. सर्व शोधांचा अनिष्ट असा परिणाम कशावर झाला असेल तर तो शेतीवर. शेती खालावली, शेतें पडून राहूं लागलीं व शेतकरी भिकेस लागूं लागला. शहरांकडे ज्याचा त्याचा ओढा वाहूं लागल्यानें शहरांची वाढ बेसुमार होऊं लागली. इंग्लंडच्या लोकसंख्येंतही वाढ होऊं लागली. गॅस, वीज, पेट्रोल वगैरेसारख्या नव्या नव्या शक्तींच्या उदयामुळें इंग्लंडची स्थिति पार पालटून गेली. रसायनशास्त्रांतील शोधांमुळें डांबरासारखे पदार्थ निर्माण होऊं लागले व कपड्यांस रंग देण्याच्या उद्योगांत क्रांति झाली. तसेंच निरनिराळ्या रासायनिक द्रव्यांचे गुणधर्म कळूं लागल्यानें कोणतें खत केव्हां घातलें असतां पीक उत्तम येईल, तें शेतकऱ्यांस कळूं लागलें व त्यामुळें जी काय थोडीबहुत शेती होती तींत सुधारणा होऊं लागली. एकंदरींत पाहतां ज्ञानाचीं अनेक अंगें लोकांस समजूं लागल्यानें त्यांच्या दृष्टिकोनांत फरक पडूं लागला. त्यामुळें लोकांच्या राहणींत, विचारांत व आचारांतही क्रांति झाल्याशिवाय राहिली नाहीं. अर्थात् त्यामुळें समाजाची घडी सुधारणें लोकांस इष्ट वाटूं लागल्यानें एकोणिसाव्या शतकांत अनेक सामाजिक कायदे पास झाले. सुधारणांची जरूरीही सर्वांस पटूं लागली व त्यामुळें टोरीसारख्या जुन्या पंथास चिकटून राहणारे लोकही सुधारणा झाली पाहिजे असें म्हणूं लागले. वरील सर्व शोधांमुळें इंग्लंडचें आंतर्राष्ट्रीय महत्त्वही वाढण्यास मदत झाली व इंग्लंड हें एक श्रेष्ठ राष्ट्र ठरलें.

अभ्यास

१. एकोणिसाव्या शतकाला 'अद्भुतरम्य शतक' असें कां म्हणतात? त्या शतकांत अद्भुत गोष्टी कोणत्या घडल्या? त्यांचें थोडें वर्णन द्या.

२. खालील संशोधकांसंबंधीं माहिती द्याः—

लुई पाश्चर, मायकेल फॅरॅडे, लॉर्ड केल्व्हिन, लॉर्ड लिस्टर, स्टीफनसन, रोलंड हिल, चार्ल्स डार्विन.

३. एकोणिसाव्या शतकांतील कांहीं क्रांतिकारक शोध सांगा. त्यांचा मानवी राहणीवर व आचारविचारांवर कोणता परिणाम झाला?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. खालीलसंबंधीं शोध कोणीं लावले ? —
गॅल्व्हॅनोमीटर, डायनॅमो, क्लोरोफॉर्म, गॅसचा दिवा, तारायंत्र, टेलिफोन, केबल, मोटारगाडी, ग्रामोफोन, 'क्ष' किरण, शिवण्याचें यंत्र, पेट्रोल एंजिन, फोटोग्रॅफी, सायकल.

५. दळणवळणांतील शोध कोणते ? त्यांचा फायदा सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११. एकोणिसाव्या शतकांतील कांहीं ठळक विशेष

१. लोकशाहीचा उत्कर्ष :—नेपोलियनशीं झालेल्या युद्धानंतर युरोपांत राष्ट्रीयत्वाच्या तत्त्वाचा उगम झाला व त्यानें युरोपांतील सर्व राष्ट्रांना ग्रासून टाकलें. अनियंत्रित राजसत्ता नष्ट करण्याची चळवळ दाबून टाकण्याचा प्रयत्न करूनही, प्रत्येक राष्ट्रांत ती फोफावली व तिनें इतकें घट्ट मूळ धरलें कीं, कांहीं केल्या तें उपटलें जाईना. अर्थात् त्याचा इंग्लंडवर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. प्रथम लोकांवर दडपशाही कायद्यांची संक्रांत बसली व पार्लमेंटच्या सुधारणेचा प्रश्न दडपून टाकण्याचा, सरकारकडून व जमीनदारवर्गाकडूनही, प्रयत्न झाला; पण तो फसला. अखेर सन १८३२ मध्यें पार्लमेंटच्या सुधारणेचा पहिला कायदा पास होऊन शहरांतील घरमालकांस मतदानाचा अधिकार मिळाला व मध्यमवर्गाच्या विचारांचें दडपण पार्लमेंटच्या कामकाजावर पडूं लागलें. झाली ही गोष्ट फार झाली, आतां जास्त पुढें पाऊल टाकूं नये असें व्हिग लोक म्हणूं लागले. परंतु एकदां टाकलेलें पाऊल मागें घेणें किंवा तेथें थांबविणें अशक्य होऊन पार्लमेंटला सन १८६७ सालीं दुसरा कायदा पास करावा लागला. त्यामुळें कामकरीवर्गांतील लोकांस मताधिकार मिळाला. अखेर सन १८८४–८५ सालीं तिसरा कायदा पास होऊन मजूरवर्गालाही मताधिकार मिळाला. याशिवाय सन १८७२ चा गुप्तमतदानाचा कायदा व सन १८८३ चा लांचलुचपत बंद करणारा कायदा पास झाल्यानें बरीच सुधारणा झाली. या सर्व कायद्यांनीं इंग्लंडमध्यें लोकशाहीचा विजय झाला असें मानण्यांत येतें. मात्र अजूनही स्त्रियांस व वयांत आलेल्या प्रत्येकास मताधिकार मिळालेला नव्हता. यामुळें इंग्लंडमध्यें एकोणिसाव्या शतकांत लोकशाही पूर्णत्वानें स्थापन झाली नाहीं असेंच म्हणावें लागतें. राजसत्ता मात्र पूर्णपणें नियंत्रित झाली होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. मजूरपक्षाचा उदय :—सन १८८४–८५ च्या कायद्यानें सर्व मजुरांस मताधिकार मिळाल्यानें मजूरपक्षाचे पार्लमेंटमध्यें प्रतिनिधि प्रथमच येऊं लागले. त्यावेळेपासूनच मजूरपक्षाच्या संघटनेचें काम सुरू झालें व त्या पक्षाला हळूहळू महत्त्व प्राप्त होऊं लागलें. मजुरांच्या सुखसोयींकडे लक्ष देऊन त्यांच्या कामाचे तास कमी करणें, त्यांची पगारवाढ करून घेणें व भांडवलवाल्यांचें महत्त्व कमी करणें हा मजूरपक्षाचा सर्वसाधारण कार्यक्रम होता. त्या दृष्टीनें पाहतां प्रसिद्ध जर्मन समाजसत्तावादी व क्रांतिकारक लेखक कार्ल मार्क्स याच्या लिखाणाची छाया मजुरांच्या विचारावर पडलेली होती. मजुरांच्या हिताकरितां डिझरेलीसारखे मुत्सद्दी कार्य करीत होते; परंतु मजुरांचा मुख्य कटाक्ष भांडवलशाहीवर होता. त्यांच्या मजूरसंघास मान्यता मिळालेली होती व संप करण्याचा त्यांचा अधिकारही सरकारनें मान्य केला होता. परंतु संपत्तीच्या उत्पादनाच्या साधनांवर त्यांस आपली सत्ता स्थापन करून भांडवलशाही नष्ट करावयाची होती. त्यांच्या या विचारसरणीमुळेंच इंग्लंडमध्यें समाजसत्तावादानें डोकें वर काढलें असें म्हणावें लागतें. एकोणिसाव्या शतकांत मजूरपक्षाचें बळ अल्पच होतें; परंतु विसाव्या शतकांत मात्र तें वाढीस लागून मजूरपक्षाला प्रधानमंडळ स्थापन करण्याचा एकदांदोनदां मान मिळाला होता.

३. उदात्ततत्त्ववादाचा उदय :—एकोणिसाव्या शतकांत मजुरांचे हाल फार होत. त्यांना पोटभर अन्न मिळत नसे, अस्वच्छ घरांत रहावें लागे, जाडेंभरडें अंगवस्त्र वापरावें लागे, त्यांच्या लहान लहान मुलांस अत्यंत कोंवळ्या वयांत खाणींतून काम करावें लागून नानाप्रकारचा जाच सहन करावा लागे व स्त्रियांसही त्याच अवस्थेंतून जावें लागे. या कारणांमुळें त्यांच्यांत बालमृत्यूचें प्रमाणही अति वाढलें होतें. ही स्थिति सुधारणें अत्यावश्यक आहे असें कांहीं उदारधि गृहस्थांस वाटूं लागलें होतें. मजुरांची स्थिति सुधारून त्यांस सामान्य सुखसोयी मिळवून दिल्या तर त्यांचें आरोग्य रक्षिलें जाईल व त्यांच्यांतील बालमृत्यूचें प्रमाणही कमी होईल असें त्यावेळीं कांहीं लोकांस वाटूं लागलें. त्यांनीं त्या काळीं 'उदात्ततत्त्ववाद्यांचा संघ' स्थापन केला होता. त्या संघाचा मुख्य संचालक लॉर्ड शॅफ्टस्बरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१८०१–१८८५) ऊर्फ ॲशले कूपर हा होता. मजुरांचे हाल पाहिले म्हणजे त्याचें अंतःकरण तिळतिळ तुटे. तो सरदार कुळांतील असल्यामुळेंच मजुरांशीं सहानुभूति बाळगण्यांत त्याचा कोणताही स्वार्थ नाहीं हें लोकांस पटलें व त्यामुळें त्याच्या चळवळीस चांगलेंच महत्त्व आलें. त्याच्या प्रमाणेंच डॉ. साऊथवुड स्मिथ, सर एडविन चॅडविक वगैरे अनेकांनीं खटपट करून लोकांचें सार्वजनिक आरोग्य सुधारण्याची खटपट केली. या सर्वांच्या प्रयत्नांस हलके हलके चांगलेंच यश येत गेलें व त्यामुळें गुलामगिरी नष्ट करणें, कॅथॉलिकांवरील निर्बंध रद्द करणें, कारखान्यांसंबंधीं निरनिराळे कायदे पास करून घेणें (१८३३, १८४२, १८४७, १८७८) वगैरे कामें झालीं. त्याचप्रमाणें आरोग्यासंबंधीं कायदा पास झाला (१८७५), शिक्षणासंबंधीं कायदे पास झाले (१८७०, १८७६, १८९१, १९००) व अनाथालयें, रुग्णालयें, आरोग्यमंडळें, सहकारीसंस्था, वगैरेंची स्थापना होऊं शकली. अनेक गुन्ह्यांच्या क्रूर शिक्षाही पीलनें रद्द केल्या. या सर्व गोष्टींमुळें उदात्ततत्त्ववाद्यांच्या कामाचें महत्त्व सहज समजून येणारें आहे. मजूरसंघासही उत्तेजन मिळून मजुरांची स्थिति सुधारण्यास अप्रत्यक्षपणें मदत झाली.

४. धार्मिक मतस्वातंत्र्याची प्रगति :—अठराव्या शतकांत प्रॉटेस्टंटांना धर्मस्वातंत्र्य होतें; इतरांस नव्हतें. ही स्थिति सुधारण्याचाही एकोणिसाव्या शतकांत प्रयत्न करण्यांत आला. कॅथॉलिक, नॉनकन्फॉर्मिस्ट, ज्यू वगैरे निरनिराळ्या धर्मपंथीयांवर अनेक प्रकारचीं धर्मबंधनें लादण्यांत आलीं होतीं. त्यांना पार्लमेंटमध्यें बसतां येत नसे, सरकारी नोकऱ्या करतां येत नसत, विश्वविद्यालयीन शिक्षण घेतां येत नसे व साधा मतदानाचाही अधिकार त्यांस नसे. यामुळें ते सर्व लोक असंतुष्टच होते. अनेक उदात्ततत्त्ववाद्यांस ही स्थिति आवडत नव्हती व सर्व लोकांस धार्मिक स्वातंत्र्य द्यावें असें त्यांस वाटे. त्यांच्या खटपटीमुळें याही बाबतींत पार्लमेंटनें निरनिराळे कायदे पास करून त्या सर्वांना धार्मिक मतस्वातंत्र्य दिलें. सन १८२८–२९ मध्यें कॅथॉलिकांवरील बंधनें नष्ट झालीं, सन १८५८ मध्यें ज्यूंना पार्लमेंटच्या निवडणुकीस उभे राहण्याचा अधिकार मिळाला, सन १८७१ मध्यें विश्वविद्यालयांतील धर्मभेद नष्ट होऊन तीं सर्वांस खुलीं करण्यांत आलीं व इतरही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक गोष्टी घडून आल्यानें सर्व धर्मपंथांतील लोकांचें धार्मिक मतस्वातंत्र्य मान्य झालें. यामुळें एकोणिसाव्या शतकांत राजकारण व धर्मकारण यांची योग्य दिशेनें फारकत झाली असें म्हणणें रास्त दिसेल.

५. ऑक्सफर्ड चळवळ :—निरनिराळ्या धार्मिक पंथांतील लोकांस धार्मिक स्वातंत्र्य मिळालें हें कांहीं लोकांस मानवलें नाहीं. प्रॉटेस्टंट धर्मपंथांत शिरलेले दोष काढून टाकावे, खऱ्या धार्मिक तत्त्वांची लोकांस शिकवण द्यावी व साधल्यास जुन्या कॅथॉलिकपंथाच्या तत्त्वांच्या साहाय्यानें नव्या प्रॉटेस्टंटपंथाच्या तत्त्वांस उजळा द्यावा असें कांहीं लोकांस वाटत होतें. अशा लोकांत जॉन कीबल, एडवर्ड पुसी, जॉन हेन्री न्यूमन, डॉ. मॅनिंग वगैरे लोक होते. हे सर्व जण ऑक्सफर्ड विश्वविद्यालयांत होते; म्हणून त्यांच्या चळवळीस 'ऑक्सफर्ड चळवळ' असें म्हणतात. त्यांनीं 'ट्रॅक्ट ऑफ दि टाइम्स' या नांवाचें एक वर्तमानपत्रही सुरू केलें. त्यांत त्यांनीं वेळोवेळीं खालील तत्त्वें प्रतिपादिलीं. (१) लोकांना धर्मतंत्रें नीट कळलेलीं नाहींत. त्यामुळें लोकांची धर्मावरील श्रद्धा नष्ट होऊं लागली आहे. तेव्हां कॅथॉलिकांचा कर्मठपणा धर्मामध्यें आणणे जरूरीचें आहे. (२) नास्तिकवादाला मूठमाती दिली पाहिजे, धार्मिक शिस्त सुधारली पाहिजे व धर्मविधि जुन्या व करड्या कॅथॉलिक धर्मपद्धतीप्रमाणें सुरू केले पाहिजेत. (३) धर्मसुधारणेमुळें रोमच्या धर्मपीठाची व इंग्लिश धर्मपीठाची फारकत झाली असें समजणें कोत्या बुद्धीचें लक्षण आहे. इंग्लंडमधील धर्मगुरू रोमच्या पीठाचेच नोकर आहेत. (४) धर्मतत्त्वांचा चिकित्सक बुद्धीनें अभ्यास करणें मूर्खपणाचें आहे. बुद्धिप्रामाण्यानें नास्तिकपणाच जास्त फोफावतो व विचारशैथिल्य येतें. यामुळें इंग्लिश धर्मपीठ, शास्त्रीय ज्ञानावर भर दिल्यानें, आपल्या उदात्त तत्त्वांपासून च्युत होऊं लागलें आहे. तेव्हां त्याला वठणीवर आणावयाचें असेल तर कॅथॉलिक धर्मतत्त्वें आचरणांत आणणेंच योग्य होय. हेन्री न्यूमन, डॉ. मॅनिंग वगैरे लोकांनीं आपल्या चळवळीनें इंग्लंडमध्यें चांगलीच खळबळ उडवून दिली. त्या चळवळ्यांना 'ट्रॅक्टेरियन्स' ऊर्फ 'धर्मसुधारणावादी' असेंही म्हणत. पुढें न्यूमन, मॅनिंग, कीबल वगैरे लोक उघडउघड कॅथॉलिक धर्मपंथांत सामील झाले. त्यामुळें पुसी एकटा पडला; मात्र त्यानें ही चळवळ पुढें एकट्यानेंच चालविली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. शिक्षणाचा प्रसार :—लोकशाहीचा प्रसार व यश सुशिक्षणावरच अवलंबून असतें. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस इंग्लंडमध्यें लोकशाहीच नव्हती, मग शिक्षण कोठून येणार? लोकांस शिक्षण देणें हें सरकारचें कर्तव्य आहे असें सरकार मानीतच नसे. उलट तें धर्मपीठाचें कार्य आहे असें म्हटलें जाई. यामुळें शिक्षणाची अनास्थाच होत होती. पुढें सन १८३२ चा कायदा पास झाल्यावर वरील धोरणांत थोडा फरक झाला व शिक्षणाच्या कार्यास सरकारी मदत मिळूं लागली. तरीही शिक्षणक्षेत्रांत अत्यंत अनास्थाच होती. सरकारनें चालविलेल्या शाळा नव्हत्या, इंग्लंडमधील सुशिक्षितांचें प्रमाण अल्प होतें व अगदीं थोड्या लोकांसच लिहितां-वाचतां येई. खाजगी शाळा होत्या; परंतु त्यांची अनास्थाच होती. निकालावरून शिक्षकांस पगार देणें, बुद्धिवानांकडेच जास्त लक्ष पोंचविणें, धार्मिक शिक्षणावर भर देणें, शिरोगणतीनें ग्रँटस् दिल्या जाणें, निरनिराळ्या शाळांकडे पाहण्याची सरकारी दृष्टि वेगवेगळी असल्यानें पक्षपात होणें व इन्स्पेक्टर्स सरकारकडून नेमले न जातां ते धर्मपीठाकडून नेमले जाणें वगैरे गोष्टी त्या काळांत चालू होत्या. ही स्थिति सुधारण्याकरितांच सन १८७० मध्यें फॉर्स्टरनें प्राथमिक शिक्षणासंबंधीं पहिला कायदा पास केला. त्यामुळें धर्मगुरू चिडले. तरी ती योजना अंतीं हिताची ठरली. पुढें सन १८८० मध्यें सक्तीचें शिक्षण सुरू झालें व सन १८९१ मध्यें मोफत शिक्षणास सुरुवात झाली. सन १८९९ मध्यें विद्याखातें सुरू झालें. एकंदरींत पाहतां शिक्षणाचें पाऊल या शतकांत खात्रीनें पुढें पडलें.

७. कारखान्यांची वाढ :—एकोणिसाव्या शतकांत कारखान्यांची भरमसाट वाढ झाली. अनेक प्रकारचे शोध, यंत्रांची व लोखंडी सामानाची मागणी, साम्राज्यविस्तार, अनुकूल हवा, लोखंड, दगडी कोळसा व जलशक्ति यांचा भरपूर पुरवठा, अनुभवी व कल्पक शास्त्रज्ञांची, कारागिरांची व स्थापत्यज्ञांची कर्तृत्वशक्ति व व्यापारास अनुकूल अशी नौकातरणाची सिद्धता या सर्व गोष्टींमुळें या शतकांत इंग्लंडमध्यें कारखान्यांची व गिरण्यांची बेफाट वाढ झाली. लोखंड, दगडी कोळसा, कापूस, लोकर वगैरे माल इंग्लंडांत उत्पन्न होत असल्यानें त्या त्या धंद्यांत विलक्षण क्रांति झाली,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



विसाव्या शतकाच्या सुरुवातीची वाहतूक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लंडचा व्यापार अतोनात वाढला, तो देश संपन्न झाला व त्याची भरभराट झाली. यांत्रिक सामुग्री त्या वेळीं फक्त इंग्लंडमध्येंच तयार होई. यामुळें त्याच्या निर्मितीचें जगाचें पेटंट इंग्लंडलाच मिळालें होतें असें म्हणतां येईल. अर्थात् इंग्लंडकडे जगाच्या कानाकोपऱ्यांतून, यंत्रसामुग्री, आगगाड्या, रूळ, एंजिनें, आगबोटी, कापड वगैरे करितां एकसारखी मागणी येऊं लागली व त्या धंद्यांत तें राष्ट्र एकटें व पहिलेंच असल्यानें इंग्लंडचा अभूतपूर्व फायदा झाला. अर्थात् त्या संपत्तीच्या जोरावर नवेनवे कारखाने इंग्लंडमध्यें निर्माण होऊं लागले व थोड्याच दिवसांत सर्व इंग्लंडभर कारखाने व गिरण्या झाल्यानें त्यांच्यामुळें तो देश गजबजून गेला. लँकेशायरमध्यें कापसाच्या गिरण्या होत्या, यॉर्कशायरमध्यें लोखंडाच्या व दगडी कोळशाच्या खाणी होत्या. 'ब्लॅक कंट्री' नामक इंग्लंडचा मध्य विभाग लोखंडाच्या यंत्रसामुग्रीच्या निर्मितीकरितां प्रसिद्ध झाला व त्यांत शेफील्ड व बर्मिंगहॅम हीं शहरें अग्रगण्य झालीं. त्याचप्रमाणें रिबन्स तयार करण्याचे, हातमोजे-पायमोजे-गंजिफ्राक वगैरे माल तयार करण्याचे कारखाने, लेस तयार करण्याचे कारखाने, फर्निचरचे कारखाने व चिनीमातीचीं भांडीं तयार करण्याचे कारखाने इंग्लंडांत अनेक ठिकाणीं निर्माण झाले होते. याच सुमारास साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतून अनेकविध कच्चा माल इंग्लंडमध्यें येई व त्याचा पक्का माल तयार होऊन तो जगाच्या निरनिराळ्या भागांत पाठविला जाई. त्यामुळें इंग्लंड म्हणजे कच्च्या मालाची बाजारपेठ, इंग्लंड म्हणजे पक्क्या मालाच्या निर्मितीचा जगाचा कारखाना व इंग्लंड म्हणजे जगाला यंत्रसामुग्री व इतर पक्का माल पुरविणारें राष्ट्र अशी इंग्लंडची कीर्ति झाली.

८. मजुरांची हलाखी :—कारखान्यांतून मजुरांना मात्र पिळून काढण्यांत येई. सर्व कारखान्यांतून व खाणींतून पुरुष, स्त्रिया व मुलें काम करीत. कारखान्यांच्या इमारती घाणेरड्या, अस्वच्छ व कामकऱ्यांच्या सुखसोयी, आरोग्य, संरक्षण वगैरेंकडे दुर्लक्ष करून बांधलेल्या असत. ऊन व हवा यांना त्या इमारतींत येण्यास पूर्ण मज्जाव होता. अशा स्थितींत कामकऱ्यांची स्थिति कशी होत असेल याची कल्पनाच करणें चांगलें! त्यांना तेरा-तेरा चौदा-चौदा तास दररोज काम करावें लागे व कधीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कधीं सकाळीं पांचपासून रात्रीं नऊपर्यंतही त्यांच्याकडून चोपून काम करून घेण्यांत येई. आणि इतकें काम करूनही त्यांना मजुरी किती मिळे? आठवड्यास फक्त एक पौंड पुरुषास, आठ-नऊ शिलिंग स्त्रीला व दोन-तीन शिलिंग मुलास. पुरुषाला मजुरी फार द्यावी लागे म्हणून त्यांना कामच मिळत नसे. अर्थात् कारखान्यांतून स्त्रिया व विशेषतः मुलें यांचाच भरणा जास्त असे. या मुलांना तर गुलामांप्रमाणें वागविण्यांत येई. त्यांच्या कोंवळ्या वयाकडेही पाहण्यांत येत नसे. तीन वर्षांच्या मुलालाही मजूर म्हणून ठेवीत व त्याच्याकडून बारा बारा तास काम करून घेण्यांत येई!



कारखान्यांत मुलांस असें वागविण्यांत येई

घांसभर अन्न खाण्यासही त्यांना अवसर देण्यांत येत नसे. सर्व दिवसभर मरेमरेतों काम करावें व संध्याकाळीं जेवावयास बसतां बसतांच डुलक्या याव्यात व हातांतल्या घांसासह अर्धपोटीं झोपीं जावें असे प्रकार नेहमीं घडत! त्यांना जें अन्न देण्यांत येई त्यांत कापसाचे धागे अगर लोखंडाचे कण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असावयाचे, त्यांच्या चहांत घाण असायची व त्यांची भाकरी...भाकरी कसली ती? निजायला एक घोंगडी व पांघरायलाही एकच घोंगडी! उकाड्यांत व कडक थंडींतही तेंच त्यांचें अंथरूण-पांघरूण! सर्व दिवसाच्या कामानें व श्रमानें सर्व मुलें इतकीं थकून जात कीं सहा केव्हां वाजतात व ताणून केव्हां देतों असें प्रत्येकास होई. झोपेंतही त्यांचे हात, काम केल्याप्रमाणें चालत व माराच्या भीतीनें तीं ओरडत उठत. कधीं त्यांना पूर्ण विश्रांतिही मिळाली नाहीं. काम करीत असतांच त्यांस डुलक्या येत व त्यांतच तीं कोलमडून यंत्रावर पडत व मग त्यांच्या अंगाच्या चिंधड्या उडत! कारखानदार त्यांच्या प्रेतांचा रात्रीच्या रात्रीं चटकन् निकाल लावी! काम नीट केलें नाहीं तर चाबकानें त्यांस मार खावा लागे. तो खात असतांच कांहींचे प्राणोत्क्रमणही होई! माराच्या भीतीनें कोणी काम चुकवीत



खाणींत मजुरांस असें वागवीत.

नसे; पण कोणीं चुकविलेंच तर त्यास सांखळ्यांनीं जखडून टाकून त्याच स्थितींत त्याच्याकडून जबरदस्तीनें काम करून घेण्यांत येई व काम संपल्यावरही त्यास त्याच स्थितींत अनेक दिवस रहावें लागे. त्यामुळें मुलांच्या कोवळ्या कातड्यांतून भळाभळा रक्तही वाही. पण त्याची पर्वा करणार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोण ? कामकऱ्यांना पोट जाळायचें होतें ना आपलें ! ! खाणींत जीं मुलें काम करीत त्यांचे हाल विचारावयासच नको. ज्या ठिकाणीं ऊन नाहीं न् स्वच्छ हवाही नाहीं व जेथें विषारी वायू सैरावैरा वागडत, त्या ठिकाणीं पांचपांच सहासहा वर्षांच्या मुलांना बारा-बारा तास काम करावें लागे. दगडी कोळशांचे गाडे लहान मुलांच्याकडून ओढून घेण्यांत येत. बैलाप्रमाणें मुलांस त्या गाड्यांस जुंपलें जाई, सांखळ्यांनीं त्यांस गाड्यास जखडलें जाई व मग मुलांस रांगत कारखान्यांत तो गाडा ओढावा लागे ! क्वचित् प्रसंगीं मुलांकडून असलें काम सोळा सोळा तासही करून घेण्यांत येत असे. त्यामुळें अनेक मुलें मृत्युमुखीं पडत.

९. कारखान्यांसंबंधीं कायदे :—कारखान्यांत काय चाललें आहे हें कोणासच समजत नसे. परंतु हळूहळू सर्व प्रकार उजेडांत येऊं लागला. सॅडलर, रिचर्ड ऑस्लर, रॉबर्ट ओवेन, लॉर्ड शॅफ्टसबरी वगैरे लोकांनीं प्रत्यक्ष परिस्थिति पाहून 'गुलामगिरींत' खितपत पडलेल्या मुलांची व मुलींची बाजू घेऊन वर्तमानपत्रांतून सर्व गोष्टी उघड उघड मांडल्या व सर्व वस्तुस्थिति चव्हाट्यावर मांडली. तेव्हां कोठें लोकांचे डोळे उघडूं लागले. तरीही कांहीं लोक म्हणत कीं "उद्योगधंद्यांची भरभराट व्हावयाची असेल तर आहे हीच स्थिति चांगली आहे व त्यांत सरकारनें ढवळाढवळ करूं नये." परंतु त्यांचें हें म्हणणें सरकारला पुढें पटलें नाहीं व कारखान्यासंबंधीं कायदे करण्यास सन १८३३ पासून सुरुवात झाली. पुढें पीलनें सन १८४४ सालीं दुसरा कायदा पास केला. डिझ्रेलीनें सन १८७८ सालीं मजुरांच्या सुखसोयींकडे चांगलेंच लक्ष पुरविलें व कारखान्यांच्या कायद्यांचें एकीकरण केलें. हे निरनिराळे कायदे पास झाल्यानें लहान मुलें व मुली गुलामगिरींतून सुटलीं, तरी कामकऱ्यांचे व मजुरांचे हाल कमी झाले नव्हते व त्यामुळेंच त्यांनीं आपली स्थिति सुधारण्याकरितां 'मजूरसंघ' स्थापण्यास सुरुवात केली होती.

१०. मजूरसंघांची स्थिति :—मजूरसंघ स्थापन झाले ते मजुरांची स्थिति सुधारण्याकरितां व आजारांत अगर मृत्यूनंतर मजुरांच्या मुलांबाळांस मदत करण्याकरितां. संप पुकारला असतां मजुरांचें नुकसान होई; त्यावेळींही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मजूरसंघ आपल्या कामकरीबंधूंस मदत करीत. त्यांची वर्गणीही ठराविक असे व ती देणारासच वरील प्रकारचा फायदा मिळे. परंतु मजुरांनीं संघ स्थापन केले ही गोष्ट कारखानदारांस मुळींच आवडली नाहीं व ते त्यांचा छळ करूं लागले. त्यावेळीं पार्लमेंटमध्यें कारखानदारांचेंच मताधिक्य असल्यामुळें मजूरसंघास सरकारकडून मान्यताही मिळाली नाहीं. सन १८७१ सालीं मजूरसंघावरील सर्व निर्बंध निघून गेले व त्यांस पूर्णपणें मान्यता देण्यांत आली. अर्थात् मजूरसंघ चांगलेच बळावूं लागले. त्यामुळें मजुरांची स्थिति सुधारणें सरकारचें कर्तव्य आहे; एवढेंच नव्हे तर आजारपणांत मदत करणें व म्हातारपणीं त्यांस पेन्शन मिळवून देणें हींही सरकारचीं कर्तव्यें आहेत असें मजूरसंघांचे पुढारी म्हणूं लागले. सरकारनें प्रथमतः हें म्हणणें एकोणिसाव्या शतकांत मान्य केलें नाहीं. त्यामुळें अनेक मजूर असंतुष्ट होऊं लागले व त्यांनीं एका नव्या वादास सुरुवात केली.

११. समाजसत्तावादाची उत्पत्ति :—मजुरांची हलाखीची स्थिति होण्यास कारखानदार म्हणजेच भांडवलवाले कारणीभूत आहेत, अर्थात् त्यांची सत्ता नष्ट करणेंच योग्य होय, असें मजुरांचें म्हणणें होतें. मनुष्य निर्माण झाला त्यावेळीं सर्व माणसें समान दर्जाचीं होतीं, उच्चनीच हा भेदाभेद त्यावेळीं नव्हता; सर्व जमीनही सर्वांची व समाइक मालकीची होती. पुढें श्रमजीवी लोकांच्या श्रमावर मजा मारणाऱ्या मातबर लोकांनीं 'बळी तो कान पिळी' या तत्त्वावर कामकऱ्यांचे सर्व हक्क लुबाडून घेतले व त्यांनीं त्यांस नाडून देशोधडीस लावलें; अर्थात् श्रमजीवी लोकांचाच संपत्तीवर व जमिनीवर खरा मालकी हक्क असतां त्यांना उपाशीं रहावें लागलें. तेव्हां त्या लोकांचें म्हणणें कीं, (१) खासगी इस्टेट बाळगण्याची पद्धति रद्द करावी, (२) ज्यांनीं श्रम केले नाहींत त्यांना व्याज, फायदा वगैरे घेण्याचा कोणत्याही प्रकारचा अधिकारच नाहीं; निसर्गनियमांच्या तें विरुद्ध आहे (३) संपत्तीची वांटणी निसर्गनियमांप्रमाणें करावयास पाहिजे. परंतु त्यांच्या म्हणण्यास त्यावेळीं इंग्लंडांत दुजोरा मिळाला नाहीं व अजूनही समाजसत्तावादानें इंग्लंडमध्यें जोरदार मूळ धरलेलें नाहीं. सन १८८४-८५ च्या पार्लमेंटच्या सुधारणाकायद्यानें मजुरांस मताधिकार मिळाल्यानें मजूर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पक्षाचा उदय झाला व त्याच्या मतांचें पार्लमेंटच्या कामकाजावर दडपण पडलें ही हकीकत मागें आलीच आहे.

१२. लोकसंख्येची वाढ:—एकोणिसाव्या शतकांत इंग्लंडची लोकसंख्या जवळ जवळ पूर्वीच्या दुप्पट झाली होती. अठराव्या शतकांत ती दीड कोट होती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस ती चार कोटींच्या जवळ गेली. आतां प्रश्न असा कीं ही वाढ एकदम झाली कशी? त्याला उत्तर असें कीं त्यावेळीं मजुरांस मजुरी अत्यंत कमी असे व त्यामुळें मुलें असणें म्हणजे मोठ्या फायद्याचें कलम समजण्यांत येई. कारण मुलगा दोन-तीन वर्षांचा झाला कीं त्याला कांहीं ना कांहीं मिळूं लागे. अर्थात् मुलांचीं लग्नेंही लहानपणींच होत. मनुष्याची राहणीही अत्यंत कमी दर्जाची झाली होती. या व इतर कारणांमुळें लोकसंख्येंत एकसारखी भरच पडत गेली. अर्थात् लोकसंख्या वाढल्यानें-म्हणजेच मागणीपेक्षां जास्त झाल्यानें—कारखानदारांचें फावलें व त्यांनीं मजुरीचे दर कमी करून व मुलांमुलींस कामावर घेऊन आपलें उखळ पांढरें करून घेतलें. लोकसंख्येच्या वाढीबरोबर शहरांची बेसुमार वाढ होऊं लागली. तेथें कारखाने असल्यानें मोलमजुरी मिळविण्याकरितां खेडीं सोडून, जो उठे तो मुलांबाळांसह शहरांकडे धांवे. यामुळें शहरांत राहणाऱ्यांची संख्या अनेक पटीनें वाढली. एकोणिसाव्या शतकांत जवळ जवळ ऐशीं टक्के लोक शहरांत रहात असत.

१३. खुला व्यापार कीं संरक्षित व्यापार:—एकोणिसाव्या शतकांतील आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खुला व्यापार कीं संरक्षित व्यापार याबद्दल चाललेली चळवळ ही होय. ही चळवळ प्रथमतः मोठ्या प्रमाणावर धाकट्या पिटनें हातीं घेतली; परंतु तिला खरें तोंड एकोणिसाव्या शतकांतच लागलें. अगदीं सुरुवातीस संरक्षित व्यापार पद्धतीच इंग्लंडच्या फायद्याची होय असें ब्रिटिश मुत्सद्यांस वाटे व त्यामुळें त्यांनीं परराष्ट्रीय व्यापारावर जाचक कर ठेवले व धान्याचा कायदा पास केला. मध्यंतरीं सन १८४६ मध्यें पीलनें धान्याचा कायदा रद्द करून इंग्लंडनें खुल्या व्यापाराच्या तत्त्वाचा पूर्ण अंगिकार केला असल्याचें जाहीर केलें. परंतु त्या शतकाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अखेरीस साम्राज्यवादी लोकांस तें तत्त्व पटेनासें झाल्यानें इंग्लंडनें पुन्हां संरक्षित व्यापाराकडे वळावें असा त्यांनीं प्रचार चालविला. खुला व्यापार व संरक्षित व्यापार यासंबंधीं साद्यंत हकीगत मागील एका धड्यांत सांगितली आहेच.

१४. बँकांच्या व्यवहाराची वाढ :—तिसऱ्या विल्यमच्या अमदानींत इंग्लंडच्या बँकेची सन १६९४ मध्यें स्थापना झाली. त्यानंतर सरकारी आश्रयामुळें तिची एकसारखी प्रगतीच होत गेली. बँकेच्या आधारावरच व्यापाराची वाढ होत असते हें इंग्रजांस पटूं लागलें होतें व त्यामुळें बँकेवर इंग्रजांचा विश्वास बसूं लागला. पण अठराव्या शतकाच्या शेवटीं फ्रान्सशीं युद्ध सुरू झाल्यानें रोखीचा व्यवहार सरकारनें बंद केल्यामुळें लोकांची फारच गैरसोय होऊं लागली. तेव्हां सर रॉबर्ट पीलनें सन १८१९ मध्यें रोखीनें व्यवहार करण्याची पद्धति पुन्हां सुरू करून चलनी नोटांचा सुकाळ बंद केला. परंतु त्यावेळीं सरकारमान्य अशी एकच बँक इंग्लंडमध्यें असली तरी खाजगीरीतीनें बँकेचा व्यवहार करणारे लोक व अनेक कंपन्या इंग्लंडांत उत्पन्न झाल्या होत्या; व त्याही नोटा छापीत. परंतु अशा बँकां-तून पैसे ठेवणें जरा धाडसाचें व धोक्याचें काम होतें; कारण बँक चालवि-णारा मनुष्य मेला किंवा बँकेचा व्यवहार करणारी कंपनी नष्ट झाली कीं लोकांचें अतोनात नुकसान होई. यामुळें सन १८४४ मध्यें पीलनें बँकांच्या व्यवहारावर नियंत्रण घालणारा कायदा पास केला व त्यांवर कांहीं बंधनें घातलीं. (पहा, पान ३७). त्यामुळें नोटा छापण्याचा अधिकार इंग्लंडच्या बँकेलाच मिळाला. अर्थात चलनी नोटांचा प्रसार कमी प्रमाणावर होऊं लागला. पुढें सन १८७९ मध्यें पार्लमेंटनें आणखी एक कायदा पास करून बँकेचा व्यवहार करणाऱ्या कंपन्यांवर आणखीं बंधनें लादलीं. त्यामुळें त्या कंपनीच्या भागीदारांच्या व ठेवीदारांच्या हिताचें रक्षण साधलें गेलें. बँकेच्या व्यवहारांत आणखी एक मोठा बदल म्हणजे सुमारें सन १८४० पासून चेकनें अथवा हुंडीनें व्यवहार होण्यास सुरुवात झाली; व सन १८५३ पासून चेकचा व्यवहार सर्रास सुरू झाला.

१५. वाङ्मयविकास :—शास्त्रीय शोध, औद्योगिक क्रांति व व्यापाराची प्रगति यांच्याप्रमाणेंच व्हिक्टोरियाची कारकीर्द उच्च दर्जाच्या वाङ्मयाकरि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तांही प्रसिद्ध आहे. एकोणिसाव्या शतकांत अनेक मोठमोठे लेखक निर्माण झाले. एलिझाबेथकालीन वाङ्मयाच्या खालोखाल व्हिक्टोरियाच्या काळचें वाङ्मय आहे असें मानण्यांत येतें. आश्चर्य असें कीं इंग्रजी वाङ्मय वाढलें व सामर्थ्यवान झालें, तें दोन राण्यांच्याच कारकीर्दीत; काव्याच्या बाबतींत वर्ड्सवर्थ, सॅम्युअल कोलरिज, सर वॉल्टर स्कॉट, लॉर्ड बायरन, लॉर्ड टेनिसन, रॉबर्ट ब्राऊनिंग व सौ. ब्राऊनिंग हे मोठे नामांकित कवि होऊन गेले. वर्ड्सवर्थ (१७७७–१८५०) हा निसर्गाचा चाहता होता व निसर्गापासूनही मनुष्याला उत्तमोत्तम संदेश व धडे मिळूं शकतात असें त्याचें मत होतें. आपल्या काव्यांतही निरनिराळीं तत्त्वें व निसर्गाकडून मिळणारे धडे त्यानें ग्रथित करून ठेवले आहेत. त्याचें सर्व काव्य उत्कृष्ट कल्पना व उदात्त भावना यामुळें मोठें मनोवेधक झालें आहे. सॅम्युअल कोलरिज (१७७२–१८३४) हा खंडकाव्याकरितां प्रसिद्ध आहे. लॉर्ड टेनिसन (१८०९–१८९२) हा राजकवि होता. त्याची भाषा मोठी मोहक असून तिच्या ठिकाणीं पदलालित्य अमूप असे. त्याचे शब्द मोजून-मापून व तासून-घासून उपयोजिले जात. त्यामुळें त्याचें काव्य लोकांस फार आवडे. विचारसंपत्तीचा भरणा त्याच्याजवळ फारसा नव्हता; परंतु भाषेचा भरदारपणा, गोडवा व नटवेपणा यामुळें त्याचें काव्य मोठें मोहक वाटे. रॉबर्ट ब्राऊनिंग (१८१२–१८८९) हा मोठ्या भावनावशतेनें आपलें काव्य लिही. भाषेपेक्षां विचारगांभीर्याकडे व भावनाविष्काराकडे त्याचें लक्ष फार असे. त्याचे विचार खोल व त्याच्या कल्पना मोठ्या गंभीर असत; त्या काव्यमय शब्दांत ग्रथित केलेल्या असल्यामुळें लोकांस समजण्यास जरा कठीण जात. सौ. ब्राऊनिंग (१८०६–१८६१) ही कवयित्रीही आपल्या नवऱ्याप्रमाणेंच प्रसिद्ध होती. तिचे विचारही गंभीर असत. तिचे काव्यविषय तत्कालिन परिस्थितीचें हुबेहूब शब्दचित्र वठवीत. गद्याचा भार सर वॉल्टर स्कॉट, जेन ऑस्टेन, चार्ल्स डिकन्स, विल्यम मेकपीस थॅकरे, लॉर्ड लिटन, डिझरेली, जॉर्ज ईलियट, चार्ल्स रीड, चार्ल्स किंग्जले, वगैरेंनीं उचललेला होता. हे सर्व मोठे प्रसिद्ध कादंबरीकार होऊन गेले. स्कॉटच्या 'वेव्हर्ले' नामक कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. जेन ऑस्टेन (१७७५–१८१७)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिची सुप्रसिद्ध कादंबरी ‘ प्राइड अँड प्रेज्युडिस ’ ही अजूनही लोकांचें मन रमविते. ‘ टेल ऑफ टू सिटीज़ ’ लिहिणारा डिकन्स (१८१२–७०), ‘ व्हॅनिटी फेअर ’ ‘ हेन्री एस्मॉंड ’ वगैरे कादंबऱ्या लिहिणारा थॅकरे (१८११–६३), ‘ अॅडॅम बीड ’ लिहिणारी कादंबरीकर्ती जॉर्ज ईलियट (१८१९–१८९०) वगैरेंच्या कादंबऱ्या त्या काळीं फार लोकप्रिय झाल्या. लॉर्ड मेकॉले (१८००–१८५९) व हेन्री हॅलम (१७७७–१८५९) हे मोठे इतिहासकार होऊन गेले. कवि म्हणूनही मेकॉले प्रसिद्ध होता. टॉमस कार्लाइल (१७९५–१८८१) हाही मोठा इतिहासलेखक व तत्त्ववेत्ता होऊन गेला. जॉन रस्किन (१८१९–१९००) हा सुप्रसिद्ध टीकाकार व सुधारक होऊन गेला. कलेविषयीं त्याला फार प्रेम असे व कला शुद्ध पायावर उभारलेली असावी असें त्याचें म्हणणें होतें. मॅथ्यू आर्नोल्ड (१८२२–८८) कवि असला तरी उत्तम टीकाकार म्हणून तो जास्त प्रसिद्धी पावला. जॉन स्टुअर्ट मिल (१८०६–१८७३) हा एक मोठा तत्त्वज्ञ होऊन गेला. अर्थशास्त्रावरही त्यानें ग्रंथ लिहिले होते. व्यक्तिस्वातंत्र्याचा भोक्ता व वास्तववादी तत्त्वज्ञानाचा तो पुरस्कर्ता होता. जॉन हेन्री न्यूमन (१८०१–१८९०) हाही उत्तम ग्रंथकार होता. ट्रॅक्टेरियन चळवळीचा तो एक प्रवर्तक होता. टॉमस रॉबर्ट माल्थस (१७६६–१८३४) हा मोठा अर्थशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्धी पावला. लोकसंख्येच्या वाढीबद्दल त्याचे अनेक सिद्धांत त्यावेळीं सर्वमान्य झाले होते. मनावरील ताब्यामुळें लोकसंख्या घटते व तो नसल्यास ती वाढते असें तो म्हणे. अन्नसंचय कमी असल्यास जननसंख्या वाढते व तो मोठा असल्यास ती घटते असाही त्याचा दुसरा एक सिद्धांत होता. जेरेमी

जॉन स्टुअर्ट मिल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बेंथॅम (१७४८–१८३२) हाही मोठा लेखक होता. डेव्हिड रिकार्डो (१७७२–१८२३) हा मोठा अर्थशास्त्रज्ञ होऊन गेला. हर्बर्ट स्पेन्सर (१८२०–१९०३) हा मोठा तत्त्वज्ञ व गाढा विद्वान समजला जाई. तो मोठा शिक्षणशास्त्रज्ञ म्हणून समजला जातो.

अभ्यास

१. एकोणिसाव्या शतकांत कारखान्यांची वाढ कां झाली ? त्यामुळें इंग्लंडचा कोणता फायदा झाला ? कोणते कारखाने कशाकरितां प्रसिद्ध होते ?

२. त्या काळीं मजुरांची स्थिति कशी होती ? त्यांना मजुरी कमी कां मिळत होती ? मुलांमुलींस कोणत्या प्रकारचे हाल सोसावे लागत ? कां ?

३. मजुरांची स्थिति सुधारण्याकरितां कोणीं कोणीं व कसकसे प्रयत्न केले ? त्याचा परिणाम काय झाला ?

४. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

समाजसत्तावाद, उदात्ततत्त्ववाद्यांची चळवळ, ऑक्सफर्ड चळवळ, मजूरसंघ, वाङ्मयविकास.

५. एकोणिसाव्या शतकांत लोकशाहीचा विजय झाला असें कां मानतात ?

६. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.

लॉर्ड शॅफ्टस्‌बरी, जॉन हेन्री न्यूमन, डॉ. मॅनिंग, माल्थस्, टेनिसन, ब्राऊनिंग, हर्बर्ट स्पेन्सर, लॉर्ड मेकॉले, साऊथवुड स्मिथ, कार्लाइल, रस्किन.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२. एकोणिसाव्या शतकांतील लोकांचें जीवन

१. शहरांचे प्रकार :—औद्योगिक क्रांतीच्या वेळेपासून शहरांच्या रचनेंत फार फरक पडूं लागला. शहरांची मांडणी काय किंवा त्यांतील इमारतींची रचना काय! ती लोकांच्या गरजा व व्यवहार यांवरच अवलंबून असणार. या गोष्टीचा विचार करतां औद्योगिक क्रांतीमुळें व नंतर झालेल्या शोधांमुळें शहरांच्या मांडणींत व तेथील इमारतींच्या बांधणींतही पुष्कळ फरक पडलेला होता. एकोणिसाव्या शतकांत इंग्लंडांतील शहरांमध्यें तीन प्रकार प्रामुख्यानें दिसून येतात. औद्योगिक क्रांतीमुळें ज्यांच्यांत मुळींच फरक पडलेला नव्हता व जीं शहरें जुन्या परंपरेला लोंबकळून राहिलीं होतीं त्यांचा पहिला प्रकार. मूळ खेडीं असलेलीं परंतु कारखाने व उद्योगधंदे वाढल्यामुळें ज्यांना शहरांचें स्वरूप प्राप्त झालें होतें, अशीं शहरें व जीं पूर्वीं शहरें होतीं परंतु औद्योगिक क्रांतीमुळें ज्यांना जास्त महत्त्व प्राप्त झालें होतें अशीं शहरें. या सर्व शहरांतून राहणाऱ्या लोकांना, शिक्षणाच्या अभावीं, सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय ज्ञान यासंबंधींचें महत्त्व अजूनही पटलेलें नव्हतें व त्यामुळें त्यांचें जीवन पूर्वींप्रमाणेंच अत्यंत गलिच्छ व घाणेरडें होतें. शहरांच्या बाहेर घरें बांधून राहणाऱ्या लोकांची संख्या वाढली होती. नव्या नव्या सुधारणा व सुखसोयी दररोज घडून येत होत्या, तरी त्यासंबंधींही लोक पूर्णतया अज्ञानीच असत.

२. शहरांतील अनास्था :—सर्व शहरांतून पूर्वींप्रमाणें म्युनिसिपालिट्या होत्या ही गोष्ट खरी असली तरी त्या पूर्णपणें लोकशाही तत्त्वांस धरून नव्हत्या. कांहीं विशिष्ट घराण्यांतील लोकांच्याच हातांत त्या होत्या. शिवाय लोकांकडून कर वसूल करावयाचे ते फक्त पोलिसदळ व तुरुंग यांच्या व्यवस्थेकरितांच, अशी त्यावेळीं त्यांची कल्पना होती. तेव्हां राजाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



विसाव्या शतकापर्यंत शहरांची वाढ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कायद्यांची अंमलबजावणी योग्यरीतीनें केली व आपल्या शहरांतील शांतता कायम टिकविली म्हणजे आपलें कर्तव्य संपलें असें म्युनिसिपालिट्यांस वाटे. परंतु सन १८३५ मध्यें म्युनिसिपालिट्यांसंबंधीं कायदा पास झाल्यानें दिवे-लावणी, रस्त्यांची दुरुस्ती, पोलिस-व्यवस्था वगैरे कामें म्युनिसिपालिट्यां-कडे आलीं. तरीही घरेंबांधणी, ड्रेनेज, पाण्याची व्यवस्था करणें, शिक्षण-दान वगैरे कामें त्यांच्याकडे आलेलीं नसल्यानें लोकांच्या सुखसोयींकडे फारसें लक्ष दिलें जात नसे. त्यावेळीं घरांची बांधणी अत्यंत अव्यवस्थित होती. पाठीला पाठ लावून बांधलेल्या घरांतून लोकांना रहावें लागे व त्यामुळें शहरांतून स्वच्छ व खेळती हवा लोकांस मिळत नसे. कनिष्ठ वर्गो-तील लोक ज्या गल्ल्यांतून रहात असत त्या इतक्या घाणेरड्या, अस्वच्छ व कुचकामी असत कीं त्यांत राहणारे लोक तेथें कसे राहत याबद्दल त्यावे-ळच्या लोकांसही आश्चर्य वाटे! अनेक शहरांतून घाण साचे, गटारें तुडुंब भरून येत, दुर्गंधीनें सर्व भाग दरवळून जाई व त्यामुळें तेथें निरनिराळ्या सांथी ठाण मांडून बसत! यामुळें गरिबांचे अनंत हाल होत. श्रीमंत लोक मोठमोठ्या हवेल्यांतून राहत व त्या ऐसपैस असल्यानें त्यांचें जीवन ऐषा-रामी व सुखाचें होई. तरीही त्यांच्या बंगल्यांतून पाण्याची चांगलीशी सोय नसे, तळघरांतून दुर्गंधी-चेंच राज्य असल्यानें तेथें राहणाऱ्या नोकरां-चाकरांचे हाल होत व त्यांचें आरोग्य नेहमीं बिघडे. शहरांतून पाण्याची सोय नसे. पावसाळ्यांत पाणी सांचवून त्याचा विनि-योग करण्यांत येई. त्या पाण्यांत लाकडाचे तुकडे, गाळ, आळ्या,



घोड्याची गाडी १८५५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किडे वगैरे असल्यामुळें अनेक रोग उत्पन्न होत. लंडनसारख्या शहरांतून पाण्याच्या तोट्या खाजगी कंपन्यांतर्फे सुरू झाल्या होत्या; परंतु त्यांच्याकडून आठवड्यांतून फक्त तीनच दिवस पाणी पुरविण्यांत येई. एकंदरींत ही स्थिति सन १८७५ पर्यंत टिकली. पुढें मात्र लोकांच्या राहणींत पुष्कळच फरक पडत गेला. लोकांस आरोग्याची किंमत कळूं लागली होती, सार्वजनिक आरोग्य सुधारण्याकरितां लोकांत जागृति करण्याचें काम कांहीं उदारधीनीं केलें होतें, लोकांमध्यें शिक्षणाचा थोडाफार प्रसार झाला होता, शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार झपाट्यानें होत होता व पार्लमेंटचेंही लक्ष सार्वजनिक आरोग्याकडे लागूं लागल्यानें त्याकरितां कायदे पास होत होते. म्युनिसिपालिट्यांनाही सन १८७५ च्या नंतर लोकांच्या आरोग्याकरितां खटपट करण्याचे हक्क देण्यांत आले. या सर्व गोष्टींमुळें लोकांचें आरोग्य सुधारण्यास मदत झाली.

३. शहरी जीवनांतील सुधारणा :—एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस लोकांचें आरोग्य त्या काळच्या मानानें चांगलेंच सुधारलें. शहरांतील जीवन सुखाचें होऊं लागलें होतें. नव्या नव्या सुखसोयी तेथें सुरू झाल्या होत्या. आगगाड्या, घोड्याच्या गाड्या, ट्रामगाड्या, सायकली, मोटारी वगैरे वाहनें शहरांच्या रस्त्यांतून जाऊं-येऊं लागल्यानें लोकांची चांगलीच सोय झाली होती. प्रथम प्रथम ट्रामगाड्या व बसगाड्या घोड्याच्या असत; परंतु पुढें त्या विजेच्या झाल्या व लोकांची सोय झाली. त्यामुळें लोकांस केव्हांही व कोठेंही जातां येत असे. विशेषतः गरीब मजुरांची चांगली सोय झाली होती. शहरांतून पोलिस असत व ते लोकांच्या मालमत्तेचें व जीविताचें संरक्षण करण्यास झटत असत. आरोग्यदृष्ट्या शहरांची

लंडनमधील पहिली 'मोटार बस'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मांडणी करण्यासही एकोणिसाव्या शतकांत सुरुवात झाली होती. शहरांतील रस्ते नागमोडी व वेडेवांकडे असत, घरें वाटेल तेथें बांधलीं जात व नाना प्रकारच्या घाणीनें सुसज्ज झालेल्या गल्ल्या ठिकठिकाणीं असत! ही स्थिति सुधारली जाऊं लागली व रस्त्यांची मांडणी व घरांची बांधणी आरोग्याचे नियम लक्षांत घेऊन होऊं लागली. त्यावेळीं आठवड्यांतून रविवारचीच सुटी सर्वांस मिळे; परंतु शनिवारींही अर्ध्या दिवसाची सुटी देण्याची वहिवाट पडूं लागली होती. व्हिक्टोरिया राणीच्या काळांत एकंदर राहणी अत्यंत साधी व व्यवस्थित होती. मजा मारणें गरिबांना शक्य नव्हतें, मध्यमवर्गीतील लोक ख्यालीखुशालींत रमत, श्रीमंत मात्र चैन करीत. श्रीमंतांच्या घरांतून हाताच्या खुर्च्या, गालिचे, कढत पाणी वगैरे ऐषारामी साधनें मुबलक असत. साबणाचा उपयोगही फार होऊं लागला होता. चकमकीची जागा काड्याच्या पेटीनें घेतली होती. काड्याच्या पेटीचा शोध ऑस्ट्रिया व जर्मनी या देशांमध्यें प्रथम सन १८५५ च्या सुमारास लागला. तेथूनच ती इंग्लंडांत आली. गप्पा मारीत मारीत चहापान होऊं लागलें. चहा चिनी मातीच्या पेलेबशांतून घेण्यास सुरुवात झाली होती. तपकिरीचें व्यसन कमी होऊन तंबाखू ओढण्याची संवय लोकांस चांगलीच जडली होती. स्त्रियांची स्थिति त्या काळीं निकृष्टच होती. 'चूल व मूल' हेंच त्यांचें ध्येय असे! गृहकृत्यांत तरबेज असणाऱ्या स्त्रीचें मोठें कौतुक होई. यामुळें स्त्रियांची दृष्टि अत्यंत आकुंचित असे. घरचा पुरुष त्यांस कृतांतासारखा वाटे. त्याच्या इच्छेविरुद्ध त्यांस कांहीं करतां येत नसे. वाचणें, शिवणें, कशिदा काढणें, गाणें, पियानो वाजविणें वगैरे गोष्टी आल्या म्हणजे स्त्री सुगृहिणी समजली जाई. क्रिकेट, गोल्फ, टेनिस वगैरे खेळ तिनें खेळणें मोठें गर्हणीय समजण्यांत येई. तिनें फार तर घोड्यावर बसावें अगर फिरावयास जावें. एकंदरींत शहरीजीवन सुखाचें व आरामशीर होतें.

४. खेड्यांतील जीवन :—खेड्यांत राहणारे लोक फारच थोडे होते. परंतु जे होते त्यांची दशा वर्णन करण्यासारखी नव्हती. सर्व खेडीं उजाड झालीं होतीं, त्यांतील घरांची दुर्दशा झाली होती, उद्योगधंदे व शेती बसली होती व त्यामुळें सौख्य हा जिन्नस तेथें नव्हताच! खेड्यांतील लोक भिकार घरांतून रहात. त्यांच्या झोपड्या एका खोलीच्या अगर दोन खोल्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असत. त्यांतूनच गरिबांचीं कुटुंबें आपला संसार थाटीत. झोपड्यांच्या छपरांतून पावसाचें पाणी गळे व त्यामुळें जमीन नेहमीं ओली असे. अर्थात् त्यामुळें रोगराई नेहमीं फैलावे. पुरुष, स्त्रिया व मुलें सर्वजण कामांत चूर असत व कसेंबसें पोटापुरतें अन्न व देहापुरतें ओबडधोबड वस्त्र मिळवीत. पालेभाज्या, बटाटे, कांदे, शिळी भाकर व चहाचें तांबडें पाणी हे त्यांच्या जेवणांतील मुख्य जिन्नस. पोटभर अन्न न मिळाल्यानें गरीब खेडवळांस भीक मागावी लागे, अगर शेतांची कापणी झाल्यावर तेथें सांडलेलें धान्य वेंचून आणून त्यावर आपली गुजराण करावी लागे! कधीं काळीं ससांची शिकार साधली–व तीही चोरून मारून–तर अशा लोकांस मेजवानी मिळे! लोणी, चीज, मांस, अंडीं वगैरे पदार्थ त्यांस बहुधा मिळत नसत; कारण ते फार महाग असत. अशा लोकांस शिक्षण कसलें मिळणार? त्यांचा मुख्य धंदा शेतीचा होता पण तोही बसलेला. धान्याचा कायदा पास झाल्यानें लोकांची दुर्दशा झाली होती. मजुरीचे दरही कमालीचे उतरलेले होते. खेड्यांत राहणारे श्रीमंत देशमुख मात्र ऐटींत रहात. सन १८५० नंतर शेतकऱ्यांची स्थिति हळूहळू सुधारूं लागली. धान्याच्या किंमती स्वस्त होऊं लागल्या, मजुरीचे दरही वाढूं लागले, शेतींत निरनिराळ्या सुधारणा होऊं लागल्यानें शेती चांगली चालूं लागली; कुंपणें घालण्याची पद्धति मागें पडूं लागल्यानेंही शेती चांगली होऊं लागली, नवीन नवीन यंत्रसामुग्री व खतें वापरण्यांत येऊं लागलीं व या सर्व गोष्टींमुळें शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यास चांगलीच मदत झाली. पार्लमेंट सुधारण्याकरितां या शतकांत जे कायदे झाले त्यामुळें शेतकऱ्यांना व शेतमजुरांसही मतदानाचा हक्क मिळाला होता. तेव्हां त्यांचीं मतें मागण्याकरितां उमेदवार खेड्यांतून जात, त्यावेळीं त्यांना खेड्यांतील लोकांची व शेतीची स्थिति प्रत्यक्ष समजूं लागली. त्यामुळें त्यांनीं खेड्यांच्या बाबतींत लक्ष घालण्यास सुरुवात केली व सुधारणा घडवून आणण्याकरितां खटपट आरंभिली. त्यामुळें एकोणिसाव्या शतकाच्या अखेरी–अखेरीस खेड्यांतील जीवनांतील रूक्षपणा थोडा जाऊं लागला व शेतकरी सुखी होऊं लागला.

५. घरें–इमारती :—एकोणिसाव्या शतकांतील घरें अत्यंत साधीं असत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्यांत भपका नव्हता, सौंदर्य नव्हतें व ऐटही नव्हती. शहराच्या बाहेरच्या इमारती ऐसपैस व अघळपघळ बांधल्या जात; मात्र त्यांत सौंदर्यदृष्टि क्वचितच दिसून येई. त्यामुळें तीं घरें ओबडधोबड व गबाळीं दिसत; त्यांच्याबद्दल आकर्षण वाटत नसे. कामकरी रहात तीं घरें—घरें कसलीं तीं?—अत्यंत घाणेरडीं व अस्वच्छ असत. एकेका खोलीमध्यें सर्वच्या सर्व कुटुंब रहात असे. बसायचें तेथेंच, जेवायचें तेथेंच, निजायचें तेथेंच; सर्व व्यवहार त्याच खोलींत व्हावयाचा. असलीं घरें भिंतीला भिंत लावून बांधण्यांत येत असल्यामुळें उजेड व हवा यांस त्या घरांतून जाण्यायेण्यास मज्जाव असे. श्रीमंतांचीं घरें मोठीं असत. त्यांतून अनेक खोल्या असत. मात्र स्नानगृहाची सोय क्वचितच असे. श्रीमंतांच्या घरांच्या बांधणींत फारसा फरक पडलेला नव्हता. विटा, चुना, दगड वगैरेंच्या साहाय्यानें घरें बांधलीं जात. खिडक्या मुबलक असत. खिडक्यांस तावदानें असत. घरांतून फडताळेंही बांधण्यास सुरुवात झाली होती. घरावर कौलें घालीत असत. पाण्याचे नळ श्रीमंतांनाच घेतां येत, इतरांस नाहीं. घराच्या आजूबाजूस बाग असे. सन १८५१ मध्यें भरलेल्या प्रदर्शनांत आदर्श घर कसें असावें याबद्दल प्रात्यक्षिकें देण्यांत येत होतीं. त्यामुळें घरबांधणीच्या कल्पनेंत पुष्कळ फरक होऊं लागला. घरांतील खुर्च्या, टेबलें, बाकें, सोफे वगैरे फर्निचर अत्यंत साधें असे; परंतु त्याच्या बांधणींत पुष्कळच नवी तऱ्हा दिसून येत होती. कांहीं कांहीं फर्निचरवर पितळेचें जडावाचें कामही करण्यांत येत असे. त्यामुळें तें जरा बरें दिसे. कधीं कधीं मोतिया रंगाचाही जडावाच्या कामीं उपयोग होई. खेड्यांतील लोकांचीं घरें कशीं असत तें मागें सांगितलेंच आहे. त्यामधून दारिद्र्य ओसंडत असे! शहरांतील मोठमोठ्या इमारती 'गोथिक पद्धतीनें' बांधल्या जाऊं लागल्या होत्या. त्या शोभिवंत करण्याकडे बांधणाराची प्रवृत्ति असे. सन १८४० सालीं सध्यांचें पार्लमेंटगृह बांधण्यास सुरुवात झाली व तें पुढें सन १८६० मध्यें पुरें झालें. तें गोथिक पद्धतीचें आहे.

६. अन्न-खाद्यपेयें :—खाद्यपेयांमध्येंही फारसा फरक पडलेला नव्हता. साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतून अनेक प्रकारचे पदार्थ, फळें, भाज्या, मांस, चीज, अंडीं, लोणी वगैरे जिन्नस इंग्लंडांत येत. खुद्द इंग्लंडमध्यें चेरी,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पेअर, सफरचंद, प्लम वगैरे फळें निर्माण होत; इतर फळें व दारू, चहा, कॉफी, कोको, चॅकोलेट, वगैरे पेय-पदार्थ बाहेरून इंग्लंडमध्यें येत. बटाटे व गहूं हे लोकांच्या जेवणांतील मुख्य पदार्थ होते. बटाट्यांचा दुष्काळ पडल्यामुळेंच पीलला सन १८४६ मध्यें धान्याचा कायदा रद्द करावा लागला. मांसाचे व फळांचे बंद डबे तयार करण्यास या शतकांत सुरुवात झाली होती. बर्फाचा उपयोग लोकांस कळूं लागला होता व आइसक्रीमची लज्जत लोकांस कळून चुकली होती. लोकांस बर्फ तयार करतां येत नसे; त्यामुळें हिंवाळ्यांत पाणी गोठलें म्हणजे लोक त्या बर्फाचे तुकडे तोडून ते आपापल्या घरांत सांठवून ठेवीत व ते उन्हाळ्यापर्यंत तसेच टिकावेत म्हणून शक्य ती काळजी घेत. बर्फ ठेवण्याकरितां स्वतंत्र व शास्त्रशुद्ध खोल्यांची बांधणीही होऊं लागली होती. सन १८५० च्या सुमारास पदार्थ थंड खोलींत ठेवला तर तो चांगला व पुष्कळ काळ टिकतो असा शोध लागला होता; परंतु त्याचा व्यवहारांत फारसा उपयोग होत नसे. सन १८८० सालापासून ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड वगैरे प्रांतांतून इंग्लंडमध्यें मांस पाठविण्यास सुरुवात झाली. बर्फाच्या साहाय्यानें तें ताजें व स्वच्छ राहूं शकतें, कुजत नाहीं, असें सिद्ध झाल्यानें वरील धाडसी प्रयोग झाला व तो यशस्वी झाला. त्यामुळें इंग्लंडांत मुबलक मांस मिळूं लागलें. गॅसवर स्वयंपाक करण्याची पद्धति सन १८५० नंतर इंग्लंडांत (श्रीमंतांच्या घरीं) सुरू झाली. अठराव्या शतकांत खानावळी, कॉफीगृहें व उपाहारगृहें यांचा मोठमोठ्या शहरांतून सुळसुळाट झाला होता. घरीं करून जेवण्यापेक्षां वरील गृहांतून जेवण्याची पद्धतीही त्यावेळीं चांगलीच रूढ झाली होती; ती एकोणिसाव्या शतकांतही चालू राहिली. गरीब लोकांचें जेवण साधेंच असे. गव्हाची अथवा रायची भाकरी त्यांस खावी लागे. त्यांस पोटभर अन्न मिळेच असें नाहीं. सणावारीं मांस, लोणी, चीज, दारू वगैरे त्यांस—पैसे असल्यास—मिळे. ते आपलें अन्न घरींच तयार करीत. चहाचें तांबडें पाणी त्यांस कधीं कधीं मिळत असे.

७. पोषाख व कपडे :—व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दींत कपड्यांमध्यें अनेक फरक झाले. स्त्रियांचे कपडे अगदीं हेंगाडे व बेडौल असत. जिची कंबर बारीक ती स्त्री अधिक सुंदर, अशी त्या काळीं कल्पना असल्यानें स्त्रिया

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



स्त्रीपुरुषांचे पोषाख

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपलीं शरीरें, घट्ट व तंग कपडे घालून, मुद्दाम बारीक करून घेत. त्यामुळें त्यांच्या प्रकृतीवरही वाईट परिणाम होई. भडक रंगाचे कपडे त्या आवर्जून घालीत. निळे, जांभळे, हिरवे वगैरे रंगांचे कपडे रंगसंगतीकडे लक्ष न देतां त्या वापरीत. पुढें पुढें स्त्रिया आपले कपडे कडक व्हावेत म्हणून आपल्या पोलक्यास घोड्याचे केस लावून घेत. त्यामुळें त्यांचे कपडे इतके कडक होत कीं एखादे वेळीं त्यांस गाडींतून नाचास जावयाचें असल्यास, आपल्या कपड्याची कडक इस्त्री मोडेल या भीतीनें, त्या सर्व वेळ गाडींतून उभ्यानेंच जात ! नाच चालू असो अगर तो थोडा वेळ थांबलेला असो, त्या उभ्याच्या उभ्याच ! स्त्रियांचे ठेवणीचे कपडे बहुधा रेशमी असत. सणा-सुदीचे दिवशीं त्या आपले ठेवणीचे कपडे घालूनच जात. काश्मिरी शाली त्यावेळीं इंग्लंडमध्यें फारच लोकप्रिय झाल्या होत्या. अनेकरंगी व बहुविध तऱ्हेच्या व आकारांच्या टोप्या स्त्रिया वापरीत. कृत्रिम फुलांचा व कृमीकीटकांचा स्त्रियांस इतका षोक होता कीं, बाहेर जातांना ते अंगावर घातल्याशिवाय त्यांस चैनच पडत नसे. केसांना कुरळें वळण देऊन केसांच्या वेण्या घालण्याची पद्धति त्यावेळीं होती. भडक रंगाची आवड या शतकाच्या शेवटीं शेवटीं नष्ट होऊं लागली होती व स्त्रियांचे झगे पायघोळ असत ते आंखूड होऊं लागले होते. पुरुषांच्या पोषाखांतही पुष्कळच फरक झालेला होता. भडक रंगाच्या कपड्यांची आवड नाहींशी झाली होती. मात्र पुरुषांचा पोषाख साधा होण्यास अजून बराच काळ लोटावयाचा होता. ' वॉटर प्रुफ ' कापड वापरण्यास सुरुवात झाली होती. केस कापून घेण्याची व कल्ले ठेवण्याची त्यावेळीं चाल पडली होती. पांढऱ्या कॉलरी व मोठे बूट वापरण्यास सुरुवात झाली होती. पुढें बस, ट्रॅम, आगगाडी वगैरेंचा जसजसा जास्त जास्त उपयोग होऊं लागला तसतसा स्त्रीपुरुषांच्या पोषाखांतही फरक होऊं लागला.

८. खेळ–करमणूक :—एकोणिसाव्या शतकांत अनेक प्रकारचे खेळ खेळले जात. टकरी, झुंजी वगैरे मागें पडल्या असल्या व त्यांचें महत्त्व कमी झालें असलें तरी त्या खेड्यांतून दृष्टीस पडत. नाटकें, नाचगृहें, सर्कशी यांमुळें लोकांची करमणूक चांगली होई. क्रिकेट हा खेळ चांगलाच लोकप्रिय होऊं लागला होता. क्रिकेटचे मोठमोठे सामनेही होऊं लागले होते. 'मेरि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
लिबोन क्रिकेट क्लबची'—एम्. सी. सी. ची—स्थापना या काळांतच झाली. ऑस्ट्रेलिया व इंग्लंड यांचेमध्यें क्रिकेटचे मोठमोठे सामने सुरू झाले व क्रिकेटसंघांची निर्मितीही झपाट्यानें होऊं लागली. क्रिकेटच्या खेळानें सर्वांस नुसतें वेड लावलें होतें व त्यामुळेंच तो खेळ इंग्लंडचा राष्ट्रीय खेळ म्हणून ओळखला जाऊं लागला. क्रिकेटप्रमाणेंच टेनिस, गोल्फ, हॉकी, बॅडमिंटन, फुटबॉल वगैरे खेळही लोकप्रिय असत. तरी पण हे सर्व खेळ पुरुषच खेळत; स्त्रिया ते पहात व खेळाडूंची स्तुति करीत. वल्ह्यांच्या साहाय्यानें बोटी हांकण्याच्या शर्यतीही सुरू होऊं लागल्या होत्या. ऋतूप्रमाणें खेळांतही फरक होत असे. हिंवाळ्यांत स्केटिंग खेळलें जाई व बर्फाच्या साहाय्यानें मुलें अनेक प्रकारचे खेळ खेळत. शहरांतून, मोठमोठ्या उद्यानां-तून व बागांतून मजा मारण्यांत पुष्कळच लोक दंग असत. संगीताचा षोक लोकांस चांगलाच होता. पियानो वाजविणें लोकांस आवडे. तरीपण त्यावेळीं उत्तानपणा कोणत्याही प्रकारचा नव्हता. पत्ते, ड्राफ्टस्, बुद्धिबळें, फासे वगैरे बैठे खेळ हमरीतुमरीनें खेळले जात व प्रत्येक खेळांत पैसे लावून खेळ खेळण्याचा मोह अनेकांस होत असे. जुगार नेहमींचाच होता. नाचगृहें, कॉफीगृहें, गुत्ते वगैरेंचें महत्त्व नष्ट झालेलें नव्हतें.

९. **ज्ञानसंवर्धनाच्या साधनांची वाढ**:—या शतकांत सरकारनें शिक्षणदानाचें काम आपल्या हातीं घेतल्यानें शिक्षणाचा प्रसार होऊं लागला होता. अर्थात त्यामुळें लोकांस वाचनाची गोडी लागली व अनेक प्रकारचीं वर्तमानपत्रें, मासिकें व पुस्तकें खपूं लागलीं. विशेषतः ग्लॅडस्टननें कागदाव-रील जकात सन १८६० मध्यें रद्द केल्यानें वर्तमानपत्रें, पुस्तकें, मासिकें वगैरे स्वस्त झालीं व त्यांचा खप अतिशय वाढला. त्याबरोबर ग्रंथालयेंही झपाझप वाढूं लागलीं. प्रत्येक छोट्या–मोठ्या शहरांतही ग्रंथालयें–व तींही मोफत ग्रंथालयें–स्थापन होऊं लागलीं. पुस्तकांच्या दुकानांतून पुस्तकें विकत घेऊन तीं वाचण्याची चटक लोकांस लागल्यानें चांगलीं चांगलीं पुस्तकेंही निर्माण होऊं लागून इंग्लिश वाङ्मय समृद्ध होऊं लागलें. त्याचप्रमाणें या शतकांत चित्रालयेंही स्थापन होऊं लागलीं. इतके दिवस उत्तमोत्तम चित्रें गरीब लोकांस पहावयासही मिळत नसत. आतां 'टेट गॅलरी', 'नॅशनल पोर्ट्रेट गॅलरी'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वगैरेंसारखीं चित्रालयें स्थापन झाल्यानें तेथें सर्व काळ टांगून ठेवलेलीं उत्तमोत्तम चित्रें गरिबांच्याही आटोक्यांत आलीं. या सर्व गोष्टींमुळें लोकांचें ज्ञान वाढण्यास पुष्कळच मदत झाली.

अभ्यास

१. एकोणिसाव्या शतकांत शहरीजीवन व खेड्यांतील जीवन यांत कोणता फरक होता ? तुम्ही कोठें राहिलां असतां ? कां ?

२. त्या काळीं लोक कोणते खेळ खेळत असत ? त्यांच्या करमणुकीचीं इतर साधनें कोणतीं होतीं ?

३. त्या काळीं इमारती कशा प्रकारच्या असत ? त्यांच्या बांधणींत कोणते फरक झाले होते ? नगररचनेचा त्यांच्या बांधणीवर कोणता परिणाम झाला ?

४. एकोणिसाव्या शतकांत लोकांस कोणतें अन्न मिळे ?

५. त्या वेळीं स्त्रियांची स्थिति कशी होती ? तशी असण्याचें कारण काय ? त्या कपडे कोणते घालीत असत ? कां ?

६. एकोणिसाव्या शतकांत जे अनेक शोध लागले त्यांचा लोकांच्या राहाणीवर काय परिणाम झाला ? उदाहरणें देऊन स्पष्ट करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१. वंशवृक्ष – विंडसर घराणें – १९०१ – चालू



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विंडसर घराणें

१३. शांततारक्षणार्थ युरोपियन राष्ट्रांची धडपड

१. सातवा एडवर्ड (१९०१-१९१०):—व्हिक्टोरियाच्या मृत्यूनंतर तिचा ज्येष्ठ मुलगा सातवा एडवर्ड इंग्लंडच्या गादीवर बसला. त्याचा जन्म सन १८४१ मध्यें लंडनच्या बकिंगहॅम राजवाड्यांत झाला. लहानपणीं त्याला मिळावें तसें व तितकें शिक्षण मिळालेलें नव्हतें. एडिंबरो, ऑक्सफर्ड, केंब्रिज वगैरे ठिकाणीं त्याला थोडें बहुत शिक्षण मिळालें होतें; परंतु त्याला इतर विद्यार्थ्यांत पूर्णपणें मिसळण्याची परवानगी नव्हती. खाजगी रीतीनेंच त्याचें बहुतेक सर्व शिक्षण झालें होतें. कानडा, अमेरिका वगैरे देशांत त्यानें प्रवास केला होता. त्यामुळेंही त्याला अनेक प्रकारचे अनुभव मिळाले. जर्मन व फ्रेंच या भाषा त्याला चांगल्या अवगत होत्या. व्हिक्टोरिया मेली त्यावेळीं तो थोडा आजारीच होता. त्यामुळें त्याचा राज्याभिषेकसमारंभ थोड्या उशीरांच झाला. त्याचें लग्न सन १८६३ मध्यें डेन्मार्कची राजकन्या अलेक्झांड्रा हिच्याबरोबर झालें. त्याची वृत्ति धार्मिक नव्हती. त्याची विचारसरणीही उथळ होती. कादंबरीवाचनापेक्षां वर्तमानपत्रें



सातवा एडवर्ड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचण्याची त्याला आवड होती. त्याला घोड्यांच्या शर्यतींचा नाद होता व डर्बीची लॉटरीही त्यानें एकदां मिळविली होती. राजा या नात्यानें त्यानें प्रधानांवर पूर्ण विश्वास टाकला. तो मोठा मुत्सद्दी होता अशांतला भाग नाहीं; परंतु परराष्ट्रीय राजकारणांत त्यानें आपल्या स्वतःच्या गुणांमुळें चांगल्या गोष्टी घडवून आणल्या. त्या बाबतींत त्याला 'शांतता स्थापन करणारा' अगर 'शांततारक्षक' असें म्हणतां येईल; कारण त्यानें फ्रान्सशीं समेट घडवून आणला, जर्मनीला भेट दिली, रशियाच्या झारशीं विचारविनिमय करून त्याचें प्रेम संपादिलें व इटलीच्या राजाला भेट देऊन त्यालाही त्यानें आपल्या गटांत घेतलें. डेन्मार्क, नॉर्वे व स्पेन यांच्या राजांना ब्रिटिश राजघराण्यांतील राजकन्या देऊन त्यांच्याशीं त्यानें सख्य जोडलें. अशा तऱ्हेनें एडवर्ड हा राजा झाल्यानें इंग्लंडच्या परराष्ट्रीय संबंधांतील गुंतागुंतीच्या प्रश्नांची उकल यशस्वी रीतीनें होण्यास चांगलीच मदत झाली.

२. बाल्फोरचें प्रधानमंडळ (१९०२–१९०५):—एडवर्ड राजा झाला त्यावेळीं दक्षिण आफ्रिकेंत बोअर युद्ध सुरू होतें व लॉर्ड सॅल्सबरीचें मंत्रिमंडळ अस्तित्वांत होतें. सन १९०२ मध्यें तह होऊन आफ्रिकेंतील युद्ध खलास होऊन ट्रान्सव्हाल व ऑरेंज फ्री स्टेट या बोअर वसाहती ब्रिटिश साम्राज्यांत सामील करण्यांत आल्या. त्यानंतर लॉर्ड सॅल्सबरीनें राजीनामा दिल्यानें बाल्फोर इंग्लंडचा मुख्य प्रधान झाला. तो उत्तम वक्ता होता. त्याच्या प्रधानमंडळांत जोसेफ चेंबर्लेन हा वसाहतींचा मंत्रि होता, तरी त्याचें वजन प्रधानमंडळांत फार होतें. मुख्य प्रधान होतां आलें नाहीं म्हणून त्याला थोडें वाईट वाटलें, तरी त्यानें मोठ्या उत्साहानें संरक्षित व्यापाराचें तत्त्व इंग्लंडच्या व्यापारांत घुसडून देण्याचा प्रयत्न चालविला होता.

३. शिक्षणाचा कायदा (१९०२):—बाल्फोरच्या प्रधानमंडळानें सन १९०२ मध्यें एक अत्यंत महत्त्वाचा कायदा पास केला. त्याला 'शिक्षणाचा कायदा' असें म्हणतात. सन १८७० सालीं प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास झाला. त्या अन्वयें प्रत्येक परगण्यांत स्कूलबोर्डें स्थापण्यांत येऊन त्यांच्याकडे प्राथमिक शिक्षणाचें काम सोंपविण्यांत आलें. त्यामुळें इंग्लंडांत दोन प्रकारच्या शाळा स्थापन झाल्या. स्कूलबोर्डांनीं चालविलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाळा व धर्मगुरूंनीं खाजगी पैशानें चालविलेल्या शाळा. सन १९०२ च्या कायद्यानें खालील गोष्टी ठरविल्या. (१) परगण्यांतील स्थानिक संस्थेनें आपल्या परगण्यांतील प्राथमिक, दुय्यम व औद्योगिक शिक्षणाची व्यवस्था पहावी. (२) त्याकरितां त्याच संस्थेंतील स्कूलकमेटीकडे शिक्षणाची सर्व व्यवस्था असावी. (३) पूर्वीचीं स्वतंत्र स्कूलबोर्डें रद्द समजण्यांत यावीं. (४) स्कूलकमेटीचा अधिकार खाजगी शिक्षणसंस्थांवरही चालावा. (५) खाजगी शिक्षणसंस्थांचा कारभार पूर्वीप्रमाणेंच स्वतंत्र रहावा; परंतु त्यांच्यावरही स्कूलकमेटीचा ताबा रहावा. (६) खाजगी शिक्षणसंस्थांसही स्कूलकमेटीकडून मदतीदाखल थोडा पैसा मिळावा. (७) खाजगी शिक्षणसंस्थांतील एकतृतीयांश अधिकारी स्कूलकमेटीनें नेमावे. (८) खाजगी संस्थांनीं आपापल्या संस्थांमध्यें आपल्या मताप्रमाणें धार्मिक शिक्षण देण्यास हरकत नाहीं. या कायद्यानें इंग्लंडमधील सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्था एकाच संस्थेच्या अधिकाराखालीं आल्या. त्यामुळें प्राथमिक, दुय्यम व औद्योगिक शिक्षणाचें केंद्रीकरण होऊन सर्वांस योग्यप्रकारें शिक्षण मिळण्याची सोय झाली. मात्र खाजगी शिक्षणसंस्थांच्या बाबतींत जें धोरण नव्या कायद्यानें स्वीकारलें, त्यामुळें निरनिराळ्या धर्मपंथांतील लोकांमध्यें असंतोष पसरला. खाजगी संस्थांचें स्वातंत्र्य नष्ट झालें, असें हे असंतुष्ट लोक म्हणत. सन १९०३ मध्यें हा कायदा लंडनच्या कौंटीकौन्सिललाही लागू करण्यांत आला.

४. नवीं विश्वविद्यालयें :—याच सुमारास इंग्लंडमध्यें नवीं विश्वविद्यालयें स्थापन करण्यांत आलीं. आजपर्यंत इंग्लंडमध्यें ऑक्सफर्ड, केंब्रिज व लंडन येथेंच विश्वविद्यालयें होतीं; परंतु त्यांच्याकडून लोकांची उच्च शिक्षणाची तहान पूर्णपणें भागविली जात नव्हती. त्यामुळें लिव्हरपूल, मँचेस्टर, लीडस्, डरहॅम, शेफील्ड, ब्रिस्टल व बर्मिंगहॅम या शहरीं नव्या धर्तीवर विश्वविद्यालयें स्थापन करण्यांत आलीं. या सर्व विश्वविद्यालयांतून भाषा, गणित व शास्त्रें यांच्या शिक्षणाची सोय करण्यांत आली होती, तरीही त्यांचें लक्ष उद्योगधंद्यांच्या शिक्षणाकडे नव्हतें असें नाहीं. त्याकरितां या विश्वविद्यालयांत त्या त्या धंद्याच्या शिक्षणाकरितां स्वतंत्र खातीं स्थापण्यांत आलीं. त्याचप्रमाणें निरनिराळ्या कलांचें व शास्त्रांचें शास्त्रीयदृष्टीनें ज्ञान देण्याकरितां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'इंपीरियल कॉलेज ऑफ सायन्स व टेक्नॉलजी' ही संस्था लंडन येथें स्थापन झाली. या सर्व सुधारणांमुळें उच्च शिक्षणाचें व औद्योगिक शिक्षणाचें पाऊल पुढें पडण्यास मदत झाली.

५. **मंत्रिमंडळांत फाटाफूट** :—बाल्फोरच्या मंत्रिमंडळांत जोसेफ चेंबर्लेन हा मोठा वजनदार मुत्सद्दी होता. तो साम्राज्यवादी होता; व त्यामुळें साम्राज्यसंवर्धन व संघटन याकरितां खुल्या व्यापाराच्या तत्त्वांत सुधारणा करून साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांस व्यापाराच्या बाबतींत सवलती दिल्या तर साम्राज्यसंवर्धन साहजिक घडून येईल असें त्याला वाटत होतें. या धोरणामुळें वसाहतींतील कच्चा माल इंग्लंडला मिळेल व त्याला त्याकरितां इतर राष्ट्रांकडे पहावें लागणार नाहीं असें त्याचें म्हणणें होतें. वसाहतींचा माल कमी जकाती घेऊनही इंग्लंडांत येऊं द्यावा, वेळेनुसार तो फुकटही येऊं द्यावा असें त्याचें म्हणणें होतें. या धोरणाचा त्यानें मोठ्या धडाडीनें पुरस्कार केला. तसेंच इंग्लंडमधील उद्योगधंद्यांस प्रोत्साहन व उत्तेजन देण्या-



विमानाची पहिली भरारी १९०३

करितां त्यांना संरक्षण द्यावें व परराष्ट्रीयांच्या चढाओढीपासून इंग्लंडच्या व्यापाराचें रक्षण करावें असेंही त्यानें सुचविलें. त्यामुळें तो उघड उघड संरक्षित व्यापाराचें धोरण पुरस्कारूं लागला. अर्थात् खुल्या व्यापाराच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरस्कर्त्यांनीं त्याच्या धोरणास जोरानें विरोध करण्यास सुरुवात केली. खुल्या व्यापाराचें धोरण टाकून दिल्यास महागाई होईल, परराष्ट्रीय संबंधांत खटके उडतील व साम्राज्यसंघटनेऐवजीं साम्राज्याचें विस्कळीकरण होण्यास मदत होईल असें त्यांचें म्हणणें पडलें. चेंबर्लेनला प्रधानमंडळांतील मंत्र्यांचाही विरोध होऊं लागला. तेव्हां त्यानें सन १९०३ मध्यें मंत्रिमंडळांतील वसाहतमंत्रिपदाचा त्याग केला व आपल्या धोरणास पाठिंबा मिळविण्याकरितां इंग्लंडमध्यें मोहीम सुरू केली. त्यानें 'जकाती-सुधारणा संघ' स्थापन करून इंग्लंडभर दौरे काढले व आपलीं मतें तो लोकांस पटवूं लागला. त्याच्या राजीनाम्याच्या वेळीं बाल्फोरच्या मंत्रिमंडळांत असलेल्या खुल्या व्यापाराच्या पुरस्कर्त्यांनींही मंत्रिमंडळांतील आपल्या जागांचे राजीनामे दिले. त्यामुळें संरक्षित व्यापारपद्धतीचा पुरस्कार करणारांचा एक गट व खुल्या व्यापाराचा पुरस्कार करणारांचा दुसरा गट असे दोन गट निर्माण झाल्यानें कंझर्व्हेटिव्हपक्षांत फूट पडली. लिबरलपक्ष खुल्या व्यापाराच्या धोरणाचा कट्टा अनुयायी असल्यानें त्या पक्षानें चेंबर्लेनच्या धोरणास कसून विरोध चालविला.

६. आयर्लंडसंबंधीं धोरण :—ग्लॅडस्टनचें होमरूल बिल पार्लमेंटनें नापास केल्यानें आयरिश लोक नाखूषच झाले होते; व आपला छळ होईल या भीतीनें अनेक लोक आयर्लंड सोडून पोटाकरितां अमेरिकेंत जाऊन राहूं लागले होते. सन १८९५ मध्यें आयर्लंडमधील शेतीची स्थिति थोडी समाधानकारक होऊं लागली; तरीही आयरिशांचा असंतोष कमी झालेला नव्हता. होरेस प्लंकेट यानें सन १८९४ मध्यें 'शेतीसुधारणा संघ' स्थापन केला व शेतकऱ्यांची स्थिति सुधारणें हें त्यानें आपल्या संघाचें उद्दिष्ट ठरविलें. त्या संघामार्फत त्यानें शेतकऱ्यांत चांगलीच सुधारणा घडवून आणली व सहकार्याच्या जोरावर शेतकरी काम करूं शकतात व आपली स्थिति सुधारूं शकतात असें सिद्ध केलें. तरीही सरकारी मदतीशिवाय आयरिश शेतकऱ्यांची स्थिति सुधारणें शक्य नव्हतें. बहुजन समाजांतील असंतोषही कमी झालेला नव्हता; तेव्हां सन १९०३ मध्यें बाल्फोरनें आयर्लंडमधील 'जमिनीसंबंधाचा कायदा' (विंडहॅम ॲक्ट) पास केला. त्या अन्वयें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रिटिश सरकारनें दहा कोटी पौंड बाजूला काढावे व दरसाल पांच कोटी पौंड खर्चून आयरिश जमिनी विकत घ्याव्या असें ठरविलें. जमीनदारांना चांगली किंमत देऊन त्यांच्याकडून मोठमोठ्या जमिनी विकत घ्यावयाच्या व मग त्यांचे लहान लहान तुकडे करून ते आयरिश शेतकऱ्यांस थोड्या किंमतींत विकत द्यावयाचे अगर त्याकरितां शेतकऱ्यांस कर्ज द्यावयाचें असें या कायद्यानें ठरविलें. पुष्कळ शेतकऱ्यांस त्यामुळें जमीन विकत घेतां येणें शक्य झालें व त्याप्रमाणें अनेकांनीं जमिनी घेतल्याही. त्यामुळें त्यांच्यांतील असंतोष बराचसा कमी झाला.

७. जर्मनीची महत्त्वाकांक्षा:—क्रिमियन युद्धानंतर युरोपांतील राजकारणाशीं इंग्लंड फटकूनच वागत होतें; व त्यामुळें त्या राष्ट्राला एकही मित्रराष्ट्र नव्हतें. त्यावेळीं लॉर्ड लॅन्सडाऊन परराष्ट्रमंत्रि होता. त्यानें युरोपांतील राजकारणासंबंधींचें अलिप्तपणाचें धोरण टाकून देण्याचें ठरवून इतर राष्ट्रांशीं स्नेहसंबंध जोडण्यास सुरुवात केली. त्यावेळीं जर्मनी बलाढ्य राष्ट्र म्हणून समजलें जात होतें. सन १८७० मध्यें त्या राष्ट्रानें फ्रान्सचा पराभव केला होता व त्यामुळें फ्रान्स व जर्मनी यांच्यामध्यें अखंड वैर सुरू झालें; शिवाय इतर राष्ट्रांच्या कुरापती काढून सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास जर्मन राष्ट्र उद्युक्त झालें होतें. जर्मन राष्ट्राच्या सरहद्दी वाढवून बहुतेक सर्व युरोप पादाक्रांत करण्याची व सर्व जग काबीज करण्याची जर्मनीनें महत्त्वाकांक्षा धरली होती. सन १८८८ मध्यें दुसरा विल्यम जर्मनीचा बादशाह झाला. त्यालाच कैसर असें म्हणत. गादीवर आल्याबरोबर त्यानें प्रिन्स बिस्मार्कची मुख्य प्रधानाच्या जागेवरून उचलबांगडी केली व सर्व सत्ता आपल्या हातांत घेऊन जर्मनीच्या साम्राज्यवृद्धीच्या धोरणास त्यानें उचलून धरलें. जर्मनीचा व्यापार वाढला पाहिजे, जर्मनीला वसाहती मिळाल्या पाहिजेत व जर्मन सत्ता सर्वत्र स्थापन झाली पाहिजे असें त्याला वाटे. त्याच्या या महत्त्वाकांक्षी धोरणास जर्मनांनींही उचलून धरलें. आपल्या धोरणाच्या सिद्ध्यर्थ प्रथमतः त्यानें जर्मन आरमार सुधारण्याचा प्रयत्न चालविला. डेन्मार्क व जर्मनी यांच्या सरहद्दवरील उत्तर समुद्र व बाल्टिक समुद्र यांना सांधणारी कीलची संयोगभूमि खोदून तेथें कालवा करावयाचा व त्या ठिकाणीं जर्मन आरमार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवावयाचें असा त्यानें बेत केला. त्याप्रमाणें सन १८९५ मध्यें तो कालवा खणून तयारही झाला. त्याबरोबर जर्मन आरमारही उत्तम तयार होऊं लागलें. जर्मनीचें लष्कर उत्तम होतेंच. त्याच्या जोडीला आरमारही उत्तम झाल्यानें तें राष्ट्र मोठें सामर्थ्यवान झालें. त्याच वेळीं कैसरनें मुसलमानांशीं व तुर्कस्थानशीं स्नेहसंबंध जोडण्यास सुरवात केली. सन १८९८ मध्यें तुर्कस्थानच्या सुलतानाची भेट घेऊन बर्लिन ते बगदादपर्यंत नवी आगगाडी करण्यास त्यानें सुलतानाकडून परवानगी मिळविली. परंतु त्याची ही आंखणी शेवटास गेली नाहीं. ग्रीस, हॉलंड, बल्गेरिया व रुमेनिया वगैरे राष्ट्रांच्या राजांशीं कैसरचा नात्यानें संबंध आलेला होता; व त्यामुळें त्यांच्याशीं त्याची मैत्री होती. कैसरच्या या सर्व कृत्यांच्या बुडाशीं इंग्रजांचें साम्राज्य मारून जर्मनीचें साम्राज्य वाढविणें हा मुख्य हेतु होता. त्यामुळेंच इंग्लंडचा जर्मन लोक मत्सर व द्वेष करूं लागले होते; व त्यापायींच त्यांनीं बोअर युद्धांत क्रूगरला प्रोत्साहन दिलें. अशा तऱ्हेची विल्यम कैसरची महत्त्वाकांक्षा होती व तिच्या सिद्धीकरितां तो जिवापाड खटपट करीत होता.

८. इंग्लंडला पडलेला पेंच:—कैसरचा उद्देश कळल्यानें रशियालाही भीति वाटूं लागली होती. बाल्कन राष्ट्रांत जर्मनीचें वर्चस्व स्थापन झाल्यास रशियाच्या तेथील वर्चस्वाला धोका पोंचणारा होता. हॉलंड व बेल्जम या राष्ट्रांनाही जर्मनीची भीति वाटूं लागली होती. खुद्द फ्रान्सलाही मोठा पेंच पडला होता. जर्मनीनें त्या राष्ट्राचा पराभव करून त्याची नाचक्की केली होती व त्याच्या ताब्यांतील आल्सेस व लोरेन हे प्रांत जिंकून घेतले होते. या गोष्टीचें शल्य फ्रान्सच्या मनांत सलत होतेंच. त्यांतच जर्मनीची सत्ता वाढली तर आपल्यावर गंडांतर येणार अशी फ्रान्सला भीति वाटत होती. इंग्लंडशींही त्या राष्ट्राचें नीट नव्हतें. वॉटर्लूनंतर इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें युद्ध झालें नव्हतें व क्रिमियन युद्धांत तीं राष्ट्रें खांद्याशीं खांदा भिडवून रशियाविरुद्ध लढलीं होतीं. परंतु इतर अनेक गोष्टींवरून त्या दोन्ही राष्ट्रांत एकसारखी धुसफूस सुरू होती. इजिप्तवर इंग्लंडनें आपलें स्वामित्व स्थापलें हें फ्रान्सला खपलें नाहीं. फॅशोडाप्रकरणांत फ्रेंचांना मान खालीं घालावी लागली होती. मोरोक्कोमधील फ्रान्सच्या वर्चस्वास इंग्लंड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हरकत घेत होतें. या व इतर गोष्टींमुळें इंग्लंडवर फ्रान्स जळफळत होतें. खुद्द इंग्लंडलाही जर्मनीच्या वाढत्या सत्तेबद्दल भीति वाटूं लागली होती. गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्लंडला युरोपांत एकही मित्रराष्ट्र उरलें नव्हतें. बोअर युद्धांत इंग्लंडची थोडीबहुत नाचक्कीच झाली होती. रशिया हिंदुस्थानवर चाल करील ही इंग्लंडला एकसारखी भीति होतीच. अशा स्थितींत जर्मनीची महत्त्वाकांक्षा हाणून पाडावयाची असेल तर इंग्लंडला युरोपांत मित्रराष्ट्र पाहिजे होतें. जर्मनीशीं सलोखा ठेवण्याकरितां इंग्रज मुत्सद्यांनीं अनेक प्रयत्नही चालविले होते; परंतु त्यामुळें जर्मनीच्या धोरणास पायबंद बसण्याचें लक्षण दिसेना. तेव्हां ब्रिटिश मुत्सद्यांसही मोठा पेंच पडला.

९. फ्रान्सशीं स्नेह (१९०४):—अशा स्थितींतच इंग्लंडनें फ्रान्सशीं मिळतें घेण्याचें धोरण स्वीकारलें. सन १८८२ मध्यें जर्मनी, ऑस्ट्रिया व इटली या 'त्रिवर्गाचा तह' झाला होता व तो संपुष्टांत आल्यावर जर्मनी व ऑस्ट्रिया यांच्यांत बिस्मार्कनें मैत्रीचा तह घडवून आणला व शत्रूचा हल्ला आल्यास परस्परांनीं एकमेकांस मदत करावी असेंही ठरविलें होतें (१८८७). हा तह सन १९०३ मध्यें पुन्हां झाला होता. अशा स्थितींत इंग्लंडला फ्रान्सशीं मिळतें घेऊन त्या राष्ट्राशीं मैत्रीचा तह करण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. तेव्हां सन १९०३ मध्यें सातवा एडवर्ड फ्रान्समध्यें गेला; व आपल्या गुणांनीं त्यानें फ्रासमध्यें इंग्लंडला अनुकूल असें वातावरण निर्माण केलें. त्यानंतर फ्रान्सचा अध्यक्ष लूबॉं यानेंही इंग्लंडला भेट दिली. या भेटीमुळें आशादायक वातावरण निर्माण झालें. पुढें फ्रान्स व इंग्लंड यांच्यामधील कुरबुरींचा निकाल एका लवादमंडळाकडून लावून घेण्यांत आला व त्या दोन्ही राष्ट्रांमध्यें सन १९०४ मध्यें स्नेहाचा तह झाला. त्या तहानें इजिप्तवर इंग्लंडचें स्वामित्व रहावें व मोरोक्कोमध्यें फ्रान्सचें वर्चस्व रहावें असें ठरलें. सेंट लॉरेन्स नदीमध्यें मच्छीमारी करण्याचा अधिकारही फ्रान्सला मिळाला. या तहानें इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें स्नेह निर्माण झाला. बाल्फोरमंत्रिमंडळाची ही कामगिरी उत्तम झाली असें मानण्यांत येतें. त्यामुळें इंग्लंडनें फ्रान्ससारखा देश मिळविला; एवढेंच नव्हे, तर रशिया व इटली यांची मैत्री संपादण्यासही उत्तम संधि मिळवून दिली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०. बाल्फोरचा राजीनामा :—व्यापारी धोरण बदललें पाहिजे असें चेंबर्लेनचा पक्ष म्हणत होता. बाल्फोरनें त्यासंबंधीं आपलें स्पष्ट मत दिलें नाहीं. कांहीं वेळां खुल्या व्यापाराच्या बाजूनें तो बोले, तर कांहीं वेळां संरक्षित व्यापारवाल्यांचीही त्यानें कड घेतली. त्यामुळें त्याचें आसन डळमळित झालें. त्यांतच चिनी लोकांना आफ्रिकेंत मजूर म्हणून नेण्यास संमति दिल्यानें लिबरलपक्ष त्याच्यावर चिडला होता. युरोपियन मजूर कमी पडल्यामुळें आफ्रिकेंत चिनी मजूर नेण्याची त्यानें मोकळीक दिली होती; परंतु त्यामुळें गुलामगिरीच सिद्ध होते असें लिबरल पुढारी म्हणूं लागले. मजूरपक्षालाही हें धोरण पसंत पडलें नाहीं. दारूचें व्यसन कमी करण्याकरितां बाल्फोरनें एक 'परवाना बिल' सन १९०२ मध्यें पास केलें होतें. परंतु त्याचा फारसा फायदा झाला नाहीं. त्यामुळें त्यांत सुधारणा करून सन १९०४ मध्यें तें त्यानें पुन्हां पास करून घेतलें. परंतु तेंही अनेकांना आवडलें नाहीं व त्यामुळें देशांत बाल्फोरबद्दल असंतोष निर्माण झाला. जकातीच्या धोरणामुळें कंझर्व्हेटिव्हपक्षाचीं अगोदरच छकलें झालीं होतीं. शिक्षणासंबंधीं त्यानें पास केलेला कायदाही अनेकांस पसंत नव्हता. दारूसंबंधींचें त्याचें धोरणही असंतोषास कारणीभूत झालें. या सर्व गोष्टींमुळें सन १९०५ च्या डिसेंबरमध्यें जी निवडणूक झाली त्यांत लिबरलपक्ष बहुमतानें निवडून आल्यानें बाल्फोरनें राजीनामा दिला व लिबरलपक्षाचा पुढारी कॅंपबेल बॅनरमन मुख्य प्रधान झाला.

११. कॅंपबेल बॅनरमनचें प्रधानमंडळ (१९०५–१९०८) :—हेन्री कॅंपबेल बॅनरमनच्या प्रधानमंडळांत अनेक नाणावलेले मुत्सद्दी होते. ॲस्क्विथ फडणीस होता, लॉइड जॉर्ज व्यापारमंत्रि होता, जॉन मोर्ले भारतमंत्रि होता, सर एडवर्ड ग्रे परराष्ट्रमंत्रि होता व हॉल्डेन युद्धमंत्रि होता. त्यावेळच्या पार्लमेंटमध्यें चौपन मजूरपक्षीय लोक होते. इतके मजूरपक्षीय लोक पार्लमेंटमध्यें असल्याचें हें पहिलेंच उदाहरण होय. त्या पक्षानें लिबरलपक्षाला पाठिंबा देण्याचें धोरण स्वीकारिलें होतें. निवडणुकींत बाल्फोर पडला होता, चेंबर्लेन मात्र निवडून आला होता. नव्या प्रधानमंडळानें सन १९०७ मध्यें लष्करांत सुधारणा केल्या. लॉर्ड हॉल्डेननें या सुधारणा हातीं घेतल्या होत्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लंडच्या संरक्षणाकरितां 'टेरिटोरियल फोर्स' स्थापन करण्याचें ठरविण्यांत येऊन, त्यांत लष्करांतील लोक व स्वयंसेवकदल यांचा समावेश करण्यांत आला. लष्करी सोयीच्या दृष्टीनें इंग्लंडचे निरनिराळे चौदा विभाग पाडण्यांत येऊन प्रत्येक विभागांत लष्कराची उभारणी करण्याकरितां एक मंडळ स्थापन करण्याचें ठरलें. शाळांतून विद्यार्थ्यांचीं पथकें उभारण्याचें व त्यांना



'ग्लासगो' नामक आरमारी जहाज—१९०९

लष्करी अधिकाऱ्यांचें शिक्षण देण्याचेंही ठरलें. या सुधारणांमुळें खास सैन्य कमी झालें ही गोष्ट खरी असली तरी युद्धाच्या वेळीं मुबलक सैन्य मिळण्याची सोय झाली. लष्कराप्रमाणेंच नाविकदलाच्या बाबतींतही सुधारणा करण्यांत आल्या. सन १९०१ मध्यें पहिली पाणबुडी बांधण्यांत आली. सन १९०६ मध्यें 'ड्रेडनॉट' नांवाचें 'बेडर' जहाज बांधण्यांत आलें. तें जहाज जलद जाई. त्याची बांधणीही मजबूत होती. अनेक निकामीं व आरमारी उपयोगाला नालायक अशीं जहाजें रद्द करण्यांत आलीं. जर्मनीनें आरमार सुसज्ज करण्याचें धोरण ठरविल्यानें इंग्लंडला आपलें आरमारही सामर्थ्यवान् करावें लागलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२. मंत्रिमंडळाची इतर कामगिरी :—सन १९०६ मध्यें मजुरांच्या हिताचीं दोन बिलें पास करण्यांत आलीं. पहिल्या बिलानें मजुरांच्या संपाच्या वेळीं पिकेटिंग करण्याचा हक्क कायदेशीर मानण्यांत आला व दुसऱ्या बिलानें कारखान्यांत अपघात झाला तर त्याबद्दल मजुरांना योग्य भरपाई देण्यांत यावी असें ठरविण्यांत आलें. सन १९०७ मध्यें मृत पत्नीच्या बहिणीबरोबर लग्न करण्याची सर्वांस मोकळीक ठेवण्यांत आली. त्याच सालच्या अंदाजपत्रकांत प्राप्तीवरील कर दर पौंडांस नऊ पेन्सप्रमाणें ठरविण्यांत आला व सुपरटॅक्सही बसविण्यांत आला. शाळांतील मुलांस जेवण देण्यासही सुरुवात झाली व प्रत्येकाची वैद्यकीय तपासणी करण्याचें ठरलें. इतके दिवस एकच गृहस्थ अनेक मतदारसंघांतर्फे पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळीं मतें देत असे. ही पद्धति घातुक ठरल्यामुळें एका गृहस्थानें एका वेळीं एका मतदारसंघातर्फेच मत द्यावें असें बिल कॉमन्ससभेनें पास केलें; परंतु उमरावमंडळानें तें बिल फेंटाळून लाविलें. निवडणुकीच्या वेळीं स्त्रियांस मतदानाचा अधिकार मिळालेला नव्हता व तो मिळवून घेण्याकरितां स्त्रियांची खटपट चालू होती. परंतु त्यांना त्या बाबतींत यश आलें नाहीं. हिंदुस्थानांत अपूर्व जागृति झाली होती. लॉर्ड कर्झननें बंगालची फाळणी करून हिंदुस्थानांत असंतोषाचें बीज रुजविलें. त्यामुळें सर्व हिंदुस्थानभर असंतोषाची जोराची लाट उसळली. हिंदुस्थानांत दडपशाही सुरू झाली. सन १९०६ मध्यें अफूचा व्यापार करणें नीतीच्या विरुद्ध आहे असें पार्लमेंटनें ठरविलें व त्याप्रमाणें सन १९०७ मध्यें इंग्लंडनें चीनशीं एक करार करून हिंदुस्थानांतून दरसाल फक्त ५१००० अफूच्या पेट्या चीनमध्यें पाठवाव्या व ही निर्यात दरसाल एकदशांशानें कमी करावी असें ठरलें. सन १९०७ मध्यें रेल्वेंतील मजुरांनीं एक मोठा संप करण्याचें ठरविलें. त्यांच्या संपास मान्यता देण्याचें रेल्वे अधिकाऱ्यांनीं नाकारल्यामुळें मोठा पेंचप्रसंग उत्पन्न झाला होता. शेवटीं व्यापारमंत्रि लॉइड जॉर्ज याच्या मध्यस्थीनें तो टळाला व संप स्थगित झाला.

१३. जपानचा उदय :—याच सुमारास रशिया व जपान यांच्यांतील युद्ध नुकतेंच संपलेलें होतें. त्यांत रशियाची नाचक्की झाली होती. तो प्रकार असा. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरी अखेरीस जपान हें राष्ट्र फार पुढें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आलें होतें. सतराव्या शतकांत जपानचा युरोपियनांशीं प्रथम संबंध आला; परंतु त्यावेळीं युरोपियनांवर जपाननें पूर्णपणें बहिष्कार टाकला होता. जपानचें हें धोरण चुकीचें होतें; तरी युरोपियनांनीं जपानमध्यें आपला प्रवेश करून घेण्यास सुरुवात केली. सन १८५३ मध्यें कमोडर पेटी या अमेरिकनानें जपानला व्यापारी तह करणें भाग पाडलें. तेव्हांपासून जपाननें युरोपियनांशीं संबंध ठेवण्यास सुरुवात केली व त्यांच्या एकेक गोष्टी आत्मसात् करणें आरंभिलें. सन १८९० मध्यें जपानमध्यें पार्लमेंटसभा स्थापन झाली. त्यावेळचा जपानचा बादशाह मुत्सुहिटो (१८६७–१९१२) हा एक अत्यंत आदर्श राजा होऊन गेला व त्यानें जपानची सर्वांगीण प्रगति करून जपानला पाश्चात्य राष्ट्रांच्या मांडीला मांडी लावून बसण्याचें श्रेय मिळवून दिलें. त्यावेळेपासून जपानी राष्ट्र पहिल्या प्रतीचें राष्ट्र समजण्यांत येऊं लागलें. सन १९०२ मध्यें इंग्लंडनें जपानशीं स्नेहाचा तह केला होता. त्यांत खालील अटी होत्या. (१) दोन्ही राष्ट्रांनीं चीनचें स्वातंत्र्य मान्य करावयाचें. (२) एका-पेक्षां अधिक शत्रूराष्ट्रांनीं कोणावरही हल्ला केला तर परस्परांनीं एकमेकांस मदत करावयाची. हा तह अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. कारण या तहानें जपानला पहिल्या प्रतीच्या राष्ट्राचा मान मिळाला. शिवाय पूर्वेकडील राष्ट्राला समानतेनें वागविल्याचें हें पहिलें उदाहरण होय; अर्थात् त्यामुळें जपानचा परराष्ट्रीय दर्जा वाढला. हा तह करण्यांत जपानचाही स्वार्थी हेतु होताच. त्याला रशियाच्या पूर्वेकडील वाढत्या सत्तेस आळा घालावयाचा होता व त्या राष्ट्राशीं युद्ध सुरू झाल्यास युरोपियन देशांनीं रशियाला मदत करूं नये असा जपानचा उद्देश होता. तो हेतु वरील तहानें साध्य झाला. कारण इंग्लंडचें आरमार अग्रेसर असल्यानें फ्रान्स अगर जर्मनी रशियाला जपानविरुद्ध मदत करणें शक्य नव्हतें. हा तह झाल्यानंतरच जपाननें रशि-याशीं युद्ध आरंभून रशियाचा पराभव केला.

१४. रशिया–जपान युद्ध (१९०४–१९०५):—आशियाच्या पूर्वेस असलेल्या मॅंच्यूरिया व कोरिया या प्रांतापर्यंत रशियाची सरहद्द भिडली होती. चीनमध्येंही रशियाचें वर्चस्व स्थापन झालें होतें. मॅंच्यूरिया प्रांतांतही रशिया आपलें वर्चस्व स्थापीत होता व कोरियावर त्याची दृष्टि होती. त्यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जपानला रशियाच्या या आक्रमक धोरणास आळा घालणें जरूरीचें वाटलें. कोरियांत जपानचें वर्चस्व होतें. तेव्हां जपाननें रशियाविरुद्ध सन १९०४ मध्यें युद्ध पुकारलें. या युद्धांत जपाननें अतुल पराक्रम करून आपल्या आरमाराच्या साहाय्यानें रशियाचा पराभव केला. सन १९०५ मध्यें तह झाला. त्या अन्वयें सॅघलिन बेटाचा दक्षिण भाग व आर्थर बंदर जपानला मिळालें व मँच्यूरियांतून रशियानें निघून जाण्याचें ठरवून कोरियांत जपानचें वर्चस्व त्यानें मान्य केलें. जपानच्या या विजयानें त्याला पूर्वेकडील राष्ट्रांत मोठें महत्त्व प्राप्त झालें. पूर्वेकडील एखादें राष्ट्र रशियासारख्या सबल राष्ट्राचा पराभव करूं शकतें हें सिद्ध झालें. जपानचा व्यापार अनेकपटीनें वाढण्यास सुरुवात झाली. रशियाची नाचक्की झाली, त्याचें सामर्थ्य कमी झालें व एखाद्या मित्रराष्ट्राच्या शोधार्थ रशिया प्रयत्न करूं लागला.

१५. रशिया–फ्रान्स–इंग्लंड यांचा संघ (१९०७) :—जपानशीं युद्ध चालू असतांच रशियामध्यें बंडाळी सुरू झाली होती. संप, रक्तपात, खून यांना नुसता ऊत आला होता. अशा स्थितींत रशियाच्या झारनें सन १९०५ मध्यें अनेक प्रकारच्या सुधारणा लोकांस दिल्यानें बंडाळी तात्पुरती थांबली. तरीही अंतस्थ शांतता पुरेपूर स्थापन झाली नव्हती. तेव्हां फ्रान्सच्या मध्यस्थीनें रशिया व इंग्लंड यांच्यामध्यें सलोखा निर्माण होण्यास मदत झाली. रशियाचा हल्ला हिंदुस्थानवर होणार अशी इंग्लंडला एकसारखी भीति वाटत होतीच. रशिया आपलें वर्चस्व इराणमध्यें स्थापूं लागला होता. परंतु जपाननें त्याचा पराभव केल्यानें रशिया भिऊन गेला होता. तशांत जर्मनीची त्याला फारच भीति वाटत होती. फ्रान्स व रशिया यांच्यामध्यें स्नेह होताच. फ्रान्स व इंग्लंड स्नेही बनले होते. अशा स्थितींत रशिया व इंग्लंड यांच्यांत स्नेह निर्माण होणें अशक्य नव्हतें. तेव्हां सन १९०७ मध्यें रशिया व इंग्लंड यांच्यामध्यें तह होऊन इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांच्यामध्यें 'त्रिवर्गाचा तह' स्थापन झाला. हा तह होण्यापूर्वींच सातव्या एडवर्डनें सन १९०६ मध्यें पॅरिसला भेट दिली होती आणि इंग्लंड व फ्रान्स या देशांतील स्नेह वाढविला होता. अशा तऱ्हेनें युरोपांत इंग्लंड, फ्रान्स व रशिया या राष्ट्रांचा एक मोठा बलाढ्य संघ निर्माण झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. बाल्फोरच्या मंत्रिमंडळाची कामगिरी थोडक्यांत सांगा. त्याला राजीनामा कां द्यावा लागला ?

२. फ्रान्सशीं व रशियाशीं इंग्लंडनें स्नेह कां व कसा केला ? त्याचा फायदा काय झाला ?

३. विसाव्या शतकाच्या सुरुवातीची युरोपची स्थिति वर्णा. जर्मनीची महत्त्वाकांक्षा कोणती होती ?

४. कॅंपबेल बॅनरमनच्या प्रधानमंडळाची कामगिरी वर्णा.

५. जपानचा उदय, शिक्षणासंबंधीं सुधारणा, कैसरची महत्त्वाकांक्षा, रशिया–जपान युद्ध यांसंबंधीं थोडक्यांत टिपणें करा.

६. जोसेफ चेंबर्लेन याचें चरित्र थोडक्यांत सांगा. त्यानें राजीनामा कां दिला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४. ॲस्क्विथच्या प्रधानमंडळाची कामगिरी

१. ॲस्क्विथचें मंत्रिमंडळ (१९०८) :—सन १९०८ मध्यें प्रकृति-स्वास्थ्यासाठीं बॅनरमननें राजीनामा दिला. नंतर थोड्याच दिवसांत तो मरण पावला. त्याच्या राजीनाम्यानंतर ॲस्क्विथ लिबरलपक्षाचा पुढारी झाला व त्यानें आपलें पहिलें प्रधानमंडळ बनविलें. त्या मंत्रिमंडळांत लॉइड जॉर्ज फडणीस झाला, मॅकीना आरमारमंत्रि झाला, विन्स्टन चर्चिल व्यापारमंत्रि झाला, एडवर्ड ग्रे परराष्ट्रीयमंत्रि झाला, लॉर्ड मोर्ले भारतमंत्रि झाला, लॉर्ड हॉल्डेन युद्धमंत्रि राहिला व ॲस्क्विथ मुख्य प्रधान झाला. या प्रधानमंडळानें सामाजिक व राजकीय बाबतींत कमालीची धडाडी दाखवून अनेक कायदे केले. या मंत्रिमंडळांत लॉइड जॉर्ज मोठा सामर्थ्यवान् मुत्सद्दी होता व त्यानेंच अनेक नव्या तत्त्वांना व बिलांना पार्लमेंटकडून मान्यता मिळविली. या प्रधानमंडळानें सर्व वर्गांतील लोकांस सारखें लेखून बहुजनसमाजाच्या हिताकरितां आपलें सर्व सामर्थ्य एकवटून अनेक उत्तमोत्तम कायदे पास केले; व इंग्लंडला अधिक सामर्थ्यवान् करून त्याला भावी युद्धास तयार केलें.

२. सामाजिक हितासंबंधीं कायदे :—सन १९०८ मध्यें 'पेन्शनचा कायदा' पास झाला. सत्तर वर्षांच्या म्हाताऱ्या लोकांस म्हातारपणीं दर आठवड्यास पांच शिलिंग याप्रमाणें पेन्शन मिळावें असें ठरलें; मात्र पेन्शन मिळणाराचें वार्षिक उत्पन्न एकतीस पौंड दहा शिलिंगांपेक्षां जास्त असतां कामा नये व त्याला धर्मादाय फंडांतून मदत मिळत असतां कामा नये असें ठरविण्यांत आलें. त्याप्रमाणें सन १९०९ मध्यें सरकारनें पंचावन लक्ष लोकांमध्यें सुमारें १,२०,००,००० पौंड पेन्शनदाखल वांटले. म्हातारपणीं पेन्शन देण्याचें तत्त्व त्यावेळीं सर्वांस पसंत पडलें. सन १९०८ मध्यें 'मुलांसंबंधीं कायदा' करण्यांत आला. त्या कायद्यानें खालील गोष्टी ठरल्या (१) सोळा वर्षांखालील मुलांस सिगारेट विकूं नये. (२) पांच वर्षांखालील मुलांस दारू पाजूं नये व त्यांस आईबापांनीं आपल्याबरोबर गुत्त्यांत नेऊं नये. (३)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलांस रस्त्यांतून भीक मागण्यास उत्तेजन देऊं नये; उत्तेजन देणारास शिक्षा व्हावी. (४) लहान मुलांस शेतांत काम देऊं नये. (५) लहान मुलांचे खटले चालविण्याकरितां स्वतंत्र कोर्टें असावीं. हा कायदा पास झाल्यानें मुलांवर अनंत उपकार झाले. त्याच वर्षी कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या मजुरांना दररोज आठ तासांपेक्षां जास्त काम देऊं नये असें ठरविणारा कायदा पास झाला. सन १९०८ मध्यें 'नगररचनेचा कायदा' पास झाला. त्या कायद्यानें नगररचनेच्या दृष्टीनें योग्य व सोयिस्कर जागा विकत घेण्याचा अधिकार म्युनिसिपालिट्यांस मिळाला. त्याप्रमाणें गलिच्छ व घाणेरडीं घरें पाडून त्यांच्या जागीं नवीन व हवाशीर घरें बांधावीं व तीं गरजू कामगारांना द्यावीं असें ठरविण्यांत आलें. बेकारी फार वाढली होती, तेव्हां बेकारांना काम मिळवून देण्याकरितां व कारखानदारांस मजूर पुरविण्याकरितां 'कामकरी संस्था' स्थापण्याचें सन १९०८ च्या कायद्यानें ठरविलें. त्याचप्रमाणें इंग्लंडचे दहा विभाग पाडून प्रत्येकांत एक कामकरी संस्था स्थापन करण्यांत येऊन तिनें वरील काम करावें असें ठरलें. यामुळें बेकारी कमी होण्यास मदत झाली. सन १९०८ मध्यें फौजदारी खटले चालविण्याकरितां एक मध्यवर्ती अपील कोर्ट स्थापन करण्यांत आलें.

३. राजकीय घडामोडी:—सन १९०८ मध्यें सातव्या एडवर्डनें फ्रान्सला पुन्हां भेट दिली व फ्रान्सच्या अध्यक्षानेंही इंग्लंडला भेट दिली. त्याचप्रमाणें इंग्लंडचा राजा व रशियाचा झार यांचीही भेट झाली. या भेटीप्रतिभेटीमुळें रशिया, इंग्लंड व फ्रान्स यांच्यामधील मैत्री दृढ होण्यास मदत झाली. त्याच वेळीं सातव्या एडवर्डनें जर्मनीचा बादशाह व ऑस्ट्रियाचा बादशाह यांच्याही भेटी घेतल्या. सन १९०९ मध्यें हिंदुस्थानकरितां मोर्ले-मिंटो सुधारणाकायदा पास करण्यांत आला. त्या कायद्यान्वयें हिंदी लोकांस कांहीं हक्क मिळाले; परंतु त्यामुळें त्यांचें समाधान झालें नाहीं. त्याच वर्षी दक्षिण-आफ्रिकेंतील वसाहतींचें संयुक्त सरकार स्थापन करण्यासंबंधीं कायदा पास करण्यांत आला व त्याची अंमलबजावणी सन १९१० सालीं झाली. सन १९०७ मध्यें ट्रान्सव्हाल व ऑरेंज फ्री स्टेट यांना स्वराज्य देण्यांत आलें होतेंच. त्यांचाही वरील संयुक्त संस्थानांमध्यें समावेश करण्यांत आला. मात्र ऱ्होडे-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिया वसाहत त्यांत सामील करण्यांत आली नाहीं. लॉर्ड ग्लॅडस्टन आफ्रिकेंतील संयुक्त सरकारचा पहिला गव्हर्नर जनरल झाला. स्त्रियांस मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून इंग्लंडमध्यें जी चळवळ चालली होती तिच्यातर्फे लंडनमधील हाइड पार्क नामक उद्यानांत एक मोठा समारंभ झाला.

४. लॉइड जॉर्जचें राष्ट्रीय अंदाजपत्रक :—ॲस्क्विथच्या मंत्रिमंडळानें ज्या सुधारणा केल्या त्यामुळें–विशेषतः पेन्शनची सोय व आरमाराची वाढ यांच्या योजनेमुळें–देशावर नवे कर लादून राष्ट्राच्या उत्पन्नांत भर घालणें आवश्यक होतें. तेव्हां ही गोष्ट लक्षांत घेऊन फडणीस लॉइड जॉर्ज यानें सन १९०९ च्या अंदाजपत्रकांत अनेक नवे कर सुचविले. त्याच्या अंदाजपत्रकाला 'राष्ट्रीय अंदाजपत्रक' असें म्हणतात. त्यांत प्राप्तीवरील कर वाढविण्यांत आला होता. वार्षिक पांच हजार पौंड व त्यापेक्षां जास्त उत्पन्न असलेल्या लोकांकडून जादा कर (सुपर टॅक्स) घेण्याचें व स्पिरिट, तंबाखू यांजवरील कर व गुत्त्यांची फी वाढविण्याचें सुचविण्यांत आलें होतें. जमीनदारांच्या प्रयत्नामुळें नव्हे, तर इतर गोष्टींमुळें जमिनींच्या किंमती वाढल्या होत्या. तेव्हां त्या वाढत्या किंमती लक्षांत घेऊन अशा जमिनीवर वाढलेल्या किंमतीच्या वीस टक्के कर घ्यावा असें सुचविण्यांत आलें; तसेंच कोळसा, लोखंड वगैरे खनिज पदार्थांच्या स्वामित्वाच्या हक्कांवरही कर बसविण्यांत आला. हे सर्व कर श्रीमंत लोकांकडून वसूल करण्यांत यावयाचे होते व त्यांचा फायदा गरीब लोकांस मिळावयाचा होता. म्हणूनच या अंदाजपत्रकाला 'राष्ट्रीय अंदाजपत्रक' असें म्हणतात. या अंदाजपत्रकाला कलाल, जमीनदार व श्रीमंत लोक या सर्वांनीं कसून विरोध केला. कांहींनीं त्याला 'खुनशी अंदाजपत्रक' म्हणूनही संबोधलें. खुद्द कॉमन्ससभेंत अनेकांनीं लॉइड जॉर्जला शिव्यांची लाखोली वाहिली, कांहींनीं त्याला जॅक केडप्रमाणें बंडखोर ठरविलें, तर कांहींनीं त्याला 'गांवगुंड' म्हणून हिणविलेंही. परंतु त्यानें डगमगून न जातां लॉइड जॉर्जनें आपल्या अंदाजपत्रकांत कोणताही फेरफार न करतां तें कॉमन्ससभेकडून पास करवून घेतलें. उमरावमंडळानें नेहमींचा रिवाज बाजूस सारून तें नापास करण्याचेंच ठरविलें. एकानें कॉमन्ससभेला 'मूठभर मूर्खांच्या हातांतील सभा' असा टोमणाही मारला. शेवटीं उमरावमंडळानें तें अंदाजपत्रक मोठ्या बहुमतानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नामंजूर केलें. ही गोष्ट कळतांच ॲस्क्विथनें 'उमरावमंडळानें घटनाभंग केला व कॉमन्ससभेचे सनदशीर हक्क लाटले' अशा अर्थाचा एक ठराव कॉमन्ससभेकडून पास करून घेऊन उमरावमंडळाचा निषेध केला. परंतु निषेध केला तरीही 'राष्ट्रीय अंदाजपत्रक' उमरावमंडळानें नापास केल्यानें पार्लमेंटची फेरनिवडणूक करून आपल्या कृत्यास मतदारांची अर्थात् राष्ट्राची संमति मिळविणें मंत्रिमंडळाला जरूर होतें. त्याप्रमाणें ॲस्क्विथनें राजीनामा दिला व पार्लमेंटची फेरनिवडणूक करविली (१९१०); त्यांत ॲस्क्विथचा लिबरलपक्ष बहुमतानें निवडून आला. ताबडतोब लॉइड जॉर्जनें आपलें राष्ट्रीय अंदाजपत्रक कॉमन्ससभेपुढें पुन्हां मांडलें. आयरिशपक्ष व मजूरपक्ष यांच्या पाठिंब्यामुळें तें पास झालें. पुढें उमरावमंडळानेंही तें पास केलें. नंतर त्याला राजाची संमतीही मिळाली. कॉमन्ससभा व उमरावमंडळ यांचा राष्ट्रीय अंदाजपत्रकासंबंधीं आर्थिक बाबतींतील हक्कांबद्दल वाद चालू असतांच सातवा एडवर्ड सन १९१० मध्यें मरण पावला व त्याचा एकुलता एक मुलगा पांचवा जॉर्ज इंग्लंडच्या गादीवर बसला.

५. पांचवा जॉर्ज (१९१०-१९३६):—पांचव्या जॉर्जचा जन्म सन १८६५ मध्यें झाला होता. त्याचें सर्व शिक्षण योग्य रीतीनें पार पडलें. सन १८७७ मध्यें आरमारी शिक्षणाकरितां त्याला पाठविण्यांत आलें व सन १८९० मध्यें तें पूर्ण झालें. सन १८९२ मध्यें त्याचा वडील भाऊ मृत्यु पावल्यानें इंग्लंडच्या गादीवर त्याचा वारसा सिद्ध झाला. तेव्हां त्यानें आरमारी नोकरी सोडली. सन १८९३ मध्यें टीकची राजकन्या मेरी हिच्याबरोबर त्याचें लग्न झालें. तो राज्यावर आला त्यावेळीं कॉमन्ससभा व उमरावमंडळ यांच्यामध्यें आर्थिक व राजकीय हक्कांबद्दल वाद चालू होता. त्यावेळीं त्यानें ॲस्क्विथच्या विनंतीस मान्यता देऊन 'पार्लमेंट ॲक्ट' पास होण्यास लागतील तितके नवे उमराव निर्माण

पांचवा जॉर्ज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्याची तयारी दाखविली व इंग्लंडमध्यें होणारी राज्यक्रांति वांचविली. सन १९११ मध्यें त्यानें हिंदुस्थानास भेट दिली व दिल्लीस मोठा दरबार भरवून बादशाही वस्त्रें स्वीकारिलीं. महायुद्धाच्या वेळीं त्यानें उत्कृष्ट कामगिरी बजाविली. त्यानंतरही इंग्लंडमध्यें सामाजिक, आर्थिक व राजकीय बाबतींत जीं अनेक वादळें उठलीं त्यांतून त्यानें आपल्या देशास सहीसलामत नेण्यांत जें कौशल्य व चातुर्य दाखविलें तें अपूर्व होय. राजा या नात्यानें आपल्या घराण्याची प्रतिष्ठा त्यानें वाढविली. त्याच्या आजीनें जें ध्येय व धोरण त्या बाबतींत ठरविलें होतें त्याप्रमाणें वागून त्यानें राजसत्ता लोकप्रिय केली. त्याचा चेहरा मोठा उमदा दिसे, त्याची छापही लोकांवर चटकन् पडे व त्याचें वक्तृत्वही प्रभावी ठरे.

राणी मेरी

तो लोकप्रिय होता. आपल्या प्रधानमंडळाला तो योग्य तोच सल्ला देई. सन १९३५ मध्यें त्याच्या राज्यारोहणाला पंचवीस वर्षें पूर्ण झाल्यानें लंडनला मोठा रजत महोत्सव करण्यांत आला. त्यावेळीं साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतील लोक लंडनला जमले होते. त्यावेळीं साम्राज्यसरकारबद्दल त्या सर्वांस किती जिव्हाळा वाटत होता तें दिसून आलें. तो सन १९३६ मध्यें मृत्यु पावला.

६. पार्लमेंट ॲक्ट (१९११)-कारणें :—पांचवा जॉर्ज राजा झाला त्यावेळीं देशांत राज्यक्रांतीची वावटळ उत्पन्न झाली होती. सन १९०९ चें राष्ट्रीय अंदाजपत्रक उमरावमंडळानें नापास केलें हें शल्य ॲस्क्विथ मंत्रिमंडळाला चांगलेंच झोंबलें होतें. सन १६८९ च्या राज्यक्रांतीच्या वेळेपासून राष्ट्राच्या आर्थिक कारभारावर कॉमन्ससभेचाच अधिकार चालू झाला होता. उमरावमंडळानें आर्थिक बिलांना नुसती संमति द्यावी, त्यांत दुरुस्त्या करूं नयेत, अशी त्या वेळेपासून रूढी पडली होती. त्या रूढीचा भंग आजपावेतों

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उमरावमंडळानें कधींही केला नव्हता. सन १८६१ मध्यें त्या बाबतींत उमरावमंडळानें थोडा हेका धरला होता हें खरें; तथापि एकंदरींत आर्थिक बाबतींत कॉमन्ससभेचे अधिकारच मान्य करण्यांत येत. इतर बिलांच्या बाबतींतही उमरावमंडळानें कॉमन्ससभेनें पास केलेलीं बिलें नापास करण्याचें धोरण स्वीकारलें होतें व त्यांस अनुसरून सन १९०६ मध्यें शिक्षणाचें बिल, एकाच वेळीं अनेक मतें देण्यास विरोध करणारें बिल, पुन्हां सन १९०८ चें शिक्षणाचें बिल वगैरे बिलें कॉमन्ससभेनें पास केलीं असतांही उमरावमंडळानें तीं फेंटाळून लाविलीं होतीं. तेव्हां एखादें बिल फेंटाळून लावण्याच्या उमरावमंडळाच्या अधिकारास वेळींच आळा घातला नाहीं तर परिणाम ठीक होणार नाहीं असें मंत्रिमंडळास वाटूं लागलें. अर्थात् उमरावमंडळ कॉमन्स-सभेला नेहमीं अडथळे करूं लागल्यानें राज्यघटनेचा प्रत्येक वेळीं भंग होतो, तो होऊं देणें योग्य नव्हतें. उमरावमंडळाला कॉमन्ससभेनें पास केलेलीं बिलें नापास करतां येतात, त्यांत सुधारणा सुचवितां येतात व वेळेनुसार एखादें बिल फेंटाळूनही लावतां येतें; परंतु आपल्या या अधिकारांचा त्या मंडळानें योग्य-रीतीनें उपयोग न करतां मन मानेल तसा त्यांचा उपयोग केला तर पार्लमेंटच्या दोन्ही सभांमध्यें खटके उडाल्याशिवाय कसे राहणार? तेव्हां ही स्थिति सुधारण्याकरितां उमरावमंडळाच्या वरील अधिकारांस नियंत्रण घालून ते मर्यादित करण्याशिवाय गत्यंतर नाहीं असें ॲस्क्विथच्या मंत्रिमंडळानें ठरविलें. त्याच सुमारास सातवा एडवर्ड मेल्यानें हें काम थोडें दिरंगाईवर पडलें होतें. परंतु पुढें सन १९१० मध्यें त्या प्रश्नाची चर्चा करण्याकरितां सर्वपक्षीयांची एक सभाही भरविण्यांत आली; परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. तेव्हां ॲस्क्विथनें राजीनामा दिला व उमरावमंडळाच्या 'अधिकारावर नियंत्रण घालणें' असें आपलें धोरण जाहीर करून त्यानें नवी निवडणूक लढविली. त्यांत त्याचा पक्ष यशस्वी झाला व त्यानें ताबडतोब 'पार्लमेंट ॲक्ट' कॉमन्ससभेपुढें सन १९११ मध्यें मांडून तो पास करून घेतला. परंतु त्याला कायदेशीर स्वरूप प्राप्त होण्याकरितां उमरावमंडळाची संमति पाहिजे होती; पण ती मिळणार कशी?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. पार्लमेंट ॲक्ट (१९११):—कॉमन्ससभेनें पार्लमेंट ॲक्ट पास केला त्यांत खालील गोष्टी होत्या. (१) पैशासंबंधींचें बिल नापास करण्याचा उमरावमंडळाला अधिकार नसावा. (२) पैशाचें बिल कोणतें तें ठरविण्याचा अधिकार कॉमन्ससभेचा अध्यक्ष ऊर्फ स्पीकर याला असावा. (३) कॉमन्ससभेनें पास केलेलें कोणतेंही पैशांचें बिल उमरावमंडळानें एका महिन्यांत पास करावें. त्यानें तसें केलें नाहीं तर त्या बिलाला राजाची संमति घेऊन तें पास झालें असें समजावें. (४) पैशाच्या बिलाशिवाय इतर बिलें कॉमन्ससभेनें आपल्या निरनिराळ्या तीन बैठकींत पास केलीं व उमरावमंडळानें त्याला आपली संमति जरी दिली नाहीं, तरी त्यांना कायद्याचें स्वरूप प्राप्त व्हावें. कोणतेंही बिल उमरावमंडळाला दोनच वर्षें थोपवून धरतां यावें. (५) कॉमन्ससभेच्या प्रत्येक सभासदाला वार्षिक चारशें पौंड पगार मिळावा. (६) कॉमन्ससभेची मुदत पांच वर्षांची असावी. हें बिल कॉमन्ससभेनें पास करून उमरावमंडळाच्या संमतीकरितां पाठविलें; परंतु तेथें तें पास होईलच अशी खात्री नसल्यानें मुख्य प्रधान ॲस्क्विथ यानें तें बिल उमरावमंडळांत पास होण्यास लागतील तितके उमराव बनविण्याची धमकी दिली व तिला राजाचीही संमति मिळविली. तरीही उमरावांनीं त्या बिलाला अनेक पुस्त्या जोडल्या, त्याचा फेरविचार व्हावा म्हणून सुचविलें, खुद्द उमरावमंडळाची घटनाही बदलावी असें सुचविलें; परंतु त्या सर्वांचा कांहीं उपयोग होत नाहीं असें पाहून अखेरीस तें बिल उमरावमंडळानें पास केलें. तें बिल पास झाल्यानें कॉमन्स सभेच्या हातीं खरी राजसत्ता आली; पूर्वीच्या मानानें उमरावमंडळाचा अधिकार नियंत्रित पण निश्चित झाला. प्रधानमंडळाचें महत्त्व वाढलें व स्पीकरवर महत्त्वाची जबाबदारी पडली. या दृष्टीनेंच या कायद्याला ब्रिटिश राज्यघटनेंत अत्यंत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें.

८. प्रधानमंडळाची इतर कामगिरी:—पार्लमेंट ॲक्ट पास झाल्यानें ॲस्क्विथच्या प्रधानमंडळास आणखी हुरूप आला व त्यानें इतर अनेक लोकोपयोगी कामें करण्यास सुरुवात केली. सन १९११ त पार्लमेंटमध्यें 'विमाबिल' मांडण्यांत आलें. आजारपण व बेकारी उत्पन्न झाल्यास मजुरांना पैसा मिळत नसे व त्यामुळें त्यांची कुचंबणा होई. तेव्हां त्यांच्याकरितां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा कायदा पास करण्यांत आला. ज्यांचें उत्पन्न एकशेंसाठ पौंडांपेक्षां कमी आहे, अशा मजुरांनीं विमा उतरावा, मात्र विम्याचे हप्ते कारखानदार, सरकार व मजूर या सर्वांनीं मिळून भरावे असें ठरलें. ज्यावेळीं मजुरांना पैशाची जरूरी लागेल त्यावेळीं त्यांना या पैशाचा उपयोग करतां यावा हा मुख्य हेतु होता. सन १९११ मध्यें, पार्लमेंट ॲक्ट पास होण्याच्या थोडें अगोदर, पार्लमेंटच्या सभासदांस दरसाल चारशें पौंडांचा तनखा असावा असा कायदा पास करण्यांत आला होता. त्याच सालीं रेल्वेमजुरांनीं दुसरा मोठा संप केला; परंतु तोही लॉइड जॉर्जच्या मध्यस्थीनें मिटविण्यांत आला. सन १९१३ मध्यें वेल्श धर्मखातें स्वतंत्र करण्याबद्दल पार्लमेंटनें कायदा पास केला. सन १९१२ सालीं आयर्लंडला स्वराज्य देण्याच्या हेतूनें पार्लमेंटमध्यें ‘होमरूल बिल’ मांडण्यांत आलें व तें पास झालें. तसेंच एकाच वेळीं अनेक मतदारसंघांतर्फे मत देण्याचा अधिकार रद्द करणारें बिलही पार्लमेंटनें पास केलें. या तिन्ही बिलांस उमरावमंडळानें संमति दिली नाहीं. त्यामुळें कॉमन्ससभेला तीं पुन्हां पास करावीं लागलीं व त्यानंतरच त्या बिलाला उमरावमंडळानें आपली मान्यता दिली.



पाणबुडी १९१२

९. बाल्कन युद्ध (१९१२–१३):—सन १८७८ च्या बर्लिनच्या परिषदेनंतर बाल्कन संस्थानांपैकीं बल्गेरिया हें राष्ट्र एकदम पुढें आलें. त्याचवेळीं ऑस्ट्रियाचा डोळा बाल्कन संस्थानांवर होता. ऑस्ट्रियामध्यें स्लाव्ह जातीचे लोक होते व त्यांची कड ऑस्ट्रियाचा युवराज आर्च ड्यूक फर्डिनंड घेत असे. त्यानें एका स्लाव्ह स्त्रीशीं लग्नही केलें होतें. त्याच्या वजनामुळें व खटपटीमुळेंच बॉस्निया व हर्झेगोव्हिना हे दोन प्रांत ऑस्ट्रि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यानें आपल्या राज्यांत सामील करून घेतले (१९०८). ते दोन्ही प्रांत तुर्कस्थानच्या अधिराज्याखालीं मोडत होते; परंतु त्याच वेळीं 'तरुण तुर्कांच्या' बंडाचा मोड करण्यांत तुर्कस्थानचा सुलतान गुंतल्यानें त्याला ऑस्ट्रियाच्या आक्रमणाविरुद्ध कांहीं करतां आलें नाहीं. या प्रकरणामुळें ऑस्ट्रिया व जर्मनी यांचें चांगलेंच सूत जमलें. मात्र सर्व बाल्कन संस्थानांना ऑस्ट्रियाच्या आक्रमणाची भीति वाटूं लागली. त्यामुळें सन १९१२ मध्यें सर्व्हिया, ग्रीस, बल्गेरिया व मॉटेनीग्रो या राष्ट्रांनीं एक संघ निर्माण केला. त्या अन्वयें ऑस्ट्रियानें सर्व्हियावर हल्ला केल्यास बल्गेरियानें सर्व्हियाला दोन लक्ष सैनिकांची मदत करावी असें ठरलें होतें. तसेंच त्या संघानें तुर्कस्थानला पत्र लिहून मॅसिडोनियांतील लोकांस नीट वागवावें व त्या देशांत सुधारणा करावी असें कळविलें. परंतु आपल्या नेहमींच्या दिरंगाईच्या वृत्तीस अनुसरून तुर्कस्थाननें त्याकडे कानाडोळा केला व मॅसिडोनियांतील लोकांची कांहीं कारणावरून कत्तल केली. त्याचा राग येऊन बाल्कन संघांतील लोकांनीं बाल्कन राष्ट्रांच्या सरहद्दी ठरविण्यांत याव्या असें तुर्कस्थानला पुन्हां सुचविलें. ती मागणीही तुर्कस्थाननें झिडकारिली व त्यामुळें युद्ध सुरू झालें (१९१२). त्या युद्धांत तुर्कस्थानचा संपूर्ण पराभव झाला व युरोपांतील त्याचें बहुतेक सर्व राज्य त्याच्या शत्रूंनीं काबीज करून घेतलें. तेव्हां इंग्रज परराष्ट्रमंत्रि सर एडवर्ड ग्रे यानें मध्यस्थी करून बाल्कन मुत्सद्यांची लंडन येथें एक परिषद भरवावी, तिच्यापुढें सर्व प्रश्नांचा विचार व्हावा व त्याप्रमाणें तह व्हावा असें सुचविलें. ग्रेची सूचना सर्वांस मान्य झाल्यानें सन १९१३ मध्यें लंडनला परिषद भरली (१९१३) व त्यांत ठरल्याप्रमाणें कॉन्स्टॅंटिनोपलच्या आसपासचा भाग आपल्याकडे ठेवून युरोपांतील बाकी सर्व प्रदेश तुर्कस्थाननें बाल्कन राष्ट्रांच्या हवालीं करावा असें ठरलें. त्याला तुर्कस्थाननें मान्यता दिली. मात्र त्यामुळें जास्त प्रदेश मिळविण्याकरितां बाल्कन राष्ट्रांत अहमहमिका लागून त्यांच्यांत युद्ध माजलें. शेवटीं सन १९१३ मध्यें त्यांच्यांत बुखारेस्ट येथें तह होऊन तें युद्ध संपलें. त्या युद्धानें जर्मनी व ऑस्ट्रिया यांचें बाल्कन संस्थानांमध्यें प्रस्थ माजण्यास संधि मिळाली व सर्व्हिया व बल्गेरिया यांचें सामर्थ्य कमी झालें. सर्व्हियाला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बराच प्रदेश मिळाला. त्यामुळें त्याचें व ऑस्ट्रियाचें वितुष्ट आलें व त्या राष्ट्राचा सर्व नाश करण्याच्या संधीची ऑस्ट्रिया वाट पहात बसला. बल्गेरियाचा बराचसा मुलुख गेल्यानें तो देश नाराज झाला व तो इंग्लंडवर रागावला. आगामी युद्धाचें बीज या बाल्कन युद्धांत बरेंच होतें. तुर्कस्थानची युरोपांतील सत्ता कायमची नष्ट झाल्यानें जर्मनीनें त्या देशाला घेरण्यास व तुर्की दरबारांतील इंग्रजांचें वर्चस्व नष्ट करण्यास सुरुवात केली.

१०. ॲस्क्विथच्या मंत्रिमंडळाचें कार्य:—एकंदरींत पाहतां ॲस्क्वि-

राजकुटुंब १९१३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थच्या मंत्रिमंडळानें मोठ्या धडाडीनें काम केलें यांत शंका नाहीं व त्यांत त्याला अपूर्व असें यशही प्राप्त झालें. उमरावमंडळाच्या अधिकाराचें नियंत्रण, पेन्शनची योजना, मजुरांच्या हितार्थ केलेल्या योजना, विम्याची पद्धति, त्याचें नाविन्यपूर्ण आर्थिक धोरण, आरमार व लष्कर यांची सुधारणा वगैरे गोष्टी अत्यंत स्मरणीय झाल्या. परंतु शिक्षणाच्या बाबतींत जास्त सुधारणा करण्याचें ठरवूनही त्या मंत्रिमंडळाला कांहीं करतां आलें नाहीं. दरसाल करांचें ओझें एकसारखें वाढतच होतें व त्याखालीं लोक भरडले जात होते. भांडवलशाहीला ऊत आला होता व त्यामुळें कारखानदार व मजूर यांच्यामध्यें तंटेबखेडे एकसारखे चालत होते. मजुरांनीं अनेकदां संपाची भीति दाखवून व एकदोनदां प्रत्यक्ष संप करून आपला प्रभाव सरकारला दाखविला होता. पेन्शनची सोय, विम्याची पद्धति वगैरे गोष्टी होऊनही मजुरांची स्थिति सुधारलेली नव्हती. स्त्रियांस मतदानाचा अधिकार मिळाला नव्हता व तो मिळविण्याकरितां 'सफ्रेजेट' स्त्रियांनीं इंग्लंडमध्यें जोरानें चळवळ चालविली होती. या सर्व गोष्टींवरून इंग्लंडमध्यें किती असंतोष माजला होता हें दिसून येईल. या सर्व गोष्टींचा फायदा शत्रूंनीं घ्यावयाचें ठरविलें होतें. युरोपांत आगामी युद्धाचे ढग जमूं लागले होते व त्यामुळें युद्धाचा वणवा केव्हां पेटेल तें कोणालाही सांगतां येणें शक्य नव्हतें. तरीही अनेक प्रकारच्या सुधारणा करून इंग्लंडनें त्या युद्धास तोंड देण्याकरितां या काळांत पुरेपूर तयारी केली होती यांत मात्र शंका नाहीं आणि त्याचें बरेंचसें श्रेय ॲस्क्विथ-मंत्रिमंडळास देणें योग्यच ठरणार आहे.

अभ्यास

१. ॲस्क्विथच्या मंत्रिमंडळाची कामगिरी थोडक्यांत सांगा.

२. सन १९११ चा पार्लमेंट ॲक्ट पास होण्यास कोणती परिस्थिति कारणीभूत झाली ? त्या बिलांतील कलमें व त्यांचें महत्त्व सांगा.

३. उमरावमंडळ व कॉमन्ससभा यांच्यामध्यें खटके उडण्याचें कारण काय ? त्याचा परिणाम काय झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. लॉइड जॉर्जच्या राष्ट्रीय अंदाजपत्रकाचें वर्णन करा. त्याचें महत्त्व सांगून त्यामुळें कोणती परिस्थिति निर्माण झाली तें सांगा.

५. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा:—
मुलांसंबंधीं कायदा, पेन्शनचा कायदा, विम्याचा कायदा, आफ्रिकेंतील संयुक्त सरकार, बुखारेस्टचा तह, राष्ट्रीय अंदाजपत्रक, पार्लमेंट ॲक्ट १९११.

६. बाल्कन संस्थानांत युद्ध कां निर्माण झालें? त्याचा परिणाम काय झाला?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१५. युरोपांतील महायुद्ध [१९१४ – १९१८]

१. जर्मनीची महत्त्वाकांक्षा :—एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस जर्मन राष्ट्र साम्राज्यशाहीच्या मदानें भारून गेलें होतें. साम्राज्याची वाढ व्हावयाची असेल तर युरोपच्या बाहेरील प्रांत व वसाहती काबीज करणें जर्मनीला जरूरीचें होतें. प्रिन्स बिस्मार्क जर्मनीचा मुख्य प्रधान असतां त्यानें प्रथमतः साम्राज्यशाहीचें वेड जर्मनांच्या मनांत भरवून दिलें होतें व ‘ आपलें धोरण यशस्वी व्हावयाचें असेल तर तें पार्लमेंटच्या कायद्यांनीं नव्हे, तर तलवार व रक्तपात यांच्या जोरावर ’ असें त्यानें सर्वांस बजाविलें होतें. दुसरा विल्यम कैसर सन १८८८ सालीं जर्मनीचा बादशाह झाला. त्यानें बिस्मार्कचेंच धोरण उचलून धरलें व तें यशस्वी करावयाचें असेल तर आपल्याला आक्रमक धोरण स्वीकारल्याशिवाय भागावयाचें नाहीं असें तो म्हणे. साम्राज्य वाढवावयाचें असल्यास आरमार सामर्थ्यसंपन्न पाहिजे हें त्यानें ओळखलें होतें व म्हणूनच त्यानें आपल्या आरमाराची वाढ इतक्या झपाट्यानें केली कीं, थोड्याच दिवसांत तें सर्व जगांत दुसऱ्या प्रतीचें समजलें जाऊं लागलें. जर्मनीचें लष्कर सर्वोत्तम होतेंच. त्याच्या जोडीला आरमारही उत्तम झाल्यानें कैसरला जोर चढला. लगेच त्यानें ऑस्ट्रियाशीं मैत्री संपादन केली, तुर्कस्थानला हाताशीं धरलें व त्याच्या परवानगीनें बर्लिन–बगदादपर्यंत आगगाडीचा रस्ता पुरा करण्याचा घाट घातला. सन १८९५ मध्यें खोदवून तयार केलेला कालवा बेडर जहाजांसही जाण्यास योग्य व्हावा म्हणून जास्त खोल व रुंद केला, जर्मनांना उत्तम प्रकारचें लष्करी शिक्षण देण्यास सुरुवात केली, शस्त्रास्त्रांचे अगणित कारखाने देशांत सुरू ठेवून शस्त्रास्त्रांची निपज अनेक पटींनीं वाढविली व अशा तऱ्हेनें त्यानें युद्धाच्या दृष्टीनें आपली कडेकोट तयारी केली. खुद्द जर्मनांनाही त्यानें नुसतें भारून टाकलें. इतकें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कीं त्यांना एक प्रकारचा लष्करी मद चढल्यासारखा दिसत होता ! त्याच वेळीं नीत्शेसारखे तत्त्वज्ञानी 'युद्धामुळेंच सर्व गोष्टींची सिद्धी होते' असें सांगत होते, ट्रीटस्कीसारखे इतिहासज्ञ कैसरचें तत्त्वज्ञान उचलून धरीत होते व बर्नहार्डीसारखे युद्धशास्त्रज्ञ लेखक जर्मनीच्या धोरणाचा उदो उदो करीत होते. सर्व शाळा-कॉलेजांतून जर्मनीच्या ध्येयाला पोषक होईल असेंच शिक्षण देण्यांत येत होतें. जर्मनीला पहिल्या प्रतीचें राष्ट्र बनविण्याच्या कल्पनेच्या बुडाशीं जर्मनीची जबर साम्राज्यतृष्णा होती व तिच्या पोटींच इंग्लंडचा द्वेष व त्याच्या व्यापाराचा व साम्राज्याचा नाश करण्याची बळकट इच्छा होती हें विसरून चालणारें नव्हतें.



झेपेलिनची लंडनवर भरारी दाखविणारें जर्मन पदक : कौंट झेपेलिन व दुसरी बाजू, सन १९१५ मध्यें झेपेलिननें लंडनवर केलेला हल्ला.

२. इंग्लंड व जर्मनी यांची तेढ :—इंग्रजांबद्दलचा जर्मनांचा द्वेष इंग्रजांच्या दृष्टींतून सुटलेला नव्हता. विल्यम कैसर इंग्लंडचा मित्र नव्हता तसा शत्रूही नव्हता. आपल्या इच्छेच्या पूर्तीच्या आड इंग्लंड आल्याशिवाय राहणार नाहीं हें त्यानें ओळखलें होतें. आपल्या हेतूंच्या सिद्ध्यर्थ इंग्लंडशीं आपल्याला दोन हात करावे लागतील हेंही तो जाणून होता व म्हणून त्यानें आपलें आरमार इंग्लंडच्या आरमाराच्या तोडीस तोड म्हणून सज्ज ठेवण्याचा उपक्रम चालविला होता. बाल्कन संस्थानांत व तुर्कस्थानच्या दरबारांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्रजांचें वर्चस्व हाणून पाडण्याकरितांच त्यानें तुर्कस्थानला आपल्या पाठीशीं घातलें व बर्लिन–बगदाद आगगाडीसंबंधीं त्यानें त्याच्याकडून अनेक सवलती मिळविल्या. इंग्लंडला या सर्व गोष्टी माहीत होत्या व जर्मनीचे हेतु त्यानें बरोबर ओळखले होते. बोअर युद्धाच्या वेळीं आपल्याविरुद्ध कैसरनें क्रूगरला मदत करण्याचें ठरविलें होतें हें इंग्लंड विसरलें नव्हतें; तेव्हां आज ना उद्यां आपल्याला जर्मनीशीं युद्ध करावें लागेल हेंही इंग्लंडनें ताडल्यामुळेंच त्यानें आपलें आरमार वाढविलें, सैन्याची पुनर्रचना करून तें सुसज्ज केलें, शस्त्रास्त्रांचा भरपूर पुरवठा केला व भावी संकटास तोंड देण्याची तयारी चालविली; आणि इंग्लंडनें हें केलें नसतें तर त्याच्या साम्राज्यास धोका पोचला असता, त्याचा व्यापार नष्ट झाला असता व त्याचें श्रेष्ठ स्थान नाश पावलें असतें. तसेंच बोअर युद्धाच्या वेळेपासूनच इंग्लंड एकाकी राहिलें होतें. आपल्याला एखादें मित्रराष्ट्र असावें या हेतूनेंच मागें सांगितल्याप्रमाणें त्यानें सन १९०४ मध्यें फ्रान्सशीं व सन १९०७ मध्यें रशियाशीं मैत्रीचे तह करून ठेविले होते. या सर्व गोष्टींमुळेंच इंग्लंडला जर्मनीशीं दोन हात करतां आले.

३. फ्रान्स व जर्मनी :—सन १८७० पासूनच जर्मनी व फ्रान्स या दोन देशांत अखंड वैर निर्माण झालें होतें. जर्मनीनें पराभव करून फ्रान्सकडून आल्सेस व लोरेन प्रांत व पांच अब्ज फ्रँकांची (सुमारें वीस कोट रुपये) खंडणी वसूल केली होती. हें शल्य फ्रान्सच्या मनांत सलत होतेंच व त्या गोष्टीचा सूड घेण्याची संधि फ्रान्स शोधीत होता. तशांतच सन १९०४ मध्यें मोरोक्कोमध्यें फ्रान्स आपलें बस्तान बसवीत असतां कैसर तेथें गेला व त्यानें मोरोक्कोच्या लोकांस स्वातंत्र्यावर एक व्याख्यान पाजलें ! या गोष्टीनें युरोपला आश्चर्य वाटलें. फ्रान्स व इंग्लंड यांना भीति उत्पन्न झाली. त्यामुळें मोरोक्कोचें स्वातंत्र्य मान्य करण्यांत आलें. तरीही त्याला फ्रान्सची मदत घ्यावी लागली. तेव्हां कैसरनें सन १९११ मध्यें ‘ पँथर ’ नांवाचें एक सशस्त्र जर्मन जहाज व ‘ बर्लिन ’ नांवाचें एक क्रूझर मोरोक्कोकडे पाठवून दिलें व जर्मनीच्या महत्त्वाकांक्षेची व सामर्थ्याची चुणूक सर्वांस दाखविली. या कृत्यानें सर्व युरोपला मोठाच धक्का बसला. इंग्लंडनें त्या गोष्टीचा ताबडतोब निषेध केला व लढा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ईची भाषा सुरू केली. त्याबरोबर कैसर चपापला. कारण त्याला फ्रान्स व इंग्लंड यांच्याशीं एकदम लढावयाचें नव्हतें. या प्रकरणामुळें फ्रान्ससंबंधीं जर्मनीचें धोरण कोणत्या प्रकारचें होतें हें चटकन् ध्यानांत येईल.

४. युरोपांतील दोन तट :—युरोपांतील राजकारणांत कोणत्या प्रकारचे वारे वाहत होते हें वरील वर्णनावरून दृष्टोत्पत्तीस येण्यासारखें आहे. आज ना उद्यां युरोपमध्यें महायुद्ध भडकणार असें प्रत्येक राष्ट्राला कळून चुकलें होतें. त्यामुळें युरोपियन राष्ट्रांत चळवळ सुरू झाली होती, फ्रान्स व जर्मनी एकमेकांचे वैरी होते, ऑस्ट्रिया व रशिया यांच्यामध्यें बाल्कन राष्ट्रांतील वर्चस्वाकरितां चुरस लागून राहिली होती व इंग्लंड व जर्मनी यांच्यामध्यें व्यापार, वसाहती, साम्राज्य व नाविकसत्ता यांच्याबद्दल तेढ माजून राहिली होती. थोडक्यांत म्हणजे युरोपियन राष्ट्रांस असंतोष, अस्वस्थता, हेवा, मत्सर, द्वेष व सूड यांनीं पूर्णपणें ग्रासून टाकलें होतें. तशांतच युरोपांत दोन मोठे तट पडलेले दिसत होते. पहिला मोठा तट इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांचा होता व दुसरा तट जर्मनी, ऑस्ट्रिया व इटली या राष्ट्रांचा होता. बाल्कन संस्था-नांतही तट होतेच. रशियानें सर्व्हिया व इतर स्लाव्ह लोकांचा पाठपुरावा केल्यानें ऑस्ट्रियाचा रशियावर दांत होता. सर्व्हियावरही ऑस्ट्रियाचा डोळा होता व वेळेनुसार तें राष्ट्र पादाक्रांत करण्याचा ऑस्ट्रियाचा उद्देश होता. त्यामुळें सर्व्हिया रशियावर अवलंबून होता. जर्मनीनें तुर्कस्थानला आपलेंसें करून ठेवलें होतें. बल्गेरियाचा ओढाही जर्मनीकडे होता. एकंदरींत पाहतां युरोपांत स्वास्थ्य नांदणेंच कठीण होतें. भावी युद्धाच्या ज्वाला केव्हां भडक-णार त्याची प्रत्येकजण वाट पहात होता. शेवटीं ती संधि आली व महायुद्धाचा वणवा सर्व युरोपभर पेटून त्याच्या ज्वाळांचे चटके सर्व जगाला बसले.

५. आर्चड्यूक फर्डिनंडचा खून (१९१४) :—वर वर्णन केल्याप्रमाणें युरोपची स्थिति असतांच बॉस्नियाची राजधानी सॅराजेव्हो या शहरीं ऑस्ट्रियाचा युवराज आर्चड्यूक फर्डिनंड याचा त्याच्या पत्नीसह एका माथेफिरूनें भररस्त्यांत गाडीमध्यें खून केला (२८ जून, १९१४). त्या कृत्यानें ऑस्ट्रियाला भयंकर संताप आला. हा खून सर्व्हियाच्या फुसलावणीनें झाला असें समजून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऑस्ट्रियानें सर्व्हियाकडे एक निर्वाणीचा खलिता पाठवून त्याचें फक्त अठ्ठेचाळीस तासांत उत्तर मागितलें (२३ जुलै, १९१४). त्या खलित्यांत ऑस्ट्रियानें खालील मागण्या केल्या होत्या. (१) ऑस्ट्रिया सांगेल त्या अधिकाऱ्यांस सर्व्हियानें कामावरून काढून टाकावें. (२) फर्डिनंडच्या खुनाचा तपास करण्यास सर्व्हियानें ऑस्ट्रियाला मदत करावी. (३) ऑस्ट्रियाला विरोधी अशी सर्व्हियांतील चळवळ सर्व्हियानें हाणून पाडावी व त्या चळवळींत असणाऱ्यांस कडक शासन करण्यांत यावें. वेळ थोडा असल्यानें उत्तराची मुदत वाढवावी अशी सर्व्हियानें ऑस्ट्रियाला विनंति केली; परंतु ती झिडकारण्यांत आली. अठ्ठेचाळीस तासांची मुदत संपल्यावर ऑस्ट्रियानें सर्व्हियावर लष्कर पाठवून युद्धास तोंड पाडलें (२८ जुलै, १९१४). सर्व्हियाच्या मदतीला येण्याचें रशियानें वचन दिलें होतें. त्याप्रमाणें रशियानें आपल्या लष्कराची जमवाजमव सुरू केली. ही बातमी कळतांच जर्मनीनें १ ऑगस्ट रोजीं रशियाविरुद्ध युद्ध पुकारलें व रशियाचा मित्र म्हणून फ्रान्सवर झडप घातली. मध्यंतरींच्या काळांत युद्ध थांबावें व युरोपांत शांतता नांदावी म्हणून इंग्लंडचा परराष्ट्रमंत्रि सर एडवर्ड ग्रे यानें अत्यंत खटपट केली; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. उलट जर्मनीनें ब्रिटिश जहाजें पकडण्यास सुरुवात केली व २ ऑगस्ट रोजीं बेल्जमला निर्णायक खलिता पाठवून त्या देशांतून फ्रान्सकडे जाण्यास खुला मार्ग मागितला. तेव्हां बेल्जमकडून उत्तर न आल्यानें आंतरराष्ट्रीय करार धुडकावून देऊन जर्मनीनें बेल्जमवर स्वारी केली (४ ऑगस्ट, १९१४).

६. इंग्लंड युद्धांत कां पडलें :—जर्मनीनें बेल्जमवर स्वारी केल्याचें कळतांच इंग्लंडला संताप आला. सन १८३९ च्या तहाप्रमाणें बेल्जमचें स्वातंत्र्य व त्याचा तटस्थपणा अबाधित राखण्याबद्दल सर्व युरोपियन राष्ट्रांनीं मान्यता दिली होती व त्या तहावर जर्मनी व ऑस्ट्रिया या राष्ट्रांनींही सह्या करून त्या राष्ट्राचें स्वातंत्र्य रक्षण करण्याची हमी दिली होती. परंतु या वेळीं जर्मनीनें आपला शब्द मोडून वचनभंग केला होता. त्या तहाला ‘ कागदाचें चिटोरें ’ समजून जर्मनीनें तो तह लाथाडून दिला ! यामुळें इंग्लंडला जर्मनीबद्दल तीव्र संताप उत्पन्न झाला. तावडतोब इंग्लंडनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४ ऑगस्ट रोजीं सकाळीं ११ वाजतां जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें. जर्मनीविरुद्ध इंग्लंडनें युद्ध पुकारतांच कैसरला आश्चर्य वाटलें. इंग्लंड तटस्थ राहील अशी त्याची कल्पना होती. कारण त्यावेळीं इंग्लंडची व इंग्लिश साम्राज्याची स्थिति अत्यंत वाईट होती. इंग्लंडांत मजुरांमध्यें असंतोष माजला होता व त्यामुळें तेथें संपास ऊत आला होता, ब्रिटिश सैन्य छोटेंच होतें व जर्मन सैन्याच्या मानानें तें कस्पटासमान होतें अशी कैसरची कल्पना होती. आयर्लंडमध्यें होमरूलची चळवळ जोरांत चालू असून तेथें बंड केव्हां निर्माण होईल हें सांगणें कठीण होतें. साम्राज्याच्या भागांतून ब्रिटनला मदत मिळणार नाहीं असें जर्मनीला वाटत होतें. हिंदुस्थानांत राष्ट्रीय चळवळ जोरांत होती, दक्षिण आफ्रिका साम्राज्यांतून फुटून जाऊं पहात होती, ऑस्ट्रेलिया लांब असल्यानें त्याची मदत इंग्लंडला लवकर मिळणार नाहीं असें कैसर समजत होता. तेव्हां इंग्लंडनें युद्ध पुकारतांच त्याला आश्चर्य वाटलें यांत नवल नाहीं. प्रथम फ्रान्स व रशिया यांचा निःपात केल्यावर इंग्लंडकडे मग सावकाश पाहतां येईल असा जर्मनीचा बेत होता. परंतु तो फसला.

७. युद्धमान पक्ष व युद्धक्षेत्रें :—या युद्धांत दोन प्रमुख पक्ष होते. एक जर्मनीचा व दुसरा दोस्तांचा. जर्मनीच्या बाजूच्या पक्षांत ऑस्ट्रिया, जर्मनी, तुर्कस्थान हीं राष्ट्रें होतीं व पुढें बल्गेरिया हें राष्ट्र त्या पक्षांत सामील झालें (१९१५). दोस्तांच्या पक्षांत इंग्लंड, फ्रान्स, बेल्जम, रशिया व सर्व्हिया हीं राष्ट्रें प्रथम होतीं व नंतर जपान, इटली, रुमेनिया व अमेरिका हीं राष्ट्रें त्या पक्षांत सामील झालीं. इंग्लिश साम्राज्यांतील सर्व राष्ट्रांनीं इंग्लंडला भरपूर मदत केली. एवढेंच नव्हे, तर इंग्लिश सरकारला मदत करण्याच्या बाबतींत त्या सर्व राष्ट्रांत अहमहमिका लागलेली होती. पैसा, सैन्य, जहाजें, विमानें, अन्नसामुग्री, युद्धोपयोगी जिनसा वगैरेंची मदत साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतून इंग्लंडकडे एकसारखी येत होती. त्यामुळें त्यांची इंग्लंडबद्दलची आपुलकी दिसून आली. एवढेंच नव्हे, तर इंग्लंड व त्याचें साम्राज्य यांना एकत्र व एकजीव करणारें महायुद्ध म्हणजे एक इष्टापत्तीच समजली जाऊं लागली. मार्शल फॉश हा दोस्तांचा मुख्य सेनापति होता व सर जॉन फ्रेंच, अर्ल हेग हे पश्चिम आघाडीवर त्याला मदत करीत होते. अर्थात् पश्चिम आघाडी हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या युद्धाचें प्रमुख रणक्षेत्र समजलें जाई. पूर्व आघाडीवर दोस्तांचें सैन्य नव्हतें. तेथें जर्मनी व ऑस्ट्रिया यांच्या सैन्याबरोबर रशिया व सर्व्हिया यांचें सैन्य लढत होतें. त्याशिवाय तुर्कस्थान, पॅलेस्टाईन, मेसापोटेमिया वगैरे भागांत रणक्षेत्रें उत्पन्न झालीं होतीं. या भागांत अलेन्बी व मॉड हे इंग्रज सेनापति होते. समुद्रावर इंग्लंडची सत्ता होती; परंतु ती आपल्या नव्या

सन १९१४: महायुद्धाच्या वेळचें एक जर्मन पदक. हिंडेनबुर्ग–दुसरी बाजू जर्मन योद्धा

आरमारच्या मदतीनें नष्ट करतां येईल असा जर्मनीला विश्वास होता. त्यामुळें त्या दोन देशांच्या आरमारामध्यें समुद्रावर ठिकठिकाणीं आरमारी युद्धें होत होतीं. शस्त्रास्त्रांच्या दृष्टीनें पाहतां या युद्धांत तोफा, बाँब, रणगाडे, झेपेलिन विमानें, पाणबुड्या, बेडर जहाजें, विनाशिका, क्रूझरें, पाणसुरुंग, टॉर्पेडो, विषारी धूर, गॅसचे मुखवटे वगैरे अनेक साधनांचा उपयोग दोन्ही पक्षांकडून एकसारखा होत होता. या युद्धाइतकें संहारक युद्ध पूर्वी झालेंच नव्हतें. जगांतील बहुतेक सर्व देश या युद्धांत सामील झाल्यानें या युद्धाला जागतिक महायुद्ध असेंही म्हणतात. या युद्धांत इंग्लंडनें रणगाडे व जर्मनीनें झेपेलिन नामक अजस्र विमानें प्रथमच उपयोजिलीं. सन १९१४ मध्यें महायुद्ध सुरू झालें व सन १९१८ मध्यें बंद झालें. अगदीं सुरुवातीस इंग्लंडची लष्करी तयारी चांगलीशी नव्हती. तेव्हां लष्कराची भरती व त्याची तयारी करण्याचें अवघड काम लॉर्ड किचनेर या युद्धमंत्र्यानें उत्तम केलें. त्यानें उभारलेल्या पथकांस 'किचनेरचीं पथकें' असें म्हणत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. पश्चिम आघाडी :—जर्मनीचा मुख्य भर पश्चिम रणांगणावरच होता. जलदी करून फ्रान्सचा पराभव करावयाचा हा जर्मनीचा मुख्य हेतु होता व त्यास अनुसरूनच आंतर्राष्ट्रीय करारनामा मोडून जर्मनीनें बेल्जमवर झडप घातली. जर्मन सैनिकांच्या झुंडीच्या झुंडी बेल्जममध्यें घुसूं लागल्या व त्यांनीं लीज, नामूर, घेंट, अँटवर्प वगैरे महत्त्वाचीं ठिकाणें एकामागून एक घेण्यास सुरुवात केली. इंग्लिश, फ्रेंच व बेल्जियन सैन्यानें जर्मन सैन्याची मुसंडी थोपवून धरण्याचें काम मोठ्या हिंमतीनें केलें; परंतु त्याचा फारसा उपयोग न होतां जर्मनीनें फ्रान्समध्यें थोड्याच दिवसांत आपलें सैन्य घुसविलें व पॅरिसवर चाल करून जाण्याची हिम्मत धरली. त्याच वेळीं दोस्तांच्या मदतीला हिंदी सैन्य आलें. हिंही सैन्यानें जर्मनीची फळी फोडून मोठा पराक्रम गाजविला. त्यामुळें जर्मनीला आपलें आक्रमक धोरण सोडून देऊन पीछेहाट करावी लागली. जर्मन सेनापति बुलो व क्लुक यांना माघार घेणें प्राप्त झालें. येप्रे या ठिकाणीं मोठ्या घनघोर लढाया झाल्या. त्यामध्यें जर्मनीनें आंतर्राष्ट्रीय कायदे झुगारून देऊन विषारी गॅस वापरला. परंतु या लढाईत जर्मनांचा पराभव झाला. पुढें फ्रान्समध्यें दक्षिण बाजूनें शिरण्याचा जर्मनीनें प्रयत्न करून व्हर्डून नामक अभेद्य किल्ल्यावर मारा केला; परंतु तेथेंही त्यांची फसगत झाली. फ्रेंचांनीं त्या किल्ल्याचें मोठी मर्दुमकी गाजवून रक्षण केलें. याच वेळीं कॅले हस्तगत करण्याचा जर्मनांनीं प्रयत्न केला. कॅले हातीं आल्यास इंग्लंडवर हल्ला करणें सोपें जाईल असा त्यांचा अंदाज होता. सत्तर-ऐंशीं मैल अंतरावरील ठिकाणावर सहज मारा करतां येईल अशा लांब पल्ल्याच्या तोफा जर्मनीजवळ असल्यानें कॅले जर्मनीच्या ताब्यांत येतें तर इंग्लंडवर त्याला चांगला मारा करतां आला असता. पण तोही डाव फसला. एकंदरींत या रणक्षेत्रांत जर्मनीला प्रथम अपूर्व यश मिळालें, तरीही शेवटीं त्या राष्ट्राचा पूर्ण पराभव झाला. या लढाईत खंदकांत राहून सैनिकांना लढावें लागलें. ‘ खंदकी लढायांचें ’ प्रमाणही मोठें होतें.

९. पूर्व आघाडी :—सर्व्हियाच्या रक्षणार्थ रशिया युद्धांत पडला. प्रथमतः रशियाच्या सैन्याच्या झुंडीच्या झुंडी ऑस्ट्रिया व जर्मनी या देशांच्या प्रदेशांत मोठ्या हिंमतीनें घुसल्या. जर्मनीचा मुख्य सेनापति हिंडेनबुर्ग होता. त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



महायुद्धाच्या वेळचे कांहीं लष्करी अधिकारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टॅनेनबर्गच्या लढाईत रशियाचा पराभव केला व रशियनांना जर्मन हद्दींतून हांकलून दिलें. यापुढें जर्मनीनें रशियनांचा एकसारखा पराभव केला. त्यामुळें रशियन लोक झारवर उठले. झारचा अनियंत्रित कारभार व त्याचा जुलूम त्याच्या प्रजेस असह्य झालाच होता. लेनिनच्या नेतृत्वाखालीं बोल्शेव्हिझम् रशियामध्यें बोकाळला होता व त्या चळवळीनें लोकांना भारून टाकलें होतें. रशियन सैन्याची स्थितीही चांगली नव्हती, त्यामुळें लष्करानें सन १९१७ मध्यें बंड केलें. शेवटीं रशियांत राज्यक्रांति झाली. झारची उचलबांगडी होऊन त्याला व त्याच्या बायकोला फाशीं देण्यांत आलें. त्यावेळीं केरेन्स्की याच्या हातीं सर्व सत्ता आली व त्यानें रशियांत लोकशाही स्थापन केली. पुढें त्याच्या हातांतून सर्व सत्ता काढून घेऊन बोल्शेव्हिक पुढारी लेनिन (१८७०–१९२४) हा सर्वसत्ताधारी झाला. त्यानें रशियांत आपल्या बोल्शेव्हिक तत्त्वांस अनुसरून लोकशाही स्थापन केली. लगेच त्यानें जर्मनीशीं स्वतंत्रपणें तह करून युद्धांतून आपलें अंग काढून घेतलें (१९१७). त्यामुळें तिकडील सैन्य जर्मनीला पश्चिम आघाडीवर नेतां आलें.

१०. **आरमारी युद्ध**:—जर्मनीचें आरमार उत्तम तयार झालें होतें. त्यामुळें ब्रिटिश आरमाराचा आपल्याला पराभव करतां येईल अशी जर्मनीच्या कैसरची कल्पना होती. परंतु ती फोल ठरली. ब्रिटननें जर्मन आरमाराचा ठिकठिकाणीं पराभव करून समुद्रावरील आपलें श्रेष्ठत्व कायम राखिलें. अगदीं सुरुवातीला पाणबुड्यांनीं सुळसुळाट करून सर्व राष्ट्रांना भंडावून सोडलें. या पाणबुड्यांनीं अनेक जहाजें बुडविलीं व ब्रिटिश साम्राज्यांतून इंग्लंडकडे येणारी रसद मारण्याचा, अन्नपुरवठा हस्तगत करण्याचा व सैन्यांतील माणसें बुडविण्याचा धूमधडाका उडविला. या पाणबुड्यांनीं इंग्लंडचींच जहाजें बुडविलीं असें नाहीं तर तटस्थ राष्ट्रांचींही बुडविलीं व त्याची चीड येऊनच अमेरिका दोस्तांना मिळाली (१९१७). समुद्रावरील ही गनिमीकाव्याची जर्मनांची चढाई त्यांच्या अखेर आंगलट आली. पाणबुड्यांचा नाश करणारीं अनेक साधनें इंग्लंडनें शोधून काढलीं व 'सबचेजर्स' ऊर्फ पाठलागी व 'मिस्टरी' ऊर्फ गूढ जहाजें यांसारखीं नवीं जहाजें निर्माण करून त्यांनीं जर्मन पाणबुड्यांचा नायनाट केला. सन १९१८ सालीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



महायुद्धाच्या वेळचे कांहीं आरमारी अधिकारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जर्मन पाणबुड्यांच्या मुख्य ठाण्यावर–झीब्रगवर–हल्ला करून तें ठिकाण इंग्लिशांनीं उठवून दिलें. 'एमडेन' नामक एक जर्मन क्रूझर ब्रिटिशांच्या तडाख्यांतून सुटलें होतें. त्यानें ब्रिटिश निशाण आपल्यावर फडकत ठेवून हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर धुमाकूळ घातला. मद्रासवरही त्यानें हल्ला केला होता. पुढें तें ऑस्ट्रेलियाजवळ बुडविण्यांत आलें. जटलंड जवळ एक मोठी आरमारी लढाई झाली. त्यावेळीं इंग्रजांचा दर्यासारंग लॉर्ड जेलिको होता. ही लढाई निर्णायक झाली नाहीं. तरी यावेळीं (१९१६) जर्मनीचीं जहाजें जर्मन बंदरांत शिरल्यानेंच त्यांचें रक्षण झालें. पुढें नांव घेण्यासारखी एकही आरमारी लढाई झाली नाहीं. मात्र ब्रिटिश आरमारानें उत्कृष्ट कामगिरी बजावून आपलें नांव चिरस्थायी केलें. त्यानें ब्रिटिश किनाऱ्याचें संरक्षण केलें, साम्राज्याच्या कानाकोपऱ्यांतून इंग्लंडांत अन्नसामुग्री, माणसें, युद्धोपयोगी सामान, पैसा यांची पोंच केली, शत्रूचा व्यापार थांबविला, पाणसुरुंग पेरून शत्रूचीं जहाजें बुडविलीं, टॉर्पेडो ऊर्फ पाणतीर सोडून जर्मनीच्या पाणबुड्या व इतर जहाजांचा नायनाट केला व समुद्रावर गस्त व सतत पहारा ठेवून जर्मनीचा सर्व बाजूंनीं कोंडमारा केला.

११. मध्यपूर्वेकडील रणकंदन:—तुर्कस्थान जर्मनीस मिळाला होता. त्या बाजूस आपलें वर्चस्व प्रस्थापित करून तेथील ब्रिटिश वर्चस्व जर्मनीस नष्ट करावयाचें होतें. तसेंच बर्लिन-बगदाद रेल्वेरस्ता तयार करण्यांत हिंदुस्थानवर जर्मन कैसरचा डोळा होता. तेव्हां तो मार्ग बंद करणें इंग्लंडला जरूर होतें. प्रथमतः तुर्कस्थानवर इंग्लंडनें मारा केला. ऑस्ट्रेलियांतील व न्यूझीलंडमधील सैनिकांनीं डार्डानेल्सवर हल्ला करून गॅलिपोलीवर ते उतरले; परंतु त्यांचा तेथें निभाव न लागल्यानें त्यांस माघार घ्यावी लागली. पुढें इंग्लंडनें पॅलेस्टाईनवर हल्ला केला. इंग्रज सेनापति अलेन्बी यानें डमास्कस व जरुसलेम हीं शहरें काबीज करून तुर्कांचा पराभव केला. तुर्कांनीं सुवेझ कालव्यावर हल्ला केला होता, परंतु तो फसला. मेसापोटेमियावर ब्रिटिशांनीं हल्ला केला व तो प्रांतही तुर्कांकडून जिंकून घेतला. गॅलिपोलीची लढाई चालू असतांच इटली दोस्तांना मिळाला होता. दोस्तांच्या मदतीनें त्यानें ऑस्ट्रियाचा अनेक ठिकाणीं पराभव केला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२. युद्धाची समाप्ति:—जर्मनीला बाहेरील राष्ट्रांतून कोणताही माल मिळूं द्यावयाचा नाहीं व अशा रीतीनें जर्मनीला अन्नसामुग्री अगर युद्धोपयोगी माल मिळाला नाहीं म्हणजे तें राष्ट्र वठणीवर येईल असें इंग्लंडचें धोरण होतें. तें सिद्धीस जावयाचें असेल तर समुद्रावरील सर्व प्रकारचीं जहाजें तपासणें जरूर होतें. अर्थात् समुद्रावर संचार करणाऱ्या प्रत्येक जहाजांची तपासणी करण्याचा हक्क इंग्लंड बजावूं लागलें. यामुळें अमेरिकेंत बरीच कुरकूर झाली होती व इंग्लंडचा हा अधिकार अमान्य करून अमेरिकेनें इंग्लंडविरुद्ध युद्धही पुकारलें असतें. परंतु त्याच सुमारास जर्मनीनें एक नवीन फर्मान काढून व्यापारी जहाजें, उतारूंचीं जहाजें, आरमारी जहाजें,



सन १९१४-१८ मध्यें जें महायुद्ध झालें त्यावेळीं अमेरिकेनें दोस्तांना जी मदत केली त्याचें हें व्यंगचित्र आहे. मागें अमेरिकेच्या गगनचुंबी इमारती असून समुद्रांत एक जहाज आहे. त्यांत युद्धसामुग्री आहे. जहाजाला एका राक्षसाचें मुख आहे व तो डॉलर्स खात आहे अशी कल्पना आहे.

तटस्थांचीं जहाजें अगर शत्रूंचीं जहाजें असा भेदाभेद न करतां भेटेल तें जहाज बुडविण्याचा आपल्या आरमारास हुकूम सोडला. त्यामुळें अमेरिका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिडली व तिनें जर्मनीविरुद्ध सन १९१७ मध्यें युद्ध पुकारिलें. त्याबरोबर युद्धाचें पारडें फिरलें. ज्या वेळीं दोस्त राष्ट्रांना ताज्या दमाचें लष्कर पाहिजे होतें त्याचवेळीं अमेरिकेच्या फौजा फ्रान्समध्यें उतरविण्यांत आल्यानें दोस्तांना विजयाची आशा दिसूं लागली व जर्मनीची नाहींशी होऊं लागली. त्याचवेळीं तुर्कस्थान व बल्गेरिया यांच्या पराभवाच्या बातम्या जर्मनीपर्यंत पोंचल्या होत्या. खुद्द जर्मनीमध्यें अन्नसामुग्री व युद्ध-सामुग्री संपुष्टांत आली होतीच. अशा स्थितींतही जर्मन सैन्यानें अखेरचा प्रयत्न करून पाहिला; पण तो जर्मनीच्या अंगाशीं आला. दोस्तांचा सेनापति मार्शल फॉश यानें हळूहळू जर्मन सैन्याला मागें मागें रेटीत नेलें. ही बातमी कळतांच जर्मनीमध्यें क्रांति झाली, कैसर हॉलंडमध्यें पळून गेला, जर्मनींत लोकशाही निर्माण झाली व नव्या जर्मन सरकारनें, ता. ११ नोव्हेंबर १९१८ रोजीं युद्धतहकुबीच्या करारपत्रकावर सह्याही केल्या. युद्ध थांबलें ही बातमी कळतांच सर्व राष्ट्रांतील लोकांना इतका आनंद झाला कीं त्याचें वर्णन करतां येणें शक्य नाहीं! जर्मनीप्रमाणेंच ऑस्ट्रियामध्येंही क्रांति झाली. हंगेरी ऑस्ट्रियापासून फुटून निघून स्वतंत्र झाला व तेथील राजा व ऑस्ट्रियाचा बादशाह यांनीं राज्यत्याग केला. हंगेरी व ऑस्ट्रिया देशांत लोकशाही स्थापन झाली.

१३. महायुद्धाचे कांहीं विशेष :—आजपर्यंत जीं निरनिराळीं युद्धें झालीं त्यापेक्षां हें महायुद्ध अनेक दृष्टींनीं महत्त्वपूर्ण झालें. जगांतील बहुतेक सर्व राष्ट्रांनीं या युद्धांत भाग घेतला होता. त्या युद्धांत किती लोक गुंतले होते तें नक्की सांगतां येणार नाहीं; किती मेले तेंही सांगणें अशक्य. सुमारें दीड-दोन कोटी माणसें मृत्यु पावलीं असावीं असा तर्क आहे! खुद्द इंग्लंडचीं दहा लाख माणसें मेलीं व वीस लाख जखमी झालीं असें सांगतात! अनेक प्रकारचीं नवीं नवीं हत्यारें वापरण्यांत आलीं. लांब पल्ल्याच्या तोफा, रण-गाडे, विमानें, बॉंब व विषारी गॅस यांचा या युद्धांत प्रथमच उपयोग करण्यांत आला. एकोणिसाव्या शतकांत एखाद्या सबंध युद्धांत खर्च होई इतका दारूगोळा या युद्धांत दररोज खर्चिला जात होता, यावरून हें युद्ध किती खर्चाचें होतें तें लक्षांत येईल. विमानेंही या युद्धांत प्रथमच उपयोजिलीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेलीं. वैमानिकांनीं मोठी मर्दुमकी गाजविली. त्यांनीं शहरेंच्या शहरें बॉंब टाकून उध्वस्त केलीं. जर्मनीचें वैमानिकदल प्रथमतः अतिशय उत्तम होतें.



ग्राफ झेपेलिन

त्यांतील विमानांनीं लंडनवर अनेक वेळां बॉंबचा वर्षाव केला. 'झेपेलिन' नामक जर्मन विमानें या बाबतींत त्यावेळीं फार मोठीं मारक समजण्यांत येत. पुढें पुढें दोस्तांचे वैमानिक काफिलेही उत्तम काम करूं लागले. पत्रकें प्रसिद्ध करून शत्रूच्या गोटांत त्यांचा फैलाव करण्याचें धोरण दोन्ही पक्षांनीं अंगिकारिलें होतें. लांब पल्ल्याच्या तोफांमुळें खंदकांतील युद्धाला फार महत्त्व आलें होतें. या सर्व गोष्टींमुळें हें युद्ध अपूर्व झालें असें मानण्यांत येतें.

१४. व्हर्सायचा तह (१९१९):—युद्ध संपल्यावर व्हर्सायला सर्व राष्ट्रांची शांतता परिषद भरली. इंग्लंडतर्फे लॉइड जॉर्ज, फ्रान्सतर्फे क्लेमासो, अमेरिकेतर्फे वुड्रो विल्सन व इटलीतर्फे ऑरलॅंडो यांची एक मध्यवर्ति कमिटी नेमण्यांत आली होती. त्या सर्वांत विल्सन हाच प्रभावी ठरला. जर्मनीचा पराभव झाला तो आपल्यामुळें झाला असें प्रत्येक राष्ट्राला वाटत असल्यानें प्रत्येक राष्ट्राला प्राप्तीचा मोठा हिस्सा पाहिजे होता. परंतु शेवटीं विल्सननें आपलीं चौदा तत्त्वें प्रसिद्ध केलीं. त्या तत्त्वानुसार युरोपांत शांतता सिद्ध करावी असें सर्वांनीं ठरविलें. जर्मनीचा पराभव झाल्यानें त्या राष्ट्रावर मात्र जबर अटी लादण्यांत आल्या. जर्मनीच्या सर्व वसाहती गेल्या, आल्सेस-लोरेन प्रांत फ्रान्सला मिळाला, डॅंझिग, वरचा सायलेशिया, पश्चिम प्रशिया वगैरे प्रांत निरनिराळ्या राष्ट्रांस मिळाले व सार प्रांत पंधरा वर्षें दोस्तांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ताब्यांत रहावा असें ठरलें. जर्मनीनें फक्त एक लाख खडें सैन्य ठेवावें, युद्धसामुग्री मर्यादित ठेवावी, सहा लढाऊ जहाजें, सहा क्रूझरें, बारा विना-



व्हर्सायच्या तहावर सही करण्यावेळीं १९१९

शिका व बारा टॉर्पेडो बोटी इतकेंच आरमार ठेवावें, कील कालवा सर्वांस मोकळा असावा, दोस्तांच्या बुडविलेल्या बोटींबद्दल प्रत्येक टनास एक टन याप्रमाणें दोस्तांस नुकसानभरपाई द्यावी, खुद्द कैसर व दोस्त मागतील ते जर्मन अधिकारी जर्मनीनें दोस्तांच्या ताब्यांत द्यावे व फ्रान्स व बेल्जम या देशांच्या झालेल्या नुकसानीकरितां दोन अब्ज पौंड (दोन खर्व व आठ अब्ज रुपये) भरपाई म्हणून द्यावे. याप्रमाणें जर्मनीची व्यवस्था झाल्यानंतर युरोपच्या फाळणीसंबंधीं व्हर्सायच्या परिषदेनें योजना केल्या. त्याप्रमाणें नवे देश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निर्माण झाले. पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, ऑस्ट्रिया, हंगेरी, युगोस्लाव्हिया, रुमेनिया वगैरे नवीं राष्ट्रं निर्माण होऊन त्यांच्या सरहद्दी ठरविण्यांत आल्या. इटलीला ट्रीस्ट, ट्रेंटीनी व पोला हे भाग मिळाले, ग्रीसला मॅसिडोनिया, थ्रेस व आशियामायनरचा थोडा भाग मिळाला. रशियाचा बराचसा प्रदेश कमी करण्यांत आला; त्यांपैकीं कांहीं भाग पोलंडला देण्यांत आला व इस्टोनिया, फिनलंड, लिथुआनिया व लटेव्हिया हीं चार नवीं व स्वतंत्र्य राष्ट्रं निर्माण करण्यांत आलीं. तुर्कस्थानचीही फाळणी करण्यांत आली; सीरिया फ्रान्सकडे व पॅलेस्टाइन व मेसापोटेमिया हे प्रांत इंग्लंडकडे सोपविण्यांत आले. जपानला जर्मनीचीं कियोचू व पॅसिफिक बेटें मिळालीं.

१५. राष्ट्रसंघाची स्थापना :—या युद्धाच्या जगड्व्याळ स्वरूपावरून तें किती भीषण झालें असेल याची कल्पना होते. वित्तहानी, मनुष्यहानी व इतर हानी किती झाली त्याला गणतीच नाहीं. व्यापार बंद झाला, आर्थिक संबंध घटले, प्रदेशच्या प्रदेश बेचिराख झाले, रोगांच्या सांथी उद्भवल्या व त्यामुळेंही मनुष्यहानी झाली. ही भीषण स्थिति युद्धामुळें उत्पन्न झालेली पाहून जीवित, वित्त व मालमत्ता यांचें संरक्षण व्हावयाचें असेल, तर युद्धें थांबलीं पाहिजेत असें अमेरिकेचा अध्यक्ष व त्यावेळच्या तहपरिषदेचा एक वजनदार मुत्सद्दी वुड्रो विल्सन याला वाटलें. तेव्हां त्यानें ‘ राष्ट्रसंघाची ’ कल्पना तेथील लोकांपुढें मांडून त्याला त्या परिषदेची मान्यता मिळविली. जागतिक शांतता टिकविणें व युद्ध टाळणें हा त्या संघाचा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रांराष्ट्रांतील कलह तडजोडीनें मिटवावे, लढाईच्या मार्गानें नव्हे; व अशारीतीनें त्यांच्यांतील सहकार्य वाढवावें व जागतिक शांतता व स्वास्थ्य टिकवावें असा राष्ट्रसंघाचा मुख्य हेतु आहे. आंतरराष्ट्रीय कायदा, तहनामे व करार सर्वांनीं कसोशीनें व निःपक्षपातबुद्धीनें पाळावे म्हणजे शांततेचा भंग होणारच नाहीं अशी विल्सनची कल्पना होती. जर एखाद्या सभासदराष्ट्रानें करार मोडले तर बाकीच्या सर्व सभासदराष्ट्रांनीं त्याला त्याचे करार अगर तह योग्य रीतीनें पाळावयास लावावे. कोणत्याही स्वतंत्र व स्वायत्त राष्ट्रास राष्ट्रसंघाचा सभासद होतां येतें. मात्र त्यानें राष्ट्रसंघाच्या उद्देशास व करारनाम्यास मान्यता दिली असली पाहिजे. दोन वर्षांची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इ.स.१९१४ मधील युरोप खंड.



इ.स.१९२१ मधील युरोप खंड.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नोटीस देऊन कोणालाही आपलें सभासदत्व रद्द करून घेतां येतें. त्याप्रमाणें त्यावेळीं सुमारें पन्नास राष्ट्रांनीं राष्ट्रसंघाचें सभासदत्व स्वीकारलें. राष्ट्रसंघाची मुख्य कचेरी स्वित्झर्लंडमध्यें जिनीव्हा येथें आहे. संघाच्या असेंब्लीमध्यें सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधि सभासद म्हणून असतात; मात्र कौन्सिलमध्यें सर्व मोठ्या राष्ट्रांचे प्रतिनिधि व छोट्या राष्ट्रांनीं निवडलेले प्रतिनिधि असतात. असेंब्लीची सभा वर्षांतून एकदां व कौन्सिलची तीनदां भरावी असें ठरलें आहे. एक आंतरराष्ट्रीय न्यायकोर्ट व आंतरराष्ट्रीय मजूरसंस्था अशा दोन उपयुक्त संस्थाही राष्ट्रसंघानें चालविल्या आहेत. आंतरराष्ट्रीय न्यायकोर्ट हॉलंडमध्यें हेग या ठिकाणीं आहे. राष्ट्राराष्ट्रांतील कज्जे, खटले, भांडणें वगैरे त्या न्यायकोर्टाकडे सोपविण्यांत येतात. आंतरराष्ट्रीय मजूरसंस्था जिनीव्हा येथेंच आहे. जगांतील मजुरांची स्थिति सुधारण्याकरितां ही संस्था स्थापण्यांत आली. या संस्थेचें काम नीटसें झालेलें नाहीं. हिंदुस्थान राष्ट्रसंघाचा सभासद आहे. अगदीं सुरुवातीस या संघाची अनेकांनीं चेष्टा केली; परंतु पुढें सर्वजण त्याचे सभासद झाले. राष्ट्रसंघामार्फत जागतिक शांतता राखण्याचे अनेक वेळां प्रयत्न करण्यांत आले आहेत. परंतु अनेक वेळां ते फसलेही आहेत. सन १९३५ मध्यें इटलीनें आक्रमक धोरण स्वीकारून ॲबिसीनियाचें स्वातंत्र्य हरण केलें. त्यावेळीं राष्ट्रसंघ स्वस्थ होता. जर्मनीचा सर्वाधिकारी हिटलर यानेंही असेंच आक्रमक धोरण स्वीकारलें होतें. सन १९३९ मध्यें त्यानें जागतिक युद्धाला सुरुवातही केली. त्यावरून जागतिक शांततारक्षणाच्या दृष्टीनें राष्ट्रसंघाचें कार्य तितकेंसें यशस्वी झालेलें नाहीं असेंच म्हणावें लागतें. राष्ट्रसंघ स्थापन झाल्यावर अमेरिकेनें त्या संघांतून आपलें नांव काढून घेतलें होतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

१६. महायुद्धाचे परिणाम :— महायुद्ध संपल्यानंतर सर्व राष्ट्रांत असंतोषानें नुसतें थैमान घातलें होतें. बेकारी अतोनात वाढली, अन्न महाग झालें, सांथी उद्भवल्या, व्यापार मंदावला व लोकांच्या राहणींत मोठा फरक पडला. सर्वांत मोठा दुष्ट परिणाम म्हणजे सर्व राष्ट्रांची आर्थिक परिस्थिति अत्यंत हलाखीची झाली. इंग्लंडसारख्या मोठ्या राष्ट्रांतही करांचें ओझें वाढलें. राष्ट्रीय कर्ज शिगेस चढलें व त्यामुळें त्या राष्ट्राचा आर्थिक व्यवहार मंदावून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याची व्यापारी देवघेव, बँका व राष्ट्रीय पत यांच्यावर वाईट परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. तसेंच एकोणिसाव्या शतकांत एकराष्ट्रीयत्वाच्या चळवळीनें सर्वांस भारून टाकलें होतें; परंतु विसाव्या शतकांत आंतरराष्ट्रीयत्वाच्या चळवळीनें सर्वांस मोहित केलें. त्यामुळेंच राष्ट्रसंघासारख्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संस्था निर्माण झाल्या. व्हर्सायच्या तहानें राष्ट्रीयत्व व स्वयंनिर्णयाचें तत्त्व यांना मान्यता दिली, तरी त्यांची अंमलबजावणी मात्र योग्य रीतीनें झाली नाहीं. त्याप्रमाणें थोडा प्रयत्न झाला असला तरी त्याचा फारसा फैलाव झाला नाहीं. महायुद्धानंतर रशिया, ऑस्ट्रिया-हंगेरी, जर्मनी वगैरे देशांत राज्यक्रांत्या झाल्या व तेथील राजांस क्रांतिकारकांच्या संतापास बळी पडावें लागलें. रशियाच्या झारचा खून झाला, ऑस्ट्रिया-हंगेरीमध्येंही त्या गोष्टीचीच पुनरावृत्ति होऊन तेथें लोकशाही निर्माण झाली व जर्मनीचा विल्यम कैसर हॉलंडमध्यें पळून गेल्यानें व तो तेथेंच स्थाईक झाल्यानें जर्मनींतील राजसत्ता नष्ट होऊन तेथेंही लोकशाही निर्माण झाली. मात्र जर्मनी, रशिया, ऑस्ट्रिया, इटली, पोलंड वगैरे देशांत लोकशाही निर्माण झाली तरी तिचीही त्या राष्ट्रांतून वासलात लावण्यांत येऊन वरील देशांत सर्वाधिकारशाही स्थापन झाली. इटली सिनॉर मुसूलीनीच्या मुठींत गेला, पोलंड सेनापति पिल्सुडस्कीच्या ताब्यांत गेला, ऑस्ट्रियामध्यें खून, मारामाऱ्या निर्माण होऊन तो देश डॉ. डॉल्फस, शूश्निग वगैरेंच्या हातीं गेला, रशियामध्यें बोल्शेविझम बोकाळला व तो देश लेनिन, ट्रॉटस्की, स्टॅलिन वगैरेंच्या हातीं गेला व खुद्द जर्मनीमध्येंही शेवटीं शेवटीं सर्वाधिकारशाहीच बोकाळली व तेथें हेर हिटलरसारख्या नात्सीपक्षाच्या पुढाऱ्याच्या हातीं सर्व सत्ता एकवटली. थोडक्यांत म्हणजे महायुद्धानें लोकशाहीला ग्रहण लागलें व तिची जागा सर्वाधिकारशाहीनें घेतली. शिवाय या युद्धानें भावी युद्धाचीं बीजें पेरून ठेवण्यासही पुष्कळ मदत केली. कारण व्हर्सायच्या तहानें जर्मनी, रशिया, तुर्कस्थान, ऑस्ट्रिया वगैरे देशांची फाळणी होऊन त्यांच्या राज्यांतील बराचसा हिस्सा दोस्तांस मिळाला व कांहींमध्यें नवीन राष्ट्रें निर्माण झालीं. डँझिगसारखीं कांहीं बंदरें राष्ट्रसंघाकडेही सोपविण्यांत आलीं होतीं. यामुळें देशादेशांत असंतुष्टता, हेवा-दावा व मत्सर माजण्यास सुरवात झाली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व यामुळेंच सन १९१९ च्या व्हर्सायच्या तहानें सन १९३९ चें महायुद्ध ओढवून आणलें असें मानण्यांत येतें.

१७. युरोपांत सर्वाधिकारशाही :—महायुद्धानंतर रशिया, इटली, जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी वगैरे राष्ट्रांत राज्यक्रांति होऊन तेथें लोकशाही निर्माण झाली हें खरें. परंतु त्या राष्ट्रांतील लोकशाही चिरकाल टिकणारी नव्हती. हळूहळू लोकशाही नष्ट होऊन तिचें स्थान सर्वाधिकारशाहीनें घेतलें व जर्मनी, रशिया, इटली, पोलंड, ऑस्ट्रिया, हंगेरी वगैरे युरोपियन राष्ट्रांत तिनें धुडगूस घातला ! अर्थात त्या सर्व राष्ट्रांतून लोकशाही नष्ट झाली. आज ज्या राष्ट्रांत सर्वाधिकारशाही गाजत आहे त्यांत जर्मनी, इटली व रशिया हे देश प्रमुख आहेत. (१) **जर्मनी**–महायुद्धामध्यें जर्मनीचा पराभव झाल्यावर त्या राष्ट्रांत राज्यक्रांति झाली, विल्यम कैसर राज्यत्याग करून हॉलंडांत पळून गेला व जर्मनींत लोकशाही स्थापली गेली. सर्व सत्ता एका राष्ट्रीय सरकारच्या हातीं ठेवण्यांत येऊन रीश ऊर्फ रीशस्टॅग ही जर्मनीची पार्लमेंटसभा राष्ट्रीय सरकारला मदत करूं लागली. त्या सरकारच्या मुख्यास अध्यक्ष म्हणत. जर्मनीचा पहिला अध्यक्ष एबर्ट होता. त्याच्यानंतर सन १९२५ मध्यें सेनापति हिंडेनबुर्ग अध्यक्ष झाला. तो सन १९३४ पर्यंत जर्मनीचा अध्यक्ष होता. त्याच्यानंतर हेर हिटलर हा जर्मनीचा सर्वाधिकारी झाला व त्यानें पार्लमेंटलाही गुंडाळून ठेवून व अध्यक्षपद रद्द करून सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली. हेर हिटलरचा जन्म सन १८८९ मध्यें ऑस्ट्रियांत झाला. त्याचें शिक्षण फारसें झालेलें नाहीं. महायुद्धांत त्यानें जर्मन सैन्यांत नोकरी केली. युद्धानंतर सन १९२० मध्यें त्यानें राष्ट्रीय सोशॅलिस्ट पक्षाची स्थापना केली होती. पुढें सन १९२३ त म्यूनिक येथें त्यानें एक मोठें बंड केलें; त्यामुळें त्याला पांच वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यांत आली. त्यांतून त्याची सुटका झाल्यावर त्यानें आपल्या पक्षाची संघटना करण्यास सुरुवात केली. त्याच्या पक्षास ‘ नात्सीपक्ष ’ असें म्हणतात. त्या पक्षाच्या शक्तीच्या जोरावरच हिटलर सन १९३२ मध्यें जर्मनींतील अध्यक्षाच्या निवडणुकीस उभा राहिला. त्याचा प्रतिपक्षी हिंडेनबुर्ग असल्यानें हिटलरला यश लाभलें नाहीं. तरी त्याच्या पक्षाचे अनेक लोक जर्मन पार्लमेंटांत निवडून आल्यानें हिटलरचें वर्चस्व वाढलें. हें जाणूनच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अध्यक्ष हिंडेनबुर्ग यानें त्याला जर्मनीचें चॅन्सेलरपद (मुख्य प्रधानपद) दिलें. पुढें सन १९३४ मध्यें हिंडेनबुर्ग मेल्यावर हिटलर सर्वसत्ताधारी झाला. त्याचा नात्सीपक्ष आज जर्मनींत अत्यंत प्रबळ आहे व हिटलरचा प्रत्येक शब्द झेलण्यांतच जर्मन लोक मोठेपणा मानतात. हिटलरच्या हातीं जर्मनींतील सर्व सत्ता आल्यानें जर्मनींतील लोकशाही मात्र नष्ट झाली. त्यांच्या पंथाला 'नात्सीझम्' असें म्हणतात. (२) इटली :—इटलीमध्यें नियंत्रित राजसत्ता होती व त्या देशांत लोकशाही नांदत होती; परंतु सन १९२२ मध्यें तेथील लोकशाही नष्ट करून बेनिटो मुसूलीनी यानें इटलीमधील सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली; मात्र तेथील राजघराणें त्यानें कायम ठेवलें. मुसूलीनीचा जन्म इटलींतील एका खेड्यांत सन १८८३ मध्यें झाला. थोडा अभ्यास झाल्यावर तो सोशॅलिस्ट बनला होता. महायुद्धांत त्यानें लष्करी अधिकाऱ्याचें काम केलें होतें. तेथें तो जखमी झाल्यानें परतला. युद्धानंतर त्यानें सोशॅलिस्टपक्ष सोडला व राजकारणांत शिरून त्यानें एक वर्तमानपत्र सुरू केलें. त्यानें फॅसिस्टपक्ष निर्माण केला (१९१९). या पक्षाचें बळ हळूहळू इतकें वाढलें कीं, त्या पक्षानें सन १९२२ मध्यें मुसूलीनीच्या हातीं इटलीच्या राज्य-कारभाराची सर्व सत्ता द्यावी असा ठराव पास केला. त्याची अंमलबजावणी करण्याकरितां सर्व लोक रोमवर चाल करून गेले. तेव्हां राजानें त्यांची मागणी मान्य करून मुसूलीनीकडे सर्व सत्ता दिली. मुसूलीनीच्या हातीं सर्व सत्ता आल्यानें तोच इटलीचा सर्वाधिकारी झाला. ताबडतोब त्यानें वर्तमानपत्रें व पार्लमेंट यांचें वर्चस्व हाणून पाडलें व तो मन मानेल तसा वागूं लागला. त्याच्या पंथाला 'फॅसिझम्' असें म्हणतात. सर्वाधिकारी झाल्या-नंतर मुसूलीनीनें इटलीची सर्वांगीण उन्नति केली व तें राष्ट्र बलाढ्य केलें. (३) **रशिया**—महायुद्ध चालू असतांच सन १९१७ मध्यें रशियांत राज्य-क्रांति होऊन क्रांतिकारकांनीं झार, त्याच्या कुटुंबांतील मंडळी व उमराव यांचा वध केला. त्यावेळीं क्रांतिकारकांचा पुढारी केरेन्स्की होता. परंतु बोल्शेव्हिक पुढाऱ्यांनीं थोड्याच महिन्यांत त्याला हुसकून लावून सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली. केरेन्स्की फ्रान्समध्यें पॅरिसला होता. तो आतां नुकताच अमेरिकेस गेला आहे. केरेन्स्कीनंतर बोल्शेव्हिकांचा पुढारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेनिन (१८७०-१९२४) हा सर्वसत्ताधारी झाला. त्यानें रशियांत बोल्शेव्हिक राज्यपद्धति स्थापन केली. तो सन १९२८ मध्यें वारल्यावर त्याची जागा स्टॅलिननें घेतली. त्याचा जन्म १८७९ मध्यें झाला. त्याचा एकेकाळचा दोस्त ट्रॉटस्की हाही लेनिननंतर रशियाचा सर्वाधिकारी होऊं पहात होता; परंतु स्टॅलिननें त्या बाबतींत त्याचा पराभव करून त्याला देशोधडीस लावलें (१९२८). आज ट्रॉटस्की मेक्सिकोमध्यें होता. त्याच्या सर्व सहकाऱ्यांस स्टॅलिननें ठार मारलें. ता. २१ ऑगस्ट १९४० रोजीं ट्रॉटस्कीचा मेक्सिकोमध्यें खून झाला. अशा रीतीनें आपल्या शत्रूंचा निःपात केल्यावर तो रशियाचा सर्वसत्ताधारी झाला. स्टॅलिन हें त्याचें टोपण नांव आहे व त्याचा अर्थ पोलादी मनुष्य असा होतो. त्याच्या पंथाला 'बोल्शेव्हिझम्' असें म्हणतात. सन १९२४ पासून रशियाची सर्व सत्ता स्टॅलिनच्या हातीं आहे व त्यानें रशियाची सर्वांगीण प्रगति केली आहे. जगांत बोल्शेव्हिझमचा प्रसार करणें योग्य आहे असें तो म्हणतो. मात्र सर्व जगानें बोल्शेव्हिझमला नाकें मुरडलीं.

अभ्यास

१. महायुद्धाचीं कारणें सांगा. त्या युद्धाला जर्मनीचा कैसर कितपत कारणीभूत झाला ?

२. महायुद्धाचे जगावर व युरोपवर झालेले परिणाम सांगा. व्हर्सायच्या तहानें कोणत्या गोष्टी साध्य केल्या ? त्या तहांतच भावी युद्धाचीं बीजें आहेत, असें कां म्हणतात ?

३. महायुद्धामुळें लोकशाही नष्ट होऊन सर्वाधिकारशाही उत्पन्न झाली असें म्हणतात तें खरें का ? कशावरून ?

४. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—
कैसर, पँथर, आर्चड्यूक फर्डिनंड, नीत्शे, बेल्जम, जटलंड, हिंडेनबुर्ग, हिटलर, स्टॅलिन, लेनिन, मुसोलीनी, ॲलेन्बी, जेलिको.

५. महायुद्धापूर्वी युरोपची स्थिति कशी होती ? इंग्लंड त्या युद्धांत कां पडलें ? तें पडणार नाहीं असें कैसरला कां वाटत होतें ?

६. महायुद्धाचे कांहीं विशेष सांगा. त्या युद्धांत जर्मनीचा पराभव कां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला ? व्हर्सायच्या तहानें जर्मनीवर कोणकोणत्या जाचक अटी लादल्या ?

७. राष्ट्रसंघ कसा निर्माण झाला ? त्यासंबंधीं सर्व माहिती सांगा. त्याचें वैशिष्ट्य काय ?

उतारा

१. वुड्रो विल्सनचीं चौदा तत्त्वें

१. राजकीय कारस्थानें उघडपणें व्हावीं.

२. समुद्रावर सर्वांस खुला संचार करतां यावा.

३. राष्ट्राराष्ट्रांतील मारक जकाती रद्द व्हाव्या.

४. शस्त्रसंन्यास.

५. उजाड झालेल्या जमिनींची भरपाई.

६. पोलंडला स्वातंत्र्य असावें.

७. बेल्जमचें स्वातंत्र्य अबाधित असावें.

८. राष्ट्रसंघाची स्थापना व्हावी.

९. स्वयंनिर्णयाच्या तत्त्वास मान्यता द्यावी.

१०. राष्ट्रांच्या इच्छेनुसार वसाहतींची वांटणी.

११. इटलीच्या सरहद्दीची व्यवस्था.

१२. बाल्कन प्रदेशांतील सरहद्दीची पूर्वपरंपरेस अनुसरून व्यवस्था.

१३. तुर्कस्थानांतील तुर्केतर प्रजेस स्वयंनिर्णय द्यावें.

१४. ऑस्ट्रिया-हंगेरीच्या राज्यांतील निरनिराळ्या लोकांस स्वयंनिर्णय.

[या तत्त्वांस अनुसरून वुड्रो विल्सननें महायुद्धानंतरच्या तहपरिषदेमध्यें भाग घेतला व महत्त्वाचे निकाल लावले; परंतु त्याचें हें कृत्य अमेरिकन पार्लमेंटला आवडलें नाहीं. विशेषतः विल्सनची राष्ट्रसंघाची कल्पना अमेरिकनांस पसंत पडली नाहीं व त्यामुळें अमेरिकेनें राष्ट्रसंघांत भाग घेण्याचें नाकारलें.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१६. महायुद्धानंतरचें इंग्लंड

१. ॲस्क्विथचा राजीनामा :—सन १९१४ मध्यें युरोपांत महायुद्ध पेटलें; व त्यामुळें ॲस्क्विथच्या प्रधानमंडळाला सुधारणांचें आपलें काम आवरतें घ्यावें लागून महायुद्धाकडे सर्व लक्ष देणें भाग पडलें. ताबडतोब त्यानें इंग्लंडची युद्धाच्या दृष्टीनें सर्वांगीण तयारी केली. त्या बाबतींत लॉर्ड किचनेर व लॉइड जॉर्ज यांनीं अपूर्व धडाडी दाखविली. परंतु युद्धसामुग्रीच्या बाबतींत प्रधानमंडळावर बरीच टीका होऊं लागल्यानें ॲस्क्विथनें आपल्या प्रधानमंडळाची पुनर्रचना केली. त्यांत सर्व पक्षांतील लोक होते. त्यामुळें त्याला मिश्रप्रधानमंडळ असें म्हणतात (१९१५). महायुद्ध सुरू झाल्यानें आयरिश होमरूलचा प्रश्न व वेल्स धर्मपीठाचा प्रश्न मागें ठेवण्यांत आला. त्याचप्रमाणें त्यावेळीं एक सर्वपक्षीय युद्धमंडळही नेमण्यांत येऊन ॲस्क्विथ, लॉइड जॉर्ज, बोनर लॉ, मॅकीना व बाल्फोर हे त्याचे सभासद झाले. या मंडळानें १५ ते ६० वयाच्या पुरुषांची नोंदणी करण्याचें ठरविलें व सक्तीचें लष्करी शिक्षण देण्याचें धोरण जाहीर केलें. त्याच वेळीं सन १९१६ मध्यें हॅंपशायर नामक बोटींतून लॉर्ड किचनेर रशियाकडे जात असतां सुरुंग लागून त्याची बोट बुडाली व त्यांतच तो मेला. त्यामुळें लॉइड जॉर्जची त्याच्या जागीं युद्धमंत्रि म्हणून नेमणूक झाली. पुढें जिनसांच्या किंमती अतोनात वाढूं लागल्या, अन्नसामुग्रीचें नियंत्रणही सरकारकडून नीट होईना, जर्मन पाणबुड्यांचा ससेमिराही इंग्लंडला फार भोंवला व इंग्लिशांची सगळीकडे पीछेहाट होऊं लागली. त्यामुळें देशांत असंतोष पसरला. तेव्हां ॲस्क्विथनें राजीनामा दिला व लॉइड जॉर्जनें मुख्य प्रधानाची जागा स्वीकारून मिश्र-प्रधानमंडळ स्थापलें. त्याच्या प्रधानमंडळांत बहुतेक सर्व प्रधान पूर्वींचेच होते.

२. लॉइड जॉर्जचें प्रधानमंडळ (१९१६–१९१९) :—लॉइड जॉर्जच्या प्रधानमंडळानें महायुद्धाचें काम मोठ्या उमेदीनें, हिंमतीनें व चिकाटीनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालवून अखेर त्या युद्धांत जय मिळविला. युद्ध चालू असतांच सन १९१७ मध्यें त्या प्रधानमंडळानें हिंदुस्थानासंबंधीं एक जाहीरनामा प्रसिद्ध करून 'हिंदुस्थानास जबाबदारीचें स्वराज्य हळूहळू देण्यास इंग्लंड तयार आहे' असें जाहीर केलें. सन १९१८ मध्यें शिक्षणासंबंधींच्या कायद्यास राजाची संमति मिळाली. त्या कायद्यानें चौदा वर्षांपर्यंत प्रत्येकाला शिक्षणाची सक्ति करण्यांत आली, बारा वर्षांपर्यंत मुलांस नोकरीवर ठेवतां कामा नये असें ठरलें, १४ ते १८ वर्षें वयाच्या मुलांकरितां संध्याकाळच्या शाळा स्थापण्याचें ठरलें व मुलांस शारीरिक शिक्षण व हस्तव्यवसायाचें शिक्षण देण्यांत यावें असें ठरलें. सन

लॉइड जॉर्ज

१९१८ मध्यें पार्लमेंटमध्यें चौथा सुधारणाकायदा पास झाला. तो पास होण्यास इंग्लंडमध्यें चालू असलेली 'सफ्रेजेट चळवळ' विशेष कारणीभूत झाली होती. स्त्रियांना मताधिकार देण्याबद्दल इंग्लंडमध्यें एकोणिसाव्या शतकापासून चळवळ सुरू झाली होती. सन १८६७ मध्यें जॉन स्टुअर्ट मिलनें स्त्रियांना मताधिकार द्यावा असें पार्लमेंटमध्यें प्रथम सांगितलें. तेव्हांपासून त्या चळवळीस सुरुवात झाली. परंतु एकोणिसाव्या शतकांत त्या मताला फारसा पाठिंबा मिळाला नाहीं. पुढें सन १९१२ मध्यें पार्लमेंटमध्यें एक खाजगी बिल मांडण्यांत आलें होतें; परंतु तें नापास झालें. त्यामुळें सफ्रेजेट चळवळीला जोर चढला. तेव्हां सफ्रेजेट स्त्रियांनीं देशांत दंगेधोपे करण्यास सुरुवात केली, मोठमोठ्या सभा भरविल्या, टॉवरवर हल्ले चढविले, बॉंब फेकले व वेस्टमिन्स्टर ॲबे, चित्रसंग्रहालयें व पोस्ट ऑफिसें यांच्यावर हल्ले चढवून अत्यंत नुकसान आरंभिलें. तेव्हां अनेक स्त्रियांस पकडण्यांत आलें. तुरुंगांत त्यांनीं अन्नसत्याग्रह आरंभिला. पुढें महायुद्ध सुरू झालें. त्यावेळीं सफ्रेजेट स्त्रियांनीं आपली चळवळ थोडी बंद करून अनेक प्रकारचीं कामें केलीं व आपली लायकी सिद्ध केली. सफ्रेजेट चळवळीची मुख्य उत्पादक स्त्री एमिली पॅंकहर्स्ट ही स्त्री होती (१८५४–१९२८). तिनेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अत्याचाराची शिकवण स्त्रियांस दिली. अखेर युद्धसमाप्तीनंतर सन १९१८ मध्यें त्यांना मताधिकार देण्याच्या हेतूनें सरकारनें चौथा सुधारणाकायदा पास केला. त्या अन्वयें खालील गोष्टी ठरल्या. (१) एकवीस वर्षें वयाच्या प्रत्येक पुरुषास मताधिकार असावा. (२) मतदार आपल्या मतदारसंघाच्या हद्दींत निदान सहा महिने तरी राहिलेला असला पाहिजे. (३) तीस वर्षें वयाच्या प्रत्येक स्त्रीला मतदानाचा हक्क असावा. मात्र तिला म्युनिसिपल मत असलें पाहिजे अगर तिचा नवरा म्युनिसिपल मतदार पाहिजे अगर ती विश्वविद्यालयाची पदवीधर पाहिजे.

एमिली पँकहर्स्ट

(४) निवडणूक एकाच दिवशीं व्हावी. या कायद्यानें सैनिक व खलाशी यांना मतदानाच्या बाबतींत कांहीं सवलती मिळाल्या. तसेंच साठ लक्ष स्त्रियांस मतदानाचा अधिकार मिळाला. पूर्वी एकंदर मतदार ८३,५७,००० होते ते आतां १,६०,००,००० झाले. त्याच वर्षी उमेदवार म्हणूनही स्त्रियांस उभे राहण्याची परवानगी मिळाली. मात्र उमरावमंडळांत बसण्याची त्यांस परवानगी नाकारण्यांत आली.

३. लॉइड जॉर्जची कामगिरी व राजीनामा:—सन १९१८ मध्यें पार्लमेंटची निवडणूक होऊन त्यांत सरकारपक्षीय लोक बहुमतानें निवडून आले व त्यामुळें लॉइड जॉर्जनें पुन्हां मिश्रप्रधानमंडळ स्थापन केलें. सन १९१८ मध्यें मॉंटफर्ड–रिपोर्ट तयार झाला होता. त्यास अनुसरून सन १९१९ मध्यें पार्लमेंटनें हिंदुस्थानासंबंधीं एक कायदा पास केला व हिंदुस्थानाला मॉंटफर्ड–सुधारणा देण्यांत आल्या. युद्धतहकुबीनंतरचा व्हर्सायचा तह घडवून आणण्याची कामगिरीही याच प्रधानमंडळानें केली. सन १९२१ मध्यें आयर्लंडसंबंधीं कायदा पास करण्यांत आला. युद्धाच्या पूर्वी आयर्लें-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डच्या स्वराज्यासंबंधीं कायदा पास झाला होता; परंतु तो युद्धामुळें मागें पडला. युद्धाच्या वेळीं त्या देशांत असंतोषानें तीव्र स्वरूप धारण केलें होतें. 'सिनफीन' चळवळही जोरांत सुरू होती. त्यांतील लोकांनीं दंगेधोपे सुरू करून आयर्लंडांतील जीवित व वित्त यांची भयंकर हानी चालविली. शेवटीं लॉइड जॉर्जनें सन १९२१ मध्यें आयर्लंडचे उत्तर आयर्लंड (अल्स्टर) व दक्षिण आयर्लंड असे दोन भाग पाडून, दक्षिण आयर्लंडला 'वसाहतींचें स्वराज्य' दिलें. व त्याप्रमाणें सन १९२२ मध्यें आयरिश फ्री स्टेटची स्थापना झाली. अल्स्टरला मात्र त्यांतून वगळण्यांत आलें. या योजनेनें आयरिशांचें समाधान झालें नाहीं व त्यांनीं स्वातंत्र्यप्राप्तीकरितां चळवळ चालू ठेविली. डी व्हॅलेरा आयर्लंडचा अध्यक्ष झाल्यापासून (१९३२) आयरिश प्रश्न मोठ्या त्रासाचा होऊन बसला आहे. सन १९२१ मध्यें इंग्लंडमध्यें खाणींतील मजुरांनीं फार मोठा संप केला होता. परंतु तो मिटविण्यांत आला. सन १९२१ मध्यें वॉशिंग्टन येथें युद्धसामुग्रीस नियंत्रण घालण्याच्या हेतूनें परिषद भरविण्यांत आली. इंग्लंड, अमेरिका, जपान, फ्रान्स व इटली या राष्ट्रांनीं त्यांत भाग घेतला होता. अमेरिकेचा अध्यक्ष हार्डिंज हा या परिषदेचा अध्यक्ष होता. शस्त्रसंन्यासाचें धोरण या परिषदेनें मान्य केलें व विषारी वायू व पाणबुड्या वापरूं नये असें ठरलें. तसेंच आरमारांतील लढाऊ जहाजेंही कमी करावीं असें ठरलें. परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. पुढें हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायकोर्ट स्थापन झालें (१९२२). त्याच वर्षी इजिप्तमध्यें सनदशीर राजसत्ता स्थापन करण्या-संबंधाचा एक जाहीरनामा पार्लमेंटनें प्रसिद्ध केला. सुएझ कालवा, इजिप्तचें परराष्ट्रीय धोरण व सूडानचा कारभार यासंबंधीं सर्व हक्क इंग्लंडनें आपल्या-कडे ठेवून बाकी सर्व बाबतींत इजिप्तला स्वराज्य दिलें. पुढें सन १९२२ मध्यें पार्लमेंटची निवडणूक होऊन कंझर्व्हेटिव्हपक्ष बहुमतानें पार्लमेंटमध्यें निवडून आल्यानें लॉइड जॉर्जनें राजीनामा दिला व कंझरर्व्हेटिव्ह पुढारी अँड्र्यू बोनर लॉ मुख्य प्रधान झाला.

४. बोनर लॉचें प्रधानमंडळ (१९२२-२३):—बोनर लॉच्या प्रधान-मंडळांत लॉर्ड कर्झन परराष्ट्रमंत्रि होता. सन १९२२ मध्यें तुर्कस्थान व ग्रीस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांच्यामधील वाद मिटविण्याकरितां लॉसेन येथें एक परिषद भरविण्यांत आली होती. त्याप्रमाणें तुर्कस्थानकडे कॉन्स्टँटिनोपल व त्याच्या आजूबाजूचा कांहीं भाग ठेवण्यांत आला, आशियामायनरमधील कांहीं प्रांत त्याला देण्यांत आले, अंगोरा प्रांत तुर्कांकडे राहिला व तुर्कस्थानच्या राज्यांतील ख्रिश्चन राष्ट्रें स्वतंत्र झालीं. यानंतर प्रकृति-स्वास्थ्यासाठीं बोनर लॉनें मुख्य प्रधा-नाच्या जागेचा राजीनामा दिला. तेव्हां कंझर्व्हेटिव्हपक्षाच्या पुढारी-पणाबद्दल तंटे सुरू झाले. अखेर स्टॅन्ले बाल्डविन त्या पक्षाचा पुढारी निवडला गेला व तो मुख्य प्रधान झाला. त्यामुळें लॉर्ड कर्झन याला अत्यंत वाईट वाटलें. त्याला मुख्य प्रधान होण्याची बळकट आशा होती. परंतु अलीकडे उमरावाला तो मान मिळण्याची प्रथा बंद पडल्यानें त्याची निराशा झाली व बाल्डविनच्या निवडणु-कीस त्यानें मान्यता दिली. बाल्डविननें सन १९२३ मध्यें जोसेफ चेंबर्लेनच्या संरक्षित व्यापारपद्धतीचा उघड उघड पुरस्कार केला. मात्र त्या बाबतींतील नवें धोरण स्वीकारण्यापूर्वी त्यानें निवडणूक करण्याचें वचन दिलें. पण निवडणुकींत त्याच्या पक्षाचा पराभव झाल्यानें त्यानें राजीनामा दिला. त्यामुळें मजूरपक्षाचा पुढारी रॅम्से मॅक्डोनल्ड हा इंग्लंडचा पहिला मजूर-पक्षीय मुख्य प्रधान झाला (१९२४).

लॉर्ड कर्झन

५. पहिलें मजूरमंत्रिमंडळ (१९२४):—मॅक्डोनल्डनें पहिलें मजूर-मंत्रिमंडळ बनविलें. त्यांत क्लाइन्स, लॉर्ड हाल्डेन, फिलिप स्नोडन, आर्थर हेंडरसन, टॉमस वगैरे मंत्रि प्रभावी ठरले. मजूरपक्षाला निर्णायक बहुमत मिळालेलें नव्हतें. त्या पक्षाचे फक्त १९१ लोक निवडून आले होते. तेव्हां लिबरलपक्षाच्या पाठिंब्यानेंच तें मंत्रिमंडळ अधिकारारूढ झालें होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यावेळीं इंग्लंडमध्यें बेकारीचा प्रश्न सर्वांस सतावीत होता; व त्याचें मुख्य कारण म्हणजे युरोपांतील आर्थिक हलाखी. युद्धानंतर दोस्तांनीं जर्मनीला जबर दंड केला होता; परंतु तो देण्याची ऐपत व शक्ती त्या राष्ट्रांत नव्हती. तेव्हां त्या राष्ट्रांकडून 'सार'खोरें व तेथील खाणी दोस्तांनीं आपल्याकडे घेतल्या. त्यांतील माल घेऊनही दंडाची भरपाई होईना म्हणून सेनापति डॉज याच्या अध्यक्षत्वाखालीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. त्या कमिटीनें आपला रिपोर्ट सादर केला होता. त्याचा विचार करण्याकरितां मॅक्डोनल्डनें लंडन येथें सर्व राष्ट्रांची परिषद भरविली. त्या परिषदेनें 'डॉज-योजना' मान्य केली. त्या योजनेप्रमाणें जर्मनींतील सर्व रेल्वेरस्ता एका कमिशनकडे सोपविण्यांत आला व आगगाडीच्या उत्पन्नांतून दंडाची रक्कम वसूल करून घ्यावी असें ठरलें. जर्मनीनेंही या योजनेस मान्यता दिली. मॅक्डोनल्डचा रशियन कम्युनिस्टपक्षाकडे ओढा होता; व त्या पंथाच्या तत्त्वांप्रमाणें इंग्लंडमध्येंही राज्यकारभार हांकला जावा असा त्याचा मनोदय होता. हें कळतांच लिबरलपक्षानें मजूरपक्षाला दिलेला पाठिंबा मागें घेतला. त्यामुळें मॅक्डोनल्डनें राजीनामा दिला. नवी निवडणूक झाली व त्यांत कंझर्व्हेटिव्ह-पक्षास बहुमत मिळाल्यानें त्या पक्षाचा पुढारी बाल्डविन दुसऱ्यांदां मुख्य प्रधान झाला (१९२४).

६. स्टॅन्ले बाल्डविनचें प्रधानमंडळ (१९२४–१९२९):— बाल्डविनच्या दुसऱ्या प्रधानमंडळांत विन्स्टन चर्चिल फडणीस होता, ऑस्टिन चेंबर्लेन परराष्ट्रमंत्रि होता व लॉर्ड बर्कनहेड भारतमंत्रि होता. निवडणुकीच्या वेळीं बाल्डविननें संरक्षित व्यापाराचें धोरण स्वीकारणार नाहीं व आयात अन्नसामुग्रीवर कर बसविणार नाहीं असें मतदारांस वचन दिलें होतें; मात्र सरकारी संरक्षणाच्या अभावीं जे धंदे डबघाईस आले होते त्यांस संरक्षण देण्याचें त्यानें ठरविलें होतें. मुख्य प्रधानाच्या या धोरणामुळें अनेक लोक असंतुष्ट झाले. महायुद्ध थांबल्यानंतर वस्तूंच्या किंमती तेजींत होत्या; परंतु कांहीं वर्षांनीं त्या घटूं लागल्यानें व्यापारी लोकांचें नुकसान होऊं लागलें. देशांतही असंतोष माजूं लागला होता. व्यापार मंदावला, बेकारी 'आ' वासून बसलीच होती व सर्वत्र संपाचें वातावरण खेळूं लागलें होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राष्ट्रीय कर्जाचा डोंगर आठ खर्व पौंडांपर्यंत गेला होता! त्यामुळें करांचें ओझेंही लोकांस असह्य झालें होतें. अशा स्थितींत सन १९२६ मध्यें कोळशाच्या खाणींतील लोकांनीं मोठा संप केला. खाणीचा धंदा बसल्यानें मजुरांना काम नव्हतें. त्यामुळें मजुरीचे दर कमी झाले व म्हणून मजुरांनीं संप केला. त्यांना सहानुभूति दाखवावी म्हणून रेल्वे, ट्रामगाड्या, बसेस वगैरे धंद्यांतील लोकांनींही संप पुकारला. त्यामुळें त्याला सार्वत्रिक संपाचें स्वरूप आलें. लोकांची फार गैरसोय झाली. परंतु सरकारनें कडक धोरण स्वीकारून संप मोडला व मजूर पुन्हां कामावर रुजू झाले. हा संप एक आठवडा चालू होता. त्यानंतर सन १९२७ मध्यें 'मजूर-संघाचा कायदा' पास करून सहानुभूतीनें संप करणें व व्यापारांत अडथळा आणणें हीं कृत्यें बेकायदा ठरविण्यांत आलीं. हा कायदा पास झाल्यानें मजुरीचे दर उतरूं लागले,



आजची वाहतूक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बेकारीही वाढूं लागली व मजुरांची स्थिति वाईट झाली. सन १९२५ मध्यें विन्स्टन चर्चिलनें मजूर, खलाशी व सैनिक यांच्या विधवांस व पोरक्या मुलांस पेन्शन देण्यांत यावें असें ठरविलें; व ज्यांनीं विमा उतरलेला आहे अशा मजुरांस पासष्टाव्या वर्षापासून पुढें अगर त्यापूर्वी मृत्यु आल्यास त्यांच्या मुलांस पेन्शन मिळावें असें ठरविलें. सन १९२८ मध्यें भिकाऱ्यांच्या कायद्यांत सुधारणा झाली व भिकाऱ्यांच्या कायद्याच्या अंमलबजावणीचें काम स्थानिक-स्वराज्य संस्थांकडे सोपविण्यांत आलें. प्रार्थनापुस्तकांत सुधारणा करण्याबद्दलही एक बिल कॉमन्ससभेपुढें मांडण्यांत आलें; पण तें पास झालें नाहीं. सन १९२८ मध्यें पार्लमेंट-सुधारणेचा पांचवा कायदा पास करण्यांत आला. त्या कायद्यानें एकवीस वर्षांच्या सर्व स्त्रीपुरुषांस मतदानाचा अधिकार देण्यांत आला. त्यामुळें मतदानाचा अधिकार सार्वत्रिक झाला व इंग्लंडांत लोकशाही पूर्णत्वास पोंचली.

७. शांततापरिषदा :—सन १९२५ मध्यें लोकॅर्नो येथें एक आंतर-राष्ट्रीय परिषद भरविण्यांत आली होती. त्यांत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली वगैरे राष्ट्रांनीं भाग घेतला होता. राष्ट्रांनीं आक्रमक धोरण स्वीकारूं नये असें त्या परिषदेनें ठरविलें. विशेषतः ऱ्हाइन खोऱ्यांत फ्रान्सनें आक्रमक धोरण स्वीकारल्यानें अनेक घोटाळे माजूं लागले होते व त्यामुळें जर्मनीला राग आला होता. तेव्हां सरहद्दीबद्दल तंटा उत्पन्न झाल्यास तो राष्ट्रसंघाच्या लवादमंडळा-तर्फे मिटवून घ्यावा असें ठरलें. या 'लोकॅर्नो करारास' जर्मनीनें मान्यता दिली होती व त्यामुळेंच त्या राष्ट्राचा राष्ट्रसंघांत पुढील सालीं समावेश कर-ण्यांत आला. मात्र सन १९३६ मध्यें हिटलरनें हा करार धुडकावून दिला. त्या करारांत ठरल्याप्रमाणें इंग्लंडनें आपलें सैन्य ऱ्हाइन खोऱ्यांतून काढून घेण्यास सुरुवात केली. सन १९२६ मध्यें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत वसाहतींची लंडन येथें परिषद भरविण्यांत आली. साम्राज्यांतर्गत अनेक प्रश्नांची चर्चा त्या परिषदेनें केली व वसाहतींचें स्वराज्य मिळालेल्या वसाहतींचा व इंग्लंडचा दर्जा समान आहे असें ठरविण्यांत आलें. हिंदी प्रश्नांचा विचार करून हिंदुस्थानाला कोणत्या प्रकारच्या सुधारणा द्याव्यात हें ठरविण्याकरितां 'सायमन कमि-शनची' नेमणूक करण्यांत आली (१९२७). त्याच वर्षी नाविक युद्धसामुग्री

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



अॅटलांटिकमधील ब्रिटिश आरमार, १९२५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कमी करण्याच्या हेतूनें जिनीव्हा येथें आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यांत आली. सन १९२८ मध्यें पांचवा जॉर्ज आजारी पडल्यानें राजपालकमंडळाची स्थापना करण्यांत आली. त्याच वर्षी पॅरिस येथें अमेरिकन प्रतिनिधी फ्रँक केलॉग यानें एक आंतरराष्ट्रीय परिषद बोलाविली. युद्ध करूं नये व शांततेच्या मार्गानें सर्व राष्ट्रांनीं भांडणतंटे मिटवावे असें या परिषदेनें ठरविलें. तिनें जो करार केला त्याला 'केलॉग करार' असें म्हणतात. मात्र त्यावर सही करतांना बहुतेक सर्व राष्ट्रांनीं आपल्या वचनांतून स्वतःस सोडवून घेतलें. यानंतर पार्लमेंटची निवडणूक झाली. त्यांत कंझर्व्हेटिव्हपक्षाचा पराभव झाल्यानें व मजूरपक्षाला बहुमत मिळाल्यानें रॅम्से मॅक्डोनल्ड हा इंग्लंडचा मुख्य प्रधान झाला.

८. दुसरें मजूरमंत्रिमंडळ (१९२९-३१):—रॅम्से मॅक्डोनल्डनें बनविलेल्या दुसऱ्या मजूरमंत्रिमंडळांत फिलिप स्नोडन फडणीस होता, हेंडरसन परराष्ट्रमंत्रि होता, वेजवुड बेन भारतमंत्रि होता व बांडफील्ड ही पहिली स्त्री मजूरमंत्रि होती. यावेळीं बेकारी फार वाढली होती, व्यापार फारच मंदावला होता, आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थितीही बिकट झाली होती, मालाची पैदास मागणीपेक्षां वाढल्यानें त्याला किंमत येईनाशी झाली, कर वाढले व राष्ट्रीय कर्ज एकसारखें फुगत गेलें. जर्मनीकडील खंडणीही वसूल होईनाशी झाली व जमाखर्चाची तोंडमिळवणी करणें अशक्य झालें. तेव्हां नवे कर बसविण्याचें ठरलें; परंतु ते कोणते बसवावे याबद्दल मॅक्डोनल्ड व फडणीस फिलिप स्नोडन यांच्यांत मतभेद झाल्यानें स्नोडन व त्याचे साथीदार यांनीं मंत्रिमंडळांतील जागांचे राजीनामे दिले (१९३१). तेव्हां मॅक्डोनल्डनें कंझर्व्हेटिव्ह व लिबरल या दोन्ही पक्षांतील प्रमुख मुत्सद्यांशीं विचारविनिमय करून राष्ट्रीय पक्षाची उभारणी केली व नव्या प्रधानमंडळाची स्थापना केली. सन १९३० मध्यें जागतिक 'आरमार परिषद' लंडनला भरविण्यांत आली होती; परंतु तिचा फारसा फायदा झाला नाहीं. सन १९३० मध्यें सायमन कमिशनचा रिपोर्ट सरकारला सादर करण्यांत आला; परंतु तो मजूरमंत्रिमंडळानें बाजूस ठेवून सन १९३० मध्यें हिंदी प्रश्नांचा निकाल लावण्याकरितां पहिली गोलमेज परिषद भरविली. पुढल्या वर्षी दुसरी गोलमेज परिषद

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भरली; या परिषदेंत हिंदी कॉंग्रेसपक्षानें भाग घेतला होता. सन १९३१ मध्यें इंग्लंडची आर्थिक परिस्थिति अत्यंत बिकट झाली. तेव्हां फ्रान्स व अमेरिका यांनीं इंग्लंडला प्रत्येकीं ४,००,००,००० पौंड कर्जाऊ दिले. त्यानेंही निभेना तेव्हां राष्ट्रीय सरकारनें सुवर्णपरिमाण सोडून दिलें. त्यानंतर राष्ट्रीय सरकारनें राजीनामा दिल्यानें पार्लमेंटची फेरनिवडणूक झाली. त्यांत राष्ट्रीयपक्ष बहुमतानें निवडून आल्यानें रॅम्से मॅक्डोनल्ड पुन्हां मुख्य प्रधान झाला.



'अँटीलोप' नामक आरमारी जहाज, १९२८

९. राष्ट्रीय प्रधानमंडळ (१९३१-३५):—या प्रधानमंडळांत स्टॅन्ले बाल्डविन, नेव्हिल चेंबर्लेन, सर जॉन सायमन, सर सॅम्युअल होअर वगैरे मुत्सद्दी होते. सन १९२६ सालीं भरलेल्या वसाहतींच्या परिषदेनें इंग्लंड व वसाहती यांचा दर्जा समान आहे असें ठरविलें होतें. त्यास अनुसरून पार्लमेंटनें सन १९३१ मध्यें वेस्ट मिन्स्टरचा कायदा पास करून त्या तत्त्वास मान्यता दिली. त्यामुळें वसाहतींस संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य मिळालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लंडची आर्थिक स्थिति सुधारण्याचा या प्रधानमंडळानें कसून प्रयत्न चालविला होता. खुल्या व्यापाराचें धोरण सोडण्याचें ठरवून त्यानें संरक्षित जकाती लादण्यास सुरुवात केली. त्यामुळें परकीय आयात मालावर जकाती लादल्या गेल्या. त्यामुळें सरकारचें उत्पन्न व सरकारची पत वाढली. सन १९३२ त ओटावा येथें कानडामध्यें साम्राज्यांतील घटकावयवांची एक आर्थिक परिषद भरविण्यांत आली. या परिषदेनें एक करार पास करून साम्राज्याच्या निरनिराळ्या घटकांनीं एकमेकांस व्यापारासंबंधीं सवलती द्याव्यात असें ठरलें. या कराराला 'ओटावा करार' असें म्हणतात. इंग्लंडनें या कराराला संमति दिल्यानें खुल्या व्यापाराचें धोरण त्या राष्ट्रानें टाकून दिलें व संरक्षित व्यापाराचें धोरण स्वीकारलें हें सिद्ध झालें. याच वेळीं राष्ट्रीय कर्ज फार वाढल्यानें त्याच्यावरील व्याजही पुष्कळ द्यावें लागे. तेव्हां सरकारनें पांच टक्के दराचे सर्व रोखे बदलून ते साडेतीन दराचे केले. यामुळें व्याज कमी झालें. सन १९३५ मध्यें हिंदुस्थानासंबंधीं सुधारणा-कायदा पास झाला. त्या कायद्यानें प्रांतिक स्वायत्तता सिद्ध झाली व मध्यवर्ती सरकाराच्या बाबतींत संयुक्त राज्यपद्धति जबाबदार राज्यपद्धतीच्या स्वरूपांत स्थापन करण्याचें ठरलें. त्याच वर्षी पांचव्या जॉर्जच्या कारकीर्दीला पंचवीस वर्षें झाल्यानें लंडन येथें मोठ्या थाटाचा रजतमहोत्सव साजरा करण्यांत आला. त्यावेळींही साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतील लोकांनीं बादशहा-बद्दलचा आपला अभिमान व आदर अनेक रीतींनीं उत्तम प्रकारें व्यक्त केला. यानंतर मुख्य प्रधान मॅक्डोनल्ड यानें राजीनामा दिल्यानें बाल्डविन राष्ट्रीय-पक्षाचा मुख्य नेता झाला व त्यानें मुख्य प्रधानाची जागा स्वीकारली. त्यानंतर त्यानें पार्लमेंटची नवी निवडणूक केली. त्यांत राष्ट्रीय सरकारला कॉमन्ससभेंत मताधिक्य मिळाल्यानें बाल्डविनच मुख्य प्रधान राहिला. मात्र सन १९३६ च्या जानेवारींत बादशाह पांचवा जॉर्ज वयाच्या ७० व्या वर्षी मृत्यु पावला. अत्यंत सनदशीर राजा म्हणून तो लोकप्रिय होता. त्याला आपली प्रजा फार आवडे; प्रजेचीही त्याच्यावर निष्ठा होती. त्याच्या कारकीर्दींत राष्ट्राची भरभराट झाली. त्याच्यामागून त्याचा ज्येष्ठ पुत्र आठवा एडवर्ड या नांवानें इंग्लंडचा राजा झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अ भ्या स

१. लॉईड जॉर्जच्या प्रधानमंडळाची युद्धोत्तर कामगिरी वर्णा.

२. स्टॅन्ले बाल्डविनच्या प्रधानमंडळाची (१९२४–२९) कामगिरी सांगा.

३. मजूरपक्षाची स्थापना केव्हां झाली ? त्याचें ध्येय व धोरण सांगा. आतांपर्यंत मजूरमंत्रिमंडळें केव्हां केव्हां स्थापन झालीं ? त्यांनीं कोणती कामगिरी केली ?

४. राष्ट्रीय मंत्रिमंडळ कां स्थापण्यांत आलें ? त्याची कामगिरी सांगा.

५. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या :—
ओटावा करार, लोकॅर्नो करार, डॉज योजना, चौथा सुधारणा कायदा, आयर्लंडचें स्वराज्य, सफ्रेजेट चळवळ, केलॉग करार, लॉसेनची परिषद.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालदर्श—१९०१-१९३६

वर्ष	इंग्लंड—महत्त्वाच्या गोष्टी	हिंदुस्थान—महत्त्वाच्या गोष्टी	यूरोप—महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ति
१९०२	शिक्षणाचा कायदा	कर्झन ग. ज. १८९९–१९०५	बोअर युद्ध संपलें.	बाल्फोर, जोसेफ चेंबर्लेन,
१९०४	फ्रान्स-इंग्लंड तह	तिबेटवर स्वारी	जपान-रशिया युद्ध सुरू	गोखले,
१९०५	इंग्लंड-जपान तह	बंगालची फाळणी	जपान-रशिया तह	बिपिनचंद्र पाल,
१९०७	लष्करी सुधारणा	सुरतेची राष्ट्रीय सभा	पनामा कालवा—खणती सुरू	टिळक,
१९०८	ॲस्क्विथचें प्रधानमंडळ १९०८—१९१६	टिळकांस शिक्षा		लजपतराय,
१९०९	दक्षिण आफ्रिकेचें संयुक्त सरकार	मोर्लेमिंटो सुधारणा		ॲस्क्विथ, पँकहर्स्ट
१९१०	पार्लमेंट ॲक्ट. ७ वा एडवर्ड, मृत्यु	लॉर्ड हार्डिंज ग. ज. १९१०—१६		लॉइड जॉर्ज, चर्चिल,
१९१२	टिटानिक बोट बुडाली		बाल्कन युद्ध (१९१२–१३)	कैसर,
१९१४	महायुद्ध १९१४—१८		महायुद्धास सुरुवात.	रवींद्रनाथ टागोर
१९१८	पार्लमेंट सुधारणा कायदा			
१९१९	व्हर्सायचा तह			
१९२०	राष्ट्रसंघाची स्थापना	असहकाराची चळवळ सुरू		वुड्रो विल्सन, हिंडेनबुर्ग,
१९२१	आयर्लंडला वसाहतीचें स्वराज्य	लॉर्ड रीडिंग १९२१—२६		गांधी,
१९२२	आयरिश 'फ्री स्टेट' स्थापना		मुसूलीनी इटलीचा सर्वाधिकारी.	केमालपाशा,
१९२४	पहिलें मजूर मंत्रिमंडळ	असहकाराची चळवळ तहकूब		मुसूलीनी,
१९२५	मजुरांस पेन्शन		लोकॅर्नो करार	लेनिन,
१९२८	पांचवा सुधारणा कायदा		केलॉग करार	रमण,
१९३१	राष्ट्रीय प्रधानमंडळ	गांधी—आयर्विन करार		स्टॅलिन, कॉनराड, हिटलर,
१९३६	पांचव्या जॉर्जचा मृत्यु	लॉर्ड लिनलिथगो, १९३६–		बर्नार्ड शॉ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७. दुसरें जागतिक युद्ध (१९३९)

१. राजा आठवा एडवर्ड (२० जाने. १९३६–१० डिसें. १९३६):— आठव्या एडवर्डचा जन्म सन १८९४ मध्यें झाला. लहानपणीं त्याचें शिक्षण उत्तम प्रकारें झालें होतें. आरमारी शिक्षणाची त्यास जात्याच आवड असल्यानें आपल्या वयाच्या वीस वर्षांपर्यंत त्यानें तें घेतलें होतें. महायुद्धामध्येंही त्यानें आरमारी अधिकारी म्हणून चांगलें काम केलें होतें. गरिबांबद्दल त्यास आपलेपणा वाटे व त्यांच्या हिताकरितां त्याची फार खटपट चाले. प्रवासाची आवड असल्यानें त्यानें पुष्कळ प्रवास केला होता. इंग्लंडबद्दल व इंग्लिश लोकांबद्दल त्यास अभिमान वाटे. त्यांच्या हिताकरितां तो नेहमीं झटे. वडील वारल्यावर त्याच्याकडे इंग्लंडचें राजपद आलें; मात्र त्यास लौकर राज्याभिषेक झाला नाहीं. राज्याभिषेक चार-पांच महिन्यांवर आला असतांच लग्नासंबंधीं एक विचित्र पेंचप्रसंग निर्माण होऊन त्याला राज्याभिषेक न होतांच राज्यत्याग करावा लागला. राजा एडवर्ड याचें प्रेम वॉलिस सिंमसन नामक एका अमेरिकन स्त्रीवर बसलें होतें. ती कुमारिका नव्हती; तिचें लग्न त्यापूर्वी दोनदां झालेलें होतें व तिचे दोन्ही नवरे जिवंत होते. तेव्हां त्या लग्नाला पार्लमेंटनें विरोध केला. मुख्य प्रधान बाल्ड-विन यानें प्रधानमंडळांतील सहकारी व सर्व वसाहतमंत्रि यांचा विचार घेऊन राजानें त्या स्त्रीशीं विवाह केला तर त्याला राज्यत्याग करावा लागेल असें सांगितलें. परंतु राजानें त्याच स्त्रीशीं विवाह करावयाचें ठरवून राज्यत्याग केला (१० डिसें. १९३६). त्यानंतर त्यानें इंग्लंडचाही त्याग केला व तो आपल्या प्रेयसीसह फ्रान्समध्यें जाऊन राहिला. तेथेंच त्या दोघांचें लग्न झालें. नंतर त्याला विंडसरचा ड्यूक ही पदवी अर्पण करण्यांत आली. त्याच्यामागून त्याच्या भावास इंग्लंडचें राजपद मिळालें. सन १९३९ चें युद्ध चालू झाल्यावर तो इंग्लंडांत गेला व सध्यां तो वेस्ट इंडीजचा गव्हर्नर जनरल आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. राजे सहावे जॉर्ज (१९३६):—आठवा एडवर्ड यानें राज्यत्याग केला ही घटना इंग्लंडच्या इतिहासांत अत्यंत विस्मयजनक आहे. त्यावेळीं इंग्लंडांत एखादी राज्यक्रांतीच व्हावयाची; परंतु इंग्लिश मुत्सद्यांच्या पुण्याईनें ती टळली व राजे सहावे जॉर्ज यांना इंग्लंडचें राजपद मिळालें.



त्यांचा जन्म सन १८९५ मध्यें झाला. लहानपणीं राजकुमारास योग्य असें शिकार करणें, घोड्यावर बसणें वगैरेंचें शिक्षण त्यांना देण्यांत आलें होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डार्टमथच्या आरमारी कॉलेजमध्यें त्यांचा वयाच्या सोळाव्या वर्षीच प्रवेश झाला होता. तेथें त्यांस उत्तम प्रकारचें आरमारी शिक्षण मिळालें होतें. राष्ट्राच्या औद्योगिक जीवनाकडे सहानुभूतीनें पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अभिमानास्पद आहे. मजुरांबद्दल त्यांस सहानुभूति वाटते. मुलांबद्दलही त्यांस आपलेपणा वाटतो व दरसाल त्यांच्या कँपमध्यें जाऊन त्यांची विचारपूस करण्याची त्यांस मोठी हौस आहे. महायुद्धामध्यें त्यांनीं जटलंडच्या आरमारी लढाईत प्रत्यक्ष भाग घेतलेला होता. त्याचप्रमाणें वैमानिकदळामध्येंही त्यांना कॅप्टनचा हुद्दा मिळालेला होता. ता. २६ एप्रिल, १९२३ रोजीं स्कॉटिश राजघराण्यांतील स्ट्रॅथमोरच्या अर्लची कन्या एलिझाबेथ यांच्याशीं मोठ्या थाटानें राजे सहावे जॉर्ज यांचा विवाह झाला. त्यांना राजकन्या एलिझाबेथ व मेरी अशा दोन कन्या आहेत. राजे सहावे जॉर्ज यांना प्रवासाची अत्यंत आवड आहे व त्यांनीं आजपर्यंत साम्राज्यांतील अनेक भागांत प्रवास केला आहे. ता. १२ मे, १९३७ रोजीं लंडनच्या वेस्टमिन्स्टर ॲबेमध्यें त्यांना व महाराणी एलिझाबेथ यांना राज्याभिषेक झाला. त्यावेळीं साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतील मुख्य प्रधान व इतर राष्ट्रांतील मुत्सद्दी लंडनला जमा झाले होते. त्याच वेळीं लंडनला एक साम्राज्यपरिषद भरविण्यांत आली होती. त्या परिषदेनें साम्राज्यसंरक्षणाची योजना केली व युद्ध सुरू न होतां जगांत शांतता नांदावी म्हणून शस्त्रसंन्यास व आरमारनियंत्रण यासंबंधीं चर्चा केली. त्याकरितां इतर राष्ट्रांशीं विचारविनियम करावा व त्यांचींही मनें वळवावीं असें ठरलें. ही परिषद चालू असतांच बाल्डविननें मुख्य प्रधानपदाचा राजीनामा दिला.

३. बाल्डविनचा राजीनामा :—बाल्डविन मुख्य प्रधान असतांच इटलीनें आफ्रिकेंतील ॲबिसीनिया प्रांतावर अचानकपणें स्वारी केली. इटलीच्या या आक्रमक धोरणाचा राष्ट्रसंघांतील सर्व राष्ट्रांनीं निषेध केला व त्या संघानें इटलीला ठपका दिला. इटलीचा सर्वाधिकारी सिनॉर मुसूलीनी यानें कोणालाच दाद दिली नाहीं. अखेर ॲबिसीनिया देश जिंकून त्यानें तो देश इटलीच्या साम्राज्यांत समाविष्ट केला. सन १९३६ मध्यें स्पेनमध्यें यादवी युद्ध सुरू झालें. रशियाप्रमाणें समाजसत्तावादी सरकार स्पेनमध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थापन करावें असें तेथील सरकारचें धोरण होतें. तें अनेकांस पसंत न पडल्यानें स्पेनमध्यें दोन तट पडून युद्ध पेटलें. सेनापति फ्रँको हा बंडखोरांचा पुढारी होता. त्याला हिटलर व मुसूलीनी यांची अनेक प्रकारची गुप्त मदत मिळाल्यानें त्याचा विजय झाला. वरील दोन्ही युद्धांच्या वेळीं बाल्डविनचें प्रधानमंडळ तटस्थच होतें. राजीनामा देण्यापूर्वी प्रधानमंडळांतील प्रधानांच्या पगारांत फेरफार करणारें बिल बाल्डविननें पार्लमेंटकडून पास करून घेतलें. त्याप्रमाणें मुख्य प्रधानाचा पगार पूर्वी वार्षिक पांच हजार पौंड होता तो दहा हजार पौंड झाला. त्याचप्रमाणें इतर कांहीं प्रधानांच्या पगारांतही थोडी वाढ करण्यांत आली. पुढें बाल्डविननें सन १९३७ मध्यें राजीनामा दिल्यानें कंझर्व्हेटिव्हपक्षाचा पुढारी नेव्हिल चेंबर्लेन इंग्लंडचा मुख्य प्रधान झाला. बाल्डविनला उमराव करण्यांत आल्यानें अर्ल बाल्डविन या नांवानें तो आज ओळखला जातो.

४. चेंबर्लेनचें प्रधानमंडळ (१९३७–१९४०) :—चेंबर्लेनच्या प्रधानमंडळांत सर जॉन सायमन, लॉर्ड हॅलिफॅक्स, होअर बेलीशा, डफ कूपर वगैरे मुत्सद्दी होते. नेव्हिल चेंबर्लेन इंग्लंडचा मुख्य प्रधान झाला त्या सुमारास युरोपची राजकीय परिस्थिति अत्यंत बिकट होती. आशियामध्येंही युद्धाचे ढग निर्माण होऊन सन १९३७ च्या ऑगस्टमध्यें चीन–जपान युद्ध सुरू झालें. जपाननें चीनवर आक्रमण करून त्या देशाचा पूर्वेकडील बहुतेक सर्व भाग लष्कराच्या जोरावर काबीज केला आहे. अजूनही हें युद्ध चालूच आहे. त्याच वेळीं युरोपांत एका नव्या युद्धाची नांदी सुरू झाली होती. त्यावेळच्या युरोपियन राष्ट्रांत सर्वाधिकारशाही सुरू

नेव्हिल चेंबर्लेन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाली होती. जर्मनी व इटली हीं राष्ट्रें प्रबळ होऊं लागून त्यांनीं आक्रमक धोरण स्वीकारिलें होतें. इंग्लंड व फ्रान्स यांचें सूत होतें व त्यांच्या साम्राज्यावर इटली व जर्मनी यांचा डोळा होता. त्यामुळें हेवा-दावा-असूया यांचा युरोपांत नंगा नाच सुरू झाला व जर्मनी व इटली हीं राष्ट्रें व्हर्सायचा अपमानकारक तह धुडकावून देण्यास सिद्ध झालीं.

५. शांततेकरितां चेंबर्लेनची धडपड :—तशाही स्थितींत चेंबर्लेननें आपल्या मनाची शांति ढळूं दिली नाहीं व युरोपांत शांतता टिकावी म्हणून त्यानें जिवापाड खटपट केली. त्यानें आयर्लंडशीं सलोख्याचा तह घडवून आणला व इटलीशींही मैत्रीचा तह केला. रशियाशीं मैत्रीचा तह घडवून आणण्याचा त्यानें निष्फळ प्रयत्न केला. जर्मनीच्या हिटलरनें यावेळीं युरोपची शांतता बिघडविण्याचा प्रयत्न चालविला होता. त्यानें आक्रमक धोरण स्वीकारून मध्य युरोपांतील प्रांत घेण्यास सुरुवात केली होती. चिटोऱ्याच्याही किंमतीचा नसलेला सन १९१९ चा व्हर्सायचा अपमानकारक तह आपण मानणार नाहीं असें सन १९३५ त त्यानें जाहीर केलें व त्याप्रमाणें त्यानें व्हर्सायचा तह मोडून सारप्रांत व ऱ्हाइनखोऱ्यांतील प्रदेश जर्मनीस जोडून घेतला. इटलीचा सर्वाधिकारी मुसोलीनी याच्याबरोबर त्यानें मैत्रीचा तह करून (ऑक्टोबर, १९३६) आपली शक्ति वाढविली. लगेच त्यानें सन १९३८ मध्यें ऑस्ट्रिया गिळंकृत केला व झेकोस्लोव्हाकियावर नजर ठेविली. पुढें सुडेटन प्रांतांतील बहुसंख्य लोक जर्मन आहेत तेव्हां तो प्रांत आपल्याला मिळाला पाहिजे असें तो म्हणूं लागला. जबरदस्ती करूनही तो प्रांत मिळविण्याची त्यानें तयारी दाखविली. तेव्हां युरोपची शांतता बिघडूं नये म्हणून चेंबर्लेननें मध्यस्थी केली व फ्रान्स, इंग्लंड, इटली व जर्मनी या राष्ट्रांची म्यूनिक येथें एक परिषद भरविली (सप्टेंबर १९३८). तेथें एक करार होऊन सर्व राष्ट्रांनीं त्या करारावर सह्या केल्या. म्यूनिक कराराप्रमाणें सुडेटन प्रांत जर्मनीच्या ताब्यांत द्यावा असें ठरलें. त्याच वेळीं 'आतां यापुढें युरोपांतील कोणताही प्रांत मिळविण्याची माझी इच्छा नाहीं' असें हिटलरनें चेंबर्लेनला वचन दिलें होतें. म्यूनिक करार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केल्यानें अनेकांनीं चेंबर्लेनला शाबासकी दिली; अनेकांनीं त्याला दोषी ठरवून गुप्तपणें शिव्या दिल्या.

६. चेंबर्लेनचा राजीनामा :—म्यूनिकच्या करारानंतरही हिटलरनें आपले बेत चालू ठेवले होते. थोड्याच दिवसांत जर्मनीनें झेकोस्लोव्हाकिया आपल्या राज्यास जोडला (१४ मार्च, १९३९) व पुढें त्याची दृष्टि डँझिग, मेमेल व पोलंड यांच्याकडे वळली. त्याच वेळीं हिटलरनें आपलीं पूर्वींचीं मतें झुगारून देऊन रशियाशीं मैत्रीचा तह केला (२३ ऑगष्ट, १९३९) व तो झाल्याबरोबर त्यानें पोलंडवर अचानक झडप घालून जगांतील दुसऱ्या महायुद्धास सुरुवात केली (१ सप्टेंबर, १९३९). इंग्लंडनें पोलंडच्या स्वातंत्र्याची हमी घेतली होती. त्यामुळें चेंबर्लेननेंही फ्रान्सच्या संमतीनें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारिलें. जर्मनीनें पोलंडवर हल्ला केला व तो देश पंधरा दिवसांत पादाक्रांत केला. मात्र त्या विजयानंतर पोलंडचे दोन विभाग पाडण्यांत येऊन पोलंडचा पूर्वभाग रशियानें घेतला व पश्चिम भाग जर्मनींत समाविष्ट करण्यांत आला. पोलंडच्या पराभवानंतर हें युद्ध फार रेंगाळलें. पुढें हिटलरनें ९ एप्रिल, १९४० रोजीं डेन्मार्कवर अचानक हल्ला चढवून तो देश एकही गोळी न उडवितां एका दिवसांत जिंकला व त्यानें लगेच नॉर्वेवर अचानकपणें आक्रमण करून त्या देशाच्या स्वातंत्र्यावरही घाला घातला. चेंबर्लेननें तिकडे दोस्तांचें लष्कर व आरमार नॉर्वेस मदत करण्याकरितां पाठविलें. तेथील आरमारी युद्धांत जर्मनीचा पराजय झाला, तरी जर्मन लष्करानें मोठी मर्दुमकी गाजवून दोस्तांच्या विरोधास न जुमानतां नॉर्वेचें राजधानीचें शहर ऑस्लो काबीज केलें. तेव्हां दोस्तांच्या सैन्याला तेथून माघार घ्यावी लागली. त्यामुळें चेंबर्लेनवर पार्लमेंटमध्यें गहजब उडाला तेव्हां त्यानें राजीनामा दिला व त्याच्या जागीं विन्स्टन चर्चिल इंग्लंडचा मुख्य प्रधान झाला.

७. विन्स्टन चर्चिलचें प्रधानमंडळ (मे १९४० पासून):—विन्स्टन चर्चिलच्या प्रधानमंडळांत इंग्लंडमधील सर्व पक्षांचे लोक सामील झाले आहेत. त्यांत ग्रीनवुड, मेजर अटली, हर्बर्ट मॉरिसन वगैरे मजूरपक्षीय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुत्सद्दी आहेत, तसेंच सर जॉन सायमन, आर्चिबाल्ड सिंक्लेर वगैरे लिबरल-पक्षीय मुत्सद्दी आहेत व अँथनी ईडन, लॉर्ड लॉइड, डफ कूपर, लॉर्ड हॅलिफॅक्स, नेव्हिल चेंबर्लेन, सर जॉन अँडरसन, सर किंग्जले वुड वगैरे कंझर्व्हेटिव्ह मुत्सद्दी आहेत. देशावर आलेलें संकट दूर करण्याकरितांच हें सर्वपक्षीय मंत्रिमंडळ नेमलें गेलें आहे. अर्थात् त्याला मिश्र प्रधानमंडळ असेंही म्हणतां येईल. मात्र त्याला राष्ट्रीय प्रधानमंडळ असें म्हणतात. या प्रधान-मंडळावर पार्लमेंटनें आपला पूर्ण विश्वास असल्याचें दर्शविलें. युद्धाचें धोरण नीट व जोरदारपणें आंखतां यावें म्हणून या मंत्रिमंडळानें एक युद्ध-समितीही नेमिली आहे. त्यांत मुख्य प्रधान विन्स्टन चर्चिल, चेंबर्लेन, लॉर्ड हॅलिफॅक्स, मेजर अटली व ग्रीनवुड यांचा समावेश झालेला आहे. विन्स्टन चर्चिल मोठा तडफदार मुत्सद्दी आहे. गेल्या महायुद्धांत त्यानें उत्कृष्ट काम-गिरी बजाविलेली आहे. असा अनुभवी व तडफदार मुत्सद्दी इंग्लंडचा कर्ण-धार झाल्यानें इंग्लंडांत व साम्राज्यांत आशादायक वातावरण निर्माण झालें.

विन्स्टन चर्चिल

८. ब्रिटिश आरमाराचें कार्य :—युद्धाच्या सुरुवातीपासूनच जर्मनीनें इंग्लंड, फ्रान्स व इतर तटस्थ राष्ट्रांचीं आरमारी व व्यापारी जहाजें, आपल्या पाणबुड्या व 'यू' बोटी यांच्या साहाय्यानें बुडविण्याचें कार्य आरंभिलें होतें. परंतु ब्रिटिश आरमारानें त्यांचा संहार करण्याचें कार्य आरं-भून समुद्रावरील संचार सुरक्षित केला व समुद्रावरील आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें. दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यावर 'ॲडमिरल ग्रॅफ स्पे' नामक एका जर्मन युद्धनौकेवर दोन छोट्या ब्रिटिश युद्धनौकांनीं हल्ला चढवून त्याची कमालीची नासाडी केली. शेवटीं स्वसंरक्षणार्थ त्या बोटीनें आत्म-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाश करून घेतला. ग्रॅफ स्पेवरील हल्ला इतिहासांत अजरामर होऊन राहण्यासारखा आहे असें म्हणतात. जर्मनीनें नॉर्वेवर हल्ला केला त्यावेळींही ब्रिटिश आरमारानें जर्मन आरमारावर जोराचा हल्ला करून त्याचा धुव्वा उडविला. ब्रिटिश साम्राज्याचें संरक्षण करण्याचें कार्य तर सततचें आहे व त्याबरोबरच साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतून युद्धसामुग्री व रसद पोंचविण्याचें कार्यही ब्रिटिश आरमार चोखपणें आज करीत आहे. शिवाय जर्मनीचा आर्थिक कोंडमारा करण्याच्या कार्यांतही ब्रिटिश आरमारानें मोठा भाग उचललेला आहे. यामुळें जर्मनींत अन्नाचा व युद्धोपयोगी सामुग्रीचा तुटवडा पडून तें राष्ट्र वठणीवर येईल असा ब्रिटिश मुत्सद्यांचा विश्वास आहे.

९. फ्रान्सची शरणागति:—चर्चिल मुख्य प्रधान झाला त्यावेळीं नॉर्वेंत रणकंदन चाललेलेंच होतें. इंग्लिश व फ्रेंच सैनिक तेथें मोठ्या मर्दुमकीनें लढत होते; परंतु थोड्याच दिवसांत दोस्तांनीं नॉर्वेंतील आपलें लष्कर काढून घेतलें. तेव्हां जर्मनीनें त्या देशांत आपली सत्ता स्थापन केली. त्यानंतर जर्मनीनें आपली दृष्टि हॉलंड, बेल्जम व लक्झेंबर्ग या देशांकडे वळविली (१० मे, १९४०). केवळ चारच दिवसांत डच लोक जर्मनांना शरण गेले व त्यांनीं शस्त्रास्त्रें खालीं ठेविलीं. १९ मे, १९४० रोजीं जर्मनीनें हॉलंड देश जर्मन राज्यांत समाविष्ट केला. त्यावेळीं बेल्जममध्यें रणकंदन सुरू होतें. गेल्या महायुद्धांत बेल्जियन लोक मोठ्या हिंमतीनें व शौर्यानें लढले होते; परंतु यावेळीं जर्मनीच्या तुफानी माऱ्यापुढें त्यांचें कांहीं चालेनासें झालें. तेव्हां २७ मे, १९४० रोजीं त्यांचा राजा लिओपोल्ड, यानें बेल्जियन सैनिकांस शस्त्रें खालीं ठेवण्यास सांगितलें व तो जर्मनांस शरण गेला. दोस्तांस त्याचें हें कृत्य पसंत पडलें नाहीं. पश्चिम युरोपांतील एकामागून एक देश अशा रीतीनें पादाक्रांत झाल्यानें जर्मनीचा पराभव करण्याचें काम फ्रान्स व इंग्लंड या दोन देशांवर पडलें. त्यांचीं सैन्यें मोठ्या जोमानें जर्मन सैन्याशीं लढत होतीं. परंतु शेवटीं फ्रेंचांचा धीर खचत गेला. त्यांचा एकसारखा पराभव होत गेल्यानें तह करावा असें फ्रेंच मुत्सद्यांस वाटूं लागलें. याचवेळीं ता. १० जून, १९४० रोजीं जर्मनीच्या बाजूनें इटलीनें इंग्लंड व फ्रान्स यांच्याविरुद्ध युद्ध पुकारिलें. शेवटीं युद्धास कंटाळून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फ्रान्सचा त्यावेळचा मुख्य प्रधान मार्शल पेतॉं यानें ता. १७ जून रोजीं युद्धतहकुबीची याचना केली व तो जर्मनी व इटली यांना शरण गेला. त्याची मागणी मान्य करण्यांत येऊन फ्रान्सबरोबर चालू असलेलें युद्ध जर्मनी व इटली यांनीं ता. २४ जून, १९४० रोजीं थांबविलें. असें म्हणतात कीं वरील सर्व देश जिंकतांना जर्मनीनें हेरगिरी, साम-दाम-दंड-भेद, फंद-फितुरी वगैरेंचा उपयोग पुरेपूर केला व नव्या नव्या मार्गांचा व उपायांचा अवलंब करून व नव्या युद्धसाधनांचा उपयोग करून युद्ध करण्याची पूर्वीची पद्धति पार बदलून टाकली. यामुळेंच जर्मनीला लागोपाठ विजय मिळाले.

१०. इंग्लंडशीं युद्ध सुरूच :—फ्रान्ससारखें अव्वल दर्जाचें लष्करी दृष्टीनें मोठें सामर्थ्यवान् राष्ट्र शरण गेलें ही गोष्ट अनेक स्वाभिमानी फ्रेंचांस रुचली नाहीं. ते लोक इंग्लंडमध्यें गेले व त्यांनीं स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं त्या राष्ट्राला सर्वतोपरी मदत करण्याचें ठरविलें. तेंच धोरण फ्रान्सच्या कांहीं वसाहतींनींही स्वीकारिलें. फ्रान्सच्या शरणागतीमुळें फ्रेंच साम्राज्यावर मोठा वज्राघातच झाला. मात्र फ्रान्सच्या शरणागतीनें जर्मनांना खरा आनंद झाला. इंग्लंडही थोड्याच दिवसांत आपल्याला शरण येईल असा त्यांचा अंदाज होता. परंतु फ्रान्सच्या पराभवानंतर इंग्लंडचा मुख्य प्रधान चर्चिल यानें सर्वांस धीर देऊन 'फ्रान्सचें युद्ध संपलें; आतां इंग्लंड व जर्मनी यांचें युद्ध सुरू झालें' असे स्वाभिमानपूर्वक उद्गार काढले. संकटकाळींही धीर धरून इंग्लिश लोकांमध्यें चर्चिलनें जो आत्मविश्वास निर्माण केला तो अपूर्व होय. त्याच्या धीरोदात्त उद्गारांमुळें इंग्रजांमध्येंच नव्हे, तर साऱ्या ब्रिटिश साम्राज्यांतील लोकांमध्यें आत्मविश्वास बळावला व ते लोक विजय संपादण्यास मोठ्या हुरुपानें तयार झाले. फ्रान्सचा पराभव झाल्यानें त्यांचें सामर्थ्यवान् आरमार इटली व जर्मनी या देशांच्या ताब्यांत जाईल व त्यांची शक्ति वाढेल हें चर्चिलनें तावडतोब ओळखलें. लगेच फ्रेंच आरमारावर झडप घालून आपल्या आरमाराच्या साहाय्यानें त्यानें अर्धें अधिक फ्रेंच आरमार आत्मसात् केलें. यामुळें शत्रूचें आरमार सामर्थ्यवान् तर झालें नाहींच, उलट इंग्लंडच्या आरमाराची शक्ति मात्र वाढली. इंग्लंडचें अतुलनीय आरमारी सामर्थ्य व त्याचें भौगोलिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैशिष्ट्य लक्षांत घेऊन जर्मनीशीं युद्ध करण्याचें चर्चिलनें ठरविलें. जर्मनीचे वैमानिक हल्ले परतविण्याकरितां इंग्लंडचें वैमानिक दल सुसज्ज व बलवान् केलें पाहिजे हें त्यानें ओळखलें. तावडतोब त्यानें इंग्लंडमध्यें नानाप्रकारचीं विमानें तयार करण्यास कारखानदारांस सांगितलें, अमेरिकेकडून अनेक प्रकारचीं विमानें खरीदण्यास सुरुवात केली व साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतून उत्तमोत्तम वैमानिक व नानातऱ्हेचीं विमानें आणण्यास सुरुवात केली. आतांपर्यंतच्या लढाईंत जर्मनीचे अनेक वैमानिक मारले गेले होते व त्या देशाचें वैमानिक दल पूर्वीसारखें बलवान् राहिलें नव्हतें हें तो जाणून होता. अशी तयारी चालू असतांच हिटलरनें तहाचें बोलणें केलें व तें मान्य न केल्यास ब्रिटिश साम्राज्याचा नाश होईल, अशी धमकी दिली. परंतु त्यानें डगमगून न जातां इंग्लंडचा परराष्ट्रमंत्रि लॉर्ड हॅलिफॅक्स यानें त्याला उत्तर देऊन युद्धांत विजय मिळवूंच मिळवूं असें बजाविलें. इंग्लंडवर जर्मनीचे वैमानिक हल्ले होतच होते व त्याला इंग्रज वैमानिक चोख उत्तर देत होते. या हल्ल्याप्रतिहल्ल्यांत जर्मनीचीं अनेक विमानें दररोज नष्ट होत होतीं. ब्रिटिश वैमानिक मोठ्या हिरीरीनें युद्ध करून विजय मिळवूं लागल्यानें इंग्रजांचा आत्मविश्वासही दुणावला व त्यांस विजयाची आशा वाटूं लागली. आज ब्रिटिश वैमानिक दल अग्रेसर ठरत आहे व त्यापुढें जर्मन वैमानिक दळाचें कांहीं चालेंनासें झालें आहे. या वैमानिक युद्धांत जर्मनीला हारच खावी लागली व त्यामुळें इंग्लिश खाडीमार्गें इंग्लंडवर लष्करी हल्ला करण्याचा उद्देशही मागें पडला. हाही इंग्लंडचा विजयच होय. या गोष्टी घडत असतांच इंग्लंडनें इटली-जर्मनीचा आर्थिक कोंडमारा करण्याचें धोरणही चालूच ठेवलें आहे.

११. रशियाची प्रगति :—युरोपच्या पश्चिमेकडे अशा तऱ्हेनें रणकंदन चालू असतांच जर्मनीशीं स्नेहाचा तह करणारा रशिया गप्प नव्हता. प्रत्यक्ष युद्धामध्यें भाग न घेतां त्यानें आपल्या पश्चिम सरहद्दीला लागून असलेल्या राष्ट्रांवर दडपण आणण्यास सुरुवात केली. व्हर्सायच्या तहानें रशियाचा बराचसा मुलुख तोडून घेऊन फिनलंड, लटेव्हिया, इस्टोनिया, लिथुआनिया वगैरे राष्ट्रें बाल्टिक समुद्राच्या किनाऱ्यावर निर्माण करण्यांत आलीं होतीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यामुळें रशियाला बाल्टिक समुद्रावर वर्चस्व ठेवणें अशक्य झालें होतें. हें शल्य रशियाच्या मनांत डांचत होतें. तेव्हां योग्य संधीची वाट पहात रशिया बसला होता. जर्मनीनें पोलंडचा पराभव करून निम्मा पोलंड काबीज केलेला पाहतांच रशियानें पोलंडच्या पूर्वसरहद्दीकडून त्या राष्ट्रावर चाल केली व अल्पावधींत निम्मा पोलंड हस्तगत करून तो आपल्या राज्यास जोडला. पुढें त्याची दृष्टि फिनलंडकडे वळली व त्या राष्ट्राकडे बाल्टिक समुद्रावरील कांहीं महत्त्वाच्या ठाण्यांची मागणी करून त्यांच्याऐवजीं त्याला दुसरा भाग देण्याचें ठरविलें. ही गोष्ट फिनलंडनें अमान्य केल्यानें रशियानें त्याच्यावर चाल केली. त्या युद्धांत फिनलंडचा पराभव झाल्यानें त्याला रशियाच्या सर्व मागण्या मान्य कराव्या लागल्या. पुढें जुलै, १९४० मध्यें रशियानें रुमेनियाकडे आपली दृष्टि वळवून त्या देशाकडून बेसअरेबिया व बुकोव्हीना या प्रांतांची मागणी केली. जर्मनीच्या संमतीनें रुमेनियानें ती मागणी मान्य केली. हें पाहतांच रुमेनियाचे लचके तोडण्याकरितां हंगेरी व बल्गेरिया हीं राष्ट्रं पुढें सरसावलीं. त्याचा निकाल सलोख्यानें लावावा असें जर्मनीनें सुचविल्यावरून रुमेनियानें ट्रॅन्सिलव्हॅनियाचा बराच मोठा भाग हंगेरीला व डोब्रूजाचा थोडा भाग बल्गेरियाला दिला. त्यानंतर रुमेनियांत राज्यक्रांति होऊन राजा पॉल यानें राज्यत्याग केला व त्याचा मुलगा मायकेल रुमेनियाचा राजा झाला. या घटनेमुळें रुमेनिया जर्मनीच्या वर्चस्वाखालीं गेला. याच सुमारास लटेव्हिया, इस्टोनिया व लिथुआनिया या राष्ट्रांनीं रशियास सामील होण्याची आपली इच्छा दर्शविली व रशियानेंही मोठ्या आनंदानें ती मान्य केली. वरील सर्व घडामोडींमुळें बाल्टिक समुद्रावर रशियाची सत्ता पूर्णपणें स्थापन झाली.

१२. युद्धाच्या इतस्ततः पेटणाऱ्या ज्वाला:—युरोपांत युद्ध सुरू झाल्यानें व पादाक्रांत देश बेचिराख झाल्यानें सर्व युरोपांत दुष्काळानें सर्वांस भेडसावण्यास सुरुवात केली आहे. तुर्कस्थान तटस्थ असलें तरी त्याचा ओढा इंग्लंडकडे आहे. सर्व बाल्कन संस्थानांत युद्धाचा अग्नि धुमसत असल्यानें तो केव्हां पेट घेईल तें सांगतां येत नाहीं. इटलीनें युद्धांत पदार्पण केल्यापासून आफ्रिकेंत युद्धाचीं अनेक लहानमोठीं रणक्षेत्रें निर्माण झालीं आहेत व लिबिया, इजिप्त, कीनिया, सोमालीलँड वगैरे भागांत एकसारख्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चकमकी होत आहेत. पुढें ब्रिटिश सोमालीलँड हा निर्जन प्रदेश ब्रिटननें सोडून दिल्यानें तो इटलीच्या ताब्यांत गेला. एडन, माल्टा, जिब्रॉल्टर वगैरे ब्रिटिश साम्राज्याच्या नाक्यांवर इटलीनें अनेक निष्फळ वैमानिक हल्ले चढविले. भूमध्यसमुद्रांतील ब्रिटनचें आरमार सामर्थ्यवान् असल्यानें इटलीला त्या भागांत फारशी गडबड करतां येत नाहीं. चीन व जपान यांच्यामधील युद्ध चिघळत असतांही, युरोपांतील राष्ट्रें युद्धांत गुंतलेलीं पाहून, स्वार्थी जपाननें पूर्वेकडे आपले हातपाय पसरण्यास सुरुवात केली आहे. इंडो-चायनावर डोळा ठेवून तो प्रांत बळकाविण्याची त्यानें महत्त्वाकांक्षा बाळगलेली दिसत आहे. तसेंच पूर्वेकडील मसाल्याचीं बेटें, सिंगापूर, ब्रह्मदेश वगैरेंवरही त्याचा डोळा आहे. ता. २७ सप्टेंबर, १९४० रोजीं जर्मनी, इटली व जपान या तीन राष्ट्रांत दहा वर्षांचा एक राजकीय व लष्करी करार झाला. त्यांतून रशिया वगळला गेला होता. यानंतर बाल्कन संस्थानांत जर्मनीनें आपलें लष्कर घुसविलें व तेथें आपलें वर्चस्व स्थापण्यास सुरुवात केली. जर्मनीचें धोरणही रशियाच्या विरुद्ध दिवसेंदिवस झुकूं लागलें आहे. या सर्व गोष्टी-मुळें जर्मनी व रशिया यांच्यांतही युद्ध होईल असें कांहीं म्हणतात. या सर्व घडामोडींवर अमेरिका व इंग्लंड डोळ्यांत तेल घालून पहात आहेत. अमे-रिका व जपान यांच्यामध्यें पॅसिफिक महासागरांतही युद्ध उत्पन्न होण्याचा बराच संभव आहे. इंग्लंडला मात्र अमेरिकेची सर्वतोपरि प्रत्यहीं मदत मिळत आहे व तें राष्ट्र इंग्लंडच्या वतीनें युद्धांत उडी घेईल असें म्हणतात. अमेरिकेलाही जर्मनीचें भय वाटत आहेच व त्यामुळें त्या देशांनेंही युद्धाची तयारी चालविलेली आहे. या सर्व गोष्टींचा निकाल कसा व केव्हां लागणार तें आज कसें सांगतां येणार ?

अभ्यास

१. चेंबर्लेनच्या प्रधानमंडळाचें कार्य सांगा. चेंबर्लेननें शांतता स्थापण्या-करितां कोणते प्रयत्न केले ?
२. कोणत्या परिस्थितींत विन्स्टन चर्चिल मुख्य प्रधान झाला ? त्याची कामगिरी सांगा.
३. दुसरें महायुद्ध कोणत्या परिस्थितींत निर्माण झालें ? त्याला विशेष कोण कारणीभूत झालें ?
४. व्हर्सायच्या तहामुळेंच हें युद्ध निर्माण झालें हें खरें काय ? कशावरून ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८. विसाव्या शतकांतील इंग्लंड

१. शास्त्रीय शोधांची प्रगति :—एकोणिसाव्या शतकांत शास्त्रीय प्रगति झपाट्यानें झाली. विसाव्या शतकांतही अनेक प्रकारांनीं ती प्रगति चालू आहे. त्यामुळें इंग्लंडमधील लोकांच्या आचाराविचारांत, त्यांच्या उद्योगधंद्यांत, त्यांच्या दळणवळणाच्या साधनांत, त्यांच्या कारखान्यांत, त्यांच्या जीवनांत, त्यांच्या राजकारणांत व त्यांच्या व्यापारी संबंधांत अनेक प्रकारचे फरक पडलेले आज आपल्याला दिसून येतात. यामुळेंच इंग्लंड देश आज सुधारलेल्या जगांत अभिमानानें व जरासा तोऱ्यानें मिरवत आहे. विसाव्या शतकांत अनेक शास्त्रीय शोध लागले. त्या सर्व शोधांत मार्कोनी (१८७४–१९३७) या इटालियन शास्त्रज्ञाचा नभोवाणी-संदेशाचा शोध अत्यंत महत्त्वाचा होय. मार्कोनीनें सन १९०१ मध्यें इंग्लंडमधून न्यू फाऊंडलंडमध्यें नभोवाणी-द्वारा संदेश पाठविला. त्याचा शोध अत्यंत आश्चर्यकारक खराच; तसेंच त्यामुळें लोकांवर अनंत उपकार झाले ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. सर जगदीशचंद्र बोस या हिंदी शास्त्रज्ञानेंही तो शोध अगोदर लावला होता असें म्हणतात. आइन्स्टाइन (जन्म, १८७९) या जर्मनानें विज्ञानशास्त्रांत अनेक आश्चर्यकारक शोध लावले. जर्मनीमध्यें हिटलरशाही स्थापन झाल्यानंतर त्याला जर्मनींतून–तो ज्यू असल्यामुळें–हांकून देण्यांत आलें. आज तो अमेरिकेंत विज्ञानशास्त्राचा प्राध्यापक आहे. त्याच्या 'सापेक्षता वादानें' जगाला मोठाच धक्का दिला. सर फ्रेडरिक हॉपकिन्स याच्या शोधांमुळें पुढें सन १९२७-२९ पर्यंत 'ए,' 'बी,' 'सी' 'डी' वगैरे व्हिटॅमिन्सचा शोध लागला व त्यांच्यावरून अन्नांतील सत्त्वांश ओळखला जाऊं लागला. हेन्री मोस्ले (१८८७–१९१५) या शास्त्रज्ञानें 'क्ष' किरणांच्या साहाय्यानें अनेक चमत्कारिक शोध लावले. विद्युत्परिमाणू सर्वत्र असतात या शोधास त्याच्या शोधामुळें बळकट पुरावा मिळाला. स्थापत्य-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शास्त्रांतही क्रांतिकारक शोध लागले. सीमेंट कॉंक्रीटचा उपयोग इमारती-करितां चांगला होतो असें सिद्ध झालें. एंजिनांमध्येंही पुष्कळच प्रगति झाली.

२. विमानविद्येची प्रगति :—हायड्रोजन अथवा साधी हवा भरलेले फुगे सन १७८२ पासून पॅरिसमध्यें उडूं लागले होते; परंतु पहिलें विमान सन १८८४ मध्यें आकाशांत भराऱ्या मारूं लागलें. उडत्या घारीच्या आकाराचीं तीं विमानें असत; परंतु तीं आकाशांत फार उंच उडत नसत. पुढें सन १९०१ मध्यें सन्टॉस डुमो या फ्रेंच गृहस्थानें आपलें विमान तयार करून पॅरिसच्या एफिल टॉवरभोंवतीं घिरट्या घातल्या. तो प्रकार पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें. त्याच्या विमानांत गॅस नसून एंजिन होतें. तेव्हांपासून आकाशयानें बांधण्यास सुरुवात झाली. पुढें कौंट झेपेलिन (१८३८–१९१७) या जर्मनानें पहिलें उत्तम आकाशयान बांधलें. त्या वेळेपासून विमानांचा खरा उपयोग लोकांस कळूं लागला. यानंतर प्रत्येक राष्ट्रांत आकाशयानें



'R 34' नामक आकाशयानाची भरारी

बांधण्यास सुरुवात झाली. गेल्या महायुद्धांत जर्मन वैमानिकांनीं इंग्लंडवर अनेक वैमानिक हल्ले केले व तेव्हांपासून वैमानिकदलाची प्रत्येक राष्ट्राला किती जरूरी आहे तें पटवून दिलें. विमानांच्या साहाय्यानें वैमानिकांनीं नवीन भूभागांचे शोधही लाविले. कॅप्टन स्कॉट (१८६८–१९१२) या वैमानिकानें सन १९१० मध्यें दक्षिण ध्रुवाजवळील भाग शोधण्याकरितां इंग्लंडांतून उड्डाण केलें. तो इच्छित स्थळीं पोंचला; परंतु त्याच्यापूर्वींच कॅप्टन अमुंडसेन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१८७२–१९२८) या नॉर्वेजियन वैमानिकानें दक्षिण ध्रुवाजवळ आपल्या देशाचें निशाण रोंवलेलें त्याला दिसलें. त्यामुळें तो हताश झाला. तेथेंच तो सन १९१२ मध्यें बर्फामुळें गोठून मेला. पुढें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्याच्या शर्यती झाल्या. त्यांत जॉन अल्कॉक व व्हिटन ब्राऊन या वैमानिकांनीं अॅटलांटिक महासागर ओलांडून दहा हजार पौंडांचें बक्षीस सन १९१९ मध्यें मिळविलें. यानंतर अॅलन कॉबहॅम, चार्ल्स स्कॉट, किंग्जफर्ड स्मिथ, मॉलिसन, अमी जॉन्सन वगैरे अनेक स्त्रीपुरुष वैमानिक



'R 101' नामक आकाशयानाची भरारी

पुढें आले व त्यांनीं आकाशयानांत अनेक उच्चांक स्थापिले. खुद्द आकाशयानांच्या बांधणींतही अनेक फरक झाले व अजस्र विमानें बांधण्यांत येऊं लागलीं. सन १९१९ मध्यें 'आर् ३४' या नांवाचें एक अजस्र विमान इंग्लंडहून अमेरिकेस उडून गेलें व तेथेंच तें उतरतांक्षणीं जळून खाक झालें. त्यानंतर 'आर् १०१' या नांवाचें दुसरें एक प्रचंड विमान सन १९३० मध्यें बांधलें गेलें. तें हिंदुस्थानास येण्यास निघालें असतांच फ्रान्समध्यें जळून खाक झालें. पुढें निरनिराळ्या देशांतही विमानांतून वाहतुक होऊं लागली. टपालाप्रमाणेंच प्रवासीही विमानमार्गें जाऊं लागल्यानें थोड्या वेळांत पुष्कळ लांबपर्यंत जातां येणें शक्य झालें. हिमालयासारख्या अत्युच्च पर्वताच्या शिखरांची पहाणीही वैमानिकांनीं केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. दळणवळणाचीं इतर साधनें :—एकोणिसाव्या शतकांत मोटारींचा शोध लागलेला होताच. विसाव्या शतकांत त्यांच्या बांधणींत पुष्कळ फरक झाले व विजेच्या साहाय्यानेंही मोटार सुरू करण्याची युक्ति निघाल्यानें मोटारींचा खप बेसुमार वाढला. सन १९०० मध्यें मोटरसायकल प्रथम अस्तित्वांत आली. त्या गाडीला 'बाजूची गाडी' जोडण्यांत आल्यानें ती गाडीही लौकरच लोकप्रिय झाली. सन १९०० मध्यें लंडनमध्यें 'ट्यूबरेल्वे' सुरू झाल्यानें शहरांतील रस्त्यांतील वाहतुक बरीच कमी झाली. जहाजांच्या बांधणींतही फरक करण्यांत आले. त्यामुळें अजस्र बोटी बांधण्यास सुरुवात झाली. ओशियानिक, मॅजेस्टिक, मॉरेटॅनिया, टैटानिक, क्वीन मेरी, नॉर्मंडी वगैरे अजस्र आगबोटी ॲटलांटिक महासागर ओलांडून जाऊं-येऊं लागल्या. सन १९१२ मध्यें टैटानिक ही अजस्र बोट सागरांतील हिमपर्वतावर आपटली व बुडाली. त्यामुळें जवळजवळ दीड हजार माणसें मृत्युमुखीं पडलीं. हीं जहाजें पन्नास साठ हजार टन वजनाचीं असूनही त्यांचा ताशीं वेग २७–२८ नॉटस् म्हणजे सुमारें ३०–४० मैल असतो. त्यांच्यावरील सुखसोयी राजवाड्यालाही लाजवितात.

४. सिनेमा-टेलीव्हिजन :—टॉमस एडिसननें मॅजिक लॅंटर्नचा शोध लावला होता. त्यांतच सुधारणा करून त्यानें सिनेमाचा शोध लावला. त्यामुळें जिकडेतिकडे लोकांना सिनेमाचें वेड लागलें, तें इतकें कीं त्यामुळें नाटकगृहें ओस पडूं लागलीं! सिनेमाचीं चित्रें प्रथमतः बोलकीं नसत व चित्रांच्या हालचालींवरून त्यांचा भावार्थ ओळखावा लागे. ही गोष्ट लक्षांत घेऊन सन १९२८ पासून बोलपट सुरू झाले. त्यामुळें हालचालीप्रमाणेंच नटांचे संवादही लोकांस ऐकूं येऊं लागले. या बाबतींत अमेरिकेनें इतकी प्रगति केली कीं, त्यामुळें इंग्लिश कंपन्यांचा धंदा बसूं लागला. तेव्हां पार्लमेंटनें सन १९२७ मध्यें कायदा करून बोलपटगृहाच्या मालकानें शेंकडा अमुक टक्के इंग्लिश बोलपट दाखविलेच पाहिजेत असें ठरविलें. संवाद, संगीत व वार्ता पसरविण्याची सोय ब्रॉडकास्टिंगनें केली. सन १९०४ मध्यें जोसेफ चेंबर्लेननें पहिलें भाषण 'ब्रॉडकास्ट' केलें. सन १९२१ मध्यें ब्रॉडकास्टिंगला सरकारीरीत्या प्रथम सुरुवात झाली व पुढच्याच वर्षी लंडनमध्यें एक ब्रॉड-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कास्टिंग स्टेशन उघडण्यांत आलें. पुढें सन १९२२ मध्यें 'ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कंपनी' (बी. बी. सी.) स्थापन होऊन तिच्या तर्फे रेडियोचे कार्यक्रम होऊं लागले. त्या कंपनीला दर दहा वर्षांनंतर सरकारकडून त्याबद्दल परवाना घ्यावा लागतो. त्या कंपनीचे कार्यक्रम अति लोकप्रिय झाल्यानें इंग्लंडमध्यें घरोघरीं रेडियो होऊं लागले. तरीही त्यांत एक गैरसोय होती. ती म्हणजे गाणारा किंवा बोलणारा दिसत नसे. ही गोष्ट लक्षांत घेऊन जॉन बर्ड यानें शोध चालू करून सन १९२६ मध्यें 'टेलिव्हिजनचा शोध' प्रसिद्ध केला व त्याचें पहिलें प्रदर्शन केलें. तें यशस्वी झाल्यानें सन १९२९ मध्यें टेलीव्हिजन कंपनी लंडनला स्थापन झाली व तिच्या तर्फे कार्यक्रम ठरूं लागले. हा शोध अजून प्रथमावस्थेंत असल्यानें त्याला जबर किंमत द्यावी लागते. त्यामुळें तो फारसा लोकप्रिय नाहीं.

५. व्यापाराची मंदी :—महायुद्ध चालू होतें त्यावेळीं अमेरिका, जपान वगैरे राष्ट्रें व्यापारांत पुढें सरसावलीं; त्यामुळें महायुद्धानंतर इंग्लंडला त्यांच्याशीं चढाओढ करावी लागली. त्यावेळीं कापड, अन्नसामुग्री, यंत्रें, लोखंड, कोळसा वगैरेच्या किंमती बेसुमार वाढल्यानें इंग्लिश कारखानदारांना व्यापारांत पुढें सरसावलेल्या राष्ट्रांशीं नीटपणें टक्कर देतां येईना. महायुद्ध संपलें त्यावेळीं इंग्लंडमधील कारखान्यांची स्थिति चांगली होती; परंतु जसजसे दिवस जाऊं लागले तसतशी इंग्लंडच्या व्यापारांत घट येऊं लागली. त्यामुळें मजुरींत कपात होऊं लागल्यानें बेकारी वाढूं लागली. अर्थात् मजुरांची स्थिति केविलवाणी झाल्यानें त्यांनीं संपाचें हत्यार उपसण्यास सुरुवात केली. मोठमोठे संप करूनही मजुरांचा फारसा फायदा झाला नाहीं. सन १९२९ मध्यें इंग्लंडमध्यें आर्थिक हलाखीसच सुरुवात झाली. तेव्हां खुल्या व्यापाराचें धोरण टाकून देऊन संरक्षित व्यापाराचें धोरण स्वीकारणें सरकारला योग्य वाटूं लागलें व अखेर सरकारनें अनेक जिनसांवर संरक्षित जकाती बसविण्यास सुरुवात केली. हा काळ जागतिक मंदीचाच होता; अर्थात् त्याची झळ सर्व राष्ट्रांस लागली होती. एकोणिसाव्या शतकापेक्षां विसाव्या शतकांतील इंग्लंडचा व्यापार वाढल्यासारखा दिसतो; परंतु त्या काळांत बेकारी मात्र अति वाढली होती व आर्थिक मंदीमुळें इंग्लंडांत मजुरांचे फार हाल होत होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. शेतीची स्थिति :—एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडची शेती फारशी फायद्याची नव्हती; परंतु सन १९००–१९१५ पर्यंत इंग्लंडची शेती चांगलीच पुढें सरसावली होती. त्यावेळीं अन्नाच्या किंमती वाढल्या होत्या, लोकसंख्याही वाढली व धान्याची आयात कमी झाली. अर्थात् शेतकऱ्याचें लक्ष शेतीकडे जास्त वेधलें गेलें. त्यामुळें पूर्वी ज्यांनीं कमी किंमतीला जमिनी विकत घेऊन व त्यांत घास-गवत लावून आपला चरितार्थ चालविला ते आतां शेती करूं लागले. अर्थात् शेतमजुरांसही बरकत होऊं लागली. सरकारी शेतकीखात्यानेंही शेतकऱ्यांसाठीं शेतीसंबंधीं निरनिराळ्या सुधारणा जाहीर केल्या व त्यांचा प्रयोग करण्यास शेतकऱ्यांस सुचविलें. त्यामुळेंही शेती पुढें सरसावली. पुढें महायुद्धांत इंग्लंडमधील शेतीला चांगलीच बरकत आली. धान्याला भावही चांगला येऊं लागला. ही स्थिति सन १९२० पर्यंत टिकली; परंतु पुढें शेतीला घसरगुंडी लागूं लागली. मोठमोठे जमीनदार आपल्या जमिनीचे तुकडे करून ते विकून टाकूं लागले. अनेक शेतकरी लढाईवर गेले होते व त्यांच्या अनुपस्थितींत शेतीचें काम मुलें व स्त्रिया यांनीं केलें. त्यामुळें जमिनीची खराबी झाली. शेतीला उपयुक्त असणाऱ्या सामानाच्या किंमतीही वाढूं लागल्या. या सर्व कारणांमुळें शेतकऱ्यांची स्थिति वाईट होऊं लागली. शेतमजुराची स्थितीही अत्यंत हलाखीची होती. त्याची मजुरी अत्यंत कमी झाली होती व त्या थोड्या मजुरींत त्याला स्वतःचें व आपल्या कुटुंबीयांचें पोट भरावें लागे, भिकार घरांतून रहावें लागे व भिकार कपडे त्यावे लागत. सन १९२५ च्या सुमारास शेतकऱ्यांची व शेतमजुरांची स्थिति सुधारूं लागली; परंतु सन १९३० मध्यें जागतिक मंदीमुळें त्या स्थितींत पुन्हां फरक पडून त्यांची स्थिति वाईट होऊं लागली. त्यामुळें अनेक लोकांनीं आपलीं खेडीं सोडलीं व ते शहरांत राहूं लागले.

७. खेड्यांतील जीवन :—इंग्लंडमधील खेड्यांतील आजची राहणी कमालीची सुधारलेली आहे. जिकडेतिकडे स्वच्छता व टापटीप दिसून येते. शेती चालत नसली तरी खेड्यांतील लोकांनीं आपलें जीवन सुखमय करण्याचा चांगलाच प्रयत्न चालविला आहे. सायकल, मोटर वगैरेच्या साहाय्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
खेड्यांतील लोकांस कोठेंही चटकन् जातां-येतां येतें व त्यामुळें खेड्यांतील राहणींत पुष्कळच फरक पडलेला दिसतो. शिक्षण मोफत व सक्तीचें झाल्यानें खेड्यांत सुशिक्षितांचा भरणा चांगला आहे. नव्या नव्या सुखसोयी आज सर्व खेड्यांतून दिसत आहेत व त्यामुळेंही खेडेगांवचें जीवन सुखमय होण्यास मदत झाली आहे. 'शेतकरी सुखी तर राष्ट्र सुखी' या भावनेनें सरकार खेड्यांकडे पाहत असल्यानें शेतीची स्थितीही चांगली सुधारूं लागली आहे. या खेड्यांतून आजही पूर्वींचे खेळ, नाच, गाणीं, उत्सव होत असतात. स्त्रीपुरुषांचीं मंडळेंही स्थापन होऊन त्यांतून नानाविध चर्चा व वादविवाद होतात. त्यामुळें खेड्यांतील जीवनास योग्य वळण लागण्यास पुष्कळ मदत होते. घरांच्या बांधणींतही पुष्कळ व चांगला फरक होत आहे. हिंदुस्थानांतील एखाद्या बऱ्यापैकीं शहरांतही ज्या सुधारणा व सुखसोयी आज आपल्याला दिसत नाहींत, त्या इंग्लंडमधील बऱ्यापैकीं खेड्यांतूनही आपल्याला दिसून येतील. यावरून इंग्लंडमधील आजच्या खेड्यांची कल्पना आपल्याला येईल.

८. शहरांतील जीवन :—इंग्लंडमधील आजचीं शहरें मोठीं गजबजलेलीं दिसतात. त्यांमध्यें नानाविध सुखसोयी असल्यामुळें लोकांचें जीवन एकंदरींत सुखमय झालें आहे. ट्रामगाड्या, मोटारी, आगगाड्या, बायसिकली वगैरेमुळें शहरांतील दळणवळण सुखकर व एकप्रकारें आल्हादकारक झालेलें आहे. निरनिराळीं करमणुकीचीं साधनें उपलब्ध आहेत. नाटकगृहें, सिनेमागृहें, नाचगृहें, गुत्ते, जुगाराचे अड्डे, मोठमोठीं उद्यानें, उपवनें, संग्रहालयें, पशुसंग्रहालयें, चित्रसंग्रहालयें, वाचनालयें वगैरे सर्व प्रकारचीं करमणुकीचीं साधनें आज थोड्याफार प्रमाणांत इंग्लंडमधील लहान मोठ्या शहरांतून उपलब्ध आहेत. त्यामुळें लोकांस ज्ञान होऊन त्यांची करमणूकही होण्यास मदत होते. शहरांतून कुटुंबसंस्था जवळ जवळ नष्टच होऊं लागली आहे. उपाहारगृहांत अगर हॉटेलांत जेवावें, कामावर जावें, संध्याकाळीं थोडी करमणूक करावी व रात्रीस आपल्या घरीं वस्तीस यावें असा मध्यम स्थितींतील लोकांचा बहुधा कार्यक्रम असतो. तयार जिन्नस आणून घरीं जेवण करणारेही कित्येक आहेत. शुक्रवारीं दर आठवड्यास पगार होतो व शनिवारीं व रविवारीं तो खलास झाल्यावर पुन्हां सोमवारीं कामास सुरुवात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होते. अशा तऱ्हेचें जीवन लोकांस फार आवडूं लागलें आहे. घरीं स्वयंपाक करूनही अनेक कुटुंबें राहतात. श्रीमंतांची गोष्टच निराळी. मोठमोठ्या हवेल्यांतून व प्रासादांतून राहणें, मोटारींतून जाणें–येणें, श्रीमंती कपडे अंगांत घालून ऐटींत राहणें, वगैरे गोष्टी आजही मोठमोठ्या शहरीं दिसतात. त्यांचीं खाद्यपेयेंही श्रीमंती, त्यांचा थाटमाट श्रीमंती, भपका व डामडौल श्रीमंती व दरबारी थाटाचा. रुबाबदार चालावें, रुबाबदार बोलावें, रुबाबदार हंसावें, श्रीमंतांनींच ! गरिबांचे हाल मात्र अजूनही कुत्रा खात नाहीं. शहरांत राहूनही त्यांना अजून चांगलीं घरें मिळत नाहींत, चांगले कपडे मिळत नाहींत, चांगलें अन्न खायला मिळत नाहीं. त्यांच्या वस्तींत अजूनही घाण व अस्वच्छता दिसून येते. त्यामुळें घाणेरडीं घरें पाडून टाकून गरिबांकरितां चांगलीं घरें बांधून देण्याचें धोरण स्थानिक स्वराज्य संस्थांनीं हातीं घेतलें आहे. त्याच-प्रमाणें चांगलें अन्नही मिळावें अशी योजना करण्यांत येत आहे. शहरांतील दुकानें मोठीं भव्य असतात. त्यांतून सर्व प्रकारचा माल माफक किंमतींत मिळूं शकतो.

९. घरें–इमारती:—विसाव्या शतकांत घरें बांधणींत पुष्कळच फरक झालेला आहे. मोठमोठ्या हवेल्या बांधण्याकडे लोकांची प्रवृत्ति आहे. शहरां-तून घरांच्या बांधणींत लोखंडाचा उपयोग फार होऊं लागला आहे. पूर्वी लाकूड वापरीत, त्या ऐवजीं आतां सर्रास लोखंड वापरण्यांत येऊं लागलें आहे. अगोदर लोखंडाचा सांगाडा उभा करावयाचा व मग गवंडीकामास सुरुवात करावयाची असा प्रघातच पडून गेला आहे. अगदीं अलीकडे सीमेंट काँक्रीटच्या इमारतीही इंग्लंडमध्यें होऊं लागल्या आहेत. 'मोनीर' नांवाच्या फ्रेंच गृहस्थानें प्रथमतः काँक्रीटच्या इमारती बांधण्यास सुरुवात केली. हा प्रकार नवीन असला तरी तो फारसा लोकप्रिय नाहीं. घरांवरील कौलारू छपरें नाहींशीं होऊन त्यांची जागा सपाट छपरांनीं घेतली. घरांस खिडक्या व धुरांडीं आवश्यक आहेत; व विसाव्या शतकांत त्यांचाही सर्रास उपयोग होऊं लागला आहे. घरांची बांधणी साधी पण सुबक करण्याकडे लोकांची प्रवृत्ति आहे. घरांत न्हाणीघर, शौचकूप, पाण्याचे नळ, ड्रेनेजची सोय वगैरे आधुनिक सोयी कसोशीनें करण्यांत येतात. घरांतील फर्निचरही चांगलें ठेवण्याकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांची प्रवृत्ति दिसून येते. घराला जो रंग दिला असेल त्या रंगाचेंच फर्निचर सहसा वापरण्यांत येतें व त्यायोगें रंगसंगति साधून मनाची प्रसन्नताही वाढते. प्रत्येक घरांत निरनिराळ्या कामाकरितां निरनिराळ्या खोल्या ठेवण्याची पूर्वी पद्धति होती, ती अजूनही कायम आहे. गरिबांचीं घरें मात्र अत्यंत वाईट असतात. त्यांच्या आवतींभोवतीं घाणही बरीच असते. आधुनिक सुखसोयींची व्यवस्थाही आधुनिक घरांतून दिसते. रेडिओ, टेलिफोन, ग्रामोफोन, टंकयंत्र, लिफ्ट, गालिचे, रुजामे, विजेचे दिवे, गॅसच्या शेगड्या वगैरे सोयी थोड्याफार फरकानें बहुतेक घरांतून–गरिबांच्या घरांतून क्वचित्–दिसून येतात. एकंदरींत पाहतां इंग्लंडमधील शहरांतील घरांतून आनंद ओसंडत असतो असें म्हणतां येईल.

१०. कपडेलत्ते व पोषाख:—विसाव्या शतकाच्या सुरुवातीसच स्त्रियांच्या पोषाखांत भयंकर क्रांति झाली. आखूड बाह्यांचे व अंगांत तंग बसतील असे कपडे त्यांस आवडूं लागले होते. त्यांचे कपडे इतके तंग असत कीं कांहीं कांहीं वेळां स्त्रियांना सरळ चालण्याच्या ऐवजीं दुडक्या चालीनें रखडत जावें लागे. महायुद्धानंतर स्त्रियांचे पोषाखांत पुष्कळ फरक झाला. थाटमाट गेला, ऐट नष्ट झाली व कपडे साधे, सुटसुटीत व रंगसंगति साधून वापरण्याकडे स्त्रियांची प्रवृत्ति होऊं लागली. त्यांचे झगे आखूड होऊं लागले. इतके कीं, पूर्वी ज्या स्त्रीचें नखही दृष्टीस पडत नसे ती स्त्री गुडघ्यापर्यंतच झगे वापरण्यांत भूषण मानूं लागली! या झग्यांस बाह्याही जवळजवळ नसत. कपडा सहज घालतां यावा इतका तो सुटसुटीत असावा असें प्रत्येकीला वाटे; व जितके कमी कपडे वापरतां येतील तितके वापरण्याकडे इंग्लिश स्त्रियांचा कल होऊं लागला. रंगसंगतीची त्यांची आवड मात्र मोहक दिसते. ज्या रंगाचा कपडा त्या रंगाची छत्री, त्याच रंगाची टोपी, त्याच रंगाची हॅंडबॅग, व त्याच रंगाचे बूट. मात्र यामुळें स्त्रियांची राहणी अधिक खर्चिक झाली आहे. तोंडाला पावडर, ओठाला व नखांना रंग, केसांचें कुरळें वळण वगैरे बाबतींतही त्या दक्ष असतात. त्यांच्या टोप्याही चित्रविचित्र व पिसें अथवा इतर कृत्रिम जिनसांनीं युक्त असतात. स्त्रियांचे कपडे रेशमाचे, सुती अगर लोकरीचेही असतात. पुरुषांच्या पोषाखांतही क्रांति घडून आली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अत्यंत साधे व सुटसुटीत कपडे पुरुष वापरतात. त्यांतील भपका अजीबात नष्ट झालेला आहे. सूट-बूट–नेकटाय, कॉलर असा पुरुषांचा पोषाख असतो. टोप्या वापरणें शिष्टसंमत समजलें जातें. पुरुषांचेंही रंगसंगतीकडे लक्ष असतें. खेळायच्या वेळीं, जेवण्याचे वेळीं, बाहेर जातांना, पार्टीला जातांना, नाटकाला जातांना, रात्रीच्या वेळचा अशा प्रत्येक वेळीं स्त्रीपुरुष ठराविक पोषाख घालतात. समाजाची ती रीतच पडून गेली आहे.

११. वाङ्मय विकास :—विसाव्या शतकांत वाङ्मयाचीही चांगली वृद्धी झाली आहे. या काळांतही अनेक उत्तम कवि व लेखक निर्माण झाले. चार्ल्स स्विनबर्न (१८३७-१९०९) हा उत्तम कवि होता. वृत्तांच्या चालींमध्यें त्यानें नाविन्य प्रगटविलें. तो उत्तम टीकाकारही होता. रुडयार्ड किपलिंग (१८६५-१९३६) हा मोठा कवि व ग्रंथकार होऊन गेला. त्याचा जन्म मुंबईस झाला होता. त्यानें अनेक गोष्टी लिहिल्या. 'किम' नामक त्याची कादंबरी फार प्रसिद्धी पावली. कवि म्हणूनही त्याची कीर्ति चांगली होती. नव्या शोधांकडे किपलिंगचा ओढा असल्यानें त्यांच्याकडे त्यानें लोकांचीं मनें खेचलीं. जॉन मेसफील्ड हा राजकवि आहे. त्याचा जन्म सन १८७५ मध्यें झाला. त्याची कविता भारदस्त व नव विचारांनीं ओथंबलेली असते. त्यानें अनेक नाटकेंही लिहिलीं आहेत. सन १९३० मध्यें तो राजकवि झाला. रॉबर्ट ब्रिजेस (१८४४–३०) हाही मोठा कवि होता. सन १९१३ मध्यें राजकवि म्हणून त्याची नेमणूक झाली होती. जेम्स बॅरी (१८६०–१९३७) हा मोठा बांका लेखक होता. त्याच्या लेखनांत विनोद व करुणरस यांची सांगड उत्तम-प्रकारची असे. त्यामुळें त्याच्या कादंबऱ्या व नाटकें फारच लोकप्रिय झालीं होतीं. त्यानें कांहीं बोलपटकथाही लिहिल्या होत्या. हर्बर्ट जॉर्ज वेल्स याचा जन्म सन १८६६ मध्यें झाला. तोही आज मोठा लेखक म्हणून प्रसिद्ध आहे. 'टाइम मशीन' ही त्याची पहिली कादंबरी होय. त्यानंतर त्यानें अनेक उत्तम कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या असून त्या सर्व लोकप्रिय आहेत. त्याच्या कादंबऱ्यांतून शास्त्रीय ज्ञान विखुरलेलें असतें. जोसेफ कॉनराड (१८५७–१९२४) हा जातीनें पोलिश होता. त्यानें अनेक कादंबऱ्या लिहिल्या. त्याच्या कादंबऱ्यांतून खलाशांच्या जीवनाची हकीकत दृष्टीस पडते. त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लिश भाषा आत्मसात करून त्या भाषेंत चटकदार कादंबऱ्या लिहिल्या, म्हणून तो इंग्लंडांत फार लोकप्रियता पावला. जॉर्ज बर्नार्ड शॉचा जन्म सन १८५६ मध्यें डब्लिनला झाला. प्रथमतः त्यानें अनेक कादंबऱ्या लिहिल्या होत्या; पण त्या प्रसिद्ध केल्या नाहींत. पुढें त्यानें नाटकें लिहिण्यास सुरुवात केली. त्याचें पहिलें नाटक सन १८९२ मध्यें प्रसिद्ध झालें. तो समाजसत्तावादीमताचा असल्यानें आपल्या पुस्तकांतून त्या मतांचा त्यानें पुरस्कार केलेला आढळतो. त्याचीं नाटकेंही याला अपवाद नाहींत. 'आर्कची जोन' हें ऐतिहासिक नाटक असलें तरी त्यांतही त्याचा समजसत्तावाद डोकावतोच. प्रत्येकानें भावनेच्या आहारीं न जातां कांहीं तरी भरीव कामगिरी करून दाखवावी असा त्याच्या लिखाणांतून सूर निघतो. विल्यम बटलर येटस् (१८६५–१९३८) हा उत्तम कवि व ग्रंथकार म्हणून प्रसिद्धी पावला. त्याचा जन्म डब्लिनला झाला. त्यानें अनेक कविता व नाटकें लिहून प्रसिद्ध केलीं. सन १९२३ मध्यें त्याला 'नोबेल' बक्षिस मिळालें होतें. त्याच्या कवितेंत प्रसाद आहे व त्याची भाषा, तोलून-मापून योजलेले शब्द, मनोहर कल्पना व सहजपणा यामुळें मोहक वाटते. जॉन गाल्सवर्दी (१८६७–१९३३) हाही मोठा कादंबरीलेखक व नाटककर्ता होऊन गेला. या नामांकित लेखकांशिवाय आज इंग्लंडमध्यें अनेक थोर लेखक व कवि हयात आहेत.

अभ्यास

१. विसाव्या शतकांत कोणकोणते शोध लागले? त्यांचा मानवी जीवनावर काय परिणाम झाला?

२. विसाव्या शतकांत इंग्लंडची स्थिति पूर्णपणें सुधारली असें तुम्हांस वाटतें काय? कशावरून?

३. त्या शतकांतील लोकांचे कपडे, घरें, वाङ्मय, दळणवळण वगैरेसंबंधीं हकीकत सांगा.

४. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.
एडिसन, नभोवाणी, रेडियो, टेलीव्हिजन, मोस्ले, आइन्स्टाइन, सन्टॉस डुमो, कॉबहॅम, ॲमी जॉन्सन, अमुंडसेन, येटस्, बर्नार्ड शॉ, किपलिंग, मेसफील्ड, वेल्स, आर् १०१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९. इंग्लंडची राज्यघटना

१. इंग्लंडच्या राज्यघटनेचें स्वरूप :—जगाच्या इतिहासांत इंग्लंडची राज्यघटना मोठी अलौकिक व अपूर्व आहे. ती एकदम व एकाएकीं स्थापन झालेली घटना नसून, ती हळूहळू, क्रमाक्रमानें व सावकाशपणें विकसीत होत गेलेली घटना आहे. तिचें आजचें परिणत स्वरूप प्राप्त होण्यास तिला निदान सात-आठशें वर्षें लागलीं. अर्थात् तिच्या प्रगतीचा एक प्रचंड ओघ आपल्याला दिसून येतो. इंग्लंडची राज्यघटना लिखित–म्हणजे कायद्यांनीं जखडून टाकलेली नाहीं. मॅग्नाकार्टा, हक्कांचा अर्ज, हक्कांचा कायदा, वारसा कायदा, पार्लमेंट ॲक्ट वगैरेंसारख्या महत्त्वाच्या कायद्यामुळें तिला थोडें-फार लिखित स्वरूप प्राप्त झालेलें आहे. तरीही तिचा बराच मोठा भाग प्रघात, रूढी, परंपरा व संप्रदाय यांवरच अवलंबून आहे. इंग्लंडच्या राज्यघटनेंत ब्रिटिश पार्लमेंटला वाटेल तेव्हां फरक करतां येतो व त्यामुळेंच तिला लवचिक अथवा प्रगमनशील असेंही म्हणतां येईल. व्यवहार व राज-कारण यांचा उत्तम संगम कोठें झाला असेल तर तो इंग्लिश राज्यघटनेंत व त्यामुळेंच तिच्यांत लहान मोठे फरक पार्लमेंटला करतां येतात. जबाबदार राज्यपद्धति हा तिचा आत्मा आहे. यामुळेंच प्रधानमंडळ व पार्लमेंट यांच्या ऐकमत्यावरच राज्यकारभाराचें यशापयश अवलंबून असतें. खरें पाहतां इंग्लंडची राज्यघटना म्हणजे एक गंगाजमनी प्रकार आहे. कारण इंग्लंडमध्यें धड लोकमतानुवर्ति अशी निर्भेळ लोकशाही नाहीं, धड स्वयंपूर्ण अशी राजसत्ता नाहीं, कीं तेथें एखाद्या विशिष्ट समाजाच्या हातींही सर्व सत्ता नाहीं. त्यामुळेंच इंग्लंडांत 'अनियंत्रित राजसत्ता' आहे असें म्हणतात. अर्थात् इंग्लंडांत राजा आहे पण तो नामधारी; लोकशाही आहे, परंतु ती पूर्णांशानें नाहीं. कसेंही असलें तरी इंग्लंडच्या राज्यघटनेंत खऱ्या व शुद्ध लोकशाहीचीं बीजें खोलपर्यंत गेलेलीं आहेत यांत शंका नाहीं व त्या घटनेंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
इंग्लिश लोकांना परिस्थित्यनुरूप वाटेल तेव्हां व वाटेल तसा फरक करून घेतां येतो हेंही खरें आहे. थोडक्यांत म्हणजे इंग्लंडची राज्यघटना रूढी, इतिहास, कायदा व परिस्थिति यांनीं घडविली असें म्हणतां येईल.

२. राज्यघटनेचीं मुख्य अंगें :—इंग्लिश राज्यघटनेचीं तीन मुख्य अंगें आहेत. राजा, पार्लमेंट व न्यायसंस्था हीं तीं तीन अंगें होत. नामधारी कां होईना, इंग्लंडांत राजा आहे. त्यामुळें पूर्ण व शुद्ध लोकशाहीचें स्वरूप थोडें लांच्छित होतें यांत शंका नाहीं; तरीही साम्राज्याच्या संघटनेच्या दृष्टीनें राजाला राज्यघटनेंत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें आहे. इंग्लंडचा सर्व कारभार राजाच्या नांवानेंच चालतो. इंग्लिश लोक पुराणमतवादी आहेत व त्यामुळेंच राजपद ही संस्था त्यांस हवीशी वाटते. राज्यघटनेचें दुसरें अंग म्हणजे पार्लमेंटसभा. ब्रिटिश पार्लमेंटचे उमरावमंडळ व कॉमन्ससभा असे दोन भाग आहेत. उमरावमंडळांत धर्माधिकारी व उमराव असतात व लोक-प्रतिनिधि कॉमन्ससभेंत बसतात. धर्मगुरू, उमराव व कॉमन्ससभेंतील लोक हे इंग्लिश समाजाचे तीन मुख्य घटकावयव समजले जातात. अर्थात् राष्ट्राकरितां कायदे करण्याचें मुख्य काम राजा व समाजाचे हे तीन मुख्य घटक म्हणजेच पार्लमेंटसभा—यांच्याकडे आहे. त्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार राजाकडे आहे; परंतु रूढीनें तो प्रधानमंडळाकडे सोंपविलेला आहे. राज्यकारभारांत राजाला मदत करण्याकरितां प्रिव्ही कौन्सिल नांवाचें एक मंडळही असतें. राज्यघटनेचें तिसरें अंग म्हणजे न्यायसंस्था होय. प्रत्यक्ष न्याय देण्याचें काम न्यायकोर्टांकडून होतें. तरीही राजाचें प्रिव्ही कौन्सिल व उमरावमंडळ हीं दोन्ही मिळून एक सर्वश्रेष्ठ न्यायासन म्हणून मानलें जातें. राजा मात्र न्यायाचें उगमस्थान म्हणून ओळखला जातो.

इंग्लंडचें राजपद

३. राजसत्ता मर्यादित कशी झाली :—प्राचीन काळीं इंग्लंडांतील राजा त्याच्या प्रजेकडून निवडला जात असे. राजा राष्ट्राचा नोकर असून त्यानें आपल्या राष्ट्राच्या अभिवृद्धीकडे व आपल्या प्रजेच्या संरक्षणाकडे लक्ष पुरविलें पाहिजे असें त्याच्यावर पूर्वी बंधन असे. राजाला राज्यकारभारांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मदत करण्याकरितां ‘ वितन ’ नामक शाहण्या लोकांचें एक मंडळही असे. पुढें या पद्धतींत हळूहळू फरक पडत गेला. नॉर्मन लोकांनीं पुढें राजाची सत्ता वाढवून राजपद वंशपरंपरागत आहे असें आपल्या उदाहरणानें सिद्ध केलें. पुढें राजपद वंशपरंपरेनें चालू झालें. त्यामुळें राजा अनियंत्रित होऊं लागला व तो प्रजेवर जुलूम करूं लागला. तेव्हां त्याला लोकांचा विरोध होऊं लागला. अशा तऱ्हेचा पहिला विरोध जॉन राजाच्या वेळीं झाला व त्याला मॅग्नाकार्टावर सही करावी लागून लोकांच्या स्वातंत्र्यास मान्यता द्यावी लागली. पुढें तिसऱ्या हेन्रीच्या वेळीं लोकांनीं राजाला राजसंन्यास घ्यावयास लावून पार्लमेंटची उभारणी केली. हळूहळू पार्लमेंटची वाढ होऊं लागली व त्यामुळें राजसत्तेला एक मोठाच शत्रु उत्पन्न होऊन राजा व पार्लमेंट यांच्यांत अधिकार व हक्क यांकरितां एकसारखा झगडा सुरू झाला. पुढें ट्यूडर राजांच्या कारकीर्दींत पार्लमेंट सभा राजाच्या पूर्णपणें अंकितच राहिली व त्यामुळें ट्यूडर राजे स्वच्छंदपणें कारभार करूं लागले. त्या राजांच्या पावलावर पाऊल टाकून स्टुअर्ट राजे वागूं लागले. एवढेंच नव्हे, तर राजा हा ईश्वरी अंश आहे व पार्लमेंट व कायदा यांच्यापेक्षां राजा श्रेष्ठ आहे अशी ते ग्वाही देऊं लागले. तेव्हां पार्लमेंटला त्यांच्याशीं दोन हात करून आपलें श्रेष्ठत्व व राजाची सत्ता नियंत्रित असल्याचें सिद्ध करावें लागलें. या दृष्टीनेंच सन १६४९ ची व सन १६८९ ची राज्यक्रांति लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्यामुळें पार्लमेंटचें श्रेष्ठत्व ठरलें व राजाची सत्ता नियंत्रित झाली. हें तिसऱ्या जॉर्जला आवडलें नाहीं व त्यामुळें राजाची गेलेली सत्ता पुन्हां मिळविण्याचा त्यानें आटोकाट प्रयत्न केला. परंतु त्याला यश लाभलें नाहीं. एकोणिसाव्या शतकांत सन १८३२, १८६७ व १८८४–८५ या सालीं पार्लमेंटची सुधारणा करण्याकरितां जे कायदे पास झाले त्यामुळें व विसाव्या शतकांतील सन १९११, १९१८ व १९२८ या कायद्यांमुळें इंग्लंडमधील राजसत्ता पूर्णपणें नियंत्रित झाली व राजा नामधारी बनून खरी सत्ता ब्रिटिश पार्लमेंटच्या हातीं गेली.

४. इंग्लंडचें राजपद :—ब्रिटिश राष्ट्रांत राजाला सर्वश्रेष्ठ असा मान दिला जातो. राष्ट्राच्या आचाराविचारांचें, ध्येयधोरणाचें व धर्माचें तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रतीक समजला जातो. इंग्लंडचा राजा सनदशीर आहे. अर्थात् त्याला आपणहून कोणतीही गोष्ट करतां येत नाहीं; कायद्यानें वागावें लागतें व कायद्यानें बोलावें लागतें. 'पार्लमेंटचे कायदे व प्रघात पाळीन' अशी राज्याभिषेकाचे वेळीं राजाला शपथ घ्यावी लागते. त्याचा प्रत्येक व्यवहार पार्लमेंटच्या कायद्यानें ठरविला जातो. असें असलें तरी राजाला कांहीं खास अधिकार आहेत. इंग्लंडचें राजपद पिढीजाद आहे. एक राजा मेला तर त्याच्या ज्येष्ठ मुलाला तें मिळतें. तो जिवंत नसला तर तें त्याच्या ज्येष्ठ वंशजाकडे जातें; मात्र तो निपुत्रिक वारला तर इंग्लंडचें राजपद मृतराजाच्या दुसऱ्या मुलाकडे जातें. मुलगा जिवंत नसला तर मात्र तें ज्येष्ठ मुलीला मिळतें. इंग्लंडचा राजा प्रॉटेस्टंटपंथीयच असला पाहिजे, प्रॉटेस्टंटपंथीय स्त्रीशींच त्यानें लग्न केलें पाहिजे व स्कॉटलंडमधील प्रेसबिटेरियनपंथाचें त्यानें संरक्षण केलें पाहिजे. त्याच्या खासगी खर्चाकरितां पार्लमेंटकडून त्याला दरसाल तनखा मिळतो. राजे सहावे जॉर्ज यांना पौं. ४,१०,००० इतका वार्षिक तनखा मिळतो. त्याशिवाय राजाचें कांहीं खाजगी उत्पन्नही असतें. तेंही त्याला मिळतें. 'लँकॅस्टरच्या जहागिरीचें' उत्पन्न अशांतलेंच होय. त्या जहागिरीचें सालीना उत्पन्न पौं. ८५००० आहे. राजाच्या मालकीचीही कांहीं जमीन आहे. त्यापासूनही त्याला सालीना तेरा लाख पौंड मिळतात. राजाच्या राणीचा व राजकुटुंबांतील प्रत्येकाचा तनखा स्वतंत्र असतो व तोही पार्लमेंटकडूनच मिळतो. यामुळें राजा पार्लमेंटवर अवलंबून आहे हेंच सिद्ध होतें. राजाचा व त्याच्या वारसाचा देह पवित्र समजला जातो. अर्थात् त्याच्या जिवाला अपाय करणें म्हणजे राजद्रोह करण्यासारखें मानण्यांत येतें व तसा अपाय करणारास देहान्ताची शिक्षा देण्यांत येते.

५. राजाचे अधिकारः—स्वतःच्या मुखत्यारीवर अवलंबून राजाला स्वतंत्रपणें वागतां येतें. या त्याच्या अधिकारास 'राजाधिकार' असें म्हणतात. पूर्वीच्या काळीं राजाला अनेक हक्क होते, तसे ते आजही कायम आहेत. फरक इतकाच कीं पूर्वीप्रमाणें राजाला आज त्यांची अंमलबजावणी स्वतंत्रपणें करतां येत नाहीं. आज राजाचे खालीलप्रमाणें मुख्य अधिकार मानण्यांत येतात. (१) पार्लमेंटसभा बोलाविणें, ती तहकूब करणें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बरखास्त करणें, तिनें पास केलेल्या बिलांस संमति देणें अगर तिनें पास केलेलीं बिलें फेंटाळून लावणें हे राजाचे स्वयंभू हक्क आहेत. राजाची संमति मिळाली नाहीं तर कोणत्याही बिलाला कायद्याचें स्वरूप प्राप्त होत नाहीं. (२) राजा हा अंमलबजावणी खात्याचा मुख्य अधिकारी समजला जातो. अर्थात् लष्कर, आरमार, वैमानिकदल वगैरेंसारख्या महत्त्वाच्या खात्यांपासून अगदीं छोट्या खात्यांपर्यंत सर्व खात्यांवर त्याचा अधिकार चालतो. त्यामुळें त्या त्या खात्यांतील लहानमोठ्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याचा व त्यांच्या कामावर देखरेख ठेवण्याचा राजाला अधिकार आहे. (३) परराष्ट्रीय धोरण तोच ठरवितो. अर्थात् युद्ध करणें, तह करणें, परराष्ट्र–वकिलांच्या भेटी घेणें, परराष्ट्रांच्या राजांना भेटी देणें-घेणें वगैरे व्यवहार तोच करतो. (४) राजा ‘मानसन्मानाचें उगमस्थान’ मानण्यांत येतो. अर्थात् त्याला लोकांस पदव्या, हुद्दे, किताब, उमरावपदें, ‘सर’क्या, बक्षिसें, पारितोषिकें देतां येतात व त्यांचा मानसन्मान करतां येतो. (५) राज्याच्या जमाखर्चावरही त्याचा अबाधित ताबा चालतो. अर्थात् नवीं नाणीं पाडणें, त्यांच्या किंमती ठरविणें, टांकसाळीची व्यवस्था ठेवणें वगैरे कामें त्याला करतां येतात. (६) इंग्लिश धर्मपीठाचा तो सर्वश्रेष्ठ मुख्य अधिकारी आहे. त्यामुळें धर्मपीठांतील अधिकाऱ्यांची त्याला नेमणूक करतां येते. धर्मपीठाच्या कामावर देखरेख करण्याचा त्याला अधिकार आहे. (७) मुख्य प्रधानाची नेमणूक करण्याचा त्याला अधिकार आहे. त्याचप्रमाणें आपल्या मंत्र्यांस वेळोवेळीं सल्ला देणें, त्यांना उत्तेजन देणें व त्यांना ताकीद देणें हाही राजाला अधिकार आहे. (८) राज्यांतील सर्व जमिनीचा मालक राजा आहे व लोकांकडे आज जी जमीन आहे ती त्यानें मोठ्या मेहेरबानीनें आपल्या लोकांस बहाल केली आहे अशी समजूत आहे. अर्थात् एखाद्याचा निर्वंश झाला तर त्याची जमीन राजालाच मिळते. (९) राजा ‘न्यायाचें उगमस्थान’ आहे असें मानण्यांत येतें. अर्थात् एखाद्या व्यक्तीला गुन्ह्याबद्दल झालेल्या शिक्षेची माफी देण्याचा त्याला अधिकार आहे. एखाद्याची शिक्षा कमी करणें अगर ती अजीबात रद्द करणें, हे राजाधिकार समजले जातात. त्याचा ‘दयेचा अधिकार’ सर्वमान्य आहे व त्याचा राजानें अनेकवार उपयोगही केला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. (१०) राज्यांत शांतता ठेवणें, सुराज्यव्यवस्था स्थापन करणें व राज्यांतील लोकांच्या आर्थिक व सामाजिक गोष्टींस वळण लावणें हेही त्याचेच अधिकार आहेत. त्या दृष्टीनें राजा 'समाजाचा नेता' आहे असेंही मानण्यांत येतें. (११) जाहीरनामे लावून विशिष्ट कायद्यांकडे लोकांचें लक्ष वेधण्याचाही त्याला हक्क आहे. (१२) महत्त्वाच्या कंपन्या अगर विश्वविद्यालयें यांना सनदा देण्याचाही त्याचाच अधिकार मानण्यांत येतो.

६. राज्यघटनेंतील राजाचें स्थान:—राजाच्या हक्कांची वर जी नामावळी देण्यांत आली आहे, त्यावरून राजाच्या अधिकारांची चांगलीच कल्पना येते. त्यावरून पाहतां राजा इंग्लंडच्या राज्यघटनेचा प्राणाधारच ठरतो. परंतु वरवर दिसणारी ही गोष्ट व्यवहारांत खरी नाहीं. राजाला अधिकार आहेत पुष्कळ; परंतु त्यांची अंमलबजावणी मात्र त्याला आपल्या मताप्रमाणें करतां येत नाहीं. आणि म्हणूनच ना आपण त्याला नामधारी राजा असें म्हणतों? राज्यघटनेंतील राजाकडे असलेल्या अधिकारांचा भोगवटा राजाकडे नसून तो प्रधानमंडळाकडे—कॅबिनेटकडे—आहे. अर्थात् राजाच्या सर्व अधिकारांची अंमलबजावणी राजाचें प्रधानमंडळ करतें. त्यावरूनच 'इंग्लंडचा राजा राज्य करतो, परंतु अधिकार मात्र पार्लमेंटतर्फे मुख्य प्रधान गाजवितो' किंवा 'अधिकार राजाचे; परंतु भोगवटा मुख्य प्रधानाचा' अशी जी म्हण आहे तिच्यांतील सत्य समजून येईल. मात्र मुख्य प्रधान किंवा प्रधानमंडळ जी जी गोष्ट करतें ती ती राजाच्या नांवानें करतें. प्रत्येक गोष्ट मुख्य प्रधानाच्या सांगीवरून राजा करतो. अर्थात् राजा मुख्य प्रधानाच्या म्हणजेच पार्लमेंटच्या मुठींत असतो. मुख्य प्रधानाला किंवा प्रधानमंडळांतील कोणत्याही प्रधानाला कोणतीही गोष्ट राजाच्या कानावर अगोदर घालावी लागते. या विवेचनावरून सरकारच्या प्रत्येक गोष्टीला राजा कारण नसून मुख्य प्रधान किंवा प्रधानमंडळ कारण असतें हें उघड होतें. म्हणून 'राजाच्या हातून अन्याय्य गोष्ट कधींही घडत नाहीं' असें म्हणतात. राजातर्फे नेमणूक करणें, परराष्ट्रीय धोरण आंखणें, राजाचें भाषण तयार करणें, परराष्ट्र वकिलांच्या गांठीभेटी घेणें, देशांत शांतता राखणें वगैरे हक्कांचा भोगवटा करावयाचा प्रधानानें व त्याबद्दल जबाबदार धरावयाचें राजाला! हें जमावयाचें कसें?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. राजपदाचा उपयोग :—'अधिकार राजाचा व भोगवटा प्रधानांचा' हें तत्त्व व्यवहारांत खरें आहे, तरीही राजा राजकारणांत मुरब्बी असला म्हणजे त्याचा आपल्या प्रधानांवर एक प्रकारचा दाब असतो, यांत शंकाच नाहीं. पामर्स्टनला व्हिक्टोरियानें राजीनामा द्यावयास लावलेंच कीं नाहीं ? तिच्यामुळेंच पार्लमेंट सुधारण्याचा तिसरा कायदा पास होऊं शकला व ट्रेंट प्रकरण युद्ध न होतां निकालांत निघालें. सातव्या एडवर्डचा शांततारक्षणा-करितां किती उपयोग झाला हें सर्वश्रुतच आहे. दुसरें असें कीं, राजा ब्रिटिश राज्यघटनेचा एक आधारस्तंभ आहे. मृत्यु अगर अनपेक्षित गोष्टी यांशिवाय तो कधींही बदलत नाहीं. त्याशिवाय 'राजा अमर आहे,' अशी ब्रिटिशांची कल्पना आहे. एक राजा मृत्यु पावला कीं 'राजा मेला, राजा चिरायु होवो' असें म्हणून मेलेल्या राजाच्या योग्य वारसास इंग्रज गादीवर बसवितात व सिंहासनाचें सातत्य कायम राखतात. यामुळें राजपदाची परंपरा कायमची राखली जाते. 'त्याचमुळें राजा येवो किंवा जावो' इंग्लिश सिंहासन कायम असतें असें म्हणतात. राजाच्या दीर्घकालीन अनुभवाचा राष्ट्रास व प्रधानमंडळास चांगला फायदा होतो यांत शंका नाहीं. शिवाय राजा पक्षभेदातीत मानला जातो. त्यामुळें कोणत्याही पक्षाचें प्रधानमंडळ अस्तित्वांत असलें तरी त्याच्यावर त्या पक्षाचा कोणत्याही प्रकारचा परिणाम होत नाहीं. सर्व पक्षांस समतेनें वागवून त्यांच्याकडून अंगीकृत कार्य धडा-डीनें करवून घेण्यांत राजाच्या अंगींही थोडें कसब लागतेंच. असेंही म्हणतां येईल कीं दोन विरोधी पक्षांची सांगड घालणारा राजा हा एक अत्यंत मह-त्त्वाचा घटक इंग्लंडच्या राज्यघटनेंत आहे. साम्राज्याच्या संघटनेच्या दृष्टी-नेंही राजाचा अत्यंत उपयोग होतो. साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांत ऐक्यबुद्धि नांदावी व साम्राज्यांत विस्कळितपणा उत्पन्न होऊं नये म्हणून राजाचा फार उपयोग होतो. यामुळें साम्राज्याचे निरनिराळे भाग व इंग्लिश सरकार यांना एकत्र जोडणारा राजा हा महत्त्वाचा दुवा आहे. समाजाचा अग्रणी या नात्यानेंही त्याला राष्ट्रोपयोगी व समाजोपयोगी कितीतरीं कामें करतां येतात. अर्थात् एखाद्या व्यक्तीचा सर्व राष्ट्रांतर्फे सन्मान करावयाचा झाल्यास तोही राजाच्या हस्तेंच होतो. थोडक्यांत म्हणजे इंग्लंडचा राजा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नामधारी असला तरी तो समाजाचा नेता आहे, राष्ट्राचा पुढारी आहे, राज्यघटनेचा मुख्य आधारस्तंभ आहे व साम्राज्याच्या एकीचें प्रतीक आहे. यामुळेंच इंग्रजांस राजा आवडतो व तो त्यांस पाहिजे असतो.

ब्रिटिश पार्लमेंट

८. थोडा पूर्वेतिहास :—इंग्लंडच्या राज्यघटनेचें दुसरें व महत्त्वाचें अंग म्हणजे ब्रिटिश पार्लमेंट होय. कायदा करणें हें पार्लमेंटचें मुख्य काम. हें काम प्राचीन काळींही वितन, गांवसभा ऊर्फ फोकमूट, नगरसभा वगैरे प्रातिनिधिक स्वरूपाच्या संस्था करीत होत्या. आपण पार्लमेंट असें म्हणतों ती प्रथमतः तिसऱ्या हेन्रीच्या कारकीर्दींत सन १२६५ सालीं मॉटफर्डच्या बोलावण्यावरून भरविण्यांत आली. तरी खरी व नमुनेदार पार्लमेंटसभा पहिल्या एडवर्डनें सन १२९५ मध्यें स्थापन केली. या पार्लमेंटमध्यें समाजांतील सर्व वर्गांचे प्रतिनिधि प्रथमच एकत्र आले व त्यामुळेंच तिला पूर्ण प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त झालें असें मानण्यांत येतें. मात्र त्यावेळीं पार्लमेंटच्या तीन निरनिराळ्या सभा होत्या. पुढें सन १३४१ च्या सुमारास त्या दोन झाल्या. धर्मगुरू व उमराव एका सभेंत बसून चर्चा करूं लागले व बाकीचे दुसऱ्या सभेंत बसूं लागले. त्यामुळें पहिल्या सभेला उमरावमंडळ व दुसरीला कॉमन्ससभा अशीं निरनिराळीं नांवें मिळालीं. पुढें या पार्लमेंटनें राजसत्तेवर नियंत्रण घालून अनेक प्रकारचे अधिकार मिळविले. त्यांत खजिन्यावर ताबा, मंत्र्यांच्या नेमणुकीवर ताबा, भाषणस्वातंत्र्य, अटकस्वातंत्र्य, स्वतंत्र निवडणुकीचा अधिकार हे प्रमुख होत. ट्यूडर कालांतही पार्लमेंटच्या अधिकारांची वाढ झाली व स्टुअर्ट काळांत राजापेक्षां पार्लमेंटसभा श्रेष्ठ ठरून राजसत्ता नियंत्रित झाली. हॅनोव्हर काळांत कॅबिनेटचा उदय झाला, पक्षनिष्ठ राजकारणाची भक्कम पायावर उभारणी झाली व त्यामुळें पार्लमेंटची सत्ता वाढण्यास पुष्कळच मदत झाली. विसाव्या शतकांत कॉमन्ससभेनें उमरावमंडळावर मात करून आपलें श्रेष्ठत्व स्थापन केलें. एकंदरीनें पाहतां इंग्लंडमध्यें पार्लमेंटइतकी सामर्थ्यवान् व सत्ताधारी अशी दुसरी सत्ता नाहीं. त्यामुळें पार्लमेंट करील ती पूर्वदिशा असा इंग्लंडांत आज जमाना आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. **ब्रिटिश पार्लमेंटची अपूर्वाई :**—ब्रिटिश पार्लमेंटला जगाच्या इतिहासांत तोड नाहीं, त्यामुळेंच तिला बिनतोड असेंही म्हणतां येईल. तिचें अनुकरण अनेक राष्ट्रांतून झालेलें असल्यानें तिला 'पार्लमेंटांची जननी' असेंही म्हणतां येईल. पार्लमेंटला अमर्याद सत्ता आहे. तिला वाटेल तो कायदा रद्द करतां येतो किंवा वाटेल तो पास करतां येतो. तिच्यावर दुसऱ्या कोणाचीही सत्ता चालत नाहीं. अर्थात् पार्लमेंट सर्वसत्ताधारी आहे हें उघड आहे. तिला बंधन नाहीं, मात्र ती दुसऱ्यावर बंधनें घालूं शकते. एका अर्थानें राजाही तिला पूर्णपणें जबाबदार आहे; मग प्रधानमंडळाचा प्रश्नच उरत नाहीं. या अमर्याद सत्तेचा उपयोग पार्लमेंटनें राष्ट्राच्या कल्याणार्थ करावा, प्रजेच्या सुखसोयी वाढविण्याकरितां करावा, असा प्रघात आहे. तो



ब्रिटिश पार्लमेंट-सभागृह

जर पार्लमेंटनें मोडला व आपल्या सत्तेचा दुरुपयोग केला, तर त्याबद्दल तिला योग्य तें शासन मिळाल्याशिवाय रहात नाहीं. हें शासन करण्याचा अधिकार मात्र जनतेच्या हातीं आहे. अर्थात् मतदारांच्या हातीं आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळें एखादे वेळीं जनतेचा योग्य कौल न मिळाल्यास पार्लमेंटला योग्य शासन व तेंही आपोआप होतें. जनतेचा धाक असल्यानेंच पार्लमेंटसभा सर्व काम योग्य विचार करूनच करते. त्यामुळें इंग्लिश लोकशाहीचीं बीजें खोलवर गेलीं आहेत असें म्हणतात.

उमरावमंडळ

१०. उमरावमंडळाची रचना :— उमरावमंडळ ही सभा उमरावांकरितां आहे. त्यांचे दोन ठळक वर्ग पडतात. पहिला धर्मगुरू व धर्माधिकारी यांचा व दुसरा ऐहिक किंवा लौकिक उमरावांचा. धर्माधिकाऱ्यांपैकीं फक्त आर्चबिशप व बिशप हे उमरावमंडळांत बसूं शकतात. कँटरबरी व यॉर्क येथील आर्चबिशप व लंडन, डरहॅम व विंचेस्टर येथील बिशप हे उमरावमंडळांत नेहमींच असतात. इतर गांवीं जे बिशप असतात व त्यांच्यापैकीं ज्यांची नोकरी सर्वांत जास्त झालेली असते अशा एकवीस बिशपांना उमरावमंडळांत जागा मिळते. धर्माधिकारी व धर्मगुरू यांची उमरावमंडळांतील संख्या फक्त २६ आहे. ऐहिक उमराव पिढीजाद आहेत. उमराव मेला कीं त्याचें उमरावपद त्याच्या ज्येष्ठ मुलाकडे जातें, तो जिवंत नसेल अगर त्याला मुलगा नसेल तर मात्र तें दुसऱ्या मुलांकडे जातें. ज्याला तें मिळतें तोच उमरावमंडळाचा सभासद होऊं शकतो व त्याचे भाऊ, एक किंवा अनेक, कॉमन्ससभेचे सभासद होऊं शकतात. लौकिक उमरावांच्या, त्यांच्या दर्जाप्रमाणें, प्रती ठरविण्यांत आलेल्या आहेत. त्या अशा. ड्यूक, मार्किस्-अर्ल, व्हायकाउंट व बॅरन. ड्यूक हा सर्वांत श्रेष्ठ प्रतीचा व बॅरन हा सर्वांत कमी प्रतीचा उमराव होय. राजा आपल्या प्रजाजनांस सरदारक्या देतो; त्या त्या व्यक्तीच्या सामाजिक लायकीवरून. त्यावरूनच त्याची उमरावमंडळांतील प्रत ठरून जाते. इंग्लंडमधील लौकिक उमरावांची आजची संख्या सुमारें ७२० आहे. ही संख्या दरसाल कमीजास्त होते. दर पांच वर्षांनीं स्कॉटिश उमरावांतर्फे निवडून आलेले सोळा उमराव उमरावमंडळांत बसूं शकतात. मात्र स्कॉटिश धर्माधिकाऱ्यांस त्यांत स्थान नाहीं. आयर्लंडच्या अल्स्टरतर्फेंही सोळा तहाहयात उमराव त्या मंडळांत बसूं शकतात. याशिवाय सहा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कायदेपंडितांची तहाहयात नेमणूक झालेली असते. कायद्याच्या बाबतींत सल्ला देणें हें त्यांचें मुख्य काम. अशा तऱ्हेनें उमरावमंडळांतील सभासदांची संख्या आज आठशेंपर्यंत गेलेली आहे. उमरावमंडळाला मुदत नाहीं व इंग्लिश उमरावांची निवडणूकही होत नाहीं. जे आयरिश व स्कॉटिश उमराव उमरावमंडळांत निवडून आलेले नसतात त्यांस कॉमन्ससभेच्या निवडणुकीस उभें राहतां येतें व निवडून आल्यास त्या सभेंत बसतां येते. राजकुटुंबांतील पुरुषांसही उमरावमंडळांत सभासद म्हणून बसतां येतें. या मंडळाच्या सभासदांची संख्या आठशेंपर्यंत असली तरी त्यांपैकीं फारच थोडे लोक त्या सभेच्या बैठकीस हजर असतात. बैठक सुरू होण्यापूर्वी तीन उमराव हजर असल्यास कामकाज सुरू करतां येतें. अर्थात् तीन हीच उमरावमंडळाची गणसंख्या आहे. लॉर्ड सिंह हे एकटेच हिंदी उमराव, बॅरन ही पदवी लाभलेले, उमरावमंडळाचे सभासद आहेत. वयांत न आलेले, दिवाळखोर व जबर शिक्षा झालेले उमराव त्या मंडळांत बसूं शकत नाहींत. स्त्रियांस उमरावपद लाभलें तरी त्यांना त्या मंडळाचें सभासदत्व प्राप्त होत नाहीं. उमरावांना आपले पिढीजाद हक्क टाकून देतां येत नाहींत किंवा आपली जहागीर विकतां येत नाहीं किंवा तिचे तुकडे पाडून ते निरनिराळ्या लोकांस देतां येत नाहींत.

११. लॉर्ड हाय चॅन्सेलर :—उमरावमंडळाच्या अध्यक्षाला 'लॉर्ड हाय चॅन्सेलर' असें म्हणतात. तो उमरावमंडळाचा सभासद असलाच पाहिजे असा नियम नाहीं. असला तर ठीकच, नसल्यास त्याला करतात. तो मंत्रिमंडळाचा सभासद असतो. अर्थात् तो मंत्रिमंडळाबरोबर त्या जागेवर येतो व त्याच्याबरोबरच जातो. मात्र तो मुरब्बी कायदेपंडित असला पाहिजे. त्याच्या आसनाला 'वूलसॅक' असें म्हणतात. तें लोकरीचें केलेलें असतें. त्याच्या खुर्चीला पाठ नाहीं. पूर्वी इंग्लंडचा लोकरीचा व्यापार अत्यंत महत्त्वाचा होता, त्याची साक्ष म्हणूनच चॅन्सेलरचें आसन लोकरीचें होतें; तें तसेंच अजूनही कायम ठेवण्यांत आलें आहे. लॉर्ड हाय चॅन्सेलर अध्यक्ष असला तरी उमरावमंडळावर त्याची फारशी हुकमत चालत नाहीं. उमराव त्याला उद्देशून भाषणें करीत नाहींत, इतर उमरावांना उद्देशून तीं करतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तसेंच दोन उमराव एकदम भाषणें करावयास उभे राहिले तर प्रथम कोणी भाषण करावयाचें तें उमरावमंडळच ठरवितें. केव्हां केव्हां उमरावमंडळांतील सभासद वर्दळीवर येऊन तेथें क्वचित्प्रसंगीं गुद्दागुद्दीही चालते! तरीही चॅन्सेलरला मध्यें पडतां येत नाहीं व तो तंटा मिटवितां येत नाहीं. तो सर्वश्रेष्ठ न्यायाधिकारी असतो व त्या नात्यानें मोठमोठ्या न्यायाधिकाऱ्यांच्या नेमणुकाही तोच करतो. उमरावमंडळाला न्याय देण्याचें काम करावें लागतें, तेव्हां मात्र चॅन्सेलरला महत्त्व असतें; कारण त्या न्यायासनाचा तोच मुख्य समजला जातो. त्याचा पगार दरसाल दहा हजार पौंड ठरविण्यांत आला आहे. उमरावमंडळाच्या निरनिराळ्या सभासदांस जीं व्यक्तिशः आमंत्रणें जातात तीं त्याच्याकडूनच जातात.

१२. उमरावांचे विशिष्ट अधिकारः—उमरावमंडळाच्या प्रत्येक सभासदाला सार्वजनिक कामाकरितां राजाला केव्हांही भेटण्याचा अधिकार आहे. पार्लमेंटचें बोलावणेंही राजाकडून त्याला व्यक्तिशः यावें लागतें. उमरावावर दिवाणी फिर्याद झाल्यास त्याबद्दल त्याला अटक नाहीं. ज्यूरर म्हणून त्याला काम करण्याची त्याच्यावर सक्ति करितां येत नाहीं. उमरावाचा खटला त्याच्या बरोबरीच्या उमरावापुढेंच चालला पाहिजे. तो तसा चालला नाहीं तर आरोपीला आपला खटला आपल्या बरोबरीच्या उमरावांकडूनच चालला पाहिजे असा आग्रह धरतां येतो. सभेच्या शिस्तीविरुद्ध जो वर्तन करील त्याला शिक्षा करण्याचा अधिकार उमरावमंडळाला आहे. त्याचप्रमाणें उमरावमंडळाची बेअब्रू करणाऱ्या गृहस्थाला अटक करण्याचा हक्कही त्या मंडळाला आहे. पार्लमेंटची सभा चालू असतां अगर ती सुरू होण्याच्या अगोदर ४० दिवस व ती बंद झाल्यानंतर ४० दिवस पार्लमेंटच्या सभासदास पकडतां येत नाहीं. उमरावमंडळालाही तो नियम लागू आहे. उमरावमंडळांत पास झालेल्या एखाद्या ठरावाचा आपल्या कारणांसह निषेध व्यक्त करण्याचा प्रत्येक उमरावाला हक्क आहे. एवढेंच नव्हे, तर तशी नोंदही उमरावमंडळाच्या इतिवृत्तांत त्याला करतां येते. लायकी असून ज्याला उमरावमंडळांत जागा मिळाली नसेल त्याला ती मिळवून देण्याचा व नालायक सभासदास जागा सोडून देण्यास भाग पाडण्याचा अधिकार उमरावमंडळाला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तसेंच एखाद्याला आमंत्रण गेलें नसेल तर राजाकडून तें त्याला गेलें पाहिजे असा या मंडळाला आग्रहही धरतां येतो. भाषणस्वातंत्र्य सर्वांस आहे. [किन्सेलच्या उमरावालाच उमरावमंडळांत राजाच्या समक्ष टोपी घालून बसण्याचा खास अधिकार आहे.]

१३. उमरावमंडळाचीं कामें :— उमरावमंडळाला चार प्रकारांचीं कामें करावीं लागतात. कायदा करणें, करांचा विचार करणें, सार्वजनिक प्रश्नांची चर्चा करणें व न्यायदान करणें. (१) प्रथम आपण कायदेमंडळ या नात्यानें उमरावमंडळाकडे कोणतीं कामें येतात तें पाहूं. कॉमन्ससभेनें पास केलेलें प्रत्येक बिल उमरावमंडळाच्या संमतीकरितां यावें लागतें. त्याची संमति मिळाली तरच त्या बिलाला कायद्याचें स्वरूप प्राप्त होतें. उमरावमंडळानें कॉमन्ससभेनें पास केलेलीं बिलें अनेक वेळां नापास केलीं व त्या सभेच्या कामांत व्यत्यय आणण्याचा सपाटा चालविला, म्हणून सन १९११ च्या पार्लमेंट कायद्यानें उमरावमंडळाच्या बिल फेंटाळून देण्याच्या अधिकारावर नियंत्रण घातलें. अर्थात् कॉमन्ससभेनें आपल्या निरनिराळ्या तीन बैठकींत एखादें बिल पास केलें व उमरावमंडळानें तें दर वेळीं फेंटाळून लावलें तरी राजाची संमति मिळून त्या बिलाला कायद्याचें स्वरूप प्राप्त व्हावें असें त्या कायद्यानें ठरलें. कॉमन्ससभेनें पास केलेलें कोणतेंही बिल उमरावमंडळाला फक्त दोनच वर्षें थोपवून धरतां येतें. आर्थिक बिलाव्यतिरिक्त दुसरें कोणतेंही बिल उमरावमंडळांत प्रथमतः मांडलें तरी हरकत नसते. कायदे करण्याच्या बाबतींत उमरावमंडळ म्हणजे 'फेरफार करणारें मंडळ' आहे असें म्हणतां येईल. (२) पूर्वी आर्थिक बाबतींत उमरावमंडळाला थोडे अधिकार होते. परंतु सन १९११ च्या कायद्यानें त्याला त्या बाबतींत कोणत्याही प्रकारचा अधिकार शिल्लक राहिलेला नाहीं. कोणतेंही आर्थिक बिल त्या मंडळांत चर्चेकरितां प्रथम मांडलें जात नाहीं किंवा कोणत्याही बिलांत त्याला कसलाही फरक सुचवितां येत नाहीं. एवढेंच नव्हे, तर कॉमन्ससभेनें पास केलेल्या आर्थिक बिलांस एका महिन्याच्या आंत या मंडळानें संमति दिली नाहीं तर राजाच्या संमतीनें तीं बिलें पास झालीं असेंच समजण्यांत येतें. (३) कोणत्याही सार्वजनिक प्रश्नाची चर्चा या मंडळाला करतां येते. अनेक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभवी मुत्सद्द्यांचा भरणा या मंडळांत असल्यानें त्यांच्या सूचनांचा विशेष उपयोग होतो. या मंडळांत झालेल्या चर्चेचा प्रधानमंडळावरही पुष्कळ परिणाम होतो; त्यामुळेंच त्या मंडळाला 'मतपरिमर्शिनी सभा' (Ventilating Chamber) असें म्हणतात. (४) न्यायदानाचें काम प्राचीन काळापासून या मंडळाकडे आहे. इंग्लंडांतील न्यायदान करणारें सर्वांत वरिष्ठ अपील कोर्ट म्हणजे उमरावमंडळ. न्यायदानाचें काम करण्याकरितां एक कमिटी उमरावमंडळानें नेमलेली असते व न्यायदानाचें काम त्या कमिटीमार्फतच होत असतें. किंग्ज बेंच व चॅन्सरी कोर्ट यांच्या निकालाविरुद्ध अपिलें ऐकण्याचें काम वरील कमिटीच करते. कांहीं बाबतींत अव्वल खटलेही या कोर्टाकडे येतात. उमरावावर राजद्रोहाचा आरोप असेल तर त्या उमरावाचा खटालाही याच कमिटीकडे निवाड्याकरितां येतो. उमरावांच्या वारसांचे खटले चालविणें व उमरावपदासंबंधींच्या वादांचा निकाल लावणें हीं कामेंही हीच कमिटी करते. राजाच्या प्रधानांची चौकशी करून त्यांना शिक्षा देण्याचें कामही याच कमिटीला करावें लागतें. एकंदरींत पाहतां उमरावमंडळाचें न्यायदानाचें काम अत्यंत महत्त्वाचें व सर्वश्रेष्ठ आहे यांत शंका नाहीं. वरील कमिटींत लॉर्ड चॅन्सेलर, लॉर्डस् ऑफ अपील, माजी चॅन्सेलर व इतर कायदेपंडित उमराव असतात.

१४. उमरावमंडळाचा उपयोग :—उमरावमंडळांत अनुभवी, पोक्त, राजकारणांत मुरलेले व विशेषतः थंडपणें कोणत्याही गोष्टीचा साधकबाधकपणें विचार करणारे मुत्सद्दी असतात. त्यामुळें कोणत्याही प्रश्नासंबंधींचे त्यांचे विचार व त्यांचीं मतें महत्त्वाचीं मानिलीं जातात. तेव्हां कॉमन्ससभेनें कोणतेंही बिल घाईनें, अविचारानें व विकारवशतेनें पास केलें तर तें उमरावमंडळाला निदान दोन वर्षें तरी थोपवून ठेवितां येईल. अर्थात् त्या दृष्टीनें उमरावमंडळाचा आगगाडीच्या ब्रेकसारखा उपयोग होत असतो. शिवाय बिलांच्या वेळीं उमरावमंडळांत जी चर्चा होते त्यामुळें त्या त्या प्रश्नाकडे जनतेचें मत खेचलें जाऊन लोकमत बनविण्यास पुष्कळ मदत होते. जनतेचीं गाऱ्हाणीं या सभेपुढें चर्चेकरितां येतात, त्यांचेंही परिमार्जन ही सभा करूं शकते. या सभेंतील बहुतेक लोक खानदानींतील असल्यामुळें त्यांच्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडून राष्ट्रकार्य स्वार्थत्यागपूर्वक व मोठ्या दक्षतेनें होतें. अर्थात् उमराव-मंडळ असण्यामुळें राष्ट्राचा पुष्कळ फायदा होतो यांत शंका नाहीं. तरीही कांहीं लोकांना उमरावमंडळ अजीबात रद्द करावें असें वाटतें. ज्या मंडळाला कोणत्याही प्रकारचा अधिकार नाहीं तें ठेवून उपयोग काय असें त्यांचें म्हणणें. त्यांच्या म्हणण्यांत थोडा अर्थ असला तरी आज बहुतेक सर्व राष्ट्रांत द्विमंडळात्मक पद्धति ज़ोर धरून आहे. उमरावमंडळांत बेसुमार लोक आहेत, वंशपरंपरेनें ते आपले पिढीजाद हक्क उपभोगतात व हातीं सत्ता नसतांही उमरावमंडळ जगविण्याचा ते प्रयत्न करतात. हे दोष उमरावमंड-ळाच्या ठिकाणीं असले तरी इंग्लिश सरकारला उमरावमंडळासारखी पुराणी संस्था नष्ट करावी असें वाटत नाहीं व त्यामुळेंच उमरावमंडळ अजून जीव धरून आहे.

कॉमन्स सभा

१५. कॉमन्ससभेची रचना:—कॉमन्ससभा हा ब्रिटिश पार्लमेंटचा अत्यंत महत्त्वाचा भाग. खरी सत्ता याच सभेच्या हातीं आहे. त्या सभेंत एकंदर ६१५ सभासद आहेत. त्यांपैकीं ४९२ इंग्लंडतर्फे, ३६ वेल्सतर्फे, ७४ स्कॉटलंडतर्फे व १३ आयर्लंडमधील अल्स्टर प्रांतातर्फे आहेत. त्या सर्वांची निरनिराळ्या मतदारसंघांतर्फे निवडणूक होते. सर्वसाधारणपणें शहरां-तर्फे ३००, परगण्यांतर्फे ३०३ व विश्वविद्यालयांतर्फे १२ अशी जागांची वांटणी आहे. कॉमन्ससभेच्या निवडणुकीच्या वेळीं उमराव, दिवाळखोर, जबर शिक्षा झालेले, परकीय लोक, वेडे व वयांत न आलेले लोक यांस मतदानाचा अधिकार नाहीं. इंग्लंडमध्यें सार्वत्रिक मतदानाचें तत्त्व रूढ असल्यानें एकवीस वर्षें वयाच्या प्रत्येक स्त्री–पुरुषास मतदानाचा अधिकार आहे. ज्याला मतदानाचा अधिकार प्राप्त झालेला आहे अशा कोणत्याही स्त्रीस अगर पुरुषास पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळीं उमेदवार म्हणून उभें राहतां येतें. मात्र ज्या मतदारसंघातर्फे तो उमेदवार म्हणून उभा राहणार असेल त्या संघाच्या हद्दींत निदान तीन महिने त्याचें वास्तव्य असलें पाहिजे. इंग्लंडची लोकसंख्या चार कोटी आहे. त्यापैकीं जवळ जवळ दोन कोटी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांना मतदानाचा अधिकार असून त्यापैकीं सुमारें पाऊण कोटी स्त्रिया आहेत. साधारणपणें पार्लमेंटची निवडणूक पांच वर्षांनीं होते व ती गुप्त-मतदानपद्धतीनें होते. प्रत्येक मतदारानें निवडणुकीच्या वेळीं मत दिलेंच पाहिजे असा कायदा नाहीं; मात्र मतदाराचा अर्ज त्यानें भरलाच पाहिजे असा निर्बंध आहे. त्यानें तसें केलें नाहीं तर त्याला वीस पौंडांपर्यंत दंडही होऊं शकतो. कोणालाही दोनपेक्षां जास्त मतें एकाच वेळीं देतां येत नाहींत. कॉमन्ससभेच्या प्रत्येक सभासदाला सालीना चारशें पौंड पगार मिळतो. कॉमन्ससभेच्या अध्यक्षाला स्पीकर असें म्हणतात व त्याची निवडणूक त्या सभेच्या सर्व सभासदांकडून होते. चाळीस सभासद हजर असले म्हणजे कॉमन्ससभेच्या कामास सुरुवात होते. अर्थात् त्या सभेची ४० ही गणसंख्या होय.

१६. कॉमन्ससभेचा अध्यक्ष ऊर्फ स्पीकर :—कॉमन्ससभेची निवडणूक झाली कीं अध्यक्षाचीही निवडणूक होते. पूर्वी त्या सभेचा अध्यक्ष राजाचा संदेश कॉमन्ससभेला किंवा त्या सभेचें म्हणणें राजाला कळवीत असे व म्हणूनच त्याला 'स्पीकर' असें म्हणत. त्याच्या निवडणुकीला राजाची संमति असावी लागते. तो त्या सभेचा लोकनियुक्त सभासद असतो. तो पक्षातीत असला पाहिजे. पार्लमेंटकरितां त्याची निवडणूक बिनविरोध व्हावी असा प्रघात आहे. सभागृहांत शिस्त राखणें, सभेचें मत जाहीर करणें, मतांची योग्य मोजदाद करणें, योग्य निकाल देणें शंकास्थलांवर निःपक्षपातीपणें निर्णय देणें, शिस्तभंगाबद्दल प्रायश्चित्त देणें, अनावश्यक वादविवाद थांबविणें वगैरे त्याचीं महत्त्वाचीं कामें आहेत. सभागृहांत गैरशिस्त वर्तन करणारास सभेंतून हांकून देण्याचाही त्याला अधिकार आहे. त्याच्या निर्णयाविरुद्ध अगर हुकुमाविरुद्ध अपील नाहीं. प्रत्येक सभासदानें त्याचा हुकूम मानलाच पाहिजे. सभेचें वातावरण उच्च प्रकारचें ठेवण्याची त्याच्यावर जबाबदारी आहे. प्रत्येक सभासदाला भाषण करावयाचें असल्यास तें त्यानें अध्यक्षाला उद्देशून केलें पाहिजे असा दंडक आहे. मतें सारखीं पडलीं तर त्याला निर्णायक मत देण्याचा अधिकार आहे. पार्लमेंट बरखास्त झाली कीं त्याची मुदतही संपते; नाहींपेक्षां त्याची मुदत पांच वर्षांची आहे. अधिकाराची साक्ष म्हणजे पार्लमेंट चालू असतां स्पीकरच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढील टेबलावर ठेवण्यांत येणारी रुपेरी गदा होय. त्याच्या गैरहजेरींत उपाध्यक्ष काम करतो. अध्यक्षाला पुनः पुनः त्याच जागीं निवडतां येतें; त्यानें तें काम सोडलें तर त्याला उमरावपद दिलें जातें. केन्सिंग्टन म्यूझियमचा व ब्रिटिश म्यूझियमचा तो संरक्षक समजला जातो. त्याचा वार्षिक पगार ५००० पौंड आहे. त्याला राहावयास घरही मोफत असतें व त्याकरितां त्याला कोणतेही कर द्यावे लागत नाहींत. अध्यक्षाच्या उजव्या बाजूच्या बाकांवर सरकारपक्षीय लोक बसतात व विरोधी पक्षांतील लोक अध्यक्षाच्या डाव्या बाजूच्या बाकांवर बसतात.

१७. कॉमन्ससभेचे विशिष्ट अधिकार:—पार्लमेंटच्या सभासदास भाषणस्वातंत्र्याचा हक्क आहे. अर्थात् त्यास माहीत असलेली गुप्त माहिती त्यानें बैठकीच्या वेळीं सांगितली तरी त्याबद्दल त्याला शिक्षा होत नाहीं, माफी असते. अटकस्वातंत्र्याचाही हक्क त्यास आहे. त्याच्यावर दिवाणी दावा चालू शकत नाहीं. पार्लमेंटची बैठक चालू असतां अगर बैठक होण्यापूर्वी व झाल्यानंतर ४० दिवस त्यांस अटक करतां येत नाहीं. पार्लमेंटच्या सभासदास सरकारी नोकरी स्वीकारितां येत नाहीं व आपल्या सभासदत्वाचा राजीनामा देतां येत नाहीं. त्याला राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यानें चिल्टर्न हंड्रेडच्या अधिकाऱ्याच्या नामधारी जागेकरितां फडणिसाकडे अर्ज करावयाचा असतो. बहुधा त्याला ती जागा मिळते व ज्या क्षणीं त्याला ती जागा मिळते त्याच क्षणीं तो त्या जागेचा राजीनामा खरडून मोकळा होतो. सभेच्या हक्कास बाधक होईल अगर तिची इभ्रत कमी होईल असें कृत्य जर कोणीं केलें तर त्याला अटक करण्याचा कॉमन्ससभेला अधिकार आहे. असली अटक त्या सभेची बैठक संपली कीं संपते. तसलीच गोष्ट सभेच्या सभासदानें केली तर त्याला सभागृहांतून बाहेर हांकलून देण्याचा अधिकार कॉमन्ससभेला आहे. वादात्मक निवडणुकींची चौकशी करण्याचा हक्क या सभेला आहे. राजाचे मंत्री याच सभेला जबाबदार असतात. तेव्हां जरूर पडल्यास त्यांच्यावर खटला भरण्याचा हक्क या सभेला आहे. नवीन कर बसविणें, जुन्यांत फेरफार करणें, ते रद्द करणें, अंदाजपत्रक तयार करून वेळोवेळीं पैशाची मंजुरी देणें व सरकारी जमाखर्चाची तपासणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करणें हेही कॉमन्ससभेचे अधिकार समजले जातात. कोणतेंही पैशासंबंधाचें बिल प्रथमतः याच सभेंत विचाराकरितां आलें पाहिजे. सामुदायिकरीत्या–व्यक्तिशः नव्हे–कॉमन्ससभेला, आपल्या अध्यक्षाला पुढें घालून, राजाची भेट घेतां येते.

१८. कॉमन्ससभेचीं कामें :—कॉमन्ससभेच्या कामांचें वर्गीकरण खालीलप्रमाणें करतां येईल. (१) सर्व प्रकारचीं आर्थिक बिलें तयार करणें व जमाखर्चावर देखरेख ठेवणें. (२) कायदे करणें. (३) लोकहिताच्या कामांचा विचार करणें व (४) राज्यकारभारावर देखरेख ठेवून अंमलबजावणी खात्यावर ताबा चालविणें. (१) कॉमन्ससभेचें आर्थिक प्रश्नांसंबंधींचें वर्चस्व अत्यंत महत्त्वाचें आहे. प्रत्येक आर्थिक बिल याच सभेंत विचाराकरितां प्रथम मांडलें गेलें पाहिजे. नवीन कर नेमणें, जुने कमी अगर रद्द करणें, आर्थिक बिलें तयार करणें, जकाती बसविणें, अंदाजपत्रक तयार करून तें पार्लमेंटला सादर करणें, कोणत्या खात्यावर किती खर्च करावयाचा तें ठरविणें वगैरे कामें करण्याचा हक्क याच सभेला आहे. आर्थिक बाबतींत दोष दिसून आल्यास त्याबद्दल प्रधानमंडळाला जबाबदार धरून त्यावर उमरावमंडळापुढें खटला भरण्याचा अधिकारही याच सभेला आहे. (२) कोणत्याही गोष्टीसंबंधीं कायदा करावयाचा तर बिलें तयार करून तीं सभेपुढें प्रधानमंडळाकडून मांडिलीं जातात. मग त्यांवर वादविवाद होऊन तीं या सभेकडून पास अगर नापास होतात. हें काम अत्यंत महत्त्वाचें आहे. (३) सार्वजनिक हिताच्या गोष्टींसंबंधीं चर्चा करण्याचाही या सभेस अधिकार आहे. त्यासंबंधीं सरकारला प्रश्न विचारून माहिती विचारण्याचा व जरूर पडल्यास त्यावर चर्चा करण्याचाही हक्क या सभेला आहे. लोकांच्या तक्रारी दूर कशा कराव्या ह्याचाही विचार या सभेंत होतो. (४) आपण पास केलेल्या कायद्यांची प्रधानमंडळाकडून चोखपणें अंमलबजावणी होते किंवा नाहीं हें पाहणें कॉमन्ससभेचें काम आहे. अर्थात् त्याकरितां कॉमन्ससभेचे सभासद प्रधानांना प्रश्न विचारतात; त्यानें समाधान झालें नाहीं तर तहकुबीच्या सूचनाही करतात, एखाद्या खात्याच्या खर्चांत काट सुचवून व तो मंजूर करून आपला निषेध व्यक्त करतात, सरकारवर निंदाव्यंजक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठराव मांडतात किंवा एखादे वेळीं सर्वच्या सर्व अंदाजपत्रक अगर जमाबंदीचें बिल नापास करतात. कॉमन्ससभेचा निषेध ज्या प्रकारचा तीव्र अगर सौम्य असेल त्याप्रमाणें वरीलपैकीं एखाद्या उपायाची योजना होते. अशा-तऱ्हेनें प्रधानमंडळाच्या कामाबद्दल या सभेनें आपली नापसंती दर्शविली तर प्रधानमंडळ आपल्या जागेचा राजीनामा देतें किंवा पार्लमेंटची नवी निवडणूक करतें. प्रधानमंडळाच्या कामांतील दोष दाखवून देऊन त्याला कामावरून हुसकून काढण्याचा अधिकार या सभेला असल्यामुळें या सभेला 'सरकार घडविणारें मंडळ' असें म्हणतात.

१९. कॉमन्ससभेच्या कामाची पद्धति :—पार्लमेंटची सभा दरसाल ठराविक वेळां भरते. निवडणूक झाल्यावर कॉमन्ससभा आपल्या अध्यक्षाची निवडणूक प्रथम करते. नंतर सर्व सभासदांस राजनिष्ठेची शपथ घ्यावी लागते. त्यावेळीं पार्लमेंट उघडण्याचा थाटमाट मोठा वैभवशाली होतो. पार्लमेंटगृहा-पर्यंत राजाची मोठी थाटाची मिरवणूक निघते. मग उमरावमंडळांत 'राजाचें भाषण' होतें. तें ऐकण्याकरितां अध्यक्षाच्या पुढारीपणाखालीं कॉमन्ससभेचे सभासद उमरावमंडळाच्या दारापाशीं जाऊन उभे राहतात. तें संपल्यावर दोन्ही सभांच्या निरनिराळ्या सभा भरतात व तेथें राजाच्या भाषणावर चर्चा होते. राजाच्या भाषणांत अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख केलेला असतो. तें भाषण मंत्रिमंडळानेंच तयार केलेलें असतें. अर्थात् पार्लमेंटमध्यें त्यावर चर्चा होत असतां सरकारी धोरणावर कडक टीका होण्याचा संभव असतो. राजाच्या भाषणास पुस्ती जोडण्याचाही कॉमन्ससभेला अधिकार आहे. तसा प्रकार सर्वसंमत झाला तर तोही प्रधानमंडळावरील अविश्वासाचा प्रकार असें समजून प्रधानमंडळ राजीनामा देतें. तसें झालें नाहीं तर दोन्ही सभांचें 'उत्तरात्मक भाषण' राजाला सादर करण्यांत येतें. यानंतर पार्लमेंटच्या कामाला सुरुवात होते. खाजगी बिलें व सरकारी बिलें असे बिलांचे दोन प्रकार असतात. सरकारी बिलें प्रधानमंडळाकडून तयार केलीं व मांडलीं जातात. खाजगी बिलें बिनसरकारी सभासदांकडून मांडलीं जातात; त्यांना वेळ फार थोडा मिळतो. कोणत्याही बिलाला कायद्याचें स्वरूप प्राप्त होण्या-पूर्वी त्याला निरनिराळ्या संस्कारांमधून जावें लागतें. तें असें. पहिलें वाचन.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यावेळीं बिलावर सर्वसाधारण चर्चा होते. पहिलें वाचन मंजूर झालें म्हणजे तें बिल दुसऱ्या वाचनाकरितां पार्लमेंटपुढें मांडिलें जातें. त्यावेळीं त्याचें तत्त्व व सामान्य स्वरूप यांसंबंधीं पुन्हा चर्चा होते. हें वाचन एखादे वेळीं चटकन् होतें किंवा त्याला महिनेच्या महिनेही लागतात. दुसरें वाचन पास झाल्यावर तें कमिटीकडे विचाराकरितां पाठविण्यांत येतें. तेथें त्याची साद्यंत छाननी होते, त्यांत दुरुस्त्या व क्वचित्प्रसंगीं त्याचें सर्वच्या सर्व रूप पालटून जातें. कमिटींत बिल पास झालें म्हणजे मग त्या बिलाचें तिसरें वाचन पार्लमेंटपुढें होतें. त्यावेळीं त्यावर पुन्हां सामान्य चर्चा होऊन त्या बिलावर सभासदांचीं मतें घेतलीं जातात व बिल पास अथवा नापास केलें जातें. तिसऱ्या वाचनानंतर बिल पास झालें म्हणजे मग ते दुसऱ्या सभेच्या संमती-करितां पाठविण्यांत येतें. तेथें तें पास झालें म्हणजे मग राजाची संमति मिळून त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त होतें. दुसऱ्या सभेनें तें नापास केलें तर तें नापास झालें असें समजतात; त्या सभेनें त्या बिलांत दुरुस्त्या केल्या तर तें बिल दुरुस्त स्थितींत पहिल्या सभेकडे येतें. तेथें तें पास झालें तर मग तें पुन्हां दुसऱ्या सभेंत पास व्हावें लागतें व मग त्याला राजाची संमति मिळून कायद्याचें स्वरूप प्राप्त होतें. आर्थिक बिलें व अंदाजपत्रकेंही वरील-प्रमाणें कॉमन्ससभेला पास करावीं लागतात. तीं नापास झालीं तर प्रधान-मंडळाला राजीनामा देणें भाग पडतें.

प्रधानमंडळ ऊर्फ कॅबिनेट

२०. थोडा पूर्वेतिहास :—प्राचीन काळापासून राजाला मदत करण्या-करितां वितन, बडें कौन्सिल वगैरे संस्था होत्या. पुढें त्यांचें प्रिव्ही कौन्सिलांत रूपांतर होऊन राजे लोक त्या कौन्सिलचा सल्ला राज्यकारभाराच्या वेळीं घेत. या कौन्सिलांत सर्व पक्षाचे व सर्व प्रकारच्या मतांचे लोक असत. ट्यूडर काळांत या मंडळांतील सभासदांची संख्या फार वाढली; त्यामुळें इतक्या मोठ्या कौन्सिलचा सल्ला घेणें अवघड होऊं लागलें. स्टुअर्ट राजांच्या वेळींही ती संख्या आणखी फुगत गेली. त्यामुळें त्यांचा सल्ला घेणें जास्तच दुष्कर झालें. त्या मंडळाकडून राज्यकारभाराचें व अंम-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लबजावणीचें कामही योग्य रीतीनें होईनासें झालें. त्या कामाकरितां त्या मंडळांत थोडी मंडळी असणेंच सोइस्कर आहे असें दुसऱ्या चार्ल्सला वाटलें. तेव्हां त्यानें प्रिव्ही कौन्सिलांत कांहीं प्रमुख लोकांचाच सल्ला घेण्याचें धोरण स्वीकारून, सर्व वेळीं तो त्यांचाच सल्ला विचारांत घेऊं लागला. हे सर्व लोक राजाच्या मर्जीतले व त्याच्या इच्छेप्रमाणें वागणारे असूनही त्यांना पार्लमेंटमध्यें पाठबळ होतें. त्याच्या एका मंडळाला 'कॅबॉल मंत्रिमंडळ' असें नांव होतें. त्या मंडळाच्या स्थापनेपासूनच प्रधानमंडळाची ऊर्फ कॅबिनेटची स्थापना झाली असें मानण्यांत येतें. पुढें सन १६८९ च्या क्रांतीनंतर तिसऱ्या विल्यमनेंही तेंच धोरण स्वीकारिलें. त्यानेंच पहिलें कॅबिनेट स्थापिलें; कारण आधुनिक तत्त्वाप्रमाणें त्याच्या मंत्रिमंडळांत एकाच पक्षाचे प्रधान होते. ॲननेंही त्याच्याच धोरणाचें अनुकरण करून प्रधानमंडळात्मक राज्यपद्धतीची वाढ केली. पुढें पहिला व दुसरा जॉर्ज यांच्या कारकीर्दीत सर रॉबर्ट वॉलपोलमुळें त्या राज्यपद्धतीचा चांगलाच विकास झाला व त्यानें त्या राज्यपद्धतीचीं बीजें खोलपर्यंत रुजविलीं. पहिल्या जॉर्जला इंग्रजी येत नसे, त्यामुळें तो प्रधानमंडळाच्या सभांस गैरहजर राहूं लागला. दुसऱ्या जॉर्जनेंही तेंच धोरण स्वीकारिलें. त्यामुळें सर्व प्रधान एकत्र येत, प्रत्येक प्रश्नाचा साधक बाधक विचार करीत, कारभाराचें धोरण ठरवीत व राज्यकारभार हांकीत. त्यांच्यावर राजाचा दाब न राहिल्यानें त्यांचा कारभार स्वतंत्रपणें होऊं लागला. राजाच्या गैरहजेरीमुळें मुख्य प्रधानाला मात्र महत्त्व येऊं लागलें. सर रॉबर्ट वॉलपोलनें प्रधानमंडळाच्या कामाला योग्य वळण लावलें व त्याच्या कामासंबंधीं कांहीं प्रघात रूढ केले. पुढें ते इतके वज्रलेप झाले कीं त्यांविरुद्ध वर्तन करणें म्हणजे घटनाभंग झाला असें अजूनही मानण्यांत येतें. प्रधानमंडळात्मक राज्यपद्धतीची सर्व उभारणी रूढी, परंपरा, आचार व प्रघात यांवरच आहे.

२१. प्रधानमंडळाचें वैशिष्ट्य :—कॅबिनेट या शब्दाचा मूळ अर्थ एक 'खाजगी खोली' असा आहे. प्रधानमंडळाच्या बैठकी गुप्तपणें एका खाजगी खोलींत होत, म्हणून प्रधानमंडळाला 'कॅबिनेट' असें लोक म्हणूं लागले. कांहीं लोक प्रधानमंडळाला कायदेमंडळाची एक पोटकमिटी असें समजतात, तर कांहीं त्याला प्रिव्ही कौन्सिलची एक कमिटी मानतात. हे दोन्हीही अर्थ बरोबर आहेत;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पार्लमेंट कारभाराचें धोरण आंखते व त्याची अंमलबजावणी करण्याचें महत्त्वाचें काम प्रधानमंडळाला करावें लागतें. अर्थात् प्रधानमंडळ सर्व कारभार राजाच्या नांवानें व पार्लमेंटच्या हुकुमानें करते. तेव्हां प्रधानमंडळ म्हणजे राजा व पार्लमेंट यांना एकत्र जोडणारें एक मंडळ आहे असें म्हणतां येईल. कॅबिनेटचें वैशिष्ट्य खालील गोष्टींमध्यें सामावलेलें आहे. (१) 'राजाची गैरहजेरी'—प्रधानमंडळाच्या बैठकीस राजानें हजर राहतां कामा नये. पहिले दोन जॉर्ज व नंतर तिसरा जॉर्ज प्रधानमंडळाच्या सभांस हजर रहात नसत. त्यामुळें राजानें हजर राहूं नये अशी रूढीच पडली. त्याचा अप्रत्यक्ष व महत्त्वाचा परिणाम म्हणजे राजाच्या गैरहजेरींत मुख्य प्रधानाचें महत्त्व व प्रस्थ वाढलें. प्रधानमंडळांतील चर्चाही निर्भीडपणें होऊं लागली, राज्यकारभाराची सर्व जबाबदारी राजावर न पडतां ती प्रधानमंडळावर पडूं लागली; व त्यामुळें प्रधानमंडळ पार्लमेंटला आपोआपच जबाबदार राहूं लागलें. (२) 'बहुमताचाच पाठिंबा पाहिजे'—कॉमन्ससभेंत ज्या पक्षाला बहुमत मिळालेलें असतें त्याच पक्षाचें प्रधानमंडळ असलें पाहिजे. निर्णायक बहुमत नसेल तर त्या पक्षाला प्रधानमंडळ बनवितां येणार नाहीं. (३) 'एकपक्षीयत्व'—प्रधानमंडळांतील सर्व प्रधान बहुमतवाल्या पक्षांतूनच निवडले गेले पाहिजेत. विरोधी पक्षाचा एकही प्रधान त्यांत असतां कामा नये. एकाच पक्षाचे लोक प्रधानमंडळांत असले तर प्रधानमंडळाचें धोरण एक राहूं शकतें. (४) 'सामुदायिक जबाबदारी'—प्रधानमंडळांतील सर्व प्रधान पार्लमेंटला सामुदायिकरीत्या जबाबदार असले पाहिजेत. पार्लमेंट, राजा व जनता यांच्याशीं वागतांना मंत्रिमंडळानें नेहमीं एकीनें वागलें पाहिजे; इतकें कीं सर्व प्रधानमंडळ जणूं एकच व्यक्ति आहे असें सर्वांस वाटावें. प्रधानाप्रधानांमध्यें विरोध अगर मतभेद असणें शक्य आहे; परंतु प्रधानांनीं ते तसे न दाखवितां सर्वांची एकीच लोकांच्या निदर्शनास सदैव आणली पाहिजे. सर्व प्रधान प्रधानगिरीवर एकदम येतात व तेथून एकदमच परत जातात. (५) 'मुख्य प्रधानाची हुकमत'—सर्व प्रधानांनीं मुख्य प्रधानाच्या हुकमतींत वागलें पाहिजे व तो सांगेल व तो जो सल्ला देईल त्याप्रमाणें वागलें पाहिजे. यामुळें प्रधानमंडळाचीं सर्व सूत्रें मुख्य प्रधानाच्या हातींच असतात असें म्हणतां येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२२. प्रधानमंडळाची रचना :—पार्लमेंटची निवडणूक झाली म्हणजे त्यांत ज्या पक्षाला बहुमत मिळालें असेल त्या पक्षाच्या पुढाऱ्यास राजा बोलावून घेतो व त्याची मुख्य प्रधान म्हणून नेमणूक करून त्याला प्रधानमंडळ बनविण्यास त्यास आज्ञापितो. नंतर मुख्य प्रधान आपल्या पक्षांतील प्रमुख व मुरब्बी मुत्सद्यांचें मंत्रिमंडळ तयार करून त्यांचीं नांवें राजाच्या संमतीकरितां पाठवितो. राजाची संमति मिळाली म्हणजेच त्या त्या प्रधानाचें मंत्रिमंडळांतील आसन स्थिर होतें. ज्या पक्षाचें प्रधानमंडळ असेल त्या पक्षाला अधिकारारूढ पक्ष असें म्हणतात व त्याच्या खालोखाल ज्या पक्षाचें बहुमत कॉमन्ससभेंत असेल त्याला विरोधीपक्ष असें म्हणतात. अधिकारारूढ पक्षाला जोंपर्यंत कॉमन्ससभेचा पाठिंबा असेल तोंपर्यंतच अधिकारारूढ राहतां येतें, नाहींतर मंत्रिमंडळानें राजीनामा द्यावा किंवा पार्लमेंटची नवी निवडणूक करावी. त्यानें राजीनामा दिल्यावर विरोधीपक्षाचा पुढारी मुख्य प्रधान होतो व तो आपल्या पक्षाचें प्रधानमंडळ बनवितो. पार्लमेंटची नवी निवडणूक झाली व त्यांत अधिकारारूढ पक्षालाच बहुमत मिळालें तर त्या पक्षाचें प्रधानमंडळ टिकतें; पण बहुमत मिळालें नाहीं तर त्याला राजीनामा द्यावा लागतो. प्रधानमंडळांतील सर्व प्रधान पार्लमेंटच्या एखाद्या सभेचे सभासद असलेच पाहिजेत. मुख्य प्रधान मात्र कॉमन्ससभेचाच सभासद असला पाहिजे असा अलीकडे प्रघात पडला आहे. कॅबिनेटमध्यें साधारणतः वीसबावीस प्रधान असतात. ज्यांना कॅबिनेटमध्यें जागा नाहीं पण ज्यांची प्रधानमंडळांत नेमणूक झालेली आहे असे ३५–४० प्रधान असतात. सन १९३७ च्या कायद्याप्रमाणें मुख्य प्रधान, खजिन्यावरील पहिला प्रधान व लॉर्ड हाय चॅन्सेलर यांचा पगार दरसाल दहा हजार पौंड, बाकीच्या सर्व प्रधानांचा वार्षिक पगार प्रत्येकीं पांच हजार पौंड व विरोधीपक्षाच्या पुढाऱ्यास वार्षिक दोन हजार पौंड असावा असें ठरलें. त्याचप्रमाणें सर्वांस योग्य पेन्शनही मिळावें असें त्या कायद्यानें ठरविलें आहे. प्रधानमंडळाची नेमणूक सामान्यतः पांच वर्षांची असते व मध्यंतरीं एखादें गंडांतर आलें नाहीं तर तें तितका वेळ टिकतें. मुख्य प्रधान हाच प्रधानमंडळाचा अध्यक्ष असतो. प्रत्येक प्रधानाकडे अंमलबजावणीचें एकेक खातें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोंपविलेलें असतें. प्रधानमंडळाच्या सभांस राजा हजर राहत नाहीं, तरी त्या सभेंत काय झालें व ठरलें तें त्याला कळवावें लागतें. इतके दिवस त्या बैठकींत झालेली चर्चा दप्तरीं दाखल होत नसे; अलीकडे ती तशी होऊं लागली आहे.

२३. मंत्रिमंडळांतील प्रधान व त्यांचीं खातीं :—प्रधानमंडळांत जे प्रधान असतात व त्यांच्याकडे जीं खातीं असतात तीं खालीं दिलीं आहेत. कॅबिनेटमध्यें खालील प्रधान असतात.

१. मुख्य प्रधान व खजिन्याचा पहिला प्रधान
२. लॉर्ड हाय चॅन्सेलर, उमरावमंडळाचा अध्यक्ष
३. प्रिव्ही कौन्सिलचा अध्यक्ष
४. शिक्का सांभाळणारा प्रधान (Lord Privy seal)
५. फडणवीस—फडणिशीखातें
६. परराष्ट्रमंत्रि—परराष्ट्रीयखातें
७. गृहमंत्रि—अंतर्व्यवस्थाखातें
८. वसाहतमंत्रि—वसाहतखातें
९. डोमीनियनमंत्रि—डोमीनियन खातें
१०. युद्धमंत्रि—युद्धखातें
११. भारतमंत्रि—हिंदुस्थानचा कारभार
१२. विमानमंत्रि—विमानखातें
१३. व्यापारमंत्रि—व्यापारखातें
१४. आरमारमंत्रि—आरमारखातें
१५. आरोग्यमंत्रि—आरोग्यखातें
१६. कृषिमंत्रि—शेतकी व मच्छीमारी
१७. शिक्षणमंत्रि—शिक्षणखातें
१८. मजूरमंत्रि—मजूरखातें
१९. स्कॉटलंडचा मंत्रि—स्कॉटलंडचा कारभार
२०. इमारती व रस्ते मंत्रि—सार्वजनिक हितकृत्यें
२१. राजाच्या खाजगी इस्टेटीचा मंत्रि
२२. अॅटोर्ने जनरल—कायदेपंडित—कायद्याचा सल्ला

प्रत्येक मंत्र्याला मदत करण्याकरितां एक उपमंत्रि असतो. प्रिव्ही कौन्सिलचा अध्यक्ष व शिक्का सांभाळणारा प्रधान यांच्याकडे कोणतेंही खातें नसतें. तरीही त्या जागीं ज्या प्रधानांची नेमणूक झालेली असते ते मोठे मुरलेले,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभवी व नामांकित मुत्सद्दी असल्यानें त्यांच्या सल्ल्याचा प्रधानमंडळाला फार उपयोग होतो. राज्यकारभाराचें धोरण कॅबिनेट ठरवितें व सर्व मंत्रिमंडळ त्याप्रमाणें आपापल्या खात्याचा कारभार करतें. अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींचा खल व चर्चा कॅबिनेटमधील सर्व सभासद एकत्र येऊन करतात. त्यांच्या सभेंत जें ठरेल त्याप्रमाणें एकमुखी धोरण ठरविलें जातें.

२४. मिश्र प्रधानमंडळ :—कॉमन्ससभेमध्यें ज्यावेळीं कोणत्याही पक्षाला बहुमत नसतें त्यावेळीं मात्र मोठी अडचणीची परिस्थिति निर्माण होते. अशा स्थितींत एखादे वेळीं दोन किंवा अधिक पक्षांतील मुत्सद्यांचें प्रधानमंडळ बनविण्यांत येतें. त्याचप्रमाणें राष्ट्रावर जर एखादे वेळीं मोठी आपत्ति आली अगर अत्यंत आणीबाणीची वेळ उत्पन्न झाली तर त्यावेळींही सर्व पक्षांतील लोकांचें प्रधानमंडळ बनवितात. अशा प्रधानमंडळाला 'मिश्र-प्रधानमंडळ' असें म्हणतात. मिश्र प्रधानमंडळ बनवितात तेव्हां निरनिराळ्या पक्षांतील लोक आपापसांतील मतभेद बाजूस सारून राष्ट्रावरील आपत्ति कशी निवारण करतां येईल याचा विचार करतात व एक सर्वमुखी धोरण व कार्यक्रम ठरवितात. त्याप्रमाणें मिश्र प्रधानमंडळाचें काम चालतें. सर्वपक्षीय प्रधानमंडळही कांहीं कांहीं वेळां स्थापन होतें. त्याला 'राष्ट्रीय प्रधानमंडळ' असें म्हणतात. कांहीं कांहीं वेळां आपल्या प्रतिपक्षीयांचा पाडाव करून समाईक हेतु साधण्याकरितांही मिश्र प्रधानमंडळ स्थापिलें जातें. फॉक्स व नॉर्थ (१७८३), फॉक्स-ग्रेनव्हिल (१८०७), ॲबर्डीन (१८५२), लॉइड जॉर्ज (१९१५), मॅकडोनल्ड (१९३१), चर्चिल (१९४०) हीं सर्व मिश्र प्रधानमंडळाचीं कांहीं उदाहरणें होत.

२५. मुख्य प्रधान :—वॉलपोल हा इंग्लंडचा पहिला मुख्य प्रधान मानला जातो. मात्र मुख्य प्रधानाची जागा त्यावेळीं राज्यघटनेला व कायद्याला मान्य नव्हती. त्याला प्रथम सन १९०५ मध्यें मान्यता मिळाली. मुख्य प्रधान हा राष्ट्राचा खरा नेता समजला जातो. राजाच्या खालोखाल राष्ट्राकडून त्याला मान मिळतो. असें असूनही त्याच्या जागेला पगार मिळत नाहीं. त्यामुळें त्याला दुसरी एखादी पगारी जागा पत्करावी लागते. ती जागा बहुधा 'खजिन्याचा पहिला प्रधान' ही असते. मुख्य प्रधान हा कॅबिनेटचा आत्मा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कार्यकारी मंडळाचा तो अध्यक्ष असतो व त्यामुळें त्याला इतर खात्यांच्या कामावर देखरेख ठेवावी लागते. इतर मंत्र्यांनीं त्याच्या सूचना ऐकून त्याप्रमाणें काम केलें पाहिजे, नाहींतर राजीनामा दिला पाहिजे. कोणत्याही प्रश्नाचा अखेरचा निकाल मुख्य प्रधानच देतो व तो सर्वांना शिरसावंद्य मानावा लागतो. परराष्ट्रीय प्रधानाच्या कामावर मुख्य प्रधानाची नजर विशेष काळजीपूर्वक असते. परराष्ट्रीय पत्रव्यवहारही त्याच्या नजरेखालून जातो. मुख्य प्रधान कॉमन्ससभेचा पुढारी असतो व त्या नात्यानें सरकारचें म्हणणें त्याला पॉर्लमेंटपुढें मांडावें लागतें. अप्रत्यक्षपणें जनतारूपी राजसत्तेचा तो प्रतिनिधि व राजाचा खाजगी सल्लागार असतो. त्या नात्यानें सरकारी धोरण सांभाळणें, कायदे करणें व जुन्यांत दुरुस्ती करणें, नवे कर बसविणें अगर जुनें रद्द अगर कमी करणें वगैरे कामें त्याला करावीं लागतात. कोणत्याही प्रश्नासंबंधीं प्रधानमंडळानें कोणतें धोरण स्वीकारिलें आहे हें त्याला राजाला कळवावें लागतें व राजाचें त्या संबंधींचें म्हणणें प्रधानमंडळाला कळवावें लागतें. या दृष्टीनें राजा व प्रधानमंडळ यांना सांधणारा मुख्य प्रधान हा एक अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. राजा व पार्लमेंट यांचा परस्पर संबंध घडवून आणून त्यांच्यांत विचारविनिमय होण्यास मदत करणें हेंही त्याचें काम आहे. एकंदरींत प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणें राष्ट्राचें वैभव वाढविण्याकरितां मुख्य प्रधानाला एकसारखें झटावें लागतें. देशाचा तोच एकमेव पुढारी. या नात्यानेंही त्याला निरनिराळ्या वेळीं राष्ट्राला व्याख्यानांच्या रूपानें आपल्या सरकारचें धोरण समजावून द्यावें लागतें. मुख्य प्रधानाच्या कामाचा विचार करतां तो कॅबिनेटरूपी कमानीचा मधला (अर्थात् अत्यंत महत्त्वाचा) चिरेबंदी दगड आहे, असें म्हणतात, तें शब्दशः खरें आहे. राष्ट्राचा त्याला पूर्ण पाठिंबा असेल तर त्याला इकडचें जग तिकडे करतां येईल, इतकी सत्ता त्याच्या हातांत असते. एखाद्या अनियंत्रित राजाला ज्या गोष्टी करणें अत्यंत जिकिरीचें, त्रासाचें व भयंकर वाटतें त्याही तो अत्यंत कुशलतेनें करूं शकतो. त्या दृष्टीनें पाहतां इंग्लंडचा मुख्य प्रधान म्हणजे एक अनभिषिक्त राजाच असतो असें म्हणणें योग्य दिसेल; कांहीं लोकांच्या मतें तो इंग्लंडचा सर्वाधिकारीही ठरेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुख्य प्रधानाच्यासंबंधीं आणखी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो संस्था निर्माण करणारा आहे असें समजण्यांत येतें. त्यानें राजीनामा दिला तर पार्लमेंटची पुन्हां निवडणूक झाली पाहिजे अशी इंग्लंडच्या राजकारणांत रूढी पडून गेलेली आहे. अर्थात् नवी पार्लमेंटसभा होणार व त्याचबरोबर नवें मंत्रिमंडळही अस्तित्वांत येणार. या संस्था मुख्य प्रधानाच्या राजीनाम्यामुळेंच निर्माण होतात. राज्यांतील व साम्राज्यांतील सर्व महत्त्वाच्या नेमणुकीही त्याच्या सल्ल्यानेंच राजा करतो. लोकांस पदव्या, सरदारक्या, बक्षिसें, इनामें, वगैरेंचें दानही त्याच्याच सल्ल्याप्रमाणें राजा करतो. एकंदरींत पाहतां मुख्य प्रधानाच्या जागेचें इंग्लंडच्या राज्यघटनेंत अत्यंत महत्त्व आहे. कॅबिनेटचा अध्यक्ष, सर्व प्रधानांचा मार्गदर्शक, कॉमन्ससभेचा नेता, मतदारांचा विश्वस्त, राजाचा मुख्य व विश्वासू सल्लागार अशा निरनिराळ्या नात्यानें त्याला आपल्या राष्ट्राची धुरा हांकावयाची असते. १०, डाऊनिंग स्ट्रीट, येथील भव्य वाड्यांत त्याची कचेरी असते व तेथेंच तो राहतोही.

प्रिव्ही कौन्सिल

२६. प्रिव्ही कौन्सिल—थोडा पूर्वेतिहास :—प्रिव्ही या शब्दाचा 'खाजगी' असा अर्थ होतो; अर्थात् प्रिव्ही कौन्सिल म्हणजे राजाला खाजगी रीतीनें सल्ला देणारें मंडळ होय. पूर्वीच्या वितन नामक मंडळापासूनच त्याची उत्पत्ति झाली असें मानण्यांत येतें. प्रिव्ही कौन्सिल ही शब्दयोजना मात्र पंधराव्या शतकापासून सुरू झाली. कायदा करणें, त्याची अंमलबजावणी करणें, न्याय देणें वगैरे बाबतींत राजा प्रिव्ही कौन्सिलचा सल्ला घेत असे. तिसऱ्या हेन्रीच्या वेळीं त्या मंडळाकडेच राज्यकारभाराचें बहुतेक सर्व काम होतें. पुढें पार्लमेंटची स्थापना झाल्यावर तीच पद्धति सुरू होती. कॉमन्ससभेच्या कामांतही प्रिव्ही कौन्सिल ढवळाढवळ करूं लागलें. तेव्हां कॉमन्ससभेनें त्या विरुद्ध तक्रार केली व प्रिव्ही कौन्सिलची लुडबूड थांबविली. पुढें राजांनीं प्रिव्ही कौन्सिलांत आपल्या मर्जीतील व विश्वासांतील लोक नेमण्याचा परिपाठ सुरू केला. त्यामुळें त्या मंडळांतील सभासदांची संख्या फुगूं लागली. त्यामुळें राजाला योग्य तो सल्ला मिळेनासा झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ट्यूडर राजांनीं राज्यकारभाराच्या बाबतींत त्या मंडळाचा पुष्कळ उपयोग करून घेतला. स्टुअर्टांनींही तीच गोष्ट चालविली. परंतु दुसऱ्या चार्ल्सनें कांहीं विशिष्ट व्यक्तींसच आपल्या विश्वासांत घेऊन राज्यकारभारांत त्यांचा सल्ला घेण्याचें धोरण स्वीकारिलें. त्यामुळें प्रिव्ही कौन्सिल मागें पडूं लागलें. पुढें पार्लमेंटच्या व प्रधानमंडळाच्या हातीं राज्यकारभाराचीं सूत्रें आल्यावर प्रिव्ही कौन्सिलचें राज्यकारभारांतील महत्त्व नष्ट झालें.

२७. प्रिव्ही कौन्सिलचें काम :—आज हें कौन्सिल अस्तित्वांत आहे. त्यामध्यें इंग्लिश समाजांतील सर्व दर्जाच्या लोकांची नमणूक होत असते. राजघराण्यांतील लोक, आर्चबिशप, पूर्वीच्या व अधिकारारूढ प्रधानमंडळांतील प्रधान, मुख्य न्यायाधीश वगैरे गृहस्थांची त्या मंडळांत राजाकडून नेमणूक होते. आपल्या बुद्धिप्रभावानें ग्रंथलेखक, शास्त्रज्ञ, कवि, कारखानदार, शोधक वगैरे दृष्टींनीं जे लोक पुढें आले त्यांसही हा बहुमान देण्यांत येतो. साम्राज्यांतील कांहीं लोकांसही त्यांत जागा मिळते. त्या मंडळाच्या सर्व सभासदांस ‘प्रिव्ही कौन्सिलर’ अशी पदवी आपल्या नांवापुढें व ‘नेक नामदार’ ही पदवी आपल्या नांवाच्या मागें लावतां येते. या मंडळाच्या अध्यक्षाला ‘लॉर्ड प्रेसिडेंट ऑफ दि कौन्सिल’ असें म्हणतात व तो कॅबिनेटचा सभासद असतो. प्रत्येक सभासदाला राजनिष्ठेची शपथ घ्यावी लागते. कौन्सिलला मुख्यतः दोन प्रकारचीं कामें करावीं लागतात. राजाला महत्त्वाच्या बाबतींत सल्ला देणें व न्याय देणें. पहिलें काम मुख्यतः कॅबिनेटमार्फतच होतें. तेव्हां कॅबिनेटचा सल्ला घेणें म्हणजेच प्रिव्ही कौन्सिलचा सल्ला घेणें अशी इंग्लंडांत रूढी पडलेली आहे; न्यायदानाचें काम करण्याकरितां या मंडळांतील सभासदांची एक कमिटी नेमतात. त्या कमिटींत त्या कौन्सिलचा अध्यक्ष, उमरावमंडळाचा अध्यक्ष व न्यायखात्यांत नांव मिळविलें आहे अशा कायदेपंडित उमरावांची नेमणूक होते. कायद्याची अंमलबजावणी करण्याचें अत्यंत महत्त्वाचें काम या मंडळाकडे असतें. मुख्यतः साम्राज्यांतील सर्व प्रजा आपापल्या देशांतील हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध या कौन्सिलकडे अपील करते. त्या दृष्टीनें पाहतां प्रिव्ही कौन्सिल म्हणजे साम्राज्यांतील सर्वांत मोठें न्यायकोर्ट आहे असें म्हणतां येईल. न्यायकमिटींतील सर्व सभासदांना सालीना चारशें पौंड पगारही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळतो. या कौन्सिलचें तिसरें काम म्हणजे वैद्यक, पशुवैद्यक व औषधें तयार करण्याचे कारखाने यांच्या कामावर देखरेख ठेवणें, म्युनिसिपालिट्यांना सनदा देणें वगैरे. आज प्रिव्ही कौन्सिलांत सुमारें तीनशें सभासद आहेत. अत्यंत महत्त्वाच्या समारंभाच्या वेळींच त्या मंडळाची सभा भरते, औपचारिक चर्चा होते व ती सभा संपते. अजूनही सर्व खास हुकूम 'कौन्सिलच्या सल्ल्यावरूनच' राजा काढतो. अर्थात् प्रिव्ही कौन्सिलचें मोठेपण आज फक्त नांवाचें शिल्लक उरलेलें दिसतें.

अभ्यास

१. राजाचा अधिकार म्हणजे काय ? इंग्लंडच्या राजाचे आजचे अधिकार सांगा. त्यांची अंमलबजावणी त्याला कितपत करतां येते ? इंग्लंडचा राजपदामुळें काय फायदा होतो ?

२. इंग्लंडच्या राज्यघटनेंतील राजाचें स्थान सांगा.

३. कॉमन्ससभेची आजची घटना सांगा. त्या सभेला कोणते विशिष्ट अधिकार आहेत ?

४. कॉमन्ससभेची रचना, अधिकार व कामें सांगा. इंग्लंडमध्यें तीच एक सर्वशक्तिमान् संस्था आहे असें तुम्हांस वाटतें काय ? कशावरून ? उमरावमंडळ व कॉमन्ससभा यांची तुलना करा.

५. उमरावमंडळाची रचना, अधिकार व कामें सांगा. त्या मंडळाचा उपयोग काय ? तें मंडळ नष्ट केलें तर काय होईल ? त्यांत सुधारणा करावयाची झाल्यास तुम्ही कोणती सुधारणा कराल ?

६. प्रधानमंडळात्मक राज्यपद्धतीची उत्पत्ति व वाढ कशी झाली ? दुसरा चार्ल्स, तिसरा विल्यम, ॲन, पहिले तीन हॅनोव्हेरियन राजे, वॉलपोल वगैरे लोक त्याच्या विकासास कितपत कारणीभूत झाले ?

७. कॅबिनेटची घटना सांगून त्याच्या कामाचें वर्णन करा.

८. मुख्य प्रधानाच्या जागेचें महत्त्व सांगा. जनता, पार्लमेंट, कॅबिनेट व राजा यांच्याशीं त्याचें कोणत्या प्रकारचें नातें असतें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. कॅबिनेटचें वैशिष्ट्य सांगा. प्रघात व रूढी यांच्यावरच कॅबिनेटची उभारणी झाली आहे या म्हणण्याचें समर्थन करा.

१०. पार्लमेंटचें कामकाज कसें चालतें तें वर्णा.

११. १८३२, १८६७, १८८४, १९१८, १९२८ हे सन लक्षांत घेऊन इंग्लंडमध्यें मतदानाचा प्रसार कसकसा होत गेला तें सांगा.

१२. थोडक्यांत टिपणें करा :—
प्रिव्ही कौन्सिल, सरकार घडवून आणणारें मंडळ, सन १९११ चा कायदा, मतपरिमर्शिनी सभा, स्पीकर, लॉर्ड हाय चॅन्सेलर, राजाच्या हातून अन्याय होत नाहीं, राजा अमर आहे, मिश्र प्रधानमंडळ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हॅनोव्हर व विंडसर राजघराणीं

हॅनोव्हर घराणें १७१४-१९०१

पहिला जॉर्ज (१७१४-१७२७)
जन्म १६६० मृत्यु १७२७

दुसरा जॉर्ज (१७२७-१७६०)
जन्म १६८३ मृत्यु १७६०



तिसरा जॉर्ज (१७६०-१८२०)
जन्म १७३८ मृत्यु १८२०



चौथा जॉर्ज (१८२०-१८३०)
जन्म १७६२ मृत्यु १८३०



चौथा विल्यम (१८३०-१८३७)
जन्म १७६५ मृत्यु १८३७



व्हिक्टोरिया (१८३७-१९०१)
जन्म १८१९ मृत्यु १९०१



विंडसर घराणें १९०१-

सातवा एडवर्ड (१९०१-१९१०)
जन्म १८४१ मृत्यु १९१०



पांचवा जॉर्ज (१९१०-१९३६)
जन्म १८६५ मृत्यु १९३६

आठवा एडवर्ड १९३६
१० डिसें. १९३६, एका स्त्रीकरितां राज्यत्याग
जन्म १८९४

सहावे जॉर्ज १९३६—चालू—
जन्म १८९५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आधारभूत ग्रंथांची यादी

1. A New History of Great Britain—R. B. Mowat.
2. A Middle School History of England, Vol. III—R. M. Rayner.
3. History of England—A. D. Innes.
4. An Advanced History of Great Britain, Bk. III—T. F. Tout.
5. Concise History of the World—Sir John Marriott.
6. History of England—G. M. Trevelyan.
7. A Text Book of Modern English History, Book, II—C. W. Southgate.
8. Economic History of England—Lipson.
9. Groundwork of British History, Parts I & II—Warner and Marten.
10. The Piers and Ploughman Social & Economic Histories. Books VI & VII—General Editor, E. H. Spalding.
11. Short History of England—Ransome.
12. Cambridge School Histories, Book III—M. M. Elliot.
13. Marten & Carter's Histories, Book IV—Marten & Carter.
14. Economic History of England—Waters.
15. Social History of England—Frederick Bradshaw.
16. Outlines of British Social History—Dance.
17. English People of the Past, Vol. III—M. J. Whicher and M. S. Mitchel.
18. A History of English Life, Vols. III & IV—A. William Ellis and Fisher.
19. A Source Book of English History—Jones.
20. Source Book of English History—Kendal.
21. A History of England for Schools, Part II—Keatinge & Frazer.
22. Our English Towns & Villages—W. Hall.
23. Speeches by Disraeli.
24. Speeches by W. E. Gladstone.
25. Speeches by J. Bright.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

26. Notes on British History, Parts IV & V—W. Edwards.
27. English History Note-book—Margaret Rollstone.
28. Selections from the sources of English History—C. W. Colby.
29. English History from Original Sources, Book IV—Morgan and Bally.
30. A Short History of the British Commonwealth—Ramsey Muir.
31. A History of Everyday Things in England, Vols. III & IV —Morjorie and C. H. B. Quennell.
32. Graphic Charts of British History—Newman.
33. History Time Charts—H. G. Wood.
34. Philips New School Atlas of Universal History—Ramsey Muir.
35. Historical Atlas of the British Empire—Macmillan & Co.
36. Collin's Biographical Histories, Vol. VII—Modern Times —Prescot.
37. Bell's Modern School Histories, Vol. III—Somervell.
38. Short History of the British People, Part V—J. R. Green.
39. A History of the English People, Part I—Pelican Books.
40. Great Victorians, Part I—Pelican Books.
41. Teaching of History—Jarvis.
42. Learning of History—Forth.
43. Teaching of History—F. R. Worts.
44. History in Schools—Drummond.
45. Oxford History of India—V. Smith.
४६. हिंदुस्थानचा इतिहास—प्रो. शं. रा. कानिटकर.
४७. इंग्लंडचा अर्वाचीन इतिहास—रा. प. ह. वर्वे.
४८. इंग्रजांचें स्वराज्य—रा. अ. वा. मराठे.
४९. अर्वाचीन इंग्लंड—रा. वि. के. पानसे.
५०. महाराष्ट्र सांवत्सरिक—प्रो. श्री. म. माटे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूची

अ

अन्न १७९–१८०.
अफगाणिस्थान ४१, ९०, ९८.
अमेरिका ६८, १३२, २३६.
अमुंडसेन २६४.
अल्बामा ६८, ८१.
अलेक्झांडर (झार) ८८.
अलेन्बी २२४.
ॲबर्डीन ३५, ५१, ५६.
ॲबिसीनिया २५३.
ॲस्किथ १९४, २००, २०२–२०६, २१०, २३७.

आ

आइन्स्टाइन २६३.
आगगाडी १४५, १४६, १४९.
आगबोट १४६, १४७.
आफ्रिका १११–११७, १२१–१२६, १९४, २०१.
आयर्लंड ११–१३, ३८, ४३, ७३, ७६, ७७, ८३, ९४–९६, १००, १०५–१०७, १०९, १९०, २०७, २४०.
आल्बर्ट (प्रिन्स) ३०, ४४, ६६.
ऑस्ट्रेलिया १२६, १२८, १२९.

इ

इजिप्त ८७, ९८–९९, १११, ११२, २४०.

ए

एडवर्ड (७ वा) १८६, १९३, १९८, २०१, २०३, २०४.
एडवर्ड (८ वा) २४८, २५१.
एडिसन १५१, २६६.

उ

उदात्ततत्त्ववाद १५६, १५७.
उमरावमंडळ २८३–२८७.

ओ

ओकोनेल ११, १२, १५, ३८, ४३.
ओटावा परिषद २४८.

औ

औद्योगिक क्रांति १४१–१४६, १७३.

क

कपडे १८०–१८२, २७१.
कर्झन (लॉर्ड) १९६, २४१.
कार्डवेल ७४, ७८.
कार्लाइल १७१.
काव्हूर ६६.
कारखाने २४, ३८, ४२, ८६, १५९, १६१–१६५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किचनेर (लॉर्ड) १११, ११६, ११७, २१८.
किपलिंग २७२.
किंबर्ले ११३, ११७.
कील कालवा १९१, १९२.
कुक (कॅप्टन) १२६, १२९.
केल्व्हिन (लॉर्ड) १३९.
केलॉग करार २४६.
केरेन्स्की २२२, २३४.
कैसर ११६, १९१, १९२, २१२–२१४, २२६.
कॅथॉलिक विमोचन ११, १२, १४, १५, ३६, ५९.
कॅनिंग (जॉर्ज) ४–६, २३.
कॅबिनेट २९३–३००.
कॅसलरे ३, ४, ५.
कॉमन्स सभा २८८–२९३.
कॉर्पोरेशन कायदा ११.
कॉबडेन ३३, ३४, ६९.
कॅंपबेल बॅनरमन १९४, २००.
क्रिमियन युद्ध ५३–५८.
क्रूगर (पॉल) ११४–११६, २१४.
क्यूरी (मादाम) १४०.

ख

खार्टूम १११.
खुला व्यापार ८, ९, ३४, ३७, ३८, ४३, ४५, ४७, ४८, ४९, १६७, १८९, २४८.
खेळ १८२, १८३.
खेडीं १७७, १७८, २६८.

ग

गुलामगिरी २३, २४, ६८.
गुप्तमतदान ३३, ७९.
गोडरिच ६, ८, ९.
गॅरिबाल्डी ६६.
ग्रे (लॉर्ड) १८, २०, २१, २५.
गॉर्डन ९९, ११०.
ग्लॅडस्टन ३५, ३८, ४०, ४४, ५१, ५९, ६५, ६९, ७०, ७२, ७४–८२, ९०, ९१, ९४–१०५, १०७, १३५, १८३.

घ

घरें–इमारती १७८, १७९, २७०.

च

चर्चिल (रॅंडॉल्फ) १०५.
चर्चिल (विन्स्टन) २००, २४२, २४४, २५६, २५७, २५९.
चार्टिस्ट ३२, ३३, ४२, ४३, ४६, ४७.
चीन ६१, ६३, ६४, ११०, १९६.
चेंबर्लेन (जोसेफ) ९४, १०१, १०५, १०९, ११६, १३५, १४४, १८७, १८९, १९४, २४१.
चेंबर्लेन (नेव्हिल) २५४, २५५, २५६.

ज

जगदीशचंद्र बोस २६३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
जटलंड २२४.
जपान १९६–१९८, २५४.
जर्मनी ६७, १९१–१९५, १९७, २०९, २१२, २१३, २१६, २१७, २२५, २५४–२५९.
जेलिको २२४.
जेम्सन (डॉ.) ११५.
जॉर्ज (४ था) १–३, १७.
जॉर्ज (५ वा) २०३, २०४, २४८
जॉर्ज (६ वा) २५२, २५३.
ज्यू लोक ६४, ६५.

ट

टाइथ २६, ३८.
टेनिसन १७०.
टेलीफोन १४८.
टेलीव्हिजन २६६.
टॅस्मन १२६.
ट्रेंट प्रकरण ६९.
ट्रामगाड्या १४९.

ड

डरहॅम (लॉर्ड) ३०, ३१, १३७.
डार्बी (लॉर्ड) ४४, ६४, ६५, ७०, ७२, ७३.
डार्विन १३९.
डिकन्स १७१.
डिझरेली ४०, ४४, ६५, ७२, ७३, ८२, ८४–९२, १३५, १५६.
डी व्हॅलेरा २४०.
डेव्ही (हंफ्री) १३८.
डॉज योजना २४२.

त

तारायंत्र १४८.
तुर्कस्थान ६, ५१–५४, ५८, ६१, ८१, ८७, ११०, २०८, २१३.

थ

थॅकरे १७१.
थिसलवुड २.

द

दळणवळण १४४–१४८, २६६.

ध

धान्याचा कायदा ८, ३२, ३३, ३६, ३९, ४०.
धान्य-कर-विरोधी संघ ३३, ३४, ४०, ४८.

न

नाइटिंगेल (फ्लॉरेन्स) ५७.
निकोलस (झार) ५१, ५३.
नेपोलियन (३ रा) ४३, ४४, ५४, ६२, ६६, ६९, ८०.
नौकानिर्बंधाचे कायदे ७, ४४.
नॅव्हॅरिनो ६.
न्यूमन १५८, १७१.
न्यूझीलंड १२९.

प

पामर्स्टन ९, ४४, ४५, ५९–७०.
पार्नेल ९४–९७, १०६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाश्वर १४०

पार्लमेंट (सुधारणा) ४, ११, १८–२२, २७, २८, ७२, ९७, ९८, २३९, २४४.

पार्लमेंट ॲक्ट २०३–२०६.

पील (रॉबर्ट) ४, ७, १२, २०, २५, ३१, ३५–४२, ४३.

पूर्वेकडील प्रश्न ६, १०, ५१, ५२, ८१, ८८.

पोलिस ७, १७५.

प्रदर्शन ४४.

प्रधानमंडळ २९३–२९८

प्राथमिक शिक्षण ७७, ८६, १०७.

प्रिव्ही कौन्सिल ३००–३०२

फ

फॅरडे (मायकेल) १३८, १३९, १४९.

फर्डिनंड लेसेप्स ८७.

फिनियन ७३.

फ्रेंच राज्यक्रांति १०, ४३.

फॅशोडा १११.

फॉर्स्टर ७४, ७७.

फ्रँकलिन १४९.

ब

बट (ऐझॅक) ९४.

बर्लिन परिषद ८९.

बायसिकल १५१, १५२.

बाल्कन युद्ध २०७, २०८.

बाल्फोर १०५, १०६, १०९, १८७, १९४.

बाल्डविन २४१, २४२, २४८, २५१, २५३, २५४.

बिस्मार्क ६७, ८०, ८९, १९१, १९३.

बेसेमर १४३

बेकन्सफील्ड ८४, ८९, ९८.

बोअर लोक १११, ११२.

बोअर युद्ध ११६, ११७, २१४.

बोनर लॉ २३७, २४०, २४१.

बोथा ११७.

बोल्शेविझम् २३५.

बॅलाक्लॅव्हा ५५.

बँकांचा कायदा ९, ३७, १६९.

बॅनरमन १९४, २००.

बॅलट ॲक्ट ७९.

ब्राइट ३३.

ब्राउनिंग १७०.

भ

भिकाऱ्यांचा कायदा २४, २४४.

म

मजुबा ११३.

महादी ९९.

मजूर संघ ८, ७९, १६४.

मन्रोतत्त्व ५, १०९.

माल्थस १७१.

मार्कोनी २६३.

मिल (जॉन) ३३, १७१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुसलीनी २३२, २३४.
मुख्य प्रधान २९५-२९७, २९८, २९९
मेटर्निक ४३.
मेकॉले १७१.
मेलबर्न (लॉर्ड) २५, ३०, ३१, ३५.
मेसफील्ड (लॉर्ड) २७२.
मोटारगाडी १५१.
मोल्टक ६७.
मोर्ले (लॉर्ड) १९४, २०१.
मॅकडोनल्ड २४०-४२, २४६-४८.
मंगोपार्क १२२, १४३.
म्युनिसिपालिट्यांचा कायदा २५.

य

येटस् २७३.

र

रस्किन १७१.
रसेल (लॉर्ड) ३, १८, २०, २३, ४२-४४, ६२, ७०.
राष्ट्रसंघ २२९, २३१.
राजपद २७५-२७७.
राजपदाचा उपयोग २८०.
राजाधिकार २७७-७९.
रोजबरी (लॉर्ड) १०८, १३५.
रॅगलन (लॉर्ड) ५५.
ऱ्होडस् (सेसिल) ११४-११६

ल

लिटन् (लॉर्ड) ९०.
लिस्टर १४०.
लिव्हरपूल ३, ९, ३६.
लिव्हिंग्स्टन १२४.
लिंकन ६८.
लुई फिलीप १०, ४३, ६२.
लेनिन २२२, २३२, २३४.
लोकेर्नो करार २४४.
लॉसेन परिषद २४१.
लॉइड जॉर्ज १९४, १९६, २००, २०२, २०७, २२७-२३७, २४०.

व

वर्डस्वर्थ १७०.
विमान १५१, २२६, २२७, २६४.
विल्बरफोर्स २३.
विल्यम (४ था) १७, १८.
वुड्रो विल्सन २२७, २२९, २३६.
वेलिंग्टन ६, ९, १०, ११, १२, १८, २०-२१, २७, ३५, ३६, ४१-४२.
व्हिक्टोरिया २६, २९, ३०, ६२, ८७, ९७, ११७.
व्हर्सायचा तह २२७-२२९, २३३, २३९, २५५.
व्यापारी सवलतींचा कायदा ८.

श

शहरें १७३-१७७, २६९-७०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षण-शाळा १५९.
शिक्षणाचा कायदा २४, ७७, १००, १८७.
शेतकी १४३, १४४, २६८.
शॅफ्टस्बरी (लॉर्ड) १५६.
शॉ (बर्नार्ड) २७३.

स

साम्राज्यवाद ८७, ९३, १०९, ११५, १३२–१३५, १८९.
समाजसत्तावाद १५६, १६५.
सफ्रेजेट २१०, २३८.
सिनफीन २४०.
सिनेमा-बोलपट २६६.
सिड्मथ ३४.
सिंपसन (डॉ.) १४०.
स्पीकर २८९–२९०
सुवेझ ८७, ८८, १४७.
सूडान ९९, १११.
सेबॅस्टिपूल ५५.
सॅल्सबरी (लॉर्ड) ८९, १००, १०१, १०५, १०९, ११०, १२६, १८७.
स्टॅलिन २३५.
स्टीफन्सन १४५, १४६.
स्कॉट (वॉल्टर) १७०.
स्थानिक स्वराज्य २५, १०७, १०८.
संरक्षित व्यापारपद्धति ३४, ४०, ४५, ४८, १६७, १९०, २४१.
सॅनस्टेफॅनो ८८.
स्पेन्सर १७२.

ह

हस्किसन ४, ७, ८, ९.
हॉल्डेन १९४, १९५, २००.
हिंदुस्थान १०, २४, ४१, ५४, ५५, ७८, ८७, ११०, १२९, १३०, १४७, १९६, २०१, २०४, २३८, २३९, २४६, २४८.
हिंडेनबुर्ग २२०, २३३, २३४.
हिटलर २३२, २३३, २४४, २५५, २६०.
हिल (रोलंड) ३२.
होमरूल (आयर्लंड) १००–१०३.
हेग २१७.

LIBRARY,
GURUKULA KANGRI.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri







CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri











CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

KPH

किंमत १। रु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Arya Samaj Foundation Chennai an

ब्रिटिशांचा इतिहास

*

खंड दुसरा
(उत्तरार्ध)
इ. स. १८२०
ते
इ. स. १९४०

*

वि. सि. चितळे,
बी. ए., बी. टी.,
टी. डी. (लंडन)

*

कर्नाटक
पब्लिशिंग
हाउस,
मुंबई २

lic Domain. Gurukul Kangri Collect